भट्टोजी दीक्षितकृत

प्रौढ मनोरमा

व

त्या ग्रंथावरील शब्दरत्ननामक टीका
यांचें स्त्रीप्रत्ययान्त

विस्तृत विवरणासह व प्रक्रियेसह
मराठी

सुबोध भाषांतर

भाग ४ था

(विसर्गसन्धि, स्वादिसन्धि व अजन्तपुल्लिङ्गप्रकरण
'सर्वादीनि सर्वनामानि' पर्यंत)

विवरणकर्ता

कै० रावबहादुर ना. दा. वाडेगांवकर, एम्. ए.
सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज, नागपूर.

किमत रु. ११

मनोरमा व शब्दरत्न

यांचें

मराठी भाषांतर

भाग ४ था

अनुक्रमाणिका

विसर्गसन्धिप्रकरणम्

स्वादिसन्धि प्रकरणम्

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

रा. रा. रावबहादुर ना. दा. वाडेगांवकर यांनी प्रौढ मनोरमा व शब्दरत्न या ग्रंथांचें जें स्त्रीप्रत्ययान्त विवरण केलें आहे त्याचा बराचसा भाग मी वाचला. या ग्रन्थांत प्रथम प्रत्येक पंक्तीचा अक्षरार्थ देऊन पुढें कंसांत त्या पंक्तीचें विस्तृत व मार्मिक विवरण केलें आहे व आवश्यक ठिकाणीं पूर्ण प्रक्रिया दिली आहे. त्यामुळें ग्रन्थाचा बोध होण्यास साधारण बुद्धीच्या विद्यार्थ्याला देखील माझ्या मतें कांही अडचण येऊं नये. या ग्रन्थांत ठिकठिकाणीं भाष्य, प्रदीप, उद्योत, काशिका, पदमञ्जरी इत्यादि ग्रन्थांतून समर्पक उतारे दिले असल्यामुळें हा ग्रन्थ आदर्शभूत झाला आहे व युनिव्हर्सिटीसारख्या संस्थांनी हा माननीय ग्रन्थ संग्रहीं ठेवण्यास अत्यंत लायक आहे. विद्यार्थीवर्गाच्या हिताकरितां हा ग्रन्थ जितक्या लवकर छापला जाईल तितकें बरें व या ग्रन्थाचें हिन्दींत भाषान्तर करून ते छापल्यास यू. पी., पंजाब, बंगाल वगैरे प्रांतांतील विद्यार्थ्यांना फार फायदा होईल. मी हा ग्रन्थ वाचून फार प्रसन्न झालों आहे व एवढे कठिण व्याकरणशास्त्राचे ग्रन्थ महाराष्ट्र भाषेंत उतरविणें दुष्कर असून देखील रा. ब. वाडेगांवकर यांनीं हें जें काम सरळ व सुंदर भाषा लिहून प्रशंसनीय रीतीनें केलें आहे त्याबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक अभिनन्दन करितों.

बनारस
ता. ६–१२–४४

गोपाल शास्त्री नेने
व्याकरणाध्यापक, ग. सं. कॉलेज, **बनारस**

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

संस्कृत भाषेंतील शास्त्रीय ग्रन्थाचें मराठी भाषेंत यथार्थ भाषान्तर करणें हें कार्य सगळ्यांनाच उत्तम रीतीनें साधतें असें, नाहीं. पं. आचार्य भक्त विष्णुशास्त्री बापट, दीक्षित, भाऊशास्त्री लेले, म. म. पं. वासुदेव शास्त्री अभ्यंकर प्रभृति दिवंगत व विद्यमान पं. धुण्डिराज शास्त्री उर्फ बापू दीक्षित, बापट, पांचगांवकर प्रभृति ग्रन्थकारांनीं केलेलीं भाषांतरें वजा करितां बहुतेक भावार्थानुवादात्मकच भाषांतरें आहेत म्हणावयास हरकत नाही. भाषांतरित ग्रन्थांत सुद्धां वेदान्तादि शास्त्रीय ग्रन्थांचीं भाषांतरें लोकांत प्रचलित असलेल्या दृष्टांतादिकानीं सुरुचिर तरी करितां येतात. परंतु सर्वथा नीरस व क्लिष्ट अशा व्याकरण शास्त्रांतील विशिष्ट टीकाग्रन्थांचें भाषांतर सुव्यवथित व यथार्थ रीतीनें करणें हें कार्य अति अवघड व फारच कष्टसाध्य असें आहे. म्हणूनच जेथें वेदान्त, धर्मशास्त्र वगैरे शास्त्रांतील दहा दहा ग्रन्थांचीं भाषांतरें झालेलीं मिळतात, तेथें व्याकरणशास्त्रांतील दोन तीनच ग्रन्थांचीं भाषांतरें झालीं आहेत याचें कारण उघडच आहे. प्रस्तुत ग्रन्थकारांनीं कांहीं वर्षांपूर्वीं श्री. नागोजीभट्ट काळे यांनी केलेल्या परिभाषेन्दुशेखर नांवाच्या ग्रन्थाचें मराठींत सुंदर भाषांतर केलेलें प्रसिद्ध आहेच. आतां प्रकृत ग्रन्थकारांनीं शब्दरत्न मनोरमेचें अव्ययान्त भागाचे मराठींत भाषान्तर केलें आहें. तें मी बरेंच स्थळीं आपाततः व एकाध प्रकरण अक्षरशः संपूर्ण वाचून पाहिलें आहे. त्यामुळें मला निश्चयानें असें सांगतां येतें कीं सदरहू भाषांतर प्राचीन परंपरेला व मूळांतील गंभीर अर्थाला कोठेंहि न सोडतां उत्तम रीतीनें केलेलें आहे. व्याकरणासारख्या नीरस, क्लिष्ट शास्त्रांतील अति कठीण टीकाग्रन्थाचें उत्कृष्ट भाषांतर करितां येतें याकरितां हा ग्रन्थ सर्वदा उत्कृष्ट उदाहरण म्हणून दाखवितां येण्यासारखा आहे. अस्तु. ज्यांना व्याकरणशास्त्राचें अध्ययन करण्याची आवड आहे परंतु गुरूकडे जाऊन अध्ययन करितां

येणें शक्य नाहीं; तसेंच गुरूजवळ अध्ययन करूनहि ग्रन्थ स्पष्ट होण्याकरितां पुन: चिंतनाची आवश्यकता आहे अशा उभयविध जिज्ञासूंना या ग्रन्थानें फार उपयोग होणार आहे.

७५ चें आंतबाहेर वय, इंद्रियें एका काळीं आपलीं असूनहि आपलीं नाहींत अशी साक्ष पटवीत आहेत. या कालांतील सांसारिक सुख, अशा परिस्थितीत १५–१५ तास दिवसा तसेंच रात्रींहि व्याकरणशास्त्रासारख्या नीरस क्लिष्ट विषयांत एकाग्रचित्तानें विचार करीत समाधि स्थितींत असलेल्या श्रीमान पंडित बाबासाहेब वाडेगांवकरांना पाहिलें म्हणजे प्राचीन विद्वानांचीं वर्णनें प्रत्यक्ष डोळ्यांसमोर उभीं राहतात. असो. हा ग्रन्थ लवकरच प्रसिद्ध होण्याचा योग यावा व मराठी भाषेंत एका उत्कृष्ट भाषांतराची भर पडावी अशी सदिच्छा प्रकट करितों.

पौष वद्य २००१ (६) बुधवार
ता. ६–१२–४४, काशी

पं. अनंत शास्त्री फडके
व्याकरणाचार्य, मीमांसातीर्थ
प्रा. ग. स. कॉ., काशी

॥ श्री विश्वनाथो विजयते तमाम् ॥

रा. ब. श्री. ना. दा. वाडेगांवकर यांनी 'प्रौढ–मनोरमा आणि शब्दरत्न' ह्या व्याकरण शास्त्रावरील जटिल दोन ग्रंथांचें जें महाराष्ट्र भाषेंत विस्तृत विवरण केलें आहे त्याचा कांही भाग मी वाचला. हा ग्रंथ सर्वांगसुंदर जाहला आहे. जसा एखादा वैयाकरणमूर्द्धन्य आपल्या प्रियतम विद्यार्थ्यांस प्रत्येक पंक्तीचें विशद विवरण करून ग्रंथाचें गूढ ग्रन्थिरहस्य एकान्तांत सांगतो तसें हें 'भाषान्तर' वाचकांस चटकन ग्रंथ प्रमेय सांगतें. यांत प्रत्येक पंक्तीचा अक्षरार्थ प्रथम देऊन नंतर कंसांत त्यांचें विस्तृत विवरण केलें आहे व जेथें प्रक्रिया देणें आवश्यक आहे तेथें सूत्रें देऊन सविस्तर प्रक्रिया दिलीं आहे आणि ठिकठिकाणीं भाष्य,काशिका, प्रदीप, उद्योत, शब्देन्दुशेखर, पदमंजरी इत्यादि ग्रंथांतील समर्पक उतारे दिले आहेत; त्यायोगें ग्रंथ समजण्यांत अडचण जात नाहीं. माझी पूर्ण खात्री आहे कीं ज्याने कौमुदीचें अध्ययन केलें आहे त्याला शिक्षकाच्या सहाय्याशिवाय हा ग्रंथ वाचल्यानें मनोरमा व शब्दरत्न यांतील पंक्ति उत्तम रीतीनें समजूं शकते. असा सर्वोत्कृष्ट ग्रंथ लिहिल्याबद्दल मी रावबहादुर यांचें सप्रेम हार्दिक अभिनंदन करितो. महाराष्ट्र प्रान्तांत व्याकरणशास्त्राचा विशेष प्रचार विरल आहे. उत्तर (हिंदुस्थानांत) भारतांत व्याकरणशास्त्राचा विशेष प्रचार असल्यामुळें या ग्रंथाचें हिन्दींत भाषान्तर होणें आवश्यक आहे. तसें भाषान्तर केल्यास व्याकरणशास्त्राध्ययन करणाऱ्या छात्रवर्गावर फार उपकार होतील.

बनारस
कार्तिक कृ. १३ सोमवार
ता. १३-११-४४

सदशिव शास्त्री मुसलगांवकर
माजी प्रिन्सिपल, संस्कृत कॉलेज,
ग्वाल्हेर

॥ श्री ॥

श्री. रा. ना. दा. वाडेगांवकर यांनीं प्रौढ मनोरमा व शब्द-रत्न या गहन ग्रन्थांचें महाराष्ट्र भाषेंत जें स्त्रीप्रत्ययान्त विवरण केलें आहे त्याचीं तीन प्रकरणें मी वाचलीं. या विवरणांत प्रत्येक पंक्तीचा प्रथम अक्षरार्थ देऊन पुढें कंसांत विस्तृत विवेचन केलें आहे व अवश्य ठिकाणीं सूत्रें व सूत्राङ्क देऊन पूर्ण प्रक्रिया दिली आहे, आणि तसेंच भाष्य, प्रदीप, उद्योत, शब्देन्दुशेखर, काशिका, पदमञ्जरी इत्यादि ग्रंथांतून आवश्यक स्थलीं समर्पक उतारे दिले असून त्यांचा भावार्थहि दिला आहे. त्यामुळें प्रत्येक पंक्तीचा उत्तम रीतीनें अर्थबोध होतो. हा ग्रंथ सरल व सुंदर भाषेंत लिहिला असल्यामुळें सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्याला देखील ग्रंथबोध होण्यांत कांही अडचण येऊं नये. शब्दरत्नाची भाषा फार अवघड आहे व त्या ग्रंथाचा गूढार्थ मराठी भाषेंत पूर्णपणें उतरविणें हें दुष्कर असून देखील या विवरणांत तें उत्तम रीतीनें केलें. सारांश हें विवरण अत्यन्त सुंदर, बोधप्रद व आदर्शभूत झालें आहे व या उतारवयांत शरीर रोगग्रस्त झालें असून देखील वाडेगांवकर साहेबांनी जो एवढा प्रचण्ड व सुंदर ग्रन्थ निर्माण केला आहे त्याबद्दल त्यांचें जितकें कौतुक व अभिनंदन केलें तितकें कमीच आहे.

दिवाकर शास्त्री जोशी,
व्याकरणाचार्य,
व्याकरण शास्त्राध्यापक, गवर्नमेण्ट संस्कृत कॉलेज व स्था. जैन विद्यालय, बनारस.

ता. ६-१२-४४

भोंसला वेदशास्त्र महाविद्यालय

(संशोधन व प्रकाशन मंडळ)

पत्रव्यवहाराचा पत्ता :—

श्री. कृ. मा. चौरीकर

कार्यवाह,

भोंसला वेदशास्त्र महाविद्यालय,

सर्कल ६, अयाचित रोड, नागपूर २

अर्पण पत्रिका

"ज्याचें

त्याला

निवेदन।"

॥ श्री ॥

मनोरमा व शब्दरत्नाचा मराठी अनुवाद.

नम्र निवेदन

माझे परमपूज्य ती. कै. रा. ब. ना. दा. वाडेगांवकर यांनीं प्रौढ मनोरमा व शद्बरत्न या संस्कृतव्याकरणविषयक ग्रंथाचें जें स्त्रीप्रत्ययान्त विवरणात्मक मराठी भाषांतर करून ठेवलें आहे तें प्रसिद्ध करण्याच्या दृष्टीनें मार्च १९५१ मध्यें मी या प्रचंड ग्रंथाचा पहिला भाग ईशदयेनें प्रकाशित केला. यानंतर माझे बंधु रा. सा. वामनराव व श्री रा. विश्वनाथराव, संपादक, 'उद्यम', यांनी अनुक्रमें दुसरा भाग आगस्ट १९५७ व तिसरा जानेवारी १९६१ मध्यें प्रकाशनाचा सबंध खर्च सोसून प्रकाशित करविला. या दहा वर्षांत केवळ तीनच भाग प्रकाशित होऊं शकले व हस्तलिखिताची केवळ ११९८ पानेंच खर्ची पडलीं असून सुमारे २१०० पानें हस्तलिखित प्रकाशित होणें आहे. हें संपूर्ण कार्य कसें व केव्हां होणार या विवंचनेंत असतां, भोसला संस्कृत महाविद्यालय, नागपूर ही संस्था अनपेक्षितपणें माझे सहायार्थ धावून आली व हा संपूर्ण ग्रंथ येत्या ५ । ६ वर्षांत तिनें प्रकाशित करण्याचें ठरविलें. यामुळें मी फार मोठ्या जबाबदारींतून मोकळा झालों. दर वर्षी मकरसंक्रांतीचें

सुमारास एक या हिशेबानें संस्थेनें उर्वरित संपूर्ण ग्रंथ ५ भागांत १९६६ अखेर प्रकाशित करण्याचें ठरविलें आहे. या अमोल सहायाबद्दल संस्थेचे — विशेषतः तिचे अध्यक्ष श्री. रा. बाळशास्त्री हरदास यांचे— कृतज्ञताबुद्धीनें मनः-पूर्वक आभार मानण्यास माझेजवळ पुरेसे शद्ब नाहीत असें मी प्रांजलपणें कबूल करतो. संपूर्ण ग्रंथ प्रकाशित करण्यानें माझे जबाबदारींतून तर संस्थेनें मला मुक्त केलेंच पण त्या-बरोबर या विषयाचे जिज्ञासु व अभ्यासु वर्गावर संपूर्ण ग्रंथ पुढील पांच वर्षांत प्रकाशित करून फार मोठे उपकार केले आहेत. आजपर्यंत झालेल्या प्रगतीच्या मानानें कदा-चित २५ वर्षांतहि जें काम मजकडून होऊं शकलें नसतें तें संस्थेनें अंगावर घेऊन ५ वर्षांत पूर्ण करण्याचें ठरविलें या-बद्दल संस्थेस द्यावेत तितके धन्यवाद थोडेच होतील. ही संस्था देखील जनतेच्या सहानुभूति व सहकार्यावरच चालणारी संस्था असल्यामुळें या प्रकाशनामुळें संस्थेस किंचितहि आर्थिक घस सोसावी लागू नये या बाबतींत संस्थेचे हितचिंतक व संस्कृतचे अभिमानी अवश्यमेव जाग-रूक राहतील याबद्दल मला मुळींच शंका वाटत नाही. आजवर ज्यांनी ज्यांनी एवढी मजल गाठीपावतों मला निरनिराळ्या प्रकारें सहाय्य केलें त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

माझे वडिलांनी तपःश्चर्याविजा संकृत व मराठी वाङ्मय-याची जी सेवा केली ती ईश्वरास मान्य असेल व आमचा पितृ-ऋण फेडण्याचा योगच असेल तर सत्यसंकल्पाचा दाता भग-

वान स्वतःच हें सकृतदर्शनीं अवघडच नव्हें तर अशक्यप्राय वाटणारें कार्य लीलया परिणत करवून घेईल असा मला भरंवसा आहे. दहा वर्षांपूर्वी या ग्रंथाबद्दल मी एक लहान पुस्तिका प्रसिद्ध केली होती. तींत शेवटीं हा भरंवसा व्यक्त केला होता. तो माझा विश्वास आज फलद्रूप होऊन त्या दयाघनाचे प्रेरणेनेच संस्थेनें हें प्रचंड कार्य हातीं घेतलें असें मी समजतो.

हें सर्व ज्या ईश्वराच्या एकमेव कृपेमुळें घडून आलें त्याचें चरणीं वंदन करून हें निवेदन संपवितो.

– खं. ना. वाडेगांवकर

कै० रावबहादुर ना. दा. वाडेगांवकर, एम्. ए.
सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज, नागपूर

प्रस्तावना

— लेखक —

महामहोपाध्याय बाळशास्त्री हरदास, साहित्याचार्य

नागपूर

पंडित श्रेष्ठ कै. रावबहादूर ना. दा. वाडेगांवकर यांच्या या महान् कृतीचे तीन खंड यापूर्वी त्यांचे साक्षेपी चिरंजीव श्री. खं. ना. वाडेगांवकर यांनी प्रसिद्ध केलेलें असून त्यावरून या कृतीचें महत्व किती आहे हे सर्वांना कळलेलेंच आहे. त्यांच्या या ग्रंथराजाचा प्रस्तुतचा चवथा खंड व यानंतरचे सर्व खंड भोसला वेदशास्त्र महाविद्यालयाच्या संशोधन व प्रकाशन मंडळाने प्रकाशित करावयाचे ठरविलेलें असून तदनुसार त्या मंडळाच्या वतीनें हा खंड आज प्रकाशित करण्यांत येत आहे. भोसला वेदशास्त्र महाविद्यालयाच्या संशोधन व प्रकाशन विभागाचा अध्यक्ष म्हणून हें कार्य पार पडतांना मला जसा कर्तव्यपूर्तीचा आनंद होत आहे असाच व्यक्तिशः मला गुरु सेवा घडत असल्याचाहि आनंद वाटतो. कारण कै. रावबहादूर नारायणराव वाडेगांवकर हे माझे व्याकरणशास्त्राचे गुरू

होते. मी व माझे मित्र डॉ. विनायक वामन करंबेळकर त्यांच्याजवळ सिद्धांतकौमुदी शिकावयास जात होतो.

रा. ब. वाडेगांवकर यांचा विद्याव्यासंग हा एक अलौकिक चमत्काराचा विषय होय. इंग्रजी विद्या हस्तगत करून न्यायमूर्ति पदासारख्या श्रेष्ठ पदावर अधिरूढ होऊनहि त्यांची वैदिक धर्मावरील श्रद्धा व संस्कृत विद्येची उपासना जाज्वल्य राहिली. भारतीय विद्येचा अलौकिक व्यासंग करून संस्कृत शास्त्रावरील आकर ग्रंथांची निर्मिति करणारे वैय्याकरणकेसरी सदाशिव भट्ट घुले यांच्यासारखे श्रेष्ठ ग्रंथकार नागपूरला झाले. पण ते केवळ आजन्म संस्कृत विद्येचाच व्यासंग करणारे व त्याहून अन्य कोणत्याहि व्यवसायांत नसलेले असें होते. रा. ब. वाडेगांवकर हे अशा कालखंडांत जन्म पावले की ज्या कालखंडांत वावरणारा पाश्चात्य विद्याविभूषित व उच्चपदाधिष्ठित पुरुष हा सामान्यत: सुधारणावादाकडे कल असलेला व भारतीय विद्या आणि कला यांच्याकडे सामान्यत: तुच्छताबुद्धीने पाहणारा असावयाचा. रा. ब. वाडेगांवकर यांच्या बाबतींत हा संकेत खोटा ठरला आणि विद्येचा – विशेषत: संस्कृत व्याकरणशास्त्राचा एखाद्या व्यसनासारखा ध्यास घेऊन त्यांनी आपल्या अपूर्व ग्रंथनिर्मितीने मराठीचें दालन समृद्ध केलें.

कै. वाडेगांवकर हे नागपूरचे वैय्याकरणकेसरी व उत्तररामचरिताचे प्रसिद्ध टीकाकार कै. म. म. भट्टजीशास्त्री घाटे यांचे शिष्य होत. भट्टजीशास्त्री घाटे हे नाग-

पूरचे चालते बोलते असे श्रेष्ठ विद्यापीठच असून या विद्यापीठांतूनच कै. म. म. डॉ. केशवरावजी ताम्हन, कै. म. म. पंडितसम्राट कृष्णशास्त्री घुले, कै. पंडितवर्य गोपाळराव गर्दे, कै. म. म. सदाशिव जयराम देहाडराय, कै. वैय्याकरण केसरी बाळशास्त्री घाटे, कै. पंढरीनाथ-शास्त्री घाटे प्रभृति स्नातक बाहेर पडले. कै. वाडेगांवकर हे याच महान् विद्यापीठांतील स्नातक होत.

इ. स. १९२६ मध्ये डिस्ट्रिक्ट व सेशन्स् जज्जाच्या जागेवरून निवृत्त झाल्यावर त्यांनी थकत्या काळची हक्काची विश्रांति घेण्याऐवजी आपल्या आवडीच्या विद्या-व्यासंगाला स्वतःला वाहून घेतले. सेवानिवृत्तीनंतर काशीला जाऊन त्यांनी आपल्या विद्येला आलेली मलिनता झाडून टाकली. त्यानंतर नागपूरला स्थिरपद होऊन त्यांनी आपले मित्र कै. पं. गोपाळराव गर्दे यांच्या समवेत व्याक-रणशास्त्राच्या सखोल मननचिंतनांत स्वतःला निमग्न करून घेतले. त्यांच्या याच चिंतनांतून मराठीला ललामभूत ठर-णारे दोन ग्रंथ निर्माण झाले. एक परिभाषेंदुशेखराचा मराठी अनुवाद व दुसरा प्रौढ मनोरमा व शब्दरत्न यांचा स्त्रीप्रत्ययान्त विवरणात्मक मराठी अनुवाद होय.

जिच्या अनुवादाचा चौथा खंड भोसला वेदशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने प्रकाशित होत आहे ती मनोरमा म्हणजे भट्टोजी दीक्षितांनी स्वतःच्या सिद्धांत कौमुदी या ग्रंथावर स्वतःच लिहिलेली टीका होय. सिद्धांत कौमुदी

हा व्याकरणशास्त्रांतील अलौकिक ग्रंथ असून त्या ग्रंथाच्या उदयाबरोबर इतर पठण पाठण बंद पडून त्या ग्रंथाच्या द्वारेच संस्कृत व्याकरणशास्त्राच्या अध्ययन अध्यापनाची परंपरा सुरूं झालीं. कौमुदीच्या वर्णनाचा पुढील श्लोक, तिची श्रेष्ठता यथार्थपणे प्रगट करतो.

" कौमुदी यदि कंठस्था वृथा भाष्यपरिश्रमः ।
कौमुदी यद्य कंठस्था वृथा भाष्यपरिश्रमः ॥ "

भट्टोजी दीक्षितांनी सिद्धांत कौमुदीची रचना केल्यावर तिच्यावर आक्षेप घेणारे अनेक वैय्याकरण झाले. त्या सर्वांचें खंडन करून कौमुदींत व्यक्त केलेल्या मतांचें समर्थन करण्यासाठी मुख्यतः त्यांनी प्रस्तुत प्रौढ मनोरमा लिहिली आहे. भट्टोजींच्या या ग्रंथांत त्यांची कठोर कर्तव्यनिष्ठा उत्कटतेने प्रगट झालेली आहे. त्यांनी प्रस्तुत ग्रंथांत काशिका, न्यास, पदमंजरी, प्रक्रियाकौमुदी इत्यादि ग्रंथांतील अपप्रतिपादनाचा तर समाचार घेतला आहेच पण आपले गुरु शेषश्रीकृष्ण यांच्याहि मतांचे खंडन केलें आहे. शास्त्रनिष्ठेला अतिरेकी व्यक्तिनिष्ठेचें कसें वावडे असतें याचें भट्टोजींची प्रौढ मनोरमा हें एक उदाहरणच होय.

कै. रा. ब. वाडेगांवकर हेहि न्यायनिष्ठुर व कठोर शास्त्रनिष्ठ होते. या समानधर्मत्वामुळे भट्टोजींच्या ग्रंथाकडे रा. ब. आकर्षिले गेले असले तर ते अत्यंत योग्यच होय.

भट्टोजींच्या प्रौढ मनोरमेवर अनेक व्याकरणज्ञांनी टीकांची झोड उठविली. या टीकाकारांच्या मतांचें खंडन करणाऱ्या ज्या अनेक टीका प्रौढ मनोरमेवर झाल्या त्यांत भट्टोजी दीक्षितांचा नातू, हरि दीक्षित यांची शब्दरत्न ही टीका सर्वश्रेष्ठ मानली जाते. ही टीका वस्तुतः हरि दीक्षितांनी लिहिलेली नसून ती त्यांचे विख्यात कीर्ति शिष्य नागोजी भट्ट यांनी लिहिलेली आहें हे आता विद्वानांना मान्य झालेलें आहे.

व्याकरणशास्त्रावरील या श्रेष्ठ व महत्वाच्या ग्रंथांचा विवरणात्मक अनुवाद आजवर कोणत्याहि भाषेंत झालेला नाही. या दृष्टीने कै. रा. ब. नारायणराव वाडेगांवकर यांची कामगिरी केवळ अपूर्व होय. त्यांनी केवळ महाराष्ट्र शारदेचे दालनच या आपल्या कृतीने समृद्ध केलें असें नव्हे; तर आंतर भारतीय भाषांत मराठीला सर्वश्रेष्ठ वैभव प्राप्त करून दिलें आहे. महाराष्ट्र सारस्वत त्यांचे सदैव ऋणी राहील यांत शंका नाही.

प्रस्तुत ग्रंथाचे तीन खंड कै. वाडेगांवकर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. खंडेराव वाडेगांवकर यांनी प्रकाशित केले आहेत. प्रस्तुत चौथ्या भागापासूनच्या पुढील सर्व भागांच्या प्रकाशनाचें दायित्व श्री. वाडेगांवकर यांनी करारपत्राने भोसला वेदशास्त्र महाविद्यालयाकडे सोपविलें असून महाविद्यालयाच्या संशोधन व प्रकाशन विभागाने तें दायित्व संपूर्णपणे स्वीकारलें आहे. श्री. खंडेराव वाडे-

गांवकर यांनी कै. रा. ब. नारायणराव वाडेगांवकर यांच्या सेवेची ही सुसंधी महाविद्यालयाला प्राप्त करून दिल्याबद्दल त्यांना मी अंत:करणपूर्वक धन्यवाद देतो. तसेच त्यांचे बंधु व उद्यम प्रेसचे संचालक श्री. वि. ना. वाडेगांवकर यांनी निश्चित कालखंडांत ग्रंथाचें मुद्रण व अन्य गोष्टी उत्कृष्टपणे करून दिल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

"सर्वारम्भास्तंडुला: प्रस्थमूला:" या न्यायानें या ग्रंथप्रकाशनाला आर्थिक सहाय्य लाभले नसते तर हें प्रकाशन कार्य सिद्धीस जाणें दुर्घट होतें. राजसत्तेने अशा महत्कार्याला सहाय्य करण्याची भारताची परंपरा आहे. विजयनगरच्या साम्राज्याच्या व शिवछत्रपतींच्या स्वराज्याच्या काळांत भारतीय विद्येला आलेला बहर या गोष्टीची साक्ष द्यावयास पुरेसा आहे. शिवछत्रपतींची राज्यमुद्रा महाराष्ट्र राज्यानें स्वीकारलेलीं आहे. छत्रपतींच्या परंपरेचे अभिमानी व "पैशाच्या अभावी शस्त्रविद्या आणि शास्त्राध्ययन या कार्यांचा अंगिकार केलेल्या संस्थांना मी या राज्यांत नामशेष होऊं देणार नाही" असें बाणेदार उद्‌गार काढणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण यांना आम्ही सहाय्यार्थ अभ्यर्थना केली. या स्वरूपाच्या कार्यांना संजीवन देण्यासाठीं मा. चव्हाण यांनी राज्य सरकारच्या वतीने साहित्य व संस्कृति मंडळाची निर्मिति करून क्रांतिकारक पाऊल टाकले आहे. या मंडळाच्या द्वारे महाराष्ट्र राज्य सरकारनें

प्रस्तुत ग्रंथाच्या या खंडाच्या प्रकाशनासाठीं तीन सहस्त्र रुपयांचें अनुदान देऊन आम्हांला अत्यंत ऋणी केलें आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री माननीय यशवंतराव चव्हाण, बॅ. शेषराव वानखेडे, राज्य सरकारच्या साहित्य व संस्कृति मंडळाचें अध्यक्ष तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी व मंडळाचें अन्य सर्व सदस्य यांचा ऋणनिर्देश करणें आमचें कर्तव्य होय. महाविद्यालयाच्या या स्वरूपाच्या उपक्रमांना त्यांचे सदैव सहकार्य असावें अशी आमची अपेक्षा आहे.

व्याकरणासारख्या विषयावरील हा ग्रंथ असल्यामुळे तो अत्यंत शुद्ध स्वरूपांतच प्रकाशित होणें अगत्याचें होतें. त्यादृष्टीने या ग्रंथाचीं प्रुफें व्याकरण तज्ञाकडून तपासलीं जाणें आवश्यक होतें. महाविद्यालयाच्या संशोधन व प्रकाशन मंडळाचे सन्मान्य सदस्य व विदर्भांतील एक विख्यात संशोधक श्री. शं. गो. चट्टे, एम्. ए. यांनी याबाबतींत अतिशय कष्ट घेतले व महाविद्यालयाचे कार्यवाह श्री. दादासाहेब चौरीकर यांनी त्यांना कष्टपूर्वक सर्व प्रकारचें सहकार्य दिलें. या दोन व्यक्तींच्या सहकार्याशिवाय ग्रंथप्रकाशन इतकें शीघ्र होणें अशक्य होतें. त्यामुळे त्यांचा ऋणनिर्देश होणें अत्यावश्यक आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशन समारंभाला लोकनायक डॉ. मा. श्री. उपाख्य बापूजी अणे यांच्यासारखा भारतीय कीर्तीचा व वैदिक धर्मावर प्रखर निष्ठा आणि भारतीय शास्त्रावर अधिकार असलेला लोकनेता अध्यक्ष म्हणून लाभला हें आमचें सद्भाग्य होय.

महाराष्ट्र सारस्वताचें दालन सर्व दृष्टींनी अत्यंत समृद्ध करणाऱ्या या ग्रंथाचें स्वागत महाराष्ट्रांतील साक्षेपी विद्वानांकडून होईल यांत शंका नाही.

दि. ८ मार्च १९६२
फाल्गुन शुद्ध तृतीया
शके १८८३

बाळशास्त्री हरदास
अध्यक्ष, भोसला वेदशास्त्र महाविद्यालय
संशोधन, प्रकाशन विभाग, नागपूर.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ अथ विसर्गसन्धिप्रकरणम् ॥

मनोरमा—— शर्परे सत्वादेरयमपवादः । यदि तु शर्परे नेत्येवोच्येत तर्हि प्रकृते सत्वे निषिद्धेऽपि कुप्वोः ≍क≍ पौ स्याताम् । वासः क्षौमम्, अद्भिः प्सातमिति । विसर्जनीयवचनात्तु विकारमात्रं बाध्यते इत्याशयेनाह–न त्वन्यदिति । तदेव स्फुटयति । इहेति ॥

'शर्परे विसर्जनीयः' सू. १५० हें सूत्र सत्व इत्यादिकांचें, म्हणजे 'विसर्जनीयस्य सः' सू. १३८ या सूत्रानें होणाऱ्या सत्वाचें व तसेंच 'कुप्वो ≍क ≍ पौ च' सू. १४२ या सूत्रानें होणाऱ्या जिव्हामूलीय व उपध्मानीय यांचें, अपवादक आहे. ('शर्परे विसर्जनीयः' असें सूत्र न करितां त्या ऐवजीं पाणिनीनें) 'शर्परे न' असेंच सूत्र पठित केलें असतें तर, जरी ('विसर्जनीयस्य सः' या सूत्रानें होणाऱ्या व त्या सूत्रांत) प्रकृत असलेल्या सत्वाचा निषेध झाला असता तरी, 'वासः क्षौमम् अद्भिः प्सातम्' या स्थलीं (विसर्गापुढें शर्पर 'खय्' असल्यामुळें, 'कुप्वोः' या सूत्रानें विसर्गाचे जागीं) जिव्हामूलीय व उपध्मानीय आदेश अनुक्रमें झाले असते. परंतु प्रकृत सूत्रांत 'विसर्जनीयः' हें पद घातलें असल्यामुळें, म्हणजे 'शर्परे विसर्जनीयः' असें प्रकृत सूत्र पठित केलें असल्यामुळें, विसर्गाचे जागीं कोणत्याहि प्रकारचा विकार—आदेश—होण्याचा बाध होतो, म्हणजे विसर्गाचे जागीं इतर कोणताहि आदेश न होतां विसर्ग विसर्गरूपानेंच कायम राहतो, आणि हा आशय मनांत धरूनच प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'न त्वन्यत्' असें म्हटलें आहे व याचेंच स्पष्टीकरण 'इह यथायथं सत्वं जिव्हामूलीयश्च न' या कौमुदींतील पुढील पंक्तींत केलें आहे. ('वासः क्षौमम्' या स्थलीं विसर्गापुढें ककार असल्यामुळें 'कुप्वोः' या सूत्रानें विसर्गाचे जागीं जिव्हामूलीयाची प्राप्ति होते आणि

'अद्भिः प्सातम्' या स्थलीं विसर्गापुढें पकार असल्यामुळें विसर्गाचे जागीं उपध्मानीयाची प्राप्ति होते, व तसेंच ककार व पकार हे 'खर्' असल्यामुळें या दोन्ही स्थलीं 'विसर्जनीयस्य सः' या सूत्रानें सत्वाची प्राप्ति होते. परंतु वरील दोन्ही उदाहरणांत ककार व पकार या 'खर्' पुढें अनुक्रमें असणारे षकार व सकार हे 'शर्' असल्यामुळें व प्रकृत सूत्रांत 'विसर्जनीयः' हें पद मुद्दाम घातलें असल्यामुळें, विसर्गाचे जागीं इतर कोणताहि आदेश न होतां विसर्गच झाला आहे, म्हणजे विसर्ग विसर्गरूपानेंच कायम राहिला आहे. 'इह यथायथम्' इत्यादि जी पंक्ति प्रकृत सूत्रावरील कौमुदींत दिली आहे ती 'कः त्सरुः' व 'घनाघनः क्षोभणः' या उदाहरणां-संबंधानें लिहिली आहे. प्रथम उदाहरणांत सत्वाची प्राप्ति असून द्वितीय उदाहरणांत जिव्हामूलीयाची प्राप्ति आहे. पण त्या उदाहर-णांत 'खर शर्पर' असल्यामुळें सत्व व जिव्हामूलीय न होतां. विसर्ग विसर्गरूपानेंच कायम राहतो.)

शब्दरत्न—नेत्येवोच्यतेति । "कुप्वोः" इत्यत्रापि चेन सत्त्वं नेत्ये-वानुकृष्टव्यमिति भावः । स्यातामिति । सत्वनिषेधे "खरवसानयोः" इति विहितविसर्गस्य सत्त्वादिति भावः । विकारमात्रमिति । तत्सामर्थ्याच्चानेन तस्यैव प्रत्यापत्तावपि न ताविति भावः । एतेनैतद्विहितस्य स्थानेऽपि तौ स्याताम् । किं चास्यैव तौ स्यातां "खरवसानयोः–" इति विहितस्य त्वेतयोरसिद्धत्वात् "विसर्ज-नीयस्य" इति सत्वमेव स्यादित्यपास्तम् । अर्थाधिकारेण "खरव-सानयोः" इति विहितविसर्गस्यैवातिदेशाच्च । विसर्जनीयस्य सोऽशर्पर इति तु न सूत्रं कृतम् । "वा शरि" इत्यनेन सत्वस्य विकल्पेन सिद्धावपि "कुप्वोः" इत्यत्राशर्परे इत्यनुवृत्त्या तयोः शर्परे-ऽप्रवृत्तावपि "कुप्वोः–" इति सूत्रे चाद्विसर्गलाभानापत्तेः ।।

('शर्परे विसर्जनीयः' असें सूत्र पठित न करितां त्या ऐवजीं पाणिनीनें) 'शर्परे न' असें सूत्र पठित केलें असतें तर, 'कुप्वोः' या

पुढील सूत्रांत देखील त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'च' या पदानें प्रकृत सूत्रांतील 'न = सत्वं न' याचेंच अनुकर्षण झालें असतें असा दिक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. ('विसर्जनीयस्य स = ' या सूत्राच्या लगेंच पुढें 'शर्परे विसर्जनीयः' हें प्रकृत सूत्र अष्टाध्यायींत पठित केलें आहे व जर 'शर्परे न' असें प्रकृत सूत्र पठित केलें असतें तर त्या सूत्राचा 'शर्परे सः न' असा अर्थ झाला असता आणि त्यामुळें 'कुप्वो ≍क ≍ पौ च' या पुढील सूत्रांतील 'च' नें 'सःन = सत्वं न' याचें अनुकर्षण झालें असतें व त्यामुळें 'कुप्वोः' या सूत्रानें जरी सत्वाचा निषेध झाला असता व विसर्गाचे जागीं जिव्हामूलीय व उपध्मानीय आदेश झाले असते तरी, त्या सूत्रांतील 'च' नें, प्रकृत सूत्रांतून 'विसर्जनीयः' हें पद गाळल्यानें, त्या पदाचें अनुकर्षण होऊं शकलें नसतें व त्यामुळें विसर्गाचे जागीं विसर्गरूप पाक्षिक आदेशाची प्राप्ति झाली नसती. ही आपत्ति टाळण्याकरितां देखील प्रकृत सूत्रांत 'विसर्जनीयः' या पदाचें मुद्दाम ग्रहण केलें आहे व तसें ग्रहण केलें असल्यामुळें, 'कुप्वोः' या सूत्रांतील 'च' या पदानें त्या सूत्रांत विसर्जनीयाचें अनुकर्षण होतें आणि त्यामुळें त्या सूत्रानें विसर्गाचे जागीं विकल्पेंकरून विसर्ग देखील होतो.) 'सत्वे निषिद्धेऽपि कुप्वो : ≍क ≍ पौ स्याताम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('शर्परे न' असें जर प्रकृत सूत्र पठित केलें असतें तर ' विसर्जनीयस्य सः ' सू. १३८ या सूत्रानें होणाऱ्या) सत्वाचा जरी निषेध झाला असता तरी, 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या सूत्रानें होणारा विसर्ग (सकारादेशाच्या अभावामुळें) विद्यमान राहत असल्यामुळें, त्या विसर्गाचे जागीं जिव्हामूलीय व उपध्मानीय आदेश होण्याची आपत्ति आली असती; (कारण 'शर्परे न' असें सूत्र केल्यानें 'न' या पदाचा 'सत्वं न' एवढाच अर्थ झाला असता व 'कुप्वोः' या पुढील सूत्रानें विसर्गाचे जागीं जी जिव्हामूलीय व उपध्मानीय या आदेशांची प्राप्ति आहे त्यांची निवृत्ति झाली नसती व त्यामुळें विसर्गाचे जागीं ते आदेश होण्याची

आपत्ति आली असती. ही आपत्ति टाळण्याकरितां देखील प्रकृत सूत्रांत 'विसर्जनीयः' या पदाचें मुद्दाम ग्रहण केलें आहे.) आणि जरी प्रकृत सूत्रानें 'खरवसानयोर्विसर्जनीयः' या सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचीच प्रत्यापत्ति—पुनः प्राप्ति—होते तरी, प्रकृत सूत्रांत 'विसर्जनीयः' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें त्या ग्रहणसामर्थ्यानें त्या विसर्गाचे जागीं (जसा सकारादेश होत नाहीं त्याच प्रमाणें) जिव्हामूलीय व उपध्मानीय हे आदेश देखील होत नाहींत (व विसर्ग विसर्गरूपानेंच कायम राहतो) असा मनोरमेंतील 'विकारमात्रं बाध्यते' या पंक्तीचा भावार्थ आहे. (शब्दरत्नांतील 'प्रत्यापत्तावपि' या पदांचा भैरवींत 'प्राप्तस्य विकारस्य निरसनपूर्वकस्वस्वरूपावस्थानेऽपि' असा अर्थ दिला आहे. आतां शंकाकार अशी शंका करतो कीं,) 'शर्परे विसर्जनीयः या प्रकृत सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचे जागीं देखील 'कुप्वोः' या सूत्रानें होणारे जिव्हामूलीय व उपध्मानीय हे आदेश होण्याची प्राप्ति आहे. आणखी असें कीं, 'शर्परे विसर्जनीयः' या सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचेच जागीं जिव्हामूलीय व उपध्मानीय हे आदेश होऊं शकतात. 'खरवसानयोर्विसर्जनीयः' या सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचे जागीं ते आदेश होऊं शकत नाहींत; कारण 'विसर्जनीयस्य सः' या त्रैपादिक पूर्व सूत्राच्या दृष्टीनें 'कुप्वोः' हें त्रैपादिक पर सूत्र असिद्ध असल्यामुळें ('खरवसानयोः' या सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचे जागीं 'विसर्जनीयस्य सः' या सूत्रानें होणारा) सकारादेशच होऊं शकतो. पण (शब्दरत्न-कार म्हणतात कीं) 'विकारमात्रं बाध्यते' असें जें मनोरमेंत विवेचन केलें आहे त्यावरून शंकाकारानें केलेली शंका चूक ठरते. ('खरवसानयोर्विसर्जनीयः' ८. ३. १५ या सूत्रानंतर 'विसर्ज-नीयस्य सः' ८. ३. ३४ हें सूत्र पठित असून त्यानंतर 'शर्परे विसर्जनीयः' ८. ३. ३५ हें सूत्र पठित आहे व त्याच्याहि पुढें 'कुप्वोः' ८. ३. ३७ हें सूत्र पठित आहे. असा या त्रैपादिक सूत्रांचा अष्टाध्यायींत पाठक्रम असल्यामुळें व 'पूर्वत्रासिद्धम्' हें वचन असल्यामुळें शंकाकार असें म्हणतो कीं, 'खरवसानयोः' या सूत्रानें

होणाऱ्या विसर्गाचें सत्वच होऊं शकतें व त्या विसर्गाचे जागीं जिव्हामूलीय व उपध्मानीय हे आदेश होऊं शकत नाहींत; कारण 'विसर्जनीयस्य सः' या पूर्व सूत्राच्या दृष्टीनें 'कुप्वोः' हें परसूत्र असिद्ध आहे आणि म्हणून तें त्रैपादिक परसूत्र सत्वकार्याचा बाध करूं शकत नाहीं व स्वतः प्रवृत्त होऊं शकत नाहीं. पण 'विसर्जनीयस्य सः' या पूर्वत्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें 'शर्परे विसर्जनीयः' या त्रैपादिक परसूत्रानें होणारा विसर्ग असिद्ध ठरत असल्यामुळें व तो विसर्ग झालाच नाहीं असें मानावें लागत असल्यामुळें, त्या विसर्गाचें त्या पूर्व त्रैपादिक सूत्रानें होणारें सत्व होऊं शकत नाहीं व 'कुप्वोः' या पर त्रैपादिक सूत्रानें होणारे जिव्हामूलीय व उपध्मानीय हे आदेशच त्या विसर्गाचे जागीं होऊं शकतात. म्हणून 'विकारमात्रं बाध्यते' असें जें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे तें बरोबर नाहीं व वास्तविक प्रकृत सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचे जागीं केवळ सकारादेश होऊं शकत नाहीं, पण जिव्हामूलीय व उपध्मानीय हे आदेश होण्यांत कांहीं प्रत्यवाय येत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'विकारमात्रं बाध्यते' असें मनोरमेंत सिद्ध करून दाखविलें असल्यामुळें वरील शंका चूक ठरते. दीक्षितांनी जसा प्रकृत सूत्राचा 'शर्परे खरि विसर्जनीयस्य विसर्जनीय एव नत्वन्यत्' असा अर्थ केला आहे तसाच अर्थ काशिकाकार व प्रक्रियाकौमुदीकार यांनीं देखील केला आहे व काशिकेंत तर 'नेति वक्तव्ये विसर्जनीयस्य विसर्जनीयादेशविधानं विकारनिवृत्त्यर्थम् । तेन जिव्हामूलीयोपध्मानीयौ न भवतः' असें स्पष्ट म्हटलें आहे. काशिकाकार, प्रक्रियाकौमुदीकार व दीक्षित यांनीं प्रकृत सूत्राचा वरप्रमाणें जो अर्थ केला आहे तसा अर्थ करण्याचें कारण हें कीं, 'विसर्जनीयस्य सः' या पूर्वसूत्रांतून 'विसर्जनीयस्य' हें पद प्रकृत सूत्रांत अनुवृत्त होत असून 'विसर्जनीयः' हें पद या सूत्रांत विधेयांशामध्यें घातलें असल्यामुळें, 'शर्परे खरि विसर्जनीयस्य विसर्जनीयः' असा प्रकृत सूत्राचा अर्थ होतो. पण विसर्गाचे जागीं विसर्ग होतो असें विधान

करणें निष्फळ असल्यामुळें, या अर्थांतून 'विसर्जनीयस्य विसर्जनीयः एव भवति न त्वन्यत्' असा अर्थ निष्पन्न होतो व त्यामुळें, प्रकृत सूत्र 'विसर्जनीयस्य सः' या सूत्रानें होणाऱ्या सत्वाचें व तसेंच 'कुप्वोः' या सूत्रानें होणाऱ्या जिव्हामूलीय व उपध्मानीय या आदेशांचें अपवादक ठरतें. म्हणून अपवादत्वाचा विचार न करितां सूत्रांचा केवळ पूर्वपरभाव मनांत धरून शंकाकारानें जी शंका केली आहे ती अयोग्य ठरते व अपवादत्वामुळें जिव्हामूलीय व उपध्मानीय या आदेशांचा बाध होत असल्यामुळें, प्रकृत सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचे जागीं ते आदेश मुळींच होऊं शकत नाहींत व प्रकृत सूत्रांतील 'विसर्जनीयः' या पदाच्या सामर्थ्यानें विसर्ग विसर्गरूपानेंच कायम राहतो असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. शब्दाधिकार मानण्यास कोणतेंहि प्रमाण नसल्यामुळें) अर्थाधिकार मानल्यानें, 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचाच ('कुप्वोः' या सूत्रांत) अतिदेश केला आहे हें सिद्ध होतें, म्हणजे 'कुप्वोः' सू. १४२ या सूत्रानें ज्या विसर्गाचे जागीं जिव्हामूलीय व उपध्मानीय आदेश होण्याचें विधान केलें आहे तो विसर्ग 'खरवसानयोः' या सूत्रानेंच होणारा विसर्ग आहे हें स्पष्ट होतें; (कारण प्रकृत सूत्रांत विसर्ग होण्याचें वास्तविक विधान केलें नसून विसर्ग विसर्गरूपानेंच कायम राहतो याचें विधान केलें आहे व 'खरवसानयोः' या सूत्रानेंच विसर्ग होण्याचें विधान केलें आहे. म्हणून त्या सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचे जागींच 'कुप्वोः' या सूत्रानें होणारे जिव्हामूलीय व उपध्मानीय आदेश होऊं शकतात. त्यामुळें प्रकृत सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचेच जागीं जिव्हामूलीय व उपध्मानीय आदेश होऊं शकतात असें जें अप्रमाण शब्दाधिकार मानून शंकाकारानें म्हटलें आहे तें चूक ठरतें. कारण जेथें दृढ प्रमाण उपलब्ध आहे तेथेंच शब्दाधिकार मानतां येऊं शकतो व प्रकृत स्थलीं तसें कोणतेंहि प्रमाण उपलब्ध नसल्यामुळें अर्थाधिकारानुरोधानेंच सूत्रार्थ करणें योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

'विसर्जनीयस्य सोऽशर्परे' असें ('विसर्जनीयस्य सः' व प्रकृत सूत्र या दोन सूत्रां ऐवजीं पाणिनीनें एकच) सूत्र पठित केलें नाहीं. तसें सूत्र पठित केलें असतें तर, जरी 'वा शरि' सू. १५१ या सूत्रानें विसर्गाचे जागीं विकल्पेंकरून सकार व विसर्ग झाला असता व तसेंच 'कुप्वोः' या सूत्रांत 'अशर्परे' या पदाची अनुवृत्ति केल्यानें, 'शर्पर खर्' पुढें आला असतां विसर्गाचे जागीं जिव्हामूलीय व उपध्मानीय आदेश झाले नसते तरी, 'कुप्वोः' या सूत्रांतील 'च' या पदानें ('अशर्परे' या पदाचेंच अनुकर्षण झालें असते व वर सुचविलेल्या सूत्रांत 'विसर्जनीयः' या पदाच्या अभावामुळें विसर्गाचें अनुकर्षण झालें नसतें) व त्यामुळें विसर्गाचे जागीं विकल्पेंकरून विसर्गरूप आदेश न होण्याची आपत्ति आली असती. (सारांश वर सांगितल्याप्रमाणें एकच सूत्र पठित केलें असतें तर त्या सूत्रांत 'विसर्जनीयः' हें पद नसल्यामुळें, विसर्गापुढें 'अशर्पर खर्' आला असतां विसर्गाचे जागीं 'कुप्वोः' या सूत्रानें जिव्हामूलीय व उपध्मानीय हेच आदेश झाले असते व विकल्पेंकरून जो विसर्गरूप आदेश होणें इष्ट आहे तो आदेश मुळींच होऊं शकला नसता. ही आपत्ति टाळण्याकरितां 'विसर्जनीयस्य सः' व 'शर्परे विसर्जनीयः' अशीं दोन भिन्न सूत्रें पाणिनीनें केलीं आहेत व तशीं सूत्रें केलीं असल्यामुळें 'कुप्वोः' या सूत्रांतील 'च' या पदानें 'शर्परे विसर्जनीयः' या सूत्रांतील 'विसर्जनीयः' हें पद अनुकृष्ट होतें आणि त्यामुळें 'कुप्वोः' या सूत्रानें विसर्गाचे जागीं विकल्पेंकरून विसर्गरूप आदेश देखील होतो असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा — सोऽपदादौ ।। अपदाद्योरिति । सूत्रे तु व्यत्ययेनैकवचनम् । यदि तु खर् विशेष्यतेऽपदादौ खरीति तदा यथाश्रुतं साधु । किं तु 'खरि' इति मण्डूकप्लुत्याऽनुवर्त्यमिति क्लेशः । न चानुवृत्तेरुत्तरत्राप्यावश्यकता । खरं विना विसर्गस्य दुर्लभत्वेन तदनुवृत्तेर्निष्फलत्वात् । पाशकल्पककाम्येष्विति वृत्तिः ।

सम्भवप्रदर्शनमेतन्न तु परिगणनम् । अन्यस्यासम्भवात् । प्रातः कल्पमिति । अधिकरणशक्तिप्रधानस्यापि प्रातःशब्दस्येह वृत्तिविषये शक्तिमत्परत्वम् । दोषाभूतमहः, दिवाभूता रात्रिरितिवत् । गीः काम्यतीति । इह "इणः षः" इति षत्वं न । तत्रापि "काम्ये रोरेव" इत्यस्यानुवृत्तेः । यदि तु तत्रैवेदं पठ्येत तर्हि षत्वमात्रप्रतिषेधेऽपि पूर्वेण सत्वं स्यात् ॥

('सोऽपदादौ' सू. १५२ या सूत्रांत 'कुप्वोः' या पूर्व सूत्रांतून 'कुप्वोः' या द्विवचनान्त पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें आणि त्या अनुवृत्त पदाचें प्रकृत सूत्रांतील 'अपदादौ' हें पद विशेषण होत असल्यामुळें, कौमुदींत 'अपदादौ' याचा 'अपदाद्यो.' असा द्विवचनामध्यें विपरिणाम केला आहे; कारण विशेष्य द्विवचनान्त असल्यामुळें त्याचें विशेषण देखील द्विवचनान्त असलें पाहिजे. म्हणून वास्तविक पाणिनीनें 'सोऽपदाद्योः' असें प्रकृत सूत्र पठित करावयास पाहिजे होतें. पण 'छन्दोवत्सूत्राणि भवन्ति' असें भाष्यवचन असल्यामुळें व 'व्यत्ययो बहुलम्' सू. ३४३३ असें सूत्र असल्यामुळें) प्रकृत सूत्रांत द्विवचनाचे जागीं एकवचनाचा प्रयोग व्यत्ययानें–वचनांत फरक करून–केला आहे. जर ('खरवसानयोर्विसर्जनीयः' या पूर्व सूत्रांतून जशी 'विसर्जनीयस्य सः' व 'शर्परे विसर्जनीयः' या सूत्रांत 'खरि' या पदाची मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति केली आहे तशी प्रकृत सूत्रांत) 'खरि' या पदाची अनुवृत्ति केली व त्या अनुवृत्त 'खरि' या पदाचें 'अपदादौ' हें विशेषण मानून 'अपदादौ खरि' असा अन्वय केला तर प्रकृत सूत्रांतील 'अपदादौ' हा एकवचनाचा प्रयोग साधु ठरतो. परंतु तसें केल्यास प्रकृत सूत्रांत 'खरि' या पदाची मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करावी लागते व तशा तऱ्हेची अनुवृत्ति करण्यांत क्लेश–दोष–होतो. (प्रकृत सूत्राच्या पुढील सूत्रांत 'खरि' या पदाच्या अनुवृत्तीची आवश्यकता असती तर प्रकृत सूत्रांत त्या पदाची मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करणें क्षम्य झालें असतें. परंतु) उत्तर सूत्रांत 'खरि' या पदाची अनुवृत्ति करणें आवश्यक नाहीं (कारण उत्तर सूत्रांत विसर्गाला

कार्य होणें सांगितलें आहे व) 'खर्' पुढें असल्याशिवाय विसर्ग होऊंच शकत नसल्यामुळें, उत्तर सूत्रांत 'खरि' या पदाची अनुवृत्ति करणें व्यर्थ ठरतें. (म्हणून तशी दोषयुक्त मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति न करितां कौमुदींत जसा एकवचनाचा व्यत्यय करून प्रकृत सूत्राचा अर्थ केला आहे तसेंच करणें योग्य आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. या पंक्तीचें अधिक विवरण शब्दरत्नांत करण्यांत येईल.) 'पाशकल्पककाम्येषु' (हें वार्तिक नसून) काशिकाकाराची वृत्ति आहे (कारण असें वार्तिक भाष्यांत पठित नाहीं.) तसेंच हें परिगणन नव्हें, पण हेच प्रत्यय पुढें येण्याचा संभव आहे असें या वचनांत प्रदर्शित केलें आहे; कारण या चार प्रत्ययांखेरीज दुसरा कोणताहि (ककारानें किंवा पकारानें सुरु होणारा) प्रत्यय पुढें येणें संभवत नाहीं. (जर या चार प्रत्ययांखेरीज ककारानें किंवा पकारानें सुरु होणारे इतर प्रत्यय पुढें येणें संभवनीय असतें तर परिगणन करणें आवश्यक ठरलें असतें आणि तशा स्थितींतच 'पाशकल्पककाम्येषु' हें काशिकेंतील वचन परिगणन मानतां आलें असतें.) 'प्रातःकल्पम्' या उदाहरणांतील 'प्रातः' हें अव्यय जरी अधिकरणशक्तिप्रधान, म्हणजे 'प्रातःकाले' या सप्तम्यर्थाचें वाचक आहे तरी, 'प्रातःकल्पम्' या शब्दाची वृत्ति करतेवेळीं ('प्रातः' हा शब्द अधिकरणार्थक—सप्तम्यर्थाचा वाचक—न मानतां कालवाचक, म्हणजे 'प्रातः कालः' या अर्थाचा वाचक, मानल्यानें व अशा रीतीनें त्यांत समस्यमान होण्याची) शक्ति आहे असें मानल्यानें वृत्ति करतां येते. ('ईषदसमाप्तौ कल्पब्देश्यदेशीयरः' सू. २०२२ या सूत्रानें 'प्रातर्' या अव्ययाहून 'कल्पप्' प्रत्यय झाला आहे व 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें 'प्रातर्' यांतील अन्त्यरेफाचा विसर्ग होऊन 'प्रातःकल्पम्' हें रूप सिद्ध झालें आहे आणि 'ईषदसमाप्तः प्रातःकालः प्रातःकल्पम्' अशी या शब्दाची वृत्ति आहे. 'कल्पप्' प्रत्यय लावतेवेळीं 'प्रातः' हा शब्द अधिकरणार्थाचा—सप्तम्यर्थाचा—वाचक मानल्यास, वर सामानाधिकरण्यानें केलेली इष्ट वृत्ति होऊं शकणार

नाहीं. म्हणून तो शब्द 'प्रातःकालः' या कालरूप अर्थाचा वाचक मानणें आवश्यक आहे. या स्थलीं 'प्रातः' हें अव्यय असल्यामुळें व 'अनव्ययस्येति वाच्यम्' हें वार्तिक असल्यामुळें, प्रकृत सूत्रानें प्राप्त होणारें विसर्गाचें सत्व झालें नाहीं.) 'दोषाभूतमहः, दिवाभूता रात्रिः' या स्थलीं जशी वृत्ति केली जाते, म्हणजे जरी 'दोषा' व 'दिवा' हीं अधिकरणशक्तिप्रधान अव्ययें असून देखील वृत्ति करतेवेळीं ते कालार्थाचे वाचक होतात, तशीच 'प्रातःकल्पम्' या स्थलीं वृत्ति केली पाहिजे. 'गीः काम्यति' या उदाहरणांत 'इणः षः' सू. १५३ या सूत्रानें होणारें विसर्गाचें षत्व होत नाहीं; करण त्या सूत्रांत देखील 'काम्ये रोरेव' या वार्तिकाची अनुवृत्ति आहे. ('गॄ निगरणें' या धातूहून क्विप् प्रत्यय केला असतां 'ॠत इद्धातोः' सू. २३९० या सूत्रानें धातूंतील ॠकाराचा इकार होऊन व 'उरण्-रपरः' सू. ७० या सूत्रानें त्या इकारापुढें रकार होऊन 'गिर्' असें रूप झाल्यावर 'गिरमात्मनः इच्छति' या अर्थामध्यें 'काम्यच्च' सू. २६६३ या सूत्रानें 'काम्यच्' प्रत्यय होऊन व 'र्वोरुपधाया दीर्घ इकः' सू ४३३ या सूत्रानें उपधेंतील इकार दीर्घ होऊन आणि 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें 'गीर्' यांतील अन्त्यरेफाचा विसर्ग होऊन 'गीः काम्यति' हें रूप सिद्ध होतें. या उदाहरणांत झालेल्या विसर्गापूर्वीं जरी 'ई' हा 'इण्' आहे व त्या विसर्गापुढें ककार आहे तरी तो विसर्ग रुस्थानिक नसून 'गीर्' यांतील रेफाचे जागीं झालेला विसर्ग असल्यामुळें व 'काम्ये रोरेव' हें प्रकृत सूत्रावर पठित केलेलें वार्तिक 'इणः षः' या सूत्रांत अनुवृत्त होत असल्यामुळें, येथें विसर्गाचें षत्व झालें नाहीं.) जर 'काम्ये रोरेव' हें वार्तिक (प्रकृत सूत्रांत पठित न करितां) 'इणः षः' या उत्तर सूत्रांतच पठित केलें असतें तर, जरी केवळ षत्वाचा प्रतिषेध झाला असता तरी ('सोऽपदादौ' या प्रकृत) पूर्व सूत्रानें विसर्गाचें सत्व होण्याची आपत्ति आली असती. (ही आपत्ति टाळण्याकरितांच तें वार्तिक वार्तिककारानें 'सोऽपदादौ' या प्रकृत पूर्व सूत्रांत पठित केलें आहे

आणि त्यामुळें 'गीः काम्यति' या स्थलीं विसर्गाचें सत्व देखील होत नाहीं. तें वार्तिक 'इणः षः' या उत्तर सूत्रांत अनुवृत्त होत असल्या-मुळें वरील उदाहरणांत विसर्गाचें षत्व देखील होत नाहीं हें वर सांगितलेंच आहे.)

शब्दरत्न—— व्यत्ययेनेति । सौत्रत्वादिति भावः । इति क्लेश इति । किं च पूस्तरेत्यादौ षत्वादिवारणाय "कुप्वोः" इत्यनुवर्त्य तदन्तर्गते खरीति व्याख्याने सुतरां क्लेश इत्यपि बोद्धव्यम् । अन्यस्या-सम्भवादिति । अयं भावः । अपदे इत्येव "कुप्वोः" इत्यनुवर्त्य "यस्मिन्विधिः–" इति परिभाषया कपवर्गादौ अपदे इत्यर्थेन सिद्धे आदिग्रहणमपदस्यैवादिरित्यर्थलाभार्थम् । तेनोरः कायतीति विग्रहे सुबुत्पत्तेः पूर्वं समासेऽव्युरःकेणेत्यादौ न सत्वम् । आदिग्रहणसामर्थ्येन तल्लब्धावधारणेन च पदत्वयोग्यप्रातिपदिकानवयवस्यैव ग्रहणादिति । शक्तिमत्परत्वमिति । अव्ययत्वं तु भूतपूर्वगत्या बोद्धव्यमिति भावः । षत्वं नेति । सत्वं नेत्यपि बोद्धव्यम् । तत्रापि–षत्व विधावपि । एवं चात्र पाठात्तत्रानुवृत्तेश्चोभयमपि नेति बोद्धव्यम् ।।

'व्यत्ययेनैकवचनम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, ('अपदादौ' हा) सौत्र प्रयोग, म्हणजेच 'छन्दोवत् सूत्राणि भवन्ति' या भाष्यवचनान्वयें छान्दस प्रयोग आहे. प्रकृत सूत्रांत ('खरवसानयोः' या सूत्रांतून) 'खरि' या पदाची मण्डूक-प्लुतीनें अनुवृत्ति करण्यांत क्लेश–दोष–तर आहेच, पण त्याशिवाय 'पूस्तरा' इत्यादि स्थलीं ('इणः षः' सू. १५३ या सूत्रानें होणाऱ्या) षत्वाचें निवारण करण्याकरितां त्या सूत्रांत ('कुप्वोः' या पूर्व सूत्रांतून) 'कुप्वोः' या पदाची अनुवृत्ति करणें आवश्यक आहे. (त्यामुळें त्या सूत्रापूर्वी पठित असलेल्या प्रकृत सूत्रांत देखील 'कुप्वोः' या पदाची अनुवृत्ति करणें आवश्यक आहे. प्रकृत सूत्रांत 'कुप्वोः' या पदाची अनुवृत्ति न केल्यास, 'इणः षः' या पुढील सूत्रांत त्या पदाची मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करण्याचा दोष येईल,)

व तशी अनुवृत्ति करून पुन्हा प्रकृत सूत्रांत 'खरि' या पदाची अनुवृत्ति करणें आणि कवर्गांत व पवर्गांत अन्तर्भूत असलेलाच अपदादि–पदाचा आदि नसणारा–'खर्' विसर्गापुढें आला असतां विसर्गाचें सत्व होतें असा प्रकृत सूत्राचा अर्थ करणें यांत अधिकच क्लेश आहेत. ('कुप्वोः' या सूत्रांतील 'कुप्वोः' ही औपश्लेषिक सप्तमी आहे व जर 'कुप्वोः' आणि 'खरि' या दोन्ही पदांची प्रकृत सूत्रांत अनुवृत्ति केली तर प्रकृत सूत्रांत 'कुप्वोः' ही निर्धारणे सप्तमी मानावी लागेल, म्हणजे 'कवर्गांतील व पवर्गांतील 'खर्' पुढें असतांच' असा निर्धारणरूप अर्थ करावा लागेल, व असें करण्यांत अधिकच क्लेश आहेत हें उघड आहे. सारांश प्रकृत सूत्रांत 'खरि' या पदाची अनुवृत्ति न करितां 'कुप्वोः' या पदाची अनुवृत्ति केल्यानेंच इष्टसिद्धि होऊं शकत असल्यामुळें व 'खरि' या पदाची देखील त्याशिवाय अनुवृत्ति केल्यानें तोच अर्थ निष्पन्न होत असल्यामुळें, 'खरि' या पदाची प्रकृत सूत्रांत मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करणें जशी वर सांगितल्याप्रमाणें दोषयुक्त ठरते तशीच ती व्यर्थ देखील ठरते; कारण 'खर्' पुढें असल्याशिवाय विसर्ग उपलब्धच होऊं शकत नाहीं आणि ज्याअर्थी प्रकृत सूत्रानें विसर्गाचें सत्व आणि 'इणः षः' या पुढील सूत्रानें विसर्गाचें षत्व होणें सांगितलें आहे त्याअर्थी त्या विसर्गापुढें 'खर्' असलाच पाहिजे हें आपोआपच सिद्ध होतें व त्यामुळें त्या दोन्ही सूत्रांत 'खरि' या पदाची अनुवृत्ति करण्याची कांहींच आवश्यकता नाहीं व 'कुप्वोः' एवढ्याच पदाची अनुवृत्ति करणें आवश्यक व योग्य आहे आणि तशी अनुवृत्ति केल्यानें 'पूस्तरा' या स्थलीं 'इणः षः' या सूत्रानें होणाऱ्या षत्वाचें निवारण होतें. 'इयमनयोरतिशयेन पूः पूस्तरा' अशी 'पूस्तरा' या शब्दाची वृत्ति आहे. या स्थलीं 'पूर्' या शब्दाहून 'द्विवचनविभज्योपपदे तरबीयसुनौ' सू. २००५ या सूत्रानें 'तरप्' प्रत्यय होऊन नंतर 'टाप् = आ' हा स्त्रीत्वबोधक प्रत्यय झाला आहे. 'पूर् तरप् टाप्' अशा स्थितींत 'पूर्' या

पदाच्या अन्तीं रेफ असून त्या रेफापुढें तकार हा 'खर्' असल्यामुळें, 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें त्या रेफाचा विसर्ग होऊन व नंतर 'विसर्जनीयस्य सः' सू. १३८ या सूत्रानें विसर्गाचा सकार होऊन 'पूस्तरा' असें रूप सिद्ध होतें. जर 'इणः षः' या सूत्रांत 'कुप्वोः' या पदाची अनुवृत्ति न करतां 'खरि' या पदाची अनुवृत्ति केली असती तर, वरील उदाहरणांत 'ऊ' या 'इण्'पुढें विसर्ग असून त्या विसर्गापुढें तकार हा 'खर्' असल्यामुळें, विसर्गाचें षत्व झालें असतें व 'पूस्तरा' असें इष्ट रूप सिद्ध न होतां 'पूष्टरा' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती. पण त्या सूत्रांत 'कुप्वोः' या सूत्रांतून 'कुप्वोः' या पदाची अनुवृत्ति केल्यानें वरील उदाहरणांत विसर्गापुढें कवर्गांतील किंवा पवर्गांतील वर्ण नसून तकार असल्यामुळें ती आपत्ति टळते आणि त्या सूत्रांत 'कुप्वोः' या पदाची मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करण्याचा दोप न यावा याकरितां, त्या सूत्राच्या व 'कुप्वोः' या सूत्राच्या मध्यें जें प्रकृत सूत्र पठित आहे त्या प्रकृत सूत्रांत देखील 'कुप्वोः' या पदाची अनुवृत्ति मानणें आवश्यक आहे व ती मानल्यानें पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्रकृत सूत्रांत व 'इणः षः' या सूत्रांत 'खरि' या पदाची पुन्हा अनुवृत्ति करण्याची कांहीं गरज राहत नाहीं; कारण जरी कवर्गांतील व पवर्गांतील प्रथम दोनच वर्ण 'खर्' असून बाकीचे तीन वर्ण 'अखर्' आहेत तरी, तशा 'अखर्' वर्णांपूर्वी विसर्ग येणें शक्य नसून त्या दोन वर्गांतील 'खर्' वर्णापूर्वींच तो येणें शक्य असल्यामुळें, वरील दोन सूत्रांत 'कुप्वोः' या पदाची अनुवृत्ति केल्यावर पुन्हा 'खरि' या पदाची अनुवृत्ति करणें व्यर्थ आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'अन्यस्यासम्भवात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'सोऽपदे' असें जरी प्रकृत सूत्र पठित केलें असतें तरी त्या सूत्रांत 'कुप्वोः' या पदाची अनुवृत्ति केल्यानें, 'यस्मिन्विधिस्तदादावल्ग्रहणे'—परि. ३३—या परिभाषान्वयें 'कुप्वोः' या पदाचा 'कपवर्गादौ' असा

अर्थ झाला असता व 'कपवर्गादौ अपदे परे सति विसर्जनीयस्य सः स्यात्' असा त्या सूत्राचा अर्थ झालाच असता. असें असून देखील ('अपदे' असा शब्द न घालतां 'अपदादौ' असा जो शब्द प्रकृत सूत्रांत घातला आहे व त्या शब्दांत) 'आदि' या शब्दाचें जें ग्रहण केलें आहे तें अशाकरितां केलें आहे कीं, कपवर्गांतील वर्ण हा अपदाचाच आदि असावा असा प्रकृत सूत्राचा अर्थ व्हावा. असा प्रकृत सूत्राचा अर्थ केल्यानें 'उरः कायतीति उरः कः तेन उरः केण' या उदाहरणांत सुबुत्पत्ति होण्यापूर्वीं जरी समास होतो तरी विसर्गाचे जागीं सकार होत नाहीं. प्रकृत सूत्रांत 'आदि' या शब्दाचें ग्रहण केलें असल्यामुळें व त्या शब्दाच्या ग्रहणसामर्थ्यानें 'अपदस्यैव' असा अवधारणरूप अर्थ सिद्ध होत असल्यामुळें, प्रकृत सूत्रांतून असा अर्थ निघतो कीं, विसर्गापुढें येणारा कवर्गांतील किंवा पवर्गांतील वर्ण पदसंज्ञा होण्यास योग्य असलेल्या प्रातिपदिकाचा देखील आद्य अवयव नसावा. ('कै शब्दे' या धातूहून 'आतोऽनुपसर्गे कः' सू. २९१५ या सूत्रानें 'क=अ' प्रत्यय केला असतां, 'आदेच उपदेशे' सू. २३७० या सूत्रानें 'कै' चा 'का' होऊन व 'आतो लोप इटि च' सू. २३७२ या सूत्रानें 'का' यांतील आकाराचा लोप होऊन 'क् + अ = क' असें कृत्प्रत्ययान्त प्रातिपदिक होतें. या 'क' शब्दाचा 'उरः' या शब्दाशीं समास करतेवेळीं 'गतिकारकोपपदानां कृद्भिःसह समासवचनं प्राक् सुबुत्पत्तेः'—परि. ७६—या परिभाषान्वयें 'क' या शब्दाहून विभक्तिप्रत्यय होण्यापूर्वींच समास होतो. या स्थलीं 'क' हें पद नसून प्रातिपदिक आहे व त्यांत ककार आदि आहे. म्हणून 'उरः क' या स्थलीं प्रकृत सूत्रानें विसर्गाचा सकार कां होऊं नये ? या प्रश्नाचें उत्तर हें आहे कीं, जरी समास करतेवेळीं 'क' हें पद नसून प्रातिपदिक आहे तरी, त्याहून सुबुत्पत्ति झाल्यावर त्याला पदसंज्ञा होण्याची योग्यता आहे. त्यामुळें 'उरः' यांतील विसर्गाचा प्रकृत सूत्रानें सकार होत नाहीं व विसर्गाचा सकार झाला नसल्यामुळेंच, 'अट्कुप्वाङ्नुम्व्यवायेऽपि' सू. १९७ या सुत्रानें 'उरः

केण' या स्थलीं नकाराचें णत्व झालें आहे. पण 'व्यूढोरस्केन' या उदाहरणांत 'व्यूढोरः' या शब्दापुढें 'उरः प्रभृतिभ्यः कप्' सू. ८८९ या सूत्रानें झालेला समासान्त 'कप् = क' प्रत्यय आला असल्यामुळें व 'अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपदिकम्' सू. १७८ या सूत्रान्वयें त्या 'कप्' प्रत्ययाला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नसल्यामुळें आणि म्हणून त्याहून सुबुत्पत्ति होणें अशक्य असल्यामुळें व अशा रीतीनें त्याचे ठिकाणीं 'सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें होणारी पदसंज्ञा होण्याची मुळींच योग्यता नसल्यामुळें, या द्वितीय उदाहरणांत प्रकृत-सूत्रानें विसर्गाचा सकार होतो व अशा रीतीनें सकाराचा व्यवाय—व्यवधान—होत असल्यामुळें, नकाराचें णत्व होत नाहीं.) 'प्रातः कल्पम्' या उदाहरणांत 'प्रातः' या शब्दाला भूतपूर्वगतीनें, म्हणजे तो पूर्वीं अव्ययसंज्ञक असल्यामुळें, अव्ययसंज्ञा होते हें ध्यानांत ठेवावें. ('प्रातःकल्पम्' या स्थलीं 'प्रातः' या शब्दाचा 'प्रातः कालः' असा अर्थ होत असल्यामुळें तो शब्द अव्ययसंज्ञक मानतां येत नाहीं; कारण अधिकरणार्थवाचक, म्हणजे 'प्रातः काले' या अर्थाच्या वाचक, 'प्रातः' शब्दालाच 'स्वरादि निपातमव्ययम्' सू. ४४७ या सूत्रानें अव्ययसंज्ञा होते; कारण तसा अधिकरणार्थवाचक 'प्रातर्' शब्द स्वरादि-गणांत पठित आहे. म्हणून 'अनव्ययस्य' या वार्तिकान्वयें 'प्रातःकल्पम्' या स्थलीं विसर्गाचें सत्व कां होऊं नये अशी शंकाकाराची शंका आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, जरी वृत्ति करतेवेळीं 'प्रातः' हा शब्द कालवाचक होत असून अधिकरणार्थवाचक राहत नसल्यामुळें अव्ययसंज्ञक मानतां येत नाहीं तरी, वृत्ति करण्यापूर्वीं तो अधिकरणशक्तिप्रधान 'प्रातर्' शब्द अव्ययसंज्ञक होता आणि म्हणून 'साम्प्रतिकाभावे भूतपूर्वगतिः'—परि. ७७—या परिभाषान्वयें त्याच्या पूर्वीं असलेल्या अव्ययसंज्ञेचा आश्रय केल्यानें, म्हणजेच भूतपूर्वगतीनें, तो शब्द अव्ययसंज्ञक ठरतो आणि अशा रीतीनें वृत्ति करतेवेळीं तो शब्द कालवाचक असून देखील 'काकवत् देवदत्तस्य गृहम्' या न्यायान्वयें अव्ययसंज्ञक मानला जाऊं शकत

असल्यामुळें व 'अनव्ययस्य' हें निषेधक वार्तिक असल्यामुळें, 'प्रातः' यांतील विसर्गाचें प्रकृत सूत्रानें होणारें सत्व होत नाहीं.) 'गीः काम्यति' या उदाहरणांत (जसें 'इणः षः' या सूत्रानें होणारें विसर्गाचें षत्व होत नाहीं तसेंच 'सोऽपदादौ' या प्रकृत सूत्रानें होणारें विसर्गाचें) सत्व देखील होत नाहीं. (कारण 'काम्यच्' प्रत्यय पुढें आला असतां 'रु'चे जागीं होणाऱ्या विसर्गाचेंच षत्व किंवा सत्व होतें व पूर्वीं सांगितल्याप्रमाणें 'गीः' या स्थलीं जो विसर्ग झाला आहे तो 'रु' स्थानिक नसून 'गीर्' यांतील रेफाचे जागीं झाला असल्यामुळें, त्याचें सत्व किंवा षत्व होऊं शकत नाहीं.) मनोरमेंतील 'तत्रापि' या पदांचा 'षत्वविधावपि,' म्हणजे 'इणः षः' या षत्वविधायक सूत्रांत देखील, ('काम्ये रोरेव' या वार्तिकाची अनुवृत्ति असल्यामुळें) असा अर्थ आहे. सारांश 'सोऽपदादौ' या प्रकृत सूत्रावर 'काम्ये रोरेव' हें वार्तिक पठित असल्यामुळें व 'इणः षः' या उत्तर सूत्रांत त्या वार्तिकाची अनुवृत्ति होत असल्यामुळें 'गीः काम्यति' या उदाहरणांत (रुस्थानिक नसणाऱ्या विसर्गाचें) षत्व व सत्व हीं दोन्ही होत नाहींत हें ध्यानांत ठेवावें.

मनोरमा—"इणः षः" पूर्वस्यापवादः । इदं सूत्रं "सः" इति च द्वयमपि उत्तरत्रानुवर्तते । यथा सम्भवमिणः परस्य षोऽन्यस्य स इति विवेकः ।

'इणः षः' सू. १५३ हें सूत्र 'सोऽपदादौ' सू. १५२ या पूर्वसूत्राचें अपवादक सूत्र आहे. 'इणः षः' हें प्रकृत सूत्र व 'सोऽपदादौ' या सूत्रांतील 'सः' हें पद उत्तर सूत्रांमध्यें अनुवृत्त होतें. जेथें उत्तर सूत्रांच्या उदाहरणांत 'इण्' पुढें विसर्ग आला असेल तेथें विसर्गाचें षत्व होतें व जेथें इण्भिन्नापुढें विसर्ग आला असेल तेथें विसर्गाचें सत्व होतें असा या दोन स्थलीं फरक होतो. (उदाहरणार्थ 'सर्पिष्पाशम्, पुरस्करोति' इत्यादि)

मनोरमा——पुरः प्रवेष्टव्या इति । पॄ पालनपूरणयोः "भ्राज-भास–" इत्यादिना क्विप् । तदन्ताज्जस् । जसन्ततां स्फुटीकर्तुं पूः पुरावित्युपन्यस्तम् ।।

('नमस्पुरसोर्गत्योः' सू. १५४ या सूत्रावरील कौमुदींत 'अगतित्वान्नेह । पूः पुरौ पुरः प्रवेष्टव्याः' हें जें प्रत्युदाहरण दिलें आहे त्यांतील) 'पुरः' हा शब्द 'पॄ पालनपूरणयोः' या धातूहून 'भ्राजभास' सू. ३१५७ या सूत्रानें क्विप् प्रत्यय होऊन व त्या क्विबन्ताहून 'जस्' हा विभक्तिप्रत्यय होऊन सिद्ध झाला आहे. हा जसन्त शब्द आहे (व गतिसंज्ञक 'पुरः' हा प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेला 'पुरः' हा शब्द नव्हें) हें स्पष्ट करण्याकरितां 'पूः पुरौ पुरः' असा वरील प्रत्युदाहरण देतेवेळीं कौमुदींत उपन्यास केला आहे. ('पॄ' धातूहून 'भ्राजभास' या सूत्रानें क्विप् प्रत्यय केला असतां, 'उदोष्ठ्यपूर्वस्य' सू. २४९४ या सूत्रानें 'पॄ' यांतील ऋकाराचा उकार होऊन व 'उरण्रपरः' सू. ७० या सूत्रानें त्या उकारापुढें रकार होऊन 'पुर्' असें क्विबन्त प्रातिपदिक सिद्ध झाल्यावर त्या प्रातिपदिकाहून प्रथमेच्या बहुवचनाचा 'जस् = अस्' प्रत्यय केल्यानें 'पुर् + अस् = पुरः' असें प्रथमेच्या बहुवचनाचें रूप सिद्ध होतें. हा अव्यय नसणारा 'पुरस्' शब्द गतिसंज्ञक नसल्यामुळें, 'नमस्पुरसोर्गत्योः' या सूत्रानें होणारें विसर्गाचें सत्व 'पुरः प्रवेष्टव्याः' या उदाहरणांत झालें नाहीं.)

मनोरमा——"इदुदुपधस्य" ।। इदुतौ उपधे यस्य समुदायस्य तस्यावयवो यो विसर्जनीय इति वैय्यधिकरण्येन सम्बन्धः । "अप्रत्ययस्य" इति तु अप्रत्ययो यो विसर्ग इति सम्बद्ध्यते । सम्भवति सामानाधिकरण्ये वैयधिकरण्यस्यान्याय्यत्वात् । न च विसर्गस्य प्रत्ययत्वमप्रसिद्धमिति वाच्यम् । अग्निः करोतीत्यादौ स्थानिवद्भावेन तत्प्रसिद्धेः । न चातिदेशं प्रति त्रिपाद्या असिद्धत्वं शङ्क्यम् "अप्रत्ययस्य" इति निषेधेनैव सिद्धत्वज्ञापनात् । अत

एवाग्निरित्यादौ रोर्विसर्गः सिद्धचति । अन्यथाऽपदान्तत्वान्न स्यात् । विसर्गविधिस्तु पुनरित्यादौ चरितार्थः । ज्ञापकं च विशेषापेक्षम् । तेन "अचः परस्मिन्–" इति त्रिपाद्यां न प्रवर्तते । एवं च "पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्" इति सिद्धान्त उक्तयुक्तिमूलको न तु वाचनिक इति प्रपञ्चितं शब्दकौस्तुभेऽस्माभिः । नन्वेवं मातुः कार्यमित्यादौ षत्वं स्यादिति चेन्न । कस्कादिषु भ्रातुष्पुत्रशब्दस्य पाठेन ङसिङसोः अत उकारात्परस्य षत्वं नेति ज्ञापनात् । एवं च अप्रत्ययस्य इत्येतदपि व्यधिकरणमेवेति हरदत्तेनोक्तं नातीवादर्तव्यम् । मातुरिति । अत्र हि "ऋत उत्" इत्येकादेशशास्त्रं विसर्गं प्रति परम्परया प्रयोजकम् । आकरे तु एकादेशशास्त्रनिमित्तात्" इति प्रचुरः पाठः । तत्र एकादेशशास्त्रं निमित्तं यस्य उकारस्य तस्मादित्यर्थः ।।

मुहुः कामेति । इह "कुप्वोः ≍क≍पौ" इति प्रवर्तते । वृत्तौ मुहुस्कामेति सकारः क्वचित् पठचते, तत्प्रामादिकमिति हरदत्तः ।

'इदुदुपधस्य चाप्रत्ययस्य सू. १५५ या सूत्रांतील 'इदुदुपधस्य' या पदाचा 'इदुतौ उपधे यस्य समुदायस्य' असा विग्रह होऊन त्याचा 'तस्यावयवो यो विसर्जनीयः' असा 'विसर्जनीयः' या पदाशीं वैयधिकरण्यानें अन्वय होतो. (प्रकृत सूत्रांत 'विसर्जनीयस्य सः' या पूर्वसूत्रांतून 'विसर्जनीयस्य' हें पद अनुवृत्त होतें व 'इदुदुपधस्य' याचा 'विसर्जनीयस्य' या पदाशीं सामानाधिकरण्यानें अन्वय केल्यास, 'इदुतौ उपधे यस्य विसर्जनीयस्य' असा अर्थ होईल. परंतु 'उपधा' या अवयववाचक शब्दानें अवयवीचा, म्हणजे समुदायाचा, आक्षेप होत असल्यामुळें, 'इदुदुपधस्य' हें 'समुदायस्य' याचें विशेषण होतें व 'समुदायस्य' ही अवयवषष्ठी मानल्यानें तशा समुदायाचा अवयव जो विसर्ग असा वैयधिकरण्यानें अन्वय होतो.) प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' हें पद (अनुवृत्त असलेल्या 'विसर्जनीयस्य' या पदाचें विशेषण होत असल्यामुळें) 'अप्रत्ययो यो विसर्गः' असा त्या दोन पदांचा सामानाधिकरण्यानें अन्वय होतो. (व 'प्रत्ययावयवभिन्नो यो विसर्गः'

असा वैयधिकरण्यानें अन्वय होत नाहीं;) कारण जेथें सामानाधिकरण्यानें अन्वय होणें संभवतें तेथें वैयधिकरण्यानें अन्वय करणें अयोग्य आहे. ('इदुदुपधस्य' या समुदायवाचक पदाचा 'विसर्जनीयस्य या पदाशीं सामानाधिकरण्यानें अन्वय होणें संभवत नसल्यामुळें, दीक्षितांनीं त्या दोन पदांचा वैयधिकरण्यानें अन्वय केला आहे. परंतु 'अप्रत्ययस्य' व विसर्जनीयस्य' या दोन पदांचा सामानाधिकरण्यानें अन्वय होणें संभवत असल्यामुळें व तसा अन्वय जेथें होऊं शकतो तेथें वैयधिकरण्यानें अन्वय करणें बरोबर नाहीं असा न्याय असल्यामुळें, त्यांनीं या दोन पदांचा सामानाधिकरण्यानेंच अन्वय केला आहे आणि त्यामुळें 'इदुदुपधस्य समुदायस्य अवयवरूपः प्रत्ययभिन्नो यो विसर्गः तस्य षः स्यात् कुप्वोः परयोः' असा त्यांच्या मतें प्रकृत सूत्राचा अर्थ होतो.) विसर्ग प्रत्ययरूपानें कोठेंहि प्रसिद्ध नाहीं हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'अग्निः करोति' इत्यादि स्थलीं तो प्रत्ययरूपानें, स्थानिवद्‌भाव केल्यानें, आढळतो. ('अग्नि + सु' या स्थलीं 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचे जागीं 'रु' होऊन व 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें त्या 'रु' चा विसर्ग होऊन तो रुस्थानिक विसर्ग स्थानिवद्‌भावानें प्रत्यय मानतां येतो व अशा रीतीनें, जरी विसर्ग हा प्रत्ययरुपानें पाणिनीनें साक्षात् पठित केला नाहीं तरी, जेव्हां तो प्रत्ययाचे जागीं होतो तेव्हां त्याला स्थानिवद्‌भावानें प्रत्यय मानतां येतें, म्हणजे त्या विसर्गाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें प्रत्ययत्व हा धर्म येतो.) 'स्थानिवदादेशः' सू. ४९ या अतिदेशविधायक सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध आहे (व त्यामुळें त्रैपादिक सूत्रांनीं 'सु' प्रत्ययाचे जागीं झालेला 'रु' स्थानिक विसर्ग स्थानिवद्भावानें प्रत्यय आहे असें मानतां येत नाहीं) अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाहीं; कारण प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' या निषेधानेंच, 'स्थानिवदादेशः' या सूत्राच्या दृष्टीनें त्रिपादी सिद्ध आहे, हें ज्ञापित होतें. (विसर्ग प्रत्ययरूपानें किंवा प्रत्ययावयवरूपानें

अष्टाध्यायींत कोठेंहि पठित नाहीं. 'सु = स्' असा प्रत्यय व तसेंच 'जस्, शस्, भिस्, भ्यस्' इत्यादि सान्त प्रत्ययच अष्टाध्यायींत पठित आहेत व त्या प्रत्ययरूप किंवा प्रत्ययांतील अन्त्य सकाराचे जागीं 'रु' व विसर्ग हे 'ससजुषो रुः' व 'खरवसानयोर्विसर्जनीयः' या त्रैपादिक सूत्रांनींच होतात व त्या विसर्गाचे ठिकाणीं 'स्थानिवदादेशः' सू. ४९ हें सापादिक सूत्र प्रवृत्त केल्यासच त्या विसर्गाला स्थानिवद्भावानें प्रत्यय किंवा प्रत्ययावयव मानतां येतें, आणि प्रकृत सूत्रांत त्रैपादिक कार्यांचा आश्रय करून 'अप्रत्ययस्य विसर्गस्य' हीं पदें घातलीं असल्यामुळें त्यावरूनच हें सिद्ध होतें कीं, 'स्थानिवदादेशः' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध ठरत नसून तें सूत्र त्रिपादींत देखील प्रवृत्त होतें व त्यामुळें त्या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रैपादिक सूत्रांनीं प्रत्ययाचे जागीं झालेला विसर्ग सिद्ध ठरून स्थानिवद्भावानें प्रत्ययरूप ठरतो.) असें आहे म्हणूनच 'अग्निर्' इत्यादि स्थलीं 'रु' चा विसर्ग होऊं शकतो. स्थानिवद्भाव न मानल्यास, तो 'रु' अपदान्त ठरून त्याचा विसर्ग न होण्याची आपत्ति येईल. ('अग्नि + सु' या स्थलीं 'ससजुषो रुः' या त्रैपादिक सूत्रानें 'सु' प्रत्ययाचे जागीं 'रु' होऊन 'अग्निर्' अशी स्थिति झाल्यावर जर 'सु' प्रत्ययाचे जागीं झालेल्या 'रु' ला स्थानिवद्भावानें प्रत्यय मानलें नाहीं तर 'सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें होणारी पदसंज्ञा 'अग्निर्' याला होणार नाहीं व त्यामुळें 'खरवसानयोः' या सूत्रानें पदान्तीं असलेल्या 'रु' चे जागीं जो विसर्ग होणें सांगितलें आहे तो 'अग्निर्' यांतील अन्त्य 'रु' चे जागीं होऊं शकणार नाहीं व 'अग्निः' असें विसर्गान्त इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. 'स्थानिवदादेशः' हें सूत्र त्रिपादींत देखील प्रवृत्त होतें व त्याच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध ठरत नाहीं असें मानल्यानेंच तसें विसर्गान्त इष्ट रूप सिद्ध होऊं शकतें.) 'पुनर्' इत्यादि स्थलीं विसर्गविधि चरितार्थ ठरतो. (स्वरादिगणांत 'पुनर्' असें रेफान्त अव्यय पठित आहे. या शब्दाच्या

अन्तीं असणारा रेफ 'ससजुषो रुः' या सूत्रानें झालेला 'रु' नसून मूळचा रेफ आहे व 'पुनर्' या अव्यायाहून सुबुत्पत्ति केल्यावर 'अव्ययादाप्सुपः' सू. ४५२ या सूत्रानें जरी विभक्तिप्रत्ययाचा लुक् होतो तरी, 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें 'पुनर्' याला पदसंज्ञा होते व त्या पदाच्या अन्तीं असलेल्या रेफाचा 'खरवसानयोः' या सूत्रानें विसर्ग होतो व अशा रीतीनें या उदाहरणांत अन्त्य रेफाचें ठिकाणीं पदान्तत्वरूप धर्म आणण्या-करितां स्थानिवद्भाव मानण्याचा प्रसंगच येत नाहीं व स्थानिवद्भाव न मानतां 'खरवसानयोः' हें विसर्गाचें विधान करणारें सूत्र या स्थलीं चरितार्थ ठरतें. पण 'अग्निर्' इत्यादि स्थलीं, वर सांगितल्याप्रमाणें, 'सु' प्रत्ययाचे जागीं झालेला 'रु' स्थानिवद्भावानें प्रत्यय आहे असें मानल्याशिवाय त्याचें ठिकाणीं पदान्तत्व येत नाहीं व त्यामुळें पदान्तीं असलेल्या 'रु' चा विसर्ग होतो असें विधान करणारें 'खरवसानयोः' हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं. म्हणून तशा ठिकाणीं स्थानिवद्भाव मानणें आवश्यक आहे.) 'अप्रत्ययस्य' हें प्रकृत सूत्रांतील पद विशेषापेक्ष ज्ञापक आहे, म्हणजे 'स्थानिवदादेशः' हें अतिदेशविधायक स्थानिवद्भावाचें सापादिक शास्त्र त्रिपादींत प्रवृत्त होतें एवढ्याचेंच ज्ञापक आहे. त्यामुळें 'अचः परस्मिन् पूर्वविधौ' सू. ५० हें (स्थानिवद्भावाचें विधान करणारें सापादिक) सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होत नाहीं, आणि म्हणूनच 'पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्' हा सिद्धान्त वर सांगितलेल्या युक्तीनेंच सिद्ध होतो व त्याच्या सिद्धीकरितां तें वार्तिक मान-ण्याची कांहीं गरज नाहीं हें शब्दकौस्तुभांत आम्ही सिद्ध करून दाखविलें आहे. ('अचः परस्मिन्' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें, 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें, त्रिपादि असिद्ध असल्यामुळें, तें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होऊं शकत नाहीं व त्यामुळें त्रैपादिक कार्य कर्तव्य असतां, अजादेशाचे ठिकाणीं स्थानिवद्भाव होऊं शकत नाहीं हें आपोआपच सिद्ध होतें आणि म्हणून त्याच्या सिद्धीकरितां

'पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्' हें वार्तिक मानण्याची कांही गरज नाहीं. कारण जें युक्तीनेंच सिद्ध होतें त्याच्याकरितां स्वतंत्र वार्तिक मानण्याची गरज काय असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'न पदान्त' १·१·५८ या सूत्रावरील शब्दकौस्तुभांत 'पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्' हें वचन पठित करून दीक्षितांनीं या वचनासंबंधानें 'न्यायसिद्धं चेदम् । अचः परस्मिन्नित्यतिदेशंप्रति त्रिपादीस्थस्यासिद्धतया तस्मिन् कर्तव्येऽतिदेशाप्राप्तेः । न चैवं स्थानिवत्सूत्रस्याप्यप्रवृत्तौ राम इति विसर्गो न स्यादिति वाच्यम् । प्रत्ययः परश्चेत्यादि निर्देशैर्भोभगोअधो इति सूत्रेऽश्ग्रहणेन च तत्प्रवृत्तेर्ज्ञापितत्वादित्यवधेयम्' असें म्हटलें आहे.) 'प्रत्ययभिन्नस्य विसर्गस्य' असा सामानाधिकरण्यानें अन्वय केल्यास, 'मातुः कार्यम्' इत्यादि स्थलीं प्रकृत सूत्रानें विसर्गाचें षत्व होण्याची आपत्ति येते असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण कस्कादिगणांत 'भ्रातुष्पुत्रः' या शब्दाचा पाठ केला असल्यामुळें त्यावरून हें ज्ञापित होतें कीं, (ऋदन्त शब्दापुढें) 'ङसि' व 'ङस्' हे प्रत्यय आल्यास ऋकाराचे व प्रत्ययांतील अकाराचे जागीं 'उ' हा जो एकादेश होतो त्याच्यापुढें येणाऱ्या विसर्गाचें षत्व होत नाहीं. ('मातृ + ङस् = मातृ + अस्' या स्थलीं 'ऋत उत्' सू. २७९ या सूत्रानें 'मातृ' यांतील ऋकाराचे व 'ङस् = अस्' प्रत्ययांतील अकाराचे जागीं उकार हा एकादेश होतो व 'उरण्रपरः' सू. ७० या सूत्रानें तो उकार रपर होऊन 'मातुर्स्' अशी स्थिति झाली असतां 'रात्सस्य' सू. २८० या सूत्रानें अन्त्य सकाराचा लोप होऊन 'मातुर्' असें रूप झाल्यावर 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें अन्त्य रेफाचा विसर्ग होऊन 'मातुः' असें रूप सिद्ध होतें. 'मातुः कार्यम्' या उदाहरणांत 'मातुः' यांतील 'उ' या उपधेपुढें जो विसर्ग आहे तो अप्रत्ययरूप, म्हणजे प्रत्ययाचे जागीं झालेला विसर्ग नसून 'उरण्रपरः' या सूत्रानें जो 'उ' या एकादेशापुढें रेफ झाला आहे त्या रेफाचे जागीं झालेला, विसर्ग असल्यामुळें

व त्यापुढें 'कार्यम्' यांतील ककार असल्यामुळें, प्रकृत सूत्रानें त्या विसर्गाचें षत्व कां होऊं नये अशी शंकाकाराची शंका आहे. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, कस्कादिगणांत 'भ्रातुष्पुत्रः' या शब्दाचा पाणिनीनें मुद्दाम पाठ केला असल्यामुळें त्यावरून हें ज्ञापित होतें कीं, एकादेशशास्त्ररूप निमित्तामुळें निष्पन्न झालेल्या 'उ' या उपधेंतील वर्णापुढें येणाऱ्या विसर्गाचें षत्व होत नाहीं, व 'मातुः कार्यम्' या स्थलीं 'मातुः' या रूपांत जो उकार झाला आहे तो, वर सांगितल्याप्रमाणें, 'ऋत उत्' या एकादेश-शास्त्रानें निष्पन्न झाला असून तशा उपधारूप उकारापुढें विसर्ग आला असल्यामुळें, जरी त्या विसर्गापुढें ककार आला आहे व उपधेंत उकार आहे तरी, त्या विसर्गाचें प्रकृत सूत्रानें होणारें षत्व होत नाहीं. 'मातुः' हें पद जसें 'मातृ' या ऋदन्त शब्दाचें षष्ठीचें एकवचन आहे तसेंच 'भ्रातुः' हें पद 'भ्रातृ' या ऋदन्त शब्दाचें षष्ठीचें एकवचन आहे व वर दिलेल्या ज्या प्रक्रियान्वयें 'मातुः' हें रूप सिद्ध होतें त्याच प्रक्रियान्वयें 'भ्रातुः' हें रूप देखील सिद्ध होतें. 'भ्रातुः पुत्रः' या स्थलीं देखील 'भ्रातुः' यांतील विसर्ग 'उ' या उपधेपुढें असून त्यापुढें पकार असल्यामुळें 'इदुदुपधस्य चाप्रत्ययस्य' या सूत्रानें त्या विसर्गाचें षत्व होऊं शकलेंच असतें व त्यामुळें 'कस्कादिषु च' सू १४४ या सूत्रान्वयें षत्व होण्याकरितां 'भ्रातुष्पुत्रः' या शब्दाचा जो कस्कादि-गणांत पाठ केला आहे तो पाठ करण्याची कांहींच गरज नव्हती. पण ज्याअर्थी त्या शब्दाचा कस्कादिगणांत पाणिनीनें मुद्दाम पाठ केला आहे त्याअर्थी तो पाठ व्यर्थ न ठरतां सार्थक ठरावा याकरितां हें मानणें आवश्यक आहे कीं, एकादेशशास्त्रानें निष्पन्न झालेल्या उपधारूप उकारापुढें विसर्ग आल्यास, त्या विसर्गाचें षत्व होत नाहीं. पण 'भ्रातुष्पुत्रः' या स्थलीं षत्व होणें इष्ट असल्यामुळें, त्या शब्दाचा कस्कादिगणांत मुद्दाम करावा लागला आणि अशा रीतीनें तो पाठ वरील नियमाचा ज्ञापक ठरत असल्यामुळें, त्या नियमान्वयें

'मातुः कार्यम्' या स्थलीं प्रकृत सूत्रानें होणारें विसर्गाचें षत्व होत नाहीं) 'सम्भवति सामानाधिकरण्ये वैयधिकरण्यस्य अन्याय्यत्वात्' असा नियम असल्यामुळें, 'अप्रत्ययस्य इत्येतदपि व्यधिकरणमेव'— म्हणजे 'अप्रत्ययस्य' या शब्दाचा 'विसर्गस्य' या अनुवृत्त होणाऱ्या पदाशीं 'प्रत्ययभिन्नस्य विसर्गस्य' असा सामानाधिकरण्यानें अन्वय न करितां, जसा 'इदुदुपधस्य' या पदाचा 'विसर्गस्य' या पदाशीं वैयधिकरण्यानें अन्वय केला आहे तसाच 'अप्रत्ययस्य' व 'विसर्जनीयस्य' या पदांचा देखील 'प्रत्ययावयवभिन्नस्य विसर्जनीस्य' असाच वैयधिकरण्यानें अन्वय करावा — असें जें हरदत्तानें म्हटलें आहे तें विशेष आदराला पात्र नाहीं. (या पंक्तीची शब्दरत्नांत विस्तृत चर्चा करण्यांत येईल.) 'मातुः कृपा' या स्थलीं 'ऋत उत्' सू. २७९ हें एकादेशशास्त्र विसर्गाचें (साक्षात् निमित्त नसून) परंपरेनें निमित्त आहे (कारण तें एकादेशशास्त्र एवढेंच सांगतें कीं, ऋदन्त अङ्गापुढें पञ्चमीच्या व षष्ठीच्या एकवचनाचा 'ङसि' किंवा 'ङस्' — म्हणजे 'अस्'— प्रत्यय आल्यास, 'ऋ' व 'अस्' प्रत्ययांतील अकार या दोहोंचे जागीं 'उ' असा एकादेश होतो. 'उ' हा एकादेश रपर व्हावा व पदान्तीं असलेल्या तशा रेफाचा विसर्ग व्हावा याचें विधान तें एकादेशशास्त्र मुळींच करीत नाहीं. 'उरण्रपरः' सू ७० या सूत्रान्वयें 'उ' हा एकादेश रपर होतो व तो रपर झाल्यावर त्यांतील अन्त्य रकार पदान्तीं येत असल्यामुळें, त्या रकाराचा 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या सूत्रानें विसर्ग होतो. सारांश 'खरवसानयोः' हें सूत्र विसर्ग होण्याचें साक्षात् प्रयोजक निमित्त आहे. तरी पण एकादेशशास्त्र जोपर्यंत प्रवृत्त होत नाहीं व 'उ' असा एकादेश होत नाहीं तोपर्यंत 'उरण्रपरः' व 'खरवसानयोर्विसर्जनीयः' या सूत्रांची प्रवृत्ति होणें असंभवनीय असल्यामुळें, तें एकादेशशास्त्र विसर्गाचें परंपरेनें निमित्त ठरतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) परंतु भाष्यांत 'एकादेशशास्त्रनिमित्तात्' असा

अनेक स्थलीं पाठ आढळतो व 'एकादेशशास्त्रं निमित्तं यस्य उकारस्य तस्मात्' असा त्याचा अर्थ आहे. (दीक्षितांनीं प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'एकादेशशास्त्रनिमित्तकस्यं-विसर्गस्य-न षत्वम् । कस्कादिषु भ्रातुष्पुत्रशब्दस्य पाठात्' असें म्हटलें आहे. याला प्रकृत सूत्रावरील भाष्य प्रमाण आहे. या भाष्यांत भाष्यकार म्हणतात— 'एवं तर्हि भ्रातुष्पुत्रग्रहणं ज्ञापकमेकादेशनिमित्तात् षत्वप्रतिषेधस्य । यदयं कस्कादिषु भ्रातुष्पुत्रशब्दं पठति तज्ज्ञापयत्याचार्यो नैकादेशनिमित्तात्षत्वं भवतीति ।') 'मुहुःकामा' या स्थलीं ('मुहुसः प्रतिषेधः' हें वार्तिक असल्यामुळें जरी 'इदुदुपधस्य' हें सूत्र प्रवृत्त होत नाहीं व विसर्गाचें षत्व होत नाहीं तरी) 'कुप्वोः' सू. १४२ हें सूत्र प्रवृत्त होऊं शकतें (व त्यामुळें विसर्गाचे जागीं विकल्पेंकरून जिव्हामूलीय आदेश होऊं शकतो.) काशिकावृत्तीच्या कांहीं प्रतींत 'मुहुस्कामा' असा जो सकारयुक्त पाठ आढळतो तो पाठ चूक आहे असें हरदत्तानें म्हटलें आहे. (कारण 'कुप्वोः' सू. १४२ हें सूत्र 'विसर्जनीयस्य सः' सू. १३८ या सूत्रानें होणाऱ्या सत्वाचें बाधक सूत्र आहे हें पूर्वीं सांगितलेंच आहे.)

शब्दरत्न—समुदायस्येति । "अलोऽन्त्यात्—" इति सूत्रे अवयववाचकान्त्यशब्देन समुदायस्याक्षेपेण उपधात्वस्य समुदायनिरूपितत्वादिति भावः । इदुदुपधस्य विसर्गान्तस्य पदस्येति सामानाधिकरण्येनान्वयः । षत्वं तु "अलोऽन्त्यस्य" इत्यनेन विसर्गस्येत्यन्ये । व्याख्यादर्शोक्तरीत्याऽऽह — अप्रत्ययो य इति । तत्प्रसिद्धेरिति । विसर्गस्य प्रत्ययत्वप्रसिद्धेरित्यर्थः । न स्यादिति । रोरसुप्त्वेन पदत्वाप्रवृत्तेरिति भावः । चरितार्थ इति । ननु तत्रापि पुनर् स् इत्यवस्थायां जातपदत्वस्यातिदेशेनैव सुलोपे कृते आनयनमिति को विशेषः । न चैकदेशविकृतन्यायेन सिद्धिः । अग्निरित्यत्रापि समत्वात् । न चाग्निरित्यत्रादेशस्यातिदेशलभ्यकार्यस्य चासिद्धत्वमत्र तल्लभ्यकार्यस्यैवेति विशेष इति वाच्यम् । सर्वथा अतिदेशापेक्षणेन तस्याकिञ्चित्करत्वात् । किं च रुत्वा-

सिद्धत्वेनाग्निरित्यत्र पदत्वं सुलभम् । किं च विसर्गस्थान्यल्रूप-रेफवृत्तिप्रत्ययत्वस्य स्थान्यल्धर्मत्वेन तदतिदेशाप्रवृत्तिरिति प्रत्ययरूपो विसर्गो दुर्लभः । स्पष्टा चेयं रीतिः "भोभगो-" इति सूत्रे भाष्ये । किं चैवं सामानाधिकरण्ये "असोः" इति वक्तव्ये ऽप्रत्ययग्रहणं व्यर्थं स्यात । किं चैवं "नित्यं समासे-" इति सूत्रे "अनुत्तरपद-स्थस्य" इत्यस्य वैय्यर्थ्यम् । परमसर्पिः कुण्डिकेत्यादावनेन षत्वस्य दुर्वारत्वात् । किं चैवं "नित्यं समासे-" इति सूत्रस्थभाष्यासङ्गतिः । तथा हि-अथाव्युत्पन्नं प्रातिपादिकं सर्पिरादि ततो नित्ये प्राप्ते "इसुसोः सामर्थ्ये इति विभाषा आरभ्यत इति तत्रोक्तम् । प्रत्यय-त्वपर्याप्त्यधिकरणभिन्नस्येत्यर्थे तु व्युत्पत्तिपक्षेऽपि नित्यषत्वप्राप्तेर-थाव्युत्पन्नमित्यादेरसङ्गतिः स्पष्टैव । अत्र भाष्येऽथेति यद्यर्थे । तेन सर्पिषा यजुषेत्यादौ षत्वसिद्धये व्युत्पत्तिपक्ष एव न त्वसाविति सूचितम् । तस्मादत्र प्रत्ययपदं तत्सम्बन्धिपरं प्रत्ययसम्बन्धिभि-न्नस्य विसर्गस्येत्यर्थ उचितः । अत एव कविभिः कृतमित्यादौ न दोषः । "नित्यं समासे-" इति सूत्रस्थानुत्तरपदस्थस्येत्यस्य, कस्कादिषु सर्पिष्कुण्डिकाशब्दपाठस्य चैतदर्थज्ञापकतैवोचितेति चेत्सत्यम् । व्याख्यादर्शानुसारेणैतद्ग्रन्थसत्त्वात्तद् ध्वनयन्वक्ष्यति-नातीवादर्त्तव्यमिति ।

'अलोऽन्त्यात्पूर्व उपधा' सू. २४९ या उपधासंज्ञाविधायक सूत्रांत जो अवयववाचक 'अन्त्य' शब्द आहे त्यानें समुदायाचा-म्हणजे अवयवीचा-आक्षेप होत असल्यामुळें, 'उपधा' तशा समुदायाचा बोध करते. (समुदायांतील अन्त्य वर्णाच्या लगेंच पूर्वी असणाऱ्या वर्णास 'उपधा' ही संज्ञा असल्यामुळें, 'उपधा' या शब्दानें ज्याची ती उपधा आहे तशा समुदायाचा आक्षेप होतो, आणि म्हणूनच 'इदुतौ उपधे यस्य समुदायस्य तस्यावयवो यो विसर्जनीय इति वैयधिकरण्येन सम्बन्धः' असें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे. परंतु दीक्षितांनीं जसा वर सांगितल्याप्रमाणें वैयधि-करण्यानें अन्वय केला आहे तसा अन्वय न करितां) इतर वैयाकरण

'इदुदुपधस्य विसर्गान्तस्य पदस्य' असा सामानाधिकरण्यानें अन्वय करितात आणि 'अलोऽन्त्यस्य' सू. ४२ ही परिभाषा प्रवृत्त करून अन्त्य विसर्गाचें षत्व करितात. ('इदुदुपधस्य' हें प्रकृत सूत्र 'पदस्य' या अधिकारांत पठित असल्यामुळें त्यांत 'पदस्य' हें पद अनुवृत्त होतें आणि 'विसर्जनीयस्य सः' या पूर्वसूत्रांतून 'विसर्जनीयस्य विसर्गस्य' हें पद प्रकृत सूत्रांत अनुवृत्त होतें, आणि ते वैयाकरण 'विसर्गस्य' हें पद 'पदस्य' या पदाचें विशेषण मानतात व 'येन विधिस्तदन्तस्य' सू. २६ या सूत्रान्वयें 'विसर्गस्य' याचा 'विसर्गान्तस्य' असा अर्थ करून वर प्रमाणें प्रकृत सूत्राचा अर्थ करितात. या पक्तींत 'अन्ये' हें अरुचि प्रदर्शक पद घातलें असल्यामुळें, हें मत म्हणजे अशा तऱ्हेनें अन्वय करणें शब्दरत्नकारांस मान्य नाहीं हें सूचित होतें, व याचें कारण हें कीं, 'पदस्य' ८–१–१६ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'पदस्य' ही स्थानषष्ठी न मानतां विशेषणषष्ठी मानली आहे व या वैयाकरणांचें मत बरोबर मानल्यास व 'पदस्य' ही विशेष्यषष्ठी मानून स्थानषष्ठी मानल्यास, त्या भाष्याशीं विरोध येतो. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात– 'पदस्येति नैषा स्थानषष्ठी । का तर्हि ? । विशेषणषष्ठी…… अथवा यदयं न लोपः प्रातिपदिकान्तस्येत्यन्तग्रहणं करोति तज्ज्ञापयत्याचार्यो विशेषणषष्ठ्येषा न स्थानषष्ठीति ।.') व्याख्यादर्शांत जसें प्रकृत सूत्राचें व्याख्यान केलें आहे त्या व्याख्यानाला धरूनच 'अप्रत्ययो यो विसर्गः' असें दीक्षितांनीं व्याख्यान केलें आहे. (शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, 'अप्रत्ययो यो विसर्गः' असें जें दीक्षितांनीं व्याख्यान केलें आहे तें वास्तविक दीक्षितांचें मत नसून व्याख्यादर्शांत केलेला अर्थ दीक्षितांनीं दिलेला आहे, व याची विस्तृत चर्चा शब्दरत्नकार पुढें करणार आहेत.) मनोरमेंत 'तत्प्रसिद्धेः' असें जें म्हटलें आहे त्याचा 'विसर्गस्य प्रत्ययत्व प्रसिद्धेः' असा अर्थ आहे. 'अन्यथाऽपदान्तत्वान्न स्यात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ

हा आहे कीं, ('स्थानिवदादेशः' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध ठरते व त्यामुळें तें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होऊं शकत नाहीं असें मानल्यास, 'ससजुषो रुः' सू. १६२ या त्रैपादिक सूत्रानें, 'अग्नि + सु' या स्थलीं, 'सु' प्रत्ययाचे जागीं झालेला) 'रु' हा 'सुप्' नसल्यामुळें, 'अग्नि + सु = अग्निर्' याला पदसंज्ञा होऊं शकणार नाहीं (व त्यामुळें 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या सूत्रानें 'अग्निर्' यांतील अन्त्य रुसंज्ञक रकाराचा विसर्ग होऊं शकणार नाहीं. पण 'सु' प्रत्ययाचे जागीं झालेला 'रु' हा 'सु' प्रत्ययच आहे असें 'स्थानिवदादेशः' या सूत्रान्वयें मानल्यासच, 'अग्निर्' याला 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रानें पदसंज्ञा होऊन पदान्तीं असलेल्या रेफाचा 'खरवसानयोः' या सूत्रानें विसर्ग होतो आणि तो विसर्ग स्थानिवद्भावानें प्रत्ययच आहे असें मानल्यानें त्याचें प्रकृत सूत्रानें षत्व न होतां 'अग्निः करोति' असा इष्ट प्रयोग सिद्ध होतो.) 'विसर्गविधिस्तु पुनरित्यादौ चरितार्थः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यावर शंकाकार अशी शंका करितो कीं, 'पुनर्' या स्थलीं देखील त्या अव्ययाहून 'सु' प्रत्यय केल्यावर 'पुनर् + सु' अशी स्थिति झाली असतां, (सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें त्या समुदायाला) जी पदसंज्ञा होते ती पदसंज्ञा, ('अव्ययादाप्सुपः' सू. ४५२ या सूत्रानें) 'सु' प्रत्ययाचा लुक् झाल्यावर, 'पुनर्' याचे ठिकाणीं अतिदेशशास्त्रानेंच आणतां येते. मग या दोन उदाहरणांत फरक कोणता ? (शंकाकार असें म्हणतो कीं, 'अग्नि + सु' या स्थितींत 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रानें त्या समुदायाला जी पदसंज्ञा होते ती पदसंज्ञा, 'अग्निस्' या पदांतील अन्त्य सकाराचे जागीं 'ससजुषो रुः' या सूत्रानें 'रु' हा आदेश केल्यावर 'अग्निस्' चें 'अग्निर्' असें जें रूप होतें त्याचे ठिकाणीं आणण्याकरितां ज्याप्रमाणें 'स्थानिवदादेशः' या अतिदेशशास्त्राचा आश्रय करावा लागतो त्याचप्रमाणें 'पुनर् + सु' या स्थितींत 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रानें प्राप्त झालेली पदसंज्ञा, 'अव्ययादाप्सुपः'

या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लुक् झाल्यावर 'पुनर्' असें जें रूप होतें त्याचे ठिकाणीं आणण्याकरितां 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या अतिदेशशास्त्राचा आश्रय घ्यावा लागतोच आणि अशा रीतीनें दोन्ही उदाहरणांत कोणताहि फरक आढळत नाहीं म्हणून 'विसर्गविधिस्तु पुनरित्यादौ चरितार्थः' म्हणजे 'अतिदेशशास्त्र-मनाश्रित्य पुनरित्यादौ विसर्गविधिश्चरितार्थः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें बरोबर मानतां येत नाहीं. सारांश 'अग्नि + सु' या स्थलीं 'सु' प्रत्ययाचे जागीं 'रु' हा आदेश झाल्यावर तो आदेश 'सु' प्रत्ययच आहे असें मानण्याकरितां ज्याप्रमाणें 'स्थानिवदादेशः' या अतिदेशशास्त्राचा आश्रय करावा लागतो त्याचप्रमाणें 'पुनर् + सु' या स्थलीं 'सु' प्रत्ययाचा लुक् झाल्यावर तो 'सु' प्रत्यय कायमच आहे असें मानण्याकरितां देखील 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या अतिदेशशास्त्राचा आश्रय करावा लागतोच व अतिदेश-शास्त्राची प्रवृत्ति केल्याशिवाय—मग तें एकच शास्त्र असो किंवा भिन्न शास्त्र असो— जशी 'अग्निर्' याला पदसंज्ञा होऊं शकत नाहीं तशी 'पुनर्' याला देखील होऊं शकत नाहीं आणि म्हणून वरील दोन उदाहरणांत दीक्षितांनीं जो फरक दाखविला आहे व अति-देशशास्त्राची प्रवृत्ति न करितां 'पुनर्' इत्यादि स्थलीं विसर्गविधि चरितार्थ ठरतो असें जें त्यांनीं म्हटलें आहे तें बरोबर मानतां येत नाहीं असा शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. या शंकेवर जर दीक्षितांचें असें म्हणणें असेल कीं, 'पुनर् + सु' या स्थलीं 'अव्ययादाप्सुपः' या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लुक् झाल्यावर 'पुनर्' असें जें अवशिष्ट रूप राहतें त्याला पदसंज्ञा करतेवेळीं आम्ही 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' या अतिदेशशास्त्राची प्रवृत्ति न करितां 'एकदेशविकृतमनन्यवत्' —परि. ३७—या लौकिकन्यायान्वयें पदसंज्ञा करतो, तर त्यावर शंकाकार असें उत्तर देतो कीं,) 'पुनर्' या एकदेशविकृत रूपाला एकदेशविकृतन्यायानें पदसंज्ञा केली जाते असें जर तुम्ही म्हणत असाल तर तुम्ही दिलेलें ज्ञापक—म्हणजे 'स्थानिव-

दादेशः' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध नाहीं याचें प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' हें पद ज्ञापक आहे असें जें तुम्ही म्हणतां तें—व्यर्थ ठरतें व तें मानण्याची कांहींच गरज नाहीं; कारण) 'अग्नि + सु' या स्थलीं ('सु' प्रत्ययाचे जागीं 'ससजुषो रुः' या सूत्रानें 'रु' आदेश केल्यावर) 'अग्निर्' असें जें एकदेशविकृत रूप होतें त्याला देखील तो लौकिक एकादेशविकृतन्याय लावल्यानें पदसंज्ञा होऊं शकतेच. (कारण हा एकदेशविकृतन्याय पाणिनीय शास्त्रांत सांगितलेल्या 'स्थानिवदादेशः' इत्यादि अतिदेशशास्त्रासारखा शास्त्रीय न्याय नसून लौकिक न्याय असल्यामुळें, सापादिक अतिदेश-शास्त्राला जसें 'पूर्वत्रासिद्धम्' हें सूत्र लागू पडतें व त्यामुळें त्या सापादिक अतिदेशशास्त्राच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध ठरते त्याप्रमाणें या लौकिक न्यायाला 'पूर्वत्रासिद्धम्' हें सूत्र लागू पडत नाहीं व त्यामुळें तो न्याय जसा सपादसप्ताध्यायीला लागू पडतो तसाच त्रिपादीला देखील लागू पडतो. मग 'स्थानिवदादेशः' या सूत्राच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध ठरत नाहीं याचें प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' हें पद जें तुम्ही ज्ञापक मानलें आहे तें ज्ञापक मानून विशेष लाभ कोणता झाला ? जर ज्ञापकाचें सहाय घेतल्याशिवाय 'अग्निर् = अग्निः' याची पदसंज्ञा लौकिक एकदेश-विकृतन्यायानेंच सिद्ध होऊं शकतें तर ज्ञापक मानण्याची गरज काय व वरील दोन उदाहरणांत फरक तो कोणता ? यावर दीक्षितांतर्फे असें म्हणण्यांत येतें कीं, 'पुनर्' व 'अग्निर्' या दोन उदाहरणांत फरक आहे; कारण) 'अग्निर्' या स्थलीं ('ससजुषो रुः' या त्रैपादिक सूत्रानें 'सु' प्रत्ययाचे जागीं झालेला व विसर्गाचा स्थानी) 'रु' हा आदेश व तसेंच त्या 'रु' चे जागीं ('खरवसानयो-र्विसर्जनीयः' या त्रैपादिक सूत्रानें होणारा) विसर्गरूप आदेश हे दोन्ही (त्रैपादिक सूत्रांनीं होत असल्यामुळें, 'सुप्तिङन्तं पदम्' या पदसंज्ञाविधायक सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें) असिद्ध ठरतात; परंतु 'पुनर्' या स्थलीं विसर्गाचा स्थानी रेफ मूळचा स्वतः-

सिद्ध असून त्या रेफाचे जागीं होणारा विसर्गच केवळ असिद्ध आहे. (सारांश 'अग्नि + सु = अग्निर् = अग्निः' या स्थलीं दोन त्रैपादिक सूत्रांनीं दोन असिद्ध कार्यें झालीं असून, 'पुनर् = पुनः' या स्थलीं एकच विसर्गरूप असिद्ध कार्य झालें आहे, आणि 'अणुरपि विशेषोऽध्यवसायकरः' या न्यायान्वयें वरील दोन उदाहरणांत फरक आहे हें सिद्ध होतें. यावर शंकाकार असें उत्तर देतों कीं,) वरील दोन्ही उदाहरणांत पदसंज्ञा होण्याकरितां अतिदेशशास्त्राची मदत घ्यावी लागत असल्यामुळें, त्या दोन उदाहरणांत दाखविलेला वरील फरक केवळ नाममात्र फरक आहे, म्हणजे तशा निरर्थक फरकामुळें वरील दोन उदाहरणांत फरक आहे असें मुळींच म्हणतां येत नाहीं. (शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, जरी 'अग्नि + सु = अग्निर् = अग्निः' या स्थलीं 'सु' प्रत्ययाचा 'रु' होणें व 'रु' चा विसर्ग होणें अशीं दोन असिद्ध कार्यें होतात व 'पुनर् = पुनः' या स्थलीं रेफाचे जागीं विसर्ग होणें एवढें एकच असिद्ध कार्य होतें तरी, 'अग्निः' याला पदसंज्ञा प्राप्त करून देण्याकरितां जशी 'स्थानिवदादेशः' या अतिदेशशास्त्राची मदत घ्यावी लागते त्याचप्रमाणें 'पुनः' याला पदसंज्ञा प्राप्त करून देण्याकरितां देखील त्या अतिदेशशास्त्राची मदत घ्यावी लागतेच; कारण 'पुनर् + सु = पुनर्' या स्थलीं 'सु' प्रत्ययाचा लुक् झाल्यावर 'पुनर्' या रेफान्त शब्दाला 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' या सूत्रानें जरी पदसंज्ञा होते तरी त्या पदांतील अन्त्य रेफाचा 'खरवसानयोर्विसर्जनीयः' या त्रैपादिक सूत्रानें होणारा विसर्ग 'सुप्तिङन्तं पदम्' व 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' या सापादिक सूत्रांच्या दृष्टीनें असिद्ध असल्यामुळें, 'पुनः' या विसर्गान्त रूपाला पदसंज्ञा प्राप्त करून देण्याकरितां 'स्थानिवदादेशः' हें सूत्र उपयोगांत आणलेंच पाहिजे; त्याशिवाय 'पुनः' याला पदसंज्ञा होणें अशक्य आहे. सारांश वरील दोन्ही उदाहरणांत पदसंज्ञा प्राप्त करून देण्याकरितां 'स्थानिवदादेशः' या सूत्राची मदत घ्यावी लागत असल्यामुळें, एका उदाहरणांत दोन असिद्ध

कार्यें होतात व दुसऱ्या उदाहरणांत एकच असिद्ध कार्य होतें असें दर्शविल्यानें तीं दोन उदाहरणें भिन्न प्रकारचीं उदाहरणें ठरत नाहींत; कारण प्रकृत स्थलीं एका उदाहरणांत किती कार्यें असिद्ध आहेत व दुसऱ्यांत किती असिद्ध आहेत हा प्रश्न नसून, वास्तविक प्रश्न हा आहे कीं, दोन्ही उदाहरणांत पदसंज्ञा होण्याकरितां 'स्थानिवदादेशः' या सूत्रान्वयें स्थानिवद्भाव मानण्याची सारखीच गरज आहे किंवा नाहीं. एका उदाहरणांत पदसंज्ञा होण्याकरितां स्थानिवद्भाव मानणें आवश्यक असून दुसऱ्यांत स्थानिवद्भाव न मानतां व अतिदेशशास्त्राचीं प्रवृत्ति न करितां पदसंज्ञा होऊं शकते अशी जर वस्तुस्थिति असती तरच तीं दोन भिन्न प्रकारचीं उदाहरणें ठरलीं असतीं. म्हणून 'स्थानिवद्भावमनाश्रित्य विसर्गविधिः पुनरित्यादौ चरितार्थः' हें दीक्षितांचें म्हणणें योग्य ठरत नाही. दोन्ही उदाहरणांत 'स्थानिवदादेशः' या सूत्राचा आश्रय करण्याची सारखीच अपेक्षा—गरज—असल्यामुळें, भावप्रकाशकार प्रकृत पंक्तीचा तात्पर्यार्थ देतांना असें म्हणतात कीं, 'तथा चोभयत्रापि ज्ञापकोपयोगः । सामर्थ्याद्वा प्रवृत्तिरिति । वैषम्यमयुक्तमितिभावः'—म्हणजे वरील दोन्ही उदाहरणांत 'स्थानिवदादेशः' या सूत्राचा आश्रय करण्याची सारखीच गरज असल्यामुळें, दीक्षितांनीं दिलेलें ज्ञापक दोन्ही स्थलीं सारखेंच लागू पडतें व उपयुक्त ठरतें असें मानलें पाहिजे किंवा प्रकृत सूत्र मुद्दाम आरंभिलें असल्यामुळें त्या आरंभसामर्थ्यानें तें सूत्र दोन्ही उदाहरणांत सारखेंच प्रवृत्त होतें असें मानलें पाहिजे, आणि म्हणून तीं दोन भिन्न प्रकारचीं उदाहरणें आहेत हें म्हणणें बरोबर नाही असा शंकाकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. पुन्हा शंकाकार असें म्हणतो की,) 'अग्नि+सु = अग्निर्' या स्थलीं ('ससजुषो रुः' सू. १६२ या त्रैपादिक सूत्रानें) 'सु' प्रत्याचे जागीं झालेला 'रु' हा आदेश ('सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या पदसंज्ञाविधायक सापादिक सूत्राच्या दृष्टीनें) असिद्ध असल्यामुळें ('रु' हा आदेश

झालाच नाहीं व 'सु' प्रत्यय कायमच आहे असें मानल्यानें) 'अग्निर्' याला पदसंज्ञा होऊं शकतेच (व 'ससजुषो रुः' या पूर्व त्रैपादिक सूत्रानें झालेलें रुत्व हें 'खरवसानयोर्विसर्जनीयः' या उत्तर त्रैपादिक सूत्राच्या दृष्टीनें सिद्ध असल्यामुळें, पदान्तीं असलेल्या 'रु' चा विसर्ग होण्यांत कांही अडचण येत नाहीं. पुन्हा शंकाकार असें म्हणतो कीं,) विसर्गाचा स्थानी जो अल्रूप रेफ त्याचे ठिकाणीं असलेला 'प्रत्ययत्व' हा धर्म अल्रूप स्थानीचे–रेफाचे–ठिकाणीं असलेला धर्म असल्यामुळें, (त्या रेफाचा विसर्ग झाल्यावर) विसर्गाचे ठिकाणीं आणण्याकरितां 'स्थानिवदादेशः' या अतिदेशशास्त्राची, ('अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें) प्रवृत्ति करतां येत नाहीं व त्यामुळें प्रत्ययरूप विसर्ग मिळणें शक्य नाहीं. विसर्गाचा स्थानी 'रु' हा अनल्रूप समुदाय नसून अल्रूप रेफ हाच त्या विसर्गाचा स्थानी आहे असें जें वर म्हटलें आहे त्याला 'भो भगो अघो' सू. ८.३.१७ या सूत्रावरील भाष्य प्रमाण आहे. (त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'रो रि' या पूर्व सूत्रांतून 'खरवसानयोर्विसर्जनीयः' या उत्तरसूत्रांत 'रः' या षष्ठयन्त पदाची अनुवृत्ति करून त्या सूत्राचा 'खरवसानयोः रः विसर्जनीयः' असा अर्थ केला आहे व विसर्गाचा स्थानी रेफ हा अल् मानला आहे. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'अथाऽयमल्विधिः स्याच्छक्यमश्ग्रहणमवक्तुम् ? बाढं शक्यम् । अल्विधिस्तर्हि भविष्यति । कथम् ? । इदमस्ति रो रीति । ततो वक्ष्यामि–खरवसानयोर्विसर्जनीय रः । ततो रोः सुपि । विसर्जनीयो र इत्येव ।' भाष्यकारांनीं असें म्हटलें असल्यामुळें, अल्रूप रेफाचे ठिकाणीं असलेला प्रत्ययत्व धर्म त्याचे जागीं होणाऱ्या विसर्गाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें, 'अनल्विधौ' या प्रतिषेधान्वयें येऊं शकत नाहीं हें उघड आहे आणि त्यामुळें प्रत्ययरूप विसर्ग कोठेंहि मिळणें शक्य नाहीं. म्हणून 'न च विसर्गस्य प्रत्ययत्वमप्रसिद्धमिति वाच्यम् । अग्निः करोतीत्यादौ स्थानिवद्भावेन तत्प्रसिद्धेः' असें जें दीक्षितांनी मनोरमेंत

म्हटलें आहे तें बरोबर मानतां येत नाही.) दुसरें असें कीं, 'अप्रत्ययो यो विसर्गः' असा सामानाधिकरण्यानें अन्वय होतो असें मानल्यास, 'इदुदुपधस्य च असोः' असें प्रकृत सूत्र करावयास पाहिजे होतें व 'अप्रत्ययस्य' हें पद प्रकृत सूत्रांत घालण्याची कांहीं गरज नव्हती व तें पद व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. (कारण 'सु' प्रत्ययाचे जागीं झालेल्या विसर्गाचे ठिकाणीं प्रत्ययत्वरूप धर्म येऊं शकतो असें मानल्यास, प्रत्ययरूप विसर्ग केवळ 'सु' प्रत्ययाचाच मिळूं शकतो. 'भिस्, भ्यस्' इत्यादि इतर प्रत्ययांत जो विसर्ग सांपडतो तो प्रत्ययरूप विसर्ग नसून प्रत्ययावयव सकाराचा विसर्ग असतो. म्हणून प्रत्ययरूप विसर्गाचेंच षत्व होऊं नये असें जर पाणिनीला विवक्षित व इष्ट असतें तर, त्यानें 'असोः' असा लघु व असंदिग्ध–स्पष्टार्थबोधक –निर्देश केला असता व 'अप्रत्ययस्य' असा अधिक मात्रांचा संदिग्ध व लक्षणेनें–परम्परेनें– 'सु' प्रत्ययाचें ज्ञान करून देणाऱ्या शब्दाचा निर्देश केला नसता; कारण 'असोः' असा न्यास केल्यानें 'सु' प्रत्ययाचे जागीं न झालेला विसर्ग असा एकदम अर्थ ध्यानांत येतो व लक्षणा करण्याची गरज पडत नाहीं. पण 'अप्रत्ययस्य' असा न्यास केल्यानें 'प्रत्यय' या शब्दाचा 'केवळ सु प्रत्यय' असा लक्षणेनें अर्थ करावा लागतो व तसा लक्षणेनें अर्थ करण्यांत गौरव आहे हें उघड आहे. परंतु ज्या अर्थी 'असोः' असा लघु व स्पष्ट निर्देश न करितां पाणिनीनें प्रकृत सूत्रांत 'अप्रत्ययस्य' असा लांबलचक व सामान्य निर्देश केला आहे त्याअर्थी हें ज्ञापित होतें कीं, सामानाधिकरण्यानें अन्वय करणें पाणिनीला विवक्षित नसून वैयधिकरण्यानें अन्वय करणें विवक्षित होतें असा शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.) पुन्हा असें कीं, 'अप्रत्ययो यो विसर्गः' असा सामानाधिकरण्यानें अन्वय मानल्यास, 'नित्यं समासेऽनुत्तरपदस्थस्य' सू. १५९ या सूत्रांतील 'अनुत्तरपदस्थस्य' या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते; कारण 'परमसर्पिः कुण्डिका' इत्यादि स्थलीं

(‘अनुत्तरपदस्थस्य’ हें पद त्या सूत्रांत असून देखील) ‘इदुदुपधस्य’ या प्रकृत सूत्रानें प्राप्त झालेलें षत्व टाळतां येणें अशक्य आहे. (‘परमसर्पिः कुण्डिका’ या उदाहरणांत जो विसर्ग आहे तो प्रत्ययरूप विसर्ग नसून ‘सृप्’ धातूहून झालेल्या ‘इस्’ या उणादि प्रत्ययाचा अवयव जो सकार त्याचे जागीं झालेला विसर्ग आहे. म्हणून त्या अप्रत्ययरूप विसर्गाला ‘इदुदुपधस्य’ हें सूत्र लागून विसर्गाचें षत्व होण्याची आपत्ति येईल व ‘नित्यं समासे’ या सूत्रांत ‘अनुत्तरपदस्थस्य’ हा प्रतिषेध असून देखील ‘परमसर्पिः’ या सामासिक पदांतील ‘सर्पिः’ या उत्तरपदाच्या अन्तीं असणाऱ्या अप्रत्ययरूप विसर्गापुढें ककार असल्यामुळें, त्यांचें षत्व होणे टाळतां येणार नाहीं व अशा रीतीनें ‘अनुत्तरपदस्थस्य’ हें पद व्यर्थ ठरेल. परंतु प्रकृत सूत्रांतील ‘अप्रत्ययस्य’ याचा ‘प्रत्ययावयवभिन्नस्य विसर्गस्य’ असा वैयधिकरण्यानें अन्वय करून अर्थ केल्यास, ‘परमसर्पिः’ यांतील विसर्ग ‘इस्’ या उणादि प्रत्ययाचा अवयव जो सकार त्याचे जागीं झाला असल्यामुळें व अशा रीतीनें तो विसर्ग प्रत्ययावयवरूप ठरत असल्यामुळें, त्याला ‘इदुदुपधस्य’ हें सूत्र लागू पडते नाहीं व त्या विसर्गाचें षत्व होण्याची आपत्ति टळते. ‘परमसर्पिः कुण्डिका’ या उदाहरणासंबंधानें बालमनोरमाकार म्हणतात—‘अत्र विसर्गस्य उत्तरपदस्थत्वान्न षत्वम् । इदुदुपधस्येति षत्वं तु न, विसर्गस्यात्र प्रत्ययावयवत्वात् । प्रत्ययभिन्नस्य विसर्गस्येति व्याख्याने तु अत्रापि इदुदुपधस्येति षत्वं स्यात्, अत्र विसर्गस्य प्रत्ययैकदेशतया प्रत्ययभिन्नत्वात् ।’) पुन्हा असें कीं, ‘अप्रत्ययो यो विसर्गः’ असा सामानाधिकरण्यानें अन्वय मानल्यास, ‘नित्यं समासे’ ८. ३. ४५ या सूत्रावरील भाष्याशीं विरोध येण्याची आपत्ति येते. त्या भाष्यांत भाष्यकार असें म्हणतात कीं, जर ‘सर्पिः’ इत्यादि अव्युत्पन्न प्रातिपदिकें मानलीं तर, (‘इदुदुपधस्य’ या सूत्रानें’) जें नित्य षत्व प्राप्त होतें तें विकल्पें-करून व्हावें याकरितां ‘इसुसोः सामर्थ्ये’ सू. १४८ हें सूत्र आरंभिलें

आहे. प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' या पदाचा 'प्रत्ययत्वरूप धर्म जेथें केवळ विसर्गाचे ठिकाणींच राहतो तसा विसर्ग खेरीज करून इतर विसर्ग' असा अर्थ केल्यास, व्युत्पत्तिपक्षांत देखील 'इदुदुपधस्य' या सूत्रानें नित्य षत्वाची प्राप्ति होत असल्यामुळें, वरील भाष्यांत 'अथ अव्युत्पन्नं प्रातिपदिकम्' इत्यादि जें म्हटलें आहे तें विसङ्गत–चूक–ठरण्याची आपत्ति येते. ('नित्यं समासे' या सूत्रावरील भाष्यांत चार कारिका पठित केल्या असून त्यांपैकीं 'अथ चेत्सं-विज्ञानं नित्ये षत्वे ततो विभाषेयम् । सिद्धं च मे समासे, प्रतिषे-धार्थस्तु यत्नोऽयम् ।।' ही चवथी कारिका आहे. या कारिकेंतील 'संविज्ञानम्' या पदाचा 'अव्युत्पन्नं प्रातिपदिकम्' असा अर्थ आहे व या कारिकेचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात–'अथाऽव्युत्पन्नं प्रातिपदिकं ततो नित्ये षत्वे प्राप्ते इयं विभाषा आरभ्यते । सिद्धं च मे समासे षत्वम् । किमर्थं तर्हीदमुच्यते ? । प्रतिषेधार्थोऽयं यत्नः । अनुत्तरपदस्थस्येति प्रतिषेधं वक्ष्यामीति ।' म्हणून शंकाकार असें म्हणतो कीं, 'सर्पिस्' हें व्युत्पन्न किंवा अव्युत्पन्न, म्हणजे धातूला उणादि प्रत्यय लागून तयार झालेलें किंवा प्रकृतिप्रत्ययविभागरहित स्वतःसिद्ध, प्रातिपादक मानलें तरी, दोन्ही पक्षांत विसर्ग प्रत्ययरूप नसून, अव्युत्पत्तिपक्षांत तो 'सर्पिस्' या प्रातिपदिकाचा अवयव जो सकार त्याचे जागीं झालेला विसर्ग आहे. व व्युत्पत्तिपक्षांत 'इस्' या उणादि प्रत्ययाचा अन्त्यावयव जो सकार त्याचे जागीं झालेला विसर्ग आहे. म्हणून 'अप्रत्ययरूपो यो विसर्गः' असा सामानाधिकरण्यानें अन्वय केल्यास, दोन्ही पक्षांत त्या प्रत्ययरूप नसलेल्या विसर्गाचे जागीं 'इदुदुपधस्य' या प्रकृत सूत्रानें नित्य षत्वाची प्राप्ति आहे. परंतु भाष्यकार तर म्हणतात कीं, अव्युत्पत्तिपक्षांतच नित्य षत्वाची प्राप्ति आहे. दोन्ही पक्षांत नित्य षत्वाची प्राप्ति आहे असें भाष्यकारांचें मुळींच म्हणणें नाहीं. सारांश 'अप्रत्ययो यो विसर्गः' असा सामानाधिकरण्यानें अन्वय केल्यास, वरील भाष्य विसङ्गत

ठरतें. पण 'प्रत्ययावयवो यो विसर्गस्तद्भिन्नस्य' असा वैयधिकरण्यानें अन्वय केला तरच तें भाष्य सुसङ्गत ठरतें; कारण व्युत्पत्तिपक्षांत विसर्ग हा प्रत्ययावयव ठरत असल्यामुळें, त्या पक्षांत 'इदुदुपधस्य' या सूत्राची प्रवृत्तीच होऊं शकत नाहीं व त्यामुळें नित्य षत्वाची प्राप्ति होत नाहीं. केवळ अव्युत्पत्तिपक्षांतच त्या सूत्राची प्रवृत्ति होऊं शकते; कारण त्या पक्षांत विसर्ग प्रत्ययाचे किंवा प्रत्ययावयवाचे जागीं झाला नसून प्रातिपदिकावयव जो सकार त्याचे जागीं झालेला विसर्ग आहे. म्हणून 'अप्रत्ययो यो विसर्गः' असा सामानाधिकरण्यानें अन्वय करणें भाष्यविरुद्ध ठरत असल्यामुळें, तसा अन्वय करणें योग्य नाहीं असा शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'अथाव्युत्पन्नं प्रातिपदिकम्' या वरील भाष्यांतील 'अथ' या पदाचा 'यदि' असा अर्थ आहे. तसा त्या पदाचा अर्थ असल्यामुळें, 'सर्पिषा, यजुषा' इत्यादि स्थलीं ('आदेशप्रत्यययोः' सू. २१२ या सूत्रान्वयें) षत्वसिद्धि होण्याकरितां अव्युत्पत्तिपक्ष न मानतां, व्युत्पत्तिपक्ष मानणेंच योग्य आहे असें भाष्यकार सुचवितात. ('सर्पिस् इत्यादि जर अव्युत्पन्न प्रातिपदिकें मानलीं' असें वरील भाष्यांत म्हटलें असल्यामुळें हें ध्वनित होते कीं, जेथें 'सर्पिस्, यजुस्' इत्यादि प्रातिपदिकें व्युत्पन्न—उणादि प्रत्यय लागून सिद्ध झालेलीं—प्रातिपदिकें मानल्याशिवाय इष्टरूपांची सिद्धि होऊं शकत नसेल तशा ठिकाणीं तीं व्युत्पन्न प्रातिपदिकें मानून इष्ट रूपांची सिद्धि करावी; कारण इष्ट रूपांची सिद्धि होण्याकरितांच व्याकरणशास्त्रांत व्युत्पत्तिपक्ष व अव्युत्पत्तिपक्ष हे दोन्ही पक्ष मानलें आहेत आणि इष्ट रूपांची सिद्धि करणें हें व्याकरणशास्त्राचें मुख्य प्रयोजन असल्यामुळें, जेथें जो पक्ष स्वीकारल्यानें इष्ट रूप सिद्ध होऊं शकतें तेथें तो पक्ष स्वीकारावा असें वरील भाष्यांत 'यदि' या अर्थाचा वाचक 'अथ' हा शब्द घालून भाष्यकार सुचवितात असा शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. व्युत्पत्तिपक्ष मानला तरच 'सर्पिषा, यजुषा' इत्यादि स्थलीं 'आदेशप्रत्यययोः' सू. २१२ या सूत्रानें होणारें सकाराचें

षत्व होऊं शकतें; कारण त्या सूत्रानें सकाराचें षत्व होण्याकरितां (१) 'इण्' प्रत्याहारान्तर्गत किंवा कवर्गान्तर्गत वर्णाच्या लगेंच पुढें सकार असला पाहिजे, व (२) तो सकार पदान्तीं नसला पाहिजे, आणि (३) तो आदेशरूप किंवा प्रत्ययावयवरूप सकार असला पाहिजे. 'सर्पिस् + आ, यजुस् + आ' या स्थलीं 'इण्' प्रत्याहारान्तर्गत 'इ, उ' या वर्णांपुढें सकार आहे व तो सकार पदान्तीं नाहीं; कारण 'टा = आ' हा अजादि प्रत्यय पुढें असल्यामुळें 'यचि भम्' सू. २३१ या सूत्रान्वयें 'सर्पिस्, यजुस्' हीं अङ्गें भसंज्ञक ठरतात. पण तो सकार प्रत्ययावयव मानला तरच प्रकृत सूत्र प्रवृत्त न होतां त्याचें वरील सूत्रानें षत्व होऊं शकतें. या स्थलीं अव्युत्पत्ति-पक्ष स्वीकारल्यास, म्हणजे 'सर्पिस्, यजुस्' हीं प्रकृतिप्रत्ययविभाग-रहित स्वतःसिद्ध प्रातिपादकें आहेत असें मानल्यास, तो सकार प्रत्ययावयव ठरत नसून प्रातिपादिकाचा अवयव ठरतो व त्यामुळें त्या सकाराचें वरील प्रकृतसूत्रानें षत्व होऊं शकत नाहीं. पण षत्व होणें तर इष्ट आहे, आणि व्युत्पत्तिपक्ष मानला तरच त्या सकाराचें षत्व होऊं शकतें; कारण त्या पक्षांत तो सकार 'सृप्' व 'यज्' धातूहून अनुक्रमें झालेल्या 'इस्' व 'उस्' या उणादि प्रत्ययांचा अवयव ठरतो. म्हणून या वरील उदाहरणांत षत्वसिद्धि होण्या-करितां व्युत्पत्तिपक्ष मानणें आवश्यक आहे असें शंकाकाराच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे. 'नित्यं समासे' या सूत्रावरील वृत्तींत 'अव्युत्पत्तिपक्षे त्वाश्रीयमाणे सर्पिषा यजुषेत्यादि न सिध्यतीति षत्वाय व्युत्पत्तिपक्ष एवेसुसन्तस्याश्रयणीयः' असें कैयटानें देखील म्हटलें आहे व त्याचाच प्रकृत पंक्तींत अनुवाद केला आहे. या विषया-संबंधानें 'परेत्वथ चेत्संविज्ञानमिति पाणिनेः पक्षः, सर्पिषेत्यादौ बहुलग्रहणात् कूचिदन्यदेवेत्यर्थकात्षत्वं सिद्धम् ।' असें 'नित्यं समासे' या सूत्रावरील उद्योतांत व तसेंच शब्देन्दुशेखरांत नागेशानें म्हटलें आहे.), म्हणून वर दिलेल्या भाष्यानुसार, प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' या पदांत जो 'प्रत्यय' शब्द आहे त्याचा (लक्षणेनें)

प्रत्ययसंबंधि–प्रत्ययावयवरूप–असा अर्थ करून 'अप्रत्ययस्य' या पदाचा 'प्रत्ययसम्बन्धिभिन्नस्य–प्रत्ययावयवभिन्नस्य–विसर्गस्य' असा (सामानाधिकरण्यानें अन्वय करून) अर्थ करणें उचित आहे. तसा त्या पदाचा अर्थ असल्यामुळेंच, 'कविभिःकृतम्' इत्यादि स्थलीं (षत्वापत्तिरूप) दोष येत नाहीं. ('कवि + भिस् + कृतम्' या स्थलीं होणारा विसर्ग प्रत्ययरूप विसर्ग नाहीं; कारण ज्या सकाराचे जागीं तो विसर्ग होतो तो सकार प्रत्यय नसून 'भिस्' या प्रत्ययाचा अवयव आहे. म्हणून 'अप्रत्ययरूपो यो विसर्गः' असा मनोरमेंत दिलेला अर्थ बरोबर मानल्यास, 'कविभिः कृतम्' या स्थलीं 'इदुदुपधस्य' या प्रकृत सूत्रान्वयें त्या विसर्गाचें षत्व होण्याची आपत्ति येते. पण 'प्रत्ययावयवो यो विसर्गः तद्भिन्न.' असा वर सांगितल्याप्रमाणें अर्थ केल्याने त्या विसर्गाचें षत्व होण्याची आपत्ति टळते. मग 'अग्निःकरोति' या स्थलीं 'सु' प्रत्ययाचे जागीं झालेला विसर्ग प्रत्ययरूप असून प्रत्ययावयवरूप नसल्यामुळें त्या विसर्गाचें षत्व होण्याची आपत्ति येते असें कोणी म्हटल्यास, त्याला उत्तर हें आहे कीं, 'व्यपदेशिवदेकस्मिन्'–परि. ३०–या परिभाषान्वयें तो विसर्ग व्यपदेशिवद्भावानें प्रत्ययावयव मानतां येतो व त्यामुळें त्या विसर्गाचें षत्व होण्याची आपत्ति टळते, आणि 'विसर्गस्य व्यपदेशिवद्भावेन प्रत्ययावयवत्वात्' हेंच 'अग्निःकरोति' या स्थलीं विसर्गाचें षत्व होत नाहीं याचें कारण बालमनोरमेंत दिलें आहे.) 'नित्यं समासे' सू. १५९ या सूत्रांत 'अनुत्तरपदस्थस्य' या पदाचें जें ग्रहण केलें आहे व तसेंच कस्कादिगणांत 'सर्पिष्कुण्डिका' या शब्दाचा जो पाठ केला आहे हीं दोन्हीं 'प्रत्ययावयवो यो विसर्गः तद्भिन्नस्य' असाच प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' या पदाचा अर्थ होतो याचीं ज्ञापकें मानणें उचित आहे. ('परमसर्पिःकुण्डिका' या उदाहरणांत 'परमसर्पिः' या सामासिक पदांतील 'सर्पिः' या उत्तरपदाच्या अन्तीं असलेला विसर्ग प्रत्ययरूप नसून 'इस्' या उणादि प्रत्ययाचा अवयव जो सकार त्याचें

जागीं झाला असल्यामुळें, प्रत्ययावयवरूप आहे. म्हणून 'अप्रत्ययो यो विसर्गः' असा अर्थ केल्यास, या विसर्गाचें 'इदुदु-पधस्य' या सूत्रानें प्राप्त झालेलें षत्व टाळतां येणें शक्य नाहीं. पण 'अप्रत्ययस्य' या पदाचा 'प्रत्ययावयवो यो विसर्गः तद्भिन्नस्य' असा अर्थ केल्यास, जरी 'परमसर्पिः' यांतील विसर्ग प्रत्ययावयव आहे तरी, तो त्या समासांतील 'सर्पिः' या उत्तरपदांत असल्यामुळें व 'नित्यं समासे' या सूत्रांत 'अनुत्तरपदस्थस्य' हा निषेध असल्यामुळें, 'इदुदुपधस्य' या सूत्रान्वयें प्राप्त झालेलें षत्व त्या विसर्गाचें होत नाहीं, आणि अशा रीतीनें 'अनुत्तरपदस्थस्य' हें पद चरितार्थ ठरून 'प्रत्ययावयवो यो विसर्गः तद्भिन्नस्य' या अर्थाचें तें पद ज्ञापक ठरतें. तसेंच दीक्षितांनीं 'अप्रत्ययरूपो यो विसर्गः' असा जो सामानाधिकरण्यानें अन्वय केला आहे तो बरोबर मानल्यास, 'सर्पिष्कुण्डिका' या स्थलीं अव्युत्पत्तिपक्षांत 'सर्पिस्' या प्रातिपदिकाचा अन्त्यावयव जो सकार त्याचे जागीं होणारा विसर्ग असल्यामुळें व व्युत्पत्तिपक्षांत 'इस्' या उणादि प्रत्ययाचा अन्त्यावयव जो सकार त्याचे जागीं होणारा विसर्ग असल्यामुळें आणि अशा रीतीनें दोन्ही पक्षांत तो प्रत्ययरूप विसर्ग ठरत नसल्यामुळें, 'इदुदुपधस्य' या सूत्रानेंच त्या विसर्गाचें नित्य षत्व होऊं शकतें आणि त्यामुळें 'सर्पिष्कुण्डिका' या शब्दाचा 'कस्का-दिषु च' सू. १४४ या सूत्रानें नित्य षत्व होण्याकरितां कस्कादिगणांत जो पाठ केला आहे तो व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. परंतु व्युत्पत्ति-पक्षांत तो विसर्ग प्रत्ययावयवरूप ठरत असल्यामुळें, 'प्रत्ययावयवो यो विसर्गः तद्भिन्नस्य' असा अर्थ केल्यास, 'इदुदुपधस्य' हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व नित्य षत्व होऊं शकत नाहीं, आणि तसें नित्य षत्व व्हावें याकरितां 'सर्पिष्कुण्डिका' या शब्दाचा कस्कादि-गणांत केलेला पाठ चरितार्थ ठरून तो पाठ देखील दीक्षितांनीं जसा अर्थ करून अन्वय केला आहे तसें न करितां, वर सांगितल्याप्रमाणें अन्वय करून अर्थ करावा याचा ज्ञापक ठरतो असा शंकाकाराच्या

म्हणण्याचा आशय आहे. 'ननु तत्रापि पुनर्स्' येथपासून 'चैतदर्थ-ज्ञापकतैवोचिता' येथपर्यंत शंकाग्रन्थ आहे हें लक्षांत ठेवावें. या शंकेसंबंधानें शब्दरत्नकार असें म्हणतात कीं,) वर केलेली शंका म्हणजे दीक्षितांनीं 'अप्रत्ययस्य' याचा जो अर्थ केला आहे तो चूक आहे हें सिद्ध करण्याकरितां शंकाकारानें वर जी कारणपरंपरा दिली आहे ती, यथार्थ आहे. परंतु दीक्षितांनीं व्याख्यादर्श ग्रन्थाला अनुसरून 'प्रत्ययरूपो यो विसर्गः' असा सामानाधिकरण्यानें अन्वय केला आहे व हें ध्वनित करण्याच्या हेतूनेंच दीक्षितांनीं 'हरदत्तेनोक्तं नातीवादर्तव्यम्' असें मनोरमेंतील पुढील पंक्तींत म्हटलें आहे. (त्या पुढील पंक्तीचें विवरण लौकरच केलें जाईल.)

शब्दरत्न—'न प्रवर्तत इति । अत एव तिरश्चेत्यादौ सस्य श्चुत्वसिद्धिः । एतच्चेष्टानुरोधेन संयोगादिलोपलत्वणत्वातिरिक्त-विषयं तेन तत्र स्थानिवत्त्वं भवत्येवेति "तस्य दोष–" इत्याद्यपि न वाचनिकमिति भावः । मातुः कार्यमिति । सिद्धान्तव्याख्याने ऽप्यत्र दोषः । तथा हि सकारसन्निधावकारो नैव प्रत्ययः समुदायनिवेशि-तत्वात्प्रत्ययत्वस्येति तदादेशस्योरः प्रत्ययत्वाभावेन विसर्गस्य तत्सम्बन्धित्वाभावात् । यस्तूत्वे कृतेऽवशिष्टः सकारः प्रत्ययसञ्ज्ञकः, स लुप्त एव । न च "अन्तादिवच्च" इत्यस्य पूर्वस्य परस्य समुदा-यस्यान्तादिभ्यां वर्णाभ्यां पृथगवस्थिताभ्यां ये व्यवहाराः प्रत्ययत्वाद-यस्ते एकादेशविशिष्टस्यापीत्यर्थादुर्सित्यत्र प्रत्ययत्वस्य सुलभतया एकदेशविकृतन्यायेनोरित्यस्य प्रत्ययतया न दोष इति वाच्यम् । त्रिपाद्या असिद्धत्वेन तत्रान्तवत्त्वाप्रवृत्तेः । स्थानिवत्त्वेन तु न निर्वाहः । उपात्तस्य स्थानिनो ऽकारस्य प्रत्ययत्वाभावात् । प्रत्यय-सम्बन्धित्वं तु न स्थानिवत्त्वलभ्यमशास्त्रीयत्वात् । "सर्वे सर्व-पदादेशा" इति न्यायेन मातृ असित्यस्य स्थानित्वेऽप्यसित्यस्य स्थानित्वालाभेनोर्सित्यस्य प्रत्ययत्वमलभ्यमिति । एतदेवाभिप्रेत्य प्रकृतसूत्रे "उरण् रपरः" इति सूत्रे च भाष्ये उक्तम् "इह कस्मान्न भवति पितुः करोति, "अप्रत्ययस्य" इति षत्वं प्राप्नोति, अप्रत्यय-

विसर्जनीयस्येत्युच्यते, प्रत्ययविसर्जनीयश्चायं, लुप्यते ऽत्र प्रत्ययविसर्जनीयो "रात्सस्य" इति"। लुप्यते ऽत्रेत्यादेरयमर्थः। प्रत्ययविसर्जनीयत्वेन यस्तवाभिमतः स लुप्यते, न दृश्यते स्थानिनः प्रत्ययस्यैव लोपादिति बोद्धव्यम्।

(प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' हें पद, 'स्थानिवदादेशः' या सूत्राच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध ठरत नाहीं एवढयापुरतेंच दीक्षितांनीं विशेषापेक्ष ज्ञापक मानलें आहे व असें म्हटलें आहे कीं, तें ज्ञापक विशेषापेक्ष असल्यामुळें, 'अचः परस्मिन्' सू. ५० हें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होत नाहीं.) तसें असल्यामुळेंच, म्हणजे 'अचः परस्मिन्' सू. ५० या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध ठरत असल्याकारणानें तें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होत नसल्यामुळेंच, 'तिरश्चा' इत्यादि स्थलीं सकाराचें श्चुत्व होतें. ('तिरः अञ्चतीति तिर्यक् तेन तिरश्चा' या उदाहरणांत 'ऋत्विग्दधृक्' सू. ३७३ या सूत्रानें 'अञ्च्' धातूहून 'क्विन्' प्रत्यय होऊन व 'अनिदितां हल उपधायाः' सू. ४१५ या सूत्रानें 'अञ्च्' धातूंतील नकाराचा लोप होऊन व 'अचः' सू. ४१६ या सूत्रानें त्या धातूंतील अकाराचा लोप होऊन आणि 'वेरपृक्तस्य' सू. ३७५ या सूत्रानें 'क्विन् = व्' हा अपृक्त प्रत्यय नाहींसा होऊन 'तिरस्+च्+आ' अशी स्थिति झाली असतां, 'स्तोः श्चुना श्चुः' सू १११ या त्रैपादिक सूत्रानें 'तिरस्' यांतील सकाराचें शत्व पावलें आहे. 'अचः परस्मिन' या सूत्रान्वयें 'अ'लोपाचे ठिकाणीं तो 'अ' कायमच आहे अशी स्थानिवद्भावानें बुद्धि केल्यास, सकाराचे पुढें अकार येत असून चकार येत नाहीं असें मानावें लागत असल्यामुळें, सकाराचा शकार होऊं शकणार नाहीं व 'तिरश्चा' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. पण 'अचः परस्मिन्' हें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होत नसल्यामुळें, 'अ'लोपाचे ठिकाणीं तो 'अ' कायमच आहे अशी स्थानिवद्भावानें बुद्धि करतां येत नाहीं व त्यामुळें 'तिरश्चा' असें इष्ट रूप सिद्ध होतें.) इष्ट रूपांची

सिद्धि व्हावी याकरितां, संयोगादिलोप, लत्व, व णत्व हीं तीन कार्यें खेरीज करून इतर त्रैपादिक कार्यें करतेवेळीं 'पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्' हें वचन प्रवृत्त होतें असें मानलें आहे आणि त्यामुळें तीं तीन त्रैपादिक कार्यें करतेवेळीं अजादेशाचे ठिकाणीं स्थानिवद्भाव होतोच. म्हणून (तें वचन वार्तिक न मानतां त्याला जसें युक्तिमूलक सिद्धान्त मनोरमेंत मानलें आहे त्याचप्रमाणें) 'तस्यदोषः संयोगादिलोपलत्वणत्वेषु' हें वचन देखील वार्तिक मानूं नये (पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्' या युक्तिमूलक सिद्धान्ताचाच प्रपञ्च करणारें– अर्थ स्पष्ट करणारें– तें वचन आहे असें समजावें) असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. ('प्रत्ययरूपो यो विसर्गः तद्भिन्नस्य' असा प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' या पदाचा अर्थ न करितां 'प्रत्ययसम्बन्धिभिन्नस्य= प्रत्ययावयवो यो विसर्गः तद्भिन्नस्य' असा लक्षणा करून व सामानाधिकरण्यानें अन्वय करून अर्थ केला तरी या) सिद्धान्तपक्षांत देखील 'मातुःकार्यम्' या स्थलीं दोप येतोच म्हणजे विसर्गाचें षत्व होण्याची आपत्ति येतेच. (कारण 'मातृ + ङस् = मातृ + अस्' या स्थलीं) सकाराचे जवळ, म्हणजे सकाराच्या लगेंच पूर्वीं, असलेला अकार मुळींच प्रत्यय नसून, 'अस्' या समुदायाचे ठिकाणीं प्रत्ययत्व आहे (व तो अकार त्या समुदायाचा अवयव आहे. म्हणून 'मातृ' यांतील ऋकार व 'अस्' प्रत्ययांतील अकार या प्रत्यय नसणाऱ्या दोहोंचे जागीं 'ऋत उत्' सू. २७९ या सूत्रानें 'उ' असा एकादेश होऊन व 'उरण्रपरः' सू. ७० या सूत्रानें तो रपर होऊन, म्हणजे त्याला रकारागम होऊन) 'उर्' असा जो आदेश होतो त्याचे ठिकाणीं प्रत्ययत्व हा धर्म नसल्यामुळें ('उर्' यांतील अन्त्य रकाराचे जागीं 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें होणारा) विसर्ग प्रत्ययसंबंधि, म्हणजे प्रत्ययाचा अवयव, आहे असें मानतां येत नाहीं. (जर तो 'उ' हा एकादेश 'अस्' या संपूर्ण प्रत्ययाचे जागीं झाला असता तर त्याला स्थानिवद्भावानें प्रत्यय मानतां आलें असतें व त्याला 'उरण्रपरः' या

सूत्रानें जो रकारागम होतो तो 'यदागमाः'—परि. ११—या परिभाषान्वयें त्याचा अवयव होत असल्यामुळें, तो आगमरूप रेफ प्रत्ययावयव आहे व त्याचे जागीं झालेला विसर्ग प्रत्ययावयव आहे असें मानतां आलें असतें. पण तो विसर्ग प्रत्ययावयव नसून प्रत्यया-वयवभिन्न असल्यामुळें, 'इदुदुपधस्य' या प्रकृत सूत्रानें त्याचें सिद्धान्तपक्षांत देखील षत्व होण्याची आपत्ति येते. वरील उदाहरणांत 'ऋ' व 'अ' या दोन वर्णांचे जागीं) 'उ' हा एकादेश केल्यावर (एकादेश केल्यानें 'अस्' प्रत्ययांतील अकार नाहींसा होऊन) जो त्या प्रत्ययांतील सकार अवशिष्ट राहतो तो प्रत्यसंज्ञक आहे असें मानतां येते तरी, त्या सकाराचा लोप होतोच—म्हणजे एकादेश रपर होऊन 'मातुर्स्' अशी स्थिति झाली असतां, रेफापुढें सकार आला असल्यामुळें, 'रात्सस्य' सू. २८० या सूत्रानें त्या सकाराचा देखील लोप होतोच. (सारांश 'अस्' प्रत्ययांतील अकार एकादेशानें नाहींसा झाल्यावर जरी 'यः शिष्यते स लुप्यमानार्थाभिधायी' या वचनान्वयें त्या प्रत्ययांतील अवशिष्ट सकाराचे ठिकाणीं प्रत्ययत्व-धर्म आणतां येतो तरी, तो सकार देखील 'रात्सस्य' या सूत्रानें लुप्त होत असल्यामुळें आणि अशा रीतीनें संपूर्ण 'अस्' प्रत्यय नाहींसा होत असल्यामुळें, 'मातुर्' यांतील अन्त्य आगन्तुक रकाराचे जागीं 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या सूत्रानें जो विसर्ग होतो तो प्रत्ययावयव आहे असें मानतां येत नाहीं आणि त्यामुळें सिद्धान्तपक्षांत देखील त्या विसर्गाचें प्रकृत सूत्रानें षत्व होण्याची आपत्ति येते. येथें कित्येक वैयाकरण अशी शंका करतात कीं, 'मातृ + अस्' या स्थलीं 'ऋ + अ' या दोहोंचे जागीं 'उ' हा एकादेश झाला असल्यामुळें व जेथें केवळ ऋकाराचे जागीं अण्—अ, इ, किंवा उ—आदेश होतो तशाच ठिकाणीं तो आदेश 'उरण्रपरः' या सूत्रानें रपर करतां येत असल्यामुळें, प्रकृत स्थलीं दोन स्थानींचे जागीं झालेला 'उ' हा एकादेश रपर करतां येत नाहीं आणि म्हणून तो एकादेश केल्यावर 'मातुर्स्' अशी स्थिति

मुळींच होत नसून 'मातुस्' अशीच स्थिति होते. अशा स्थितींत 'मातुस्' यांतील सकार रेफापुढें येत नसल्यामुळें, 'रात्सस्य' सू. २८० हें सूत्र येथें प्रवृत्त होऊंच शकत नाहीं व सकाराचा लोप मुळींच पावत नाहीं आणि तो सकार पदान्तीं असल्यामुळें, 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें त्याचें रुत्व करून 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें 'रु' चे जागीं विसर्ग केला असतां, तो विसर्ग 'अस्' प्रत्ययांतील अवशिष्ट जो सकार व ज्याला 'यः शिष्यते स लुप्यमानार्थाभिधायी' या न्यायान्वयें प्रत्ययसंज्ञक मानतां येतें त्याचे जागीं झालेला विसर्ग असल्यामुळें, तो विसर्ग स्थानिवद्भावानें प्रत्ययरूप मानतां येतो व अशा रीतीनें तो विसर्ग प्रत्ययभिन्न किंवा प्रत्ययावयवभिन्न ठरत नसल्यामुळें आणि प्रकृत सूत्रांत 'अप्रत्ययस्य' असा निषेध असल्यामुळें, 'मातुः कार्यम्' या स्थलीं 'इदुदुपधस्य' या सूत्रानें त्या विसर्गाचें षत्व होण्याची मुळींच आपत्ति येत नाहीं. ही जी वर शंका केली आहे ती 'उरण्रपरः' १. १. ५१ या सूत्रावरील भाष्यांत 'उः स्थानेऽण्प्रसज्यमान एव रपरो भवतीत्युच्यते, न चायमुरेव स्थानेऽण्शिष्यते । किं तर्हि ? । उश्चान्यस्य च' असें जें शंकापर ग्रन्थांत म्हटलें आहे त्याच्या आधारें केली आहे. पण भाष्यकारांनीं त्या भाष्यांत त्या शंकेचें निरसन 'इह यो द्वयोः षष्ठीनिर्दिष्टयोः प्रसङ्गे भवति लभतेऽसावन्यतरतो व्यपदेशम् । तद्यथा । देवदत्तस्य पुत्रः देवदत्तायाः पुत्र इति'. भाष्यकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, जेथें दोन षष्ठीनिर्दिष्ट स्थानींचे जागीं मिळून एकादेश होणें सांगितलें आहे तेथें तो एकादेश त्या दोन स्थानींपैकीं कोणत्याहि स्थानीचा आदेश आहे असें म्हणतां येतें. ज्याप्रमाणें लौकिक व्यवहारांत देवदत्त बाप व देवदत्ता आई या दोघांचा जो मुलगा त्याला देवदत्ताचा मुलगा असेंहि म्हणतात व देवदत्तेचा मुलगा असेंहि म्हणतात तसेंच 'ऋ' व 'अ' या दोहोंचे जागीं मिळून 'ऋत उत्' सू. २७९ या सूत्रानें झालेला 'उ' हा एकादेश 'ऋ' या स्थानीचे जागीं झाला आहे असें म्हणतां येतें व

त्यामुळें तो एकादेश 'उरण्रपरः' या सूत्रानें रपर करतां येतोच. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'मातृ + अस्' या स्थलीं वरील शंकेंत म्हटल्याप्रमाणें 'मातुस्' अशी स्थिति होत नसून 'मातुर्स्' अशीच स्थिति होते व या स्थितींत 'रात्सस्य' या सूत्रानें 'अस्' प्रत्ययांतील अवशिष्ट सकाराचा लोप होत असल्यामुळें, पदान्तीं असलेल्या प्रत्ययावयवरूप सकाराचे जागीं विसर्ग होतो असें जें वरील शंकेंत म्हटलें आहे तें चूक ठरतें हें उघड आहे. वास्तविक 'मातुर्स्' या स्थलीं वर सांगितल्याप्रमाणें सकाराचा लोप झाल्यावर पदान्तीं जो रकार येतो त्याचे जागीं विसर्ग होतो व तो विसर्गाचा स्थांनी रकार प्रत्यय किंवा प्रत्ययावयव नसल्यामुळें, त्याचे जागीं होणारा विसर्ग प्रत्ययावयवरूप आहे असें मानतां येत नाहीं आणि त्यामुळें 'मातुः कार्यम्' या स्थलीं सिद्धान्तपक्षांत देखील विसर्गाचें षत्व होण्याची व 'मातुष्कार्यम्' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. पण या आपत्तीचें निवारण 'उरण्रपरः' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'इह हि मातुः करोति, पितुः करोतीत्यप्रत्ययविसर्जनीयस्येति षत्वं प्रसज्येत। अप्रत्ययविसर्जनीयस्येत्युच्यते, प्रत्ययविसर्जनीयश्चायम्। लुप्यतेऽत्र प्रत्ययो रात्सस्येति। एवं तर्हि भ्रातुष्पुत्रग्रहणं ज्ञापकमेकादेशनिमित्तात्षत्वप्रतिषेधस्य। यदयं कस्कादिषु भ्रातुष्पुत्रशब्दं पठति तज्ज्ञापयत्याचार्यो नैकादेशनिमित्तात्षत्वं भवतीति।' अशा रीतीनें केलें आहे व या भाष्याचें विवरण पूर्वीं मनोरमेंत केलेंच आहे.) 'अन्तादिवच्च' सू. ७५ या सूत्राचा, 'एकादेश होण्यापूर्वीं पृथक् स्थितींत असणाऱ्या पूर्व व पर समुदायांचे ठिकाणीं जे प्रत्ययत्वादि धर्म आहेत ते धर्म एकादेश केल्यानंतर एकादेशान्त व एकादेशादि समुदायांचें ठिकाणीं देखील येतात', असा अर्थ होत असल्यामुळें, 'उर्स्' या समुदायाचे ठिकाणीं प्रत्ययसंज्ञा सहज प्राप्त करून देतां येते (व त्या समुदायांतील अन्त्य सकाराचा 'रात्सस्य' सू. २८० या सूत्रानें लोप झाल्यावर अवशिष्ट राहिलेल्या) 'उर्' या भागाला देखील 'एकदेशविकृतमनन्यवत्'–

परि–३७–या न्यायान्वयें प्रत्यय मानतां येतें व त्यामुळें (षत्व होण्याची आपत्ति टळते आणि) कांहीं दोष येत नाही असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाही; कारण 'अन्तादिवच्च' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध असल्यामुळें, तें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होऊं शकत नाही. ('मातृ+अस् = मातुर्स्' या स्थलीं 'अन्तादिवच्च' या सूत्रान्वयें 'उर्स्' हा एकादेशादि प्रत्ययान्त समुदाय प्रत्यय मानतां येतो आणि 'उर्स्' यांतील सकाराचा जरी 'रात्सस्य' या सूत्रानें लोप होतो तरी अवशिष्ट राहिलेला 'उर्' हा एकदेशविकृतन्यायानें प्रत्यय मानतां येतो व 'उर्' यांतील रकाराचे जागीं जो विसर्ग होतो तो विसर्ग प्रत्यया-वयव आहे असें स्थानिवद्भावानें मानतां येत असल्यामुळें, 'इदुदुपधस्य' हें प्रकृत सूत्र 'मातुः कार्यम्' या उदाहरणांत प्रवृत्त होऊं शकत नाहीं व त्यामुळें विसर्गाचें षत्व होण्याची आपत्ति मुळींच येत नाहीं असें शंकाकाराचें म्हणणें आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें 'अन्तादिवच्च' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध असल्यामुळें, म्हणजे त्रिपादीचा अभाव असल्यामुळें, तें सापादिक सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होऊं शकत नाही व त्यामुळें 'इदुदुपधस्य' या प्रकृत त्रैपादिक सूत्रानें षत्व करतेवेळीं 'मातुर्स्' यांतील 'उर्स्' हा एकादेशादि समुदाय प्रत्यय मानतां येत नाहीं आणि त्या समुदायांतील सकाराचा लोप झाल्यावर पदान्तीं असलेल्या रकाराचे जागीं 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें जो विसर्ग होतो तो प्रत्ययावयव आहे असें मानतां येत नसल्यामुळें, षत्व होण्याची आपत्ति टळत नाहीं. 'मातुः कार्यम्' या स्थलीं) 'स्थानि-वदादेशः' सू ४९ हें सूत्र प्रवृत्त केल्यानें देखील षत्व होण्याची आपत्ति टाळतां येत नाहीं; कारण ('ऋत उत्' सू. २७९ या सूत्रांत) निर्दिष्ट असलेला 'अ' हा स्थानी प्रत्यय नव्हे. ('मातृ + अस्' या स्थलीं 'ऋत उत्' या सूत्रानें 'मातृ' यांतील ऋकार व

'अस्' प्रत्ययांतील अकार या दोहोंचे जागीं मिळून 'उ' हा एकादेश होणें सांगितलें आहे. तो एकादेश रपर केल्यावर 'उर्' या आदेशाचे 'ऋ' व 'अ' हे दोन स्थानी ठरतात. या दोन स्थानींपैकीं 'ऋ' हा 'मातृ' या प्रकृतीचा अवयव असल्यामुळें त्याचे ठिकाणीं प्रत्यय-त्वरूप धर्म नाहीं हें उघड आहे. 'अस्' या प्रत्ययांतील 'अ' हा द्वितीय स्थानी जरी प्रत्ययावयव आहे तरी तो प्रत्यय नव्हे; कारण संपूर्ण 'अस्' हा प्रत्यय आहे. सारांश 'उर्' हा एकादेश प्रत्ययाचे जागीं झाला नसल्यामुळें, 'स्थानिवदादेशः' हें सूत्र येथें प्रवृत्त केलें तरी त्या आदेशाचे ठिकाणीं प्रत्ययत्व धर्म येऊं शकत नाहीं. त्यामुळें 'उर्' यांतील रेफाचे जागीं झालेला विसर्ग प्रत्ययावयव आहे असें मानतां येऊं शकत नसल्यामुळें, वरील उदाहरणांत 'इदुदुपधस्य' या प्रकृत सूत्रानें षत्व होण्याची आपत्ति सिद्धान्तपक्षांत देखील कायम राहतेच.) 'प्रत्ययसंबंधित्व' हा शास्त्रीय धर्म नसल्यामुळें, अशा अशास्त्रीय धर्माचा आदेशाचे ठिकाणीं 'स्थानिवदादेशः' या सूत्रानें अतिदेश करतां येत नाहीं. (शंकाकाराची शंका अशी आहे कीं, 'अस्' प्रत्ययसंबंधि—'अस्' प्रत्ययावयव—जो अकार त्याचे जागीं 'उर्' हा आदेश होत असल्यामुळें, तो आदेश देखील 'स्थानिवदादेशः' या सूत्रान्वयें प्रत्ययसंबंधि मानतां येतो, म्हणजे त्या आदेशाचे ठिकाणीं प्रत्ययसंबंधित्व हा धर्म स्थानिवद्भावानें आणतां येतो. म्हणून 'उर्' यांतील रकाराचे जागीं झालेला विसर्ग स्थानिवद्भावानें प्रत्ययसंबंधि मानतां येऊं शकत असल्यामुळें, 'मातुः कार्यम्' या स्थलीं 'इदुदुप-धस्य' हें प्रकृत सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व विसर्गाचें षत्व होण्याची आपत्ति टळते. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'स्थानिवदादेशः' या सूत्रानें स्थानीचे ठिकाणीं असणाऱ्या प्रातिपदिकत्व, सुबन्तत्व, प्रत्ययत्व इत्यादि शास्त्रीय धर्माचाच आदेशाचे ठिकाणीं अतिदेश करतां येतो. प्रत्ययत्व हा जरी शास्त्रीय धर्म आहे तरी प्रत्यसंबंधित्व हा शास्त्रीय धर्म नसल्यामुळें, तशा

अशास्त्रीय धर्माचा वरील सूत्रान्वयें आदेशाचे ठिकाणीं अतिदेश करतां येत नाहीं व त्यामुळें षत्व होण्याची आपत्ति सिद्धान्तपक्षांत देखील कायम राहतेंच.) 'सर्वे सर्वपदादेशाः' या न्यायान्वयें जरी 'मातुर्स्' या समुदायरूप आदेशाचा 'मातृ + अस्' हा समुदाय स्थानी मानतां येतो तरी, 'अस्' प्रत्यय त्या समुदायरूप आदेशाचा स्थानी मानतां येत नसल्यामुळें, 'उर्स्' याचे ठिकाणीं प्रत्ययत्व हा धर्म येऊं शकत नाहीं आणि हा आशय मनांत धरूनच प्रकृत सूत्रावरील व तसेंच 'उरण्रपरः' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात ÷ 'पितुः करोति' या स्थलीं ('इदुदुपधस्य' या सूत्रानें) षत्व कां होत नाहीं ? त्या सूत्रांत 'अप्रत्ययस्य' असा निर्देश असल्यामुळें वरील उदाहरणांत षत्वाची प्राप्ति आहे. त्या सूत्रानें अप्रत्ययरूप विसर्गाचें षत्व होणें सांगितलें आहे व वरील उदाहरणांत झालेला विसर्ग प्रत्ययाचे जागीं झाला असल्यामुळें, त्याचें षत्व होत नाहीं. पण प्रत्ययांतील ज्या सकाराचे जागीं विसर्ग झाला आहे (असें शंकाकार समजतो) त्या सकाराचा 'रात्सस्य' या सूत्रानें लोप झाला आहे. या भाष्यांत 'लुप्यतेऽत्र प्रत्ययविसर्जनीयः' इत्यादि जें म्हटलें आहे त्याचा असा अर्थ आहे कीं, ज्या प्रत्ययाचे—प्रत्ययांतील सकाराचे— जागीं विसर्ग झाला आहे असें तूं – शंकाकार – समजतोस त्या स्थानिरूप प्रत्ययाचाच लोप झाला आहे व तो दिसत नाहीं. (विसर्ग होण्यापूर्वींच त्या विसर्गाचा जो तूं सकार हा स्थानी समजतोस) त्या स्थानीचाच लोप झाला आहे. (सारांश 'पितुः कार्यम्' या उदाहरणांत झालेला विसर्ग प्रत्ययावयवरूप सकाराचे जागीं झाला नाहीं; कारण विसर्ग होण्यापूर्वींच संपूर्ण 'अस्' प्रत्यय नाहींसा झाला आहे, म्हणजे एकादेशानें प्रत्ययांतील अकार नाहींसा होऊन अवशिष्ट सकाराचा 'रात्सस्य' या सूत्रानें लोप होऊन गेला आहे, आणि त्या सकाराचा लोप झाल्यावर 'उर्' यांतील रकाराचे जागीं वास्तविक विसर्ग झाला आहे व 'उर्' हा

प्रत्यय नसल्यामुळें, त्यांतील रेफाचे जागीं झालेला विसर्ग प्रत्ययावयव आहे असें मानतां येत नाहीं आणि त्यामुळें त्या विसर्गाचें प्रकृत सूत्रानें षत्व होण्याची प्राप्ति आहे. या आपत्तीचें भाष्यकारांनीं 'नैकादेशनिमित्तात् षत्वं भवति' हा सिद्धान्त सांगून निवारण केलें आहे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'उर्स्' याचे ठिकाणीं प्रत्ययत्व हा धर्म अतिदेशानें आणतां येत नाहीं.)

शब्दरत्न-- ज्ञापनादिति । त्रिपाद्यामप्यन्तवत्त्वप्रवृत्तिज्ञापनद्वारेति भावः । अत एवामी, क्षीरपेणेत्यादौ मीत्वणत्वे सिद्ध्यतः । अत्रेकारस्यादस्सम्बन्धित्वं पे इत्यस्यैकाजुत्तरपदत्वं चान्तवद्भावाधीनमिति बोद्धयम् । व्यधिकरणमेवेति । प्रत्ययस्य सम्बन्धी यो विसर्गस्तस्य नेत्यर्थ इति तद्भावः । अगत्या च वाक्यभेदाऽसमर्थसमासवैय्यधिकरण्यान्वयरूपदोषत्रयसहनमिति तदभिमानः । नातीवेति । वैय्यधिकरण्यान्वयफलस्य कविभिः कृतमित्यादेः प्रत्ययसम्बन्धिभिन्नस्य विसर्गस्येत्येवं लक्षणया सामानाधिकरण्येनापि संग्रहसम्भवादिति भावः । व्याख्यादर्शोक्तसामानाधिकरण्ये तु लेशतोऽपि तदादराभावादतीवेत्यसङ्गतमेव स्यादिति । अनेनोक्तव्याख्याया एव स्वाभिमतत्वं सूचितवानित्यलम् ।

'ङसिङसोः अत उकारात्परस्य षत्वं नेति ज्ञापनात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'अन्तादिवच्च' सू. ७५ हें सूत्र त्रिपादींत देखील प्रवृत्त होतें हें ('भ्रातुष्पुत्रः' या शब्दाचा कस्कादिगणांत मुद्दाम पाठ केला असल्यामुळें) ज्ञापित होत असल्यामुळें, त्या ज्ञापनाचें फल हें आहे कीं, ('मातुः कार्यम्' इत्यादि स्थलीं) षत्व होत नाहीं. ('पूर्वपरवर्णयोर्भवन्नेकादेशः पूर्वस्थानिघटितसमुदायस्यान्तद्भवति, परस्थानिघटितसमुदायस्याद्यवद्भवति' असा 'अन्तादिवच्च' या सूत्राचा अर्थ आहे. 'भ्रातृ + ङस् = भ्रातुरस्' या स्थलीं 'पुत्र' हा शब्द पुढें आला असतां, प्रकृत सूत्रानें विसर्गाचें षत्व करतेवेळीं 'अन्तादिवच्च' हें सूत्र प्रवृत्त

केलें तरच वरील अर्थान्वयें 'उर्स्' हा एकादेशादि समुदाय परादिवद्भावानें प्रत्ययसंज्ञक मानतां येतो व त्या समुदायांतील सकाराचा 'रात्सस्य' या सूत्रानें लोप झाल्यावर अवशिष्ट राहिलेल्या 'उर्' यांतील रकाराचे जागीं 'खरवसानयोः' या सूत्रानें होणारा विसर्ग स्थानिवद्भावानें प्रत्ययावयव मानतां येतो व प्रकृत सूत्रानें प्रत्ययावयवभिन्न विसर्गाचें षत्व होणें सांगितलें असल्यामुळें, वरील उदाहरणांत रेफाचें जागीं झालेल्या विसर्गाचें षत्व होऊं शकत नाही. पण त्या उदाहरणांत षत्व होणें इष्ट असल्यामुळें, 'भ्रातुष्पुत्रः' हा शब्द कस्कादिगणांत मुद्दाम पठित केला आहे व 'अन्तादिवच्च' हें सूत्र त्रिपादींत देखील प्रवृत्त होतें याचा तो पाठ वास्तविक ज्ञापक ठरतो, आणि तें सूत्र त्रैपादिक षत्वकार्य करतेवेळीं त्रिपादींत प्रवृत्त होत असल्यामुळें, विसर्गाचें षत्व होत नाहीं हें म्हणणें त्या सूत्राच्या प्रवृत्तिमुळें निष्पन्न होणाऱ्या फलाचें केवळ कथन करणें होय असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'त्रिपाद्या असिद्धत्वात् तत्रान्तवत्वाप्रवृत्तेः' असें जें पूर्वी शब्दरत्नांत म्हटलें आहे त्या विरुद्ध प्रकृत पंक्ति असल्यामुळें, या दोन पंक्ति आपाततः परस्परविरुद्ध दिसतात. परंतु पूर्व पंक्ति पूर्वपक्षाचा अनुवाद करणारीं असून प्रकृत पंक्ति सिद्धान्तपक्ष सांगणारी असल्यामुळें, तो दोष येत नाहीं. प्रकृत सूत्रावरील उद्योतांत 'त्रिपाद्या असिद्धत्वेन तत्रान्तवद्भावाऽप्रवृत्तेरिति पूर्वपक्षतात्पर्यम्' असें स्पष्ट म्हटलें आहे व शब्दरत्नांतील वरील सर्व पंक्ति 'उरण्रपरः' या सूत्रावरील उद्योतांत आढळतात.) 'अन्तादिवच्च' हें सूत्र त्रिपादींत प्रवृत्त होत असल्यामुळेंच, 'अमी, क्षीरपेण' इत्यादि उदाहरणांत मीत्व व णत्व यांची अनुक्रमें सिद्धि होते. या दोन उदाहरणांपैकीं 'अमी' या प्रथम उदाहरणांत एकार हा 'अदस्' शब्दाचा अवयव आहे व द्वितीय उदाहरणांत 'पे' हें एकाच् उत्तर पद आहे हें पूर्वान्तद्भाव मानल्याशिवाय सिद्ध होऊं शकत नाहीं हें लक्षांत ठेवावें. ('अदस्+जस्' या स्थलीं 'त्यदादीनामः'

सू. २६५ या सूत्रानें 'अदस्' यांतील अन्त्य सकाराचे जागीं अकार होऊन व 'अतो गुणे सू. १९१ या सूत्रानें पररूप एकादेश होऊन आणि 'जसः शी' सू. २१४ या सूत्रानें 'जस्' प्रत्यायाचे जागीं 'शी = ई' असा आदेश होऊन 'अद+ई' अशी स्थिति झाली असतां, 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊन 'अदे' असें रूप होतें. 'एत इद्बहुवचनें' सू. ४३८ या त्रैपादिक सूत्रानें 'अदस्' यांतील दकारापुढें येणाऱ्या एकाराचे जागीं बहुवचनांत ईकारादेश होणें व तसेंच पूर्व दकाराचे जागीं मकार होणें सांगितलें आहे. 'अदे' यांतील एकार 'अदस्' शब्दाचा वास्तविक अवयव नसून तो 'अदस्' शब्दांतील अकार व प्रत्यय ईकार या दोहोंचें जागीं झालेला एकादेश आहे. पण 'अन्तादिवच्च' या सूत्रान्वयें तो एकार पूर्वान्तवद्भावानें 'अदस्' शब्दाचा अन्त्यावयव मानतां येतो व त्यामुळें त्या एकाराचे जागीं 'एत ईत्' या सूत्रानें ईकारादेश होतो. जर 'अन्तादिवच्च' हें सापादिक सूत्र 'एत ईत्' या सूत्रानें होणारें त्रैपादिक कार्य करतेवेळीं त्रिपादींत प्रवृत्त झालें नसतें तर, एकाराचे जागीं ईकार व पूर्व दकाराचे जागीं मकार होऊं शकला नसता व 'अमी' हें इष्ट रूप सिद्ध होऊं शकलें नसतें. तसेंच 'क्षीरप+टा' या स्थलीं 'टाङसिङसाम्' सू. २०१ या सूत्रानें 'टा' या प्रत्ययाचे जागीं 'इन' असा आदेश होऊन 'क्षीरप+इन' अशी स्थिति झाली असतां, 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें 'अ+इ' या दोहोंचे जागीं 'ए' असा गुणरूप एकादेश होऊन 'क्षीरपेण' असें रूप होतें. या उदाहरणांत 'एकाजुत्तरपदे णः' सू. ३०७ या त्रैपादिक सूत्रानें णत्व झालें आहे. या त्रैपादिक सूत्राचा असा अर्थ आहे कीं, समासांतील उत्तरपद एकाच् असल्यास व पूर्वपदांत णत्व होण्याचें निमित्त असल्यास, उत्तर पदापुढील विभक्तिप्रत्ययांत असणाऱ्या नकाराचें णत्व होतें. 'क्षीरपेण' या स्थलीं वास्तविक 'प' हें उत्तरपद असून त्यापुढें नकार नाहीं. 'पे' पुढें नकार आहे; पण तें उत्तर पद नाहीं. तरी पण 'अन्तादिवच्च' या सूत्रान्वयें

'पे' हें पूर्वान्तवद्भावानें उत्तर पद मानतां येतें व त्यामुळें 'पे' पुढील विभक्तिप्रत्ययांतील नकाराचें णत्व होतें. णत्वरूप त्रैपादिक कार्य करतेवेळीं जर 'अन्तादिवच्च' या सापादिक सूत्राची त्रिपादींत प्रवृत्ति झाली नसती तर, 'क्षीरपेण' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकलें नसतें. सारांश वरील दोन उदाहरणांवरून हें स्पष्ट होतें कीं, 'अन्तादिवच्च' हें सूत्र त्रिपादींत देखील प्रवृत्त होतें.) 'अप्रत्ययस्य इत्येतदपि व्यधिकरणमेव' असें जें हरदत्तानें म्हटलें आहे त्याचा 'प्रत्ययस्य सम्बन्धी यो विसर्गस्तस्य न' असा अर्थ आहे व हरदत्ताच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, (सर्व इष्टरूपांची सिद्धि होण्याकरितां 'अप्रत्ययस्य' हा प्रसज्यप्रतिषेध मानून) वाक्यभेद करणें, असमर्थ समास करणें, व वैयधिकरण्यानें अन्वय करणें हे तीन दोष गत्यन्तर नसल्यामुळें सहन करणें भाग आहे. 'हरदत्तेनोक्तं नातीवादर्तव्यम्' या मनोरमेंतील पंक्तींत 'नातीव' हें जें पद घातलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('प्रत्ययस्य सम्बन्धी यो विसर्गः तस्य न' असा) वैयधिकरण्यानें अन्वय केल्यानें जें फल सिद्ध होतें तेंच फल, 'अप्रत्ययस्य' या पदाचा 'प्रत्ययसम्बन्धिभिन्नस्य' असा लक्षणेनें अर्थ करून ('प्रत्ययसम्बन्धिभिन्नस्य' याचा 'विसर्गस्य' या पदाशीं) सामानाधिकरण्यानें अन्वय केल्यानें देखील, सिद्ध होतें व त्यामुळें 'कविभिः कृतम्' इत्यादि उदाहरणांचा संग्रह होऊं शकतो, म्हणजे त्या उदाहरणांत 'भिस्' प्रत्ययाचा अवयव जो सकार त्याचे जागीं होणाऱ्या विसर्गाचें, लक्षणा न करितां केवळ सामानाधिकरण्यानें अन्वय केल्यानें, षत्व होण्याची जी आपत्ति येत होती ती वर सांगितल्याप्रमाणें लक्षणा करून सामानाधिकरण्यानें अन्वय केल्यानें सहज टाळतां येते. व्याख्यादर्शांत जसा (लक्षणा न करितां) सामानाधिकरण्यानें अन्वय केला आहे तसा अन्वय करणें दीक्षितांना मान्य असतें तर, त्यांना लेशमात्र देखील हरदत्ताचें मत आदरार्ह वाटलें नसतें व त्यांनीं 'नातीवादर्तव्यम्' या पंक्तींत 'नातीव' हें जें पद घातलें आहे तें अगदीं अयोग्य ठरलें असतें.

वरील मनोरमेच्या पंक्तींत 'नातीव' हें पद घातलें असल्यामुळें ('अप्रत्ययस्य' या प्रकृत सूत्रांतील पदाचा 'प्रत्ययसम्बन्धिभिन्नस्य' असा लक्षणेनें अर्थ करून त्याचा 'विसर्गस्य' या पदाशीं सामानाधिकरण्यानें अन्वय करणें) असेंच व्याख्यान करणें योग्य आहे असें दीक्षितांनीं सूचित केलें आहे. या विषयासंबंधानें एवढें व्याख्यान पुरे. ('कविभिः कृतम्' इत्यादि स्थलीं विसर्गाचें षत्व होण्याची जी आपत्ति येते ती टाळण्याकरितां हरदत्तानें प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' हें पद प्रसज्यप्रतिषेध मानून त्या सूत्राचीं 'इदुदुपधस्य विसर्गस्य षत्वं भवति किन्तु प्रत्ययसम्बन्धिनः विसर्गस्य षत्वं न भवति' अशीं दोन वाक्यें केलीं आहेत. अशा रीतीनें वाक्यभेद करणें, म्हणजे एका सूत्ररूप वाक्याचीं दोन वाक्यें करणें, हा व्याकरणशास्त्रांत गौरवरूप दोष मानला आहे. दुसरें असें कीं, 'प्रत्ययसम्बन्धिनः न भवति' या अर्थांत 'अप्रत्ययस्य' हा नञ्समास होऊं शकत नाहीं; कारण नञाचा 'भवति' या क्रियेंत अन्वय असून 'प्रत्यय' या पदांत अन्वय नाहीं. त्यामुळें हा समास असमर्थ समास ठरतो व 'समर्थः पदविधिः' सू. ६४५ हें सूत्र असल्यामुळें असा असमर्थ समास करणें अयोग्य ठरतें. तिसरें असें कीं, 'सम्भवति सामानाधिकरण्ये वैयधिकरण्यमन्याय्यम्' असा न्याय असल्यामुळें, वैयधिकरण्यानें अन्वय करणें अन्याय्य ठरतें. सारांश 'अप्रत्ययस्य' हा प्रसज्यप्रतिषेध मानून हरदत्तानें जो वैयधिकरण्यानें अन्वय केला आहे तो वर सांगितल्याप्रमाणें दोषत्रययुक्त ठरत असून, 'अप्रत्ययस्य' हा पर्युदास मानून व लक्षणा करून, म्हणजे 'अप्रत्ययस्य' या पर्युदासाचा 'प्रत्ययावयवभिन्नस्य' असा लक्षणेनें अर्थ करून, 'प्रत्ययावयवभिन्नस्य' या पदाचा 'विसर्गस्य' या पदाशीं सामानाधिकरण्यानें अन्वय केला असतां वरील तीन दोषांपैकीं कोणताहि दोष उद्भवत नसल्यामुळें व तसा अन्वय केल्यानें 'कविभिः कृतम्' इत्यादि इष्ट रूपांची देखील सहज सिद्धि होऊं शकत असल्यामुळें, हरदत्तानें जसा वैयधिकरण्यानें अन्वय केला आहे तसा अन्वय

न करितां, लक्षणा करून वर सांगितल्याप्रमाणें सामानाधिकरण्यानें अन्वय करणेंच दीक्षितांना पसंत होतें आणि त्यामुळेंच त्यांनी 'हरदत्तोनोक्तं नातीवादर्तव्यम्' असें मनोरमेंत म्हटलें आहे. व्याख्यादर्शांत जसा लक्षणा न करितां सामानाधिकरण्यानें 'प्रत्ययभिन्नस्य विसर्गस्य' असा अन्वय केला आहे तसाच अन्वय करणें जर दीक्षितांना मान्य असतें तर, मनोरमेच्या वरील पंक्तींत 'नातीवादर्तव्यम्' असा प्रयोग न करितां 'नादर्तव्यम्' असा त्यांनी प्रयोग केला असता. सारांश हरदत्तानें जो वैयधिकरण्यानें अन्वय केला आहे त्यावरच दीक्षितांचा कटाक्ष असून 'प्रत्ययावयव-भिन्नस्य' असें जें त्यानें आपल्या व्याख्यानांत म्हटलें आहे त्यावर नव्हता असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. प्रकृत सूत्रावरील शब्देन्दुशेखरांत देखील 'अप्रत्ययस्येति पर्युदासो, लाघवात् । तत्र प्रत्ययपदं प्रत्ययसम्बन्धिपरम्, तेन प्रत्ययसम्बन्धि-भिन्नस्येत्यर्थः । अत एव कविभिः कृतमित्यादौ न षत्वम् ।' असेंच म्हटलें आहे.)

शब्दरत्न-- परम्परयेति । एकादेशशास्त्रसम्पन्नरेफस्थानिकत्वेन विसर्गस्यैकादेशशास्त्रनिमित्तकत्वमिति भावः । प्रचुरः पाठ इति । ओषधीस्कृधीत्यादौ शसैकादेशे "कः करत्करतिकृधि-" इति षत्वनिवृत्तिश्च तत्फलमुक्तम् । मूले तु तस्य फलस्य च्छान्दसत्वात् "छन्दसि वा प्र-" इत्यतः "इणः षः" इत्यस्य निवृत्या ऽदोषाच्च षष्ठ्यन्तमेव पठितमिति दिक् ।।

प्रामादिकमिति । पदादित्वेन "सोऽपदादौ" इत्यस्याप्राप्ति-रिति भावः ।।

'ऋत उत् इत्येकादेशशास्त्रं विसर्गं प्रति परम्परया प्रयो-जकम्' या मनोरमेंतील पंक्तींत 'परम्परया' हें जें पद घातलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'ऋत उत्' सू. २७९ या एका-देशशास्त्रानें झालेला उकार रपर झाल्यावर रेफ विसर्गाचा स्थानी होत असल्यामुळें, एकादेशशास्त्र हें परंपरेनें विसर्गाचें निमित्त ठरतें. (वास्तविक 'ऋत उत्' या एकादेशशास्त्रानें 'ऋ' व 'अ'

या दोहोंचे जागीं केवळ 'उ' हा एकादेश होणें सांगितलें आहे. त्या एकादेशशास्त्रानें रेफ निष्पन्न होत नसून, एकादेश झाल्यावर 'उरण्रपरः' सू. ७० या सूत्रानें एकादेशाला रकारागम होऊन 'उर्' असा रेफान्त एकादेश निष्पन्न होतो. पण 'उ' असा एकादेश प्रथम झाल्याशिवाय विसर्गाचा स्थानी जो रेफ तो निष्पन्न होऊं शकत नसल्यामुळें व रेफ निष्पन्न झाल्याशिवाय त्याचे जागीं होणारा विसर्ग उत्पन्न होऊं शकत नसल्यामुळें, 'ऋत उत्' हे एकादेशशास्त्र परंपरेनें विसर्गाच्या उत्पत्तीला कारणीभूत होतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे असें शब्दरत्नकार म्हणतात.) 'एकादेशशास्त्रनिमित्तात् (षत्वं न भवति)' असा जो (पञ्चम्यन्त) पाठ भाष्यांत—म्हणजे 'उरण्रपरः' १.१.५१ या सूत्रावरील व प्रकृत सूत्रावरील भाष्यांत ८.३.४१—अनेक ठिकाणीं आढळतो त्या पाठाचें फल असें सांगितलें आहे कीं, 'ओषधीस्कृधि' इत्यादि उदाहरणांत 'शस्' प्रत्ययाशीं एकादेश केल्यावर 'कः करत्करतिकृधि' सू.३६३५ या सूत्रानें विसर्गाचे जागीं षकार होत नाहीं (व सकार होतो). प्रकृत सूत्रावरील कौमुदींत ('एकादेशशास्त्रनिमित्तकस्य न षत्वम्' ही जी पंक्ति आहे त्या पंक्तींत 'एकादेशशास्त्रनिमित्तकस्य' असा) षष्ठ्यन्तच पाठ केला आहे (व भाष्यांत जसा पञ्चम्यन्त पाठ केला आहे तसा पाठ केला नाहीं. तरी पण पञ्चम्यन्त पाठाचें जें फल वर सांगितलें आहे) तें फल वैदिक प्रयोगांत होणारें असल्यामुळें व तसेंच 'इणः षः' या सूत्राची 'छन्दसि वा प्राम्रेडितयोः' या सूत्रापासून निवृत्ति मानल्यानें, ('ओषधीस्कृधि' हा प्रयोग सिद्ध होऊं शकतो आणि त्यामुळें कौमुदींत जो षष्ठ्यन्त पाठ केला आहे तसा पाठ मानल्यानें देखील) कांहीं दोष येत नाहीं. ('ओषधी + शस् = ओषधी + अस्' या स्थलीं 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' सू. १६४ या सूत्रानें पूर्वसवर्णदीर्घरूप एकादेश होऊन 'ओषधीस्' असें रूप झाल्यावर 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें अन्त्य सकाराचे जागीं 'रु' हा आदेश होऊन व त्याचा 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें विसर्ग होऊन 'ओषधीः' असें रूप होतें. 'एकादेशशास्त्रनिमित्तात्'

ही परपञ्चमी मानून 'एकादेशशास्त्रनिमित्तात्परस्य विसर्गस्य षत्वं न भवति' असा त्या भाष्यवचनाचा अर्थ केल्यानें, जरी 'ओषधीः' या स्थलीं 'ई' या एकादेशापुढें विसर्ग आला असून त्यापुढें ककारानें सुरू होणारा 'कृधि' हा शब्द आला आहे तरी देखील, 'इणः षः' सू. १५३ या सूत्रानें प्राप्त होणारें त्या विसर्गाचें षत्व न होतां 'कः करत्करतिकृधि' या सूत्रानें त्या विसर्गाचें सत्व होतें हें त्या पञ्चम्यन्त पाठाचें फल सांगितलें आहे. पण 'कः करत्करतिकृधि' या सूत्रांत 'ईणः षः' या सूत्राची अनुवृत्ति मानली तरच, विसर्गाचे जागीं षत्वाची प्राप्ति होते. परंतु 'इणः षः' या सूत्राची 'कस्कादिषु च' या सूत्राच्या अखेरपर्यंतच अनुवृत्ति मानली व 'कः करत्करतिकृधि' या पुढील सूत्रांत त्या सूत्राची अनुवृत्ति न मानली तर, वरील उदाहरणांत विसर्गाचे जागीं षत्वाची प्राप्तीच होऊं शकत नाहीं व 'ओषधीस्कृधि' असें सकारयुक्त रूपच सिद्ध होऊं शकतें. दुसरें असें कीं, 'छन्दसि दृष्टानुविधिः' हा न्याय असल्यामुळें, वैदिक प्रयोग जसा आढळतो तसाच तो शुद्ध मानला पाहिजे आणि त्यामुळें पञ्चम्यन्त पाठ मानल्यानें कोणत्याहि अधिक फलाची सिद्धि होत नाहीं. कौमुदींत जसा षष्ठयन्त पाठ मानला आहे तसा पाठ मानल्यानें देखील, वर सांगितलेल्या दोन कारणांमुळें, 'ओषधीस्कृधि' हें सकारयुक्त रूप सिद्ध होऊं शकतेंच. सारांश षष्ठयन्त पाठ मानल्यानें देखील पञ्चम्यन्त पाठाचें फल वर जें सांगितलें आहे तें निष्पन्न होऊं शकतेंच व कोणताहि दोष येत नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'वृत्तौ मुहुस्कामेति सकारः क्वचित् पठ्यते, तत् प्रामादिकमिति हरदत्तः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('मुहुः कामा' या उदाहरणांत विसर्गापुढें असणारा ककार हा 'कामा' या) पदाचा आद्य अवयव असल्यामुळें, 'सोऽपदादौ' सू. १५२ या सूत्राची प्राप्ति होत नाहीं (व त्या सूत्रानें होणारें विसर्गाचें सत्व होऊंच शकत नाहीं आणि त्यामुळें 'मुहुस्कामा' हा सकारयुक्त पाठ चूक ठरतो असा हरदत्ताच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा-- द्विस्त्रिश्चतुरिति इह । द्वित्रिभ्यां सुजन्ताभ्यां साहचर्यात् चतुःशब्दोऽपि सुजन्त एव ग्रहीष्यते । कृत्वोऽर्थग्रहणं ज्ञापकम्-साहचर्यं न सर्वत्र व्यवस्थापकमिति । तेन "दीधीवेवीटाम्" इत्यत्र धातुसाहचर्येऽपि आगमस्येटो ग्रहणम् । उभयत्र विभाषा चेयम् । चतुरित्यस्य "इदुदुपधस्य-" इति प्राप्ते इतरयोस्त्वप्राप्ते । न च तयोरपि "इसुसोः सामर्थ्ये" इत्यनेन सिद्धिः शङ्क्या । इसः प्रत्ययस्य अर्थवतश्च तत्र ग्रहणात् । चतुष्कपाल इति । "इदुदुपधस्य" इति नित्यं षः ।

'द्विस्त्रिश्चतुरिति कृत्वोऽर्थे' सू. १५७ या सूत्रांत सुजन्त 'द्विस्, त्रिस्' या शब्दांच्या साहचर्यामुळें सुजन्त 'चतुर्' शब्दाचेंच ग्रहण केलें जाऊं शकतें. असें असून देखील प्रकृत सूत्रांत 'कृत्वोऽर्थे' या शब्दांचें जें ग्रहण केलें आहे तें साहचर्यन्याय सर्वत्र लागू पडत नाहीं याचें ज्ञापक ठरतें व तो न्याय अनित्य असल्यामुळेंच, 'दीधी-वेवीटाम्' सू. २१९० या सूत्रांत 'दीधी, वेवी' या धातूंचें साहचर्य असून देखील ('इट् गतौ' धा. नं. ३१८ या धातूचें ग्रहण न केलें जातां) 'इट्' या आगमाचें ग्रहण केलें जातें. ('द्वित्रिचतुर्भ्यः सुच्' सू. २०८६ या सूत्रानें 'द्वि, त्रि, चतुर्' या शब्दांना 'क्रियाभ्या-वृत्तिगणन' या अर्थामध्यें 'सुच् = स्' प्रत्यय होतो व 'चतुर्' शब्दाहून 'सुच् = स्' प्रत्यय केला असतां, 'रात्सस्य' सू. २८० या सूत्रानें सकाराचा लोप होऊन 'चतुर्' असेंच सुजन्त रूप राहतें. 'चतुर्' हा शब्द रकारान्त अनव्यय प्रातिपदिक आहे व तसेंच सुजन्त 'चतुर्' हा शब्द, 'तद्धितश्चासर्वविभक्तिः' सू. ४४८ या सूत्रांत 'कृत्वोऽर्थाः' असें परिगणन केलें असल्यामुळें त्या सूत्रान्वयें, अव्ययसंज्ञक देखील आहे. त्यामुळें 'द्विस्त्रिश्चतुरिति कृत्वोऽर्थे' असें प्रकृत सूत्र पठित न करितां पाणिनीनें 'द्विस्त्रिश्चतुरिति' असेंच सूत्र पठित केलें असतें तरी, 'द्विस्, त्रिस्' या सुजन्त अव्ययांबरोबर 'चतुर्' शब्दाचा उच्चार केल्यामुळें, 'सहचरितासहचरितयोः सहचरितस्यैव ग्रहणम्'-परि. ११२-या साहचर्यन्यायान्वयें 'चतुर्'

या रकारान्त अनव्यय प्रातिपदिकाचें ग्रहण न होतां, 'चतुर्' या सुजन्त अव्ययाचेंच ग्रहण झालें असतें. असें असून देखील वरील सूत्रांत 'कृत्वोऽर्थे' हें पद घातलें असल्यामुळें हें ज्ञापित होतें कीं, साहचर्यन्याय अनित्य आहे, म्हणजे तो सर्वत्र लागू पडणारा नसून कोठें कोठें ज्यांचा धर्म समान नाहीं अशा शब्दांचा देखील एकत्र प्रयोग किंवा उच्चार केला जातो. उदाहरणार्थ 'दीधीवेवीटाम्' या सूत्रांत 'दीधी, वेवी' हे धातु पठित केले असून त्यांच्या साहचर्यानें भ्वादिगणांत पठित असलेल्या 'इट् गतौ' या धातूचें ग्रहण न होतां 'इट्' या आगमाचें ग्रहण होतें. जर साहचर्यन्याय नित्य असता तर, त्या सूत्रांतील 'इट्' या शब्दानें 'इट्' धातूचेंच ग्रहण करणें भाग पडलें असतें व तें सूत्र गुणवृद्धींचा निषेध करणारें सूत्र असल्यामुळें, 'इट् + शप् + ति' अशा स्थितींत 'पुगन्तलघूपधस्य च' सू. २१८९ या सूत्रानें 'इट्' धातूंतील 'इ' या उपधेचा गुण होऊं शकला नसता व 'एटति' असें इष्ट रूप सिद्ध न होतां 'इटति' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती. सारांश साहचर्यन्याय अनित्य असल्यामुळें 'चतुर्' या शब्दानें 'चतुर्' या सुजन्त अव्ययाचेंच ग्रहण व्हावें याकरितां पाणिनीला प्रकृत सूत्रांत 'कृत्वोऽर्थे' हें पद घालावें लागलें व अशा रीतीनें त्या पदाचें ग्रहण साहचर्यन्यायाच्या अनित्यत्वाचें ज्ञापक ठरतें.) प्रकृत सूत्र प्राप्ताप्राप्तविभाषेचें सूत्र आहे. 'चतुर्' या स्थलीं 'इदुदुपधस्य' सू. १५५ या सूत्रानें विसर्गाचें नित्य षत्व होण्याची प्राप्ति आहे व 'द्विः, त्रिः' या दोन स्थलीं विसर्गाचें षत्व होण्याची प्राप्ति नाहीं. ('द्वि, त्रि' या शब्दांहून 'द्वित्रिचतुर्भ्यः सुच्' सू. २०८६ या सूत्रानें 'सुच् = स्' प्रत्यय केला असतां, 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें त्या प्रत्ययरूप सकाराचे जागीं 'रु' हा आदेश होऊन 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें 'रु' चा विसर्ग होतो. सारांश या दोन्ही उदाहरणांत 'सुच्' प्रत्ययाचे जागीं झालेला विसर्ग स्थानिवद्भावानें प्रत्ययरूप ठरत असल्यामुळें,

'इदुदुपधस्य' या सूत्राची वास्तविक प्रवृत्ति होऊं शकत नाहीं. तरी पण 'द्विः, त्रिः' या सुजन्त शब्दांपुढें 'कु, पु' आल्यास प्रकृत सूत्रानें विसर्गाचें विकल्पेंकरून षत्व होतें व अशा रीतीनें या दोन शब्दांना लागू पडणारें प्रकृत सूत्र अप्राप्तविभाषेचें सूत्र ठरतें. पण 'चतुर्' या प्रातिपदिकाहून 'सुच् = स्' प्रत्यय केला असतां, 'चतुर् + स्' अशा स्थितींत 'रात्सस्य' सू. २८० या सूत्रानें प्रत्ययरूप सकाराचा लोप झाल्यावर 'चतुर्' यांतील अन्त्य प्रत्यय-भिन्न रकाराचा 'खरवसानयोः' या सूत्रानें जो विसर्ग होतो तो अप्रत्ययरूप विसर्ग ठरत असल्यामुळें, या स्थलीं 'इदुदुपधस्य' या सूत्रानें नित्य षत्वाची प्राप्ति होते. तें नित्य प्राप्त होणारें षत्व प्रकृत सूत्रानें विकल्पेंकरून होणें सांगितलें असल्यामुळें, 'चतुर्' या शब्दास लागू पडणारें प्रकृत सूत्र प्राप्तविभाषेचें सूत्र ठरतें आणि म्हणूनच हें उभयत्रविभाषेचें सूत्र आहे असें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे.) 'द्विः, त्रिः' या स्थलीं देखील 'इसुसोः सामर्थ्ये' सू. १५८ या सूत्रानें विसर्गाचें विकल्पेंकरून षत्व होऊं शकतें अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाहीं; कारण त्या सूत्रांत 'इस्' या प्रत्ययाचे व तसेंच अर्थवान् शब्दाचें ग्रहण केलें आहे. (शंकाकार अशी शंका करतो कीं, 'द्विस्, त्रिस्' या दोन्ही शब्दांत 'इस्' हा समुदाय अन्तीं आहे व त्या समुदायांतील अन्त्य सकाराचे जागीं झालेल्या विसर्गाचें 'इसुसोः सामर्थ्ये' या सूत्रानें विकल्पेंकरून षत्व होऊं शकतेंच व म्हणून प्रकृत सूत्रांत 'द्विस्, त्रिस्' या शब्दांचें ग्रहण करण्याची कांहींच गरज नव्हती. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, 'द्विस्, त्रिस्' या स्थलीं 'इस्' प्रत्यय नसून केवळ 'सुच् = स्' हाच प्रत्यय आहे व 'इसुसोः' या सूत्रांत 'इस्' या प्रत्ययाचें ग्रहण केलें असल्यामुळें आणि 'द्विस्, त्रिस्' या दोन्ही स्थलीं त्या प्रत्ययाचा अभाव असल्यामुळें, तें सूत्र या दोन शब्दांचे ठिकाणीं प्रवृत्त होऊं शकत नाहीं. दुसरें असें कीं, 'इसुसोः' या सूत्रांत, अर्थवान् असलेल्या, 'इस्'चें ग्रहण केलें आहे व 'द्विस्, त्रिस्'

यांतील अन्त्य इकार व त्यापुढील 'सुच् = स्' प्रत्यय यांचा समुदाय जो 'इस्' हा शब्द आहे तो अर्थवान् नाहीं. म्हणून 'अर्थवद्ग्रहणे नानर्थकस्य'–परि. १४–या परिभाषान्वयें 'इसुसोः' या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या अर्थवान् 'इस्'नें तशा अनर्थक 'इस्'चें ग्रहण करतां येत नाहीं आणि म्हणून देखील 'इसुसोः' हें सूत्र 'द्विस्, त्रिस्' या शब्दांना लागू पडत नाहीं. त्यामुळें प्रकृत सूत्रांत केलेलें 'द्विस्, त्रिस्' या शब्दांचें ग्रहण व्यर्थ ठरत नसून आवश्यक ठरतें.) प्रकृत सूत्रावरील कौमुदींत दिलेल्या 'चतुष्कपालः' या प्रत्युदाहरणांत 'इदुदुपधस्य' सू. १५५ या सूत्रानें नित्य षत्व होतें. ('चतुष्कपालः' या सामासिक शब्दाची 'चतुर्षु कपालेषु संस्कृतः पुरोडाशः चतुष्कपालः' अशी वृत्ति आहे. या स्थलीं तद्धित 'अण्' प्रत्यय विवक्षित असतां 'तद्धितार्थोत्तरपदसमाहारे च' सू. ७२८ या सूत्रानें झालेला हा समास 'संख्यापूर्वो द्विगुः' सू. ७३० या सूत्रान्वयें द्विगुसंज्ञक ठरतो व येथें 'संस्कृतं भक्षाः' सू. १२१७ या सूत्रानें झालेल्या 'अण्' प्रत्ययाचा 'द्विगोर्लुगनपत्ये' सू. १०८० या सूत्रानें लुक् झाला आहे. या उदाहरणांत 'चतुर्' हा शब्द संख्याभ्यावृत्तिगणनाचा, म्हणजे 'कृत्वोऽर्थां'चा, वाचक नसून केवळ संख्येचा वाचक असल्यामुळें, येथें प्रकृत सूत्र लागू पडत नाहीं व त्यामुळें अप्रत्ययरूप विसर्गाचें विकल्पें करून षत्व न होतां 'इदुदुपधस्य' या सूत्रानें नित्य षत्व होतें.)

शब्दरत्न––साहचर्यमिति । न च रामलक्ष्मणावित्यादौ दृष्टसाहचर्यसम्बन्धस्याभिधानियामकत्वं दृष्टम् । न चैषां क्वापि साहचर्यसम्बन्धो गृहीत इति कथमेतदिति वाच्यम् । "पञ्चम्यपाङ्परिभिः" इत्यनेन लक्षणादिद्योतकपरियोगे पञ्चमीशङ्कायां "यद्यप्ययं परिर्दृष्टापचारो वर्जने चावर्जने चायं खल्वपशब्दो ऽदृष्टापचारो वर्जनार्थ एव कर्मप्रवचनीयस्तस्य कः सहायो भवितुमर्हति अन्यो वर्जनार्थात् । यथा ऽस्य गोः सहायेनार्थ इति गौरेवानीयते नाश्वो न गर्दभः" इति "कर्मप्रवचनीययुक्ते" इति सूत्रस्थभाष्येण सदृशानामेव प्रयोगे

सहायत्वमित्यर्थस्य प्रतिपादनेनाक्षतेः । परिभाषायां सहचरितशब्देन सदृशस्यैव ग्रहणं सहचरस्य भावः साहचर्यम् । सहचरणं च सदृशयोरेवेति. साहचर्यशब्देन सादृश्यमुच्यते । सदृशयोरेव सहविवक्षा तयोरेव च सह प्रयोगः । रामलक्ष्मणावित्यादावपि सादृश्यमेव नियामकमिति दिक् । अर्थवतश्चेति । प्रतिपदोक्तस्य चेत्यपि बोद्धव्यम् । नित्यं ष इति । भाष्यप्रामाण्येनात्राव्युत्पत्तिपक्षस्यैवाङ्गीकारेण व्युत्पत्तिपक्षे प्रत्ययसम्बन्धित्वात्कथं षत्वमिति न शङ्क्यम् । अत एव "चतुष्पाद्भ्यो ढञ्" इत्यादिनिर्देशसङ्गतिः ।

'रामलक्ष्मणौ' इत्यादि उदाहरणांत राम व लक्ष्मण यांचा साहचर्यसंबंध लोकांत प्रसिद्ध असल्यामुळें अशा प्रकारचा साहचर्यसंबंध अभिधेय अर्थाचा, म्हणजे अभिधाशक्तीनें ज्ञात होणाऱ्या अर्थाचा, नियामक होतो हें प्रसिद्ध आहे, पण 'द्विः, त्रिः' या शब्दांचा 'चतुर्' शब्दाशीं साहचर्यसंबंध कोठेंहि (लौकिक प्रयोगांत) आढळून येत नाहीं आणि म्हणून अशा ठिकाणीं अभिधेय अर्थाचें नियामकत्व कसें होऊं शकणार अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाहीं. (राम व लक्ष्मण यांचा साहचर्यसंबंध लोकांत सर्वत्र प्रसिद्ध असल्यामुळें, 'रामलक्ष्मणौ' असा प्रयोग केला असतां, 'राम' या शब्दानें दाशरथि रामाचेंच ग्रहण केलें जातें, परशुरामाचें किंवा बलरामाचें ग्रहण केलें जात नाहीं, आणि तसेंच 'लक्ष्मण' या शब्दानें दुर्योधनपुत्र लक्ष्मण याचें ग्रहण केलें जात नसून दाशरथि लक्ष्मणाचेंच ग्रहण केलें जातें. परंतु 'द्विः, त्रिः, चतुर्' या तीन सुजन्त शब्दांचें साहचर्य लौकिक प्रयोगांत कोठेंहि आढळत नाहीं. म्हणून 'द्विः, त्रिः' या शब्दांच्या बरोबर 'चतुर्' या शब्दाचा उच्चार केला आहे एवढ्याच कारणावरून प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेला 'चतुर्' हा शब्द संख्यावाचक नसून संख्याभ्यावृत्तिगणनाचा वाचक सुजन्त शब्द आहे असें त्याच्या अभिधेय अर्थाचें नियमन करतां येणें शक्य नाहीं अशी शंकाकाराची शंका आहे. या शंकेवर उत्तर देतांना शब्दरत्नकार प्रथम भाष्याचें प्रमाण देतात.) 'कर्म-

प्रवचनीययुक्ते द्वितीया' सू. २. ३. ८ या सूत्रावरील भाष्यांत '-पञ्चम्यपाङ्परिभिः' सू. ५९८ या सूत्रानें 'लक्षण' इत्यादि अर्थाच्या वाचक 'परि' या कर्मप्रवचनीयांत अन्वय असणाऱ्या शब्दाची पञ्चमी कां होऊं नये अशी शंका उपस्थित करून त्या शंकेचें निरसन करितांना भाष्यकार असें म्हणतात कीं, जरी 'परि' या शब्दाच्या अर्थामध्यें व्यभिचार आढळत असून, म्हणजे तो शब्द एकाच अर्थाचा वाचक नसून, 'वर्जन' या अर्थाचा ('अपपरी वर्जने' सू. ५९६ या सूत्रान्वयें) वाचक आहे व तसेंच ('लक्षणेत्थंभूताख्यान-भागवीप्सासु प्रतिपर्यनवः' सू. ५५२ या सूत्रान्वयें) वर्जनभिन्न अर्थाचा, म्हणजे 'लक्षण, इत्थंभूताख्यान, भाग, वीप्सा' या अर्थांचा देखील, वाचक आहे तरी, 'अप' या शब्दाच्या अर्थामध्यें व्यभिचार आढळत नसून तो शब्द 'वर्जन' या एकाच अर्थाचा वाचक कर्म-प्रवचनीय आहे. अशा वर्जनार्थक 'अप' या कर्मप्रवचनीयाचा वर्जनार्थ-वाचक 'परि' हा कर्मप्रवचनीय खेरीज करून इतर अर्थाचा वाचक 'परि' हा कर्मप्रवचनीय कसा जोडीदार होऊं शकेल ? उदाहरणार्थ या बैलास जोड पाहिजे असें कोणी म्हटल्यास, बैलच आणला जातो, घोडा आणला जात नाहीं किंवा गाढव आणलें जात नाहीं. सामानार्थवाचक शब्दांचाच एकत्र प्रयोग केला जातो या अर्थाचें प्रतिपादन वरील भाष्यांत केलें असल्यामुळें, दीक्षितांचें म्हणणें— म्हणजे प्रकृत सूत्रांत 'द्विस्, त्रिस्' या सुजन्त शब्दांचें ग्रहण केलें असल्यामुळें व सुजन्त 'चतुर्' हाच शब्द त्यांच्यासारखा समानधर्मक असल्यामुळें त्यांच्या साहचर्यानें सुजन्त 'चतुः' शब्दाचेंच ग्रहण होऊं शकलें असतें हें म्हणणें— दोषरहित व योग्य ठरतें. 'सहचरिता-सहचरितयोः' प. ११२ या परिभाषेंतील 'सहचरित' या शब्दानें सदृशाचेंच ग्रहण होतें. म्हणजे 'सहचरित' हा शब्द सदृशार्थवाचक आहे, व 'सहचरस्य भावः साहचर्यम्' अशी 'साहचर्य' या शब्दाची व्युत्पत्ति आहे. (या स्थलीं 'गुणवचनब्राम्हणादिभ्यः' सू. १७८८ या सूत्रानें 'तस्य भावः' या अर्थांमध्यें 'ष्यञ्' प्रत्यय होऊन

'साहचर्य' हें रूप सिद्ध झालें आहे.) सारख्याच धर्माचे लोक एकत्र आढळतात. ('समानशीलव्यसनेषु सख्यम्' ही कवीची उक्ति सर्वत्र प्रसिद्धच आहे.) त्यामुळें 'साहचर्य' हा शब्द सादृश्याचा वाचक ठरतो. सदृशार्थवाचक किंवा समानधर्मक शब्दांचाच एकत्र उच्चार करण्याची इच्छा – विवक्षा – असते व तशाच शब्दांचा एकत्र प्रयोग केला जातो. 'रामलक्ष्मणौ' इत्यादि प्रयोगांत देखील सादृश्यच, म्हणजे दाशरथित्व हा समान धर्मच, अभिधाशक्तीनें ज्ञात होणाऱ्या अर्थाचा नियामक ठरतो. (सारांश समानधर्मक शब्दांचाच एकत्र प्रयोग करण्याची प्रथा – वहिवाट – असल्यामुळें, 'द्विस्, त्रिस्' या सुजन्त शब्दांच्या साहचर्यानें 'चतुर्' या सुजन्त शब्दाचें ग्रहण करतां आलेंच असतें हें दीक्षितांचें म्हणणें वरील भाष्याला धरून असल्या-मुळें योग्य ठरतें व शंकाकारानें केलेली शंका त्या भाष्याच्या विरुद्ध असल्यामुळें अयोग्य ठरते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'इसः प्रत्ययस्य अर्थवतश्च तत्र ग्रहणात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याखेरीज 'प्रतिपदोक्तस्य' हा हेतु देखील देतां येतो. ('सर्पिस्' इत्यादि शब्दांच्या अन्तीं जसा प्रतिपदोक्त – मूळचा – 'इस्' आहे तसा 'द्वि, त्रि' या इकारान्त शब्दांच्या अन्तीं मूळचा 'इस्' नाहीं. त्या शब्दांहून 'द्वित्रिचतुर्भ्यः सुच्' सू. २०८६ या सूत्रानें 'सुच् = स्' प्रत्यय केल्यावरच, 'द्वि, त्रि' या प्रकृतींतील अन्त्य इकार व त्यापुढील 'सुच् = स्' प्रत्यय यांचा 'इस्' असा समुदाय निष्पन्न होत असल्यामुळें तो 'इस्' लाक्षणिक ठरतो व 'लक्षणप्रतिपदोक्तयोः प्रतिपदोक्तस्यैव ग्रहणम्' – परि. ११४ – ही परिभाषा असल्यामुळें, 'इसुसोः' सू. १५८ या सूत्रांतील प्रतिपदोक्त 'इस्' नें तशा लाक्षणिक 'इस्' चें ग्रहण करतां येत नाहीं व त्यामुळें 'इसुसोः' हें सूत्र 'द्विस्, त्रिस्' यांना लागू पडत नाहीं.) पाणिनीय शास्त्रांत अव्युत्पत्तिपक्षच स्वीकारला आहे याला भाष्य प्रमाण असल्यामुळें, व्युत्पत्तिपक्ष मानल्यास 'चतुः' या शब्दांतील विसर्गाचें षत्व कसें होऊं शकणार अशी शंका

उद्भवतच नाहीं. व्याकरणशास्त्रांत पाणिनीनें अव्युत्पत्तिपक्ष मानला असल्यामुळेंच, 'चतुष्पाद्भ्यो ढञ्' सू. ११४१ इत्यादि सूत्रांतील 'चतुष्पाद्भ्यः' इत्यादि निर्देश योग्य ठरतात. ('चतेरुरन्' उ. सू. ७८६ या सूत्रानें 'चत्' धातूहून उणादि 'उरन् = उर्' प्रत्यय होऊन 'चतुर्' हें रूप सिद्ध होतें. येथें 'चतुर्' शब्दांतील ज्या अन्त्य रकाराचा विसर्ग होतो तो रकार 'उर्' या उणादि प्रत्ययाचा अवयव असल्यामुळें, त्याचे जागीं 'खरवसानयोः' या सूत्रानें होणारा विसर्ग स्थानिवद्भावानें प्रत्ययावयवरूप विसर्ग ठरतो व 'इदुदुपधस्य चाप्रत्ययस्य' सू. १५५ या सूत्रांत 'अप्रत्ययस्य' असा निषेध असल्यामुळें, त्या सूत्रानें त्या प्रत्ययावयवरूप विसर्गाचें षत्व होऊं शकत नाहीं असें शंकाकाराचें म्हणणें आहे. शंकाकारानें ही शंका व्युत्पत्तिपक्ष मानून केली आहे, व तो पक्ष मानल्यास, 'चतुष्कपालः' या उदाहरणांत विसर्गाचें षत्व होऊं शकत नाहीं. पण 'आयनेयीनीयियः' सू. ७.१.२ या सूत्रावरील भाष्यांत 'प्रातिपदिकविज्ञानाच्च पाणिनेः सिद्धम्' असें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात— 'प्रातिपदिकविज्ञानाच्च भगवतः पाणिनेराचार्यस्य सिद्धम् । उणादयोऽव्युत्पन्नानि प्रातिपदिकानि ।' या भाष्यावर उद्योतकारांनीं 'अत्र पाणिनेरित्युक्त्या सर्पिषा यजुषेत्यादि कतिपयातिरिक्तोणादिषु पाणिनेरव्युत्पत्तिपक्ष एवाभिप्रेत इति दर्शयति । वस्तुतः सर्पिषेत्यादौ षत्वमपि बहुलग्रहणादिति सर्वथाऽव्युत्पत्तिरेवैतेष्विति बोध्यम्' असें म्हटलें आहे. यावरून हें सिद्ध होतें कीं, धातूहून उणादि प्रत्यय करून सिद्ध केलेलीं प्रातिपदिकें अव्युत्पन्न प्रातिपदिकेंच मानलीं पाहिजेत असा पाणिनीय सिद्धान्त आहे. सारांश पाणिनीला व्युत्पत्तिपक्ष मान्य नसून अव्युत्पत्तिपक्षच मान्य असल्यामुळें, व्युत्पत्तिपक्षाचा आश्रय करून 'चतुष्कपालः' या स्थलीं औणादिक 'उरन् = उर्' या प्रत्ययाचा अन्त्यावयव जो रकार त्या रेफाचे जागीं होणाऱ्या विसर्गाचें षत्व पावत नाहीं अशी जी शंकाकारानें शंका केली आहे

ती पाणिनीय सिद्धान्ताविरुद्ध असल्यामुळें अयोग्य ठरते असा शब्द-रत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. जर आचार्य पाणिनीला व्युत्पत्तिपक्ष मान्य असता तर त्यानें 'चतुष्पाद्भ्यो ढञ्' या सूत्रांत औणादिक प्रत्ययावयवरूप रेफाचे जागीं झालेल्या विसर्गाचें षत्व न करितां व 'चतुष्पाद्भ्यः' असा निर्देश न करतां 'चतुःपाद्भ्यः' असा निर्देश केला असता हें उघड आहे.)

मनोरमा– व्यपेक्षाविरहेऽपीति । तिष्ठतु सर्पिष्कुण्डिकामानयेत्वादावित्यर्थः । व्यपेक्षायामिति । इदं सर्पिष्कुण्डिकाया इत्यत्रेत्यर्थः। यत्तु पारायणिका आहुः––कस्कादिषु सर्पिष्कुण्डिकादीनां पाठ उत्तर-पदस्थत्वेऽपि षत्वार्थः" इति । तद्भाष्यविरोधादुपेक्ष्यम् ।

('नित्यं समासेऽनुत्तरपदस्थस्य' सू. १५९ या सूत्रावरील कौमुदींत 'कस्कादिषुसर्पिष्कुण्डिकाशब्दोऽसमासे व्यपेक्षाविरहेऽपि षत्वार्थो, व्यपेक्षायां नित्यार्थश्च' असें दीक्षितांनीं म्हटलें आहे. या पंक्तीचेंच विवरण दीक्षित मनोरमेंत करितात.) तिष्ठतु सर्पिष्कुण्डिकामानय' इत्यादि स्थलीं व्यपेक्षाविरह–अन्वयाभाव–असून देखील विसर्गाचें षत्व झालें आहे. ('इसुसोः सामर्थ्ये' सू. १५८ या सूत्रावरील कौमुदींत दीक्षितांनीं 'सामर्थ्यमिह व्यपेक्षा', म्हणजे या सूत्रांतील 'सामर्थ्य' या शब्दाचा 'व्यपेक्षा' हा अर्थ आहे, असें म्हटलें आहे. सामर्थ्य दोन प्रकारचें असतें, एक वृत्तींत होणारें एकार्थी-भावरूप सामर्थ्य व दुसरें व्यपेक्षारूप सामर्थ्य. प्रथम प्रकारचें एकार्थी-भावरूप सामर्थ्य वृत्तींत आढळत असून, द्वितीय प्रकारचें व्यपेक्षारूप सामर्थ्य वाक्यांत आढळतें. 'पदानामाकाङ्क्षायोग्यतासन्निधिवशाद्यः परस्परान्वयः सा व्यपेक्षा' असा 'व्यपेक्षा' या शब्दाचा अर्थ आहे. असा परस्परान्वय एकाच वाक्यांत असणाऱ्या पदांमध्येंच होऊं शकतो, एका वाक्यांतील पदाचा भिन्न वाक्यांतील पदांशीं परस्परान्वय होऊं शकत नाहीं. व्यपेक्षाविरहाचें मनोरमेंत वर जें उदाहरण दिलें आहे त्यांत 'तिष्ठतु सर्पिः' व 'कुण्डिकामानय' अशीं दोन भिन्न

वाक्यें आहेत व प्रथम वाक्यांतील 'सर्पिः' या पदाचा द्वितीय वाक्यांतील 'कुण्डिकाम्' या पदांत अन्वय होत नाहीं. म्हणून परस्परान्वयाभावामुळें, म्हणजेच व्यपेक्षाविरहामुळें, या उदाहरणांत 'इसुसोः सामर्थ्ये' या सूत्रानें होणारें विसर्गाचें षत्व होऊं शकत नाहीं. तसेंच 'सर्पिः' व 'कुण्डिकाम् या दोन पदांचा समास झालेला नसल्यामुळें, 'नित्यं समासे' सू. १५९ या सूत्राची देखील प्राप्ति होत नाहीं. त्याचप्रमाणें 'सर्पिः' यांतील विसर्ग पूर्वीं सांगितल्या-प्रमाणें 'इस्' या औणादिक प्रत्ययांतील सकाराचे जागीं झालेला प्रत्ययावयवरूप विसर्ग असल्यामुळें, 'इदुदुपधस्य' सू. १५५ या सूत्राची देखील प्राप्ति होत नाहीं. परंतु या स्थलीं षत्व होणें इष्ट असल्यामुळें 'सर्पिष्कुण्डिका' या शब्दाचा कस्कादिगणांत मुद्दाम पाठ केला आहे व त्यामुळें येथें व्यपेक्षाविरह—परस्परान्वयाभाव – असून देखील, 'कस्कादिषु च' सू. १४४ या सूत्रानें विसर्गाचें षत्व झालें आहे.) 'इदं सर्पिष्कुण्डिकायाः' या उदाहरणांत व्यपेक्षा असून विसर्गाचें षत्व झालें आहे. (या उदाहरणांत 'सर्पिः' हें पद 'कुण्डिकायाः' या पदांत अन्वित आहे, म्हणजे या दोन पदांत व्यपेक्षा—परस्परान्वितत्व— आहे. त्यामुळें 'इसुसोः सामर्थ्ये' सू. १५८ या सूत्रानें 'सर्पिः' यांतील विसर्गाचें विकल्पेंकरून षत्व पावलें आहे. तें षत्व विकल्पें-करून न होतां नित्य व्हावें याकरितां 'सर्पिष्कुण्डिका' हा शब्द कस्कादिगणांत पठित केला आहे. सारांश व्यपेक्षा असो किंवा व्यपेक्षाविरह असो दोन्ही ठिकाणीं 'सर्पिः' यांतील विसर्गाचें, 'कुण्डिका' हा ककारानें सुरू होणारा शब्द पुढें आला असतां, नित्य षत्व व्हावें याकरितां 'सर्पिष्कुण्डिका' या शब्दाचा कस्कादिगणांत पाठ केला आहे असें दीक्षितांचें म्हणणें आहे.) पारायणिक वैयाकरण असें म्हणतात कीं, 'सर्पिष्कुण्डिका' इत्यादि शब्दांचा कस्कादिगणांत जो पाठ केला आहे तो अशाकरितां कीं, विसर्ग जरी समासांतील उत्तर पदांत असला तरी त्याचें षत्व व्हावें. पण हें त्यांचें म्हणणें भाष्यविरुद्ध असल्यामुळें स्वीकारार्ह नाहीं; (कारण 'नित्यं समासे'

८–३–४५ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'अनुत्तरपदस्थस्येति किमर्थम् ? । परमसर्पिः कुण्डिका ।' म्हणजे 'परमसर्पिः कुण्डिका' या उदाहरणांत समासांतील 'सर्पिः' या उत्तर पदांत विसर्ग असल्यामुळें 'नित्यं समासे' सू. १५९ या सूत्रानें होणारें षत्व त्या विसर्गाचें होत नाहीं, असें स्पष्ट म्हटलें आहे. या स्थलीं 'इसुसोः सामर्थ्ये' या सूत्राची प्राप्ति होत नाहीं; कारण पृथक् पदें असून त्यांत परस्परांत अन्वय असला तरच तें सूत्र लागू पडतें, व जेथें दोन पदांचा समास होऊन एकार्थीभाव झाला आहे तेथें तें सूत्र लागू पडत नाहीं असें 'नित्यं समासे' या सूत्रावरील भाष्यांत सांगितलें आहे. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात – 'पूर्वस्मिन् योगे व्यपेक्षासामर्थ्यमाश्रीयते न पुनरेकार्थीभावः'. 'परमसर्पिः कुण्डिका' हें सामासिक पद असल्यामुळें येथें 'इसुसोः सामर्थ्ये' हें सूत्र लागू पडत नाहीं हें उघड आहे.)

शब्दरत्न – इत्यर्थ इति । अत्रत्यन्तत्वं पूर्वं सूचितम् । तद्भाष्येति । "अनुत्तरपदस्थस्य" इति किं परमसर्पिः कुण्डिकेति "नित्यं समासे–" इति सूत्रस्थभाष्येत्यर्थः ।

'व्यपेक्षायामिति । इदं सर्पिष्कुण्डिकाया इत्यत्रेत्यर्थः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा तात्पर्यार्थ पूर्वीं सांगितला आहे. ('अत्रत्यं तत्वं पूर्वं सूचितम्' या शब्दरत्नांतील प्रकृत पंक्तीचा भावप्रकाशकारांनीं 'अयं पाठस्तादृशान्वयबोधतात्पर्यग्राहक इत्येवंरूपमित्यर्थः । इदुदुपधेतिसूत्रे स्पष्टीकृतमेतत् ।'– म्हणजे 'सर्पिष्कुण्डिका' या शब्दाचा कस्कादिगणांत जो पाठ केला आहे त्यावरून हें ज्ञापित होतें कीं, 'इदुदुपधस्य' या सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' या पदाचा लक्षणा न करितां 'प्रत्ययभिन्नस्य विसर्गस्य' असा जो व्याख्यादर्शांत सामानाधिकरण्यानें अन्वय केला आहे तसा अन्वय करणें योग्य नसून, 'अप्रत्ययस्य' या पदाचा लक्षणेनें 'प्रत्ययावयवभिन्नस्य' असा अर्थ करून नंतर त्याचा

'विसर्गस्य' या पदाशीं सामानाधिकरण्यानें अन्वय करणें योग्य आहे असें 'इदुदुपधस्य' या सूत्रावरील शब्दरत्नांत पूर्वी सांगितलें आहे— असा अर्थ केला आहे. याचा भावार्थ हा आहे कीं, 'सृप्' धातूहून औणादिक इस् प्रत्यय केल्यावर 'सर्पिस्' असें जें रूप होतें त्यांतील संपूर्ण 'इस्' प्रत्ययाचे जागीं विसर्ग होत नसून त्या प्रत्ययाचा अवयव जो सकार आहे त्याचेच जागीं विसर्ग होत असल्यामुळें, व्याख्यादर्शोक्तरीत्या वरप्रमाणें अन्वय केल्यानें, 'सर्पिष्कुण्डिका' या स्थलीं प्रत्ययरूप विसर्ग नसून प्रत्ययभिन्न विसर्ग असल्यामुळें, 'इदुदुपधस्य' या सूत्रानेंच नित्य षत्व होऊं शकतें व नित्य षत्व होण्याकरितां 'सर्पिष्कुण्डिका' या शब्दाचा जो कस्कादिगणांत पाठ केला आहे तो व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. परंतु सिद्धान्तपक्षांत जसा अन्वय करणें सांगितलें आहे तसा अन्वय केल्यानें 'सर्पिष्कुण्डिका' या स्थलीं प्रत्ययावयवरूप विसर्ग असल्यामुळें 'इदुदुपधस्य' या सूत्रानें त्याचें नित्य षत्व होऊं शकत नाहीं व 'इसुसोः सामर्थ्ये' या सूत्रानें त्याचें विकल्पेंकरून षत्व होण्याची प्राप्ति आहे. तसें त्या विसर्गाचें विकल्पेंकरून षत्व न होतां नित्य षत्व होण्याकरितां 'सर्पिष्कुण्डिका' हा शब्द कस्कादिगणांत मुद्दाम पठित केला आहे व अशा रीतीनें तो पाठ सिद्धान्तपक्ष मानल्यानेंच चरितार्थ ठरतो. म्हणून व्याख्यादर्शग्रन्थानुसार मनोरमेंत व कौमुदींत केलेलें व्याख्यान न मानतां शब्दरत्नांत लक्षणा करून 'इदुदुपधस्य' या सूत्रांतील 'अप्रत्ययस्य' या शब्दाचें जसें पूर्वी व्याख्यान केलें आहे तेंच व्याख्यान मानणें योग्य आहे असा शब्दरत्नांतील प्रकृत पंक्तीचा गर्भितार्थ आहे.)
'तद्भाष्यविरोधादुपेक्ष्यम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें की, 'नित्यं समासे' ८.३.४५ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'अनुत्तरपदस्थस्येति किम्? । परमसर्पिःकुण्डिका' असें म्हटलें आहे. (या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, समासांतील उत्तर पदांत असलेल्या विसर्गाचें षत्व होत नाहीं व म्हणून पारायणिकांचें म्हणणें वरील भाष्याविरुद्ध असल्यामुळें स्वीकारार्ह नाहीं.)

मनोरमा--अयः सहितेति । न त्वयसो विकारः । "जानपद-" इति ङीष्प्रसङ्गात् । अयस्कर्णीति । अय इव कर्णौ यस्याः । "नासिकोदरौष्ठ--" इत्यादिना ङीष् ।।

('अतः कृकमि' सू. १६० या सूत्रावरील कौमुदींत 'अयस्कुशा' व 'अयस्कर्णी' अशीं उदाहरणें दिलीं आहेत व 'अयस्कुशा' याचा 'अयः सहिता कुशा' असा विग्रह केला आहे. तसा विग्रह कां केला आहे व 'अयसो विकारः' अशा रीतीनें विग्रह कां केला नाहीं याचें कारण दीक्षित सांगतात.) 'अयसो विकारः' अशा रीतीनें विग्रह करतां येत नाहीं; कारण तसा विग्रह केल्यास, 'जानपदकुण्डगोण' सू. ५०० या सूत्रानें 'ङीष्' प्रत्यय होण्याची आपत्ति येते (व 'अयस्कुशा' असें इष्ट रूप सिद्ध न होतां, 'अयस्कुशी' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. 'जानपद' या सूत्रावरील कौमुदींत 'कुशी अयोविकारश्चेत, कुशाऽन्या' असें स्पष्ट म्हटलें आहे.) 'अयस्कर्णी' या शब्दाचा 'अयः इव कर्णौ यस्याः' असा विग्रह आहे. या स्थलीं 'नासिकोदरौष्ठ' सू. ५११ या सूत्रानें 'ङीष्' प्रत्यय झाला आहे.

शब्दरत्न---आबन्तप्रयोगसूचितमर्थं स्फुटप्रतिपत्तये आह--नत्वयस इत्यादि ॥

'अयस्कुशा' या आबन्त प्रयोगानें सूचित होणाऱ्या अर्थाचा स्पष्टपणें बोध व्हावा याकरितां 'न त्वयसो विकारः' असें मनोरमेंत म्हटलें आहे. ('कुशा' हा आबन्त शब्द यज्ञपात्र विशेषाचें नांव आहे व हें यज्ञपात्र खादिरकाष्ठाचें केलेलें असतें. 'कुशी' या ङीष्प्रत्ययान्त शब्दाचा अर्थ 'नागराचा लोखंडाचा फाळ' असा आहे व 'विकारस्त्वयसः कुशी' असा अमरपाठ आहे. सारांश लोखंडाचा फाळ असा अर्थ जेथें विवक्षित आहे तेथेंच 'कुशी' असा ङीष्प्रत्ययान्त प्रयोग करतां येतो. काष्ठ विशेषाचें तयार केलेलें यज्ञपात्र असा अर्थ जेथें विवक्षित आहे तेथें 'कुशा' या आबन्त शब्दाचाच प्रयोग करणें व्याकरणरीत्या शुद्ध ठरतें.)

मनोरमा--अधः शिरसी ।। एतयोरिति । सूत्रे तु षष्ठ्याः स्थाने प्रथमा बोद्ध्या । अधस्पदमिति । मयूरव्यंसकादित्वात्समासः शिरस्पदमिति । षष्ठीसमासः ।।

(' अधः शिरसी पदे ' सू. १६१ या सूत्राचें कौमुदींत व्याख्यान करितांना ' एतयोर्विसर्गस्य सादेशः स्यात् पदशब्दे परे ' असें म्हटलें आहे. यांत) ' एतयोः ' असा जो शब्द घातला आहे त्याचें कारण हें कीं, प्रकृत सूत्रांत षष्ठीच्या ऐवजीं प्रथमाविभक्तीचा प्रयोग केला आहे, म्हणजे ' अधः शिरसोः ' या षष्ठ्यर्थामध्यें ' अधः शिरसी ' - या प्रथमाविभक्तीचा उपयोग केला आहे. ' अधस्पदम् ' हा समास ' मयूरव्यंसकादयश्च ' सू. ७५४ या सूत्रान्वयें झाला आहे (व त्या शब्दाचा ' पदस्य अधः ' असा विग्रह आहे.) ' शिरस्पदम् ' हा षष्ठी-समास आहे (व ' शिरसः पदम् ' असा त्याचा विग्रह आहे.)

।। विसर्गसन्धिप्रकरणं समाप्तम् ।।

॥ अथ स्वादिसन्धिप्रकरणम् ॥

मनोरमा– ससजुषो रुः । पदस्येत्यनुवृत्तं ससजूर्भ्यां विशेष्यते, विशेषणेन तदन्तविधिः । न च सजूःशब्दांशे "ग्रहणवता प्रातिपदिकेन तदन्तविधिर्नास्ति" इति निषेधः शङ्क्यः । तस्य प्रत्ययविधिविषयत्वात् । सान्तं सजुष्शब्दान्तं च यत्पदं तस्य रुः स्यात् स चालोऽन्त्यस्य । एवं स्थिते फलितमाह–पदान्तस्येति । सजुष्शब्दस्येति । तदन्तस्य पदस्येत्यर्थः । तेन सजुष इत्यादौ नातिप्रसङ्गः । न च सजूरित्यत्राव्याप्तिः "व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन" इति निषेधादिति वाच्यम् । "येन विधिः" इति सूत्रे शब्दकौस्तुभेऽस्य प्रत्याख्यातत्वात् । "व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन" इति, "ग्रहणवता–" इति च परिभाषाद्वयमपि प्रत्ययविधिविषयकमिति "दिवउत्" सूत्रे कैयटहरदत्ताभ्यामुक्तत्वाच्च । एवंच परमसजूर्भ्यामित्याद्यपि निर्बाधम् । एवं स्थिते इह सजुष्शब्देन तदन्तविधिर्नेति प्राचामुक्तिरापातत इत्यवधेयम् ॥

'ससजुषो रुः' सू. १६२ (हें सूत्र 'पदस्य' या अधिकारांत पठित असल्यामुळें) या सूत्रांत 'पदस्य' हें पद अनुवृत्त होतें व त्याचें 'ससजुषः' हें विशेषण होतें आणि त्यामुळें ('येन विधिस्तदन्तस्य' सू. २६ या सूत्रानें) तदन्तविधि होतो (व 'ससजुषः पदस्य' या शब्दांचा 'सकारान्तस्य सजुष्शब्दान्तस्य च पदस्य' असा अर्थ होतो.) प्रकृत सूत्रांत 'सजुष्' हें प्रातिपदिक उच्चारलें असल्यामुळें 'ग्रहणवता प्रातिपदिकेन तदन्तविधिर्नास्ति'– परि. ३१ – या निषेधक परिभाषान्वयें 'सजुष्' शब्दाचे ठिकाणीं तदन्तविधि करतां येत नाहीं अशी शंका करणें बरोबर नाहीं; कारण जेथें प्रत्यय होण्याचें विधान केलें आहे तेथेंच ती निषेधक परिभाषा लागू पडते, म्हणजे ज्या सूत्रांत प्रातिपदिकाचें ग्रहण केलें असून त्याहून प्रत्यय होणें सांगितलें आहे तशाच सूत्रांना ती परिभाषा लागू पडते. (प्रकृत

सूत्रांत जरी 'सजुष्' या प्रातिपदिकाचें ग्रहण केलें आहे तरी त्याहून प्रत्यय होणें सांगितलें नसून त्याच्या अन्त्य वर्णाचे जागीं 'रु' हा आदेश होणें सांगितलें आहे. म्हणून प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'सजुष्' शब्दाला वरील परिभाषा लागू पडत नाहीं व त्यामुळें तदन्तविधि होतो.) ज्या पदांच्या अन्तीं सकार आहे किंवा 'सजुष्' शब्द आहे त्याचें रुत्व होतें असा प्रकृत सूत्राचा अर्थ आहे व 'अलोऽन्त्यस्य' सू. ४२ हें सूत्र असल्यामुळें, तशा पदाच्या अन्त्य वर्णाचें रुत्व होतें. असा प्रकृत सूत्राचा अर्थ होत असल्यामुळें, 'पदान्तस्य सस्य सजुष्शब्दस्य च रुः स्यात्' असें जें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे तें फलितार्थाचें, म्हणजे प्रकृत सूत्रांतील शब्दांतून निष्पन्न होणाऱ्या अर्थाचें, कथन आहे. 'सजुषशब्दस्य' असें जें कौमुदींतील वरील पंक्तींत म्हटलें आहे त्याचा 'सजुष्शब्दान्तस्य पदस्य' असा अर्थ आहे (कारण 'सजुष्' हें 'पदस्य' या अनुवृत्त-पदाचें विशेषण असल्यामुळें, 'येन विधिस्तदन्तस्य' सू. २६ या सूत्रान्वयें त्याचा 'सजुष्शब्दान्तस्य' असा अर्थ होतो.) त्यामुळें 'सजुषः' इत्यादि स्थलीं अतिप्रसङ्ग—अतिव्याप्तिरूप दोष—येत नाहीं. ('सजुष् + शस् = सजुष् + अस् = सजुषः' या स्थळीं 'सजुष्' या शब्दापुढें अजादि असर्वनामस्थान विभक्तिप्रत्यय असल्यामुळें हा शब्द पदसंज्ञक होत नसून 'यचि भम्' सू. २३१ या सूत्रानें भसंज्ञक ठरतो व त्यामुळें, त्यांतील अन्त्य षकाराचें प्रकृत सूत्रानें रुत्व होऊं शकत नाहीं.) 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन'—परि. ३२—ही निषेधक परिभाषा असल्यामुळें 'सजूः' या स्थलीं अव्याप्तिरूप दोष येतो, म्हणजे अन्त्य षकाराचें रुत्व होऊं शकत नाहीं, असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'येन विधिः' १. १. ७२ या सूत्रावरील शब्दकौस्तुभांत त्या परिभाषेचें प्रत्याख्यान केलें आहे व 'दिव उत्' ६. १. १३१ या सूत्रावरील पदमञ्जरींत हरदत्तानें (व 'इन्द्रे च' ६. १. १२४ या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तीत) कैयटानें असें म्हटलें आहे कीं, 'ग्रहणवता प्रातिपदिकेन तदन्त-

विधिर्नास्ति'–परि. ३१ –व 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन'– परि. ३२ -या दोन्ही परिभाषा प्रत्ययविधिविषयक आहेत, म्हणजे जेथें सूत्रांत प्रातिपदिकाचें ग्रहण करून त्याहून प्रत्यय होणें सांगितलें आहे अशाच ठिकाणीं त्या दोन्ही परिभाषा लागू पडतात. ('येन विधिस्तदन्तस्य' सू. १.१.७२ या सूत्रावरील शब्दकौस्तुभांत 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' या परिभाषेचें प्रत्याख्यान करितांना दीक्षितांनीं 'वस्तुतस्तु भयाढ्या-दाविव सूत्रान्ताठ्ठक्, दशान्ताड्डः इत्यादावपि विशेषणविशेष्यभावव्य-त्यासमात्रेण सिद्धे अन्तग्रहणसामर्थ्यमपि सूपपादमिति परिभाषाश्रयणं व्यर्थम्।' असें म्हटलें आहे. तसेंच 'दिव उत्' या सूत्रावरील पदमञ्जरींत हरदत्तानें 'दिवशब्देन विशेषणात्तदन्तविधिः, ग्रहणवता प्रातिपदिकेनेति तु प्रत्ययविधिविषयं, व्यपदेशिवद्भावात् केवलस्यापि भवितव्यं, व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेनेत्येतदपि प्रत्ययविधिविषय-मेव।' असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें 'इन्द्रे च' या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत कैयटानें 'इन्द्रादाविति' हें भाष्यांतील प्रतीक घेऊन 'इन्द्रशब्द आदिर्यस्य तस्मिन् परत इत्यर्थः। केवले चेन्द्रशब्दे व्यपदेशिवद्भावाद्भवति। व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेनेति तु निषेधः प्रत्ययविधिविषयः।' असें म्हटलें आहे. म्हणून जरी प्रकृत सूत्रांत 'सजुष्' या प्रातिपदिकाचें ग्रहण केलें आहे तरी या सूत्रांत प्रत्यय होणें सांगितलें नसल्यामुळें, व्यपदेशिवद्भाव करतां येतो–म्हणजे 'सजुष्' हा शब्द 'सजुष्' शब्दान्त मानतां येतो. त्यामुळें 'सजुष् + सु' या स्थितींत 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें जरी 'सु' प्रत्ययाचा लोप होतो तरी 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें 'सजुष्' शब्दाला पदसंज्ञा होते आणि जरी 'सजुष्' हें पद सजुष् शब्दान्त नसून 'सजुष्' एवढेंच पद आहे तरी 'व्यपदेशिवदेकस्मिन्' –परि. ३० –या परिभाषान्वयें तें पद व्यपदेशिवद्भावानें सजुष्शब्दान्त आहे असें मानतां येतें. येथें व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा आड येत नाहीं; कारण प्रकृत सूत्रांत 'सजुष्' शब्दाहून प्रत्यय होणें सांगितलें नसून, तो शब्द पदान्तीं असतां, त्याच्या

अंत्यवर्णाचे–षकाराचें–रुत्व होणें सांगितलें आहे. त्यामुळें प्रकृत सूत्रानें 'सजुष्' यांतील अन्त्य षकाराचें रुत्व होऊन व 'र्वोरुपधाया दीर्घ इकः' सू ४३३ या सूत्रानें 'सजुष्' यांतील 'उ' ही उपधा दीर्घ होऊन आणि 'खरवसानयोः', या सूत्रानें 'रु = र्' चा विसर्ग होऊन 'सजूः' असें रूप सिद्ध होतें.) तदन्तविधि करतां येत असल्यामुळें, 'परमसजूर्भ्याम्' इत्यादि स्थलीं देखील (अन्त्य षकाराचें रुत्व होण्यांत) कोणताहि बाध–प्रत्यवाय–येत नाहीं. ('परमसजुष्+भ्याम्' या स्थलीं 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्रान्वयें 'परमस-जुष्' हा शब्द पदसंज्ञक ठरतो व त्या पदाच्या अन्तीं 'सजुष्' हा शब्द असल्यामुळें प्रकृत सूत्रानें त्या पदांतील अन्त्य षकाराचें रुत्व होतें आणि 'र्वोरुपधायाः' या सूत्रानें उपधा दीर्घ होऊन 'परमस-जूर्भ्याम्' असें रूप सिद्ध होतें.) वर सांगितल्याप्रमाणें स्थिति असल्यामुळें, 'इह सजुष्शब्देन तदन्तविधिर्न' असें जें प्रकाशकारांनीं म्हटलें आहे तें वर वर विचार करून म्हटलें आहे, म्हणजे पूर्ण विचार न करितां त्यांनीं तसें म्हटलें असल्यामुळें त्यांचें म्हणणें वरील व्याख्यानान्वयें चूक ठरतें–हें लक्षांत ठेवावें. (कारण 'ग्रहणवता प्रातिपदिकेन तदन्तविधिर्नास्ति' ही परिभाषा वर सांगितल्याप्रमाणें प्रकृत सूत्रास लागू पडत नसल्यामुळें, 'पदस्य' या अनुवृत्त पदाचें विशेषण असणाऱ्या 'सजुष्' शब्दाहून 'येन विधिः' या सूत्रानें तदन्तविधि होण्यांत कोणताहि प्रत्यवाय येत नाहीं व त्यामुळें प्रकाश-कारांचें वरील म्हणणें चूक ठरतें हें उघड आहे.)

शब्दरत्न– तस्य प्रत्ययविधीति । अत एव "येन विधिः–" इति सूत्रे भाष्ये प्रत्ययविधिभिन्ने "अप्तृन्" इत्यादौ गृह्यमाणप्रातिपदिकेनापि तदन्तविधिप्रतिपादनं स्वसा परमस्वसेत्युदाहृतं च संगच्छते । अस्य "समासप्रत्ययविधौ––" इति निषेधानुवादकताया एव युक्तत्वाच्च । यत्त्वस्य ज्ञापकं "सपूर्वाच्च" इति सूत्रम् । अन्यथा "पूर्वादिनिः" इत्यत्र तदन्तविधिनैव सिद्धे किं तेन । तत् "प्रत्ययविधौ प्रतिषेधः" इत्यस्यैव ज्ञापकमिति वक्तुं शक्यम् । अत एव तदन्तविधिसूत्रभाष्ये

"समास--" इत्यादिनिषेधवदस्य न कथनमिति बोद्धव्यम् । प्रत्याख्यातत्वादिति। अस्याः फलाभावात् "सूत्रान्ताट्ठक्" "दशान्ताड्डः" इत्यादावन्तग्रहणसामर्थ्येन व्यपदेशिवद्भावाप्रवृत्तेरिति भावः । ननु "एकगोपूर्वात्-" इत्यस्य केवलैकशब्दगोशब्दयोरप्रवृत्त्यर्थं सा ऽऽवश्यकी "सूत्रान्तात्--" "दशान्तात्" इत्यर्थं च । तत्रान्तग्रहणं तु प्रत्ययविधौ तदन्तग्रहणनिषेधात्तदन्ते प्रवृत्त्यर्थमावश्यकमिति न तत्सामर्थ्याद् व्यपदेशिवद्भावाप्रवृत्तिर्वक्तुं शक्या । न च भयाढ्यादाविव "सूत्रान्तात्--" इत्यादौ विशेषणविशेष्यभावव्यत्यासेन सिद्धेऽन्तग्रहणसामर्थ्यं सूपपादमिति कौस्तुभोक्तरीत्या निर्वाहः "समासप्रत्ययविधौ--" इत्यादीनां सूत्रशब्दादेर्विशेष्यत्वे तात्पर्यग्राहकत्वस्य सत्त्वेन विपरीतस्य तस्य वक्तुमशक्यत्वात् । न चास्यां मानाभावः । "पूर्वात्सपूर्वादिनिः इत्येकयोगेन सिद्धे पृथग्योगकरणस्य मानत्वात् । न च "इष्टादिभ्य" इत्यत्रानुवृत्त्यर्थं तथा पाठः, अत एवानिष्टीत्यादिसिद्धिरिति वाच्यम् । ज्ञापकपरभाष्यप्रामाण्येनानिष्टीत्यादिप्रयोगाणामनिष्टत्वात् । एकयोगे ऽपि तत्रैव स्वरितत्वबलेन तावत एवोत्तरत्रानुवृत्तौ बाधकाभावाच्च । व्यपदेशिवद्भावस्य प्रातिपदिके निषेधस्वीकारादेव "नान्तादसंख्यादेः--" इति चरितार्थम् । अन्यथा पञ्चम इत्यादावपि व्यपदेशिवद्भावेन संख्यादित्वात्तद्वैयर्थ्यं स्पष्टमेवेत्यरुचेराह--व्यपदेशिद्भाव इत्यादि । दिव उत्सूत्रं यत्रेति बहुव्रीहिणा तत्सूत्रघटिते पादे इत्यर्थः । एव च "दिव उत्" इति सूत्रे हरदत्तेन "इन्द्रे च" इति सूत्रे कैयटेनोक्तमिति भावः । "येन विधिः--" इति सूत्रे कैयटेन सूत्रोपात्तान्तादिशब्दविषयतास्येति वदता स्पष्टमेव प्रत्ययविधिविषयतोक्ता । "असमासे निष्कादिभ्यः" इति सूत्रे भाष्ये कैयटे च स्पष्टमनयोः प्रत्ययविधिविषयतोक्तेति दिक् । इत्याद्यपीति । आदिना सजूर्भ्यामिति ।।

'तस्य प्रत्ययविधिविषयत्वात्,' म्हणजे ज्या सूत्रांत प्रातिपदिकांचें ग्रहण करून त्यांहून प्रत्यय होणें सांगितलें आहे. तशाच सूत्रांना 'ग्रहणवता प्रातिपदिकेन'--परि. ३१--

ही परिभाषा लागू पडते, असें मनोरमेंत म्हटलें असल्यामुळें, 'अप्तृन्' सू. २७७ इत्यादि ज्या सूत्रांत प्रत्यय होणें सांगितलें नाहीं तशा प्रत्ययविधिभिन्न सूत्रांत प्रातिपदिकांचें ग्रहण केलें असून देखील त्या प्रातिपदिकांहून तदन्तविधि करतां येतो असें जें 'येन विधिः' १.१.७२ या सूत्रावरील भाष्यांत प्रतिपादन करून 'स्वसा, परमस्वसा' हें जें उदाहरण दिलें आहे तें योग्य ठरतें. ('येन विधिः' या सूत्रावरील भाष्यांत 'महदप्स्वसृनप्तृणां दीर्घविधौ' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात– 'महदप्स्वसृनप्तृणां दीर्घविधौ प्रयोजनम् । महान् परममहान् । स्वसा स्वसारौ स्वसारः, परमस्वसा परमस्वसारौ परमस्वसारः ।' 'अप्तृन्' या सूत्रांत प्रत्यय होणें सांगितलें नसून उपधा दीर्घ होणें सांगितलें असल्यामुळें, त्या सूत्रास 'ग्रहणवता प्रातिपदिकेन' ही परिभाषा लागू पडत नाहीं व त्यामुळें त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'स्वसृ' इत्यादि प्रातिपदिकांहून तदन्तविधि करतां येतो. म्हणून 'स्वसृ+सु' या स्थलीं 'ऋदुशनस्' सू. २७६ या सूत्रानें 'स्वसृ' यांतील अन्त्य ऋकाराचे जागीं 'अनङ्=अन्' आदेश होऊन व 'अप्तृन्' सू. २७७ या सूत्रानें उपधा दीर्घ होऊन व 'हलङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लोप होऊन आणि 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें अन्त्य नकाराचा लोप होऊन ज्याप्रमाणें 'स्वसा' हें रूप सिद्ध होतें त्याचप्रमाणें स्वसृशब्दान्त 'परमस्वसृ' या शब्दाचे ठिकाणीं देखील उपधा दीर्घ इत्यादि कार्यें होऊन 'परमस्वसा' हें रूप सिद्ध होतें.) 'समास-प्रत्ययविधौ प्रतिषेधः' या वार्तिकांतील 'प्रत्ययविधौ प्रतिषेधः' या निषेधक अंशाचा अनुवाद करणारी म्हणजे तेंच सांगणारी, 'ग्रहणवता प्रातिपदिकेन' ही परिभाषा आहे असेंच मानणें योग्य आहे (व ही स्वतंत्र परिभाषा आहे असें मानूं नये.) कित्येक वैयाकरण असें म्हणतात कीं, 'सपूर्वाच्च' सू. १८८७ हें सूत्र वरील परिभाषेचें ज्ञापक आहे; कारण 'ग्रहणवता प्रातिपदि-केन' ही परिभाषा नसती तर 'पूर्वादिनिः' सू. १८८६ या सूत्रांत पठित

असलेल्या ‘ पूर्व ’ या प्रातिपदिकाहून तदन्तविधि केल्यानेंच, ‘ सपूर्वाच्च ’ या सूत्रानें सिद्ध होणारीं रूपें सिद्ध होऊं शकलीं असतीं व ‘ सपूर्वाच्च ’ हें सूत्र करण्याची कांहीं गरज नव्हती. पण हें ज्ञापक ‘ प्रत्ययविधौ तदन्तविधि प्रतिषेधः ’ या वार्तिकांशाचेंच ज्ञापक आहे असें म्हणतां येणें शक्य आहे आणि या वार्तिकांशाचाच केवळ अनुवाद करणारी ती परिभाषा असून स्वतन्त्र परिभाषा नसल्यामुळेंच, ‘ येन विधिः ’ १. १. ७२ या सूत्रावरील भाष्यांत ‘समासप्रत्ययविधौ प्रतिषेधः’ हें वार्तिक जसें पठित केलें आहे तशी ‘ ग्रहणवता प्रातिपदिकेन ’ ही परिभाषा पठित केली नाहीं हें लक्षांत ठेवावें. (जर ती स्वतन्त्र परिभाषा असती तर, भाष्यकारांनीं त्या भाष्यांत ती अवश्य पठित केली असती.) ‘व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन’ ही जी परिभाषा दीक्षितांनीं प्रत्याख्यात केली आहे त्याचें कारण हें कीं, ती परिभाषा मानल्यानें कोणतेंहि फल निष्पन्न होत नाहीं; कारण ‘सूत्रान्तात् ठक्’ सू. १२७० ‘दशान्तात् डः’ सू. १८४६ इत्यादि सूत्रांत ‘अन्त’ या शब्दाचें ग्रहण केलें असल्यामुळें, त्या शब्दाच्या सामर्थ्यानें त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या प्रातिपदिकांना, व्यपदेशिवद्भावानें ते तदन्त आहेत, असे मानतां येत नाहीं. (सारांश वरील दोन्हीं सूत्रांत ‘अन्त’ शब्दाचें ग्रहण केलें असल्यामुळें, सूत्रान्तशब्दाहूनच ‘ठक्’ प्रत्यय व दशान्तशब्दाहूनच ‘ड’ प्रत्यय होऊं शकतो; केवळ ‘सूत्र’ शब्दाहून ‘ठक्’ प्रत्यय व केवळ ‘दशन्’ शब्दाहून ‘ड’ प्रत्यय, ‘अन्त’ शब्दग्रहणसामर्थ्यामुळें, होऊंच शकत नाहींत हें उघड आहे. म्हणून ‘व्यपदेशिवद्भावो ऽप्रातिपदिकेन’ ही परिभाषा मानण्याची कांहींच आवश्यकता नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे असें शब्दरत्नकार म्हणतात. ‘येन विधिः’ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार देखील या परिभाषेसंबंधानें म्हणतात—‘सा तर्ह्येषा परिभाषा कर्तव्या ? । न कर्तव्या । आचार्यप्रवृत्तिर्ज्ञापयति व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेनेति यदयं पूर्वादिनिः सपूर्वाच्च इत्याह’।) यावर शंकाकार अशी शंका करतो कीं,

'एकगोपूर्वात् ठञ्' सू. १९२५ या सूत्रांतील 'एक' व 'गो' हे शब्द एकपूर्व व गोपूर्व न मानले जावे या करितां, 'व्यपदेशिवद्भा-वोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा मानणें आवश्यक आहे, व तसेंच 'सूत्रान्तात्' व 'दशान्तात्' इत्यादि सूत्रांत व्यपदेशिवद्भाव न व्हावा या करितां देखील ती परिभाषा मानणें आवश्यक आहे. 'सूत्रान्तात् ठक्' व 'दशान्तात् डः' या दोन सूत्रांत केलेलें 'अन्त' शब्दाचें ग्रहण अशा करितां आवश्यक आहे कीं, 'प्रत्ययविधौ तदन्तविधिप्रतिषेधः' हें तदन्तविधि प्रतिषेधक वार्तिक असल्यामुळें, ज्या शब्दाच्या अन्तीं 'सूत्र' शब्द किंवा 'दशन्' शब्द आहे अशा शब्दाहून त्या दोन सूत्रांत सांगितलेंले प्रत्यय होऊं शकले नसते ते व्हावे आणि अशा रीतीनें त्या दोन सूत्रांतील 'अन्त' शब्दाचें ग्रहण चरितार्थ ठरत असल्यामुळें, त्या शब्दाच्या सामर्थ्यानें त्या दोन सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'सूत्रान्त' व 'दशान्त' प्रातिपदिकांना व्यपदेशिवद्भाव करतां येत नाहीं असें म्हणणें शक्य नाहीं. (शंकाकार म्हणतो कीं, वरील दोन सूत्रांत 'अन्त' शब्दाचें ग्रहण केलें नसतें तर, त्या दोन सूत्रांनीं होणारे प्रत्यय 'सूत्रान्त' व 'दशान्त' शब्दाहून झाले नसते; कारण 'प्रत्ययविधौ तदन्तविधिप्रतिषेधः' असें वार्तिककारानें वार्तिक पठित केलें आहे. म्हणून 'सूत्रान्त' व 'दशान्त' शब्दाहून ते प्रत्यय व्हावे या करितां, त्या दोन्हीं सूत्रांत 'अन्त' शब्दाचें ग्रहण केलें आहे. सारांश 'अन्त' शब्दाचा उपयोग वर सांगितलेल्या कारणाकरितांच केला असल्यामुळें, त्या शब्दाच्या जोरावर, तदन्ताहूनच त्या सूत्रांनीं विहित असलेला प्रत्यय होऊं शकतो व केवलाहून तो प्रत्यय होऊं शकत नाहीं हें म्हणणें मुळींच सिद्ध होऊं शकत नाहीं; कारण 'सूत्र' व 'दशन्' हे शब्द व्यपदेशिवद्भावानें सूत्रान्त व दशान्त मानतां येऊं शकतात. ते तसे मानतां न यावे व केवलाहून त्या दोन सूत्रांत सांगितलेला प्रत्यय न व्हावा याकरितां, 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा मानणें आवश्यक आहे. त्यामुळें दीक्षितांनीं जें म्हटलें

आहे कीं, 'अन्त' शब्दाच्या सामर्थ्यामुळें 'सूत्रांन्त' व 'दशान्त' शब्दाहूनच विहित प्रत्यय होऊं शकतो व केवळ 'सूत्र' व 'दशन्' शब्दाहून तो प्रत्यय होऊं शकत नाहीं तें म्हणणें बरोबर मानतां येत नाहीं असें शंकाकाराचें म्हणणें आहे.) दीक्षितांनीं कौस्तुभांत असें म्हटलें आहे कीं, ज्या प्रमाणें ('मेघर्तिभयेषु कृञः' सू. २९६० या सूत्रांत निर्दिष्ट असलेला) 'भय' हा शब्द व तसेंच ('आढ्य-सुभग' सू. २९७३ या सूत्रांत निर्दिष्ट असलेला) 'आढ्य' हा शब्द व तसेंच सूत्रनिर्दिष्ट इतर कांहीं शब्द विशेषणें मानून ('येन विधिः' या सूत्रान्वयें भाष्यकारांनीं) तदन्तविधि केला आहे त्याच प्रमाणें, 'सूत्र' व 'दशन्' हे शब्द विशेष्य न मानतां विशेषण मानल्यानें ('येन विधिः' या सूत्रान्वयें) तदन्तविधि होऊं शकलाच असता; पण असें असून देखील ज्या अर्थी 'सूत्रान्ताठ्ठक्' व 'दशान्ताड्डः' या दोन सूत्रांत मुद्दाम 'अन्त' शब्दाचें ग्रहण केलें आहे त्या अर्थीं, 'सूत्रान्त' व 'दशान्त' शब्दाहूनच विहित प्रत्यय होऊं शकतो व तो प्रत्यय केवळ 'सूत्र' व 'दशन्' शब्दाहून होत नाहीं अशाच प्रकारें 'अन्त' शब्दाची उपपत्ति लावतां येते – म्हणजे 'अन्त' शब्दाच्या ग्रहणाचें हेंच फल आहे असें म्हणतां येतें, पण (शंकाकार म्हणतो कीं, दीक्षितांनीं शब्दकौस्तुभांत जें 'अन्त' शब्दाचें प्रयोजन सांगतांना म्हटलें आहे) तें म्हणणें बरोबर आहे असें मानतां येत नाहीं; कारण 'समासप्रत्ययविधौ प्रतिषेधः' व 'ग्रहणवता प्रातिपदिकेन तदन्तविधिर्नास्ति' या तदन्तविधिनिषेधक वचनांचें तात्पर्य हें आहे कीं, प्रत्ययविधायक सूत्रांत निर्दिष्ट असलेलीं 'सूत्र' 'दशन्' इत्यादि प्रातिपदिकें विशेष्यरूपानेंच निर्दिष्ट आहेत असेंच सिद्ध होते व त्यामुळें त्यांना विशेष्य न मानतां विशेषण मानणें अशक्य आहे. ('वस्तुतस्तु भयाढ्यादाविव सूत्रान्ताठ्ठक् दशान्ताड्डः इत्यादावपि विशेषणविशेष्यभाववत्यासमात्रेण सिद्धे अन्त-ग्रहणसामर्थ्यमपि सूपपादमिति परिभाषाश्रयणं व्यर्थम्' असें 'येन विधिः' या सूत्रावरील शब्दकौस्तुभांत दीक्षितांनीं म्हटलें आहे हें

मनोरमेंत सांगितलेंच आहे. दीक्षितांच्या म्हणण्याचें तात्पर्य हें आहे कीं, जेथें लक्ष्यानुरोधानें तदन्तविधि होणें इष्ट आहे तेथें सूत्रनिर्दिष्ट प्रातिपदिक विशेषण मानून तदन्तविधि करावा व जेथें तदन्तविधि होणें इष्ट नाहीं तेथें सूत्रनिर्दिष्ट प्रातिपदिक विशेष्य मानावें व तसें मानल्यानें तदन्तविधि होणें आपोआपच टळतें. सारांश दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, तदन्तविधिनिषेधक वचनांचें हेंच तात्पर्य आहे कीं, लक्ष्यानुरोधानें विशेषणविशेष्यभावाचा व्यत्यास करून—म्हणजे जेथें तदन्तविधि होणें इष्ट आहे तेथें सूत्रनिर्दिष्ट प्रातिपदिक विशेषण मानून व जेथें तदन्तविधि होणें इष्ट नाहीं तेथें सूत्रनिर्दिष्ट प्रातिपदिक विशेष्य मानून—इष्ट रूपांची सिद्धि करावी; कारण 'विशेषणविशेष्यभावे कामचारः' असा न्याय असल्यामुळें व 'सिद्धं तु विशेषणविशेष्ययोर्यथेष्टत्वात्' असें वार्तिक 'येन विधिः' या सूत्रावरील भाष्यांत पठित असल्यामुळें, लक्ष्यानुरोधानें तसा विशेषणविशेष्यभावव्यत्यास करण्यांत कांहीं प्रत्यवाय येत नाहीं. असें असल्यामुळेंच, 'येन विधिः' या सूत्राचीं प्रयोजनें सांगतांना, भाष्यकारांनीं त्या सूत्रावरील भाष्यांत 'उपपदविधौ भयाढ्यादिग्रहणम्' हें वार्तिक पठित केलें आहे व भाष्यकार म्हणतात—'उपपदविधौ भयाढ्यादिग्रहणं प्रयोजनम्। भयंकरः अभयंकरः। आढ्यंकरणम् स्वाढ्यंकरणम्।' 'मेघर्तिभयेषु कृञः' या सूत्रांत 'मेघ, ऋति, भय' हीं तीन उपपदें पठित आहेत. पहिल्या दोन उपपदांस तदन्तविधि होणें इष्ट नसल्यामुळें त्यांना विशेष्य मानलें आहे, व 'भय' या तृतीय उपपदास तदन्तविधि होणें इष्ट असल्यामुळें तें त्या सूत्रांत अनुवृत्त असलेल्या 'कर्मणि उपपदे' याचें विशेषण मानलें आहे. तसेंच 'आढ्यसुभग' या सूत्रांत 'आढ्य' या शब्दाला तदन्तविधि होणें इष्ट असल्यामुळें त्याला विशेषण मानलें आहे व त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या इतर प्रातिपदिकांना तदन्तविधि होणें इष्ट नसल्यामुळें तीं प्रातिपदिकें विशेष्य मानलीं आहेत व अशा रीतीनें विशेषण-

विशेष्यभावाचा व्यत्यास करण्याला वरील वार्तिक व भाष्य प्रमाण आहे. म्हणून 'सूत्राट्ठक्' असें जरी सूत्र केलें असतें तरी, 'सूत्र' हा शब्द विशेषण मानल्यानें 'सूत्रान्त' शब्दाहून 'ठक्' प्रत्यय होऊंच शकला असता. असें असून देखील ज्या अर्थी त्या सूत्रांत 'अन्त' शब्दाचें ग्रहण केलें आहे त्या अर्थी हें सिद्ध होते कीं, 'सूत्रान्त' शद्बाहूनच 'ठक्' प्रत्यय व्हावा व केवळ 'सूत्र' शद्बाहून 'ठक्' प्रत्यय होऊं नये आणि म्हणून 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा मानण्याची कांहीच गरज नाहीं असें दीक्षित म्हणतात. ह्यावर शंकाकार असें म्हणतो कीं. दीक्षितांचें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'येन विधिः' या सूत्रानें विशेषणाहूनच तदन्तविधि करतां येतो व विशेष्याहून तदन्तविधि करतां येत नाहीं. 'ग्रहणवता प्रातिपदिकेन तदन्तविधिर्नास्ति' ही परिभाषा व 'प्रत्ययविधौ तदन्तविधि प्रतिषेधः' हें वार्तिक तदन्तविधिनिषेधक असल्यामुळें व भाष्यकारांनीं सांगितल्याप्रमाणें हीं दोन्हीं प्रत्ययविधायकसूत्रांनाच लागूं पडणारीं वचनें असल्यामुळें हें सिद्ध होतें कीं, प्रत्ययविधायकसूत्रांत निर्दिष्ट असलेलीं प्रातिपदिकें विशेष्यरूपानेंच पठित आहेत, विशेषणरूपानें पठित नाहींत. जर तीं विशेषणरूपानें पठित असतीं तर, 'येन विधिः' या सूत्रानें त्यांहून तदन्तविधि करतां आला असता. पण ज्या अर्थी त्यांहून तदन्तविधि होऊं शकत नाहीं त्या अर्थी, तदन्तविधि निषेधक वचनांचें तात्पर्य हेंच मानलें पाहिजें कीं, प्रत्ययविधायक सूत्रांत निर्दिष्ट असलेलीं प्रातिपदिकें विशेष्यरूपानेंच पठित आहेत. म्हणून 'सूत्राट्ठक्' असें सूत्र केलें असतें तर, 'सूत्र' हें प्रातिपदिक विशेष्य ठरत असल्यामुळें, त्याहून तदन्तविधि होऊं शकला नसता आणि म्हणून 'सूत्रान्ताट्ठक्' असें सूत्र केलें आहे व त्या सूत्रांत 'सूत्रान्त' असें प्रातिपदिक निर्दिष्ट असल्यामुळें, केवळ 'सूत्र' या शद्बाला व्यपदेशिवद्भावानें तो 'सूत्रान्त' आहे असें मानल्यानें, त्याहून 'ठक्' प्रत्यय होण्याची जी आपत्ति येते ती टाळण्याकरितां, 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा

मानणें आवश्यक आहे. हें खरें कीं, 'विशेषणविशेष्यभावे कामचार:' या न्यायाचा उपयोग करून वार्तिककारानें प्रत्ययविधायक सूत्रांत निर्दिष्ट असलेलीं 'भय, आढ्य' इत्यादि प्रातिपदिकें विशेषण मानून त्यांहून तदन्तविधि केला आहे. पण तदन्तविधिनिषेधक वार्तिक व परिभाषा असल्यामुळें तो न्याय प्रत्ययविधायकसूत्रांत निर्दिष्ट असलेल्या वाटेल त्या प्रातिपदि-काला लावतां येत नाहीं. जेवढ्या प्रातिपदिकांना तो न्याय अपवादरूपानें वार्तिककार व भाष्यकार यांनीं लावला आहे तेवढ्याच प्रातिपदिकांना तो न्याय लावतां येतो आणि त्या न्यायाचा इतरत्र उपयोग करतां येत नाहीं, म्हणजे 'सूत्र, दशन्' इत्यादि शब्दांचे ठिकाणीं तो न्याय लावतां येत नाहीं असें शंकाकाराच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे.) 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा मान-ण्यास कांहीं प्रमाण नाहीं असें नाहीं. 'पूर्वात्सपूर्वादिनि:' असें एक सूत्र केल्यानें इष्ट रूपांची सिद्धि होऊं शकत असतां, 'पूर्वादिनि:' सू. १८८६ व 'सपूर्वाच्च' सू. १८८७ हीं जीं दोन पृथक् सूत्रें केलीं आहेत तें पृथक्सूत्रकरण ही परिभाषा मानण्यास प्रमाण आहे. ('पूर्वात्सपूर्वादिनि:' असें एकच सूत्र केलें असतें तर, ज्याच्या पूर्वी कोणता तरी शब्द आहे व अन्तीं 'पूर्व' हा शब्द आहे अशा प्राति-पदिकाहून 'इनि' प्रत्यय करावा असा त्या सूत्राचा अर्थ झाला असता व 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा न मानली तर, 'व्यपदेशिवदेकस्मिन्' या परिभाषान्वयें केवळ 'पूर्व' हा शब्द पूर्वशब्दान्त आहे असें मानल्यानें त्या 'पूर्व' शब्दाहून देखील 'इनि' प्रत्यय झालाच असता. पण तसें एकच सूत्र केलें असतें तर 'व्यपदे-शिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा मानल्यास, केवळ 'पूर्व' या प्रातिपदिकाहून 'इनि'प्रत्यय होऊं शकला नसता. परंतु 'पूर्व' या प्रातिपदिकाहून देखील 'इनि' प्रत्यय होणें इष्ट असल्यामुळें, पाणि-नीला दोन पृथक् सूत्रें, वर सांगितल्याप्रमाणें, करावीं लागलीं व अशा रीतीनें पृथक् पठित केलेलीं तीं दोन सूत्रें 'व्यपदेशिवद्भावोऽप्राति-

पदिकेन' या परिभाषेचें ज्ञापक ठरतात असें शंकाकाराचें म्हणणें आहे व त्याच्या म्हणण्यास 'येन विधिः' १-१-७२ या सूत्रावरील भाष्य देखील प्रमाण आहे. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात– 'आचार्यप्रवृत्तिर्ज्ञापयति । व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेनेति यदयं पूर्वादिनिः सपूर्वाच्च इत्याह । नैतदस्ति ज्ञापकम् । अस्ति ह्यन्यदेतस्य वचने प्रयोजनम् । किम् ? । सपूर्वात्पूर्वादिनिं वक्ष्यामीति । यत्तर्हि योगविभागं करोति । इतरथा हि पूर्वात्सपूर्वादिनिरित्येव ब्रूयात् ।' या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, भाष्यकारांनीं वरील परिभाषा स्वीकारली असून वरील दोन सूत्रांचें पृथक्करण त्या परिभाषेचें ज्ञापक मानलें आहे.) 'इष्टादिभ्यश्च' सू. १८८८ या उत्तर सूत्रांत 'सपूर्वाच्च' या पूर्व सूत्राची अनुवृत्ति व्हावी याकरितां पाणिनीनें ('पूर्वात्सपूर्वादिनिः' असें एक सूत्र न करितां 'पूर्वादिनिः, सपूर्वाच्च' अशीं) दोन पृथक् सूत्रें मुद्दाम पठित केलीं आहेत आणि 'इष्टादिभ्यः' या उत्तर सूत्रांत 'सपूर्वाच्च' या पूर्व सूत्राची अनुवृत्ति होत असल्यामुळेंच 'अनिष्टी' इत्यादि रूपें सिद्ध होतात असें कोणी म्हटल्यास, (त्यावर शंकाकार असें उत्तर देतो कीं,) हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण ज्या भाष्यांत हीं दोन पृथक् सूत्रें वरील परिभाषेचें ज्ञापक मानलीं आहेत त्या ज्ञापकपर भाष्याच्या आधारें हें स्पष्ट होतें कीं, 'अनिष्टी' इत्यादि रूपांची सिद्धि होणें इष्ट नाहीं. (प्रतिशंकाकाराचें असें म्हणणें आहे कीं, पाणिनीनें एकच सूत्र पठित न करितां दोन पृथक् सूत्रें अशाकरितां पठित केलीं आहेत कीं, 'इष्टादिभ्यः' या पुढील सूत्रांत 'सपूर्वाच्च' या पूर्व सूत्राची अनुवृत्ति व्हावी व ज्यांच्या पूर्वीं इतर शब्द आहे अशा इष्टादिशब्दान्ताहून 'इनि' प्रत्यय होऊन 'अनिष्टी' इत्यादि रूपें सिद्ध व्हावीं आणि अशा रीतीनें त्या दोन सूत्रांचें पृथक्करण सप्रयोजनक व चरितार्थ ठरत असल्यामुळें, तें पृथक्करण वरील परिभाषेचें ज्ञापक मानतां येत नाहीं. या प्रतिशंकेवर शंकाकार असें उत्तर देतो कीं, भाष्यकारांनीं वरील दोन सूत्रें वरील परिभाषेचें ज्ञापक

मानलीं असल्यामुळें, 'इष्टादिभ्यश्च' या सूत्रांत 'सपूर्वाच्च' या सूत्राची अनुवृत्ति व्हावी याकरितां दोन पृथक् सूत्रें पाणिनीनें केलीं आहेत असें मानल्यास, भाष्यकारांचें ज्ञापकपर भाष्य चूक ठरण्याची आपत्ति येते. म्हणून तें भाष्य सुसङ्गत ठरण्याकरितां वरील परिभाषा मानणें आवश्यक आहे. ती परिभाषा मानल्यानें 'अनिष्टी' इत्यादि रूपें अशुद्ध ठरतात हें उघड आहे; कारण 'इष्टादिभ्यश्च' या सूत्रांत 'सपूर्वाच्च' या सूत्राची अनुवृत्ति होत नाहीं असें मानलें असतां, त्या सूत्रान्वयें 'इष्ट' इत्यादि प्रातिपदिकांहून 'इनि' प्रत्यय होऊं शकतो व 'ग्रहणवता प्रातिपदिकेन' ही परिभाषा असल्यामुळें, तदन्तविधि होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'अनिष्ट' इत्यादि शब्दांहून 'इनि' प्रत्यय करतां येत नाहीं. दुसरें असें कीं, पाणिनीनें दोन पृथक् सूत्रें न करितां 'पूर्वात्सपूर्वादिनिः' असें) एकच सूत्र केलें असतें तरीं, त्या सूत्रांतील 'सपूर्वात्' एवढाच भाग स्वरित केल्यानें त्या स्वरितत्वाच्या सामर्थ्यानें ('स्वरितेनाधिकारः' सू. ४६ या सूत्रान्वयें 'इष्टादिभ्यश्च' या) उत्तर सूत्रांत तेवढ्याच स्वरित पदाची अनुवृत्ति करण्यांत कोणताहि बाध आला नसता. (म्हणून उत्तर सूत्रांत अनुवृत्ति करण्याकरितां पाणिनीनें दोन पृथक् सूत्रें केलीं आहेत असें मुळींच मानतां येत नाही. 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा असल्यामुळेंच, पाणिनीला तशीं दोन पृथक् सूत्रें करावीं लागलीं व अशा रीतीनें तीं दोन पृथक् सूत्रें त्या परिभाषेचे ज्ञापक ठरतात असें शंकाकाराचें म्हणणें आहे. तो पुढें असें म्हणतो कीं,) प्रत्ययविधायक सूत्रांत सूत्रनिर्दिष्ट प्रातिपदिकाचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव होण्याचा प्रतिषेध केला असल्यामुळेंच, 'नान्तादसङ्ख्यादेर्मट्' सू. १८५० हें सूत्र चरितार्थ ठरतें. अशा ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव होऊं शकला असता तर, 'पञ्चमः' इत्यादि स्थलीं 'पञ्चन्' इत्यादि नकारान्त संख्यावाचक शब्द व्यपदेशिवद्भावानें संख्यादि आहेत असें मानतां आले असतेंच व तें सूत्र व्यर्थ ठरलें असतें हें उघड आहे. ('नान्तादसङ्ख्यादेर्मट्'

या सूत्राचा असा अर्थ आहे कीं, संख्यावाचक नकारान्त शब्दापूर्वी संख्यावाचक शब्द नसल्यास, 'तस्य पूरणे डट्' सू. १८४९ या सूत्रानें होणाऱ्या 'डट्' प्रत्ययाला 'मट्' आगम होतो. अशा ठिकाणीं जर 'व्यपदेशिवदेकस्मिन्' ही परिभाषा प्रवृत्त केली तर, 'पञ्चन्' इत्यादि नकारान्त संख्यावाचक शब्द देखील व्यपदेशिवद्भावानें संख्यादि आहेत असें मानतां येऊं शकतें. त्यामुळें 'नान्तादसङ्ख्यादेर्मट्' हें सूत्र प्रवृत्त होण्यास कोणतेंहि उदाहरण मिळणें अशक्य असल्यामुळें, तें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. परंतु 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा असल्यामुळें अशा ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत नाहीं व 'पञ्चन्' शब्दाहून मडागमसहित 'डट्' प्रत्यय करतेवेळीं तो शब्द संख्यादि आहे असें व्यपदेशिवद्भावानें मानतां येत नाहीं आणि त्यामुळें 'नान्तादसङ्ख्यादेर्मट्' हें सूत्र चरितार्थ ठरतें. 'ननु एकगोपूर्वात्… तद्वैयर्थ्यं स्पष्टमेव' येथपर्यंत शंकाग्रन्थ आहे हें लक्षांत ठेवावें, आणि जरी दीक्षितांनीं 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा मानण्याची कांहीं गरज नाहीं असें पूर्वी मनोरमेंत म्हटलें आहे तरी, वरील शंकाग्रन्थांत केलेलें प्रतिपादन यथार्थ आहे हें जाणून व ही) अरुचि मनांत धरूनच दीक्षितांनीं मनोरमेच्या पुढील पंक्तींत 'परिभाषाद्वयमपि प्रत्ययविधिविषयकम्' असें म्हटलें आहे. (दीक्षितांनीं 'सान्तं सजुष्शब्दान्तं च यत्पदं तस्य रुः स्यात्, स चालोऽन्त्यस्य' असा प्रकृत सूत्राचा मनोरमेंत अर्थ केला आहे. केवळ 'सजुष्' हा शब्द सजुष्शब्दान्त नसल्यामुळें, म्हणजे त्या शब्दापूर्वी 'परम' इत्यादि कोणताहि शब्द नसल्यामुळें, वरील अर्थान्वयें त्या शब्दाच्या अन्त्य षकाराचें रुत्व न होण्याची आपत्ति येते. पण 'व्यपदेशिवदेकस्मिन्' या परिभाषान्वयें तो शब्द व्यपदेशिवद्भावानें सजुष्शब्दान्त मानतां येत असल्यामुळें, वरील आपत्ति टळते. यावर शंकाकारानें असें म्हटलें आहे कीं, 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा असल्यामुळें प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेला 'सजुष्' शब्द सजुष्शब्दान्त मानतां

येत नाहीं. या शंकेवर दीक्षितांनीं असें उत्तर दिलें आहे कीं, ती परिभाषा मानण्याची कांहीच गरज नाहीं असें त्यांनीं शब्दकौस्तुभांत सिद्ध करून दाखविलें आहे व तिचें प्रत्याख्यान केलें आहे. म्हणून ती परिभाषा न मानल्यानें व्यपदेशिवद्भाव करतां येतो व केवळ 'सजुष्' शब्द देखील व्यपदेशिवद्भावानें सजुष्शब्दान्त मानतां येतो. यावर शंकाकाराचें असें म्हणणें आहे कीं, भाष्यकारांनीं ती परिभाषा प्रत्याख्यात केली नसून स्वीकारली आहे व ती परिभाषा न मानल्यास 'नान्तादसङ्ख्यादेर्मट्' हें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. म्हणून दीक्षितांनीं त्या परिभाषेचें केलेलें प्रत्याख्यान भाष्यविरुद्ध ठरत असल्यामुळें बरोबर मानतां येत नाहीं व ती परिभाषा मानणें आवश्यक आहे. शंकाकाराची ही शंका यथार्थ मानून दीक्षित असें उत्तर देतात कीं, ती परिभाषा स्वीकारल्यानें देखील कोणताहि दोष येत नाहीं; कारण प्रत्ययाचें विधान करणाऱ्या सूत्रांनाच ती परिभाषा लागू पडते असें भाष्यकारादिकांनीं म्हटलें असल्यामुळें व प्रकृत सूत्रांत प्रत्ययाचें विधान केलें नसून अन्त्य वर्णाचे जागीं 'रु' हा आदेश होण्याचें विधान केलें असल्यामुळें, प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'सजुष्' शब्दाहून व्यपदेशिवद्भाव करण्यांत व 'सजुष्' हा शब्द सजुष्शब्दान्त मानण्यांत कोणताहि बाध – प्रत्यवाय – येत नाहीं.) मनोरमेंत 'दिव उत्सूत्रे कैयटहरदत्ताभ्यामुक्तत्वाच्च' असें जें म्हटलें आहे त्या पंक्तींतील 'दिव उत्सूत्रे' हीं पदें 'दिव उत्सूत्रं यस्मिन् पादे तत्सूत्रघटितपादे' अशा अर्थाच्या बहुव्रीहिसमासाचीं वाचक पदें आहेत व तसा समास मानल्यानें असा अर्थ होतो कीं, 'दिव उत्' या सूत्रावरील वृत्तींत हरदत्तानें व तें सूत्र ज्या पादांत पठित आहे त्या पादांत पठित असलेल्या 'इन्द्रे च' या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत कैयटानें 'परिभाषाद्वयमपि प्रत्ययविधिविषयकम्' असें म्हटलें आहे. (वास्तविक हरदत्तानें 'दिव उत्' ६-१-१३१ या सूत्रावरील वृत्तींत वरील दोन्ही परिभाषा प्रत्ययविधिविषयक आहेत असें म्हटलें आहे. कैयटानें देखील त्या दोन्ही परिभाषा – म्हणजे

'ग्रहणवता प्रातिपदिकेन तदन्तविधिर्नास्ति' व 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' या दोन्ही परिभाषा– प्रत्ययविधिविषयकच आहेत असें जरी म्हटलें आहे तरी तें 'दिव उत्' या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत म्हटलें नसून 'इन्द्रे च' ६. १. १२४ या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत म्हटलें आहे. म्हणून शब्दरत्नकारांनीं आपाततः चूक दिसणाऱ्या दीक्षितांच्या म्हणण्याचें समर्थन करण्याकरितां 'दिव उत्सूत्रे' हा शब्दसमुदाय बहुव्रीहिसमास मानून त्याचा वर सांगितल्याप्रमाणें विग्रह केला आहे.) जेथें सूत्रांत 'अन्त' इत्यादि शब्दांचें ग्रहण केलें आहे तेथेंच 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' ही परिभाषा लागू पडते असें कैयटानें 'येन विधिः' १. १. ७२ या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत म्हटलें असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, ही परिभाषा प्रत्ययविधायक सूत्रांनाच लागू पडते. (त्या भाष्याच्या वृत्तींत कैयटानें 'अप्रातिपदिकेनेति तु निषेधो यत्राऽन्तग्रहणं सूत्रे एवोपात्तं तत्र । यथा दशान्ताड्डः' असें म्हटलें आहे. यावर उद्योतकारांनीं 'यत्राऽन्तेन्यन्तग्रहणमुपलक्षणम्,' म्हणजे वरील पंक्तींत कैयटानें वापरलेला 'अन्त' हा शब्द उपलक्षणार्थक असून त्या शब्दानें 'पूर्व' इत्यादि अवयववाचक शब्दांचें देखील ग्रहण होतें. सारांश ज्या सूत्रांत प्रातिपदिकाचें ग्रहण केलें असून त्या प्रातिपदिकान्ताहून किंवा प्रातिपदिकपूर्वाहून प्रत्यय होणें सांगितलें असेल तेथेंच वरील परिभाषा प्रवृत्त होते व भावप्रकाशकारांनीं 'प्रत्ययविध्यन्यत्र तेषामभावात्' असें जें म्हटलें आहे त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, अशा रीतीचें ग्रहण प्रत्ययविधायक सूत्रांतच सांपडतें. त्यामुळें, ही परिभाषा प्रत्ययविधायक सूत्रांनाच लागू पडते हें उघड होतें.) 'असमासे निष्कादिभ्यः' ५. १. २० या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं व तसेंच त्या भाष्याच्या वृत्तींत कैयटानें स्पष्ट म्हटलें आहे कीं, 'ग्रहणवता प्रातिपदिकेन' व 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' या दोन्ही परिभाषा प्रत्ययविधायक सूत्रांनाच लागू पडतात. (त्या सूत्रावरील भाष्यांत 'आर्हादगोपुच्छसङ्ख्यापरिमाणात् ठक्'

सू. १६८१ या सूत्रान्वयें 'गोपुच्छ' या शब्दाहून 'ठक्' प्रत्यय होण्याचा प्रतिषेध केला असल्यामुळें तो प्रतिषेध 'परमगोपुच्छ' या गोपुच्छान्त शब्दास लागू पडतो किंवा नाहीं असा प्रश्न उपस्थित करून त्या प्रश्नाचें भाष्यकारांनीं असें उत्तर दिलें आहे कीं, 'विधौ प्रतिषेधः, प्रतिषेधश्चायम्' म्हणजे प्रत्ययविधायक सूत्रांच्या विषयांतच तदन्तविधि होण्याचा निषेध केला आहे, परंतु 'आर्हाद-गोपुच्छ' या सूत्रांत 'गोपुच्छ' इत्यादि शब्दांहून प्रत्यय होणें सांगितलें नसून त्या शद्वांहून 'ठक्' प्रत्यय होण्याचा प्रतिषेध केला असल्यामुळें, अशा प्रत्ययप्रतिषेधक सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या प्रातिपदिकाहून तदन्तविधि करतां येतो व त्यामुळें 'परमगोपुच्छ' या शब्दाहून देखील 'ठक्' प्रत्यय होऊं शकत नाहीं व 'ठञ्' प्रत्ययच होतो. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, वरील दोन्ही परिभाषा प्रत्ययप्रतिषेधक सूत्रांना लागू पडत नसून प्रत्ययविधायक सूत्रांनाच लागू पडतात. त्या भाष्यावरील वृत्तींत कैयटानें 'पूर्वादिनिः सपूर्वाच्चेति प्रत्ययविधौ ग्रहणवतेत्येतस्याः परिभाषाया ज्ञापितत्वाद्य-त्रैव प्रत्ययो विधीयते तत्रैवानया तदन्तविधिः प्रतिषिध्यते । अगोपुच्छसङ्ख्यापरिमाणादित्यनेन तु ठक् प्रतिषिध्यते इति न तदन्त-विधिप्रतिषेधो, नापि व्यपदेशिवद्भावप्रतिषेधः' असें स्पष्ट म्हटलें आहे.) 'एवंच परमसजूर्भ्यामित्याद्यपि निर्बाधम्' या मनोरमेच्या पंक्तींतील 'आदि' या शद्वानें 'सजूर्भ्याम्' या रूपाचें ग्रहण होतें. ('ससजुषो रुः' या प्रकृत सूत्रांत 'पदस्य' या अनुवृत्त असलेल्या पदाचें 'सजुषः' हें विशेषण असल्यामुळें, त्याचा 'येन विधिः' सू. २६ या सूत्रान्वयें 'सजुष्शद्वान्तस्य' असा अर्थ होतो. 'सजुष्' हा शब्द जरी सजुष्शद्वान्त नाहीं तरी व्यपदेशिवद्भावानें तो शद्व सजुष्शद्वान्त आहे असें मानतां येतें व येथें 'व्यपदेशिवद्भावोऽ प्रातिपदिकेन' ही परिभाषा लागू पडत नाहीं; कारण प्रकृत सूत्र प्रत्ययविधायक सूत्र नसून आदेशविधायक सूत्र आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. म्हणून 'सजुष् + भ्याम्' या स्थलीं 'सजुष्'

याला 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्रानें पदसंज्ञा होत असल्यामुळें, 'सजुष्' यांतील अन्त्य षकाराचें रुत्व होऊन व पूर्वी मनोरमेंत सांगितल्याप्रमाणें उपधा दीर्घ होऊन 'सजूर्भ्याम्' हें रूप सिद्ध होतें. प्रकृत सूत्रावरील शब्दरत्नांत परिभाषा ३०, ३१, ३२ या तीन परिभाषासंबंधानें बरीच चर्चा केली आहे. परिभाषेन्दु-शेखराच्या मराठी भाषान्तरांत या तीन परिभाषांचें जें विस्तृत विवरण केलें आहे तें वाचल्यास शब्दरत्नांतील वर केलेली चर्चा उत्तम रीतीनें ध्यानांत येईल.)

मनोरमा– "भोभगो ।। असन्धिः सौत्र इति । भगोअघोशब्द-योरोकारस्याकारस्य च पूर्वरूपं सौत्रत्वान्नेत्यर्थः । यदि तु भोस्, भगोस्, अघोस्, इति सान्तं रान्तं वा अनुकृत्य भो इत्यादीनां त्रयाणामलोऽन्त्यस्य यः स्यादपूर्वस्य रोश्चेति व्याख्यायते, तर्हि असन्धि-र्न्याय्य एव । युक्तं चैतत् । अन्यथा बिभोरिदं, सुप्रभा गौर्यस्य स सुप्रभगुस्तस्य सुप्रभगोरिदं रघोरिदमित्यत्रापि यत्वापत्तेः । भवति ह्ययं भोशब्दादिपूर्वो रुः । न चात्र भोशब्दादेर्लाक्षणिकत्वादग्रहणम् । "विभाषा भवद्भगवदघवतामोच्चावस्य" इति वार्तिकेन निष्पन्नानां भवदादिप्रकृतिकानां भोशब्दादीनामपि लाक्षणिकत्वाविशेषात् । अनर्थकत्वमप्युभयत्र तुल्यम् । रुविशिष्टानामेवार्थवत्त्वात् । ननु रोरुकारस्यानुबन्धत्वाद्रेफमात्रं विसर्गस्य स्थानि तथा च "अनल्विधौ" इति स्थानिवद्भावो न स्यादित्याशङ्क्याह––न ह्ययमिति । यथाऽग्रहीदित्यत्र "ग्रहो ऽलिटि इति दीर्घस्य स्थानिवद्भावेनेट्त्वात् "इट ईटि" इति प्रवर्त्तते । एवमिहापि विसर्गस्य रुत्वाद्यत्वं प्रवर्ततेति भावः । तथा च स्थानिवत्सूत्रे भाष्यम् "विशिष्टं ह्येषोऽनलमाश्रयते इटं नाम" इति । इतोऽपि हेतोर्धात्वङ्गेत्यादिपरिगणनम-शुद्धमित्यवधेयम् ।

'भोभगोअघोअपूर्वस्य योऽशि' सू. १६७ या सूत्रावरील कौमुदींत 'असन्धिः सौत्रः' असें जें म्हटलें आहे त्याचा अर्थ हा

आहे कीं, (लुक् पावलेल्या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाला मानून पदसंज्ञक असलेल्या एङन्त) 'भगो, अघो' या दोन शद्बांतील ओकार व त्यांच्या पुढील अकार यांचा (एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें) जो पूर्वरूप सन्धि पावला होता तो; सौत्रप्रयोग असल्या-मुळें, केला नाहीं. ('भोभगोअघोअपूर्वस्य' हा एक सामासिक शद्ब आहे व 'नित्या समासे' या वचनान्वयें समासांत सन्धिकार्य नित्य होणें सांगितलें असल्यामुळें, येथें वर सांगितल्याप्रमाणें पावलेला पूर्वरूप सन्धि करावयास पाहिजे होता व 'भोभगोऽघोऽपूर्वस्य योऽशि' असें पाणिनीनें प्रकृत सूत्र पठित करावयास पाहिजे होतें. परंतु 'छन्दोवत्सूत्राणि भवन्ति' असें भाष्यवचन असून 'सर्वे विधयश्छन्दसि विकल्प्यन्तें'–परि. ३५–अशी परिभाषा असल्यामुळें, येथें पूर्वरूप सन्धि केला नाहीं. प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'भोस्, भगोस्, अघोस् इति सकारान्ता निपाताः' असें दीक्षितांनीं म्हटलें असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेले 'भो, भगो, अघो' हे ओकारान्त शब्द निपात नसून त्या सान्त निपातांच्या किंवा 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें त्यांच्या अन्त्य सकाराचें रुत्व केलें असतां रान्त होणाऱ्या त्या निपातांच्या एकदेशांचे अनुकरण करणारे ओकारान्त शब्द आहेत. सारांश दीक्षितांनीं कौमुदींत ओकारान्तानुकरण पक्ष मानला आहे आणि त्यामुळेंच त्यानीं कौमुदींत 'असन्धिः सौत्रः' असें म्हटलें आहे. पण ते आता मनोरमेच्या पुढील पंक्तींत असें म्हणतात कीं, हा ओकारान्तानुकरण पक्ष न मानतां) 'भोस्, भगोस् अघोस्' या सान्त किंवा वर सांगितल्याप्रमाणें कृतरान्त निपातांचें अनुकरण कर-णारे प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेले 'भो, भगो, अघो' हे शब्द आहेत असें मानलें, म्हणजे सान्तानुकरण पक्ष किंवा रान्तानुकरण पक्ष मानला, आणि त्या सान्त किंवा कृतरान्त शब्दांतील अन्त्य अलाचें यत्व होतें व तसेंच 'अ' वर्ण पूर्वी आहे ज्याच्या अशा 'रु'चें यत्व होतें असें प्रकृत सूत्राचें व्याख्यान केलें तर, प्रकृत सूत्रांत जें पूर्वरूप

सन्धिकार्य केलें नाहीं तेंच योग्य ठरतें. (ओकारान्तानुकरण पक्ष मानल्यानें 'एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें ज्या पूर्वरूप सन्धिकार्याची अवश्य प्राप्ति होते तें सन्धिकार्य पाणिनीनें केलें नाहीं व सन्धिशास्त्राचें उल्लंघन केलें असा पाणिनीवर दोष येतो व त्या दोषाचें निवारण करण्याकरितां 'असन्धिः सौत्रः' अशी कल्पना करून कसें तरी समाधान करून घ्यावें लागतें. पण प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेले 'भो, भगो, अघो' हे शब्द वरील तीन सान्त किंवा कृतरान्त निपातांचेंच अनुकरण करणारे शब्द आहेत असा पक्ष मानल्यास, 'भोस्, भगोस्, अघोस्' यांच्या अन्त्य सकाराचे जागीं व कृतरान्त शब्दांतील अन्त्य रेफाचे जागीं प्रकृत सूत्रान्वयें यकारादेश केल्यावर 'ओतो गार्ग्यस्य' सू. १६९ या त्रैपादिक सूत्रानें त्या यकाराचा जो लोप होतो तो 'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ या सूत्रान्वयें 'एङः पदान्तादति' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें, सन्धिकार्य करतेवेळीं तो यकार विद्यमानच आहे असें मानणें भाग पडतें व त्यामुळें पूर्वरूप सन्धीची प्राप्तीच होत नाहीं व पाणिनीनें जें पूर्व-रूप सन्धिकार्य केलें नाहीं तें अगदीं योग्य ठरतें आणि पाणिनीवर सन्धिशास्त्राचें उल्लंघन करण्याचा जो दोष येऊं पाहत होता त्या दोषाचें सहज रीतीनें निवारण होतें. मात्र या दोन सान्त व रान्त पक्षांत 'भोभगोअघोअपूर्वस्य' एवढा एक सामासिक शब्द न मानतां, 'अपूर्वस्य' असा एक सामासिक शब्द मानून, 'भोभगो-अघो' असा वेगळा षष्ठ्यन्त सामासिक शब्द मानावा व शब्दरत्नांत सांगितल्याप्रमाणें त्या सामासिक शब्दापुढील षष्ठीच्या प्रत्ययाचा सौत्र लूक् झाला आहे असें समजावें.) आणि असेंच मानणें योग्य आहे. असें न मानल्यास, म्हणजे सान्त किंवा कृतरान्त अनुकरणपक्ष न मानल्यास व प्रकृत सूत्राचा वर प्रमाणें अर्थ न केल्यास, 'विभोरिद्, सुप्रभा गौर्यस्य स सुप्रभगुस्तस्य सुप्रभगोरिदम्' व 'रघोरिदम्' या तीन्ही उदाहरणांत देखील 'रु' चें यत्व होण्याची आपत्ति येते. या वरील तीन्ही उदाहरणांत 'रु' च्या पूर्वी 'भो, भगो,

अघो' हे शब्द आहेत. या तीन्ही उदाहरणांत ('विभु, सुप्रभगु, रघु' या घिसंज्ञक प्रातिपदिकांहून षष्ठीच्या एकवचनाचा 'ङस्=अस्' प्रत्यय केला असतां, 'घेर्ङिति' सू. २४५ या सूत्रानें अन्त्य उकाराचा गुण होऊन व 'ङसिङसोश्च' सू. २४६ या सूत्रानें पूर्वरूप एकादेश होऊन सिद्ध झालेल्या रूपांचे एकादेश) 'भो, भगो, अघो' हे शब्द लाक्षणिक असल्यामुळें, (प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या शब्दांनीं) त्यांचें ग्रहण होऊं शकत नाहीं असें देखील म्हणतां येत नाहीं; कारण 'विभाषा भवद्भगवदघवतामोच्चावस्य' या वार्तिकान्वयें 'भवत्' इत्यादि प्रकृतींहून सिद्ध झालेले 'भोर्, भगोर्, अघोर्' हे शब्द देखील वरील तीन उदाहरणांतील शब्दांसारखेच लाक्षणिक आहेत व वरील दोन्ही स्थलीं 'भो, भगो, अघो' हे शब्द अर्थवान् नसून अर्थरहितच आहेत; कारण 'रु' विशिष्ट—'रु'—युक्त—ते शब्दच अर्थवान् आहेत. (वरील वार्तिकाचा अर्थ असा आहे कीं, 'भवत्, भगवत्, अघवत्' या शब्दांपुढें संबुद्धीचा प्रत्यय आल्यास, त्यांच्या अन्त्य वर्णाचे जागीं 'रु' असा आदेश व त्या शब्दांतील 'अव' चे जागीं 'ओ' असा आदेश विकल्पेंकरून होतो. त्यामुळें या तीन शब्दांचे 'भोर्, भगोर्, अघोर्' असें संबुद्धीचें रूपान्तर होतें. जसे मनोरमेंत दिलेल्या तीन उदाहरणांतील 'भो, भगो, अघो' हे मूळचे शब्द नसून वर सांगितल्याप्रमाणें लाक्षणिक आहेत तसेच वार्तिकनिष्पन्न शब्द देखील मूळचे 'भो, भगो अघो' असे शब्द नसून 'भवत्' इत्यादि प्रकृतींच्या अन्त्य वर्णाचें रुत्व होऊन व 'अव' चे जागीं ओकार होऊन सिद्ध झालेले लाक्षणिकच शब्द आहेत. या दोन्ही स्थलीं 'विभोर्, सुप्रभगोर्, रघोर्, भोर्, भगोर्, अघोर्' हे 'रु' विशिष्ट शब्दच अर्थवान् असून त्या शब्दांचे एकदेश 'भो, भगो, अघो' हे सारखेच अर्थरहित आहेत. म्हणून सान्त किंवा कृतरान्त 'भोस्, भगोस्, अघोस्' या शब्दांचे प्रकृत सूत्रांत अनुकरण केलें नसून 'भो, भगो, अघो' या अनर्थक एकदेशांचें ग्रहण केलें आहे असा ओकारान्तानुकरण पक्ष मानला तर, मनोरमेंत

दिलेल्या तीन उदाहरणांतील 'भो, भगो, अघो' या एकदेशांच्या पुढें पदान्त सकाराचे जागीं झालेला 'रु' असल्यामुळें, प्रकृत सूत्रान्वयें त्या 'रु' चें यत्व होण्याची व तसे इष्ट प्रयोग सिद्ध न होण्याची आपत्ति येते. या सूत्रनिर्दिष्ट अर्थरहित शब्दांनीं मनोरमेंत दिलेल्या वरील तीन उदाहरणांतील अनर्थक एकदेशांचें ग्रहण होऊं शकत नाहीं पण वार्तिकनिष्पन्न शब्दांतील अनर्थक एकदेशांचें ग्रहण होऊं शकतें असा भेद मानण्यास कोणताहि आधार नाहीं. दोन्ही प्रकारचे शब्द लाक्षणिक असून त्या दोहोंचे एकदेश 'भो, भगो, अघो' हे सारखेच अर्थरहित असल्यामुळें, सूत्रनिर्दिष्ट शब्दानीं एक तर त्या दोहोंचेंहि ग्रहण होऊं नये, किंवा वार्तिकनिष्पन्न शब्दांतील एकदेशांचें ग्रहण केल्यास, मनोरमेंत दिलेल्या तीन उदाहरणांतील एकदेशांचें देखील ग्रहण करणें भाग आहे. दुसरें असें कीं, सूत्रनिर्दिष्ट 'भो, भगो, अघो' हे शब्द ओकारान्तानुकरण पक्षांत अनर्थक आहेत असें वर सांगितल्याप्रमाणें मानलें असल्यामुळें, या पक्षांत 'अर्थवद्-ग्रहणे नानर्थकस्य'–परि. १४–ही परिभाषा लागू पडत नाहीं व त्यामुळें सूत्रनिर्दिष्ट अर्थरहित शब्दांनीं मनोरमेंत दिलेल्या तीन उदाहरणांतील अनर्थक एकदेशांचें ग्रहण करण्यांत कोणताहि प्रत्यवाय येत नाहीं. म्हणून या ओकारान्तानुकरण पक्षांत त्यांचें ग्रहण टाळतां येणें अशक्य असल्यामुळें वर दाखविलेली आपत्ति येते आणि ती आपत्ति टाळण्याकरितां ओकारान्तानुकरण पक्ष न मानतां, सान्त किंवा रान्त अनुकरण पक्ष मानणेंच उचित आहे. या द्वितीय पक्षांत 'भोस्, भगोस्, अघोस्' या अर्थवान् सान्त किंवा कृतरान्त निपातांचे सूत्रनिर्दिष्ट 'भो भगो, अघो' हे शब्द अनुकरण आहेत असें मानलें असल्यामुळें, ते सूत्रनिर्दिष्ट शब्द 'प्रकृति-वदनुकरणं भवति'–परि. ३६–या परिभाषान्वयें अर्थवान् ठरतात आणि अर्थवद्ग्रहणपरिभाषान्वयें तशा सूत्रनिर्दिष्ट अर्थवान् शब्दांनीं मनोरमेंत दिलेल्या तीन उदाहरणांतील अनर्थक एकदेशांचें ग्रहण करतां येत नाहीं व अशा रीतीनें वर दाखविलेली आपत्ति टळते.

वार्तिकनिष्पन्न 'भोर्, भगोर्, अघोर्' हे संबुद्धयन्त शब्द अर्थवान् असल्यामुळें, सूत्रनिर्दिष्ट कृतरान्त संबोधनार्थक निपातांनीं त्यांचें ग्रहण करतां येते; कारण दोहोंत स्वरुपसादृश्य व अर्थसादृश्य आहे. वार्तिकनिष्पन्न शब्द जरी लाक्षणिक आहेत तरी लक्षण-प्रतिपदोक्तपरिभाषा–परि. ११४–अनित्य असल्यामुळें, सूत्रनिर्दिष्ट अर्थवान् शब्दांनीं त्यांचें ग्रहण करतां येते हें मनोरमेंत पुढें सांगण्यांत येईल. आतां पुढील पंक्तीचें विवरण करूं. 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें पदान्तीं असलेल्या सकाराचे जागीं जो 'रु' आदेश होतो त्या) 'रु' तील उकार हा अनुबन्ध–म्हणजे 'इत्'वर्ण–असल्यामुळें ('देवाः सन्ति' या उदाहरणांत 'खरवसानयोर्विसर्जनीयः' सू. ७६ या सूत्रानें होणाऱ्या) विसर्गाचा केवळ रेफ = 'र्' हा अल् स्थानी ठरतो आणि 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें, त्या विसर्गरूप आदेशाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें रुत्वबुद्धि करतांच येत नाहीं (व त्यामुळें यत्वाची प्राप्तीच होत नाहीं) अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेचें उत्तर 'नैह्य-यमल्विधिः। रोरिति समुदायरूपाश्रयणात्।' असें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत दिलें आहे. ज्याप्रमाणें 'ग्रहोऽलिटि दीर्घः' सू. २५६२ या सूत्रानें 'इट्' या आगमाचे जागीं होणारा दीर्घ ईकार 'इट्'च आहे असें मानतां येतें व त्यामुळें 'अग्रहीत्' या स्थलीं 'इट ईटि' सू. २२६६ या सूत्राची प्रवृत्ति होते (व सिचाचा–म्हणजे सकाराचा-लोप होतो) त्याचप्रमाणें ('देवाः सन्ति' या उदाहरणांत यत्वविधि करतेवेळीं विसर्गाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें रूत्वबुद्धि करतां येते व त्यामुळें यत्व होण्याची आपत्ति येते. (ती टाळण्याकरितां प्रकृत सूत्रांत 'अशि' या पदाचें ग्रहण आवश्यक आहे.) 'स्थानिवदादेशः' सू. १. १. ५६ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं स्पष्ट म्हटलें आहे कीं, 'विशिष्टं ह्येषोऽनलमाश्रयते इटं नाम'–म्हणजे 'इट ईटि' या सूत्रांत 'इट्' या समुदायाचें ग्रहण केलें असल्यामुळें, 'ग्रहोऽलिटि दीर्घः' या सूत्रानें होणाऱ्या दीर्घ ईकारादेशाचा 'इट्'

हा समुदाय स्थानी ठरतो. यामुळें देखील 'धात्वङ्गकृत्तद्धिताव्यय-सुप्तिङ्पदादेशाः' असें जें प्रक्रियाकौमुदीकारानीं परिगणन केलें आहे तें अशुद्ध ठरतें हें लक्षांत ठेवावें. (शंकाकार असें म्हणतो कीं, 'देवास् सन्ति' या उदाहरणांत 'देवास्' या पदाच्या अन्तीं असणाऱ्या सकाराचे जागीं 'ससजुषो रुः' या सूत्रानें होणाऱ्या 'रु' या आदेशांतील उकार हा अनुबन्ध इत्संज्ञक वर्ण असल्यामुळें व 'नानुबन्धकृतमनेकाल्त्वम्'–प. ६–ही परिभाषा असल्यामुळें, 'रु' हा वास्तविक अल्रूप रेफच ठरतो व त्या रेफाचे– 'र'चे--जागीं प्रकृत पर त्रैपादिक सूत्रानें पावलेल्या यत्वाचा बाध करून 'खरवसानयोः' या पूर्व त्रैपादिक सूत्रानें जो विसर्ग होतो त्या विसर्गाचा स्थानी अशा रीतीनें अल्रूप रेफ–रकार– ठरत असल्यामुळें, 'अनल्विधौ' या प्रतिषेधान्वयें, तो अल्स्थानिक विसर्ग 'रु' च आहे असें स्थानिवद्भावानें मानतां येत नाहीं व त्यामुळें प्रकृत सूत्रांत 'अशि' हें पद नसलें तरी त्या विसर्गाचें यत्व होण्याची आपत्ति मुळींच येत नाहीं; कारण प्रकृत सूत्रानें 'रु' चें यत्व होणें सांगितलें आहे व वरील उदाहरणांत अल्रूप रेफाचे जागीं झालेला विसर्ग जर वर सांगितल्याप्रमाणें 'रु' आहे असें शास्त्रदृष्टया मानतां येत नाहीं तर त्याचें यत्व कसें होऊं शकणार ? या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, 'प्रातर्, पुनर' इत्यादि स्थलीं होणाऱ्या विसर्गाचा स्थानी जसा अल्मात्रधर्मवृत्ति केवळ रकार हा अल् आहे तसा प्रकृत उदाहरणांत होणाऱ्या यत्वाचा तसा रेफ स्थानी नसून उकारानुबन्धविशिष्ट अनल्धर्मवृत्ति 'रु' हा समुदाय स्थानी आहे. आणि जरी त्या 'रु' स्थानींतील उकार हा इत् आहे तरी तो स्थानी उकारानुबन्धविशिष्ट मुद्दाम प्रकृत सूत्रांत उच्चारला असल्यामुळें, त्याचें अनलत्व नष्ट होत नसून तो अनल्धर्मवान् ठरतो. म्हणून तशा अनल्धर्मक 'रु' या समुदायरूप स्थानीचे जागीं होणारें यत्व करते–वेळीं वरील उदाहरणांत झालेला विसर्ग 'रु' च आहे असें स्थानिवद्भावानें मानण्यांत 'अनल्विधौ' हा प्रतिषेध लागूच पडत

नाहीं व त्यामुळें त्या विसर्गाचें यत्व होण्याची आपत्ति येते. पण प्रकृत सूत्रांत 'अशि' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें व 'देवाः सन्ति' या उदाहरणांत विसर्गापुढें 'अश्' नसून सकार हा 'खर्' असल्यामुळें, ती आपत्ति टळते आणि अशा रीतीनें प्रकृत सूत्रांत केलेलें 'अशि' या पदाचें ग्रहण चरितार्थ ठरतें. अशा स्थलीं होणाऱ्या विसर्गाचे ठिकाणीं रुत्वबुद्धि करतां येते हें सिद्ध करण्याकरितां दीक्षितांनीं 'स्थानिवदादेशः' १-१-५६ या सूत्रावरील भाष्याचें प्रमाण दिलें आहे. 'ग्रहोऽलिटि दीर्घः' सू. २५६२ या सूत्रान्वयें 'ग्रह' धातूपुढें येणारा इडागम लिट्लकार खेरीज करून इतर आर्धधातुक लकारांत दीर्घ होतो. 'इट्' या आगमांतील टकार इत् असल्यामुळें दीर्घ ईकारादेशाचा स्थानी वास्तविक अल्रूप ऱ्हस्व इकारच आहे व त्यामुळें त्या आदेशाचे ठिकाणीं तो 'इट्' आहे अशी, 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें, स्थानिवद्भावानें बुद्धि करतां येत नाहीं असें म्हणतां येऊं शकतें. पण भाष्यकारांनीं दीर्घ ईकारादेशाचा 'इट्' हा अनल्रूप समुदाय स्थानी मानून त्या आदेशाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें 'इट्त्व' बुद्धि केली आहे. त्याचें कारण हें कीं, 'इट् = इ' हा स्थानी मामुली ऱ्हस्व इकारासारखा अल्रूप नसून टकारानुबन्धविशिष्ट अनल्धर्मवृत्ति 'इट्' असा समुदाय स्थानी या रूपानें 'इट ईटि' या सूत्रांत निर्दिष्ट असल्यामुळें, भाष्यकारांनीं 'ग्रहोऽलिटि दीर्घः' या सूत्रानें होणारा विधि अल्विधि नव्हें असें म्हटलें आहे. हाच न्याय उकारानुबन्धविशिष्ट 'रु' या अनल्धर्मवृत्ति प्रकृतसूत्रनिर्दिष्ट समुदायरूप स्थानीचे जागीं होणाऱ्या यकारास लागू पडतो व यत्व करतेवेळीं विसर्गाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें रुत्वबुद्धि करतां येते. त्यामुळें प्रकृत सूत्रांत 'अश्' या पदाचें ग्रहण न केलें तर त्या विसर्गाचें 'देवाः सन्ति' या उदाहरणांत यत्व होण्याची आपत्ति येते. या विषयाची अधिक चर्चा शब्दरत्नांत करण्यांत येईल. वरील भाष्यांत भाष्यकारांनीं आगमाचे जागीं

होणाऱ्या आदेशाचे ठिकाणीं देखील स्थानिवद्भाव मानला असल्यामुळें व प्रक्रियाकौमुदीकारांनीं दिलेल्या परिगणनांत आगमाचे जागीं होणाऱ्या आदेशाचा निर्देश केला नसल्यामुळें, तें परिगणन न्यून व अशुद्ध ठरतें हें उघड आहे.)

मनोरमा—निपाता इति । "भोभगो-" इति सूत्रे निर्दिष्टा-श्चादेराकृतिगणत्वात्तत्र बोध्याः । तथा च "विभाषा भव-द्भगवत्——" इति वार्तिकं नाश्रयणीयम् । अन्यथा पुल्लिङ्गै-कवचनमात्रे भो हरे इत्यादिसिद्धावपि भो हरिहरौ, भो विद्वद्वृन्द, भो गङ्गे, इत्यादि न सिद्धयेदिति भावः । एतच्च वृत्तिहरदत्तादिमतेनोक्तम् । भाष्यस्वरसरीत्या तु "विभाषा——" इत्यादि वार्तिकमारब्धव्यमेव । किं तु निपातोऽपि भोः शब्दोऽस्ति, तेन द्विवचनादौ स्त्रीनपुंसकयोश्च न दोषः । युक्ततरं चैतत् । हे भवन्नितिवत हे भो इति प्रयोगस्यापी-ष्टत्वात् । तस्य च वार्तिकारम्भ एव सिद्धेः । "स्युः प्याट्पाडङ्ग-हैहेभो" इत्यमरोक्तानां सम्बोधनार्थानां निपातानां सह प्रयोगायोगात् । किं चात्रभवान् हरिस्तत्रभवान् इतिवत् तत्र भो इत्याद्यपि वार्तिके सत्येव सिद्धचति । "इतराभ्योऽपि दृश्यन्ते" इति सर्वविभक्त्यन्ता-त्त्रतसोर्भवदादियोग एवेष्टत्वात् । किं चामन्त्रितत्वे पदात्परस्याष्ट-मिकनिघातः । "आमन्त्रितं पूर्वम्——" इत्यविद्यमानवद्भावः । "आमएकान्तरम्-" इति विधिः । "वाक्यादेरामन्त्रितस्य-" "इति द्विर्भावः । "सुबामन्त्रित——" इति पराङ्गवद्भावश्चेत्यादि सर्वं सिद्धचति, न त्वन्यथेति दिक् । भगो, अघो इति निपातावपि यदि प्रामाणिकौ तर्हि स्तां नाम । आमन्त्रितकार्यसिद्धिस्तु वार्तिकाय-त्तैवेति सुधीभिराकलनीयम् । यत्तु वदन्ति—सकारान्तानेवैतान् निपातानास्थाय रुत्वौत्वे भाष्ये प्रत्याख्याते इति, तदतिरभसात् ।

'चादयोऽसत्वे' सू. २० या सूत्रांत निर्दिष्ट असलेला चादिगण आकृतिगण असल्यामुळें, 'भोस्, भगोस्, अघोस्' हे प्रकृतसूत्रनिर्दिष्ट

निपात चादिगणांत (जरी साक्षात् पठित नाहींत तरी) अन्तर्भूत आहेत असें समजावें. अशा रीतीनें 'भोस्, भगोस्, अघोस्' हे निपात मानल्यानें सर्व इष्टसिद्धि होऊं शकत असल्यामुळें, 'विभाषा भवद्भगवत्' हें वार्तिक मानण्याची कांहीं गरज नाहीं, म्हणजे त्या वार्तिकाचें प्रत्याख्यान करणें योग्य आहे. पण जर केवळ या वार्तिकाचाच स्वीकार केला (व 'भोस्, भगोस्, अघोस्' हे निपात न मानले) तर, जरी 'भो हरे' हा पुल्लिङ्गाच्या संबुद्धीचा प्रयोग सिद्ध होऊं शकतो तरी, 'भो हरिहरौ, भो विद्वद्वृन्द, भो गङ्गे' इत्यादि प्रयोग सिद्ध होऊं शकणार नाहींत. ('मतुवसो रु' ८. ३. १ या सूत्रावरील भाष्यांत वरील वार्तिक पठित करून त्याचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात–'संबुद्धावित्युच्यते तत्रेदं न सिध्यति–भो ब्राह्मणा इति। तथा विभक्तौ लिङ्गविशिष्टग्रहणं नेतीह न प्राप्नोति भो ब्राह्मणि।' या भाष्याचा भावार्थ असा आहे कीं, वरील वार्तिक 'मतुवसो रु' या सूत्रावरील वार्तिक असल्यामुळें, त्या वार्तिकांत 'मतुवसो रु' या सूत्रांतील 'संबुद्धौ' या पदाची अनुवृत्ति होते व त्यामुळें 'भो ब्राह्मणाः' इत्यादि प्रयोग सिद्ध होऊं शकत नाहींत; कारण संबोधनाचे 'औ, जस्' हे प्रत्यय संबुद्धीचे –एकवचनाचे– प्रत्यय नसून द्विवचनाचे व बहुवचनाचे प्रत्यय असल्यामुळें 'भवत्' शब्दापुढें ते प्रत्यय आल्यास वरील वार्तिकांत सांगितलेलीं आदेशरूप कार्यें होऊं शकत नाहींत व त्यामुळें 'हे भवन्तौ, हे भवन्तः' यांचें 'भोः' असें रूप सिद्ध होऊं शकत नाहीं आणि म्हणून 'भो हरिहरौ, भो ब्राह्मणाः' इत्यादि प्रयोग सिद्ध होऊं शकत नाहींत. तसेंच वरील वार्तिकांत 'भवत्' या प्रातिपदिकाचें ग्रहण केलें असून त्यापुढें 'सु' हा संबुद्धीचा प्रत्यय आला असतां वार्तिकनिर्दिष्ट आदेशरूप कार्यें होणें सांगितलें असल्यामुळें व 'विभक्तौ लिङ्गविशिष्टाग्रहणम्'– परि. ७३ –ही परिभाषा असल्यामुळें, वार्तिकनिर्दिष्ट 'भवत्' शब्दानें त्याच्या 'भवती' या स्त्रीलिङ्गाच्या रूपाचें ग्रहण करतां येत नाही. त्यामुळें

'भवत् + ङीप् + सु' या स्थलीं 'भवत्' शब्दाच्या लगेंच पुढें संबुद्धीचा 'सु' प्रत्यय नसून दोहोंमध्यें 'ङीप्चें' व्यवधान असल्यामुळें, 'भवती' या स्त्रीलिङ्गाच्या संबुद्धीचें 'भोः' असें रूप सिद्ध होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'भो ब्राह्मणि, भो गङ्गे' इत्यादि प्रयोग सिद्ध होऊं शकत नाहींत. त्याचप्रमाणें 'भवत्' शब्दाच्या नपुंसकाच्या संबुद्धीचें देखील 'भोः' असें रूप सिद्ध होऊं शकत नाहीं. याचें कारण शब्दरत्नांत सांगण्यांत येईल. त्यामुळें 'भो विद्वद्वृन्द' हा नपुंसकाचा प्रयोग देखील सिद्ध होऊं शकत नाहीं. सारांश वरील वार्तिक मानल्यानें जरी पुल्लिङ्गाच्या संबुद्धीचा 'भो हरे' हा प्रयोग सिद्ध होऊं शकतो तरी स्त्रीलिङ्गाच्या व नपुंसकलिङ्गाच्या संबुद्धीचें व तसेंच संबोधनाच्या द्विवचनाचें व बहुवचनाचें 'भोः' असें रूप सिद्ध होऊं शकत नसल्यामुळें व 'भोस्, भगोस्, अघोस्' हे संबोधनार्थक निपात मानल्यानें भाष्यांत व मनोरमेंत दिलेले सर्व प्रयोग सिद्ध होऊं शकत असल्यामुळें आणि अशा रीतीनें हे तीन शब्द निपात मानल्यानें सर्व काम भागत असल्यामुळें, वरील वार्तिक मानून फायदा काय व त्या वार्तिकाचें प्रत्याख्यान करणेंच इष्ट आहे असा मनोरमेच्या प्रकृत पंक्तीचा भावार्थ आहे. पण हें दीक्षितांचें स्वतःचें मत नसून त्यांचें भिन्न मत आहे हें ते पुढील पंक्तींत सांगतात.) वर जें व्याख्यान केलें आहे तें काशिकावृत्तीला व हरदत्तादिकांच्या मताला अनुसरून केलें आहे. (काशिकाकारानें 'निपातविज्ञानाद्वा सिद्धम्' हें वचन पठित करून वरील वर्तिकाचें प्रत्याख्यान केलें आहे व 'मतुवसो रु' या सूत्रा-वरील पदमञ्जरींत हरदत्तानें स्पष्ट म्हटलें आहे कीं, 'तस्मात्सौत्रा एते निपाता भोभगोअघोइत्यत्र सूत्रे निर्दिष्टाः चादिषु वा पठितव्याः, तदेवं प्रत्याख्यातमुपसंख्यानम्.' सारांश काशिकाकाराच्या व हर-दत्ताच्या मताप्रमाणें 'भोस्, भगोस्, अघोस्' हे निपात मानल्यानें सर्व इष्ट प्रयोगांची सिद्धि होऊं शकत असल्यामुळें व वरील वार्तिक मानल्यानें तसें होऊं शकत नसल्यामुळें, वार्तिकाचें प्रत्याख्यान

करणेंच योग्य आहे. परंतु दीक्षित म्हणतात कीं,) भाष्याचा खरा आशय लक्षांत घेतल्यास, वरील वार्तिक मानणेंच योग्य आहे व त्या खेरीज 'भोः' हा निपात देखील मानावा. तसें मानलें असतां संबोधनाच्या द्विवचनाचा व बहुवचनाचा आणि तसेंच स्त्रीलिङ्गाच्या व नपुंसकलिङ्गाच्या संबुद्धीचा प्रयोग सिद्ध होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. (ज्या भाष्याचा वर उतारा दिला आहे त्या भाष्यांत जरी भाष्यकारांनीं वरील वार्तिक मानल्यास उत्पन्न होणारे दोष दाखविले आहेत तरी त्यांनीं वार्तिकाचें प्रत्याख्यान केलें नसून असें म्हटलें आहे कीं, 'नैष दोषः। अव्ययमेष भोः शब्दो, नैषा भवतः प्रकृतिः। कथमव्ययत्वम् ?। विभक्तिस्वरप्रतिरूपकाश्च निपाता भवन्तीति निपातसंज्ञा। निपातोऽव्ययमित्यव्ययसंज्ञा।' जर भाष्यकारांनीं वरील वार्तिकाचें प्रत्याख्यान केलें असतें तर, त्यांनीं 'भोः' हा विभक्तिप्रतिरूपक निपात मानला नसता; कारण वार्तिक मानल्यानेंच 'भोः' असें 'भवत्' शब्दाच्या संबुद्धीचें रुपान्तर होऊं शकतें व त्यामुळेंच 'भोः' हा संबोधनार्थक शब्द विभक्तिप्रतिरुपक निपात मानतां येतो. सारांश भाष्यकारांनीं वार्तिकाचें प्रत्याख्यान न करितां तें मानलें असल्यामुळें, त्याचें प्रत्याख्यान करणें अयोग्य आहे आणि ज्याअर्थीं भाष्यकारांनीं तें वार्तिक मानून त्याशिवाय 'भोः' हा विभक्तिप्रतिरुपक निपात देखील मानला आहे त्याअर्थीं भाष्याला अनुसरून तसेंच मानणें योग्य आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. आतां 'भोः' हा निपात मानल्यानें पूर्वीं सांगितल्याप्रमाणें सर्व इष्ट प्रयोगांची सिद्धि होत असून देखील पुन्हा वरील वार्तिक मानण्याची गरज काय याचें कारण दीक्षित पुढील पंक्तींत देतात.) आणि वार्तिक मानणें व त्याशिवाय 'भोः' हा निपात मानणें हें (काशिकाकारादिकांच्या मतापेक्षां) अधिक योग्य आहे; कारण 'हे भवन्' या प्रयोगाप्रमाणें 'हे भोः' असा प्रयोग होणें देखील इष्ट आहे व वरील वार्तिक मानल्यानेंच तसा इष्ट प्रयोग सिद्ध होऊं शकतो. 'स्युःप्याट्पाडङ्गहै-

हेभोः' या अमरकोशांतील श्लोकांत निर्दिष्ट असलेल्या 'हे' व 'भोः' या दोन्ही संबोधनार्थक निपातांचा सहप्रयोग होणें अशक्य आहे. ('हे' व 'भोः' हे जर दोन्ही एकाच अर्थाचे संबोधनार्थक निपातच मानले तर 'हेभोः' हा प्रयोग शुद्ध ठरूं शकणार नाहीं. पण तसा प्रयोग होणें इष्ट असल्यामुळें, 'भोः' हा शब्द 'भवत्' शब्दाच्या 'भवन्' या संबुद्धीचे रूपान्तर असून निपात नाहीं असें मानणें देखील आवश्यक आहे व वरील वार्तिक स्वीकारल्याशिवाय तसें मानतां येत नाहीं व 'हे भोः' हा प्रयोग शुद्ध ठरूं शकत नाहीं. म्हणून तें वार्तिक देखील मानलें पाहिजे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) दुसरें असें कीं, ज्याप्रमाणें 'अत्र भवान् हरिः, तत्र भवान्' हे प्रयोग सिद्ध होतात त्याचप्रमाणें 'तत्र भोः' इत्यादि प्रयोग वरील वार्तिक मानल्यानेंच सिद्ध होऊं शकतात. 'इतराभ्योऽपि दृश्यन्ते' सू. १९६३ या सूत्रान्वयें ('किम्' इत्यादि सर्वनामांहून) सर्व विभक्तींच्या अर्थांमध्यें होणारे 'त्र' व 'तस्' प्रत्यय लागून बनलेल्या शब्दांचा 'भवत्' इत्यादि शब्दांसहच प्रयोग होणें इष्ट आहे. ('इतराभ्योऽपि दृश्यन्ते' या सूत्रावरील कौमुदींत 'दृशिग्रह-णाद्भवदादियोग एव' असें वचन पठित केलें आहे व त्याचें कारण हें कीं, त्या सूत्रावरील भाष्यांत ५-३-१४ 'इह कस्मान्न भवति—सः। तौ। ते?। भवदादिभिर्योगे। भवदादिभिर्योगे इति वक्तव्यम्। के पुनर्भवदादयः?। भवान्दीर्घायुर्देवानांप्रिय आयुष्मानिति। स भवान्। तत्र भवान्। ततो भवान् ....' असें भाष्यकारांनीं म्हटलें आहे. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'त्रल्' व 'तसिल्' प्रत्ययान्त 'किम्' इत्यादि सर्वनामांचा जो सर्व विभक्तींत प्रयोग होतो तो 'भवान्' इत्यादि चार शब्दांसहच होतो. म्हणून 'स भवान्' या अर्थांमध्यें जसे 'तत्र भवान्, ततो भवान्' हे प्रयोग होतात त्याचप्रमाणें 'तत्र भोः, ततो भोः' इत्यादि इष्ट प्रयोग सिद्ध होण्याकरितां देखील वार्तिक मानणें आवश्यक आहे; कारण 'भोः' हे 'भवत्' शब्दाचें रूपान्तर आहे असें मानलें तरच तसे प्रयोग 'भवदादिभिर्योगे'

या वार्तिकान्वयें शुद्ध ठरूं शकतात.) आणखी असें कीं, 'भोः' हा शद्ब ('भवत्' शब्दाच्या संबुद्धीचें रूपान्तर आहे असें वरील वार्तिकान्वयें मानल्यासच, 'तिष्ठति भोः' इत्यादि वाक्यांत 'भोः' हा शद्ब 'तिष्ठति' या पदापुढें असल्यामुळें) आमन्त्रितसंज्ञक ठरून 'आमन्त्रितस्य च' सू. ३६५४ या अष्टमाध्यायांतील सूत्रान्वयें तो सर्वानुदात्त ठरूं शकतो. (वार्तिक न मानतां 'भोः' हा शब्द केवळ निपात मानल्यास, तो अनुदात्त न होतां 'निपाता आद्युदात्ताः' फिट् सू. ८० या सूत्रानें आद्युदात्त होईल.) तसेंच 'भोः' हा शद्ब आमन्त्रितसंज्ञक मानल्यासच, 'आमन्त्रितं पूर्वमविद्यमानवत्' सू. ४१२ या सूत्रानें त्याचें ठिकाणीं अविद्यमानवद्भाव मानतां येतो. ('भोः' हा शद्ब केवळ निपात नसून 'भवत्' शब्दाच्या संबुद्धीचें रूपांतर देखील आहे असें वरील वार्तिक स्वीकारून मानलें तरच, 'भोः तिष्ठति' इत्यादि वाक्यांत 'सामन्त्रितम्' सू. ४११ या सूत्रानें 'भोः' हा शद्ब आमन्त्रितसंज्ञक ठरतो, व 'आमन्त्रितं पूर्वमविद्यमानवत्' या सूत्रानें तो वाक्याच्या आरंभीं नाहींच असें मानतां येतें व त्यामुळें 'तिङ्ङतिङः' सू. ३९३५ या सूत्राची प्रवृत्ति होत नाहीं व 'तिष्ठति' हें पद सर्वानुदात्त होत नाहीं. तसेंच 'भो ब्राह्मण' या स्थलीं 'भोः' हें आमन्त्रित पद अविद्यमान आहे असें मानल्यानें 'ब्राह्मण' या आमन्त्रित पदापूर्वीं पद नाहीं असें मानतां येतें व त्यामुळें 'आमन्त्रितस्य च' सू. ३६५४ हें अष्टमाध्यायाचें सूत्र प्रवृत्त होत नाहीं व 'ब्राह्मण' हें पद सर्वानुदात्त न होतां 'आमन्त्रितस्य च' सू. ३६५३ या षष्ठाध्यायांतील सूत्रानें तें पद आद्युदात्त होतें.) 'आम एकान्तरमामन्त्रितमनन्तिके' सू. ३९६२ या सूत्रानें होणारें अनुदात्तप्रतिषेधरूप कार्य, व तसेंच 'वाक्यादेरामन्त्रितस्य' सू. २१४३ या सूत्रानें होणारें आमन्त्रिताचें द्विर्वचनकार्य, आणि त्याचप्रमाणें 'सुबामन्त्रिते पराङ्गवत्स्वरे' सू. ३६५६ या सूत्रानें होणारा पराङ्गवद्भाव इत्यादि कार्यें, 'भोः' हा शद्ब वरील

वार्तिकान्वयें 'भवत्' शद्बाच्या संबुद्धीचें रूपान्तर आहे व त्यामुळें तो आमन्त्रितसंज्ञक आहे असें मानल्यासच, सिद्ध होऊं शकतात; तें वार्तिक न मानल्यास, तीं कार्यें सिद्ध होऊं शकत नाहींत. ('आम एकान्तरम्' या सूत्राचा 'आम: परमेकपदान्तरितमामन्त्रितं नाऽनुदात्तम्' असा अर्थ आहे. 'आम् पचति भो:' या उदाहरणांत 'आम्' व आमन्त्रितसंज्ञक 'भो:' या दोन शद्बांमध्यें 'पचति' या एकाच पदाचें व्यवधान असल्यामुळें, 'आमन्त्रितस्य च' सू. ३६५४ या अष्टमाध्यायांतील सूत्रानें पावलेल्या अनुदात्त स्वराचा प्रतिषेध होतो व 'भो:' हा शद्ब अनुदात्त होत नाहीं. 'भो:' हा शब्द केवळ निपात मानला तर त्याला वरील प्रतिषेध लागू पडणार नाहीं व त्याला 'आमन्त्रितस्य च' सू. ३६५३ या पाणिनीय सूत्रानें उदात्त स्वर न होतां 'निपाता आद्युदाता:' फिट् सू. ८० या फिट्सूत्रानें आद्युदात्त निपातस्वर होईल. हें खरें कीं, दोन्ही पक्षांत एकच प्रकारचा—म्हणजे आद्युदात्त—स्वर होईल, पण तो भिन्न सूत्रांनीं होईल एवढाच काय तो या स्थलीं फरक होतो हें लक्षांत ठेवावें. 'असूया, संमति, कोप, कुत्सन, भर्त्सन' या अर्थांमध्यें आमन्त्रिताचा वाक्याच्या आरंभीं प्रयोग केला असल्यास, त्याचें 'वाक्यादेराम-न्त्रितस्य' सू. २१४३ या सूत्रानें द्विर्वचन होणें सांगितलें आहे. म्हणून 'भो: वृथा ते वीर्यम्' या कुत्सनार्थक वाक्यांतील 'भो:' या आद्य आमन्त्रित शद्बाचें द्विर्वचन होऊन 'भो भो वृथा ते वीर्यम्' असा प्रयोग सिद्ध होतो. 'भो:' हा शद्ब केवळ निपात मानल्यास तो आमन्त्रितसंज्ञक होत नसल्यामुळें त्याचें द्विर्वचन होऊं शकणार नाहीं व वरील प्रयोग सिद्ध होऊं शकणार नाहीं. 'सुबामन्त्रिते' सू. ३६५६ या सूत्राचा 'स्वरविधौ कर्तव्ये सुबन्तमामन्त्रिते परे सति, तस्य परस्य आमन्त्रितस्य एकदेशवद्भवति—आमन्त्रितशरीरानु-प्रविष्टं तत्सुबन्तमामन्त्रितस्यैव स्वरं लभते'—असा अर्थ आहे. त्यामुळें 'पूज्योऽस्ति विद्यया भो: = विद्यावन् भवन् पूज्योऽस्ति' या वाक्यांत 'विद्यया' या मत्वर्थीय करणाचा 'भो:' या आमन्त्रित

शद्बामध्यें कारकरूपानें अन्वय होत असल्यामुळें पराङ्गवद्भाव होऊन 'त्रिद्यया' हें पद 'आमन्त्रितस्य च' सू. ३६५४ या आष्टमिक सूत्रानें सर्वानुदात्त होतें. 'भोः' हा शद्ब केवळ निपात मानल्यास, तो आमन्त्रितसंज्ञक ठरत नसल्यामुळें पराङ्गवद्भाव होऊं शकणार नाहीं.) 'भगो' व 'अघो' हे (ओकारान्त) शद्ब जर कोणत्याहि प्रमाणानें निपात ठरूं शकत असतील तर ते खुशाल निपात ठरोत. पण आमन्त्रितसंज्ञक शद्बाला होणारीं कार्यें 'भगो' व 'अघो' या शद्बांना होण्याकरितां वरील वार्तिक मानणें आवश्यक आहे हें विद्वान लोकांनी लक्षांत आणावें. प्रकाशकारांचें असें म्हणणें आहे कीं, भाष्यकारांनीं 'भोस्, भगोस्, अघोस्' असे सकारान्त निपात मानून रुत्व व ओत्व या कार्यांचें विधान करणाऱ्या वरील वार्तिकाचें प्रत्याख्यान केलें आहे. पण त्यांनीं योग्य विचार न करितां असें म्हटलें आहे. (भाष्यांत वरील वार्तिकाचें प्रत्याख्यान केलें नाहीं व भाष्यकारांनीं वरील वार्तिक मानून त्याखेरीज 'भोः' हा निपात देखील मानला आहे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. म्हणून प्रकाशकारांचें म्हणणें बरोबर मानतां येत नाहीं.)

मनोरमा–स्यादेतत् । निपातानामभ्युपगमे यत्वविधौ त एव गृह्येरन् प्रतिपदोक्तत्वात् । न तु सम्बुद्ध्यन्ताः लाक्षणिकत्वात् इति चेन्मैवम् । "स्वरितेनाधिकारः" इत्यत्राधिकः कारोऽधिकार इति व्याख्यानमाश्रित्य लक्ष्यानुरोधेन स्वरितत्वमाश्रित्योभयग्रहणात् । "भुवश्च महाव्याहृतेः" इति सूत्रे महाव्याहृतिग्रहणं लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषाया अनित्यत्वज्ञापनार्थमिति हरदत्ताद्युक्तेश्च । न चैवमपि प्रभोरित्यादावतिव्याप्तिः । परस्परसाहचर्येण निपातानां वार्तिकोक्तानां च ग्रहणेऽप्यन्येषामग्रहणात् ।

'भो, भगो, अघो' हे सान्त किंवा रान्त निपात आहेत असें मानल्यास, यत्वविधि करतेवेळीं, सूत्रनिर्दिष्ट 'भो, भगो, अघो' या शद्बांनीं त्या निपातांचेंच ग्रहण होऊं शकेल, कारण ते प्रतिपदोक्त

आहेत आणि ‘ भवन्, भगवन्, अघवन् ’ या शब्दांहून वरील वार्तिकान्वयें सिद्ध झालेले ‘ भोर्, भगोर्, अघोर् ’ हे संबुद्ध्यन्त शब्द लाक्षणिक असल्यामुळें, ‘ लक्षणप्रतिपदोक्तयोः प्रतिपदोक्तस्यैव ग्रहणम् ’— परि. ११४—या परिभाषान्वयें तशा लाक्षणिक शब्दांचें ग्रहण होऊं शकणार नाहीं अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाहीं; कारण ‘ स्वरितेनाधिकारः ’ १.३.११ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं त्या सूत्रांतील ‘ अधिकारः ’ या पदाचें ‘ अधिकः कारः ’, म्हणजे ‘ स्वरितेन अधिकं कार्यं भवति ’, असें जें व्याख्यान केलें आहे त्या व्याख्यानाचा आश्रय केल्यास व सर्व इष्ट रूपांची सिद्धि व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांतील ‘ भो, भगो, अघो ’ हे शब्द स्वरित आहेत असें मानल्यास, त्या स्वरितत्वप्रतिज्ञाबलानें ‘ भो, भगो, अघो ’ या निपातांचें व त्याचप्रमाणें वार्तिकसिद्ध शब्दांचेंहि ग्रहण करतां येतें. दुसरें असें कीं, ‘ भुवश्च महाव्याहृतेः ’ सु. ३६०५ या सूत्रांत ‘ महाव्याहृतेः ’ या शब्दाचें ग्रहण केलें असल्यामुळें, लक्षण-प्रतिपदोक्त परिभाषा—परि. ११४—अनित्य आहे हें ज्ञापित होतें असें हरदत्तादिकांचें म्हणणें आहे. (पृथिवी, अन्तरिक्ष व स्वर्ग यांच्या अनुक्रमें वाचक ‘ भूः, भुवः, स्वः ’ या तीन प्रसिद्ध महाव्याहृति आहेत. ‘ भुवः ’ हा शब्द ‘ भुवः ’ या अव्ययसंज्ञक द्वितीय महाव्याहृतीचें वाचक प्रतिपदोक्त रूप आहे व ‘ भू ’ धातूहून क्विप् प्रत्यय केला असतां ‘ भू ’ असें जें प्रातिपदिक होतें व त्याचें ‘ भुवः ’ असें जें षष्ठीच्या एकवचनाचें रूप होतें तें रूप, किंवा ‘ भुवो विश्वेषु सवनेषु ’ या श्रुतींतील छान्दस गुणाभावानें व ‘ बहुलं छन्दस्यमाङ्-योगेऽपि ’ सू. ३५४६ या सूत्रान्वयें अडागम न होतां सिद्ध झालेलें ‘ भू ’ धातूचें लङाच्या द्वितीयपुरुषैकवचनाचें रूप, हीं रूपें पाणिनीय सूत्रें प्रवृत्त केल्यानें बनलेलीं लाक्षणिक रूपें होत. लक्षण-प्रतिपदोक्त परिभाषा नित्य मानल्यास, ‘ भुवः ’ या वरील सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या शब्दानें प्रसिद्ध प्रतिपदोक्त महाव्याहृतिवाचक ‘ भुवः ’ या शब्दाचेंच ग्रहण होऊं शकतें व लाक्षणिक ‘ भुवः ’ या

शद्बाचें ग्रहण होऊं शकत नाहीं. असें असून देखील ज्या अर्थी ‘भुवश्च महाव्याहृतेः’ या सूत्रांत ‘महाव्याहृतेः’ या पदाचें ग्रहण केलें आहे त्या अर्थी हें ज्ञापित होतें कीं, लक्षणप्रतिपदोक्त परिभाषा अनित्य आहे, म्हणजे कोठें कोठें प्रतिपदोक्त शद्बानें लाक्षणिक शद्बाचें देखील ग्रहण होतें. त्यामुळें ‘भुवः’ या शद्बानें तशा लाक्षणिक शद्बाचें ग्रहण होण्याची जी आपत्ति येत होती ती टाळण्याकरितां वरील सूत्रांत ‘महाव्याहृतेः’ या पदाचें मुद्दाम ग्रहण केलें आहे व अशा रीतीनें तें ग्रहण लक्षणप्रतिपदोक्त परिभाषेच्या अनित्यत्वाचें ज्ञापक ठरतें. सारांश ती परिभाषा अनित्य असल्यामुळें, ‘भो, भगो, अघो’ या प्रतिपदोक्त निपातांनीं वार्तिकसिद्ध तशा लाक्षणिक शद्बांचें देखील ग्रहण होऊं शकतें.) जर वरील प्रतिपदोक्त निपातांनीं वार्तिकसिद्ध लाक्षणिक शद्बांचें देखील ग्रहण होतें असें मानलें तर, ‘प्रभोरिदम्’ इत्यादि मनोरमेंत दिलेल्या तीन उदाहरणांतील ’भो, भगो, अघो’ या एकदेशांचें देखील ग्रहण होण्याची आपत्ति येईल अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाहीं; कारण प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेले व वार्तिकनिष्पन्न ‘भो, भगो, अघो’ या दोन्ही प्रकारच्या शद्बांमध्यें परस्पर साहचर्य, म्हणजे स्वरूपतः व अर्थतः सादृश्य, असल्यामुळें, सूत्रनिर्दिष्ट त्या शद्बांनीं वार्तिकनिष्पन्न शद्बांचें ग्रहण करतां येतें; परंतु (‘विभोरिदम्’ इत्यादि मनोरमेंतील तीन वाक्यांतील ‘भो, भगो, अघो’ या) अनर्थक एकदेशांचें ग्रहण करतां येत नाहीं. (या पंक्तींतील ‘परस्पर-साहचर्येण’ या पदाचा ‘प्रातिपदोक्तानां सूत्रनिर्दिष्टानां कृतरान्तानां शद्बानां वार्तिकनिष्पन्नानां लाक्षणिकानां रान्तानां शद्बानां च स्वरूप-सादृश्येन अर्थवत्तारूपसादृश्येन च’ असा अर्थ आहे. सूत्रनिर्दिष्ट कृतरान्त ‘भो, भगो, अघो’ व वार्तिकनिष्पन्न ‘भोर्, भगोर्, अघोर्’ हें दोन्ही प्रकारचे शद्ब अर्थवान् असून त्यांची वर्णानुपूर्वी सारखीच आहे व त्यांचा अर्थ देखील सारखाच आहे व अशा रीतीनें दोहोंमध्यें स्वरूपसादृश्य व अर्थसादृश्य आहे. म्हणून सूत्रनिर्दिष्ट शद्बांनीं

वार्तिकनिष्पन्न शब्दांचें, अशा परस्परसादृश्यामुळें, ग्रहण करतां येतें. परंतु 'त्रिभोरिदम्, सुप्रभगोरिदम्, रघोरिदम्' या वाक्यांतील 'भो, भगो, अघो' या अनर्थक एकदेशांचें ग्रहण करतां येत नाहीं; कारण दोहोंमध्यें अर्थवत्तारूप सादृश्य नसल्यामुळें व 'सहचरितासहचरितयोः सहचरितस्यैव ग्रहणम्'–परि. ११२–हा न्याय असल्यामुळें, सूत्रनिर्दिष्ट अर्थवान् शब्दांनीं तशा अनर्थक एकदेशांचें ग्रहण होऊं शकत नाहीं. या पंक्तीचें जास्त विवरण शब्दरत्नांत केलें जाईल.)

शब्दरत्न — ननु सान्तानुकरणे "विभाषा भवत्—" इति वार्त्तिकनिष्पन्नानां ग्रहणं न स्यादत आह— रान्तं वेति । कृतरुत्वानुकरणमित्यर्थः । अलोऽन्त्यस्येति । न च भो राजसे इत्यादौ "रो रि" इति लोपे कृते एकदेशविकृतन्यायेन भोः शब्दत्वादन्त्यस्यौकारस्य यत्वापत्तिरिति वाच्यम् । तेषामभिधाने एषां रोरपूर्वस्य च रोरिति व्याख्यानेनादोषो बोध्यः । अत्र पक्षेऽघोशब्दान्तद्वन्द्वे षष्ठ्याः सौत्रो लुक् बोद्धयः । अवधेयमिति । यदि "ग्रहोऽलिटि" इति सूत्रे इटः स्थानित्वेन निर्देश इति तत्रानलाश्रयणं, प्रकृते तु विसर्गे रेफस्यैव स्थानित्वाद्वैषम्यं "अनल्विधौ" इत्यस्य स्थान्यल्वृत्तिधर्माश्रये स्थानिसम्बन्ध्यल्वृत्तिधर्माश्रये च नेत्यर्थस्तत्र स्थान्यल्रेफवृत्ति रुत्वं स्थानिवत्त्वेन दुर्लभमल्विधित्वात्स्पष्टं चेदं प्रकृतसूत्रे भाष्ये इत्युच्यते तदा पयःस्वित्यत्र यत्ववारणायाशीति । तत्र हि "रोः सुपि" इति विसर्गः । नियमशास्त्राणां च विधिमुखेनैव प्रवृत्तिरिति तत्र रुविशिष्टः स्थानीति तद्वृत्तिरुत्वस्य स्थानिवत्त्वेन लाभः सुकरः । यदि तु "रोः सुपि" इत्यत्रापि "रः" इत्यनुवर्त्य रोः रेफस्यैव तेन विसर्गस्तदा ऽश्ग्रहणमुत्तरार्थं सत्स्पष्टार्थमिहैव कृतमित्यवधेयम् ।

सूत्रनिर्दिष्ट 'भो, भगो, अघो' हे शब्द 'भोस्, भगोस्, अघोस्' या सान्त निपातांचे अनुकरण आहेत असें मानल्यास, 'विभाषा भवत्' या वार्तिकानें सिद्ध होणाऱ्या 'भोर्, भगोर्, अघोर्' या रान्त शब्दांचें ग्रहण होऊं शकणार नाहीं. म्हणून

मनोरमेंत 'रान्तं वा अनुकृत्य' असें म्हटलें आहे, व त्याचा अर्थ असा आहे कीं, 'भोस् भगोस्, अघोस्' यांतील अन्त्य सकाराचें ('ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रान्वयें) रुत्व केलें असतां जीं रकारान्त रुपें होतात त्यांचें व तसेंच वार्तिकनिष्पन्न रकारान्त रुपांचें प्रकृत सूत्रांत अनुकरण केलें आहे. हा रान्तानुकरण पक्ष मानल्यास, 'भो राजसे' इत्यादि स्थलीं 'रो रि' सू. १७३ या सूत्रानें ('भोर्' यांतील अन्त्य रकाराचा) लोप केल्यावर 'एकदेश-विकृतमनन्यवत्'–परि. ३७–या न्यायान्वयें अवशिष्ट एकदेश-विकृत 'भो' हा शब्द 'भोर्' च आहे अशी बुद्धि केल्यास, 'भो' यांतील अन्त्य ओकाराचे जागीं प्रकृत सूत्रानें (अलोऽन्त्यपरिभाषान्वयें सू. ४२) यकारादेश होण्याची आपत्ति येईल अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाहीं; कारण 'भो राजसे' इत्यादि प्रयोग भाषेंत होतात असें स्वीकारलें तरी, 'भोस्, भगोस्, अघोस्' यांच्या अन्त्य सकाराचें रुत्व केल्यावर त्या 'रु' चे जागीं आणि तसेंच 'अ' वर्णापुढें असलेल्या 'रु' चे जागीं यकारादेश होतो असें प्रकृत सूत्राचें व्याख्यान केल्यानें, 'भो राजसे' या स्थलीं 'भो' यांतील ओकाराचे जागीं यकारादेश होण्याची आपत्ति मुळींच येत नाहीं. या रान्तानुकरणपक्षांत–कृतरुत्वानुकरणपक्षांत–'भोभगोअघो' हा शब्द द्वन्द्वसमास असून षष्ठयन्त आहे व षष्ठीच्या प्रत्ययाचा सौत्र लुक् झाला आहे असें मानावें. (शब्दरत्नकारांनीं 'भो राजसे' इत्यादि प्रयोग भाषेंत आढळत नाहींत व त्यामुळें शंकाकाराची शंका अनुपपन्न ठरते अशा रीतीनें त्या शंकेचें निरसन केलें नाहीं; कारण 'भो राजसे' हा प्रयोग भाषेंत आढळत नाहीं असें मानलें तरी, 'भो राजन्' इत्यादि प्रयोग भाषेंत आढळतात व तशा प्रयोगांत देखील शंकाकारानें केलेली शंका लागू पडते. म्हणून त्यांनीं 'भो राजसे' इत्यादि प्रयोग 'भो राजन्' इत्यादि प्रयोगां-प्रमाणें भाषेंत होतात असें स्वीकारून शंकाकाराच्या शंकेचें अशा रीतीनें समाधान केलें आहे कीं, 'रोः सुपि' या पूर्व सूत्रांतून 'रोः'

या पदाची प्रकृत सूत्रांत अनुवृत्ति असून व 'भोभगोअघोअपूर्वस्य' एवढा एक सामासिक शब्द नसून 'भोभगोअघो' व 'अपूर्वस्य' हे दोन पृथक् सामासिक शब्द आहेत आणि 'भोभगोअघो' हा षष्ठ्यन्त द्वन्द्वसमास आहे असें मानल्यानें व प्रकृत सूत्राचा 'कृत-रुत्वकार्याणां भोभगोअघो इति शब्दानामन्त्यस्य रोः यः स्यात्, अपूर्वस्य रोश्च यः स्यात्' असा अर्थ केल्यानें या अर्थान्वयें यकारादेशाचा स्थानी 'रु' ठरत असल्यामुळें व 'निर्दिश्यमानस्यादेशा भवन्ति' –परि. १२–ही परिभाषा असल्यामुळें, जरी 'भोर् राजसे' या स्थलीं 'भोर्' यांतील अन्त्य रकाराचा 'रो रि' सू. १७३ या सूत्रानें लोप केल्यावर अवशिष्ट 'भो' हा शब्द एकदेशविकृतन्यायानें 'भोर्' आहे असें मानलें तरी, त्या एकदेश-विकृत 'भो' शब्दाच्या अन्तीं 'रु' नसून 'ओ' असल्यामुळें व 'ओ' चे जागीं यकारादेश होणें सांगितलें नसून 'रु' चे जागींच तो आदेश होणें सांगितलें असल्यामुळें, 'भो' यांतील अन्त्य 'ओ' चें यत्व होण्याची आपत्तीच येत नाहीं.आतां दीक्षितांनी मनोरमेंत 'ननु रोरुकारस्यानुबन्ध-त्वात् .. परिगणनमशुद्धमित्यवधेयम्' असें जें म्हटलें आहे त्या संबंधानें शब्दरत्नकार असें म्हणतात कीं,) 'ग्रहोऽलिटि दीर्घः' सू. २५६२ या सूत्रांत 'इट्' या समुदायाचा स्थानी या रूपानें निर्देश केला असल्यामुळें, तेथें अनल् स्थानीचें ग्रहण केलें आहे असें मानतां येतें, पण प्रकृत स्थलीं अल्रूप रेफ हाच विसर्गाचा स्थानी निर्दिष्ट असल्या-मुळें, या दोन स्थलीं वैष्यम्य आहे, म्हणजे द्वितीय स्थलीं स्थानीचें अल्रूपानें ग्रहण केलें आहे, हें स्पष्ट होतें. दुसरे असें कीं, 'अनल्विधौ' या प्रतिषेधाचा असा अर्थ आहे कीं, जर स्थानी अल् असला तर त्या अल्रूप स्थानीचे ठिकाणीं असलेला धर्म व तसेंच (स्थानी जरी अनेकाल् असला तरी त्या) स्थानीच्या अवयवभूत अल्चे ठिकाणीं असणारा धर्म आदेशाचे ठिकाणीं ('स्थानिवदादेशः' या) अतिदेशशास्त्रानें आणतां येत नाहीं, व म्हणून 'देवाः सन्ति' या प्रकृत उदाहरणांत अल्रूप रेफ हा जो

विसर्गाचा स्थानी आहे त्याचे ठिकाणीं असणारा रुत्व धर्म विसर्गरुप आदेशाचे ठिकाणीं आणणें हा अल्विधि ठरत असल्यामुळें, तो धर्म आदेशाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें आणतां येणें अशक्य आहे व हें सर्व प्रकृत सूत्रावरील भाष्यांत स्पष्ट केलें आहे असें जर म्हणणें असेल तर मग, 'पयःसु' या स्थलीं विसर्गाचें यत्व न व्हावें याकरितां प्रकृत सूत्रांत 'अशि' या पदाचें ग्रहण केलें आहे असेंच मानलें पाहिजे; कारण 'पयःसु' या उदाहरणांत 'रोः सुपि' सू. ३३९ या सूत्रानें ('रु' या अनल्रूप समुदायाचे जागीं) विसर्ग झाला आहे. नियामक शास्त्राची (निषेधरूपानें प्रवृत्ति होत नसून) विधिरूपानेंच प्रवृत्ति होत असल्यामुळें व 'रोः सुपि' या नियामक सूत्रांत उकारानुबन्धविशिष्ट 'रु' या समुदायाचा स्थानी या रुपानें निर्देश केला असल्यामुळें त्या स्थानीचे ठिकाणीं असणारा रुत्वधर्म विसर्गरुप आदेशाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें सहज आणतां येतो (व तसें करितांना 'अनल्विधौ' हा प्रतिषेध लागू पडत नाहीं.) पण जर 'रोः सुपि' या सूत्रांत देखील ('रो रि' या पूर्वसूत्रांतून) 'रः' या पदाची अनुवृत्ति केली व त्या सूत्रान्वयें देखील 'रु'च्या रेफाचाच विसर्ग होतो, म्हणजे त्या सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचा देखील 'रु' हा अनल्रुप समुदाय स्थानी नसून अल्रुप रेफ हाच स्थानी आहे, असे म्हणणें असेल, तर मग असेंच मानलें पाहिजे कीं, उत्तर सूत्रांत—'हलि सर्वेषाम्' या उत्तर सूत्रांत—'अशि' या पदाची अनुवृत्ति व्हावी व प्रकृत सूत्राचा अर्थ स्पष्ट व्हावा याकरितां प्रकृत सूत्रांतच त्या पदाचें ग्रहण केलें आहे हें लक्षांत ठेवावें. ('देवाः सन्ति' या उदाहरणासंबंधानें दीक्षितांचें काय म्हणणें आहे हें पूर्वी मनोरमेंत सांगितलेंच आहे. त्यांच्या म्हणण्याचा थोडक्यांत आशय हा आहे कीं, 'देव + अस् = देवास्' या पदाच्या अन्तीं असणाऱ्या सकाराचे जागीं 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें जो 'रु' आदेश होतो तो उकारानुबन्धविशिष्ट 'रु' हा जो अनल्रूप समुदाय आहे तो किंवा त्यांतील रुत्व धर्म विशिष्ट रेफ हा 'खरवसानयोः' सू. ७६ या सूत्रानें त्या उदाहरणांत

होणाऱ्या विसर्गाचा स्थानी असल्यामुळें, त्या अनल्रुप स्थानींत असणारा रुत्व धर्म विसर्गरूप आदेशाचे ठिकाणीं स्थानिवद्भावाने आणतां येतो व असें करणें हा अल्विधि ठरत नसल्यामुळें या ठिकाणीं 'अनल्विधौ' हा प्रतिषेध लागू पडत नाहीं. त्यांनीं आपल्या - या वरील म्हणण्याचें समर्थन करण्याकरितां 'स्थानिवदादेशः' या सूत्रावरील भाष्यांत 'ग्रहोऽलिटि दीर्घः' या सूत्रासंबंधानें 'विशिष्टं ह्येषोऽनलमाश्रयते इटं नाम' असें जें भाष्यकारांनीं म्हटलें आहे त्याचा आधार दिला आहे. यावर शंकाकार असें म्हणतो कीं, 'ग्रहोऽलिटि दीर्घः' या सूत्रांत 'आर्धधातुकस्येट्' या पूर्व सूत्रांतून 'इट्' या पदाची अनुवृत्ति होत असून तें पद 'इटः' असें विभक्ति-विपरिणामानें स्थानषष्ठ्यन्त होत असल्यामुळें, त्या सूत्रांत टकारानु-बन्धविशिष्ट 'इट्' या अनल्रुप समुदायाचा स्थानी ऱ्या रूपानें निर्देश केला आहे हें स्पष्ट होतें. पण 'खरवसानयोः' या विसर्ग-विधायक सूत्रांत 'रु' हा अनल्रुप समुदाय विसर्गाचा स्थानी निर्दिष्ट नसून, अल्रुप रेफ हाच विसर्गाचा स्थानी निर्दिष्ट आहे; कारण त्या सूत्रांत 'रोः' या षष्ठ्यन्त पदाची कोणत्याहि पूर्व सूत्रांतून अनुवृत्ति होत नसून 'रो रि' या पूर्व सूत्रांतून 'रः' या षष्ठ्यन्त पदाचीच अनुवृत्ति होते. म्हणून 'ग्रहोऽलिटि दीर्घः' या सूत्रांत दीर्घ ईकारादेशाचा स्थानी 'इट्' हा अनल्रूप समुदाय निर्दिष्ट असून 'खरवसानयोः' या सूत्रांत अल्रूप रेफ हाच विसर्गाचा स्थानी निर्दिष्ट असल्यामुळें, या दोन सूत्रांत वैषम्य—फरक—आहे हें स्पष्ट होतें आणि म्हणून ज्या भाष्यवचनाचा दीक्षितांनीं आधार दिला आहे तें भाष्यवचन वर दर्शविलेल्या वैषम्यामुळें प्रकृत स्थलीं लागू पडत नाहीं. म्हणून 'इट्' चे जागीं होणारा दीर्घ ईकार 'इट्'च आहे असें जरी, तो अल्विधि नसल्यामुळें, स्थानिवद्भावानें मानतां येतें तरी, 'देवाः सन्ति' या उदाहरणांत होणाऱ्या विसर्गाचा 'रु' हा समुदाय स्थानी नसून अल्रुप रेफ स्थानी असल्यामुळें, तशा अल्रुप स्थानीचे जागीं होणाऱ्या विसर्गाचे ठिकाणीं, 'अनल्विधौ'

हा प्रतिषेध असल्यामुळें, स्थानिवद्भावानें रुत्वबुद्धि करतां येत नाहीं; कारण 'अनल्विधौ' या प्रतिषेधाचा असा अर्थ आहे कीं, जर अल्‌रूप स्थानी असला तर त्याचे ठिकाणीं असणारा धर्म आदेशाचे ठिकाणीं अतिदेशानें आणतां येत नाहीं. म्हणून प्रकृत स्थलीं रेफ हा अल् जरी 'रु' या उकारानुबन्धविशिष्ट समुदायाचा अवयव आहे तरी, समुदायाचे ठिकाणीं जो रुत्व धर्म आहे त्याचा अल्‌रूप स्थानीचे जागीं होणाऱ्या विसर्गरूप आदेशाचे ठिकाणीं वरील अर्थान्वयें अतिदेश करतां येत नाहीं. जर 'रु' हा समुदाय विसर्गाचा स्थानी निर्दिष्ट असता तरच विसर्गाचे ठिकाणीं रुत्वबुद्धि करतां आली असती. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत 'वृक्षस्तत्र, प्लक्षस्तत्र' या उदाहरणांत होणाऱ्या विसर्गाचा स्थानी भाष्यकारांनीं 'रु' हा समुदाय मानला नसून रेफ हा अल्‌च त्या विसर्गाचा स्थानी मानला आहे व त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, हा अल्विधि असल्यामुळें विसर्गाचे ठिकाणीं रुत्वबुद्धि करतां येत नाहीं आणि त्यामुळें त्या विसर्गाचें प्रकृत सूत्रानें यत्व होण्याची आपत्ति टळते. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत दिलेल्या वरील दोन उदाहरणांत व 'देवाः सन्ति' या प्रकृत उदाहरणांत कांहींच फरक नाहीं; कारण दोन्ही स्थलीं 'खरवसानयोः' या सूत्रानें अल्‌रूप रेफाचेच जागीं विसर्ग झाला आहे आणि म्हणून प्रकृत सूत्रावरील भाष्यान्वयें 'देवाः सन्ति' या उदाहरणांत रेफाचे जागीं झालेल्या विसर्गाचे ठिकाणीं रुत्वबुद्धि करतां येत नसल्यामुळें यत्वाची मुळींच प्राप्ति होत नाहीं. त्यामुळें प्रकृत उदाहरणांत यत्वाची आपत्ति टाळण्याकरितां प्रकृत सूत्रांत 'अशि' या पदाचें ग्रहण आवश्यक आहे असें जें दीक्षितांनीं म्हटलें आहे तें भाष्यविरुद्ध ठरतें हें उघड आहे. हा विषय पदमञ्जरींत हरदत्तानें स्पष्ट केला आहे व असें म्हटलें आहे कीं, 'अश्ग्रहणमनर्थकमन्यत्राभावात्, अशोऽन्यः खर्भवति, तत्र च पूर्वत्रासिद्धमिति यत्वस्यासिद्धत्वाद्वि-सर्जनीयेन भाव्यं, कृते विसर्जनीये स्थानिवद्भावाद्रुग्रहणेन ग्रहणात्तस्या-त्प्रसङ्ग इति चेन्न, अल्स्थानिकत्वात् । अत्र हि रोर्यो रेफस्स विसर्ज-

नीयस्य स्थानी न पुना रुरेव, किं च यत्वस्याप्यस्य रोर्यो रेफः स एव स्थानी न पुनारुरेव, तस्मादल्विधित्वादपि नास्ति स्थानिवद्भावः।' हरदत्ताचें हें व्याख्यान भाष्यानुसार असून दीक्षितांनीं केलेलें व्याख्यान भाष्यविरुद्ध असल्यामुळें, 'देवाः सन्ति' या उदाहरणांत विसर्गाचें यत्व होण्याची आपत्ति टाळण्याकरितां प्रकृत सूत्रांत 'अश्' ग्रहण केलें आहे हें त्यांचें म्हणणें स्वीकारतां येत नाहीं. मग प्रकृत सूत्रांत 'अश्' ग्रहण कां केलें आहे ? या प्रश्नाचें शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'पयःसु, छन्दःसु' या उदाहरणांत जो विसर्ग झाला आहे तो 'खरवसानयोः' या सूत्रानें अल्रूप रेफाचे जागीं झाला नसून 'रोः सुपि' सू. ३३९ या सूत्रानें 'रु' या अनल्रूप समुदायाचे जागीं झाला असल्यामुळें, त्या विसर्गाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें रुत्वबुद्धि करतां येते व त्या विसर्गाचें यत्व न व्हावें याकरितां प्रकृत सूत्रांत अश्ग्रहण केलें आहे व त्यामुळें वरील दोन्हीं उदाहरणांत विसर्गापुढें 'अश्' नसून 'सु' प्रत्ययांतील सकार हा 'खर्' असल्यामुळें, विसर्गाचें यत्व होण्याची आपत्ति टळते आणि अशा रीतीनें प्रकृत सूत्रांत केलेलें अश्ग्रहण चरितार्थ ठरतें. आतां कोणी असें म्हणेल कीं, 'रु' यांतील उकार हा अनुबन्ध असून इत्संज्ञक असल्यामुळें, 'रोः सुपि' या सूत्रानें होणाऱ्या विसर्गाचा देखील अल्रूप रेफ हाच वास्तविक स्थानी ठरतो व तो स्थानी अल् असल्यामुळें त्याचे जागीं होणाऱ्या विसर्गाचे ठिकाणीं रुत्वबुद्धि करणें हा अल्विधि ठरत असल्यामुळें व 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें, त्या विसर्गाचे ठिकाणीं देखील रुत्वबुद्धि करतां येत नाहीं; म्हणून जशी 'वृक्षस्तत्र, प्लक्षस्तत्र' किंवा 'देवाः सन्ति' या उदाहरणांत यत्वाची प्राप्ति होत नाहीं तशीच 'पयःसु, छन्दःसु' या उदाहरणांत देखील यत्वाची प्राप्ति होत नाहीं व त्यामुळें प्रकृत सूत्रांतील 'अश्' ग्रहण व्यर्थ ठरतें. पण हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'उच्चारणकाले यः श्रुतः स स्थानित्वेनाश्रीयते, न तु प्रतिपत्तिकाले' असा भाष्यसिद्धान्त आहे. म्हणून 'रोः सुपि'

या सूत्रांत 'रु' हा अनल्रुप समुदाय विसर्गाचा स्थानी निर्दिष्ट असल्यामुळें व 'निर्दिश्यमानस्यादेशा भवन्ति' हा न्याय असल्यामुळें, त्या सूत्रांत अल्रूप रेफ हा विसर्गाचा स्थानी आहे असें मानतां येत नाहीं. आतां 'रोः सुपि' हें नियामक सूत्र असल्यामुळें या सूत्राचा 'बहुवचने सुपि परे रुभिन्नस्य विसर्गो न भवति' असा निषेधरूप अर्थ केल्यानें हें सूत्र विसर्गविधायक सूत्र ठरत नाहीं व त्यामुळें 'छन्दःसु, पयःसु' या स्थलीं त्या सूत्रानें विसर्ग झाला आहे असें मानतां येत नाहीं अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर 'नियमशास्त्राणां विधिमुखेनैव प्रवृत्तिः' असें शद्बरत्नकारांनीं उत्तर दिलें आहे व भाष्यकारांनीं पस्पशान्हिकांत 'यथा लौकिकवैदिकेषु' या वचनाचें व्याख्यान करितांना 'सति सम्भवे नियमशास्त्राणां विधिमुखेनैव प्रवृत्तिः' हा न्याय ध्वनित केला आहे. नियमशास्त्र निषेधमुखानें प्रवृत्त केल्यास स्वार्थहानि, परार्थकल्पना व शास्त्रबाध हे तीन दोष येत असल्यामुळें, नियमशास्त्राचा विधिरूपानेंच अर्थ करणें उचित आहे असा त्या न्यायाचा आशय आहे. म्हणून 'रोः सुपि' या नियामक सूत्राचा कौमुदींत दिल्याप्रमाणें 'सप्तमी बहुवचने रोरेव विसर्जनीयो नान्यस्य रेफस्य' असा विधिरूप अर्थ केल्यानें, तें सूत्र देखील विसर्गविधायक सूत्र ठरतें व त्या सूत्रानें 'पयःसु, छन्दःसु' या उदाहरणांत विसर्ग झाला आहे असें म्हणतां येतें आणि तो विसर्ग त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या अनल्रूप 'रु' या स्थानीचे जागीं झाला असल्यामुळें व त्या अनल्स्थानिक विसर्गाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें रुत्वबुद्धि करतां येत असल्यामुळें, त्या विसर्गाचें यत्व होण्याची जी आपत्ति येते तिचें निवारण करण्याकरितां प्रकृत सूत्रांत 'अश्'ग्रहण केलें आहे असें म्हणतां येतें असें शद्बरत्नकार सुचवितात. परंतु भाष्यकारांनीं 'रोः सुपि' या सूत्रांत देखील 'रो रि' या पूर्व सूत्रांतून 'रः' या षष्ठ्यन्त पदाची अनुवृत्ति करून 'रोः रः विसर्जनीयः स्यात् सुपि परे सति' असा त्या सूत्राचा अर्थ केला आहे. त्या अर्थान्वयें त्या सूत्रानें होणाऱ्या

विसर्गाचा देखील अल्‌रुप रेफ हाच स्थानी ठरत असल्यामुळें, 'पयःसु, छन्दःसु' या उदाहरणांत देखील अल्‌रुप रेफाचे जागीं होणाऱ्या विसर्गाचे ठिकाणीं रुत्वबुद्धि करतां येत नाहीं व त्यामुळें त्या दोन स्थलीं देखील विसर्गाचें यत्व होण्याची आपत्ति येत नसल्यामुळें, प्रकृत सूत्रांतील 'अश्'ग्रहण व्यर्थ ठरतें. मग जर विसर्ग सर्वत्र अल्‌रुप रेफाचेच जागीं होतो व त्यामुळें त्या विसर्गाचे ठिकाणीं रुत्वबुद्धि करतां येत नाहीं आणि अशा रीतीनें त्या विसर्गाचें यत्व होण्याची केव्हांहि आपत्ति येत नाहीं तर, पाणिनीनें प्रकृत सूत्रांत 'अश्'ग्रहण कां केलें आहे? या प्रश्नाचें शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'हलि सर्वेषाम्' या उत्तर सूत्रांत 'अशि' या पदाची अनुवृत्ति व्हावी याकरितां पाणिनीनें प्रकृत सूत्रांत 'अश्'ग्रहण केलें आहे. त्या सूत्रांत 'अशि' या पदाची अनुवृत्ति केल्यानें व 'अशि' हें 'हलि' या पदाचें विशेषण मानल्यानें 'अश्रूपे हलि' असा 'अशि हलि' या पदांचा अर्थ होऊन, 'यकारवकारयोः लोपः स्यादशि हलि सर्वेषां मतेन' असा 'हलि सर्वेषाम्' सू. १७१ या सूत्राचा अर्थ होतो व त्या अर्थान्वयें 'वृक्षव् करोति' या उदाहरणांत, 'वृक्षं वातीति वृक्षवाः, तमाचष्टे = वृक्षवा+णिच्+क्विप्+सु' या स्थलीं 'वृक्षवा' या प्रातिपदिकाहून 'प्रातिपदिकाद्धात्वर्थे बहुलमिष्ठ-वच्च' या गणसूत्रानें 'तत्करोति तदाचष्टे' या अर्थामध्यें 'णिच्' प्रत्यय करून त्या णिजन्ताहून 'क्विप् = व्' प्रत्यय केला असतां, 'णेरनिटि' सू. २३१३ या सूत्रानें 'णि'लोप होऊन व इष्ठवद्भावानें 'टेः' सू. १७८६ या सूत्रानें 'वृक्षवा' यांतील 'आ' या 'टि'चा लोप होऊन व 'वेरपृक्तस्य' सू. ३७५ या सूत्रानें 'क्विप् = व्' हा अपृक्त प्रत्यय नाहींसा होऊन आणि 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लोप होऊन 'वृक्षव्' असें जें प्रथमेच्या एकवचनाचें रूप होतें त्यापुढें 'अश्'रूप हल् नसून 'करोति' यांतील ककार हा 'खर्'रूप हल् असल्यामुळें, 'वृक्षव्' यांतील अन्त्य वकाराचा लोप होत नाहीं व 'वृक्षव् करोति' असा इष्ट प्रयोग सिद्ध होतो.

मग जर पाणिनीचा 'उत्तरार्थमश्ग्रहणमिह कृतम्' असा हेतु होता तर त्यानें 'हलि सर्वेषाम्' या सूत्रांतच 'अशि' या पदाचें ग्रहण कां केलें नाहीं व प्रकृत सूत्रांत त्या पदाचें ग्रहण कां केलें? या प्रश्नाचें शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, प्रकृत सूत्राचा अर्थ स्पष्ट व्हावा, म्हणजे 'अश्' पुढें असतांनाच 'रु' चें यत्व होणें शक्य आहे व 'खर्' पुढें असतांना त्या 'रु' तील रेफाचा 'खरवसानयोः' या त्रैपादिक पूर्वसूत्रानें अवश्य विसर्ग होणार असल्यामुळें त्याचें यत्व होणें शक्य नाहीं हें एकदम लक्षांत यावें, याकरितां प्रकृत सूत्रांतच 'अश्' ग्रहण केलें आहे व अशा रीतीनें प्रकृत सूत्राचा अर्थ स्पष्ट होणें व 'हलि सर्वेषाम्' या उत्तरसूत्रांत 'अशि' या पदाची अनुवृत्ति होणें हीं दोन्हीं कार्यें पाणिनीनें साधलीं आहेत. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत ८–३–१७ भाष्यकारांनीं 'अश्ग्रहणमनर्थकमन्यत्राभावात्' हें वार्तिक पठित करून असें म्हटलें आहे कीं, जर 'वृक्षस्तत्र, प्लक्षस्तत्र' आणि 'छन्दःसु, पयःसु' या दोन्ही प्रकारच्या उदाहरणांत होणारा विधि अल्विधि मानतां येणें शक्य असेल तरच तें वार्तिक स्वीकारतां येतें व प्रकृत सूत्रांतील 'अश्' ग्रहण व्यर्थ मानतां येतें. वरील चार उदाहरणांत होणारा विधि अल्विधि आहे असें मानतां येणें शक्य आहे काय असा प्रश्न करून भाष्यकार त्या प्रश्नाचें पुढें लिहिल्याप्रमाणें उत्तर देतातः—'बाढं शक्यम्। अल्विधिस्तर्हि भविष्यति। कथम्?। इदमस्ति रो रीति। ततो वक्ष्यामि—खरवसानयोर्विसर्जनीयः—रः। ततो रोः सुपि। विसर्जनीयो र इत्येव। उत्तरार्थं तर्हि अश्ग्रहणं कर्तव्यं,—हलि सर्वेषां,—हल्यशीति यथा स्यादिह मा भूत—वृक्षवयतेरप्रत्ययो—वृक्षव् करोति।' या भाष्याच्या आधारावरच शद्वरत्नांतील वरील ग्रन्थ लिहिला आहे व प्रकृत सूत्रावरील शद्वेन्दुशेखरांत देखील असेंच विवरण केलें आहे हें लक्षांत ठेवावें.)

शद्वरत्न— तत्रेति चादिष्वित्यर्थः। वार्तिकं नाश्रयणीयमिति। भो इत्यादिप्रयोगाणां निपातैरेव सिद्धेः। निपातानामपि सम्बोध-

नान्तभवदादिसमानार्थकत्वात्सम्बोधनविभक्त्यन्तत्वेनामन्त्रितत्वमस्ति । "भवदादि" इत्यत्र भोः शब्दस्याप्यादिना ग्रहणात्तत्रभोः इत्यादि-सिद्धिरिति भावः । अन्यथा = साधारणानामभावे । भो विद्वद्वृन्देति । नपुंसके सोर्लुका लुप्तत्वेन वार्तिकाप्रवृत्तेरिति भावः । भो गङ्गे इति । विभक्तौ लिङ्गविशिष्टाग्रहणान्ङीपा व्यवधानाद्भवतः सम्बुद्धिपरत्वाभावेनेति भावः । "स्युः प्याङ्–" इत्यस्य 'निपातमा-त्राङ्गीकारे' इत्यादिः । ननु निपातोऽव्ययं भवच्छब्दसमानार्थ एवेति हे भो इत्यस्य नासङ्गतिः । अत एव भाष्यकैयटयोर्वार्त्तिकसिद्धविभ-क्त्यन्तप्रतिरूपकमव्ययमित्युक्तं, विभक्त्यन्तप्रतिरूपकत्वं च शब्दतोऽ-र्थतश्च इत्यन्यत्र स्पष्टम् । किं च व्यतिलुनीत इत्यादिवदेतयोरपि सहप्रयोग सम्भव इत्यरुचेराह–किं चेति । पदात्परस्येति । इदं च न भोः शब्दे फलमुभयोरपि भोः शब्दयोः सम्बोधनप्रथमान्तत्वेनामन्त्रि-तत्वात् । किं तु तिष्ठसि भगो, तिष्ठसि अघो इत्यादौ भगवन्, अघवन् तिष्ठसीत्यर्थ के "आमन्त्रितस्य–" इति निघातसिद्धिः । निपातयोस्तु तयोः सम्बोधने शक्तौ मानाभावेन सम्बोधनप्रथमान्तत्वा-भावेनामन्त्रितत्वाभावात् । भगो तिष्ठसीत्यादौ अविद्यमानत्वम् । आम् देवदत्तभगो इत्यादौ, एकान्तरता । भगोभगो आगच्छेत्यादौ द्विर्भावः । धनेन भगो इत्यादौ पराङ्गत्वमिति भावः । यदि प्रामा-णिकाविति । यदीत्यनेनेदं सूचितं तौ न प्रामाणिकौ । अत एव भाष्ये "विभाषा भवत्––" इति व्याख्याय भो ब्राह्मणा भो ब्राह्मणीत्य-स्यैवासिद्धिमाशङ्क्याव्ययमेष भोः शब्दो विभक्तिप्रतिरूपकत्वादित्ये-वोक्तम् । एवं च भगो हरिहरावित्याद्यसाध्वेव ।

'तत्र बोध्याः' या मनोरमेच्या पंक्तींतील 'तत्र' या पदाचा 'चादिषु'–म्हणजे 'चादि' या आकृतिगणांत–असा अर्थ आहे. 'तथा च विभाषा भवद्भगवदिति वार्तिकं नाश्रयणीयम्' असें जें हरदत्तादिकांचें म्हणणें मनोरमेंत सांगितलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'भोस्, भगोस्, अघोस्' हे सान्त किंवा कृतरान्त निपात मानल्यानें भाषेंतील 'भोः' इत्यादि प्रयोग सिद्ध होतातच

(आणि म्हणून तें वार्तिक मानण्याची कांहीं गरज नाहीं.) 'विभाषा भवद्भगवत्' या वार्तिकांत निर्दिष्ट असलेल्या 'भवत्' इत्यादि शद्बांच्या संबोधनाच्या रुपाचा जो अर्थ होतो तोच 'भो' इत्यादि निपातांचा देखील होत असल्यामुळें व अशा रीतीनें वार्तिकनिष्पन्न शद्ब आणि हे निपात समानार्थक असल्यामुळें, 'भो' इत्यादि निपात संबोधनविभक्त्यन्त मानतां येतात आणि त्यामुळें ('सामन्त्रितम्' सू. ४११ या सूत्रानें होणारी) आमन्त्रितसंज्ञा 'भो' इत्यादि निपातांना होऊं शकतेच, (आणि 'इतराभ्योऽपि दृश्यन्ते' या सूत्रावरील भाष्यांत 'भवदादिभिर्योगे' असें जें वार्तिक पठित केलें आहे त्या वार्तिकांतील) 'भवदादि' शद्बामध्यें जो 'आदि' शद्ब आहे त्यानें 'भोः' या शद्बाचें देखील ग्रहण होत असल्यामुळें (ज्याप्रमाणें 'तत्र भवान्, ततो भवान्' इत्यादि प्रयोग सिद्ध होतात त्याचप्रमाणें) 'तत्रभोः' इत्यादि प्रयोग देखील सिद्ध होऊं शकतात. (सारांश आमन्त्रिताला जीं कार्यें होणें सांगितलीं आहेत तीं कार्यें 'भो' इत्यादि संबोधनार्थक निपातांना होऊं शकत असल्यामुळें व तसेंच 'भवदादिभिर्योगे' या वार्तिकांतील 'आदि' शद्बानें 'भो' या संबोधनात्मक निपाताचें ग्रहण होत असल्यामुळें आणि अशा रीतीनें 'तत्र भोः' इत्यादि प्रयोग सिद्ध होऊं शकत असल्यामुळें, 'विभाषा भवत्' हें वार्तिक असण्याची कांहीं गरज नाहीं असें हरदत्तादिकांचें म्हणणें आहे.) मनोरमेंतील 'अन्यथा पुल्लिङ्गैक-वचनमात्रे' या पंक्तींतील 'अन्यथा' या पदाचा 'साधारणानाम-भावे,' म्हणजे तीन्ही लिङ्गांत व तीन्ही वचनांत ज्यांचा प्रयोग होऊं शकतो असे 'भोस्' इत्यादि संबोधनार्थक निपात न मानल्यास, असा अर्थ आहे. 'भो विद्वद्वृन्द, भो गङ्गे इत्यादि न सिध्येत्' या मनोरमेंतील पंक्तींत 'भो विद्वद्वृन्द' हा नपुंसकाचा प्रयोग, 'भो' हा निपात न मानल्यास, सिद्ध होऊं शकणार नाहीं असें जें म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'भो विद्वद्वृन्द' या नपुंसकलिङ्गाच्या प्रयोगांत 'भवत्' शद्बाहून संबुद्धीचा 'सु' प्रत्यय

केला असतां त्या प्रत्ययाचा ('स्वमोर्नपुंसकात्' सू. ३१९ या सूत्रानें) लुक् होत असल्यामुळें 'विभाषा भवत्' या वार्तिकाची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं (कारण 'मतुवसो रु सम्बुद्धौ' या सूत्रांत पठित असलेलें तें वार्तिक तेव्हांच प्रवृत्त होऊं शकतें कीं, जेव्हां त्या वार्तिकांत निर्दिष्ट असलेल्या 'भवत्' इत्यादि शद्वांच्या लगेंच पुढें 'सु' हा संबुद्धीचा प्रत्यय विद्यमान आहे. त्या वार्तिकान्वयें होणारें कार्य त्रैपादिक असून 'स्वमोर्नपुंसकात्' या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लुक् होणें हें कार्य सापादिक असल्यामुळें, तें सापादिक कार्य प्रथम होतें व तें कार्य प्रथम होऊन 'सु' प्रत्ययाचा लुक् झाला असतां 'भवत्' शद्वापुढें संबुद्धीचा 'सु' प्रत्यय राहत नसल्यामुळें, वरील वार्तिक प्रवृत्त होऊं शकत नाहीं. येथें अङ्गाला प्रत्ययनिमित्तक कार्य करणें असल्यामुळें व 'न लुमताङ्गस्य' सू. २६३ हा निषेध असल्यामुळें, 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्राची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं व 'सु' प्रत्यय विद्यमान आहे असें प्रत्ययलक्षणानें मानतां येत नाहीं आणि त्यामुळें 'भवत्' शद्वाचें 'भोः' असें नपुंसकाचें संबुद्धीचें रूप सिद्ध होऊं शकत नाहीं आणि म्हणून 'भो विद्वद्वृन्द' असा नपुंसकलिङ्गाचा प्रयोग, 'भो' हा निपात न मानल्यास, सिद्ध न होण्याची आपत्ति येते असा हरदत्तादिकांच्या म्हणण्याचा आशय आहे असें शद्वरत्नकार म्हणतात.) 'भोः' हा निपात न मानल्यास 'भो गङ्गे' हा स्त्रीलिङ्गाचा प्रयोग सिद्ध होऊं शकणार नाहीं असें जें मनोरमेच्या 'अन्यथा... इत्यादि न सिध्येत्' या पंक्तींत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'विभक्तौ लिङ्गविशिष्टाग्रहणम्'–परि. ७३–ही परिभाषा असल्यामुळें, (वरील वार्तिकांत निर्दिष्ट असलेल्या 'भवत्' या प्रातिपदिकानें 'भवती' या स्त्रीलिङ्गरूपाचें ग्रहण होऊं शकत नाहीं. म्हणून 'भवत्' या उगित् सर्वनामाहून 'उगितश्च' सू. ४५५ या सूत्रानें 'ङीप्' प्रत्यय झाल्यावर त्या ङीप्प्रत्ययान्त शद्वाहून संबुद्धीचा 'सु' प्रत्यय केला असतां 'भवत्+ङीप्+सु' या स्थितींत)

'भवत्' शद्वाच्या लगेंच पुढें 'सु' हा संबुद्धीचा प्रत्यय येत नसून दोहो-मध्यें 'ङीप्' चें व्यवधान होत असल्यामुळें, वरील वार्तिक प्रवृत्त होऊं शकत नाहीं. (व त्यामुळें 'भवत्' शब्दाचें 'भोः' असें स्त्रीलिङ्गाचें संबुद्धीचें रूप सिद्ध होऊं शकत नाहीं आणि म्हणून 'भो' हा निपात न मानतां केवळ वरील वार्तिक मानल्यास, 'भो गङ्गे' हा स्त्रीलिङ्गाचा प्रयोग सिद्ध होऊं शकत नाहीं असा हरदत्तादिकांच्या म्हणण्याचा आशय आहे असें शब्दरत्नकार म्हणतात.) 'स्युः प्याट्-पाडङ्गहेहेभो......सह प्रयोगायोगात्' या मनोरमेंतील पंक्तीच्या पूर्वीं 'निपातमात्राङ्गीकारे' हें पद अध्याहृत आहे (व त्यामुळें त्या पंक्तीचा अर्थ असा होतो कीं, वरील वार्तिक न मानल्यास व 'भो, भगो, अघो' हेच संबोधनार्थक निपात मानल्यास, 'हे' व 'भो' हे दोन्ही समानार्थक निपात असल्यामुळें 'हे भोः' असा इष्ट प्रयोग करतां येणार नाहीं. येथें शंकाकार अशी शंका करतो कीं) 'भो' हा निपात देखील 'भवन्' या संबुद्धचन्त शब्दाशीं समानार्थक आहेच व त्यामुळें 'हे भोः' हा प्रयोग असङ्गत – चूक – ठरूं शकत नाहीं. (सारांश 'हे भवन्' हा प्रयोग जसा शुद्ध ठरतो त्याप्रमाणें 'हे भोः' हा तत्समानार्थक प्रयोग देखील शुद्ध ठरतो.) 'भोः' हा निपात 'भवन्' या संबुद्धचन्त शब्दाशीं समानार्थक असल्यामुळेंच, भाष्यकार व कैयट यांनीं 'विभाषा भवत्' या वार्तिकानें सिद्ध होणाऱ्या संबुद्धिविभक्त्यन्त 'भोः' या शब्दासारखें 'भोः' हें विभक्तिप्रतिरूपक अव्यय आहे असें म्हटलें आहे; आणि अव्ययाचे ठिकाणीं जें विभक्त्यन्तप्रतिरूपकत्व असतें तें केवळ विभक्त्यन्त शब्दाचें व अव्ययाचें स्वरूप, म्हणजे वर्णानुपूर्वीविशिष्टत्व, सारखें असल्यामुळेंच नसून, अर्थामध्यें देखील दोहोंचें सादृश्य असल्यामुळें असतें असें इतर स्थलीं – मतुप्सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं – स्पष्टपणें सांगितलें आहे. ('तदस्यास्त्यस्मिन्निति मतुप्' ५-२-९४ या सूत्रावरील भाष्यांत त्या सूत्रांत 'अस्ति' या पदाचें ग्रहण कां केलें आहे याचें प्रयोजन सांगतांना भाष्यकार म्हणतात –'अस्तिमानिति

मतुब्यथा स्यात् । किं च कारणं न स्यात् ? । अप्रातिपदिकत्वात् । नैष दोषः । अव्ययमेषोऽस्तिशब्दो, नैषोऽस्तेर्लट् । कथमव्ययत्वम् ? । विभक्तिस्वरप्रतिरूपकाश्च निपाता भवन्तीति निपातसंज्ञा, निपातोऽव्ययमित्यव्ययसंज्ञा ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, 'अस्ति' या शब्दाहून मतुप्प्रत्यय व्हावा याकरितां वरील 'मतुप्'विधायक सूत्रांत 'अस्ति' या शब्दाचें ग्रहण केलें आहे. पण 'अस्ति' हें 'अस्' धातूचें लटाचें प्रथम पुरुषाच्या एकवचनाचें रूप असल्यामुळें, 'अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपदिकम्' सू. १७८ या सूत्रानें होणारी प्रातिपदिकसंज्ञा 'अस्ति' या प्रत्ययान्ताला होऊं शकत नाहीं व 'ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ या अधिकारसूत्रान्वयें प्रातिपदिकाहूनच 'मतुप्'प्रत्यय होऊं शकत असल्यामुळें, 'अस्ति' या क्रियापदाहून 'मतुप्'प्रत्यय कसा होऊं शकणार अशी शंका उपस्थित करून त्या शंकेचें निवारण करतेवेळीं भाष्यकार म्हणतात कीं, मतुप्विधायक 'तदस्यास्ति' या सूत्रांत निर्दिष्ट असलेला 'अस्ति' हा शब्द 'अस्' धातूचें लटाचें रूप नसून अव्यय आहे व त्याचें कारण हें कीं, 'विभक्तिस्वरप्रतिरूपकाश्च निपाता भवन्ति' या वचनान्वयें विभक्तिप्रतिरूपक 'अस्ति' शब्दाला निपातसंज्ञा होते व अशा रीतीनें तो शब्द निपातसंज्ञक ठरत असल्यामुळें 'स्वरादिनिपातमव्ययम्' सू. ४४७ या सूत्रानें त्याला अव्ययसंज्ञा होते. या भाष्यावरील वृत्तींत कैयटानें 'अव्ययमिति' हें प्रतीक घेऊन 'कर्तृविशिष्टसत्तावाचीति भावः । तथा चास्ति त्वमिति भावप्रत्ययप्रयोगोपपत्तिः । ... तत्रास्तिमानिति वृत्तिविषयेऽस्तिक्रियायाः कर्तृविशेषे धनेऽस्तिशब्दो वर्तते ।' असें म्हटलें आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'अस्ति' हें अव्यय 'अस्ति' या क्रियापदाशीं केवळ स्वरूपामध्यें समान नसून अर्थामध्यें देखील—कर्तृविशिष्टसत्तारूप अर्थामध्यें देखील—समान आहे व 'अस्तिमान्' याचा 'धनवान्' असा अर्थ आहे. सारांश विभक्तिप्रतिरूपकत्व केवळ स्वरूपसादृश्यानें होत नसून अर्थामध्यें देखील सादृश्य असलें तरच होतें हें वरील व्याख्यानावरून सिद्ध होतें. प्रकृत स्थलीं

भाष्यकारांनीं 'भोः' हें विभक्तिप्रतिरूपक अव्यय मानलें असल्यामुळें, वार्तिकनिष्पन्न 'भोः' या शब्दाशीं तें समानार्थक आहे हें सिद्ध होतें, आणि वार्तिकनिष्पन्न 'भोः' या शब्दाचा 'हे भोः' असा प्रयोग जसा होऊं शकतो त्याचप्रमाणें 'भोः' या विभक्तिप्रतिरूपक अव्ययाचा देखील 'हे भोः' असा प्रयोग करतां येतो असें शंकाकाराचें म्हणणें आहे.) दुसरें असें कीं, 'व्यतिलुनीते' इत्यादि प्रयोगांसारखा 'हे' व 'भोः' या दोन शद्बांचा देखील एकत्र प्रयोग होऊं शकतो. ('व्यतिलुनीते' या स्थलीं 'कर्तरि कर्मव्यतिहारे' सू.२६८० या सूत्रानें 'क्रियाविनिमय' या अर्थामध्यें आत्मनेपदी प्रत्यय झाला आहे व 'व्यति' हा उपसर्गसमुदाय देखील 'क्रियाविनिमय' याच अर्थाचा वाचक आहे. सारांश आत्मनेपदी प्रत्ययाचा जो अर्थ आहे तोच 'व्यति' या उपसर्गसमुदायाचा अर्थ असून देखील जसा 'व्यतिलुनीते' हा प्रयोग होऊं शकतो त्याचप्रमाणें 'हे भोः' हा प्रयोग देखील करतां येतो असें शंकाकाराचें म्हणणें आहे. टीकाकारांनीं या विषयाचीं 'व्यावक्रोशी, व्यावहासी' हीं देखील उदाहरणें दिलीं आहेत. या दोन्ही उदाहरणांत धातूहून 'भावे णच्' प्रत्यय झाला आहे व स्त्रीत्व गम्यमान असतांनाच हा प्रत्यय होत असतो व तो प्रत्यय केल्यावर 'णचः स्त्रियामञ्' सू. ३२१६ या सूत्रानें स्वार्थिक तद्धित 'अञ्' प्रत्यय होतो आणि 'अञ्' प्रत्यय झाल्यावर 'टिड्ढाणञ्' सू. ४७० या सूत्रानें स्त्रीत्ववाचक 'ङीप्' प्रत्यय होऊन 'व्यावक्रोशी, व्यावहासी' ही रूपें सिद्ध होतात. या वरील दोन उदाहरणांत स्त्रीत्ववाचक 'णच्' प्रत्यय, तसेंच स्वार्थिक--स्त्रीत्ववाचक--'अञ्' प्रत्यय आणि तसेंच स्त्रीत्ववाचक 'ङीप्' प्रत्यय या तीहींचा सहप्रयोग आढळतो. त्यामुळें 'हे भोः' असा दोन समानार्थक निपातांचा सहप्रयोग होण्यांत व्याकरणदृष्टचा कांहीं दोष येत नाहीं. 'ननु निपातोऽप्ययं......सहप्रयोगसम्भवः' हा सर्व शंकाग्रन्थ आहे व या शंकाग्रन्थांत केलेली शंका यथार्थ आहे हें जाणून व 'भवदादि-

भियोगे ' या वार्तिकांतील 'आदि' या शद्वानें पूर्वीं सांगितल्याप्रमाणें 'भोः' या शद्वाचें ग्रहण होऊं शकत असल्यामुळें 'तत्रभवान्, ततोभवान्' या प्रयोगासारखे 'तत्रभोः, ततोभोः' हे प्रयोग देखील सिद्ध होऊं शकतात हेंहि लक्षांत आणून आणि) ही अरुचि मनांत धरुनच दीक्षितांनीं 'किं चामन्त्रिते पदात्परस्याष्टमिकनिघातः' इत्यादि पंक्ति मनोरमेंत पुढें लिहिली आहे. 'भोः' हा निपात व वार्तिकनिष्पन्न 'भोः' हा शब्द या दोहोंचेहि ठिकाणीं संबोधन-प्रथमान्तत्व असल्यामुळें, या दोहोंनाहि (सामन्त्रितम् सू. ४११ या सूत्रानें होणारी) आमन्त्रितसंज्ञा आहेच व त्यामुळें मनोरमेंतील प्रकृत पंक्तींत ज्या फलांचा, आमन्त्रिताला होणाऱ्या कार्यांचा, निर्देश केला आहे तीं फलें 'भोः' या शब्दाला व्हावीं हें 'विभाषा भवत्' या वार्तिकाचें प्रयोजन नाहीं (कारण 'भोः' हा निपात देखील विभक्तिप्रतिरूपक संबुद्ध्न्त मानला असल्यामुळें, तो आम-न्त्रितसंज्ञक ठरतो व त्यामुळें आमन्त्रिताला होणारीं सर्व कार्यें त्याला आपोआपच होऊं शकतात व अशा रीतीनें तीं आमन्त्रित कार्यें 'भो' या शब्दाचे ठिकाणीं अन्यथासिद्ध असल्यामुळें, त्याला तीं कार्यें व्हावीं याकरितां वरील वार्तिक मानण्याची कांहीं गरज नाहीं. परंतु 'भगो, अघो' या दोन शब्दांना तीं कार्यें व्हावीं या-करितां वरील वार्तिक मानणें आवश्यक आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे व याचेंच ते पुढील पंक्तींत विवरण करितात.) परंतु 'भगवन् तिष्ठसि, अघवन् तिष्ठसि' या अर्थामध्यें होणाऱ्या 'तिष्ठसि भगो, तिष्ठसि अघो' इत्यादि प्रयोगांत 'भगो, अघो' हे शब्द 'आमन्त्रितस्य च' सू. ३६५४ या सूत्रानें वरील वार्तिक असल्यामुळेंच सर्वानुदात्त होतात; कारण 'भगो, अघो' हे निपात (जरी मानले तरी ते) संबोधनार्थाचे वाचक आहेत असें मानण्यास कोणतेंहि प्रमाण नसल्यामुळें, ते संबोधनप्रथमावि-भक्त्यन्त आहेत असें मानतां येत नाहीं व त्यामुळें ('सामन्त्रितम्' या सूत्रानें होणारी) आमन्त्रितसंज्ञा त्यांना होऊं शकत नाहीं.

(म्हणून 'तिष्ठसि भगो, तिष्ठसि अघो' या दोन वाक्यांत 'तिष्ठसि' या पदापुढें असणाऱ्या 'भगो, अघो' या शब्दांना आमन्त्रिताला होणारें सर्वानुदात्तत्व व्हावें याकरितां वरील वार्तिक मानणें आवश्यक आहे. ते दोन शब्द केवळ निपात मानल्यानें आमन्त्रितसंज्ञक होऊं शकत नाहींत व त्यामुळें सर्वानुदात्त होऊं शकत नाहींत. वार्तिकनिष्पन्न 'भगो' अघो' हेच शब्द संबोधनार्थक असल्यामुळें आमन्त्रित-संज्ञक ठरून सर्वानुदात्त होतात. म्हणून 'भगो, अघो' या दोन शब्दांकरितांच, वरील वार्तिक मानलें पाहिजे व 'भोः' हा निपात संबुद्ध्यन्त असल्यामुळें व त्या योगानें त्याला आमन्त्रित-कार्यें होऊं शकत असल्यामुळें, त्या शब्दाकरितां तें वार्तिक मानण्याची कांहीं गरज नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) वरील वार्तिक मानल्यासच, 'भगो तिष्ठसि' इत्यादि प्रयोगांत अविद्यमानवद्भाव होतो, 'आम् देवदत्त भगो' इत्यादि प्रयोगांत एकान्तरता होते, 'भगो भगो आगच्छ' इत्यादि प्रयोगांत द्विर्वचन होतें, आणि 'धनेन भगो' इत्यादि प्रयोगांत पराङ्गवद्भाव होतो. ('भगो तिष्ठसि' या उदाहरणांत 'आमन्त्रितं पूर्वमविद्य-मानवत्' सू. ४१२ या सूत्रान्वयें 'तिष्ठसि' या पदापूर्वी असलेलें 'भगो' हें आमन्त्रितसंज्ञक पद विद्यमानच नाहीं असें मानल्यानें 'तिङ्ङतिङः' सू. ३९३५ या सूत्रानें पावलेलें सर्वानुदात्तत्व 'तिष्ठसि' या तिङन्त पदाला होत नाहीं. 'आम् देवदत्त भगो' या वाक्यांत 'आम्' व आमन्त्रितसंज्ञक 'भगो' या, दोन पदांमध्यें 'देवदत्त' या एकाच पदाचें व्यवधान असल्यामुळें व 'आम एकान्तरम्' सू. ३९६२ हें निषेधक सूत्र असल्यामुळें 'आमन्त्रितस्य च' सू. ३६५४ या आष्टमिक सूत्रानें पावलेलें सर्वानुदात्तत्व 'भगो' या आमन्त्रितसंज्ञक शब्दाला होत नाहीं. या वरील वाक्यांत 'भगो' हें आमन्त्रित पद 'देवदत्त' या पदाचें विशेषण असल्यामुळें व 'नामन्त्रिते समानाधिकरणे' सू. ४१३ हें अविद्यमानवद्भावाचें निषे-

धक सूत्र असल्यामुळें, या वाक्यांतील 'देवदत्त' हें आमन्त्रितसंज्ञक पद 'आमन्त्रितं पूर्वमविद्यमानवत्' या सूत्रान्वयें अविद्यमान आहे असें मानतां येत नाहीं हें लक्षांत ठेवावें. या वाक्यांतील 'देवदत्त' हें पद अविद्यमान आहे असें मानल्यास, 'आम एकान्तरम्' हें सूत्र या स्थलीं मुळींच प्रवृत्त होऊं शकणार नाहीं. 'भगो आगच्छ' या संमतिप्रदर्शक वाक्यांत 'भगो' हें आमन्त्रितसंज्ञक पद वाक्यांतील आद्य पद असल्यामुळें, 'वाक्यादेरामन्त्रितस्य' सू. २१४३ या सूत्रानें 'भगो' या पदाचें द्विर्वचन होऊन 'भगो भगो आगच्छ' असा प्रयोग सिद्ध होतो. 'धनेन भगो = धनेन ऐश्वर्यवन्' या उदाहरणांत 'धनेन' हें मतुवर्थक पद करणकारकरूपानें पुढें असणाऱ्या 'भगो' या आमन्त्रितसंज्ञक पदाशीं अन्वित असल्यामुळें, स्वरविधि करतेवेळीं 'सुबामन्त्रिते पराङ्गवत्स्वरे' सू. ३६५६ या सूत्रान्वयें 'धनेन' हें पद 'भगो' या उत्तरपदाचें अङ्ग मानलें जातें व 'धनेन भगो' हें एक पद मानलें जाऊन 'आमन्त्रितस्य च' सू. ३६५३ या षष्ठाध्यायांतील सूत्रान्वयें 'धनेन' यांतील धकारापुढील अकार उदात्त होतो — म्हणजे 'धनेन भगो' हें पद आद्युदात्त होतें. 'भगो' व 'अघो' हे संबोधनार्थक निपात आहेत असें मानण्यास कांहीं प्रमाण नसल्यामुळें, वर दर्शविलेलीं आमन्त्रित कार्यें 'भगो, अघो' या शब्दांस होऊं शकलीं नसतीं. म्हणून 'विभाषा भवत्' हें वार्तिक मानणें आवश्यक आहे असें शब्दरत्नकारांचें म्हणणें आहे.) 'भगो, अघो इति निपातावपि यदि प्रामाणिकौ' या मनोरमेंतील पंक्तींत 'यदि' हें पद घातलें असल्यामुळें दीक्षित असें सुचवितात कीं, 'भगो' व 'अघो' हे निपात आहेत असें मानण्यास कोणतेंहि प्रमाण नाहीं. ('स्युः प्याट्पाडङ्गहे-हेभोः' या अमरकोशांतील वचनांत जसा 'भोः' हा शब्द निपातरूपानें पठित केला आहे त्याप्रमाणें त्या कोशांत किंवा इतर कोणत्याहि कोशांत 'भगो, अघो' हे शब्द निपातरूपानें पठित केले नसल्यामुळें, ते निपात आहेत असें मानतां येत नाहीं.) 'भगो, अघो' हे शब्द निपात नसल्यामुळेंच, भाष्यकारांनीं 'मतुवसो रु' ८. ३. १ या सूत्रावरील

भाष्यांत 'विभाषा भवत्' या वार्तिकाचें व्याख्यान केल्यानंतर 'भो ब्राह्मणाः, भो ब्राह्मणि' हेच प्रयोग (पुल्लिङ्गाच्या संबुद्धीचे प्रयोग नसल्यामुळें वरील वार्तिकान्वयें) सिद्ध होऊं शकणार नाहींत अशी शंका उपस्थित करून त्या शंकेचें निरसन करितांना 'भोः' हा शब्द विभक्तिप्रतिरूपक असल्यामुळें अव्यय आहे एवढेंच म्हटलें आहे व या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'भगो हरिहरौ' ('भगो गङ्गे') इत्यादि प्रयोग अशुद्धच ठरतात. ('भोः' हा जसा निपात आहे तसे 'भगोः, अघोः' हे देखील निपात असते तर वरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'भगो ब्राह्मणाः, भगो ब्राह्मणिः, अघो ब्राह्मणाः, अघो ब्राह्मणि' इत्यादि प्रयोगांसंबंधानें देखील वरप्रमाणें शंका उपस्थित केली असती व त्या शंकेचें निरसन करतेवेळीं असें म्हटलें असतें कीं, 'भगो, अघो' हे निपात विभक्तिप्रतिरूपक अव्ययें ठरत असल्यामुळें तसे प्रयोग शुद्ध ठरतात.)

शब्दरत्न—— तदतिरभसादिति । "भोभगो——" "मतुवसोः——" इति सूत्रयोरस्यार्थस्य भाष्येऽस्पष्टत्वादिति भावः। उभयग्रहणादिति । वार्त्तिकबोधितसाधुत्वानामपि "कुलटाया वा" इत्यादौ कार्यान्तरबोधनाय सूत्रकृताऽनुवादस्य करणादिति भावः। हरदत्तेति । एवं चानित्यत्वात्तदप्रवृत्तौ उभयोर्ग्रहणसिद्धिरिति भावः । "विभाषा भवत्——" इति वार्तिके भो ब्राह्मणा भो ब्राह्मणीत्यसिध्द्याशङ्कायामव्ययमेष भोः शब्द इति सिद्धान्तेनोभयोरत्र ग्रहणलाभादिति बोध्यम् । परस्परसाहचर्येणेति । तेन चार्थवतामेव ग्रहणमिति भावः । अर्थवत्परिभाषयेत्यपि बोध्यम् । अन्येषाम् अनर्थकानां। सान्तरान्तान्यतरानुकरणमिति पक्षे प्रसिध्द्या भोइत्यादिपूर्वकरेफान्तानामेवार्थवतां ग्रहणस्य न्याय्यतया भोइत्याद्योकारान्तानुकरणपक्षेऽपि वार्तिकनिष्पन्नानां निपातानां चैकदेशभूतभोशब्दादीनामेव ग्रहणमिति भावः। अत्रेदन्तत्वं—रान्तानामेवानुकरणं सूत्रे सन्ध्यभावो न्याय्य एवेति भाष्यस्वरसः ।

'यत्तु वदन्ति……अतिरभसात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'भोभगो' व 'मतुवसो:' या दोन्ही सूत्रावरील भाष्यांत प्रकाशकारांनीं जसें म्हटलें आहे तसे भाष्यकारांनी मुळींच म्हटलें नाहीं, म्हणजे भाष्यकारांनीं 'अव्ययमेष भो: शब्द:' एवढेच म्हटलें असून, 'अव्ययाभ्येते' असें म्हटलें नाहीं व वार्तिक-प्रत्याख्यान केलें नाहीं. 'स्वरितत्वमाश्रित्य उभयग्रहणात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ज्याप्रमाणें ('अटतीति अटा, कुलानां अटा कुलटा = कुल + अट् + अच्' या स्थलीं 'शकन्ध्वादिषु पररूपं वाच्यम्'–सू. ७९ वरील वार्तिक–या वार्तिकानें पररूप एकादेश होऊन सिद्ध होणाऱ्या) 'कुलटा' या शब्दाचा 'कुलटाया वा' सू. ११३२ या सूत्रांत अनुवाद करून पाणिनीनें त्या शब्दाला कार्यान्तिर, म्हणजे त्या शब्दाहून अपत्यार्थक 'ढक्' प्रत्यय करतेवेळीं विकल्पेंकरून 'इनङ्' आदेश, होणें सांगितलें आहे त्याचप्रमाणें प्रकृत स्थलीं 'भोभगोअघो' या प्रकृत सूत्रांत 'विभाषा भवत्' या वार्तिकानें निष्पन्न होणाऱ्या 'भोर्, भगोर्, अघोर्' या शब्दांचा अनुवाद करून त्यांच्या अन्त्य वर्णाचे जागीं यकारादेश होणें सांगितलें आहे (व असें मानलें असतां प्रतिपदोक्त व आमन्त्रितसंज्ञक अशा दोन्ही प्रकारच्या त्या शब्दांचें ग्रहण प्रकृत सूत्रांत केलें आहे असें म्हणतां येतें. शंकाकाराची शंका अशी आहे कीं, पाणिनीच्या नंतर वार्तिकें रचलीं गेलीं असल्यामुळें, 'विभाषा भवद्भगवत्' हें वार्तिक पाणि-नीला ज्ञात होतें असें मानतां येऊं शकत नाहीं व त्यामुळें प्रकृत सूत्रांत वार्तिकनिष्पन्न 'भो, भगो, अघो' या शब्दांचें पाणिनीनें ग्रहण केलें आहे असें म्हणतां येऊं शकत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, जरी पाणिनीच्या काळीं वरील वार्तिक नव्हतें तरी त्या काळीं वार्तिकनिष्पन्न शब्द भाषेंत प्रचारांत होते व त्यांचें ज्ञान पाणिनीला होतें असें मानतां येतें. उदाहरणार्थ 'शकन्ध्वादिषु पररूपं वाच्यम्' या अर्थाचें सूत्र जरी पाणिनीनें

केलें नाहीं तरी त्या वार्तिकानें निष्पन्न होणाऱ्या 'कुलटा' या शब्दाचा पाणिनीनें 'कुलटाया वा' या सूत्रांत जसा कार्यान्तर-विधानार्थ निर्देश केला आहे त्याचप्रमाणें त्यानें प्रकृत सूत्रांत 'विभाषा भवत्' या वार्तिकानें निष्पन्न होणाऱ्या व पाणिनीय कालीं भाषेंत रूढ असणाऱ्या त्या शब्दांचा प्रकृत सूत्रांत कार्यान्तर-विधानार्थ, म्हणजे 'रु' चें यत्व होण्याकरितां, निर्देश केला आहे असें मानतां येतें, व तसें मानलें असतां, दोन्ही प्रकारच्या शब्दांचें प्रकृत सूत्रांत ग्रहण केलें आहे असें मानण्यांत कोणताहि प्रत्यवाय येत नाहीं.) 'भुवश्च महाव्याहृतेः इति सूत्रे ... ... हरदत्ताद्युक्तेश्च' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, (हरदत्तादिकांनीं म्हटल्याप्रमाणें) लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा—परि. ११४—अनित्य ठरत असल्यामुळें, तिच्या अनित्यत्वामुळें ती प्रकृत स्थलीं प्रवृत्त न केल्यानें (प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'भो, भगो, अघो' या शब्दांनीं) उभयविध शद्बांचें, म्हणजे प्रतिपदोक्त निपातांचें व तसेंच वार्तिक निष्पन्न लाक्षणिक शद्बांचें, ग्रहण करतां येऊं शकतें. (याचें विवरण पूर्वीं मनोरमेंत केलेंच आहे.) 'विभाषा भवत्' या वार्तिकाचें व्याख्यान करतेवेळीं 'भो ब्राह्मणाः, भो ब्राह्मणि' हे (संबोधनाच्या बहुवचनाचे व स्त्रीलिङ्गाच्या संबुद्धीचे) प्रयोग सिद्ध होऊं शकत नाहींत अशी शंका उपस्थित करून त्या शंकेचें निराकरण करितांना भाष्यकारांनीं ('मतुवसो रु' ८–३–१ या सूत्रावरील भाष्यांत) 'अव्ययमेष भोः शद्बः' असा सिद्धान्त सांगितला असल्यामुळें (प्रकृत सूत्रनिर्दिष्ट 'भो, भगो, अघो' या शद्बांनी) उभयविध—प्रतिपदोक्त 'भो' इत्यादि प्रसिद्ध व वार्तिकनिष्पन्न लाक्षणिक—शद्बांचें ग्रहण करतां येऊं शकतें हें त्या भाष्यावरून स्पष्ट होतें. 'परस्परसाहचर्येण निपातानां वार्तिकोक्तानां च ग्रहणेऽप्यन्येषामग्रहणात्' या मनोरमेंतील पंक्तींत दीक्षितांनीं 'परस्परसाहचर्येण' असा जो हेतु दिला आहे त्यामुळें, सूत्रनिर्दिष्ट 'भो, भगो, अघो' या शद्बांनीं वार्तिकनिष्पन्न 'भो, भगो, अघो' या अर्थवान् शद्बांचेंच (अर्थसादृश्यामुळें) ग्रहण करतां

येतें (व 'विभोरिदम्' इत्यादि मनोरमेंत दिलेल्या तीन वाक्यांतील 'भो, भगो, अघो' या अनर्थक एकदेशांचें ग्रहण करतां येत नाहीं; कारण 'सहचरितासहचरितयोः सहचरितस्यैव ग्रहणम्'— परि. ११२—या परिभाषेंतील 'सहचरित' व 'असहचरित' या शद्बांचा अनुक्रमें 'सदृश' 'असदृश' असा अर्थ आहे व त्या परि- भाषेचा थोडक्यांत हा अर्थ आहे कीं, 'सदृशासदृशयोः ग्रहणे सम्भवति सति, सदृशस्यैव ग्रहणं कर्तव्यं, नासदृशस्य.' अशी ती परिभाषा असल्यामुळें, जरी सूत्रनिर्दिष्ट शब्दांनीं वार्तिकनिष्पन्न अर्थवान् शब्दांचें व अनर्थक एकदेशांचें स्वरूपसादृश्यामुळें ग्रहण होणें संभवतें तरी वार्तिकनिष्पन्न अर्थवान् शब्दांचेंच ग्रहण करतां येतें व मनोरमेंत दिलेल्या तीन वाक्यांतील अनर्थक एकदेशांचें ग्रहण करतां येत नाहीं; कारण दोहोंमध्यें अर्थवत्तारूप सादृश्य नाहीं. मनोरमेंत 'परस्परसाहचर्येण' हा जो हेतु दिला आहे) त्याखेरीज 'अर्थवद्ग्रहणे नानर्थकस्य'—प. १४—हा हेतु देखील देतां येतो (व या अर्थवद्ग्रहण- परिभाषान्वयें देखील अनर्थक एकदेशांचें ग्रहण करतां येत नाहीं.) 'अन्येषामग्रहणात्' या मनोरमेच्या पंक्तींतील 'अन्येषाम्' या पदाचा 'अनर्थकानाम्,' म्हणजे मनोरमेंत दिलेल्या तीन वाक्यांतील अर्थरहित एकदेशांचें, असा अर्थ आहे. सान्त किंवा रान्त शब्दांचें प्रकृत सूत्रांत अनुकरण केलें आहे. असा सान्त किंवा रान्त अनुकरण पक्ष मानल्यास, प्रसिद्ध 'भोर्, भगोर्, अघोर्' हे जे रेफान्त अर्थवान् शब्द आहेत त्यांचेंच ('गौणमुख्ययोः मुख्ये कार्यसम्प्रत्ययः' —परि. १५—या न्यायान्वयें) ग्रहण करणें न्याय्य असल्यामुळें, (व अनर्थक अप्रसिद्ध—गौण—एकदेशांचें ग्रहण करणें अयोग्य असल्यामुळें,) ओकारान्तानुकरण पक्ष मानला तरी, वार्तिकनिष्पन्न 'भोर्, भगोर्, अघोर्' या प्रसिद्ध शब्दांचे व सान्त किंवा कृतरान्त प्रसिद्ध 'भोस्, भगोस्, अघोस्' या तीन निपातांचे 'भो, भगो, अघो' हे जे ओकारान्त एकदेश आहेत त्यांचेंच ग्रहण करतां येतें (व त्या पक्षांत देखील 'विभो रिदम्' इत्यादि मनोरमेंत दिलेल्या वाक्यांतील गौण व अनर्थक

ओकारान्त एकदेशांचें ग्रहण करतां येत नाहीं. सान्तानुकरणपक्ष रान्तानुकरणपक्ष व ओकारान्तानुकरणपक्ष असे तीन भिन्न पक्ष प्रकृत स्थलीं मानले असल्यामुळें, पहिल्या दोन पक्षांत जें फल सिद्ध होतें तेंच फल तृतीय पक्षांत देखील सिद्ध होणें आवश्यक आहे. म्हणून वरील तीन्ही पक्षांत फलैक्यसिद्धि होण्याकरितां, ओकारान्तानुकरणपक्षांत देखील असेंच मानलें पाहिजे कीं, सूत्रनिर्दिष्ट ओकारान्त शब्दांनीं प्रसिद्ध 'भोस्, भगोस्, अघोस्' या सान्त किंवा कृतरान्त निपातांच्या व तसेंच वार्तिकनिष्पन्न प्रसिद्ध 'भोर्, भगोर्, अघोर्' या शब्दांच्या ओकारान्त एकदेशांचें ग्रहण होऊं शकतें व मनोरमेंत दिलेल्या तीन उदाहरणांतील अप्रसिद्ध गौण शब्दांच्या ओकारान्त एकदेशांचें ग्रहण होऊं शकत नाहीं. तसें न मानलें तर, भिन्न भिन्न पक्षांत भिन्न भिन्न फलें सिद्ध होण्याची आपत्ति येईल. मग तसे भिन्न पक्ष मानून फायदा काय ? तीन्ही पक्षांत जर फलैक्यसिद्धि होणें संभवत असेल तरच तसे तीन पक्ष मानणें उचित ठरतें असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'भोस्, भगोस्, अघोस्' या सान्त किंवा कृतरान्त निपातांचे व वार्तिकनिष्पन्न 'भोर्, भगोर्, अघोर्' या शब्दांचे 'भो, भगो, अघो' हे एकदेश अनर्थक असल्यामुळें, ओकारान्तानुकरणपक्षांत अर्थवद्ग्रहणपरिभाषा लागू पडत नाहीं हें उघड आहे, आणि म्हणूनच दीक्षितांनीं तीन्ही पक्षांत त्यांच्या मतें सारखीच लागू पडणारी साहचर्यपरिभाषा—परि. ११२—प्रवृत्त केली आहे. सान्त किंवा रान्त अनुकरणपक्षांत पूर्वीं सांगितल्याप्रमाणें स्वरूपसादृश्य व अर्थसादृश्य या उभयविध परस्परसादृश्यामुळें साहचर्यपरिभाषा लागू पडते हें जसें सहज सांगतां येतें तसें ती ओकारान्तानुकरणपक्षांत कशी लागू पडते हें सांगतां येणें बरेंच कठीण आहे. प्रकृत सूत्रनिर्दिष्ट शब्दांत व सान्त किंवा कृतरान्त निपातांच्या व वार्तिकनिष्पन्न शब्दांच्या अनर्थक ओकारान्त एकदेशांत असें कोणतें धर्मसादृश्य आहे कीं, ज्यामुळें सूत्रनिर्दिष्ट ओकारान्त शब्दांनीं या अनर्थक ओकारान्त एकदेशांचें ग्रहण होऊं शकतें व मनोरमेंत दिलेल्या तीन

उदाहरणांतील अनर्थक ओकारान्त एकदेशांचें ग्रहण होऊं शकत नाहीं ? दोन्ही स्थलांतील एकदेश सारखेंच अनर्थक आहेत, तथापि सूत्रनिर्दिष्ट शब्द सान्त किंवा कृतरान्त 'भोस्, भगोस्, अघोस्' या संबोधनार्थक निपातांच्या ओकारान्त एकदेशांचें अनुकरण करणारे शद्ब आहेत असें मानलें असतां, त्या निपातांच्या व वार्तिकनिष्पन्न संबुद्धचन्त समानार्थक शद्बांच्या ओकारान्त एकदेशाचें ग्रहण होऊं शकतें व मनोरमेंत दिलेल्या तीन उदाहरणांतील ओकारान्त एकदेश तशा निपातांचे किंवा निपातसमानार्थक शब्दांचे एकदेश नसल्यामुळें त्यांचें ग्रहण करतां येत नाहीं अशा रीतीनें कसें तरी ओकारान्तानुकरणपक्षांत समाधान करून घेतलें पाहिजे. सारांश ओकारान्तानुकरणपक्ष सर्व तऱ्हेनें त्याज्य ठरतो. म्हणून सान्त किंवा रान्त अनुकरणपक्ष मानणेंच योग्य आहे. तरी पण या दोन पक्षांपैकीं रान्तानुकरणपक्ष मानणेंच अधिक योग्य आहे असें शब्दरत्नकार पुढील पंक्तींत सांगतात.) वर सांगितलेल्या सर्व गोष्टींचा विचार केला असतां हाच निष्कर्ष निघतो कीं, रान्तानुकरण पक्षच मानणें योग्य आहे व प्रकृत सूत्रांत जें पूर्वरूप सन्धिकार्य केलें नाहीं तेंच न्याय्य ठरतें आणि भाष्यावरून देखील हाच सिद्धान्त निघतो. (ओकारान्तानुकरणपक्षांत 'एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें होणाऱ्या पूर्वरूप सन्धीची प्राप्ति होते व त्या पक्षांत इतर दोष देखील उद्भवतात हें पूर्वीं सांगितलेंच आहे. म्हणून तो पक्ष मुळींच स्वीकारतां येत नाहीं. सान्तानुकरणपक्ष मानल्यास, प्रकृत सूत्रांत जें पूर्वरूप सन्धिकार्य केलें नाहीं तें जरी योग्य ठरतें तरी, सूत्रनिर्दिष्ट प्रतिपदोक्त सान्त शब्दानीं वार्तिकनिष्पन्न रान्त शब्दांचें ग्रहण करतेवेळीं लक्षणप्रतिपदोक्तपरिभाषा आड येते व तिचें निवारण करण्याकरितां ती अनित्य मानून त्या पक्षाचें समर्थन करावें लागतें. परंतु रान्तानुकरणपक्ष मानल्यास, त्या पक्षांत सान्त निपातांच्या अन्त्य सकाराचें 'ससजुषो रुः' सू. १६२ या सुत्रानें रुत्व होऊन रान्त होणाऱ्या त्या निपातांचें व वार्तिकनिष्पन्न समानार्थक

रान्त शब्दांचें सूत्रनिर्दिष्ट रान्त शब्दांनीं ग्रहण करण्यांत कोणताहि प्रत्य-वाय येत नाहीं; कारण ते दोन्ही प्रकारचे शब्दलक्षण—सूत्र व वार्तिक—लावून सिद्ध झालेले असल्यामुळें, सारखेच लाक्षणिक ठरतात. दुसरें असें कीं, 'मतुवसो रु' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं वार्तिकनिष्पन्न रान्त शब्दांचे ठिकाणीं देखील प्रकृत सूत्र प्रवृत्त केलें आहे व लक्षणप्रति-पदोक्त परिभाषेची आडकाठी दाखविली नाहीं. म्हणून त्या भाष्याचा आशय ध्यानांत आणला असतां व वर दिलेल्या सर्व कारणांचा विचार केला असतां, हाच सिद्धान्त निघतो कीं, प्रकृत स्थलीं रान्त शब्दांचें अनुकरण केलें आहे हें मानणें—म्हणजे रान्तानुकरणपक्षच मानणें—योग्य ठरतें असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा—व्योर्लघु। लघुप्रयत्नतरः लघूच्चारणतरः। स चान्त-रतम्याद्व्स्य वो यस्य य इत्याह—वयाविति ।।

'व्योर्लघुप्रयत्नतरः शाकटायनस्य' सू. १६८ या सूत्रांतील 'लघुप्रयत्नतरः' या पदाचा 'लघूच्चारणतरः', म्हणजे ज्याच्या उच्चारणांत कमी प्रयत्न करावा लागतो असा वकार किंवा यकार, असा अर्थ आहे. वकाराचे जागीं आन्तरतम्यानें, म्हणजे 'स्थानेऽन्त-रतमः' सू. ३९ या सूत्रान्वयें, लघुतरप्रयत्नक वकार आणि यकाराचे जागीं लघुतरप्रयत्नक यकार होतो हा आशय व्यक्त करण्याकरितां प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'पदान्तयोवकारयकारयोर्लघूच्चारणौ वयौ वा स्तोऽशि परे' असें व्याख्यान केलें आहे.

शब्दरत्न—लघूच्चारणतरो लघुतरोच्चारणः।

मनोरमेंतील 'लघूच्चारणतरः' या पदाचा 'लघुतरोच्चारणः' असा अर्थ आहे. (वास्तविक 'लघूच्चारणतरः' व लघुतरोच्चारणः' हे दोन्ही शद्ब व्याकरणरीत्या शुद्ध आहेत. 'अतिशायने तमबिष्ठनौ' सू. ५.३.५५ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'गुणस्यचैव प्रकर्षो न द्रव्यस्य' असा सिद्धान्त सांगितला असल्यामुळें व 'लघू-

च्चारण:' या स्थलीं 'लघु' हा शब्द गुणवाचक असल्यामुळें, 'द्विवचनविभज्योपपदे तरबीयसुनौ' सू. २००५ या सूत्रान्वयें 'लघु' या गुणवाचक शब्दाहून प्रथम 'तरप्' प्रत्यय करून नंतर बहुब्रीहि केल्यास 'लघुतरोच्चारण:' असें रूप सिद्ध होतें. परंतु त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनी 'पूर्वपदातिशये आतिशायिकाद्बहुव्रीहि: सूक्ष्मवस्त्रतराद्यर्थ:' असें वार्तिक पठित केलें आहे व त्या वार्तिकाचा भावार्थ असा आहे कीं, जेथें गुणप्रकर्ष व अन्य पदार्थ प्रधान बहुव्रीहि या दोहोंचीहि युगपत् विवक्षा आहे त्या स्थलीं 'द्विवचन-विभज्योपपदे' सू. २००५ या सूत्रानें 'तरप्' प्रत्यय होण्याची व 'अनेकमन्यपदार्थे' सू. ८३० या सूत्रानें बहुव्रीहीचीं युगपत् प्राप्ति होत असल्यामुळें व 'तरप्' प्रत्ययविधायक सूत्र बहुव्रीहिसमास-विधायक सूत्राच्या मानानें परसूत्र असल्यामुळें 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ या सूत्रान्वयें प्रथम 'तरप्' प्रत्यय झाला पाहिजे व नंतर बहुव्रीहिसमास झाला पाहिजे, व तसें केल्यास 'लघुतरप्रयत्न:, लघुतरोच्चारण:' अशींच रूपें सिद्ध होऊं शकतात. परंतु 'सूक्ष्मवस्त्रतर:' इत्यादि रूपें सिद्ध व्हावीं याकरितां वरील वार्तिक पठित केलें आहे व त्या वार्तिकान्वयें पूर्वविप्रतिषेधानें प्रथम बहुव्रीहिसमास करून नंतर 'तरप्' प्रत्यय केला असतां जसें 'सूक्ष्म-वस्त्रतर:' हें रूप सिद्ध होतें त्याचप्रमाणें 'लघुप्रयत्नतर:, लघूच्चा-रणतर:' हीं रूपें देखील सिद्ध होतात. पण हें वार्तिक मानल्यास 'लघुतरप्रयत्न:, लघुतरोच्चारण:' हीं रूपें अशुद्ध ठरण्याची आपत्ति येते असें कोणी म्हटल्यास, त्यावर हें उत्तर आहे कीं, जेथें 'तरप्' प्रत्यय व बहुव्रीहिसमास या दोहोंची सहविवक्षा नाहीं तेथें 'लघु' या गुणवाचक शब्दाहून प्रथम 'तरप्' प्रत्यय करून नंतर बहुव्रीहि-समास केला असतां वरील रूपें देखील शुद्ध ठरतात.)

मनोरमा—ओतो गार्ग्यस्य । ओकारादिति । यत्त्वोकारान्ता-दङ्गादिति प्राचा व्याख्यातं तन्न । अङ्गस्याप्रकृतत्वात् असम्भवाच्च । न ह्युदाहरणेष्वोकारान्तमङ्गमस्ति ।

'ओतो गार्ग्यस्य' सू. १६९ या सूत्राचें कौमुदींत 'ओकारात्परस्य पदान्तस्यालघुप्रयत्नस्य यकारस्य नित्यं लोपः स्यात्' असें व्याख्यान केलें आहे. या सूत्रावरील प्रक्रियाकौमुदीच्या टीकेंत प्रसादकारांनीं 'ओकारान्तादङ्गात्परस्य' असें जें व्याख्यान केलें आहे तें बरोबर नाहीं; कारण प्रकृत सूत्रांत 'अङ्गस्य' हें पद अनुवृत्त नाहीं, आणि दुसरें असें कीं, ओकारान्त अङ्गापुढें अ-लघु-प्रयत्न यकार येणें असंभवनीय आहे. प्रकुत सूत्रावरील दिलेल्या उदाहरणांत कोठेंहि ओकारान्त अङ्ग नाहीं. ('अङ्गस्य' ६-४-१ हा अधिकार षष्ठाध्यायाच्या चतुर्थ पादाच्या प्रारंभापासून सप्तमाध्यायाच्या अखेरपर्यंत चालू आहे व प्रकृत सूत्र त्या अधिकाराच्या बाहेर अष्टमाध्यायाच्या तृतीय पदांत 'पदस्य' या अधिकारांत पठित आहे. म्हणून प्रकृत सूत्रांत 'अङ्गस्य' हें पद मुळींच अनुवृत्त होऊं शकत नाहीं, पण 'पदस्य' हें पद अनुवृत्त होतें. त्यामुळें 'ओकारान्तादङ्गात्परस्य' हें व्याख्यान चूक ठरतें हें उघड आहे. प्रकृत सूत्रांत 'व्योर्लघुप्रयत्नतरः' सू. १६८ या पूर्वसूत्रांतून अनुवृत्त होणारा यकार 'पदस्य' या पदाचें विशेषण होऊन व 'येन विधिस्तदन्तस्य' सू. २६ या सूत्रान्वयें 'यकारान्तस्य पदस्य' असा अर्थ होऊन, 'अलोऽन्त्यपरिभाषान्वयें 'पदान्तस्य यकारस्य' असा अर्थ निष्पन्न होतो व प्रकृत सूत्रांतील 'ओतः' हें पद पञ्चम्यन्त असल्यामुळें, 'तस्मादित्युत्तरस्य' सू. ४१ या सूत्रान्वयें त्या पदाचा 'ओकारात्परस्य' असा अर्थ होऊन सूत्राचा कौमुदींत जसा अर्थ दिला आहे तसाच अर्थ त्या सूत्राचा होऊं शकतो. प्रक्रियाकौमुदीकारांनीं प्रकृत सूत्राचा 'ओकारात्परस्यालघुप्रयत्नस्य–यकारस्य–नित्यं लोपः' असा अर्थ केला आहे. पण प्रसादकारांनीं 'ओकारात्परस्य' याचें व्याख्यान करितांना 'ओकारान्तादङ्गात्परस्येत्यर्थः । ओकारान्तात्परस्य वकारस्यासंभवात्' असें म्हटलें आहे आणि याच व्याख्यानावर दीक्षितांचा कटाक्ष आहे. दीक्षित म्हणतात कीं, ओकारान्त अङ्गापुढें

यकार येणें असंभवनीय आहे. तें कां असंभवनीय आहे याचें कारण त्यानीं मनोरमेंत दिलें नाहीं व प्रकृत सूत्रावर शब्दरत्न नसल्यामुळें आणि मनोरमेवरील दुसरी कोणतीहि स्वतंत्र टीका येथें उपलब्ध नसल्यामुळें, मनोरमेंतील 'असंभवाच्च' या हेतूचा वास्तविक अर्थ काय आहे याचें स्पष्टीकरण करणें अवघड जातें. तथापि दीक्षितांच्या म्हणण्याचा असा आशय दिसतो कीं, 'यस्मात्प्रत्ययविधिस्तदादि प्रत्ययेऽङ्गम्' सू. १९९ या सूत्रान्वयें अङ्गसंज्ञा प्रत्ययसापेक्ष असल्यामुळें, म्हणजे प्रत्यय पुढें असतांनाच त्याच्या लगेंच मागें असणाऱ्या शब्दस्वरूपाला अङ्गसंज्ञा होत असल्यामुळें, 'ओकारान्तादङ्गात्परस्य यकारस्य' याचा 'ओकारान्तादङ्गात्परस्य यकारादिप्रत्ययस्य यकारस्य' असाच अर्थ होऊं शकतो. पण ओकारान्त अङ्गापुढें यकारादिप्रत्यय आला असतां, 'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ या वचनान्वयें प्रकृत त्रैपादिक सूत्र प्रथम प्रवृत्त न होतां 'वान्तो यि प्रत्यये' सू. ६३ हें सापादिक सूत्र प्रथम प्रवृत्त होऊन व तशा अङ्गाच्या अन्त्य ओकाराचे जागीं अवादेश होऊन अङ्ग ओकारान्त न राहतां वकारान्त होणार. म्हणून प्रकृत त्रैपादिक सूत्र प्रवृत्त करण्याकरितां ओकारान्त अङ्गापुढें प्रत्ययादि यकार मिळणें असंभवनीय आहे. उदाहरणार्थ 'गो' शब्दाहून 'गोपयसोर्यत्' सू. १५२८ या सूत्रानें विकारार्थक 'यत् = य' प्रत्यय केला असतां, 'गो+य' अशा स्थितींत 'गो' या अङ्गांतील ओकाराचे जागीं 'वान्तो यि प्रत्यये' या सूत्रानें अवादेश होऊन 'गव्' असें वकारान्त अङ्ग होतें. त्यामुळें ओकारान्त अङ्गापुढें प्रत्ययादि यकार मिळणें अशक्य आहे. 'ओ' चे जागीं झालेला 'अव्' हा आदेश 'ओ'च आहे असें स्थानिवद्भावानें मानतां येत नाहीं; कारण हा अल्विधि असल्यामुळें व 'अनल्विधौ' हा प्रतिषेध असल्यामुळें, तसा स्थानिवद्भाव करतां येत नाहीं. 'अचः परस्मिन् पूर्वविधौ' सू. ५० हें सूत्र देखील वरील उदाहरणांत प्रवृत्त करतां येत नाहीं; कारण ज्या 'ओ' स्थानीचे जागीं अवादेश झाला आहे त्या 'ओ' च्या

पूर्वी असणाऱ्या वर्णाला कार्य करणें नसून त्याच्या पुढें असणाऱ्या 'य्' या वर्णाला लोपरूप कार्य करणें आहे. म्हणून त्या सूत्रान्वयें देखील येथें स्थानिवद्भाव होऊं शकत नाहीं. 'पूर्वस्मात् विधौ कर्तव्ये' हा अनित्य पञ्चमीसमासपक्ष मानला तरी, 'पूर्वत्रासिद्धे न स्थानिवत्', म्हणजे त्रैपादिक कार्य करतेवेळीं अजादेशाचे ठिकाणीं स्थानिवद्भाव करतां येत नाहीं असें वार्तिक असल्यामुळें, अवादेशाचे ठिकाणीं कोणत्याहि रीतीनें स्थानिवद्भाव होऊं शकत नाही. तसेंच 'अचः परस्मिन्' हें सापादिक शास्त्र त्रिपादींत वास्तविक उपस्थित होऊंच शकत नाहीं हें पूर्वी सांगितलेंच आहे. सारांश त्रैपादिक यकारलोपरूप कार्य करतेवेळीं अवादेशाचें ठिकाणीं स्थानिवद्भावानें ओत्वबुद्धि करतां येत नसल्यामुळें, ओदन्त अङ्गापुढें प्रत्ययादि यकार मिळणें असंभवनीय आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय दिसतो. दुसरें असें कीं, 'गो + यत्' या स्थलीं ओकारान्त अङ्गापुढें असणाऱ्या यकाराचा लोप केल्यास, 'गव्यम्' असें इष्ट रूप न होतां 'गवम्' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल. म्हणून प्रसादकारांचें व्याख्यान बरोबर मानतां येत नाहीं हें उघड आहे.)

मनोरमा—हलि सर्वेषाम् यकारस्येति । वकारस्तु नानुवर्तते । भोभगोअघोपूर्वस्यासम्भवात् । अपूर्वस्तु यद्यपि सम्भवति वृक्षव् करोतीति तथापि तत्र लोपाप्रसङ्गः । अशीत्यनुवर्त्याशा हलो विशेषणात् । वृक्षव्हसतीत्यादि तु अनभिधानादसाध्वित्याहुः । गव्यमित्यत्र तु पदान्तत्वं नास्ति । गव्यूतिरित्यत्र तु वकारप्रश्लेषान्न वलोप इत्युक्तम् । ननु देवा नम्या इत्यादौ "लोपो व्योः—" इत्येव सिद्धम् । मैवम् । तं प्रति यत्वस्यासिद्धत्वात् । देवा यान्तीत्यत्र वलपरत्वाभावाच्च ।

'हलि सर्वेषाम्' सू. १७१ या सूत्राचें कौमुदींत व्याख्यान करितांना' यकारस्य लोपः स्यात्' असें जें म्हटलें आहे (व 'यकार-

वकारयोर्लोपः स्यात्' असें म्हटलें नाहीं) याचें कारण हें कीं, या सूत्रांत ('व्योर्लघुप्रयत्नतरः' या पूर्व सूत्रांतून 'व्योः' यांतील केवळ यकाराची, 'क्वचिदेकदेशोऽप्यनुवर्तते' – परि. १८ – या न्याया-न्वयें अनुवृत्ति होत असून) वकाराची अनुवृत्ति होत नाहीं. (प्रकृत सूत्रांत अनुवृत्त होणाऱ्या 'भोभगोअघोअपूर्वस्य' यांतील) 'भो, भगो, अघो' यांच्यापुढें वकार येण्याचा संभवच नाहीं (कारण त्यांच्यापुढें 'भोभगोअघो' सू. १६७ या सूत्रानें होणारा यकारच येऊं शकतो.) जरी 'वृक्षव् करोति' या उदाहरणांत अकारापुढें वकार येणें संभवतें तरी (प्रकृत सूत्रांत 'भोभगोअघो' या पूर्व सूत्रांतून) 'अशि' या पदाची अनुवृत्ति करून तें अनुवृत्त पद 'हलि' याचें विशेषण मानलें असल्यामुळें, त्या उदाहरणांत वकाराचा लोप होण्याचा प्रसङ्गच येत नाहीं; (कारण 'वृक्षव्' यांत पदान्तीं असणाऱ्या वकारापुढें ककार हा 'खर्' असून तो अश्रूप हल् नाहीं. 'वृक्षव् हसति' या उदाहरणांत जरी पदान्तीं असणाऱ्या वकारापुढें हकार हा 'अश्' रूप हल् असल्या-मुळें, प्रकृत सूत्रांत वकाराची अनुवृत्ति केल्यास त्या वकाराचा लोप पावतो तरी) 'वृक्षव् हसति' इत्यादि प्रयोग भाषेंत आढळत नसल्यामुळें तसे प्रयोग असाधु–अशुद्ध–आहेत असें कित्येक वैयाकर-णांचें म्हणणें आहे. 'गव्यम्' या उदाहरणांत (जरी गकारा-पुढील अकारापुढें वकार आहे व त्या वकारापुढें यकार हा 'अश्' रूप हल् आहे तरी तो) वकार पदान्तीं नाहीं (व त्यामुळें प्रकृत सूत्रानें त्याच्या लोपाची प्राप्तीच होत नाहीं.) 'गव्यूतिः' या उदाहरणांत (जरी गकारापुढील अकारापुढें जो वकार आहे तो पदान्तीं असून त्यापुढें 'यूतिः' या पदांतील यकार हा 'अश्' रूप हल् आहे तरी 'गोर्यूतौ छन्दसि' या वार्तिकांत पूर्वीं-सांगितल्याप्रमाणें 'छन्दसि' यांतील छकारापूर्वीं) वकाराचा प्रश्लेष मानला असल्यामुळें, वकाराचा लोप होत नाहीं हें ('वान्तो यि प्रत्यये' सू. ६७ या सूत्रावरील कौमुदींत) सांगितलेंच आहे. 'देवा नम्याः' इत्यादि उदाहरणांत 'लोपो व्योर्वलि' सू. ८७३ या सूत्रानें

यकाराचा लोप होऊं शकतोच असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'लोपो व्योर्वलि' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें 'भोभगो' या त्रैपादिक सूत्रानें होणारें यत्व असिद्ध ठरतें, (व त्यामुळें 'देवास् नम्या:' या स्थलीं 'ससजुषो रु:' सू. १६२ या सूत्रानें 'देवास्' या पदांतील अन्त्य सकाराचें रुत्व झाल्यावर 'देवार् नम्या:' अशी स्थिति झाली असतां, 'भोभगो' या सूत्रानें त्या 'रु' चे जागीं जो यकार होतो तो 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें 'लोपो व्योर्वलि' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें, त्रैपादिक सूत्रांनीं झालेलें रुत्व व यत्व झालेंच नाहीं व सकारच कायम आहे असें मानावें लागतें व त्यामुळें 'लोपो व्योर्वलि' या सूत्रानें यकारलोप होऊं शकत नाहीं. पण पूर्व त्रैपादिक सूत्रांनीं झालेलें रुत्व व यत्व 'हलि सर्वेषाम्' या प्रकृत त्रैपादिक उत्तर सूत्राच्या दृष्टीनें सिद्ध ठरत असल्यामुळें, प्रकृत सूत्रानेंच त्या यकाराचा लोप होऊं शकतो असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'देवा यान्ति' या उदाहरणांत 'वल्' पुढें नसल्यामुळें देखील 'लोपो व्योर्वलि' या सूत्राची प्राप्ति होत नाहीं. (देवास् यान्ति = देवार् यान्ति = देवाय् यान्ति' या उदाहरणांत, वर सांगितल्याप्रमाणें, त्रैपादिक सूत्रांनीं होणारें रुत्व व यत्व 'लोपो व्योर्वलि' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें, त्या सूत्रानें यकारलोप होऊं शकत नाहीं; आणि दुसरें असें कीं, 'देवाय्' यांतील अन्त्य यकारापुढें 'यान्ति' यांतील जो यकार आहे तो 'वल्' नसल्यामुळें तें सूत्र या उदाहरणांत प्रवृत्त होऊं शकत नाहीं व 'हलि सर्वेषाम्' हेंच सूत्र प्रवृत्त होऊन त्या सूत्रानें यकाराचा लोप होतो आणि म्हणून 'हलि सर्वेषाम्' हें सूत्र असणें आवश्यक आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

शब्दरत्न – **हलो विशेषणादिति । स्पष्टं भाष्ये । इत्याहुरिति । हरदत्तादयः । वकारलोपे ततस्तदर्थानवगतेरित्यर्थः । एवं च करोत्यादिपरेऽपि तत एव लोपो न भविष्यतीत्यशा हलो विशेषणं**

व्यर्थमिति सूचितम् । भाष्यमपि तदेकदेश्युक्तिरेव । "न पदान्ताः परेऽणः सन्ति" इति "लण्" सूत्रस्थभाष्यविरोधाच्च ।।

'अशीत्यनुवर्त्याशि हलो विशेषणात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें ('भोभगोअघो सू. ८-३-१७ या सूत्रावरील) भाष्यावरून स्पष्ट होतें (व तें भाष्य 'भोभगो' या सूत्रावरील शब्दरत्नांत पूर्वीं दिलेंच आहे.) 'असाधुरित्याहुः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें हरदत्त इत्यादिकांनीं म्हटलें आहे. ('हलि सर्वेषाम्' या सूत्रावरील पदमञ्जरींत हरदत्तानें 'ननु वृक्षव् हसतीत्यादौ–अवर्णपूर्वः अपरः पदान्तो वकारः–सम्भवति, न सम्भवति । अनभिधानात्, न ह्येवंविधमभिधानमस्ति, तथा च लण् इत्यत्र भाष्यकार आह, न पदान्ता हलोऽणः सन्तीति । एवं च वृक्षव् करोतीत्ययमपि प्रयोगश्चिन्त्यः' असें म्हटलें आहे.) 'वृक्षव् हसति' या उदाहरणांत वकारलोप केल्यास, 'वृक्षव्' या शब्दाहून होणाऱ्या अर्थाचा बोध होऊं शकणार नाहीं असा हरदत्तादिकांच्या म्हणण्याचा आशय आहे. ('वृक्षव्' यांतील वकाराचा लोप केला असतां 'वृक्ष' असा शब्द उच्चारला जाईल व त्यामुळें 'वृक्ष' हा शब्द उच्चारल्यानें ज्या अर्थाचा बोध होतो त्या अर्थाचा बोध होईल व 'वृक्षव्' हा शब्द उच्चारल्यानें ज्या अर्थाचा बोध होतो त्या अर्थाचा बोध होऊं शकणार नाहीं आणि म्हणून वकारलोप केल्यानें यथार्थाचा बोध होणें अशक्य असल्यामुळें देखील 'वृक्षव् हसति' इत्यादि प्रयोग असाधु मानणेंच योग्य ठरतें असा हरदत्तादिकांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) म्हणून 'वृक्षव्' या पदापुढें 'करोति' इत्यादि ('खर्'नें सुरू होणारे पद असले तरी प्रकृत सूत्रानें वकाराचा लोप होऊं शकणार नाहीं (कारण वर सांगितल्याप्रमाणें 'वृक्षव्' यांतील वकाराचा लोप केल्यास, त्या शब्दाहून ज्ञात होणाऱ्या अर्थाचा बोध होऊं शकणार नाहीं.) म्हणून (तशा उदाहरणांत वकारलोप न व्हावा याकरितां) प्रकृत सूत्रांत 'अशि' या पदाची अनुवृत्ति करून तें अनुवृत्त पद 'हलि' याचें विशेषण मानणें हें सर्व व्यर्थ आहे असें हरदत्तादिकांच्या

ग्रन्थावरून सूचित होतें (कारण वरील उदाहरणांत वकारलोप केल्यानें यथार्थ बोध न होण्याची आपत्ति येते हें वर सांगितलेंच आहे.) 'लण्' या शिवसूत्रावरील भाष्यांत 'न पदान्ताः परेऽणः सन्ति,' म्हणजे पदाच्या अन्तीं 'ह् य् व् र् ल्' हे 'अण्' मुळींच येत नाहींत, असें जें भाष्यकारांनीं म्हटलें आहे त्या भाष्याशीं विरोध येत असल्यामुळें, ('उत्तरार्थं तर्हि अश्ग्रहणं कर्तव्यं··· वृक्षव् करोति' असें जें 'भोभगो' या सूत्रावरील भाष्यांत म्हटलें आहे तें देखील सिद्धान्तीचें म्हणणें नसून) तें भाष्य एकदेशीचीच उक्ति आहे हें सिद्ध होतें.

मनोरमा—अहोरात्र इति । "रात्राह्नाहाः—इति पुंस्त्वम् । अहरादीनामिति । उभयत्राप्यादिशब्दः प्रकारे । तेन 'स्वर्चक्षो रथिनः सत्यशुष्मः । विप्रः कविः काव्येन स्वर्चनो' इत्यादि ग्राह्यम् ।

('रोऽसुपि' सू. १७२ या सूत्रावरील कौमुदींत पठित केलेल्या 'रुपरात्रिरथन्तरेषु रुत्वं वाच्यम्' या वार्तिकान्वयें 'अहोरात्रः' या उदाहरणांत 'अहन्' शब्दांतील अन्त्य नकाराचे जागीं रेफ न होतां 'रु' होतो व) 'रात्रान्हाहाः पुंसि' सू. ८१४ या सूत्रान्वयें 'अहोरात्रः' हा समाहारद्वन्द्व पुल्लिंगी होतो. (व 'अहस्सर्वैकदेश-संख्यातपुण्याच्च रात्रेः' सू. ७८७ या सूत्रान्वयें तद्धित 'अच्' प्रत्यय होऊन व 'यस्येति च' सू. ३११ या सूत्रानें 'रात्रि' यांतील अन्त्य इकराचा लोप होऊन 'अहोरात्रः' असें रूप सिद्ध होतें.) 'अहरादीनां पत्यादिषु वा रेफः' या प्रकृत सूत्रावरील वार्तिकांत जो दोन ठिकाणीं 'आदि' शब्द पठित आहे तो प्रकाराचा, म्हणजे सादृश्याचा, वाचक आहे. (पदान्तीं रेफ असून त्यापुढें 'खर्' आल्यास, ज्या उदाहरणांत 'खरवसानयोर्विसर्जनीयः' या सूत्रान्वयें रेफाचा नित्य होणारा विसर्ग न होतां, रेफ विकल्पेंकरून कायम राहतो तीं सर्व प्रकृत वार्तिकाचीं उदाहरणें समजावीं.) त्यामुळेंच, 'स्वर्चक्षो रथिनः सत्यशुष्मः' व 'विप्रः कविः काव्येन स्वर्चनः' या श्रुतींतील स्वर्चक्षः

व 'स्वर्चनः' इत्यादि रूपें प्रकृत वार्तिकाचीं उदाहरणें समजावीं. (या दोन्ही उदाहरणांत 'स्वर्' या पदाच्या अन्तीं रेफ असून व त्यापुढें चकार हा 'खर्' असून देखील रेफ कायम ठेविला आहे.)

मनोरमा–तृढो वृढ इति। ऊदित्त्वेन वेट्कत्वात् "यस्य विभाषा" इति निष्ठायां नेट्। ढत्वधत्वष्टुत्वढलोपाः। यत्तु प्राचा प्रत्युदाहृतं दृढ इति तन्न। तत्र ढलोपस्यैवाभावात्। तथा हि। "दृढः स्थूलबलयोः" इति सूत्रेण दृंहेर्नकारहकारयोर्लोपः, तकारस्य ढत्वं च निपात्यते। न त्वसिद्धकाण्डस्थढत्वस्येह प्रवृत्तिः "दादेर्धातोः-" इति घत्वेन बाधात्। न च इडभावो ढत्वं च निपात्यतां धत्वष्टुत्वढलोपास्तु भविष्यन्त्यवेति वाच्यम्। तथा सति परिद्रढय्येत्यत्र "ल्यपि लघुपूर्वात्" इति णेरयादेशो न स्यात्। पारिदृढीकन्येत्यत्र "अणिञोः-" इति ष्यङ् च स्यात्। ढलोपस्यासिद्धत्वेन गुरूपोत्तमत्वादिति भाष्ये स्थितम्। यत्तु प्राचा व्याख्यातं दृंहेरेवेदं निपातनं, दृह वृद्धाविति तु प्रकृत्यन्तरम्। तस्य निष्ठायामागमशास्त्रस्यानित्यत्वादिडभावे "वा द्रुह"–इत्यत्र "वा" इति योगविभागात् पक्षे घत्वाभावे ढलोपे च प्रत्युदाहरणमिदं द्रष्टव्यमिति। तन्न। उभयोरपि निपातनाभ्युपगमात्। तदाह वामनः–अथ दृहिः प्रकृत्यन्तरमस्ति तस्याप्येतन्निपातनं नलोपवर्जमिति। युक्तं चैतत्। अन्यथा हि अस्माद् णेरय् न स्यात्, ष्यङ् च स्यात्।

('ढ्रलोपे पूर्वस्य दीर्घोऽणः' सू. १७४ या सूत्रावरील कौमुदींत 'तृढः' व 'वृढः' हीं त्या सूत्राचीं प्रत्युदाहरणें दिलीं आहेत.) 'तृहू हिंसायाम्' व 'वृहू उद्यमने' हे धातु ऊदित् असल्यामुळें, ('स्वरतिसूति' सू.२२७९ या सूत्रान्वयें) 'वेट्क' आहेत, म्हणजे त्यांच्यापुढे येणाऱ्या वलादि आर्धधातुक प्रत्ययांना विकल्पेंकरून इडागम होतो. त्यामुळें त्या धातुंपुढें 'निष्ठा क्त' प्रत्यय आला असतां, त्या प्रत्ययाला 'यस्य विभाषा' सू.३०२५ या निषेधक सूत्रान्वयें इडागम होत नाहीं आणि ढत्व, धत्व, ष्टुत्व, ढलोप हीं कार्यें होतात.

('तृह्+क्त' किंवा 'वृह्+क्त' या दोन्ही स्थलीं, वर सांगितल्या-प्रमाणें, 'क्त = त' प्रत्ययाला इडागम न होतां, 'हो ढः' सू. ३२४ या सूत्रानें या दोन्ही धातूंतील अन्त्य हकाराचा ढकार होऊन व 'झषस्त-थोर्धः' सू. २२८० या सूत्रानें 'क्त' प्रत्ययांतील तकाराचा धकार होऊन व 'ष्टुना ष्टुः' सू. ११३ या सूत्रानें त्या धकाराचा ढकार होऊन आणि 'ढो ढे लोपः' सू. २३३५ या सूत्रानें पूर्व ढकाराचा लोप होऊन 'तृढः, वृढः' अशीं रुपें सिद्ध होतात, व 'अ, इ, उ' हे 'अण्' असून 'ऋ' हा 'अण्' नसल्यामुळें, या धातूंतील ऋकार 'ढ्रलोपे' सू. १७४ या सूत्रान्वयें दीर्घ होत नाहीं आणि अशा रीतीनें हीं रुपें प्रकृत सूत्राचीं प्रत्युदाहरणें ठरतात. म्हणूनच 'अणः किम्? तृढः, वृढः' असें दीक्षितांनीं प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे.) प्रक्रियाकौमुदीकारांनी 'अणः किम्? दृढः' असें जें प्रकृत सूत्राचें प्रत्युदाहरण दिलें आहे तें बरोबर नाहीं. या उदाहर-णांत ढलोपाची प्राप्तीच नाहीं. याचें कारण हें आहे कीं, 'दृढः स्थूल-बलयोः' सू. ३०६० या सूत्रानें 'दृहिः दृंह्' धातूंतील नकाराचा व हकाराचा लोप आणि निष्ठा तकाराचें ढत्व हीं कार्यें निपातनानें होतात (व तसेंच त्या सेट्क धातूपुढील 'क्त = त' या वलादि आर्ध-धातुक प्रत्ययाला जो इडागम पावला आहे तो देखील निपातनानें होत नाहीं.) या उदाहरणांत असिद्धकाण्डांत पठित असलेल्या 'हो ढः' या सूत्रानें 'दृंह्' धातूंतील अन्त्य हकाराचें ढत्व होऊं शकत नाहीं; कारण 'दादेर्धातोर्घः' सू. ३२५ या सूत्रानें होणाऱ्या घत्वानें त्या ढत्वाचा बाध होतो. ('दृढः स्थूलबलयोः' या सूत्रानें) इडागमाचा अभाव व धातूंतील अन्त्य हकाराचें ढत्व हीं दोन कार्यें निपातनानें होऊं द्या व बाकीचीं ढत्व, ष्टुत्व, ढलोप हीं कार्यें मामुली रीतीनें होतीलच असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं. तें म्हणणें बरोबर मानल्यास, 'परिद्रढय्य' या स्थलीं 'ल्यपि लघुपूर्वात्' सू. ३३३६ या सूत्रानें 'णि' चे जागीं अयादेश न होण्याची आपत्ति येईल व त्याचप्रमाणें 'पारिदृढी कन्या' या स्थलीं

'अणित्रो:' सू. ११९८ या सूत्रानें 'ष्यङ्' होण्याची आपत्ति येईल; कारण ढलोप असिद्ध असल्यामुळें ऋकार गुरु ठरेल असें भाष्यांत सांगितलें आहे. ('दृहि' धातु इदित् असल्यामुळें 'इदितो नुम्धातो:' सू. २२६२ या सूत्रानें त्याला नुमागम होतो व त्या धातूहून 'क्त' हा कित् प्रत्यय केला असतां, तो धातु अनिदित् नसल्यामुळें, अनिदितां हल उपधाया:' सू. ४१५ या सूत्रानें होणाऱ्या नकारलोपाची प्राप्ति होत नाहीं. तसेंच त्या धातूच्या अन्तीं जरी हकार आहे तरी तो धातु दकारानें सुरू होणारा असल्यामुळें, 'हो ढ:' या सूत्रानें होणाऱ्या ढत्वाची प्राप्ति न होतां, 'दादेर्धातोर्घ:' या अपवादक सूत्रानें घत्वाची प्राप्ति होते. त्याचप्रमाणें त्या 'सेट्क' धातूपुढील वलादि 'क्त = त' या आर्धधातुक प्रत्ययाला 'आर्धधातुकस्येड्वलादे:' सू. २१८४ या सूत्रानें इडागमाची प्राप्ति आहे. म्हणून शंकाकार म्हणतो कीं, 'दृंहि = दृंह्' या इदित् धातूंतील जो नकारलोप पावला नाहीं व अन्त्य हकाराचें ढत्व पावलें नाहीं आणि 'क्त' प्रत्ययाला जो इडागम पावला आहे हीं तीन्ही कार्यें, म्हणजे नकारलोप, ढत्व, इडागमाभाव, 'दृढ: स्थूलबलयो:' सू. ३०६० या सूत्रानें निपातनानें होतात असें माना व बाकीचीं सर्व कार्यें धत्व, ष्टुत्व व ढलोप– मामुली तऱ्हेनें पाणिनीय सूत्रांनीं होतीलच. सारांश 'दृंह्' धातूंतील हकाराचा लोप व निष्ठा तकाराचें ढत्व निपातनानें होतात असें जें दीक्षितांनीं 'दृढ: स्थूलबलयो:' या सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे तसें मानण्याची कांहींच गरज नाहीं. म्हणून 'दृंह् + क्त' या स्थलीं निपातनानें इडभाव, नकारलोप व धातूंतील अन्त्य हकाराचें ढत्व केल्यावर 'दृढ् + त' अशी स्थिति झाली असतां, 'त' या वलादि प्रत्ययाला निपातनानें इडागम होत नसल्यामुळें, त्या प्रत्ययांतील तकाराचा 'झषस्तथो:' सू. २२८० या सूत्रानें धकार होऊन व नंतर 'ष्टुना ष्टु:' सू. ३१३ या सूत्रानें त्या धकाराचा ढकार होऊन आणि 'ढो ढे लोप:' सू. २३३५ या सूत्रानें पूर्व ढकाराचा लोप होऊन 'दृढ:' असें 'दृह्' धातूचें

क्तप्रत्ययान्त रूप होतें. या उदाहरणांत ज्या पूर्व ढकराचा लोप झाला आहे त्याच्या लगेंच पूर्वी असलेला ऋकार हा 'अण्' नसल्यामुळें, 'ढ्रलोपे' या प्रकृत सूत्रानें 'अण्'ला होणारें दीर्घकार्य त्या ऋकारास होत नाहीं व अशा रीतीनें 'दृढः' हें प्रकृत सूत्रांतील 'अणः' याचें योग्य प्रत्युदाहरण ठरतें असें शंकाकाराचें म्हणणें आहे. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, शंकाकाराचें म्हणणें बरोबर मानल्यास, 'परि-द्रढय्य' व 'पारिदृढी' हीं इष्ट रूपें सिद्ध न होण्याची आपत्ति येईल. 'दृढ' या क्तप्रत्ययान्त शब्दाची प्रक्रिया नुकतीच वर दिली आहे. 'परि' या उपसर्गपूर्वक 'दृढ' या प्रातिपदिकाहून 'प्राति-पदिकाद्धात्वर्थे बहुलमिष्ठवच्च' या गणसूत्रान्वयें 'णिच्' प्रत्यय केला असतां, 'परि+दृढ+णिच्' अशा स्थितींत इष्ठवद्भावानें 'दृढ' यांतील ऋकाराचे जागीं 'र ऋतो हलादेर्लघोः' सू. १७८५ या सूत्रानें 'र' असा आदेश होऊन व इष्ठवद्भावानें 'टेः' सू. १७८६ या सूत्रानें टिलोप—अन्त्य अकाराचा लोप—होऊन 'परिद्रढ् णि' अशी स्थिति होते व 'सनाद्यन्ता धातवः' सू. २३०४ या सूत्रानें या णिजन्त शब्दाला धातुसंज्ञा झाली असतां त्याहून 'क्त्वा' प्रत्यय केल्यास, 'समासेऽनञ्पूर्वे क्त्वो ल्यप्' सू. ३३३२ या सूत्रानें 'क्त्वा' चे जागीं ल्यबादेश होतो व 'परिद्रढ् णि ल्यप्' अशी स्थिति होते. या उदाहरणांत 'दृढ' या शब्दाची शंकाकाराच्या रीतीनें सिद्धि करतेवेळीं 'ढो ढे लोपः' या त्रैपादिक सूत्रानें झालेला ढकाराचा लोप 'ल्यपि लघुपूर्वात्' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें असिद्ध ठरत असल्यामुळें तो झालाच नाहीं व 'णि' चे पूर्वी 'द्र' यांतील अकारापुढें 'ढ्ढ्' हा संयोग आहे असें मानणें भाग पडेल आणि 'संयोगे गुरु' सू. ३२ या सूत्रान्वयें तो अकार गुरु ठरेल आणि अशा रीतीनें 'णि' च्या पूर्वी लघु अच् आहे असें मानतां येऊं शकत नसल्यामुळें, त्या णिचे जागीं अयादेश न होण्याची आपत्ति येईल व 'परिद्रढय्य' असें इष्ट रूप सिद्ध होऊं

शकणार नाहीं. पण 'दृढः स्थूलबलयोः' या सापादिक सूत्रानेंच 'दृंह्' यांतील नकाराचा व हकाराचा लोप व त्यापुढें असलेल्या 'क्त' प्रत्ययांतील तकाराचे जागीं ढकार निपातनाने होतो असें मानल्यास दोन ढकार एकत्र येत नाहींत व अशा रीतीनें 'परिद्रढ् णि ल्यप्' यांतील 'णि' पूर्वीं असणारा ढकार संयोग ठरत नसल्यामुळें, त्याचे पूर्वीं असणारा अकार लघु ठरतो व त्यामुळें णिचे जागीं अयादेश होण्यांत कांही अडचण येत नाहीं. तसेंच 'परिदृढस्य अपत्यं पुमान् पारिदृढिः' या स्थलीं 'अत इञ्' सू. १०९५ या सूत्रानें अपत्यार्थक अनार्ष 'इञ्' प्रत्यय होऊन व 'तद्धितेष्वचामादेः' सू. १०७५ या सूत्रानें आद्य अचाची वृद्धि होऊन आणि 'यस्येति च' सू. ३११ या सूत्रानें 'परिदृढ' यांतील अन्त्य अकाराचा लोप होऊन 'पारिदृढि' असें रूप होतें. या शद्वाचें स्त्रीलिङ्गाचें रूप करितांना असिद्धकाण्डांतील सूत्रांन्वयें 'दृढ' हा शद्व सिद्ध झाला आहे असें मानल्यास, 'अणिञोः' सू. ११९८ या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें 'ढो ढे लोपः' या त्रैपादिक सूत्रानें झालेला ढकारलोप असिद्ध ठरत असल्यामुळें तो झालाच नाहीं व 'दृढ' यांतील ऋकारापुढें 'ढ्ढ्' हा संयोग आहे असें मानणें भाग पडेल. तसें मानल्यास, 'दृढ' यांतील ऋकार 'संयोगे गुरु' या सूत्रानें गुरु ठरेल व 'अणिञोः' या सूत्रानें 'ष्यङ् = य' आणि 'यङश्चाप्' सू. ५२८ या सूत्रानें 'चाप् = आ' हे स्त्रीप्रत्यय होऊन 'पारि-दृढ्या' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल. परंतु 'दृढः स्थूलबलयोः' या सापादिक सूत्रानेंच धातूंतील हकाराचा लोप व 'क्त' प्रत्ययांतील तकाराचे जागीं ढकार निपातनानें झाला आहे असें मानल्यास, दोन ढकार एकत्र येऊंच शकत नाहींत व त्यामुळें 'दृढ' यांतील ऋकार गुरु ठरण्याचा प्रसंगच येत नाहीं आणि त्यामुळें 'अणिञोः' या सूत्राची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं व 'इतो मनुष्यजातेः' सू. ५२० या सूत्रानें 'ङीष्' प्रत्यय होऊन 'पारिदृढी' असें स्त्रीलिङ्गाचें इष्ट रूप सिद्ध होतें असें 'दृढः स्थूलबलयोः'

७–२–२० या सूत्रावरील भाष्यांत सांगितलें आहे आणि म्हणून शंकाकाराची शंका भाष्यविरुद्ध असल्यामुळें अयोग्य ठरतें असें दीक्षितांचें म्हणणें आहे. त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात– 'दृढ निपातनं क्रियते, नकारहकारलोपार्थम् । नकारहकारलोपो यथा स्यात् । परस्य च ढत्वार्थम् । परस्य च ढत्वं यथा स्यात … अनिड्वचने हिरभावस्याऽप्रसिद्धिः स्यात् । द्रढीयान् । किं कारणम् ? अलघुत्वात् । नलोपवचने च । न लोपश्च वक्तव्यः । इह च परिद्रढय्य गतः– ल्यपि लघुपूर्वस्येत्ययादेशो न स्यात् । इह च पारिदृढी कन्येतिगुरूपोत्तमलक्षणः ष्यङ् प्रसज्येत ।' या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'दृहि = दृंह्' धातूंतील नकाराचा व हकाराचा निपातनानें लोप होऊन व तसेंच त्या धातूपुढील निष्ठा 'क्त' प्रत्ययाला निपातनानें इडागम न होतां त्या प्रत्ययांतील तकाराचे जागीं निपातनानें ढकार होऊन 'दृढः' असें क्तप्रत्ययान्त रूप निपातनानें सिद्ध होतें आणि शंकाकारानें जी शंका केली आहे ती या वरील भाष्याच्या विरुद्ध असल्यामुळें अनुपपन्न ठरते हें उघड होतें.) प्रसादकारांनीं (प्रकृत सूत्रावरील प्रक्रियाकौमुदींत 'अणः किम् ? दृढः' हें जें प्रत्युदाहरण दिलें आहे त्याचें व्याख्यान करितांना) असें म्हटलें आहे कीं, 'दृढ' हें 'दृंह्' धातूचेंच निपातनानें झालेलें क्तान्त रूप आहे. 'दृह् वृद्धौ' हा वेगळा धातु आहे. त्या 'दृह्' धातूहून निष्ठा क्तप्रत्यय केला असतां, आगमशास्त्र अनित्य असल्यामुळें, त्या क्तप्रत्ययाला इडागम होत नाहीं व 'वा द्रुहमुहष्णुहष्णिहाम्' सू. ३२७ या सूत्राचा 'वा' असा योगविभाग केल्यानें 'दृह्' धातूंतील हकाराचें घत्व न होतां विकल्पेंकरून ढत्व होतें व नंतर पूर्व ढकाराचा लोप झाला असतां 'दृढ' असें जें रूप सिद्ध होतें तें हें प्रत्युदाहरण होय. (प्रसादकारांनीं प्रक्रियाकौमुदींतील 'दृढः' हें प्रतीक घेऊन 'नात्र दृढः स्थूलबलयोः इति निपातो गृह्यते । तस्य निपातनादेव दीर्घाभावसिद्धेः प्रत्युदाहरणत्वानुपपत्तेः । किंतु दृह वृद्धावित्यस्य निष्ठायामागमशासनस्यानित्यत्वेनेडभावे, वा द्रुहमुह इति वा इति योगवि-

भागात् पक्षे घत्वाभावे ढत्वे ष्टुत्वे ढलोपे च रूपम्' असें म्हटलें आहे. प्रसादकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, 'दृढः स्थूल-बलयोः' सू. ७–२–२० या सूत्रावरील भाष्यांत 'दृढनिपातनं क्रियते नकारहकारलोपार्थम् । नकारहकारलोपो यथा स्यात् । परस्य च ढत्वं यथा स्यात्' असें भाष्यकारांनीं म्हटलें असल्यामुळें त्या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'दृह्' धातूंत नकार नसल्यामुळें त्या 'दृह्' धातूचे ठिकाणीं नकारलोपाची प्राप्ति नसून 'दृहिः दृंह्' या इदित धातूंचेच ठिकाणीं निपातनानें नकारलोप पावत असल्यामुळें, 'दृढ' हें 'दृह्' धातूचें निपातानें होणारें क्तान्त रूप नसून 'दृंह्' धातूचेंच निपातनानें सिद्ध झालेलें क्तान्त रूप आहे व प्रक्रिया-कौमुदीकारांनीं प्रकृत सूत्राचें 'दृढ' हें जें प्रत्युदाहरण दिलें आहे तें 'दृंह्' धातूचें क्तान्त रूप नसून 'दृह्' धातूचेंच क्तान्त रूप आहे. मग जर 'दृह' धातूहून झालेलें 'दृढ' हें क्तान्त रूप निपा-तनानें सिद्ध झालें नाहीं व मामुली रीतीनें पाणिनीयशास्त्रप्रक्रियान्वयें सिद्ध झालें आहे असें मानलें तर, त्या 'सेट्क' धातूपुढील 'क्त = त' या वलादि आर्धधातुक प्रत्ययाला 'आर्धधातुकस्येट्' सू. २१८४ या सूत्रानें इडागम व्हावयास पाहिजे होता अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर प्रसादकार असें उत्तर देतात कीं, 'आगम-शास्त्रमनित्यम'–परि. ९५–या परिभाषान्वयें आगमशास्त्र अनित्य असल्यामुळें, येथें इडागम झाला नाहीं. पण आगमशास्त्र अनित्य असल्यामुळें प्रकृत स्थलीं 'त' प्रत्ययाला इडागम झाला नाहीं असें जरी मानलें तरी, 'दृह्' धातु दकारानें सुरु होणारा असल्यामुळें 'दादेर्धातोर्घः' सू. ३२५ या सूत्रानें 'दृह्'. धातूंतील अन्त्य हकाराचे जागीं घकार पावला आहे व घकारादेश केल्यास, घकार हा तवर्गांतील वर्ण नसल्यामुळें 'ष्टुना ष्टुः' सू. ११३ हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व घकाराचा ढकार होऊं शकत नाहीं आणि त्यामुळें ढलोपाची प्राप्तीच होऊं शकत नाहीं अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर प्रसादकार असें उत्तर देतात कीं,

'वा द्रुहमुह' सू. ३२७ या सूत्राचा 'वा' असा योगविभाग करून तशा योगविभागानें बनलेल्या 'वा' या पृथक् सूत्राचा 'दादेर्धातो-र्घो वा' म्हणजे दकारानें सुरु होणाऱ्या हकारान्त धातूंतील अन्त्य हकाराचें विकल्पेंकरून घत्व होतें, असा अर्थ होतो व अशा रीतीनें घत्व वैकल्पिक ठरत असल्यामुळें तें घत्व विकल्पेंकरून न केल्यास व ढकार केल्यास व पुढील 'क्त' प्रत्ययांतील तकाराचे जागीं 'झषस्त-थोर्धः' सू. २२८० या सूत्रानें धकार करून व नंतर 'ष्टुना ष्टुः' या सूत्रानें त्या धकाराचा ढकार करून, 'ढो ढे लोपः' सू. २३३५ या सूत्रानें पूर्व ढकाराचा लोप केला असतां, 'दृढः' असें 'दृह्' धातूचें जें क्तान्त रूप सिद्ध होतें तें प्रक्रियाकौमुदींत प्रत्युदाहरण-रूपानें दिलें आहे असें प्रसादकारांचें म्हणणें आहे. यावर दीक्षित असें म्हणतात कीं, प्रसादकारांचें) हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'दृढ' हें जें निपातनानें सिद्ध झालेले क्तान्त रूप आहे तें 'दृह' व 'दृंह्' या दोन्ही धातूंचें रूप आहे असें वैयाकरणांनीं मानलें आहे. उदाहरणार्थ वामनानें काशिकेंत असें म्हटलें आहे कीं 'दृह' हा भिन्न धातु आहे. त्याचें देखील 'दृढ' हें निपातनानें सिद्ध झालेलें रूप आहे. फरक एवढाच कीं, 'दृंह्' धातूंतील नकाराचा निपातनानें जो लोप होतो तो 'दृह्' धातूचे ठिकाणीं (नकाराचा अभाव असल्यामुळें) पावत नाहीं. वामनानें जें हें म्हटलें आहे तें अगदीं योग्य आहे. तें म्हणणें बरोबर न मानल्यास, 'दृह्' धातूहून सिद्ध झालेल्या 'दृढ' या शद्बाहून 'णिच्' प्रत्यय केला असतां, 'णि' चे जागीं अयादेश होणार नाहीं व ('पारिदृढी कन्या' या स्थलीं) 'ष्यङ्' होण्याची आपत्ति येईल. ('दृढः स्थूलबलयोः' या सूत्रावरील वृत्तींत वामनानें 'दृढ इति निपात्यते स्थूलेबलवति चार्थे । दृढःस्थूलः। दृढो बलवान् । किमत्र निपात्यते । दृंहेः क्तप्रत्यये इडभावः । हकार-नकारयोर्लोपः । परस्य ढत्वम् । अथ दृहिः प्रकृत्यन्तरमस्ति । तत्रा-प्येतदेव सर्वं नेलोपवर्जम् । नकारस्याभावात् । हलोपनिपातनं

पूर्वत्रासिद्धत्वनिवृत्त्यर्थम् । ढलोपे हि सति तस्य पूर्वत्रासिद्धत्वाद् द्रढिमा द्रढियान् द्रढयतीत्यत्र र ऋतो हलादेर्लघोरिति न स्यात् । इह च परिद्रढय्यागत इति ल्यपि लघुपूर्वादिति णेरयादेशो न स्यात् । इह च परिदृढस्यापत्यं पारिदृढी कन्येति गुरूपोत्तमलक्षणः ष्यङ् च प्रसज्येत । स्थूलबलयोरिति किम् । दृंहितम् । दृहितम्।' असें म्हटलें आहे, व या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनी जें म्हटलें आहे त्याचाच हा अनुवाद आहे आणि या सर्व विषयाचें विवरण वर मनोरमेंत केलेंच आहे. अधिक विवरण शब्दरत्नांत केलें जाईल.)

शब्दरत्न—इडभावो ढत्वं चेति । चेन नलोपसङ्ग्रहः । ढलोप इति । 'ढो ढे लोप" इत्येतद्दृष्टचा ष्टुत्वं तु नासिद्धं सामर्थ्यादिति भावः । भाष्येस्थितमिति । "दृढः स्थूल—" इति सूत्रे शेषः । द्रष्टव्यमितीति । ष्यङि णेरयाभावे चेष्टापत्तिरिति भावः । उभयोरपीति । त्वदवलम्बभूतेन वृत्तिकृतेति शेषः । तदाह—वामन इति । अत्रारुचिबीजं तु दृंहेर्नकारहकारलोपार्थमिति भाष्यविरोधः । अनिदितो दृहेस्तु दृहितमित्येवेष्यत इति कैयटविरोधश्चेति । किं च प्रसादोक्तरीत्या दृहेरपि इडभावढत्वयोः सिद्धाविण्निषेधप्रकरणे दृढ इति निपातनस्य व्यर्थत्वमित्यलम् ।

'इडभावो ढत्वं च निपात्यताम्' असें जें मनोरमेंतील शंकाग्रन्थांत म्हटलें आहे त्यांतील 'च' या पदानें नकारलोपाचा देखील समावेश होतो. ('दृंह' धातूंतील अन्त्य हकाराचे जागीं ढकार होणें व त्या धातूपुढील 'क्त' प्रत्ययाला इडागम न होणें हीं कार्यें पावलीं नसून देखील जशीं 'दृढःस्थूलबलयोः' या सूत्राच्या सामर्थ्यानें निपातनानें होतात त्याचप्रमाणे नकारलोप पावला नसून देखील निपातनानेंच होतो. सारांश वरील कार्यें निपातनानेंच होतात असें मानलें असतां, 'दृंह्' धातूचें 'दृढ' हें क्तान्त रूप सिद्ध होऊं शकत असल्यामुळें, त्या धातूंतील अन्त्य हकाराचा लोप व 'क्त' प्रत्ययांतील तकाराचे जागीं ढकार होणें हीं दोन कार्यें देखील निपातनानें होतात

हें मानण्याची कांहीं गरज नाहीं असें शंकाकारांचें म्हणणें आहे. पण हें शंकाकाराचें म्हणणें भाष्यविरूद्ध असून तें म्हणणें बरोबर मानल्यास 'द्रढीयान् द्रढिमा, परिद्रढय्य' इत्यादि इष्ट-रूपांची सिद्धि होऊं शकत नसल्यामुळें, तें म्हणणें बरोबर मानतां येत नाहीं असें दीक्षितांनीं मनोरमेंत सांगितलेंच आहे.) 'धत्वष्टु-त्वढलोपास्तु भविष्यन्त्येव' असें जें मनोरमेंतील शंकाग्रन्थांत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'ढो ढे लोपः' या सूत्राच्या आरंभ-सामर्थ्यानें त्याच्या दृष्टीनें 'ष्टुना ष्टुः' या सूत्रानें होणारें ष्टुत्व असिद्ध ठरत नाहीं. ('ढो ढे लोपः' सू. २३३५ हें त्रैपादिक पूर्व सूत्र असून 'ष्टुना ष्टुः' सू. ११३ हें त्रैपादिक उत्तर सूत्र आहे. म्हणून 'पूर्वत्रासिद्धम' या वचनान्वयें 'ढो ढे लोपः' या पूर्व त्रैपादिक सूत्रानें ढकारलोप करतेवेळीं 'ष्टुना ष्टुः' या त्रैपादिक उत्तर सूत्रानें झालेलें ष्टुत्व ढत्व—असिद्ध ठरतें असें मानल्यास, पूर्व ढकाराचा लोप होऊं शकणार नाहीं व 'दृढः' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. परंतु 'ष्टुना ष्टुः' हें सूत्र प्रवृत्त केल्याशिवाय ढकारापुढें ढकार येणें अशक्य असल्यामुळें, 'ढो ढे लोपः' हें सूत्र प्रवृत्त न केल्यास तें 'व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. सारांश 'ष्टुना ष्टुः' या उत्तर त्रैपादिक सूत्रानें होणाऱ्या कार्याचा अनुवाद करून 'ढो ढे लोपः' हें पूर्व त्रैपादिक सूत्र आरंभिलें असल्यामुळें, त्या आरंभसामर्थ्यानें 'ढो ढे लोपः' या सूत्राच्या दृष्टीनें 'ष्टुना ष्टुः' या सूत्रानें झालेलें ष्टुत्व असिद्ध ठरत नाहीं असा शंकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'भाष्ये स्थितम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यापूर्वीं 'दृढः स्थूलबल-योरिति सूत्रें' हीं पदें अध्याहृत आहेत म्हणजे 'दृढः स्थूलबल-योरिति सूत्रे भाष्ये स्थितम्' अशी ती पंक्ति वाचावी. 'प्रत्युदा-हरणमिदं द्रष्टव्यमिति' असें जें प्रसादकारांनीं म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('दृह्' धातूहून 'क्त' प्रत्यय केला असतां 'दृढ' असें जें क्तान्त रूप सिद्ध होतें त्याहून 'णिच्' प्रत्यय केल्यास) 'णि'चे

जागीं अयादेश न होण्याची जी आपत्ति येते (व तसेंच 'दृढ' शब्दाहून अपत्यार्थक अनार्ष 'इञ्' प्रत्यय केला असतां) 'ष्यङ्' होण्याची जी आपत्ति येते या दोन्ही इष्टापत्तीच आहेत. (सारांश प्रसादकारांच्या मतें 'दृंह्' धातूहून सिद्ध होणाऱ्या 'दृढ' या शब्दाचींच 'परिद्रढय्य, पारिदृढी' इत्यादि रूपें होऊं शकतात व 'दृह्' धातूहून सिद्ध होणाऱ्या 'दृढ' या शब्दाचीं तशीं रूपें मुळींच होऊं शकत नाहींत.) 'उभयोरपि निपातनाभ्युपगमात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्या पूर्वी 'त्वदवलम्बभूतेन वृत्तिकृता' हीं पदें अध्याहृत आहेत, आणि म्हणूनच 'तदाह वामनः' असें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे. (पण 'दृह्' व 'दृंह्' या दोन्ही धातूंचें 'दृढ' असें क्तान्त रूप 'दृढः स्थूलबलयोः' या सूत्रान्वयें निपातनानें सिद्ध होतें असें वामनाचें म्हणणें आहे तरी, प्रक्रियाकौमुदीकारांनीं 'अणः किम्' याचें प्रकृत सूत्रावरील वृत्तींत 'दृढः' हें जें प्रत्युदाहरण दिलें आहे त्यावरून हें सिद्ध होतें कीं, प्रक्रियाकौमुदीकारांना वामनाचें हें म्हणणें मान्य नसून, 'दृंह्' धातूचेंच निपातनानें सिद्ध झालेलें 'दृढ' हें रूप आहे व 'दृह्' धातूचें निपातनानें सिद्ध झालेलें हें रूप नव्हें असें त्यांचें मत आहे; कारण जर तें रूप त्यांच्या मतें 'दृह्' धातूचें देखील निपातनानें सिद्ध झालेलें रूप असतें तर त्यांनीं तें रूप प्रत्युदाहरणरूपानें दिलें नसतें. प्रक्रियाकौमुदीकारांना वामनाचें मत मान्य नाहीं याचें उघड कारण हें आहे कीं,) 'दृंहेर्नकारहकारलोपार्थम्' असें भाष्यवचन असल्यामुळें वामनाचें मत त्या भाष्यवचनाविरुद्ध ठरतें व तसेंच 'अनिदितो दृहेस्तु दृहितमित्येवेष्यते' असें जें कैयटानें म्हटलें आहे तें देखील वामनाच्या मताविरुद्ध जातें. (सारांश जरी प्रसादकारांचें मत वामनाच्या मताविरुद्ध आहे तरी वामनाचें मत भाष्यविरुद्ध असल्यामुळें, प्रसादकारांनीं त्या मताचा स्वीकार केला नाहीं हें अयोग्य ठरत नसून उलट योग्यच ठरतें असें प्रसादकारानुयायीचें म्हणणें आहे.) पण प्रसादकारांच्या म्हणण्याप्रमाणें 'दृह्' धातूचें देखील इडागम न केल्यानें व ढत्व केल्यानें 'दृढ'

असें क्तान्त रूप सिद्ध होऊं शकतें असें मानल्यास, 'दृढः स्थूलबलयोः' हें जें निपातनसूत्र इडागमनिषेधप्रकरणांत पठित केलें आहे तें व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. ('दृह्' व 'दृहि = दृंह्' धा. नं. ७३३, ७३४ हे दोन्ही धातु भ्वादिगणांत पठित असून त्यांचा अर्थ सारखाच आहे व हे दोन्ही धातु सेट्क असून दकारानें सुरु होणारे हकारान्त धातु आहेत. त्यामुळें त्यांच्या अन्त्य हकाराचें 'दादेर्धातोर्घः' सू. ३२५ या सूत्रानें घत्व पावतें व त्यांच्या पुढें 'क्त = त' हा वलादि आर्धधातुक निष्ठाप्रत्यय आला असतां, त्या प्रत्ययाला 'आर्धधातुकस्येट्' सू. २१८४ या सूत्रानें इडागम पावतो. 'आगमशास्त्रमनित्यम्' ही परिभाषा स्वीकारून प्रसादकारांनीं 'दृह्' धातूपुढें येणाऱ्या 'क्त' प्रत्ययाला इडागम होण्याचें निवारण केलें आहे आणि 'वा द्रुह' सू. ३२७ या सूत्राचा 'वा' असा योगविभाग करून 'दृह्' धातूंतील अन्त्य हकाराचें घत्व होण्याचें निवारण केलें आहे व अशा रीतीनें त्यानीं त्या धातूचें 'दृढ' असें रूप, निपातन न मानतां, शास्त्रीयरीत्याच सिद्ध होतें असें म्हटलें आहे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. हीच तऱ्हा 'दृहि = दृंह्' धातूचे ठिकाणीं उपयोगांत आणल्यास, त्या धातूपुढें येणाऱ्या 'क्त' प्रत्ययाला इडागम होणें व त्या धातूंतील अन्त्य हकाराचें घत्व होणें जरी टाळतां येतें तरी निपातनानें नकारलोप केल्याशिवाय त्या धातूचें 'दृढ' असें क्तान्त रूप सिद्ध होऊं शकत नाहीं हें खरें; कारण तो धातु इदित् असल्यामुळें, त्याला 'अनिदितां हल उपधायाः' सू. ४१५ हें सूत्र लागू पडत नाहीं. पण जरी त्या धातूचें तसें क्तान्त रूप निपातन मानल्याशिवाय सिद्ध होऊं शकत नाहीं तरी, 'दृह्' धातूचें तसें रूप, निपातन न मानतां, शास्त्रीयरीत्या प्रसादकारांच्या म्हणण्याप्रमाणें सिद्ध होऊं शकतेंच. मग असें जर आहे तर 'दृढः स्थूलबलयोः' हें निपातनाचें सूत्र इडागमनिषेध प्रकरणांत पठित करण्याची गरज काय होती ? जर 'दृह्' किंवा 'दृहि' या दोन्ही धातूंचें 'दृढ' असें क्तान्त रूप

निपातन मानल्याशिवाय सिद्ध होऊं शकत नाहीं असें मानलें तरच तें निपातनसूत्र व्यर्थ न ठरतां चरितार्थ ठरतें. म्हणून तें सूत्र चरितार्थ ठरण्याकरितां हें मानणें आवश्यक आहे कीं, 'दृह्' या सेट्क धातूचें देखील 'दृढ' असें क्तान्त रूप निपातनानेंच ढत्व व इडभाव होतो असें मानल्याशिवाय, सिद्ध होऊं शकत नाहीं व प्रसादकारांनीं आगमशास्त्र अनित्य मानून व वर सांगितल्याप्रमाणें 'वा' असा योगविभाग करून 'दृह्' धातूचें 'दृढ' असें जें क्तान्त रूप, निपातन न मानतां, सिद्ध केलें आहे तें त्यांचें करणें चूक ठरतें; कारण 'आगमशास्त्रमनित्यम्' ही जी परिभाषा त्यांनीं स्वीकारली आहे ती भाष्यांत कोठेंहि पठित नसल्यामुळें स्वीकारार्ह नाहीं आणि तसेंच 'वा द्रुह' या सूत्राचा त्यांनीं जसा योगविभाग केला आहे तसा भाष्यकारांनीं केला नसल्यामुळें, तसा योग–विभाग करणें देखील प्रमाणरहित व अयोग्य आहे असा शद्बरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) या विषयाचें एवढें विवेचन पुरें. (सारांश 'दृढः' हें जें प्रकृत सूत्रांतील 'अणः' याचें प्रक्रियाकौमुदींत प्रत्युदाहरण दिलें आहे तें योग्य प्रत्युदाहरण ठरत नाहीं असें शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे.)

मनोरमा– उत्वमेवेति सिद्धासिद्धयोरतुल्यबलत्वेन "विप्रतिषेधे परम्–" इत्यस्याप्रवृत्तौ निष्प्रतिपक्षत्वादुत्वमेव भवतीत्यर्थः। तदुक्तम्–पूर्वत्रासिद्धे नास्ति विप्रतिषेधोऽभावादुत्तरस्य इति एतेन विभक्तिकार्यं प्राक् पश्चादुत्वमत्वे इत्यादि व्याख्यातम्।

('विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ या सूत्रावरील कौमुदींत) 'पूर्वत्रासिद्धमिति रो रि इत्यस्यासिद्धत्वादुत्वमेव' असें जें म्हटलें आहे त्याचा अर्थ हा आहे कीं, ('हशि च' सू. १६६ हें सापादिक) सिद्धशास्त्र व ('रो रि' सू. १७३ हें त्रैपादिक) असिद्धशास्त्र हीं दोन शास्त्रें समानबल नसल्यामुळें, 'विप्रतिषेधे परं कार्यम्' हें प्रकृत सूत्र ('मनस् + रथ = मनर् + रथ' या उदाहरणांत 'रो

रि' या परशास्त्राची प्रवृत्ति करून देण्याकरितां) प्रवृत्त होऊं शकत नाहीं व त्यामुळें ('हशि च' या सापादिक सिद्ध) शास्त्राचा कोणीच प्रतिपक्षी राहत नसल्यामुळें, उत्वच होतें. ('मनस् + रथ' या उदाहरणांत 'ससजुषो रुः' सू. १६२ या सूत्रानें 'मनस्' यांतील सकाराचे जागीं 'रु' हा आदेश झाला असतां, 'हशि च' या सापादिक पूर्व सूत्राची व 'रो रि' या त्रैपादिक उत्तर सूत्राची युगपत् प्राप्ति होते. या स्थलीं 'विप्रतिषेधे परं कार्यम्' हें प्रकृत सूत्र प्रवृत्त केल्यास, 'रो रि' या उत्तर सूत्राची प्रवृत्ति झाली पाहिजे व तें सूत्र प्रथम प्रवृत्त झाल्यास, 'मनोरथ' असें इष्ट रूप न होतां, त्या उत्तर सूत्रानें पूर्व रेफाचा लोप होऊन व 'ढ्रलोपे' सू. १७४ या सूत्रानें अकार हा 'अण्' दीर्घ होऊन 'मनारथ' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. पण 'विप्रतिषेधे परं कार्यम्' हें सूत्र या वरील उदाहरणांत प्रवृत्त होऊं शकत नाहीं; कारण जेथें दोन तुल्यबलशास्त्रांची युगपत् प्राप्ति होते तेथेंच तें सूत्र प्रवृत्त होऊं शकतें. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत–१.४.२–भाष्यकार म्हणतात–'विप्रतिषेध इति कोऽयं शब्दः। विप्रतिपूर्वात् सिधेः कर्मव्यतिहारे घञ्। इतरेतरप्रतिषेधो विप्रतिषेधः। अन्योन्यप्रतिशेधो विप्रतिषेधः। कः पुनर्विप्रतिषेधः?।···द्वौ प्रसङ्गौ यदाऽन्यार्थौ भवत एकस्मिंश्च युगपत् प्राप्नुतः स विप्रतिषेधः। क्व पुनरन्यार्थौ क्व चैकस्मिन् युगपत् प्राप्नुतः वृक्षाभ्याम् वृक्षेष्विन्यार्थौ, वृक्षेभ्य इत्यत्र युगपत् प्राप्तुतः।' भाष्यकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, जे दोन विधि एकएकटे निरनिराळ्या उदाहरणांमध्यें उपयोगी पडलेले असून वेगळ्या एका उदाहरणांत युगपत् प्राप्त होतात त्याला विप्रतिषेध म्हणतात. उदाहरणार्थ 'वृक्षाभ्याम्' या उदाहरणांत 'सुपि च' सू. २०२ हें सूत्र प्रवृत्त होऊन चरितार्थ होतें आणि 'वृक्षेषु' या उदाहरणांत 'बहुवचने झल्येत्' सू. २०५ हें सूत्र प्रवृत्त होऊन चरितार्थ होतें. अशा रीतीनें वेगवेगळ्या उदाहरणांत प्रवृत्त होऊन सावकाश व चरितार्थ झालेलीं हीं दोन सूत्रें

वृक्षेभ्यः' या भिन्न उदाहरणांत युगपत् प्राप्त होतात. अशा रीतीनें एकाच उदाहरणांत इतरत्र चरितार्थ झालेल्या दोन सूत्रांची युगपत् प्राप्ति होणें यालाच विप्रतिषेध म्हणतात, व अशा ठिकाणीं 'विप्रतिषेधे परं कार्यम्' या प्रकृत सूत्रानें पूर्व शास्त्र बाधित होऊन परशास्त्रच प्रथम प्रवृत्त होतें. पण जेथें युगपत् प्राप्त होणारीं दोन शास्त्रें समानबल नाहींत तेथें प्रकृत सूत्र प्रवृत्त होत नाहीं, आणि 'पूर्वत्रासिद्धम्' सू. १२ या सूत्रान्वयें सापादिक शास्त्राच्या दृष्टीनें त्रिपादी असिद्ध ठरत असल्यामुळें, म्हणजे त्रिपादी नाहींच असें मानावें लागत असल्यामुळें, 'हशि च' हें सापादिक सूत्र व 'रो रि' हें त्रैपादिक सूत्र हीं दोन सूत्रें तुल्यबल ठरत नाहीत आणि त्यामुळें तीं दोन सूत्रें प्रकृत सूत्राचा विषय होऊं शकत नाहींत. अशा रीतीनें 'हशि च' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें 'रो रि' हें त्रैपादिक सूत्र विद्यमानच नाहीं असें मानलें असतां, 'हशि च' या सूत्राचा कोणीच प्रपिपक्षी राहत नसल्यामुळें, तें सूत्र प्रवृत्त होऊन 'रु' चें उत्व होतें व 'मनोरथ' हें इष्ट रूप सिद्ध होतें.) या विषयासंबंधानें 'पूर्वत्रासिद्धे नास्ति विप्रतिषेधोऽभावादुत्तरस्य' हें वार्तिक ('पूर्वत्रासिद्धम्' ८. २. १ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं) पठित केलें आहे. हें वचन असल्यामुळें, सापादिक विभक्तिप्रत्ययनिमित्तक कार्य प्रथम होतें व नंतर उत्व मत्व हीं त्रैपादिक कार्यें होतात असें ('एत ईद्बहुवचने' सू. ४३८ या सूत्रावरील कौमुदींत) व्याख्यान केलें आहे. ('अदस् + औ' या स्थलीं 'औ' या विभक्तिप्रत्ययाच्या निमित्तामुळें 'अदस्' यांतील अन्त्य सकाराचे जागीं 'त्यदादीनामः' सू. २६५ या सापादिक सूत्रानें अकार होऊन व नंतर 'अतो गुणे' सू. १९१ आणि 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सापादिक सूत्रांनीं पररूप व वृद्धिरूप एकादेश हीं कार्यें अनुक्रमें होऊन 'अद अ औ = अद औ = अदौ' असें रूप प्रथम सिद्ध झाल्यावर 'अदसोऽसेः' सू. ४१९ या त्रैपादिक सूत्राची नंतर प्रवृत्ति होऊन त्या सूत्रानें दकाराचे जागीं मकार व दकारापुढील 'औ' चे जागीं ऊकार होऊन

'अमू' असें इष्ट रूप सिद्ध होतें. तसेंच 'अदस् + जस्' या स्थलीं 'त्यदादीनामः, अतो गुणे, जसः शी' सू. २१४ व 'आद्‌गुणः' सू. ६९ हीं सापादिक सूत्रें प्रवृत्त होऊन 'अदे' असें रूप झाल्यावर 'एत ईद्बहुवचने' हें त्रैपादिक सूत्र नंतर प्रवृत्त होतें व त्या सूत्रानें दकाराचे जागीं मकार होऊन व त्या दकारापुढील एकाराचें जागीं ईकार होऊन 'अमी' असें इष्ट रूप सिद्ध होतें. सारांश सापादिक शास्त्र व त्रैपादिक शास्त्र हीं समानबल नसल्यामुळें, प्रकृत सूत्र प्रवृत्त होत नाहीं व त्रैपादिक शास्त्र परशास्त्र असून देखील तें प्रथम प्रवृत्त न होतां, सापादिक पूर्वशास्त्रच प्रथम प्रवृत्त होतें.)

शब्दरत्न—अभावादुत्तरस्येति । आहार्याभावारोपादित्यर्थः ।।

'अभावादुत्तरस्य' यांतील 'अभावात्' या पदाचा 'आहार्याभावारोपात्' असा अर्थ आहे, म्हणजे जरी त्रिपादी विद्यमान आहे तरी सपादसप्ताध्यायीच्या दृष्टीनें ती विद्यमान नाहीं असा तिचे ठिकाणीं अभावाचा आरोप करून ती विद्यमान नाहीं असें मानावें लागतें असा अर्थ आहे.

मनोरमा—सूत्रे सु इति पृथक्पदं लुप्तषष्ठीकमित्याह—एतत्तदोर्यःसुरिति । एतत्तदर्थगतसंख्याभिधायी यः सुस्तस्येत्यर्थः । एतत्तदोर्विहित इति व्याख्याने तु परमस ददाति परमैष ददातीत्यादौ न स्यात् । अर्थद्वारकसम्बन्धाश्रयणे लिङ्गं तु "अनञ्समासे" इति बोध्यम् । अकोः किमिति । साकच्कयोः शब्दान्तरत्वादप्रसङ्ग इति प्रश्नः । एषक इति । "अकोः" इति प्रतिषेध एव "तन्मध्यपतितस्तद्ग्रहणेन गृह्यते" इति परिभाषां ज्ञापयतीति भावः ।

'एतत्तदोः सु लोपो' सू. १७६ या सूत्रांतील 'सु' हें लुप्तषष्ठीक भिन्न पद असल्यामुळें या सूत्रावरील कौमुदींत 'एतत्तदोर्यः सुस्तस्य लोपः स्याद्धलि' असें व्याख्यान केलें आहे व त्या कौमुदींतील पंक्तीचा 'एतद्' व 'तद्' यांच्या अर्थांतील संख्या सांगणारा जो 'सु' प्रत्यय त्याचा लोप होतो असा अर्थ आहे. प्रकृत सूत्रांतील 'एतत्तदोः सु' या पदांचा 'एतत्त-

दोर्विहितः यः सुः' असा अर्थ केल्यास, 'परमस ददाति, परमैष ददाति' इत्यादि स्थलीं 'सु' प्रत्ययाचा लोप न होण्याची आपत्ति येईल; (कारण वरील दोन्ही स्थलीं 'सु' हा विभक्तिप्रत्यय 'तद्' व 'एतद्' या प्रातिपदिकांहून विहित–झाला–नसून, तो 'परमतद्' व 'परमैतद्' या सामासिक शब्दांहून विहित–झाला–आहे. 'तद्' व 'एतद्' या शब्दांहून झालेल्या 'सु' प्रत्ययाचा 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें लुक् झाला आहे व तो लुक् झाल्यावर 'कृत्तद्धितसमासाश्च' सू. १७९ या सूत्रानें 'परमतद्, परमैतद्' यांना प्रातिपदिकसंज्ञा होऊन तशा सामासिक शब्दांहून 'सु' प्रत्यय झाला आहे हें लक्षांत ठेवावें. 'एतत्तदोर्विहितः यः सुः' असा प्रकृत सूत्रांतील 'एतत्तदोः सु' या पदांचा अर्थ केला तर, वर सांगितल्याप्रमाणें 'सु' प्रत्यय 'तद्, एतद्' यांहून झाला नसून 'परमतद्, परमैतद्' यांहून झाला असल्यामुळें, त्या 'सु' प्रत्ययाचा लोप न होण्याची आपत्ति येईल व 'परमस ददाति' इत्यादि इष्ट प्रयोग सिद्ध होऊं शकणार नाहींत असें दीक्षितांचें म्हणणें आहे. प्रकृत स्थलीं षष्ठीचा अर्थ विहितसंबंध नसून) अर्थद्वारकसंबंध आहे असें जें वर म्हटलें आहे त्याला प्रकृत सूत्रांतील 'अनञ्समासे' हें पद प्रमाण आहे हें ध्यानांत ठेवावें. (प्रकृत सूत्रांतील 'सु लोपः' या पदांचा 'सोः लोपः सुलोपः' असा षष्ठीसमास केला नाहीं व 'सुलोपः' असें एक सामासिक पद मानलें नाहीं; कारण 'एतत्तदोः यः सुः तस्य लोपः' असा 'एतत्तदोः सु लोपः' याचा अर्थ होणें वर सांगितल्याप्रमाणें इष्ट असल्यामुळें व 'एतत्तदोः' हे षष्ठ्यन्त पद 'सु' या पदाशीं विशेषणरूपानें अन्वित होत असणारें पद असल्यामुळें आणि 'समर्थः पदविधिः' सू. ६४७ असें सूत्र व 'सविशेषणानां वृत्तिन' असें भाष्यवचन असल्यामुळें, ज्याप्रमाणें 'ऋद्धस्य राज्ञः पुरुषः' या स्थलीं एकार्थीभावसामर्थ्याभावामुळें 'ऋद्धस्य राजपुरुषः' असा समास होऊं शकत नाहीं त्याचप्रमाणें प्रकृत स्थलीं 'सोः लोपः सुलोपः' असा समास, त्या दोन पदांत एकार्थीभाव होण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें, होऊं शकत नाहीं. म्हणून 'सु' हें लुप्तषष्ठीक भिन्न

पद मानलें आहे. आतां 'एकशतं षष्ठ्यर्थाः'—म्हणजे षष्ठीचे अनेक अर्थ आहेत—असें भाष्यवचन असल्यामुळें, 'एतत्तदोः' ही कोणत्या प्रकारच्या संबंधाची बोधक षष्ठी आहे हा प्रश्न सहजच उपस्थित होतो. ही स्थानषष्ठी मानतां येत नाहीं; कारण 'एतत्तदोः स्थाने सुः' असा अर्थ मुळींच संभवत नाहीं. ही अवयवषष्ठी देखील मानतां येत नाहीं; कारण 'सु' हा 'एतद्, तद्' यांचा अवयव नसून त्यांहून भिन्न असा प्रत्यय आहे. आनन्तर्य किंवा सामीप्य या अर्थाची बोधक ही षष्ठी आहे—म्हणजे 'एतत्तदोः अनन्तरः समीपवर्ती वा यः सुः' या अर्थाची बोधक ही षष्ठी आहे—असेंहि मानतां येत नाहीं; कारण आनन्तर्य किंवा सामीप्य असा षष्ठीचा अर्थ होत नाहीं हें संज्ञाप्रकरणांत पूर्वीं सांगितलेंच आहे. ही 'विहित' या अर्थाची बोधक षष्ठी मानल्यास कोणते दोष येतात हें नुकतेंच वर सांगितलें आहे. 'एतत्तदोः परः यः सुः' असाहि अर्थ होणें संभवत नाहीं; कारण प्रकृत सूत्रांत 'एतत्तद्भ्याम्' असें पञ्चम्यन्त पद नाहीं व 'तस्मादित्युत्तरस्य' ही परिभाषा असल्यामुळें, 'एतत्तदोः' या षष्ठीचा तसा अर्थ करतां येत नाहीं. म्हणून दीक्षितांनीं ही अर्थ-द्वारकसंबंधबोधिकाषष्ठी मानली आहे व ती तशा प्रकारची षष्ठी मानण्यास दीक्षित प्रकृत सूत्रांतील 'अनञ्समासे' हें पद प्रमाण आहे असें म्हणतात. नञ्समास 'नञ्' सू. ७५६ या सूत्रानें होतो व तें सूत्र 'तत्पुरुषः' सू. ७४६ या अधिकारांत पठित असल्यामुळें, नञ्समास हा तत्पुरुषसंज्ञक समास ठरतो आणि 'उत्तरपदार्थप्रधान-स्तत्पुरुषः' असें भाष्यवचन असल्यामुळें, नञ्समासांत 'नञ्' या पूर्व पदाचा अर्थ प्रधान नसून, त्या समासांतील उत्तरपदाचा अर्थ प्रधान असतो. त्यामुळें तशा सामासिक शब्दाहून होणारा 'सु' प्रत्यय उत्तरपदार्थगत संख्येचें अभिधान करणारा ठरतो. उदाहरणार्थ, 'राज्ञः पुरुषः राजपुरुषः' या स्थलीं 'राजपुरुष' या सामासिक शब्दाहून होणारा 'सु' प्रत्यय जसा 'पुरुष' या उत्तरपदाच्या अर्थांतील 'एक' या संख्येचा बोधक आहे त्याचप्रमाणें 'न ब्राह्मणः

अब्राह्मणः’ या नञ्समासांत देखील सामासिक शब्दाहून होणारा ‘सु’ प्रत्यय ‘ब्राह्मण’ या उत्तरपदाच्या अर्थामध्यें असणाऱ्या संख्येचा बोधक आहे. म्हणून ‘न सः असः, न एषः अनेषः’ या स्थलीं देखील सामासिक शब्दाहून होणारा ‘सु’ प्रत्यय ‘तद्, एतद्’ या उत्तरपदांतील अर्थगत संख्येचा अभिधायी–बोधक–ठरतो हें उघड आहे. नञ्समासांत उत्तरपदार्थ प्रधान असून तशा सामासिक शब्दाहून होणारा ‘सु’ प्रत्यय उत्तरपदार्थगत संख्येचा बोधक आहे असें न मानतां, उत्तरपदार्थ अप्रधान आहे व ‘सु’ प्रत्यय तदर्थगत संख्येचा बोधक नाहीं असें मानलें तर, नञ्समासांतील उत्तरपद सर्वनामसंज्ञक पद असल्यास, तें उपसर्जनीभूत मानल्यानें, ‘संज्ञोप-सर्जनीभूतास्तु न सर्वादयः’ या वार्तिकान्वयें त्याला सर्वनामसंज्ञा होणार नाहीं व त्यामुळें ‘त्यदादीनामः’ इत्यादि सूत्रांनीं सर्वनामाला होणारीं कार्यें त्याला होऊं शकणार नाहींत. त्यामुळें ‘न सः असः = नञ् + तद् + सु’ या स्थलीं ‘तद्’ यांतील अन्त्य दकाराचे जागीं ‘त्यदादीनामः’ सू. २६५ या सुत्रानें अकारादेश न होतां व ‘तदोः सः सावनन्त्ययोः’ सू. ३८१ या सूत्रानें ‘तद्’ यांतील तकाराचे जागीं सकार न होतां ‘अतद् + सु’ अशी स्थिति होईल व त्यामुळें ‘हल्ङ्याब्भ्यः’ सू. २५२ या सूत्रानें ‘सु’ प्रत्ययाचा लोप होईलच, व अशा रीतीनें प्रकृत सूत्रांतील ‘अनञ्समासे’ या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते; कारण त्या सूत्रांत तें पद नसलें तरी, वर सांगितल्याप्रमाणें, ‘सु’ लोप होऊं शकतोच. पण ज्याअर्थीं पाणिनीनें प्रकृत सूत्रांत त्या पदाचें मुद्दाम ग्रहण केलें आहे त्याअर्थीं हें ज्ञापित होतें कीं, नञ्समासांत उत्तरपदार्थ प्रधान असतो व तशा सामासिक शब्दाहून होणारा ‘सु’ प्रत्यय त्या समासांतील उत्तरपदार्थगत संख्येचा बोधक असतो. त्यामुळें ‘एतत्तदोः सु लोपः’ एवढेंच सूत्र केलें असतें तर, ‘असः शिवः, अनेषः शिवः’ या स्थलीं देखील ‘सु’ प्रत्ययाचा लोप झाला असता. पण तसें होणें इष्ट नसल्यामुळें पाणिनीनें प्रकृत सूत्रांत ‘अनञ्समासे’ या पदाचें ग्रहण

केलें आहे व अशा रीतीनें त्या पदाचें ग्रहण चरितार्थ ठरून त्या पदाच्या ग्रहणसामर्थ्यानें हें ज्ञापित होतें कीं, 'एतन्तदोः' ही अर्थ-द्वारकसंबंधबोधिकाषष्ठी आहे व त्यामुळेंच दीक्षितांनीं 'एतत्तदोः विहितः यः सुः' असा अर्थ न करितां 'एतत्तदर्थगतसंख्याभिधायी यः सुः' असा अर्थ मनोरमेंत केला आहे.) 'अकोः किम्' असा जो प्रकृत सूत्रावरील कौमुदींत प्रश्न केला आहे तो अशा आशयानें केला आहे कीं, ('एतद्, तद्' या शब्दांना 'अव्ययसर्वनाम्नामकच्प्राक्टेः' सू. २०२६ या सूत्रानें 'अकच्' प्रत्यय केला असतां त्या शब्दांचें मूळ स्वरूप बदलून ते भिन्न प्रकारचे शब्द होत असल्यामुळें, तशा) 'अकच्' प्रत्यययुक्त शब्दांपुढें येणाऱ्या 'सु' प्रत्ययाचा लोप होण्याची प्रकृत सूत्रान्वयें प्राप्तीच नाहीं. असें असून देखील प्रकृत सूत्रांत 'अकोः' असा प्रतिषेध सांगितला असल्यामुळें 'तन्मध्यपतितस्तद्ग्रहणेन गृह्यते'—परि. ९०—ही परिभाषा ज्ञापित होते. (सारांश अव्यय व सर्वनाम याहून 'अकच्' प्रत्यय झाला असतां, जरी शब्दस्वरूपांत बदल होतो तरी तें शब्दस्वरूप त्या शब्दाच्या मूळ स्वरूपाहून भिन्न आहे असें मानलें जात नाहीं; कारण तो प्रत्यय मूळ शब्दाच्या 'टि'च्या पूर्वीं होत असल्यामुळें व अशा रीतीनें त्या शब्दाच्या आदि व अन्त्य वर्णांच्या मध्यें तो येत असल्यामुळें, मूळ शब्दानें तशा अकच्प्रत्यययुक्त शब्दाचें देखील ग्रहण होतें. त्यामुळें 'एषक' हा अकच्प्रत्ययविशिष्ट 'एष' च आहे असें मानतां येतें व प्रकृत सूत्रांत 'अकोः' या पदाचें ग्रहण केलें नसतें तर, 'एषक' या शब्दापुढील 'सु' प्रत्ययाचा लोप झाला असता व 'एषको रुद्रः' असा इष्ट प्रयोग सिद्ध न होतां, 'एषक रुद्रः' असा अनिष्ट प्रयोग होण्याची आपत्ति आली असती. ती आपत्ति टाळण्याकरितांच प्रकृत सूत्रांत 'अकोः' या पदाचें ग्रहण केलें आहे व अशा रीतीनें तें ग्रहण वरील परिभाषेचें ज्ञापक ठरतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. वरील परिभाषेचें विस्तृत विवरण परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरांत पान ४१९–२० मध्यें केलें आहे व तें वाचल्यास त्या परिभाषेचा अर्थ पूर्णपणें ध्यानांत येईल.)

शब्दरत्न–लिङ्गमिति । विहितविशेषणे, तद्वैयर्थ्यं स्पष्टमेवेति भावः ।

मनोरमेंत 'अर्थद्वारकसम्बन्धाश्रयणे लिङ्गं तु अनञ्समासे इति बोध्यम्' असें जें म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'एतत्तदोः विहितः यः सुः' असा अर्थ केल्यास, प्रकृत सूत्रांतील 'अनञ्समासे' या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरतें हें उघड आहे. (कारण नञ्समास केल्यावर जो सामासिक शब्द सिद्ध होतो त्याहून 'सु' प्रत्यय होत असल्यामुळें व त्या समासांत जे 'एतद्, तद्' शब्द चरमावयव आहेत त्यांहून तो प्रत्यय होत नसल्यामुळें, तशा समासांत, वरील अर्थ बरोबर मानल्यास, 'सु' लोपाची प्राप्तीच होत नाहीं. म्हणून तसा अर्थ करणें योग्य नाहीं आणि मनोरमेंत जो अर्थ केला आहे तोच अर्थ बरोबर मानणें योग्य आहे. या विषयाचें विस्तृत विवरण मनोरमेंत केलेंच आहे.)

मनोरमा–बहुलग्रहणेति । अत एव लोपं विना पादपूरणेऽपि क्वचिद्भवति । सास्मा अरम् । सः अस्मै इति च्छेदः ।।

'सोऽचि लोपे' सू. १७७ या सूत्रांत ('स्यश्छन्दसिबहुलम्' या पूर्व सूत्रांतून) 'बहुलम्' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें (व 'क्वचित् प्रवृत्तिः क्वचिदप्रवृत्तिः क्वचिद्विभाषा क्वचिदन्यदेव । शिष्टप्रयोगाननुसृत्य लोके विज्ञेयमेतत् बहुलग्रहे तु' अशी 'बहुल' शब्दाची व्याख्या असल्यामुळें) वैदिक प्रयोगांत जेथें 'सु' लोप न केला तरी पादपूरण होतें तशा ठिकाणीं देखील क्वचित् स्थलीं 'सु' लोप होतो. उदाहरणार्थ ('सः अस्मै अरम्' या पदांचा) वेदांत 'सास्मा अरम्' असा 'सु' लोप करून सन्धि केलेला आढळतो. 'सास्मा' याचा 'सः अस्मै' असा पदच्छेद आहे. (वरील वैदिक उदाहरणांत 'सु'लोप न करितां देखील त्या 'सु' चे 'ससजुषो रुः' या सूत्रानें रुत्व करून व नंतर 'अतो रोः' सू. १६३ या सूत्रानें त्या 'रु' चें उत्व करून व 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें गुण करून 'एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें पूर्वरूप

सन्धि केला असतां 'सोऽस्मा अरम्' असा जो सन्धियुक्त प्रयोग सिद्ध होतो त्यानें देखील पादपूरण होतेंच. तरी पण प्रकृत सूत्रांत 'बहुलम्' या पदाची अनुवृत्ति असल्यामुळें त्या वैदिक प्रयोगांत 'सु' लोप करून 'स अस्मा' या पदांचा 'सास्मा' असा 'अकः सवर्णे दीर्घः' सू. ८५ हें सूत्र प्रवृत्त करून सन्धियुक्त प्रयोग केला आहे.)

शब्दरत्न–सास्मा अरमिति । सोस्मा अरमिति सन्धावपि पादपूर्त्तेः। न च "प्रकृत्यान्तः पादम्–" इति पूर्वरूपस्याभावेन न पादपूर्त्तिः। "सोऽयमागात्" इत्यादाविवात्रापि प्रातिशाख्येन सिद्धेः । एवञ्चावधारणपरतया न व्याख्येयम् । "सोऽहमाजन्म–" इत्यादौ बहुलग्रहणेन क्वचिदप्रवृत्याऽपि सिद्धेरिति तात्पर्यम् ॥

('सु' लोप न करितां) 'सोऽस्मा अरम्' असा सन्धि करून प्रयोग केला असता तरी पादपूरण होऊं शकलेंच असतें. (तरी पण प्रकृत सूत्रांत 'बहुलम्' या पदाची अनुवृत्ति केल्यानें 'सास्मा अरम्' या प्रयोगाची उपपत्ति लावतां येते व 'सर्वे विधयश्छन्दसि विकल्प्यन्ते'–परि. ३५–या परिभाषान्वयें देखील त्या प्रयोगाची उपपत्ति लावतां येते.) 'सो अस्मा अरम्' या स्थलीं ('एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें पावलेला) पूर्वरूप सन्धि, 'ऋक्पादमध्यस्थः एङ् प्रकृत्या स्यात् अति परे' या अर्थाच्या वाचक 'प्रकृत्याऽन्तःपादम्' सू. ३५१८ हें सूत्र असल्यामुळें, होऊं शकत नव्हता व ('सो अस्मा अरम्' अशी प्रकृतिभाव केल्यानें स्थिति राहिल्यामुळें) पादपूरण होऊं शकलें नसतें अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेला उत्तर हें आहे कीं, सोऽयमागात्' इत्यादि स्थलीं जसा ('अव्यादवद्यादव' सू. ३५१९ या सूत्रानें पावलेला प्रकृतिभाव न करितां) पूर्वरूप सन्धि केला आहे तसा सन्धि ('सो अस्मा अरम् = सोऽस्मा अरम्' या स्थलीं देखील) प्रातिशाख्यान्वयें करतां आला असता. म्हणून (प्रकृत सूत्रांत 'बहुलम्' या पदाची अनुवृत्ति केल्यानेंच सर्व इष्ट लौकिक व वैदिक प्रयोगांची सिद्धि होऊं शकत असल्यामुळें, 'सु' लोप केला असतां जर पादपूरण

होत असेल तरच 'सु'लोप करावा असें प्रकृत सूत्राचें) अवधारणरूप व्याख्यान करूं नये, (व वर सांगितल्याप्रमाणें 'बहुलम्' या शद्वाचा 'क्वचित् प्रवृतिः क्वचिदप्रवृत्तिः' असा अर्थ होत असल्यामुळें) क्वचित् स्थलीं प्रकृत सूत्र प्रवृत्त न केल्यानें देखील 'सोऽहमाजन्मशुद्धानाम्' इत्यादि प्रयोगांत न केलेल्या 'सु' लोपाची उपपत्ति लावतां येते असा दीक्षितांच्या म्हणण्याचा तात्पर्यार्थ आहे. (सारांश प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'पादश्चेल्लोपे सत्येव पूर्येत' असा जो दीक्षितांनीं प्रकृत सूत्राचा अवधारणरूप अर्थ केला आहे तो प्राचीन वैयाकरणांच्या मतास अनुसरून केला असून दीक्षितांचें स्वतःचें असेंच मत आहे कीं, प्रकृत सूत्रांत 'बहुलम्' या पदाची अनुवृत्ति केल्यानें व त्यामुळें प्रकृत सूत्राची 'क्वचित् प्रवृत्तिः क्वचिदप्रवृत्तिः'—म्हणजे कोठें प्रवृत्ति व कोठें अप्रवृत्ति—केल्यानें सर्व वैदिक व लौकिक इष्ट प्रयोग सिद्ध होऊं शकत असल्यामुळें, तसा अवधारणरूप अर्थ करूं नये. तसा अर्थ केल्यास, 'सास्मा अरम्' या वैदिक प्रयोगाची उपपत्ति लावण्याकरितां प्रकृत सूत्रांत 'बहुलम्' या पदाची अनुवृत्ति करणें भाग आहे व तशी अनुवृत्ति केल्यानेंच जर सर्व इष्ट प्रयोगांची सिद्धि होऊं शकते तर अवधारणारूप अर्थ करून फायदा काय? 'सोऽहमाजन्मशुद्धानाम्' या स्थलीं 'सु'लोप केल्यास व 'अकः सवर्णे दीर्घः' सू. ८५ या सूत्रानें दीर्घ एकादेश केल्यास, 'साहमाजन्मशुद्धानाम्' असा प्रयोग होऊन त्यानें पादपूरण होतेंच. 'सु'लोप न केला तरी पादपूरण होतेंच. अशा स्थलीं 'क्वचिदप्रवृत्तिः' या वचनान्वयें देखील 'सु' लोपाभावाची उपपत्ति लावतां येते म्हणून अवधारणरूप अर्थ करण्याची कांहीं गरज नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा तात्पर्यार्थ आहे असें शब्दरत्नकार म्हणतात. आतां 'सोऽयमागादित्यादाविवात्रापि प्रातिशाख्येन सिद्धेः' असें जें शब्दरत्नांत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'रथतूः सोऽयमागात्' या ऋचेंत 'सो' यांतील ओकारापूढें 'अयम्' यांतील अकार असून त्या अकारापुढें यकार आला असल्यामुळें व

'प्रकृत्याऽन्तःपादमव्यपरे' सू. ३५१८ या सूत्रांत 'अव्यपरे' असा प्रतिषेध असल्यामुळें, 'सोऽयमागात्' या स्थलीं प्रकृतिभाव न होतां पूर्वरूप सन्धीच झाला पाहिजे; परंतु ओकारापुढें 'अयम्' हा शब्द आल्यास, प्रकृतिभावच होतो असें 'अव्यादवद्याद्' सू. ३५१९ या अपवादक उत्तरसूत्रांत सांगितलें असल्यामुळें, 'सोऽयमागात्' या स्थलीं पूर्वरूप सन्धि न होतां 'सो अयमागात्' असा प्रकृतिभाव झाला पाहिजे. असें असून देखील त्या ऋचेंत प्रकृतिभाव न करितां 'एङः पदान्तादति' सू. ८६ या सूत्रानें होणारा जो पूर्वरूप सन्धि केला आहे त्याला शौनकीयप्रातिशाख्याचा आधार आहे असें शब्द-रत्नकारांचे' म्हणणें आहे, व दीक्षितांनीं देखील 'अव्यादवद्यात्' या सूत्रावरील कौमुदींत याच आशयाची 'प्रातिशाख्ये तु वाचनिक एवाय-मर्थः' ही पंक्ति लिहिली आहे. शौनकीय प्रातिशाख्यांतील द्वितीय पट-लाच्या १४ व्या श्लोकांत 'अन्तः पादमकाराच्चेत् संहितायां लघोर्लघु । यकाराद्यक्षरं परं वकाराद्यपि वा भवेत्' असा नियम सांगितला आहे व त्या श्लोकाचा असा अर्थ आहे कीं, 'एङ्' पुढें ह्स्व अकार आल्यास व त्या अकारापुढें वकार किंवा यकार आला असून त्या वकारापुढें किंवा यकारापुढें लघु स्वर आला असल्यास पूर्वरूप सन्धीच होतो, व या प्रातिशाख्य नियमान्वयें 'सोऽयमागात्' असाच प्रयोग शुद्ध ठरतो. त्याचप्रमाणें 'सास्मा अरं सोत नः सेन्द्र विश्वा । सेति सास्माकमनवद्य सासि' या त्या प्रातिशाख्यांतील द्वितीय पटलांत दिलेल्या तेहतिसाव्या श्लोकांत सांगितलेल्या नियमान्वयें 'सास्मा अरम्' हा प्रयोग व तसेंच 'सोऽस्माकं यो द्वषेभ्योऽन्यकृतेभ्यः' या त्या पटलांतील पंचविसाव्या श्लोकांत सांगितलेल्या नियमान्वयें 'सोऽस्मा अरम्' हा प्रयोग देखील शुद्ध ठरतो असा शब्दरत्न-कारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

॥ स्वादिसन्धिप्रकरणं समाप्तम् ॥

॥ पञ्चसन्धिप्रकरणं समाप्तम् ॥

॥ अथाजन्तपुल्लिङ्गप्रकरणम् ॥

मनोरमा – अर्थवदधातुः प्रत्ययं प्रत्ययान्तं चेति । सूत्रे तन्त्रादिना उभयं विवक्षितमिति भावः । तथा हि प्रत्ययस्यैव पर्युदासे "कृत्तद्धित" इति सूत्रेण तद्धितान्तस्य संज्ञाविधानं व्यर्थं स्यात् । न च तत्रापि तदन्तं न ग्राह्यमिति वाच्यम्, "अर्थवत्" इत्यनुवृत्तिसामर्थ्यात्तदन्तग्रहणात् । प्रशंसायां हि मतुप् । एकार्थीभावेन लौकिके प्रयोगे प्रसिद्धत्वं च प्रशंसामूलम् । न च "अर्थवत्" इत्यस्य पूर्वसूत्रे चरितार्थता, धातुप्रत्ययपर्युदासेनैव तल्लाभात् । तस्मात्प्रत्ययान्तं च वर्जयित्वेत्युचितमेव । यदि तु प्रत्ययो न पर्युदस्येत तर्हि "सात्पदाद्योः" इति सूत्रे सातिग्रहणं व्यर्थं स्यात् । "अर्थवत्" इति किम् ? धनं, वनमित्यादौ प्रतिवर्णं संज्ञा मा भूत् । तस्यां च सत्यां स्वादयः स्युः । ननु संख्याकर्मादेरभावात् न भविष्यन्तीति चेत, न, एकवचनमुत्सर्गतः करिष्यते इति सिद्धान्तात् । हुंफडादिभ्य इव सोर्दुर्वारत्वात् । न च अर्थवद्ग्रहणपरिभाषयाऽनर्थके न स्यादिति वाच्यम्, तस्या विशिष्टरूपोपादानविषयत्वात् । "अधातुः" इत्यादिपर्युदासबलेन यद्यप्यर्थवत्त्वं लभ्यते, तथाऽपि उत्तरार्थं तदित्युक्तम् । एतच्च "सुप्तिङन्तम्" इति सूत्रे भाष्ये ध्वनितम् ।

('अर्थवदधातुरप्रत्ययः–प्रातिपदिकम्' सू. १७८ या सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पर्युदासाचा) 'प्रत्ययं प्रत्ययान्तंच वर्जयित्वा' असा जो कौमुदींत अर्थ केला आहे त्याचें कारण हें आहे कीं, 'अप्रत्ययः' यांतील 'प्रत्यय' या शब्दाचा 'प्रत्यय' व 'प्रत्ययान्तं' असा दोन्ही प्रकारचा अर्थ प्रकृत सूत्रांत तन्त्रादिकांनीं विवक्षित आहे. ('सकृदुच्चरितः शब्दोऽनेकार्थपरो यत्र तत्र तन्त्रेति व्यवहारः' अशी 'तन्त्र' या शब्दाची भैरवीकारांनीं व्याख्या दिली आहे. जेथें एकाद्या अनेकार्थवाचक शब्दापासून एकापेक्षां अधिक अर्थाचा बोध व्हावा या इच्छेनें तो शब्द उच्चारला जातो तशा ठिकाणीं मागें संज्ञाप्रकरणांत सांगितल्या-

प्रमाणें तन्त्र व आवृत्ति या साधनांचा उपयोग केला असतां, त्या शब्दाच्या अनेक अर्थांचा बोध होतो. 'प्रत्यय' हा शब्द जसा प्रत्ययाचा वाचक आहे तसाच तो 'प्रत्ययग्रहणे यस्मात्स विहितस्तदादेस्तदन्तस्य ग्रहणम्'—परि. २३—या परिभाषान्वयें प्रत्ययान्ताचा देखील वाचक आहे. म्हणून तो अनेकार्थवाचक शब्द दोनदां उच्चारला असतां त्यापासून प्रत्यय व प्रत्ययान्त या दोन्ही अर्थांचा आवृत्तीच्या सहायानें बोध होतो, व प्रकृत स्थलीं हे दोन्ही अर्थ पाणिनीला विवक्षित असल्यामुळें, 'अप्रत्ययः' या पर्युदासाचें 'प्रत्ययं व प्रत्ययान्तं च वर्जयित्वा' असें कौमुदींत व्याख्यान केलें आहे असें दीक्षितांचें म्हणणें आहे.) 'अप्रत्ययः' या पर्युदासानें केवळ प्रत्ययालाच प्रातिपदिकसंज्ञेचा निषेध केला आहे (व प्रत्ययान्ताला प्रातिपदिकसंज्ञेचा निषेध केला नाहीं) असें मानलें तर, 'कृत्तद्धितसमासाश्च' सू. १७९ या सूत्रानें तद्धितान्ताला प्रातिपदिकसंज्ञा होण्याचें जें विधान केलें आहे तें व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. ('कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांतील 'कृत्' व 'तद्धित' या प्रत्ययवाचक शब्दांनीं प्रत्ययग्रहणपरिभाषान्वयें—परि. २३—कृदन्त व तद्धितान्त यांचें ग्रहण होतें व कृदन्ताला, तद्धितान्ताला आणि समासाला प्रातिपदिकसंज्ञा व्हावी म्हणून पाणिनीनें 'कृत्तद्धितसमासाश्च' हें सूत्र मुद्दाम केलें आहे. प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पदानें प्रत्ययान्ताचा पर्युदास केला नाहीं असें मानलें तर, अर्थवदधातुः' या प्रकृत सूत्रानेंच तद्धितान्ताला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकली असती व अशा रीतीनें 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांत तद्धितान्तवाचक 'तद्धित' या शब्दाचें ग्रहण करण्याची कांहींच गरज नव्हती. परंतु त्या शब्दाचें त्या सूत्रांत ग्रहण केलें असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या शब्दानें प्रत्ययान्ताचा देखील पर्युदास केला आहे व त्या पर्युदासामुळें तद्धितान्ताला जी प्रातिपदिकसंज्ञा प्राप्त होऊं शकत नव्हती ती त्याला व्हावी याकरितां त्या सूत्रांत तद्धितान्तवाचक 'तद्धित' या शब्दाचें ग्रहण केलें आहे.)

'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांतील 'तद्धित' या पदानें देखील (तद्धितप्रत्ययाचेंच ग्रहण होत असून) तद्धितान्ताचें ग्रहण होत नाहीं असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण त्या सूत्रांत ('अर्थवदधातुः' या पूर्व सूत्रांतून) 'अर्थवत्' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें, त्या अनुवृत्तीच्या सामर्थ्यानें 'तद्धित' या शब्दानें तद्धितान्ताचें ग्रहण होतें. ('भूमनिन्दाप्रशंसासु ··· भवन्ति मतुबाह्यः' या कारिकान्वयें) 'अर्थवत्' या स्थलीं 'प्रशंसा' या अर्थाचा वाचक 'मतुप्' प्रत्यय झाला आहे आणि लौकिक प्रयोगांत (केवळ तद्धित प्रत्ययाचा प्रयोग होत नसून, प्रकृति व तीहून होणारा तद्धित प्रत्यय या दोहोंचा) एकार्थीभाव झाल्यावर निष्पन्न होणाऱ्या तद्धितान्त शब्दाचाच लोकांत प्रयोग होणें प्रसिद्ध असल्या-मुळें, तद्धितान्त शब्द हाच प्रशस्तार्थाचा वाचक ठरतो (आणि म्हणून 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांतील 'तद्धित' या शब्दानें केवळ तद्धित प्रत्ययाचें ग्रहण न होतां, तद्धितान्ताचेंच ग्रहण होऊं शकतें.) 'अर्थवदधातुः' या प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण चरितार्थ आहे असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण त्या सूत्रांतील 'अधातुः' व 'अप्रत्ययः' या पर्युदासांच्या सामर्थ्यानेंच अर्थवान् शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकते हें आपो-आपच सिद्ध होतें. (प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण आवश्यक नसून, त्या पदाची 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांत अनुवृत्ति व्हावी व त्या अनुवृत्तीच्या सामर्थ्यानें 'कृत्, तद्धित' या शब्दांनीं कृदन्त, तद्धितान्त यांचें ग्रहण व्हावें याकरितां तें पद प्रकृत सूत्रांत घातलें आहे असें जें सिद्धान्तीचें म्हणणें आहे त्यावर शंकाकार असें म्हणतो कीं, तें पद प्रकृत सूत्रांत असणें आवश्यक ठरतें; कारण प्रकृत सूत्रांत त्या पदाचें ग्रहण न केल्यास, अर्थरहित वर्णसमुदायाला देखील प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, धातु व प्रत्यय हे दोन्ही अर्थवान् असून प्रकृत सूत्रांत त्यांचा पर्युदास केला असल्यामुळें, 'नञिवयुक्तम्'—परि. ७५—

या परिभाषान्वयें धातु व प्रत्यय याहून भिन्न पण तत्सदृश, म्हणजे त्यांच्यासारखे अर्थवान्, असे अर्थवान् शब्दच प्रातिपदिकसंज्ञक होऊं शकतात. म्हणून प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण केलें नसतें तरी, धातु व प्रत्यय खेरीज करून इतर अर्थवान् शब्दांनाच प्रातिपदिकसंज्ञा झाली असती. अशा रीतीनें त्या सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण आवश्यक ठरत नसल्यामुळें, 'कृत्तद्धितसमासाश्च' या उत्तर सूत्रांत त्या पदाची अनुवृत्ति व्हावी एवढ्याचकरितां त्या पदाचें प्रकृत सूत्रांत ग्रहण केलें आहे असें मानलें पाहिजे, व तसें मानलें असतां, लोकांत – भाषेंत – केवळ तद्धितप्रत्ययाचा प्रयोग होत नसून तद्धितान्ताच प्रयोग होत असल्यामुळें, उत्तर सूत्रांतील 'तद्धित' या शब्दानें प्रशस्तार्थवाचक तद्धितान्ताचेंच ग्रहण होऊं शकतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) म्हणून प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' याचें 'प्रत्ययान्तं च वर्जयित्वा' असें जें व्याख्यान कौमुदींत केलें आहे तें योग्य ठरतें हें उघड आहे. (प्रकृत सूत्रांत प्रत्ययान्ताचा पर्युदास केला नाहीं असें मानल्यास, 'कृत्तद्धित-समासाश्च' या सूत्रांत कृदन्ताला व तद्धितान्ताला जें प्रातिपदिकसंज्ञा होण्याचें विधान केलें आहे तें विधान, वर सांगितल्याप्रमाणें, व्यर्थ ठरण्याची आपत्ति येत असल्यामुळें, प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पर्युदासानें प्रत्ययान्ताचा पर्युदास करणें जरी योग्य ठरतें तरी, 'प्रत्ययं प्रत्ययान्तं च वर्जयित्वा' असें व्याख्यान करून कौमुदींत जो प्रत्ययाचा देखील पर्युदास केला आहे तसा पर्युदास करण्याची काय गरज होती असें कोणी म्हटल्यास, त्यावर दीक्षित असें उत्तर देतात कीं,) जर प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पदानें प्रत्ययाचा पर्युदास केला नाहीं (व केवळ प्रत्ययान्ताचा पर्युदास केला) तर, 'सात्प-दाद्योः' सू. २१२३ या सूत्रांतील 'साति' या प्रत्ययाचें ग्रहण व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. (प्रत्ययान्ताला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं व प्रत्ययाला ती संज्ञा होऊं शकते असें मानल्यास, 'अग्नि' या शब्दाहून 'विभाषा साति कार्त्स्न्ये' सू. २१२२ या सूत्रानें

'साति' प्रत्यय केला असतां 'अग्निसात्' असें जें रूप होतें त्यांतील 'साति = सात्' हा प्रत्यय प्रातिपदिकसंज्ञक होऊन त्याहून 'ङ्याप्-प्रातिपदिकात्' सू. १८२ या अधिकारसूत्रान्वयें सुबुत्पत्ति होईल व 'साति = सात्' हा शब्द व्यपदेशिवद्भावानें सातिप्रत्ययान्त मानतां येत असल्यामुळें 'तद्धितश्चासर्वविभक्तिः' सू. ४४८ या सूत्रान्वयें 'सात्' याला अव्ययसंज्ञा होईल आणि 'अव्ययादाप्सुपः' सू. ४५२ या सूत्रानें विभक्तिप्रत्ययाचा लुक् झाला तरी, 'प्रत्ययलोपे प्रत्यय-लक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें 'सात्' ची पदसंज्ञा कायम राहून 'सात्' हें पद मानलें जाऊं शकतेंच व या पदांत सकार आदि असल्यामुळें त्या सकाराचें आपोआपच षत्व होऊं शकणार नाहीं व अशा रीतीनें 'सात्पदाद्योः' या सूत्राऐवजीं 'पदादेः' एवढेंच सूत्र केल्यानें 'साति' यांतील 'स्' चें षत्व टाळतां येऊं शकत असल्या-मुळें, त्या सूत्रांतील 'सात्' या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. परंतु पाणिनीनें त्या सूत्रांत 'सात्' या प्रत्ययाचें ग्रहण केलें असल्यामुळें त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, प्रत्ययाला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं आणि 'साति' या प्रत्ययांतील सकाराचें 'आदेश-प्रत्यययोः' सू. २१२ या सूत्रानें जें षत्व होण्याची आपत्ति येत होती ती टाळण्याकरितां त्या सूत्रांत 'सात्' या प्रत्ययाचें ग्रहण केलें आहे व अशा रीतीनें तें ग्रहण चरितार्थ होऊन प्रत्ययाला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं याचें ज्ञापक ठरतें आणि म्हणून 'अप्रत्ययः' या पर्युदासाचा 'प्रत्ययान्तं वर्जयित्वा' एवढाच अर्थ न करितां, वरील ज्ञापकाच्या आधारें 'प्रत्ययं प्रत्ययान्तं च वर्जयित्वा' असा जो कौमुदींत अर्थ केला आहे तो योग्य ठरतो असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण अशाकरितां केलें आहे कीं, 'धनम्, वनम्' इत्यादि स्थलीं प्रत्येक वर्णाला प्रातिपदिक-संज्ञा न व्हावी. त्या वर्णांना प्रातिपदिकसंज्ञा झाल्यास ('ङ्याप्-प्रातिपदिकात्' या अधिकारसूत्रान्वयें) प्रत्येक वर्णाहून सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येईल. (प्रकृत सूत्रावरील भाष्यांत १. २. ४५

भाष्यकार म्हणतात–'अर्थवदिति व्यपदेशाय, वर्णानां च मा भूदिति । किं च स्यात् ? । वनम् धनमिति न लोपः प्रातिपदिकान्तस्य इति न लोपः प्रसज्येत ।' या भाष्याचा अर्थ हा आहे कीं, 'अर्थवदधातुः' या सूत्रानें जी प्रातिपदिकसंज्ञा होणें सांगितलें आहे ती अमक्यालाच व्हावी असें विशेष रीतीनें ज्ञात व्हावें याकरितां या सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण केलें आहे व अर्थवानाशिवाय इतरांना, म्हणजे अनर्थक वर्णांना, ती संज्ञा होऊं नये असा त्या पदाच्या ग्रहणाचा हेतु आहे. वर्णाला प्रातिपदिकसंज्ञा झाली असतां, 'धन, वन' इत्यादि शब्दांतील प्रत्येक वर्णाला प्रातिपदिकसंज्ञा होईल व त्यामुळें त्याहून सुबुत्पत्ति होईल व 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें जरी 'सु' प्रत्ययाचा लोप होईल तरी प्रत्ययलक्षणानें त्या वर्णाला पदसंज्ञा होईल. व 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें नकाराचा लोप होण्याची आपत्ति येईल. आतां संख्या व कर्मादिकारक यांचे वाचक 'सु' इत्यादि विभक्तिप्रत्यय असल्यामुळें व 'धन, वन' इत्यादि शब्दांत असणाऱ्या वर्णांनीं) संख्येचा किंवा कर्मादिकारकाचा बोध होत नसल्यामुळें, त्या वर्णांहून सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येऊंच शकत नाहीं असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण (जेथें संख्या किंवा कारक विवक्षित नाहींत तशा स्थलीं देखील) औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय होऊं शकतो असा भाष्यांत सिद्धान्त सांगितला आहे. म्हणून 'हुंफट्' इत्यादि शब्दांहून जसा औत्सर्गिक 'सु' प्रत्यय होतो त्याचप्रमाणें प्रत्येक वर्णाहून 'सु' प्रत्यय होणें टाळतां येऊं शकणार नाहीं. (प्रकृत सूत्रांतून 'अर्थवत्' हें पद गाळल्यास, 'धन, वन' यांतील प्रत्येक अनर्थक वर्णाला प्रातिपदिकसंज्ञा होईल व त्या प्रत्येक वर्णाहून सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येईल असें जें दीक्षितांनीं म्हटलें आहे त्यावर शंकाकार असें म्हणतो कीं, त्या वर्णांना प्रातिपदिकसंज्ञा झाली तरी त्यांहून सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येत नाहीं; कारण सुबुत्पत्ति होणें हें केवळ प्रातिपदिकसंज्ञेवर अवलंबून नसून, जेथें

एकत्व द्वित्व इत्यादि संख्या व कर्ता, कर्म, करण इत्यादि कारक यांचा बोध करून देणें आहे तेथेंच स्वादि विभक्तिप्रत्यय प्रातिपदिकाहून करतां येऊं शकतात, परंतु 'वन, धन' यांतील वर्णांचे ठिकाणीं संख्या व कारक या दोहोंचाहि अभाव असल्यामुळें, म्हणजे त्यांचे ठिकाणीं हे दोन्ही संभवत नसल्यामुळें, त्यांना प्रातिपदिकसंज्ञा झाली तरी त्यांहून सुबुत्पत्ति होऊं शकत नाहीं. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, 'स्वौजस्' सू. १८३ या सूत्रांत निर्दिष्ट असलेले विभक्तिप्रत्यय वाटेल त्या प्रातिपदिकाहून करतां येतात व जेथें त्या प्रत्ययांनीं संख्या दाखवावयाची असते तेथें त्यांचा नियम केला जातो; पण जेथें संख्येचा अभाव असेल तेथें औत्सर्गिक 'सु' हा प्रथमेचा विभक्तिप्रत्यय केला जातो असा भाष्यसिद्धान्त आहे आणि त्या सिद्धान्तान्वयें, प्रकृत सूत्रांतून 'अर्थवत्' हें पद गाळल्यास, प्रत्येक वर्णाला प्रातिपदिकसंज्ञा होईल व त्याहून 'सु' हा प्रथमेच्या एकवचनाचा औत्सर्गिक प्रत्यय होणें टाळतां येऊं शकणार नाहीं. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत देखील भाष्यकारांनीं 'इमे पुनर्वर्णा अत्यन्तायैवानर्थकाः। यथा तर्हि रथाङ्गानि विहृतानि प्रत्येकं व्रजिक्रियां प्रति असमर्थानि भवन्ति तत्समुदायश्च रथः समर्थ एवमेषां वर्णानां समुदाया अर्थवन्तोऽवयवा अनर्थका इति' असें सांगून व त्यानंतर 'निपातस्यानर्थकस्य प्रातिपदिकत्वम्' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात—'सत्यामपि प्रातिपदिकसंज्ञायां स्वाद्युत्पत्तिर्न प्राप्नोति । किं कारणम्? । न हि प्रातिपदिकसंज्ञायामेव स्वाद्युत्पत्तिः प्रतिबद्धा । किं तर्हि? । एकत्वादिष्वर्थेषु स्वादयो विधीयन्ते । न चैषां—अनर्थकनिपातानां—एकत्वादयः सन्ति । नैष दोषः अविशेषेणोत्पद्यन्ते, उत्पन्नानां नियमः क्रियते ।' आणि या भाष्याचाच दीक्षितांनीं मनोरमेच्या वरील पंक्तींत अनुवाद केला आहे.) अर्थवद्ग्रहणपरिभाषा असल्यामुळें, त्या परिभाषेच्या योगानें अनर्थकाचे ठिकाणीं सुबुत्पत्ति होऊं शकणार नाही—म्हणजे

'अर्थवद्ग्रहणेनानर्थकस्य'–परि. १४–ही परिभाषा असल्यामुळें, जीं प्रातिपदिकें अर्थवान् आहेत त्यांहूनच 'ङ्याप्प्रातिपदिकात्' या अधिकारसूत्रान्वयें सुबुत्पत्ति होईल व वर्णरूप अनर्थक प्रातिपदिकांहून सुबुत्पत्ति होऊंच शकणार नाहीं–असें कोणी म्हटल्यास तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'अर्थवद्ग्रहणे' ही परिभाषा अशाच ठिकाणीं लागू पडते कीं, जेथें सूत्रांत प्रातिपदिकविशेषाचें ग्रहण केलें आहे. ('ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ या अधिकारसूत्रांत प्रातिपदिकविशेषाचें ग्रहण केलें नसून 'प्रातिपदिक' या सामान्य प्रातिपदिकवाचक शब्दाचें ग्रहण केलें असल्यामुळें, त्या सूत्राला 'अर्थवद्ग्रहणे' ही परिभाषा लागू पडत नाहीं आणि त्यामुळें प्रकृत सूत्रांतून 'अर्थवत्' हें पद गाळल्यास, वर सांगितल्याप्रमाणें, अनर्थक वर्णांना प्रातिपदिकसंज्ञा होऊन त्यांहून औत्सर्गिक 'सु' प्रत्यय होण्याची आपत्ति येईल व तो प्रत्यय केला असतां जरी 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें त्याचा लोप होईल तरी प्रत्ययलक्षणाने प्रत्येक वर्ण पदसंज्ञक ठरेल व त्यामुळें 'धन, वन' इत्यादि स्थलीं 'न्' हून 'सु' प्रत्यय व नंतर 'सु' लोप केल्यावर 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें नकारलोप होण्याची आपत्ति येईल.) प्रकृत सूत्रांतील 'अधातुः' इत्यादि पर्युदासांच्या सामर्थ्यानें अर्थवान् शब्दांनाच प्रातिपदिकसंज्ञा होते हा अर्थ प्रकृत सूत्रांतूनच जरी निघूं शकतो तरी, त्या सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें जें ग्रहण केलें आहे तें त्या पदाची उत्तर सूत्रांत–'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांत–अनुवृत्ति व्हावी याकरितां केलें आहे हें पूर्वीं सांगितलेच आहे आणि 'सुप्तिङन्तं पदम्' १.४.१४ या सूत्रावरील भाष्यांत हें ध्वनित केलें आहे. (हें भाष्य शब्दरत्नांत दिलें आहे व त्याचें विवरण तेथे करण्यांत येईल).

मनोरमा–यत्त्वाहुः– पर्युदासो नार्थवत्त्वं गमयति, अनर्थकयोरपि धातुप्रत्यययोर्दर्शनात् । अधीते, यावकः इति अधिपूर्वस्यैवेङः

प्रयोगात् विशिष्ट एव अर्थवान्, न तु केवलः, इङ् अध्ययने इत्याद्यर्थनिर्देशस्तु अवयवे समुदायार्थारोपात् । एवं कन्नप्यनर्थकः, यावशब्दादपि तदर्थप्रतीतेः । "ओषधेश्च विभक्तावप्रथमायाम्" "अकर्तरि च कारके–" इति विभक्तिकारकग्रहणाभ्यां 'नञिवयुक्त' न्यायस्यानित्यत्वकल्पनाच्चेति । अत्रेदं वक्तव्यम्––धातुरनर्थक इति तावद्व्याहतम् क्रियावाचकत्वं विना धातुत्वायोगात् । आरोपितं तदिति चेत्, सत्यम्, तावतैवेष्टसिद्धेः । प्रकृतिप्रत्ययविभागस्तत्तदर्थविभागश्च सर्वः कल्पित एव । परमार्थतस्तु स्फोट एवार्थवानिति सिद्धान्तात् । उक्तं च हरिणा––

उपायाः शिक्षमाणानां बालानामुपलालनाः ।
असत्ये वर्त्मनि स्थित्वा ततः सत्यं समीहते ।।१।।

इति । कथमन्यथा इङो द्विर्वचनमडादयश्च स्युः । तथा च प्रत्याहाराह्निके (अर्थवन्तो वर्णाः) इति प्रघट्टके 'अध्येति' 'अधीते' इत्यत्रेकारोऽर्थवानिति भाष्ये स्पष्टमेवोक्तम् । एवं कन्प्रत्ययोऽप्यर्थवानेव, स्वार्थिकानां प्रकृत्यर्थेनैवार्थवत्त्वात् । कल्पनामात्रमिदमिति चेद्, न, उक्तोत्तरत्वात् । नैषा कल्पना शास्त्रकृत्सम्मतेति चेत्, न, "द्वितीयतृतीयचतुर्थतुर्याणि" इति सूत्रे पूरणात्स्वार्थेऽन्प्रत्ययस्य पूरणार्थताया भाष्यकारैरेवोक्तत्वात् । 'प्रत्ययः' इति महासंज्ञां कुर्वतः सूत्रकृतोऽपि संमतमेवेदम् । यदपि "ओषधेश्च" इत्यादि, तदपि न, अनित्यत्वेऽप्यौत्सर्गिकप्रवृत्त्या इष्टसिद्धेः, इष्टस्थलेऽप्यप्रवृत्तौ न्यायस्य निर्विषयत्वापाताच्च, अनित्यत्वज्ञापनस्य कथंचिदावश्यकत्वे अर्थवद्ग्रहणस्यैव ज्ञापकत्वसंभवाच्च । उत्तरार्थस्यापि इह किंचित् त्रपो इति न्यायेन इह करणस्य सफलत्वौचित्यात्, "ओषधेश्च" इत्यादौ विभक्तिकारकग्रहणयोरेवेत्थं सति प्रत्याख्यानसम्भवाच्चेति दिक् ।

प्रकाशकारांचें असें म्हणणें आहे कीं, प्रकृत सूत्रांतील ('अधातुः, अप्रत्ययः' या) पर्युदासांनीं अर्थवान् शब्दांनाच प्राति-

पदिकसंज्ञा होऊं शकते असा अर्थ निघूं शकत नाहीं; कारण कित्येक धातु व प्रत्यय अनर्थक देखील आहेत. 'अधीते, यावकः' हीं अनुक्रमें अर्थरहित धातूचीं व प्रत्ययाचीं उदाहरणें होत. 'अधि' या उपसर्गपूर्वक 'इङ्' धातूचाच भाषेंत (अध्ययन करणें या अर्थामध्यें) प्रयोग होत असल्यामुळें, अध्युपसर्गपूर्वकच 'इङ्' धातु अर्थवान् ठरतो. केवळ 'इङ' धातु म्हणजे अध्युपसर्गरहित 'इङ्' धातु अर्थवान् नाहीं. धातुपाठांत 'इङ् अध्ययने' इत्यादि जो अर्थनिर्देश केला आहे तो अवयवाचे– 'इङ्' या अवयवाचे–ठिकाणीं समुदायाच्या–'अधि+इङ्' या समुदायाच्या–अर्थाचा आरोप करून केला आहे. त्याचप्रमाणें ('यावक' यांतील 'यावादिभ्यः कन्' सू. २०९७ या सूत्रानें 'याव' या शब्दाहून झालेला स्वार्थे) 'कन्' प्रत्यय देखील अनर्थक आहे; कारण ('यावक' या 'कन्' प्रत्ययान्त शब्दाहून ज्या अर्थाचा बोध होतो) त्याच अर्थाचा 'याव' या (प्रत्ययरहित) शब्दाहून देखील बोध होतो. ('यावादिभ्यः कन्' या सूत्रांतील 'याव' या शब्दाची 'यवानामयं यावः' अशी वृत्ति आहे व 'यवापासून तयार केलेला पदार्थ' असा 'याव' या शब्दाचा अर्थ आहे. या 'याव' शब्दाहून 'याव एव यावकः' या अर्थामध्यें स्वार्थे 'कन्' प्रत्यय केला असतां, 'याव' या शब्दाहून ज्या अर्थाचा बोध होतो त्याहून अधिक अर्थाचा बोध 'कन्' प्रत्ययान्त 'यावक' शब्दाहून होत नाहीं व म्हणून तो 'कन्' प्रत्यय अर्थरहित ठरतो असें प्रकाशकारांचें म्हणणें आहे.) दुसरें असें कीं, 'ओषधेश्च विभक्तावप्रथमायाम्' सू. ३५३४ व 'अकर्तरि च कारके सू. ३१८६ या दोन सूत्रांत ('अप्रथमायाम्' व 'अकर्तरि' असा पर्युदास असून देखील) 'विभक्तौ' व 'कारके' या पदांचें त्या सूत्रांत ग्रहण केलें असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, 'नञिवयुक्तम्' – परि. ७५ – ही परिभाषा अनित्य आहे. ('नञिवयुक्तम्' या परिभाषान्वयें 'अप्रथमायाम्' या नञ्युक्त पदाचा प्रथमाभिन्न पण प्रथमासदृश असा अर्थ होतो आणि प्रथमाभिन्न

व प्रथमासदृश अशी द्वितीया इत्यादि विभक्तीच असूं शकते आणि म्हणून 'ओषधेश्च' या सूत्रांत 'विभक्तौ' हें पद घालण्याची कांहींच गरज नव्हती. त्याचप्रमाणें 'अकर्तरि च कारके' या सूत्रांतील 'अकर्तरि' या नञ्युक्त पर्युदासाचा 'कर्तृभिन्ने किन्तु कर्तृसदृशे' असा वरील परिभाषान्वयें अर्थ होतो आणि कर्तृभिन्न व कर्तृसदृश अशीं कर्म, करण इत्यादि कारकेंच असूं शकतात. असें असून देखील त्या सूत्रांत 'कारके' या पदाचें जें ग्रहण केलें आहे तें व्यर्थ ठरतें. पण तसें ग्रहण केलें असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, 'नञिवयुक्तम्' ही परिभाषा अनित्य आहे आणि अशा अनित्य परिभाषेच्या आधारावर, प्रकृत सूत्रांतील 'अधातुः, अप्रत्ययः' या पर्युदासांच्या सामर्थ्यानें अर्थवान् शब्दांनाच प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत असल्यामुळें प्रकृत सूत्रांतील 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरतें, असा निष्कर्ष काढणें अयोग्य आहे असा प्रकाशकारांच्या म्हणण्याचा आशय आहे, व त्यांचें असेंहि म्हणणें आहे कीं, सर्वच धातु व प्रत्यय अर्थवान् नसून कांहीं धातु व प्रत्यय अनर्थक असल्यामुळें देखील, तसा निष्कर्ष काढणें योग्य नाहीं. यावर दीक्षित असें उत्तर देतात कीं,) वर जें प्रकाशकारांनीं म्हटलें आहे त्यावर हें सांगणें आवश्यक आहे कीं, धातूचे ठिकाणीं अर्थवत्ता नाहीं असें म्हणणें हा वदतोव्याघात होय; कारण 'क्रिया' या अर्थाचा वाचक असल्याशिवाय शब्दाला धातुसंज्ञा होऊं शकत नाहीं. धातूचे ठिकाणीं अर्थ आरोपित केला जातो असें जरी मानलें तरी, तेवढ्यानेंच इष्टसिद्धि होऊं शकते, म्हणजे धातु अर्थवान् मानतां येतो. (प्रकाशकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, भाषेंत प्रत्ययरहित केवळ धातूचा प्रयोग होत नसल्यामुळें धातूचे ठिकाणीं अर्थवत्ता नाहीं हें आपोआपच सिद्ध होतें. धातूहून प्रत्यय केल्यावर तशा प्रत्ययसहित धातूचे ठिकाणीं अर्थवत्ता येते व तशा प्रत्ययसहित धातूचाच भाषेंत प्रयोग केला जातो. म्हणून केवळ धातु अर्थवान् मानतां येत नाहीं. प्रकृति-प्रत्ययरूप समुदायाचे ठिकाणीं जी अर्थवत्ता येते ती धातुरूप अवय-

वाचे ठिकाणीं केवळ आरोपित केली जाते. पण अशा आरोपित अर्थानें धातु अर्थवान् ठरूं शकत नाहीं. यावर दीक्षित असें उत्तर देतात कीं, 'क्रियावाचिनो भ्वादयः धातुसंज्ञाः स्युः' अशी धातूची व्याख्या असल्यामुळें, धातु अर्थवान् नाहीं हें म्हणणें वरील व्याख्ये-विरुद्ध ठरतें. दुसरें असें कीं, प्रकृतिप्रत्ययरूप समुदायाच्या अर्थाचा धातूचे ठिकाणीं आरोप केला जातो हें म्हणणें जरी खरें मानलें तरी, तशा आरोपित अर्थानें धातूचे ठिकाणीं अर्थवत्ता येतेच. आरोपित अर्थानें शब्दाचे ठिकाणीं अर्थवत्ता येत नाहीं असें मानल्यास, 'डित्थ' इत्यादि अनर्थक 'यदृच्छा' शब्दांहून सुबुत्पत्ति होऊं शकणार नाहीं. त्यांचे ठिकाणीं आरोपित अर्थवत्ता मानल्यानेंच त्यांहून सुबुत्पत्ति करतां येतें.) प्रकृति व प्रत्यय असा विभाग करणें व त्यांचा अर्थ भिन्न आहे असें मानणें हें सर्व कल्पितच आहे व वास्तविक 'स्फोट' हाच अर्थवान् आहे असा सिद्धांत आहे. ('स्फोट' कशाला म्हणतात यासंबंधानें सर्वदर्शन-संग्रहांतील पाणिनीय दर्शनांत माधवानें असें म्हटलें आहे— 'किं वर्णाः समस्ता व्यस्ता वाऽर्थप्रत्ययं जनयन्ति । नाद्यः । वर्णानां क्षणिकानां समूहासम्भवात् । नान्त्यः । व्यस्तवर्णेभ्योऽर्थ-प्रत्ययासम्भवात् । न च व्याससमासाभ्यामन्यः प्रकारः समस्तीति । तस्माद्वर्णानां वाचकत्वानुपपत्तौ यद्बलादर्थप्रतिपत्तिः स स्फोटः । वर्णातिरिक्तो वर्णाभिव्यङ्‌ग्योऽर्थप्रत्यायको नित्यः शब्दः स्फोट इति तद्विदो वदन्ति । अत एव स्फुटयते व्यज्यते वर्णैरिति स्फोटो वर्णा-भिव्यङ्‌ग्यः, स्फुटति स्फुटीभवत्यस्मादर्थ इति स्फोटोऽर्थप्रत्यायक इति स्फोटशब्दार्थमुभयथा निराहुः ।') हरीनें आपल्या कारिकेंत असें म्हटलें आहे कीं, (प्रकृतिप्रत्ययविभागकल्पना आणि त्यांचे अर्थ भिन्न आहेत ही कल्पना हे सर्व व्याकरणशास्त्र शिकणाऱ्या) अज्ञ विद्यार्थ्याला त्या शास्त्राचें ज्ञान करून देण्याचें केवळ उपाय होत. असत्य मार्गाचें अवलंबन करून त्या योगानें सत्य अर्थाचा बोध करून घेतां येतो. 'इङ्' धातु अर्थवान् नाहीं असें मानलें तर,

त्याचें द्विर्वचन व त्याला अडागम इत्यादि कसे होऊं शकतील? म्हणूनच प्रत्याहाराह्निकांत 'अर्थवन्तो वर्णाः' या मथळ्याखालीं भाष्यकारांनीं 'अध्येति, अधीते' यांतील 'इ' हा धातु अर्थवान् आहे असें अगदीं स्पष्टपणें म्हटलें आहे. ('हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्यांत 'अर्थवन्तो वर्णा धातुप्रातिपदिकप्रत्ययनिपातानामेकवर्णानामर्थदर्शनात्' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात–'धातव एकवर्णा अर्थवन्तो दृश्यन्ते । एति अध्येति अधीत इति ।') त्याचप्रमाणें 'कन्' प्रत्यय देखील अर्थवान्च आहे; कारण स्वार्थिक प्रत्यय (प्रकृतीच्या अर्थाचे वाचक असल्यामुळें) प्रकृतीच्या अर्थानें अर्थवान् ठरतात. स्वार्थिक प्रत्यय अर्थवान् आहेत हें मानणें केवळ कल्पनामूलक आहे असें म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं व या शंकेवर पूर्वीं उत्तर दिलेंच आहे. (प्रकाशकारांचें असें म्हणणें आहे कीं, स्वार्थिक प्रत्ययाला स्वतःचा कांहीं अर्थ नसून त्याचे ठिकाणीं प्रकृतीच्या अर्थाचा केवळ आरोप केला जातो आणि म्हणून स्वार्थिक प्रत्यय अर्थवान् मानतां येत नाहीं. यावर दीक्षितांनीं पूर्वीं असें उत्तर दिलें आहे कीं, ज्याचे ठिकाणीं आरोपित अर्थवत्ता असते तो देखील अर्थवान् मानतां येतोच व म्हणून स्वार्थिक प्रत्यय अर्थवान् नाहीं हें म्हणणें अयोग्य ठरतें.) स्वार्थिक प्रत्ययाचे ठिकाणीं प्रकृतीचा अर्थ आरोपित केल्यानें तो अर्थवान् ठरतो अशी कल्पना करणें भाष्यकारादिकांना संमत नाहीं असें म्हणणें असल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'द्वितीयतृतीयचतुर्थतुर्याणि' सू. २–२–३ या सूत्रावरील भाष्यांत पूरणार्थक 'तीय' प्रत्ययान्त शब्दाहून जो स्वार्थे 'अन्' प्रत्यय होतो तो देखील पूरणार्थकच प्रत्यय आहे असें भाष्यकारांनींच म्हटलें आहे. ('द्वेस्तीयः, त्रेः सम्प्रसारणं च' सू. १८५४, १८५५ या सूत्रांनीं 'द्वि,त्रि' या शब्दांहून पूरणार्थक 'तीय' प्रत्यय होतो व अशा पूरणार्थक 'तीय' प्रत्ययान्त भागवाचक शब्दाहून 'पूरणाद्भागे तीयादन्' सू. १९९४ या सूत्रानें

स्वार्थिक 'अन् = अ' प्रत्यय होतो. हा 'अन्' प्रत्यय स्वार्थिक—प्रकृतीच्या अर्थाचाच बोधक—असून देखील, भाष्यकारांनी तो पूरणार्थक प्रत्यय आहे असें 'द्वितीयतृतीयचतुर्थ' या सूत्रावरील भाष्यांत म्हटलें आहे. त्या सूत्रांत 'अन्यतरस्याम्' या पदाचें ग्रहण कां केलें आहे हा प्रश्न करून त्या प्रश्नाचें उत्तर देतांना भाष्यकार असें म्हणतात कीं, विकल्पेंकरून षष्ठीसमास व्हावा हें त्या पदाच्या ग्रहणाचें प्रयोजन आहे आणि हें सिद्ध करितांना ते म्हणतात:— 'क्रियमाणेऽपि वै अन्यतरस्याङ्ग्रहणे षष्ठीसमासो न प्राप्नोति । किं कारणम् ?। पूरणगुणेनेति प्रतिषेधात् । नैतत्पूरणान्तम्; अनैतत्पर्यवपन्नम् । एतदपि पूरणान्तमेव । कथम् ? । पूरणं नामार्थस्तमाह तीयशब्दः, अतः पूरणम् । योऽसौ पूरणान्तात्स्वार्थे भागेऽन्, सोऽपि पूरणमेव । एवं तर्ह्यन्यतरस्याङ्ग्रहणसामर्थ्यात्षष्ठीसमासो भविष्यति ।' 'पूरणार्द्धट्ठन्' ५-१-४८ या सूत्रावरील भाष्यांत देखील भाष्यकारांनीं असेंच म्हटलें आहे. या दोन्ही भाष्यांवरून हें स्पष्ट होतें कीं, स्वार्थिक प्रत्यय प्रकृत्यर्थाचे बोधक असल्यामुळें त्या अर्थानें अर्थवान् ठरतात. म्हणून स्वार्थिक प्रत्यय अर्थरहित आहेत असें जें प्रकाशकारांचें म्हणणें आहे तें भाष्यविरुद्ध असल्यामुळें चूक ठरतें. तसेंच 'इङ्' धातु अनर्थक आहे असें जें त्यांचें म्हणणें आहे तें देखील वर सांगितल्याप्रमाणें भाष्यविरुद्ध असल्यामुळें चूक ठरतें. सारांश, प्रत्येक धातु व प्रत्येक प्रत्यय अर्थवान् असल्यामुळें, प्रकृत सूत्रांतील 'अधातुः अप्रत्ययः' या पर्युदासांच्या बलानेंच हें स्पष्ट होतें कीं, अर्थवान् शब्दांनाच प्रातिपदिकसंज्ञा होते आणि त्यामुळें प्रकृत सूत्रांतील 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरतें.) 'प्रत्ययः' अशी महासंज्ञा—अन्वर्थक संज्ञा—करणाऱ्या सूत्रकार पाणिनीला देखील हेंच संमत आहे, म्हणजे प्रत्येक प्रत्यय अर्थवान् आहे हेंच पाणिनीला देखील संमत आहे. ('प्रत्याययति इति प्रत्ययः' म्हणजे जो अर्थाचा बोध करून देतो तो प्रत्यय होय, अशी 'प्रत्यय' शब्दाची व्युत्पत्ति आहे. म्हणून 'प्रत्यय' ही संज्ञा त्या शब्दाच्या अर्थाला धरून केली

असल्यामुळें अन्वर्थक ठरते आणि या संज्ञेवरूनच हें सिद्ध होतें कीं, प्रत्येक प्रत्यय मग तो स्वार्थिक असो किंवा भिन्न प्रकारचा असो, पाणिनीच्या मतें अर्थवान् असतोच.) 'ओषधेश्च' इत्यादि जें प्रकाशकारांनीं म्हटलें आहे – म्हणजे 'ओषधेश्च विभक्तावप्रथमायाम्' या सूत्रांत 'अप्रथमायाम्' या पर्युदासाचें व तसेंच 'अकर्तरि च कारके' या सूत्रांत 'अकर्तरि' या पर्युदासाचें ग्रहण केलें असून देखील पुन्हा त्या दोन सूत्रांत 'विभक्तौ' व 'कारके' हीं पदें अनुक्रमें घातलीं असल्यामुळें 'नञिवयुक्तम्' ही परिभाषा अनित्य ठरते व तशी अनित्य परिभाषा प्रकृत सूत्राचे ठिकाणीं प्रवृत्त करून या सूत्रांतील 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण व्यर्थ आहे असें मानणें अयोग्य आहे असें जें प्रकाशकारांनीं म्हटलें आहे – तें देखील बरोबर नाहीं; कारण ती परिभाषा अनित्य असली तरी तिच्या औत्सर्गिक प्रवृत्तीनें इष्टसिद्धि करून घेतां येते. इष्ट स्थलाचे ठिकाणीं देखील ती परिभाषा प्रवृत्त न केल्यास (तिच्या प्रवृत्तीला कोणतेंहि स्थळ राहत नसल्यामुळें) ती निर्विषय, म्हणजे व्यर्थ, ठरण्याची आपत्ति येते. ती परिभाषा अनित्य आहे याचें कांहीं तरी ज्ञापक असणें आवश्यक आहे असें म्हणणें असल्यास, प्रकृत सूत्रांतील 'अर्थवत्' या पदाचें ग्रहणच त्या परिभाषेच्या अनित्यत्वाचें ज्ञापक मानतां येऊं शकतें. 'अर्थवत्' या पदाची उत्तर सूत्रांत अनुवृत्ति व्हावी याकरितां त्या पदाचें प्रकृत सूत्रांत जें ग्रहण केलें आहे तें कांहीं तरी प्रयोजनाकरितां केलें आहे हें 'इह किंचित् त्रपो' या न्यायान्वयें मानणें उचित आहे. (इष्टसिद्धि करण्याकरितांच परिभाषा रचल्या असल्यामुळें, एखादीं परिभाषा अनित्य असली तरी, तिची प्रवृत्ति होणें हा तिचा नैसर्गिक धर्म आहे. जेथें तशी अनित्य परिभाषा प्रवृत्त केल्यानें इष्टसिद्धि न होतां अनिष्ट सिद्धि होण्याची आपत्ति येते तशाच ठिकाणीं तिची प्रवृत्ति करणें योग्य नाहीं. इतर सर्वत्र तिची औत्सर्गिक प्रवृत्ति होतेच व तिच्या प्रवृत्तीचा तशा स्थलीं कोणत्याहि रीतीनें प्रतिबंध करतां येत नाहीं. इष्ट स्थलीं देखील

अनित्य परिभाषा प्रवृत्त न केल्यास ती करून न केल्यासारखीच होईल व अशा रीतीनें ती व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. म्हणून 'नञिवयुक्तम्' ही परिभाषा जरी अनित्य आहे तरी तिची प्रकृत सूत्राचे ठिकाणीं होणारी औत्सर्गिक – स्वाभाविक – प्रवृत्ति रोखतां येत नाहीं आणि ती परिभाषा प्रकृत सूत्राचे ठिकाणीं प्रवृत्त केल्यास, या सूत्रांतील पर्युदासांच्या बलानेंच अर्थवान् शब्दांनाच प्रातिपदिकसंज्ञा होते हें सिद्ध होत असल्यामुळें, या सूत्रांतील 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरतें हें उघड आहे आणि त्या पदाची उत्तर सूत्रांत अनुवृत्ति व्हावी एवढ्याच हेतूनें प्रकृत सूत्रांत त्या पदाचें ग्रहण केलें आहे. मग असें जर आहे तर उत्तर सूत्रांतच त्या पदाचें ग्रहण कां केलें नाहीं व प्रकृत सूत्रांत त्या पदाचें पाणिनीनें ग्रहण कां केलें आहे असें कोणी म्हटल्यास, त्यावर दीक्षित असें उत्तर देतात कीं, प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरत असून देखील पाणिनीनें ज्याअर्थीं त्या पदाचें ग्रहण केलें आहे त्याअर्थीं तसें करण्यांत पाणिनीचा कांहीं तरी हेतु असावा हें 'इह किंचित् त्रपो' या न्यायान्वयें उघड होतें, व तो हेतु हाच कीं, 'नञिवयुक्तम्' ही परिभाषा अनित्य आहे हें त्या पदाच्या ग्रहणानें ज्ञापित व्हावें. ती परिभाषा नित्य असती तर प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण करण्याची कांहींच गरज नव्हती; कारण अर्थवान् शब्दांनाच प्रातिपदिकसंज्ञा होते हें प्रकृत सूत्रांतील पर्युदासांनीं या परिभाषान्वयें सिद्ध होऊंच शकलें असतें. पण ही परिभाषा अनित्य असल्यामुळें तिची प्रवृत्ति न केल्यास, प्रकृत सूत्रांतून इष्ट अर्थ निष्पन्न न होण्याची आपत्ति येते. ती टाळण्याकरितां या सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण केलें आहे व अशा रीतीनें तें ग्रहण चरितार्थ होऊन त्या परिभाषेच्या अनित्यत्वाचें ज्ञापक ठरतें. या मनोरमेंतील पंक्तींत 'इह किंचित् त्रपो' या ज्या न्यायाचा उल्लेख केला आहे तो न्याय 'इकोऽचि विभक्तौ' ७. १. ७३ या सूत्रावरील भाष्यांत पठित असलेल्या दोन कारिकांचें अन्तिम चरण आहे. 'इकोऽचि' सू. ३२० या सूत्रांत

'अचि' या पदाचें ग्रहण कां केलें आहे असा त्या भाष्यांत भाष्यकारांनीं प्रश्न केला आहे. त्या पदाचें ग्रहण जरी त्या सूत्रांत केलें नसतें तरी, इगन्त नपुंसक अङ्गापुढें हलादि विभक्तिप्रत्यय आल्यानें जो 'नुम् = न्' झाला असता त्या 'नुम्' चा 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें लोप होऊं शकलाच असता; कारण 'त्रपु + भ्याम्' इत्यादि स्थलीं जरी नुमागम होऊन 'त्रपुन् भ्याम्' अशी स्थिति झाली असती तरी, 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्रानें 'त्रपुन्' या अङ्गाला पदसंज्ञा झाल्यानें 'त्रपुन्' यांतील अन्त्य नकाराचा 'न लोपः' सू. २३६ या सूत्रानें लोप होऊं शकलाच असता व अशा रीतीनें सर्व इष्ट रूपें सिद्ध होऊं शकलींच असतीं. 'अचि' या पदाची उत्तर सूत्रांत अनुवृत्ति व्हावी याकरितां त्या सूत्रांत 'अचि' या पदाचें ग्रहण केलें आहे असें जर मानलें तर, उत्तर सूत्रांतच त्या पदाचें ग्रहण केलें पाहिजे होतें व 'इकोऽचि' या सूत्रांत त्या पदाचें ग्रहण करण्याची कांहींच आवश्यकता नव्हती. असें असून देखील ज्याअर्थी आचार्य पाणिनीनें त्या सूत्रांत 'अचि' या पदाचें ग्रहण केलें आहे त्याअर्थी हें स्पष्ट होतें कीं, तसें ग्रहण करण्याचें कांहीं तरी प्रयोजन असलेंच पाहिजे, व तें प्रयोजन हें कीं, 'त्रपु' या इगन्त नपुंसक प्रातिपदिकापुढें 'सु' हा संबुद्धीचा प्रत्यय आला असतां, 'त्रपु' या अङ्गाला नुमागम होऊं नये. पण 'स्वमोर्नपुंसकात्' सू. ३१९ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लुक् होऊन 'त्रपु' या अङ्गापुढें 'सु' प्रत्यय राहत नसल्यामुळें, नुमागमाची प्राप्ति होऊंच शकत नाहीं. 'सु' प्रत्यय कायमच आहे असें 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें मानल्यानें नुमागमाची प्राप्ति होते असें देखील म्हणतां येत नाहीं; कारण 'न लुमताङ्गस्य' सू. २६३ हा निषेध असल्यामुळें व प्रकृत स्थलीं प्रत्ययलक्षणानें अङ्गाला कार्य करणें असल्यामुळें, 'प्रत्ययलोपे' हें सूत्र येथें प्रवृत्त होऊंच शकत नाहीं व त्यामुळें नुमागमाची प्राप्तीच होत नाहीं. अशा रीतीनें 'अचि' या पदाचें ग्रहण सर्व प्रकारें व्यर्थ ठरत असून देखील

पाणिनीनें त्या सूत्रांत त्या पदाचें ग्रहण कां केलें आहे ? या प्रश्नाचें भाष्यकार असें उत्तर देतात कीं, 'न लुमताङ्गस्य' हा निषेध अनित्य आहे हें ज्ञापित व्हावें याकरितां त्या सूत्रांत 'अचि' या पदाचें ग्रहण केलें आहे. पण तो निषेध नित्य मानल्यानें जर 'त्रपु + सु' या स्थलीं नुमागम होणें आपोआप टळतें तर तो निषेध अनित्य मानण्याची गरज काय ? यावर भाष्यकार असें उत्तर देतात कीं, तो निषेध अनित्य मानण्याचें प्रयोजन हें आहे कीं, 'हे त्रपो' असें देखील संबुद्धीचें रूप सिद्ध व्हावें—म्हणजे 'हे त्रपु सु' या स्थलीं 'सु' या संबुद्धिप्रत्ययाचा 'स्वमोर्नपुंसकात्' या सूत्रानें लुक् झाला असतां देखील 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' हें सूत्र प्रवृत्त होऊन व त्या सूत्रान्वयें 'सु' प्रत्यय कायमच आहे असें मानलें जाऊन 'ह्रस्वस्य गुणः' सू. २४२ या सूत्रानें 'त्रपु' यांतील अन्त्य उकाराचा गुण व्हावा व 'त्रपो' असें संबुद्धीचें इष्ट पाक्षिक रूप सिद्ध व्हावें. सारांश 'इकोऽचि' या सूत्रांतील 'अचि' या पदाचें ग्रहण 'न लुमताङ्गस्य' हा निषेध अनित्य आहे याचें ज्ञापक आहे व तो निषेध अनित्य असल्यामुळेंच 'हे त्रपो' असें संबुद्धीचें इष्ट पाक्षिक रूप सिद्ध होऊं शकतें, आणि अशा रीतीनें तें ग्रहण चरितार्थ ठरतें. 'इकोऽचि विभक्तौ' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात- 'अज्ग्रहणं किमर्थम् ? । इकोचि व्यञ्जने मा भूत् । इकोऽचीत्युच्यते व्यञ्जनादौ मा भूत्—त्रपुभ्यां त्रपुभिः । अस्तु, लोपः । अस्त्वत्र नुम्, न लोपः प्रातिपदिकान्तस्येति नलोपो भविष्यति ।' यानंतर 'अचि' या पदाच्या ग्रहणाचीं इतर प्रयोजनें सांगून व त्या सर्व प्रयोजनांचें खण्डन करून अखेरीस भाष्यकार म्हणतात—'उत्तरार्थं तर्ह्यज्ग्रहणं कर्तव्यम्, अस्थिदधिसक्थ्यक्ष्णामनङुदात्तः—अजादौ यथा स्यादिह मा भूत्—अस्थिभ्याम्, अस्थिभिरिति । यद्युत्तरार्थं स्यात्तत्रैवायमज्ग्रहणं कुर्वीत, इह हि क्रियमाणे यदि किंचित्प्रयोजनमस्ति तदुच्यताम् । इहापि क्रियमाणे प्रयोजनमस्ति । किम् ? । अजादौ यथा स्यादिह मा भूत्—त्रपु, जतु । एतदपि नास्ति प्रयोजनं, विभक्तावित्युच्यते, न

चाऽत्र विभक्तिं पश्यामः । प्रत्ययलक्षणेन । न लुमताङ्गस्येति प्रत्ययलक्षणस्य प्रतिषेधः । एवं तर्हि सिद्धे सति यदज्ग्रहणं करोति तज्ज्ञापयत्याचार्यो भवतीह कश्चिदन्योऽपि प्रकारः प्रत्ययलक्षणं नामेति । किमेतस्य ज्ञापने प्रयोजनम् ? । हे त्रपु, हे त्रपो । अत्र गुणः सिद्धो भवति ।' या भाष्याचें विवरण वर केलेंच आहे व हाच 'इह किंचित् त्रपो इति' हा न्याय होय. हा न्याय प्रकृत सूत्रास लावल्यास, जरी या सूत्रांतील 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण उत्तर सूत्रांत त्याची अनुवृत्ति होण्याकरितां केलें आहे तरी, तें ग्रहण उत्तर सूत्रांत न करितां प्रकृत सूत्रांतच केलें आहे याचें कांहीं तरी विशिष्ट प्रयोजन असलेंच पाहिजे असें मानणें उचित आहे व तें प्रयोजन हेंच कीं, 'नञिवयुक्तम्' ही परिभाषा अनित्य आहे हें ज्ञापित व्हावें. अशा रीतीनें ती परिभाषा अनित्य आहे हें प्रकृत सूत्रांतील 'अर्थवत्' या पदानेंच ज्ञापित होत असल्यामुळें) 'ओषधेश्च विभक्तावप्रथमायाम्' व 'अकर्तरि च कारके' या सूत्रांत 'विभक्तौ' व 'कारके' या ज्या पदांचें ग्रहण केलें आहे तीं पदें ('नञिवयुक्तम्' या परिभाषान्वयें) प्रत्याख्यात करतां येतात. (प्रथमाध्यायांतील प्रकृत सूत्रांतच 'नञिवयुक्तम्' या परिभाषेच्या अनित्यत्वाचें ज्ञापक उपलब्ध असल्यामुळें व ती परिभाषा अनित्य मानण्यास अनेक ज्ञापकांची गरज नसून प्रकृत सूत्रांतील 'अर्थवत्' एवढें एक ज्ञापक देखील पुरें असल्यामुळें, उत्तराध्यायांतील वरील दोन सूत्रांतून 'विभक्तौ' व 'कारके' हीं व्यर्थ ठरत असलेलीं पदें गाळतां येतात; कारण तीं पदें 'नञिवयुक्तम्' ही परिभाषा अनित्य आहे हें ज्ञापित व्हावें एवढ्याकरितांच कायम ठेवणें इष्ट वाटत होतें. पण आतां प्रकृत पूर्वसूत्रांतील ज्ञापक उपलब्ध झाल्यामुळें, तीं दोन पदें कायम ठेवण्याची कांहीं आवश्यकता नाहीं व तीं पदें गाळल्यानें पदलाघव होतें हें उघड आहे. 'नञिवयुक्तम्' ही परिभाषा जरी अनित्य आहे तरी, 'अनित्यत्वेऽप्यौत्सर्गिकप्रवृत्त्या इष्टसिद्धेः' असें जें वर म्हटलें आहे त्याअन्वयें ती परिभाषा प्रवृत्त करून

'विभक्तौ' व 'कारके' या पदांचें प्रत्याख्यान करतां येतें व अशा रीतीनें पदलाघवरूप इष्ट फल साधतां येतें.)

मनोरमा–"अधातुः" इति किम्? 'अहन्' नलोपो मा भूत। न च कार्यकालपक्षे प्रत्ययान्तत्वेन पर्युदासोऽस्त्विति वाच्यम्, प्रत्ययलक्षणेनोक्तपर्युदासाप्रवृत्तेः "न ङिसम्बुद्धयोः" इति निषेधेन ज्ञापितत्वात्। कथमन्यथा राजेत्यादौ नलोपः स्यात्। अप्रत्ययः किम्? हरिषु, करोषि। अत्र सुप्सिपोर्मा भूत्। अप्रत्ययान्तः किम्? तत्रैव विभक्तिविशिष्टयोर्मा भूत्। न चान्तवद्भावेन काण्डे, कुड्ये, इत्यादौ प्रातिपदिकत्वं स्यादेव। तथा च "ह्रस्वो नपुंसके–" इति ह्रस्वत्वं सोरुत्पत्तिश्च स्यादिति वाच्यम्, कार्यकालपक्षेणेष्टसिद्धेः। यथोद्देशेऽपि 'विभक्त्येकादेशो नान्तवत्' "सप्तम्यधिकरणे च" इत्यादिनिर्देशात्। "ह्रस्वो नपुंसके–" इति सूत्रे प्रातिपदिकग्रहणं वा उक्तार्थे सामान्यापेक्षं ज्ञापकमस्तु।

प्रकृत सूत्रांत 'अधातुः' या पदाचें ग्रहण अशाकरितां केलें आहे कीं, 'अहन्' यांतील अन्त्य नकाराचा लोप होण्याची आपत्ति न यावी. (प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतातः—'अधातुरिति किमर्थम्?। अहन् वृत्रम्'। म्हणजे 'अहन् वृत्रम्' या वाक्यांतील 'अहन्' या क्रियापदाला प्रातिपदिकसंज्ञा होऊं नये याकरितां प्रकृत सूत्रांत 'अधातुः' हें पद घातलें आहे. 'अ हन् तिप्' या स्थलीं 'इतश्च' सू. २२०७ या सूत्रानें 'तिप् = ति' प्रत्ययांतील इकाराचा लोप होऊन 'अहन् त्' अशी स्थिति झाली असतां, 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें 'त्' या अपृक्त प्रत्ययाचा लोप होऊन, 'अहन्' असें जें रूप होतें त्यांत जरी अडागम आहे तरी तो 'यदागमाः' –परि. ११ –या परिभाषान्वयें धातूचा अवयव होत असल्यामुळें, केवळ धातूच शिलक आहे असें म्हणतां येतें. प्रकृत सूत्रांतून 'अधातुः' हें पद गाळलें तर, 'अहन्' या अर्थवान् अप्रत्ययान्त शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा होईल व त्याला प्रत्यय-

लक्षणानें पदसंज्ञा असल्यामुळें तें प्रातिपदिकान्त पद आहे असें मानलें जाऊन 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' या सूत्रानें त्यांतील अन्त्य नकाराचा लोप होण्याची आपत्ति येईल असें दीक्षितांचें म्हणणें आहे. यावर शंकाकार अशी शंका करतो कीं, प्रकृत सूत्रांत 'अप्रत्ययः = प्रत्ययं प्रत्ययान्तं च वर्जयित्वा' असा पर्युदास असल्यामुळें व 'अहन्' या स्थलीं जो 'त्' या प्रत्ययाचा 'हल्ङ्याब्भ्यः' या सूत्रानें लोप झाला आहे तो प्रत्यय प्रत्ययलक्षणानें विद्यमान आहे असें मानतां येत असल्यामुळें आणि अशा रीतीनें 'अहन्' हा शब्द प्रत्ययान्त ठरत असल्यामुळें) त्याच्या प्रत्ययान्तत्वामुळें 'अहन्' याला 'अप्रत्ययः' या पर्युदासान्वयें कार्यकालपक्षांत प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं (व त्यामुळें 'अहन्' यांतील अन्त्य नकाराचा लोप होण्याची आपत्ति मुळींच येत नाहीं. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं,) ही शंका बरोबर नाहीं; कारण प्रत्ययलक्षण मानून 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रवृत्ति करतां येत नाहीं हें 'न ङिसम्बुद्धयोः' सू. ३५२ या निषेधक सूत्रावरून ज्ञापित होतें. तसें न मानल्यास, 'राजा' इत्यादि स्थलीं नकारलोप कसा होऊं शकेल ? ('न ङिसम्बुद्धयोः' या सूत्रावरील काशिकावृत्तींत 'अस्मादेव नलोपप्रतिषेधवचनादप्रत्यय इति प्रत्ययलक्षणेन प्रातिपदिकसंज्ञा न प्रतिषिध्यते इति ज्ञाप्यते' असेंच म्हटलें आहे. शंकाकाराचें असें म्हणणें आहे कीं, प्रकृत सूत्रांतून 'अधातुः' हें पद गाळलें तरी, 'अहन्' या पुढील ज्या 'त्' प्रत्ययाचा लोप झाला आहे तो प्रत्यय 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें विद्यमान आहे असें मानल्यानें 'अहन्' हा शब्द प्रत्ययान्त ठरत असल्यामुळें, प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः = अप्रत्यान्तः' या पर्युदासाच्या बलानेंच तो शब्द कार्यकालपक्षांत प्रातिपदिकसंज्ञक ठरत नाहीं व त्यामुळें त्यांतील अन्त्य नकाराचा लोप होण्याची आपत्ति मुळींच येत नाहीं. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, प्रातिपदिकसंज्ञा करतेवेळीं ज्या शब्दाहून प्रत्यय होऊन प्रत्ययाचा

लोप झाला आहे तो शब्द प्रत्ययलक्षणानें प्रत्ययान्तच आहे असें मानून प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययान्तः' या पर्युदासाच्या सामर्थ्यानें तो प्रातिपदिकसंज्ञक ठरत नाहीं असें मानतां येत नाहीं. तसें मानल्यास, 'राजन् सु' या स्थलीं 'सर्वनामस्थाने चासम्बुद्धौ' सू. २५० या सूत्रानें उपधा दीर्घ होऊन व 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लोप होऊन 'राजान्' अशी स्थिति झाली असतां, ज्या 'सु' प्रत्ययाचा लोप झाला आहे तो प्रत्ययलक्षणानें विद्यमान आहे असें मानल्यानें जशी 'राजान्' याला 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रानें होणारी पदसंज्ञा होते त्याचप्रमाणें 'राजान्' हा शब्द प्रत्ययक्षणानें प्रत्ययान्त आहे असें मानून प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' या पर्युदासाची प्रवृत्ति केल्यास, तो 'राजान्' शब्द प्रातिपदिकसंज्ञक होणार नाहीं व त्यामुळें 'प्रातिपदिकसंज्ञकं यत्पदं तदन्तस्य नकारस्य लोपः स्यात्' या अर्थाचें वाचक 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ हें सूत्र प्रवृत्त होऊं शकणार नाहीं व 'राजान्' यांतील अन्त्य नकाराचा लोप होणार नाहीं आणि 'राजा' असें प्रथमेच्या एकवचनाचें इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. प्रातिपदिकसंज्ञा करतेवेळीं 'अप्रत्ययान्तः' या प्रकृत सूत्रांतील पर्युदासाची प्रत्ययलक्षण मानून प्रवृत्ति करतां येत नाहीं याचें 'न ङिसम्बुद्ध्योः' सू. ३५२ हें निषेधक सूत्र ज्ञापक आहे. 'हे राजन् सु' या स्थलीं 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें संबुद्धीच्या 'सु' प्रत्ययाचा लोप झाल्यावर जरी 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' या सूत्रान्वयें 'राजन्' शब्द प्रत्ययान्त आहें असें मानल्यानें त्याला पदसंज्ञा होते तरी, तो अशा रीतीनें प्रत्ययान्त ठरत असल्यामुळें प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पर्युदासाच्या बलानें प्रातिपदिकसंज्ञक ठरत नाहीं असें मानल्यास, 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' या सूत्रानें नकार लोपाची प्राप्तीच होत नाहीं. तसेंच 'परमे व्योमन्' या वैदिक प्रयोगांत 'व्योमन् + ङि' अशा स्थितींत 'सुपां सुलुक्' सू. ३५६१ या सूत्रानें 'ङि' प्रत्ययाचा लुक् केल्यावर 'व्योमन्'

हा शब्द प्रत्ययलक्षणानें प्रत्ययान्त आहे असें मानून त्याच्या प्रत्ययान्तत्वामुळें त्याला प्रकृत सूत्रानें होणारी प्रातिपदिकसंज्ञा न केल्यास, 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' या सूत्रानें नकारलोपाची प्राप्तीच होत नाहीं. मग 'न ङिसम्बुद्धयोः' हें निषेधक सूत्र करण्याची काय गरज होती ? पण तें निषेधक सूत्र मुद्दाम केलें असल्यामुळें हें ज्ञापित होतें कीं, प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' हा पर्युदास प्रत्ययलक्षणानें प्रत्ययान्त ठरणाऱ्या शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा न व्हावी याकरितां प्रवृत्त करतां येत नाहीं. त्यामुळें 'अहन्' हा अर्थवान् शब्द जरी प्रत्ययलक्षणानें प्रत्ययान्त आहे असें मानतां येतें तरी, तो प्रत्ययलक्षणानें प्रत्ययान्त आहे एवढ्यावरून त्याला प्रातिपदिकसंज्ञा होणें बंद करतां येत नाहीं व म्हणून 'अहन्' हें प्रातिपदिकसंज्ञक पद आहे असें मानतां येऊं शकत असल्यामुळें, या स्थलीं 'न लोपः' सू. २३६ या सूत्रानें नकारलोप होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरितां आणि 'अहन्' याला प्रातिपदिकसंज्ञा न होण्याकरितां प्रकृत सूत्रांत 'अधातुः' हें पद घातलें आहे व अशा रीतीनें तें पद चरितार्थ व आवश्यक ठरतें असें दीक्षितांचें म्हणणें आहे. वर शंकाकारानें जी शंका उपस्थित केली आहे ती कार्यकालपक्षांतच संभवते आणि म्हणूनच 'कार्यकालपक्षे प्रत्ययान्तत्वेन पर्युदासोऽस्तु' या मनोरमेंतील पंक्तींत 'कार्यकालपक्षे' हें पद घातलें आहे. 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' या सूत्रानें नकारलोप कर्तव्य असतां, ज्या शब्दांतील अन्त्य नकाराचा लोप करणें आहे तो शब्द प्रातिपदिकसंज्ञक व तसेंच पदसंज्ञक असणें आवश्यक आहे. म्हणून कार्यकालपक्षांत 'यदा कार्यं तदा संज्ञापरिभाषम्' या वचनान्वयें, ज्या शब्दांतील अन्त्य नकाराचा लोप करणें आहे तो शब्द पदसंज्ञक व प्रातिपदिकसंज्ञक आहे किंवा नाहीं हें ठरविण्याचा प्रसंग येतो व त्यावेळीं 'न लोपः' सू. २३६ या सूत्राजवळ प्रातिपदिकसंज्ञाविधायक व पदसंज्ञाविधायक सूत्रें उपस्थित होऊन त्याशीं एकवाक्यतापन्न झालीं असतां, 'अहन्' हा शब्द 'अप्रत्ययः' या पर्युदासामुळें

प्रातिपदिकसंज्ञक ठरतो किंवा नाहीं हें ठरविणें भाग पडतें. परंतु यथोद्देशपक्षांत तसा विचार करण्याचा प्रसंगच येत नाहीं. 'हन हिंसागत्योः' हा धातुपाठांत पठित असलेला धातु अर्थवान् असल्यामुळें, प्रकृत सूत्रांत 'अधातुः' हा पर्युदास नसल्यास, त्या पक्षांत 'हन्' हा अर्थवान् धातु उच्चारतांक्षणींच त्याला प्रातिपदिकसंज्ञा होते व नंतर अडागम, 'तिप्' प्रत्यय, त्या प्रत्ययांतील इकाराचा लोप, व अखेरीस अवशिष्ट 'त्' प्रत्ययाचा लोप होऊन 'अहन्' अशी स्थिति झाली असतां, जरी 'अहन्' ला प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा होते तरी, 'आ कडारादेका संज्ञा' सू. २३२ या अधिकारांत प्रातिपदिकसंज्ञा पठित नसल्यामुळें, उत्तर सूत्रानें होणारी पदसंज्ञा पूर्व सूत्रानें होणाऱ्या प्रातिपदिकसंज्ञेचा बाध करूं शकत नाहीं. त्यामुळें पूर्वीं झालेली प्रातिपदिकसंज्ञा बाधित न होतां दोन्ही संज्ञा युगपत् कायम राहिल्यानें 'अहन्' यांतील अन्त्य नकाराचा लोप होण्याची आपत्ति यथोद्देशपक्षांत, प्रकृत सूत्रांत 'अधातुः' हें पद नसल्यास, टाळतां येणें अशक्य आहे. हें जाणूनच शंकाकारानें वरील शंका करते वेळीं यथोद्देशपक्षाचा आश्रय न घेतां कार्यकालपक्षाचा आश्रय घेतला आहे. पण कार्यकालपक्षांत देखील शंकाकारानें वर केलेली शंका अयथार्थ ठरते हें दीक्षितांनीं वर सिद्ध करून दाखविलेंच आहे. या विषयाचें अधिक विवेचन शब्दरत्नांत करण्यांत येईल.) प्रकृत सूत्रांत 'अप्रत्ययः' हें पद घालण्याचें प्रयोजन हें आहे कीं, 'हरिषु, करोषि' या स्थलीं झालेल्या 'सुप्' व 'सिप्' प्रत्ययांना प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति न यावी. (त्यांना प्रातिपदिकसंज्ञा झाल्यास, त्यांहून 'ङ्याप्प्रातिपदिकात्' या अधिकारसूत्रान्वयें सुबुत्पत्ति होईल व ते पदसंज्ञक ठरतील आणि त्या दोन्हीं 'सु' व 'सि' या प्रत्ययांतील सकार आदि असल्यामुळें व 'सात्पदाद्योः सू. २१२३ हा निषेध असल्यामुळें, त्या आद्य सकाराचें षत्व न होण्याची आपत्ति येईल.) प्रकृत सूत्रांत 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' असा जो पर्युदास केला आहे तो अशाकरितां कीं, 'हरिषु, करोषि' या प्रत्ययान्त

शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा न व्हावी. (त्यांना प्रातिपदिकसंज्ञा झाल्यास, त्यांहून पुन्हा 'ङ्याप्प्रातिपदिकात्' या अधिकारसूत्रान्वयें सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येईल. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'अप्रत्यय इति किमर्थम्?। काण्डे कुडचे' असें म्हटलें आहे व त्याचा अर्थ हा आहे कीं, प्रकृत सूत्रांत प्रत्ययान्ताला प्रातिपदिकसंज्ञा होण्याचा जो निषेध केला आहे त्याचें कारण हें कीं, 'काण्डे, कुडचे' या प्रत्ययान्तांना–सप्तम्यन्त पदांना–प्रातिपदिकसंज्ञा होऊं नये.) 'काण्डे 'कुडचे' इत्यादि स्थलीं पूर्वान्तवद्भावानें प्रातिपदिकसंज्ञा होईलच व त्यामुळें 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' सू. ३१८ या सूत्रानें ऱ्हस्व होण्याची व 'सु' प्रत्यय होण्याची प्राप्ति आहेच असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण कार्यकालपक्षाचा आश्रय केल्यास (वर दाखविलेल्या आपत्ति सहज टाळतां येतात व) इष्टसिद्धि करतां येते. (शंकाकार असें म्हणतो कीं, 'काण्ड + ङि = काण्ड + इ = काण्डे' या स्थलीं 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें 'ए' असा जो गुणरूप एकादेश होतो तो पूर्वान्तवद्भावानें 'काण्ड' या पूर्व प्रकृतीचा अन्तवत् मानल्यानें 'काण्ड' या प्रकृतीचे ठिकाणीं असणारा प्रातिपदिकत्व धर्म 'काण्डे' याचे ठिकाणीं 'अन्तादिवच्च' सू. ७५ या अतिदेश-शास्त्रानें येऊं शकतो. हें खरें कीं, त्याच वेळीं परादिवद्भाव मानल्यानें प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पर्युदासान्वयें 'काण्डे' हा प्रत्ययान्त ठरून त्याला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति टाळतां येते. परंतु 'उभयत आश्रयणे नान्तादिवत्' असें वचन असल्यामुळें, एकेच वेळीं पूर्वान्तवद्भाव व परादिवद्भाव करतां येत नाहीं. म्हणून पूर्वान्तवद्भाव प्रथम केला असतां, 'काण्डे' याला प्राति-पदिकसंज्ञा होते व तो शब्द नपुंसक असल्यामुळें, 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' सू. ३१८ या सूत्रानें ऱ्हस्वकार्य होऊन, म्हणजे 'एच इग्घ्रस्वादेशे' सू. ३२३ या सूत्रानें 'काण्डे' यांतील अन्त्य 'ए' चा 'इ' होऊन व 'काण्डि' असें रूप होऊन, त्याहून

सुबुत्पत्ति झाली पाहिजे. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, 'काण्ड + ङि = काण्डे' या स्थलीं कार्यकालपक्षांत 'ऱ्हस्वो नपुंसके' या सूत्रानें 'काण्डे' यांतील अन्त्य अच् ला ऱ्हस्व कार्य कर्तव्य असतां व तो शब्द ऱ्हस्वान्त केल्यावर त्याहून 'ङ्याप्प्रातिपदिकात्' या अधिकारसूत्रान्वयें सुबुत्पत्ति कर्तव्य असतां, या दोन्ही सूत्रांत 'प्रातिपदिक' या संज्ञावाचक शब्दाचें ग्रहण असल्यामुळें, 'काण्डे' हा शब्द प्रातिपदिकसंज्ञक आहे किंवा नाहीं याचा विचार करतेवेळीं 'अर्थवदधातुरप्रत्ययः' हें प्रातिपदिकसंज्ञाविधायक प्रकृत सूत्र उपस्थित होईल व त्या सूत्रांत 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' असा पर्युदास असल्यामुळें व 'काण्डे' हा शब्द प्रत्ययान्त असल्यामुळें, त्या पर्युदासाच्या बलानें 'काण्डे' याला प्रातिपदिकसंज्ञा होणार नाहीं व त्यामुळें 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' व तसेंच 'ङ्याप्प्रातिपदिकात्' या, प्रातिपदिकाला लागू पडणाऱ्या, सूत्रांची प्रवृत्ति होऊं शकणार नाहीं.) यथोद्देशपक्षाचा आश्रय केला तरी, 'विभक्त्येकादेशो नान्तवत्' हा सिद्धान्त 'सप्तम्यधिकरणे च' सू. ६३३ इत्यादि पाणिनीय निर्देशांनीं ज्ञापित होत असल्यामुळें, त्या पक्षांत देखील शंकाकारानें दर्शविलेल्या वरील आपत्ति टाळतां येतात. (प्रकृतीचा अन्त्य वर्ण व त्या प्रकृतीपुढील विभक्तिप्रत्ययाचा आद्य वर्ण या दोहोंचे जागीं झालेला एकादेश पूर्वान्तवद्भावानें प्रकृतीचा अन्तावयव मानतां येत नाहीं असा 'विभक्त्येकादेशो नान्तवत् या वचनाचा अर्थ आहे. या वचनान्वयें 'काण्डे, कुड्ये' इत्यादि स्थलीं प्रकृतीच्या 'अ' या अन्त्य वर्णाचे व त्यापुढील 'ङि = इ' या विभक्तिप्रत्याचे जागीं 'आद्गुणः' या सूत्रानें झालेला 'ए' हा गुणरूप एकादेश पूर्वान्तवद्भावानें प्रकृतींचा अन्तावयव आहे असें मानतां येत नाहीं व त्यामुळें 'काण्डे, कुड्ये' यांना प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं. 'सप्तम्यधिकरणे च' इत्यादि पाणिनीय निर्देश वरील सिद्धान्ताचे ज्ञापक आहेत. 'अधिकरण+ङि = अधिकरणे' या स्थलीं 'अधिकरण' या प्रकृतींतील अन्त्य अकार व त्यापुढील 'ङि = इ' हा प्रत्यय या

दोहोंचे जागीं 'ए' हा जो गुणरूप एकादेश झाला आहे तो पूर्वान्तवद्भावानें 'अधिकरण' या प्रकृतीचा अन्तावयव मानल्यास, 'ऱ्हस्वो नपुंसके' या सूत्रानें नपुंसकलिङ्गी 'अधिकरणे' यांतील अन्त्य एकाराचे जागी ऱ्हस्व 'इ' असा आदेश होण्याची व त्याहून सुबुत्पत्ति होण्याची प्राप्ति होते. पण पाणिनीने ऱ्हस्व कार्य किंवा सुबुत्पत्ति न करितां 'अधिकरणे' असा निर्देश वरील सूत्रांत केला असल्यामुळें, वर सांगितलेला सिद्धान्त ज्ञापित होतो व या सिद्धान्तान्वयें 'काण्डे, कुड्ये,' यांना प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं हें उघड आहे.) अथवा 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' सू. ३१८ या सूत्रांत केलेलें 'प्रातिपदिकस्य' या पदाचें ग्रहण वर जो सिद्धान्त सांगितला आहे त्याचें सामान्यापेक्ष ज्ञापक मानतां येऊं शकतें. ('ऱ्हस्वो नपुंसके' या उत्तर सूत्रांत 'अर्थवदधातुः' या प्रकृत पूर्व सूत्रांतून 'प्रातिपदिक' या शब्दाची अनुवृत्ति होऊं शकत असून देखील पुन्हा त्या सूत्रांत 'प्रातिपदिकस्य' या पदाचें जें ग्रहण केलें आहे त्यावरून हें ज्ञापित होतें कीं, प्रकृतीचा अन्त्य वर्ण व त्यापुढील विभक्ति प्रत्ययाचा आद्य वर्ण या दोहोंचे जागीं एकादेश होऊन तयार झालेल्या कृत्रिम दीर्घान्त शब्दाला पूर्वान्तवद्भावानें प्रातिपदिकसंज्ञा होत नसून व प्रातिपदिकाला होणारीं कार्यें तशा शब्दाला होत नसून मूळच्याच दीर्घान्त प्रातिपदिकाला तीं कार्यें होतात. अशा रीतीनें 'ऱ्हस्वो नपुंसके' या सूत्रांतील 'प्रातिपदिकस्य' या पदाचें ग्रहण एकादेशानें दीर्घान्त झालेल्या शब्दाला केवळ ऱ्हस्वकार्याचा निषेध होतो एवढ्यापुरतेंच विशेषापेक्ष ज्ञापन न मानतां, तशा शब्दाला प्रातिपदिकसंज्ञेचा व त्याहून सुबुत्पत्ति होणें इत्यादि सर्व कार्यांचा निषेध होतो याचें तें सामान्यापेक्ष ज्ञापक मानल्यानें, शंकाकारानें दर्शविलेल्या आपत्ति यथोद्देशपक्षांत देखील टाळतां येतात असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.

मनोरमा– यत्तु वदन्ति–प्रत्ययपर्युदासो न कर्तव्यः, प्रत्ययान्तपर्युदासेनैव गतार्थत्वात् । व्यपदेशिवद्भावेन तस्यापि प्रत्ययान्तत्वादिति,

तन्न, प्रत्ययग्रहणे यस्मात्स विहितस्तदादेर्ग्रहणात् । केवलस्य च अतथात्वात् । अन्यथा त्वदुक्तरीत्या सुप्तिङोरपि तदन्तत्वात् पदत्वं स्यात् । तथा च हरिषु, करोषि, इत्यादौ षत्वं न स्यात्, "सात्पदाद्योः" इति निषेधात् । अधातुप्रत्ययाविति सिद्धे नञ्द्वयोपादानं स्पष्टार्थम् । महासंज्ञाकरणं श्रुत्यनुरोधात् । तथा चाथर्वणे पठ्यते— "को धातुः ? किं प्रातिपदिकं ? कः प्रत्ययः" ? इति । डित्थादीन्यव्युत्पन्नानीहोदाहरणम् । अव्युत्पत्तिपक्षस्य चेदमेव ज्ञापकमिति प्राञ्चः । यत्तु व्युत्पत्तिपक्षेऽपि निपातार्थमनुकरणार्थं चेदमिति हरदत्तेनोक्तम् । तच्चिन्त्यम्, तत्रापि प्रकृत्यादिकल्पनसम्भवात् । वस्तुतस्तु व्युत्पत्तिपक्षेऽपि बहुपटव इत्याद्यर्थं सूत्रम् । न चैवं 'बहुच्पूर्वः' इत्येव सूत्र्यतामिति वाच्यम्, 'मूलकेनोपदंशम्' इत्यादौ कृदन्तत्वेनातिप्रसङ्गात् । न च समासग्रहणं नियमार्थमिति निस्तारः, अर्थवत्सूत्रारम्भं विना समासग्रहणस्य नियमार्थत्वायोगादिति दिक् ।

प्रकाशकारांचें असें म्हणणें आहे कीं, प्रकृत सूत्रांत प्रत्ययाचा पर्युदास करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. प्रत्ययान्ताचा पर्युदास केल्यानें प्रत्ययाचा पर्युदास आपोआपच होतो (व त्यामुळें वेगळा प्रत्ययाचा पर्युदास करण्याची कांहीं गरज राहत नाहीं;) कारण व्यपदेशिवद्भावानें प्रत्यय देखील प्रत्ययान्त मानतां येतो. पण हें त्यांचें म्हणणें बरोबर नाहीं; कारण ज्या प्रकृतीहून शास्त्रानें प्रत्यय होणें सांगितलें आहे ती प्रकृति ज्या समुदायाची आदि आहे अशा प्रत्ययान्त समुदायाचें प्रत्ययग्रहणपरिभाषान्वयें प्रत्ययान्तानें ग्रहण होतें व केवळ प्रत्यय तसा नसतो, म्हणजे त्याच्या पूर्वीं प्रकृति राहत नसून तो प्रकृतीच्या अन्तीं नसतो; नाहीं तर तुमच्या—प्रकाशकारांच्या—म्हणण्याप्रमाणें (प्रातिपदिकाहून होणारे) 'सुप्' प्रत्यय व (धातूहून होणारे) 'तिङ्' प्रत्यय हे देखील तदन्तत्वामुळें पदसंज्ञक ठरतील आणि त्यामुळें 'हरिषु, करोषि' इत्यादि स्थलीं ('सु' व 'सि' या प्रत्ययांना पदसंज्ञा झाल्यानें त्यांत सकार हा आदि वर्ण असल्यामुळें त्या सकाराचें) 'सात्पदाद्योः' सू. २१२३

या निषेधान्वयें षत्व होणार नाहीं. (प्रत्यय या शब्दाचे केवळ प्रत्यय व व्यपदेशिवद्भावानें प्रत्ययान्त असे दोन्ही प्रकारचे अर्थ होतात आणि प्रत्यय व प्रत्ययान्त या दोहोंचाहि प्रकृत सूत्रांत पर्युदास होणें इष्ट असल्यामुळें, दीक्षितांनीं प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पर्युदासांत जो 'प्रत्यय' शब्द आहे त्याचें दोनदां उच्चारण करून व एकदां उच्चारलेल्या 'प्रत्यय' शब्दाचा केवळ प्रत्यय असा अर्थ करून व दुसऱ्यानें उच्चारलेल्या त्या 'प्रत्यय' शब्दाचा 'प्रत्ययान्तः' असा अर्थ करून 'अप्रत्ययः' या पदाचा 'प्रत्ययं प्रत्ययान्तं च वर्जयित्वा' अशा रीतीनें कौमुदींत अर्थ केला आहे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. प्रकाशकारांना देखील प्रत्यय व प्रत्ययान्त या दोहोंचाहि पर्युदास होणें इष्ट आहेच. पण त्यांचें म्हणणें असें आहे कीं, 'अप्रत्ययः' या पदाचा 'अप्रत्ययः' व 'अप्रत्ययान्तः' असा दोन प्रकारें अर्थ न करितां 'अप्रत्ययान्तः' असा एकच अर्थ केल्यानें देखील जसा प्रत्ययान्ताचा पर्युदास होतो तसाच प्रत्ययाचा देखील पर्युदास होतो व त्यामुळें वेगळा प्रत्ययाचा पर्युदास करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं; कारण व्यपदेशिवद्भावानें प्रत्यय देखील प्रत्ययान्त मानतां येत असल्यामुळें, प्रत्ययान्ताचा पर्युदास केल्यानें प्रत्ययाचा पर्युदास आपोआपच सिद्ध होतो. यावर दीक्षित असें म्हणतात कीं, ज्या समुदायाच्या अन्तीं प्रत्यय आहे त्या समुदायांत ज्याहून तो प्रत्यय शास्त्रानें विहित आहे तो प्रकृतिरूप शब्द आरंभीं असलाच पाहिजे, म्हणजे प्रत्ययान्तानें प्रकृतीच्या आरंभापासून प्रत्ययाच्या अखेरपर्यंत जो समुदाय आहे त्याचें ग्रहण होतें, व केवळ प्रत्यय तसा नसतो, म्हणजे त्याच्या आरंभीं प्रकृति राहत नसून व तो प्रकृतीच्या अन्तीं येत नसून एकटाच विद्यमान असतो. म्हणून 'हरिषु, करोषि' इत्यादि प्रत्ययान्त समुदायांतील 'सु, सि' हे प्रत्यय प्रत्ययान्त मानल्यास, त्यांना 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रानें होणारी पदसंज्ञा होईल व 'सु, सि' हीं पदें मानल्यानें, त्या दोहोंतहि सकार हा आदि वर्ण असल्यामुळें व 'सात्पदाद्योः' हा निषेध असल्यामुळें, त्या सकाराचें 'आदेशप्रत्यययोः'

सू. २१२ या सूत्रानें होणारें षत्व न होण्याची आपत्ति येईल आणि 'हरिसु, करोसि' अशीं अनिष्ट रूपें होतील. या विषयाचें अधिक विवरण शब्दरत्नांत करण्यांत येईल.) 'अधातुप्रत्ययौ' असें एकच सामासिक पद प्रकृत सूत्रांत घातल्यानें इष्ट प्रयोजन सिद्ध होत असून देखील, 'अधातुः' व 'अप्रत्ययः' अशीं जीं नञ्युक्त दोन पदें घातलीं आहेत तीं प्रकृत सूत्राचा अर्थ स्पष्ट होण्याकरितां घातलीं आहेत. (वास्तविक 'अधातुप्रत्ययौ' असें एकच सामासिक पद प्रकृत सूत्रांत घातलें असतें तर प्रकृत सूत्रांत एक पद कमी झालें असतें आणि 'अर्धमात्रालाघवेन'–परि. १३३ – या न्यायान्वयें जरी तसें करणें इष्ट होतें तरी, प्रकृत सूत्राचा अर्थ अधिक स्पष्ट व्हावा या हेतूनें पाणिनीनें 'अधातुः, अप्रत्ययः' अशीं दोन पदें प्रकृत सूत्रांत घातलीं आहेत असें दीक्षितांचें म्हणणें आहे.) अथर्वण वेदामध्यें 'को धातुः? किं प्रादिपदिकम्? कः प्रत्ययः?' अशी श्रुति पठित असल्यामुळें त्या श्रुतीला धरूनच पाणिनीनें 'प्रातिपदिक' ही महासंज्ञा–अन्वर्थक संज्ञा–केली आहे. (ही अन्वर्थक संज्ञा आहे असें जें म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, प्रत्येक सुबन्त पदांत प्रातिपदिक उपलब्ध आहेच; कारण प्रातिपदिकाहूनच सुबुत्पत्ति होत असते.) 'डित्थ' इत्यादि अव्युत्पन्न, म्हणजे प्रकृतिप्रत्ययविभागरहित, प्रातिपदिकें प्रकृत सूत्राचीं उदाहरणें आहेत. पाणिनीला अव्युत्पत्तिपक्ष मान्य होता याचें प्रकृत सूत्रच ज्ञापक ठरतें असें प्राचीनांचें म्हणणें आहे. (धातूहून औणादिक कृत्प्रत्यय होऊन सर्व प्रातिपदिकें सिद्ध झालीं आहेत असा व्युत्पत्तिपक्ष जर पाणिनीला मान्य असता तर त्याला प्रकृत सूत्र करण्याची कांहींच गरज नव्हती; कारण 'कृत्तद्धितसमासाश्च' सू. १७९ या सूत्रानेंच सर्व व्युत्पन्न कृदन्त शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा झालीच असती. पण पाणिनीनें प्रकृत सूत्र केलें असल्यामुळें हें ज्ञापित होतें कीं, त्याच्यामतें सर्वच प्रातिपदिकें कृदन्त नसून कांहीं अव्युत्पन्न प्रातिपदिकें देखील आहेत व तशा अव्युत्पन्न शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा होण्याकरितां पाणिनीला प्रकृत सूत्र करणें भाग पडलें आणि तसें

अव्युत्पन्न शब्दच प्रकृत सूत्राचीं योग्य उदाहरणें ठरत असून, व्युत्पन्न प्रातिपदिकें 'कृत्तद्धितसमासाश्च' या पुढील सूत्राचीं उदाहरणें ठरतात. सारांश, पाणिनीला व्युत्पत्तिपक्ष मान्य नव्हता याचें प्रकृत सूत्र ज्ञापक ठरतें असें प्राचीनांचें म्हणणें आहे.) हरदत्ताचें असें म्हणणें आहे कीं, व्युत्पत्तिपक्ष मानला तरी निपातांना व अनुकरण-वाचक शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा होण्याकरितां प्रकृत सूत्र आवश्यक आहे. ('डित्थादीन्यव्युत्पन्नान्युदाहरणानि । व्युत्पत्तौ कृदन्तादेव सिद्धम् सर्वं नाम धातुजमिति, अत्रापि पक्षेऽव्ययार्थमनुकरणशब्दार्थं च सूत्रमारभ्यमेव' असें हरदत्तानें पदमञ्जरींत म्हटलें आहे.) पण हें म्हणणें बरोबर मानतां येत नाहीं; कारण निपात व अनुकरणवाचक शब्द देखील धातूहून औणादिक प्रत्यय होऊन सिद्ध झाले आहेत असें मानतां येऊं शकतें. वास्तविक व्युत्पत्तिपक्ष मानला तरी त्या पक्षांत देखील 'बहुपटु' इत्यादि शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा व्हावी याकरितां प्रकृत सूत्र असणें आवश्यक आहे. ('विभाषा सुपोबहुच्पुरस्तात्तु' सू. २०२३ या सूत्रानें 'ईषदसमाप्ति' या अर्थामध्यें 'पटु' या शब्दाला 'बहुच्' प्रत्यय झाला असून तो प्रत्यय इतर प्रत्ययांप्रमाणें प्रकृ-तीच्या पुढें न होतां 'पटु' या प्रकृतीच्या पूर्वीं झाला आहे. त्यामुळें 'बहुपटु' हा शब्द तद्धितप्रत्ययान्त ठरत नसून तद्धितप्रत्ययादि ठरतो व 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें तद्धितान्ताला होणारी प्रातिपदिकसंज्ञा त्या शब्दाला होऊं शकत नाहीं. ती संज्ञा तशा अर्थवान् शब्दाला व्हावी याकरितां व्युत्पत्तिपक्षांत देखील प्रकृत सूत्र असणें आवश्यक आहे असें दीक्षितांचें म्हणणें आहे.) पण असेंच जर आहे, म्हणजे ज्या शब्दांना 'बहुच्' प्रत्यय झाला आहे अशा शब्दांना व्युत्पत्तिपक्षांत प्रातिपदिकसंज्ञा व्हावी एवढ्याचकरितां प्रकृत सूत्र केलें आहे असें जर म्हणणें असेल तर, (एवढें मोठें प्रकृत सूत्र न करितां त्या ऐवजीं लहानसें) 'बहुच्पूर्वः'—म्हणजे ज्या शब्दापूर्वीं 'बहुच्' प्रत्यय झाला आहे त्याला प्रातिपदिकसंज्ञा होते—असें सूत्र केल्यानें काम भागूं शकलें असतें असें कोणी म्हटल्यास ,तें म्हणणें बरोबर

नाहीं; कारण जर प्रकृत सूत्र नसतें तर, 'मूलकेनोपदंशम्' इत्यादि स्थलीं कृदन्तत्वामुळें संपूर्ण समुदायाला ('कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें) प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति आली असती. 'कृत्तद्धि-तसमासाश्च' या सूत्रांतील 'समास' ग्रहण नियमार्थ असल्यामुळें वरील आपत्ति येऊं शकत नाहीं असें कोणी म्हटल्यास, त्याला उत्तर हें आहे कीं, प्रकृत सूत्र आरंभिल्याशिवाय 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण नियमार्थ आहे असें मानतां येत नाहीं. (तृतीयान्त उपपद असलें तरच 'उप' या उपसर्गपूर्वक 'दंश्' धातूहून 'उपदंशस्तृतीयायाम्' सू. ३३६८ या सूत्रानें 'णमुल्' हा कृत्प्रत्यय होणें सांगितलें असल्यामुळें, 'मूलकेनोपदंशम्' हा उपपदपूर्वक 'णमुल्' प्रत्ययान्त समुदाय 'कृद्ग्रहणे गतिकारक-पूर्वस्यापि ग्रहणम्'–परि. २८–या परिभाषान्वयें कृदन्त ठरतो व या संपूर्ण कृदन्त अर्थवान् समुदायास, प्रकृत सूत्र नसल्यास, 'कृत्तद्धि-तसमासाश्च' या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते. पण प्रकृत सूत्रांत 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' हा पर्युदास असल्यामुळें व 'मूलकेन' हा शब्द प्रत्ययान्त असल्यामुळें, त्या प्रत्ययान्त शब्दाला प्राति-पदिकसंज्ञा न होतां, 'उपदंशम्' एवढ्याच अंशाला प्रातिपदिक-संज्ञा होते. यावर शंकाकार अशी शंका करतो कीं, 'समास एवार्थ-वतां समुदायानां प्रातिपदिकसंज्ञो भवति नान्य इति' असें प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं म्हटलें असल्यामुळें, 'मूलके-नोपदंशम्' या असमस्त पदसमुदायाला, प्रकृत सूत्र नसलें तरी, प्राति-पदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं. पण दीक्षित म्हणतात कीं, पदसमु-दायाला प्रातिपदिकसंज्ञा होणें असेल तर ती समासालाच होते असा जो भाष्यकारांनीं नियम सांगितला आहे तो प्रकृत सूत्राच्या आधारा-वरच सांगितला आहे. प्रकृत सूत्रानेंच अर्थवान् पदसमुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची प्राप्ति आहे व 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण नियमार्थ मानल्यानें त्या प्राप्तीचें निवारण करतां येतें. पण जर प्रकृत सूत्र नसलें तर अर्थवान् पद-

समुदायाला प्रातिपदिकसंज्ञेची प्राप्तीच होत नसल्यामुळें, समासग्रहण नियमार्थ मानतां येत नाहीं. म्हणून तें समासग्रहण नियमार्थ ठरण्याकरितां प्रकृत सूत्र असणें आवश्यक आहे व हें सूत्र असल्यामुळें आणि 'मूलकेनोपदंशम्' हा पदसमुदाय सामासिक शब्द नसल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति टळते.)

शब्दरत्न– व्यर्थं स्यादिति । न च 'अस्यापत्यम्–इः' इत्यादौ प्रत्ययत्वप्रयुक्तनिषेधबाधनेन तच्चरितार्थम् । 'अ अस् इ' इत्यवस्थायां प्रवृत्तसंज्ञाया एकदेशविकृतन्यायेन सुलभत्वात् । एकार्थीभावेनेति । न चैतत्प्रत्ययमात्रस्य, तन्मात्रे एकार्थीभावाभावादिति भावः । एकार्थीभावश्च–यस्य प्रातिपदिकसंज्ञा चिकीर्षिता तन्मात्रवृत्तिरेव ग्राह्यः । तेन 'पञ्चनावप्रियः' इति समासघटकपञ्चनावेत्यस्य तद्धितान्तत्वसमासत्वयोरपि न प्रातिपदिकत्वम्, प्रियशब्दान्त एव तत्रैकार्थीभावो न तु तन्मात्र इत्यदोषात् । न च, क्विबन्ते दोषः । तत्र धातोरेव विशिष्टार्थबोधकत्वेन अर्थवद्द्वितीयाभावेन पृथगर्थानामेकोपस्थितिजनकत्वरूपैकार्थीभावाभावादिति वाच्यम्, अलौकिके वाक्ये कल्पितैकार्थीभावस्य तत्राप्यारोपेणादोषात् । व्यर्थं स्यादिति । अनेन प्रत्ययपर्युदासे मानमुक्तम् । सातेः प्रातिपदिकत्वे हि तत औत्सर्गिकैकवचने तस्यापि सुबन्तत्वेन पदत्वे पदादित्वादेव निषेधसिद्धेस्तद्व्यर्थमिति भावः ।

'प्रत्ययस्यैव पर्युदासे कृत्तद्धित इति सूत्रेण तद्धितान्तस्य संज्ञाविधानं व्यर्थं स्यात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यावर शंकाकार अशी शंका करतो कीं, अस्यापत्यम् इः' इत्यादि स्थलीं प्रत्ययत्वामुळें होणाऱ्या निषेधाचा बाध करून 'कृत्तद्धित' सू. १७९ या सूत्रांतील (तद्धितप्रत्ययवाचक) 'तद्धित' हें पद चरितार्थ ठरतें. पण (शब्दरत्नकार म्हणतात कीं,) ही शंका बरोबर नाहीं; कारण 'अ अस् इ' अशा स्थितींत (या तद्धितान्त समुदायाला) जी प्रातिपदिकसंज्ञा होते ती एकदेशविकृतन्यायानें 'इ' चे ठिकाणीं सहज प्राप्त होऊं

शकते. (दीक्षितांनीं मनोरमेंत असें म्हटलें आहे कीं, प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पर्युदासानें प्रत्ययान्ताचा देखील पर्युदास न करितां केवळ प्रत्ययाचा पर्युदास केला तर, 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांतील तद्धितान्तवाचक 'तद्धित' या पदानें तद्धितान्ताला प्रातिपदिकसंज्ञा होण्याचें जें विधान केलें आहे तें व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते; कारण केवळ प्रत्ययाला प्राति-पदिकसंज्ञा होण्याचा निषेध केला आहे व प्रत्य-यान्ताला ती संज्ञा होण्याचा निषेध केला नाहीं असें मानल्यास, प्रकृत सूत्रानेंच, अर्थवान् असणाऱ्या, तद्धितान्ताला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकलीच असती. मग त्याला ती संज्ञा होण्या-करितां 'कृत्तद्धित' या सूत्रांत 'तद्धित = तद्धितान्त' या पदाचें ग्रहण कां केलें आहे ? प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पदानें प्रत्ययान्ताचा देखील पर्युदास होतो असें मानलें तरच, तद्धितान्ताला प्रातिपदिकसंज्ञा व्हावी याकरितां तें ग्रहण चरितार्थ व आवश्यक ठरतें. यावर शंकाकार असें म्हणतो कीं, 'विष्णु' या अर्थाच्या वाचक 'अ' या प्रातिपदिकाहून अपत्यार्थक 'इञ्' प्रत्यय 'अत इञ्' सू. १०९५ या सूत्रानें केल्यावर 'अस्यापत्यम् इः = अ + ङस् + इञ् = अ + अस् + इ' अशी स्थिति झाली असतां, 'सुपो धातु-प्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'ङस्' प्रत्ययाचा लुक् होऊन व 'यस्येति च' सू. ३११ या सूत्रानें 'अ' या प्रकृतीचा लोप होऊन केवळ 'इ' हा तद्धित प्रत्ययच शिल्लक राहतो व त्या प्रत्ययरूप 'इ' ला प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या प्रत्ययाच्या पर्युदासामुळें जो प्रातिपदिकसंज्ञेचा निषेध होतो, म्हणजे जी प्रातिपदिकसंज्ञा प्राप्त होत नाहीं, त्या निषेधाला बाधून 'कृत्तद्धित' या सूत्रांतील केवळ तद्धितप्रत्ययवाचक 'तद्धित' या शब्दाच्या ग्रहणामुळें 'इ' याला प्रातिपदिकसंज्ञा होते. जर त्या सूत्रांतील 'तद्धित' या शब्दानें तद्धितान्ताचें ग्रहण केलें तर 'इ' हा केवळ तद्धित प्रत्यय असून तद्धितान्त नसल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा न होण्याची

आपत्ति येते. अशा रीतीनें वर सांगितल्याप्रमाणें 'कृत्तद्धित' या सूत्रांतील 'तद्धित' या पदाचें ग्रहण व्यर्थ न ठरतां चरितार्थ व आवश्यक ठरतें. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'अ ङस् इञ्' या अवस्थेंत तद्धित 'इञ्' प्रत्ययान्त समुदायाला 'कृत्तद्धित' या सूत्रानें जी प्रातिपदिकसंज्ञा होते ती, त्या समुदायांतील 'ङस्' प्रत्ययाचा लुक् व 'अ' या प्रकृतीचा लोप वर सांगितल्या-प्रमाणें झाल्यावर 'इञ्=इ' हा जो तद्धित प्रत्ययरूप भाग अवशिष्ट राहतो त्याला, एकदेशविकृतन्यायानें होऊं शकतेच. 'एकदेशविकृतमनन्यवत्' -परि. ३७-हा न्याय जेथें अर्ध्यापेक्षां अधिक शब्दस्वरूप नाहींसें झालें आहे किंवा बदललें आहे तेथें लागू पडत नाहीं असें पूर्वीं सांगितलें आहे व प्रकृत स्थलीं अर्ध्यापेक्षां अधिक शब्दस्वरूप नाहींसें झालें असल्यामुळें येथें वास्तविक वरील परिभाषा लागू पडत नाहीं व त्या परिभाषान्वयें 'इ' हा तद्धितान्त आहे असें मानतां येत नाहीं. तरी पण 'अ ङस् इञ्' या स्थलीं त्या संपूर्ण समुदायाचे जागीं जो 'इञ् = इ' झाला आहे तो 'स्थानिवदादेशः' सू. ४९ या सूत्रानें स्थानिवद्भावानें तद्धितान्त मानतां येतो, आणि अशा रीतीनें 'इ' हा तद्धितान्त ठरत असल्यामुळें, 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांतील तद्धितान्त-वाचक 'तद्धित' या पदाच्या ग्रहणानें 'इ' याला प्रातिपदिकसंज्ञा होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. सारांश, त्या सूत्रांतील 'तद्धित' हा शब्द तद्धितान्त या अर्थाचा वाचक मानल्यानें शंकाकारानें दर्शविलेली आपत्ति येत नसल्यामुळें, त्यानें केलेली शंका अयोग्य ठरते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

'एकार्थीभावेन लौकिके प्रयोगे प्रसिद्धत्वं च प्रशंसामूलम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, प्रशस्त अर्थवत्ता केवळ प्रत्ययाचे ठिकाणीं राहत नसते; कारण (एकार्थीभाव होण्याकरितां दोन किंवा अधिक शब्दांची गरज असल्यामुळें, प्रकृति व प्रत्यय हे दोन्ही असले तरच त्या दोहोंच्या अर्थाचा एकार्थीभाव होऊं शकतो व) केवळ प्रत्यय असल्यास

एकार्थीभाव होणें शक्य नाहीं. (प्रकृत सूत्रांतून 'कृत्तद्धितसमासाश्च' या उत्तर सूत्रांत 'अर्थवत्' या पदाची अनुवृत्ति होते व त्या पदांतील 'मतुप्' प्रत्यय 'प्रशंसा' या अर्थाचा वाचक असल्यामुळें आणि जरी प्रकृति व प्रत्यय हे दोन्ही अर्थवान् असतात तरी केवळ तद्धित प्रत्यय किंवा ज्या प्रकृतीहून तद्धित् प्रत्यय होतो त्यांचे ठिकाणीं प्रशस्त अर्थ द्योतित करण्याचें सामर्थ्य नसून, प्रकृतीहून तद्धितप्रत्यय केल्यावर तशा तद्धितान्त शब्दाचे ठिकाणींच, दोहोंच्या अर्थांचें एकत्रीकरण झाल्यानें, प्रशस्तार्थ द्योतित करण्याचें सामर्थ्य येत असल्यामुळें, 'अर्थवत्' या विशेषणानें युक्त असणाऱ्या 'कृत्तद्धित' या सूत्रांतील 'तद्धित' या शब्दानें केवळ तद्धित प्रत्ययाचें ग्रहण न होतां, तद्धितान्ताचेंच ग्रहण होतें, व तद्धितान्त शब्द प्रत्ययान्त असल्यामुळें व प्रकृत सूत्रांत 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' हा पर्युदास असल्यामुळें, प्रकृत सूत्रानें तद्धितान्ताला जी प्रातिपदिक-संज्ञा होऊं शकत नव्हती ती त्याला व्हावी याकरितां 'कृत्तद्धित' या सूत्रांत प्रशस्तार्थद्योतक तद्धितान्त वाचक 'तद्धित' शब्दाचें ग्रहण केलें आहे हें पूर्वी मनोरमेंत सांगितलेंच आहे. प्रकृति व प्रत्यय हे दोन्ही अर्थवान् असून देखील त्या दोहोंच्या अर्थाचा एकत्रीभाव झाल्याशिवाय त्यांचे ठिकाणीं प्रशस्त अर्थ, म्हणजे लौकिक प्रयोगांत ज्ञात होण्यालायक अर्थ, द्योतित करण्याचें सामर्थ्य नाहीं असें जें वर म्हटलें आहे त्याचें कारण हें आहे कीं, भाषेंत केवळ प्रकृतीचा किंवा केवळ प्रत्ययाचा प्रयोग केला तर श्रोत्याला अर्थबोध होणें शक्य नाहीं. अर्थबोध होण्याकरितां प्रत्ययविशिष्ट प्रकृतीचाच प्रयोग करणें आवश्यक आहे आणि म्हणूनच भाष्यकारांनीं 'न केवला प्रकृतिः प्रयोक्तव्या नापि केवलः प्रत्ययः' असें ठिकठिकाणीं भाष्यांत म्हटलें आहे. तसेंच 'सङ्ख्याया अतिशदन्तायाः' ५. १. २२ या सूत्रावरील भाष्यांत 'न हि लोके केवलेन प्रत्ययेनाऽर्थो गम्यते, केन-तर्हि ?। सप्रकृतिकेनेति' असें भाष्यकारांनीं स्पष्ट म्हटलें आहे. त्याच-प्रमाणें 'सुप्तिङन्तं पदम्' १. ४. १४ या सूत्रावरील भाष्यांत

भाष्यकार म्हणतात–'यदप्युच्यते कृत्तद्धितसमासाश्चेत्यन्तग्रहणं कर्तव्यमिति । न कर्तव्यम् । अर्थवदिति वर्तते, कृत्तद्धितान्तं चैवार्थवन्न केवलाः कृतस्तद्धिता वा ।' येथें हें सांगणें आवश्यक आहे कीं, मतुप्सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'मतुप्' प्रत्ययाचे जे अनेक अर्थ सांगितले आहेत त्यांपैकीं 'प्रशंसा' हा एक अर्थ आहे हें त्या भाष्यांत दिलेल्या 'भूमनिन्दाप्रशंसासु नित्ययोगेऽतिशायने । सम्बन्धेऽस्ति विवक्षायां भवन्ति मतुबादयः ।।' या कारिकेवरून स्पष्ट होतें.) ज्याला प्रातिपदिकसंज्ञा करणें आहे त्याचेच ठिकाणीं असणारा एकार्थीभाव अभिप्रेत आहे. त्यामुळें पञ्चनावप्रियः' या स्थलीं 'पञ्चनाव' हा समासावयव जरी तद्धितान्त व सामासिक शब्द आहे तरी त्याला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. प्रियशब्दान्त 'पञ्चनावप्रियः' या संपूर्ण शब्दाचे ठिकाणीं एकार्थीभाव झाला असून 'पञ्चनाव' या अवयवांतच केवळ एकार्थीभाव झालेला नसल्यामुळें, येथें कांहीं दोष येत नाहीं. (तद्धितार्थोत्तरपदसमाहारे च' सू. ७२८ या सूत्रानें तीन प्रकारें द्विगुसमास होणें सांगितलें आहे. या तीन प्रकारांपैकीं उत्तर पद पुढें असतांना झालेला 'पञ्चनावप्रियः' यांतील 'पञ्चनाव' हा संख्यापूर्वक द्विगुसमास होय व या 'नौ' शब्दान्त द्विगुसमासाला 'नावो द्विगोः' सू. ८०१ या सूत्रानें समासान्त तद्धित 'टच् = अ' प्रत्यय होऊन व 'एचोऽयवायावः' सू. ६१ या सूत्रानें 'नौ' यांतील 'औ' चे जागीं आवादेश होऊन 'पञ्चनाव' असें अदन्त रूप सिद्ध झालें आहे. 'पञ्चनाव' हा शब्द सामासिक असून तद्धित 'टच्' प्रत्ययान्त असल्यामुळें, या अर्थवान् तद्धितान्त व सामासिक शब्दाला 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा कां होऊं नये ? या प्रश्नाचें उत्तर हें आहे कीं, वर सांगितल्याप्रमाणें एकार्थीभाव झाल्यानें प्रशस्तार्थवाचक होणाऱ्या तद्धितान्ताला त्या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत असल्यामुळें व उत्तर पद पुढें असतांना होणाऱ्या द्विगुचा भाषेंत स्वतंत्र रीतीनें प्रयोग होत नसून त्याचे

ठिकाणीं लौकिक प्रशस्त अर्थवत्ता नसल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. असें आहे म्हणूनच 'पञ्च नाव: प्रियाः यस्य' असा त्रिपद-बहुव्रीहि करावा लागतो. सारांश, 'पञ्चनावप्रिय' या संपूर्ण शब्द-समुदायाचे ठिकाणीं लौकिकी प्रशस्तार्थवत्ता असून 'पञ्चनाव' या अवयवाचे ठिकाणीं लौकिक प्रयोगार्हता नसल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. त्याला प्रातिपदिकसंज्ञा झाली असती तर 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें त्याहून 'टाप् = आ' हा स्त्रीप्रत्यय झाला असता व 'प्रिय' हा शब्द समासांत उत्तर पद असल्यामुळें, 'स्त्रियाः पुंवत्' सू. ८३१ या सूत्रानें होणारा पुंवद्भाव त्या सूत्रांतील 'अपूरणी प्रियादिषु' या निषेधान्वयें न होतां, 'टाप्' प्रत्ययाचें श्रवण होण्याची आपत्ति आली असती. 'पञ्चनावप्रियः' या अन्यपदार्थप्रधान बहुव्रीहिसमासांत 'पञ्चनाव' हा जरी टित् प्रत्ययान्त अवयव आहे तरी तो उपसर्जन असल्यामुळें, 'अनुपसर्जनात्' सू. ४६९ या अधिकारांत पठित असलेल्या 'टिड्ढाणञ्' सू. ४७० या सूत्रानें होणारा 'ङीप्' प्रत्यय त्याहून होऊं शकत नाहीं व 'टाप्' प्रत्ययाचीच वर सांगितल्याप्रमाणें प्राप्ति होते. प्रकृत सूत्रावरील शब्देन्दुशेखरांत 'पञ्चनावप्रिय इत्यादौ पञ्चनावे-त्यस्यानेन न प्रातिपदिकत्वम्, नाप्युत्तरसूत्रेण । प्रातिपदिकत्वे तु टाबापत्तिः' असें म्हटलें असून यावर अभिनवचन्द्रिकेंत 'पञ्चनावेत्यस्य लोके अर्थविषयकबोधजनकत्वमेव न' असें स्पष्ट म्हटलें आहे. प्रकृत सूत्रावरील उद्योतांत देखील 'पञ्चनावप्रिय इत्यत्र पञ्चनावेत्यस्य प्रातिपदिकत्वेऽपि न क्षतिः, टजन्तस्योपसर्जनत्वेन ङीपोऽप्राप्तेः, सुबपि समासे सङ्ख्याभावान्न, प्रकृते सङ्ख्याया उक्तत्वाच्च । वस्तुतः प्रशस्तार्थत्वाभावात् प्रातिपदिकत्वाप्राप्तिरेव । एतेन टाप्स्यादित्युक्तिः परास्ता' असें म्हटलें आहे. आतां येथें शंकाकार अशी शंका करतो कीं, प्रकृति व प्रत्यय यांच्या अर्थाचा एकार्थीभाव झाल्यानें उत्पन्न होणारी प्रशस्तार्थवत्ता ज्याचे ठिकाणीं असते त्यालाच प्रातिपदिकसंज्ञा होते असें मानल्यास,) क्विबन्ताचे ठिकाणीं

दोष येतो, म्हणजे त्याला प्रातिपदिकसंज्ञा न होण्याची आपत्ति येते; कारण (धातूहून 'क्विप् = व्' प्रत्यय केला असतां, त्या अपृक्त प्रत्ययाचा 'वेरपृक्तस्य' सू. ३७५ या सूत्रानें लोप झाल्यावर) अवशिष्ट धातु हाच विशिष्ट अर्थाचा–'धातुनिरूपितक्रियेचा कर्ता' या विशिष्ट अर्थाचा–बोधक होत असल्यामुळें व अर्थवान् द्वितीयाचा–क्विप्प्रत्ययाचा–अभाव असल्यामुळें, दोन भिन्न अर्थांचें एकत्रीकरण होऊन सिद्ध झालेल्या अर्थाची उपस्थिति करून देणें अशा प्रकारचा जो एकार्थीभाव तो तेथें विद्यमान नाहीं. (या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं,) ही शंका बरोबर नाहीं; कारण अलौकिक प्रक्रियावाक्यांत कल्पित असलेला जो एकार्थीभाव त्याचा लुप्त क्विबन्ताचे ठिकाणीं देखील आरोप केल्यानें कांहीं दोष येत नाहीं. ('प्रसूते इति प्रसूः = प्रसू +क्विप् + सु' या स्थली 'सू' हा धातु 'षूङ् प्राणिगर्भविमोचने' या धातुपाठान्वयें 'प्रसविणें' या अर्थाचा वाचक आहे व या धातूहून 'सत्सूद्विषद्रुहदुह' सू. २९७५ या सूत्रानें 'कर्तरि' या अर्थामध्यें क्विप्प्रत्यय केला असतां, 'प्रसूः' याचा 'प्रसविणारी' असा अर्थ होतो. येथें शंकाकार असें म्हणतो कीं, 'सू' धातूहून होणाऱ्या 'क्विप् = व्' या अपृक्त प्रत्ययाचा 'वेरपृक्तस्य' या सूत्रानें लोप होत असल्यामुळें व त्या प्रत्ययाचा लोप झाल्यावर 'सू' धातूच शिलक राहत असल्यामुळें, 'यः शिष्यते स लुप्यमानार्थाभिधायी' या वचनान्वयें तो अवशिष्ट 'सू' धातूच 'प्रसविणारी' या कर्तृविशिष्ट क्रियारूप अर्थाचा बोधक होतो व तो धातु असल्यामुळें आणि प्रकृत सूत्रांत 'अधातुः' असा पर्युदास असल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा न होण्याची आपत्ति येते. हें खरें कीं, 'प्रसू' हा लुप्तक्विबन्त शब्द कृदन्त आहे. पण क्विप्प्रत्ययाचा लोप झाला असल्यामुळें, प्रकृति व प्रत्यय यांच्या अर्थाचा एकार्थीभाव होऊन उत्पन्न होणारी प्रशस्तार्थवत्ता 'प्रसू'चे ठिकाणीं नाहीं आणि 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांत 'अर्थवत्' या पदाची अनुवृत्ति केल्यानें प्रकृति व प्रत्यय या दोहोंच्या अर्थाचें एकत्रीकरण होऊन ज्या कृदन्ताचे ठिकाणीं प्रशस्तार्थवत्ता

येते त्यालाच त्या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत असल्यामुळें आणि लुप्तक्विबन्त 'प्रसू' चे ठिकाणीं, प्रत्ययाचा लोप झाल्या-कारणानें, तशा प्रशस्तार्थवत्तेचा अभाव असल्यामुळें, 'प्रसू' याला प्रातिपदिकसंज्ञा न होण्याची व त्यामुळें त्याहून सुबुत्पत्ति न होण्याची आपत्ति येते. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'प्र सू + क्विप्' या अलौकिक प्रक्रियावाक्यांत प्रकृति व प्रत्यय या दोहोंच्या अर्थाचा जो एकार्थीभाव कल्पिला जातो त्या एकार्थी-भावाचा, क्विप्प्रत्ययाचा लोप होऊन अवशिष्ट राहिलेल्या 'प्रसू' चे ठिकाणीं, आरोप केल्यानें त्या आरोपित प्रशस्तार्थवत्ते-मुळें 'प्र सू' हा कृदन्त 'कृत्तद्धित' या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञक ठरण्यांत व त्याहून सुबुत्पत्ति होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं आणि शंकाकाराची शंका अयोग्य ठरते.) 'यदि तु प्रत्ययो न पर्युदस्येत तर्हि सात्पदाद्योः इति सूत्रे सातिग्रहणं व्यर्थं स्यात्' या मनोरमेंतील पंक्तींत, प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पदानें केवळ प्रत्ययाचा देखील पर्युदास करणें आवश्यक आहे याला प्रमाण सांगितलें आहे. 'साति = सात्' हा प्रत्यय प्रातिपदिक मानल्यास त्याहून औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय केला असतां, तो देखील सुबन्त होऊन त्याला पदसंज्ञा होईल (व त्यांतील सकार पदाचा आद्य अवयव ठरेल) व त्यामुळें 'सात्पदाद्योः' या सूत्रांतील 'पदादि' या शब्दानेंच षत्वनिषेध होऊं शकेल आणि त्या सूत्रांतील 'सात्' याचें ग्रहण व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. (या विषयाचें विवरण पूर्वी मनोरमेंत केलेंच आहे.)

शब्दरत्न — सोर्दुर्वारत्वादिति । तस्य च समुदायप्रातिपदिकत्वेन तदवयवत्वाल्लुक् । समुदायसंज्ञा चान्तरङ्गत्वादवयवेभ्यः प्रातिपदि-कत्वात्सुपि सति प्रवर्तते, इति तस्य तदवयवत्वमक्षतम् । पचति, ध्वनतीत्यादौ नावयवानां सा, धातुप्रत्ययान्तपदयोस्तदवयवपरत्वेन तत्र तन्निषेधात् । तस्मादव्युत्पन्नप्रातिपदिकावयवेभ्यस्तदुत्पत्तिरापाद्या ।

धनशब्दस्य धिनोतेर्धनमिति व्युत्पत्तिपक्षे तु वनाद्युदाहरणं बोद्ध्यम् । ध्वनितं चेदं भाष्यकैयटयोः । तस्मान्नलोपाद्यापत्तिर्दोषः । इदमव्ययेभ्य इव तेभ्योऽपि सुप एकवचनाभ्युपगमेन । वस्तुतस्तु तदुत्पत्तिः सत्येव गमके, यथाऽव्ययेभ्य उत्पत्तौ "अव्ययादाप्सुपः" इति गमकम्, नान्यत्र, "एकवचनम्" इति महासंज्ञाकरणात् । प्रकृते तु न तथा गमकम् । अत एव "ङ्याप्–" इति सूत्रे प्रातिपदिकाधिकाराभावे तिङन्तेभ्यस्तदुत्पत्तिमाशङ्क्यैकत्वादीनामुक्तत्वान्नेति समाहितं भाष्ये, त्वद्रीत्यौत्सर्गिकमेकवचनं दुर्वारमेव । अत एवाग्रे भाष्येऽर्थवत्पदस्य दशदाडिमानीत्यादिपदसमुदायो निरर्थको व्यावर्त्यत्वेन प्रदर्शितः । तत्र हि "सुपो धातु" इत्यस्य प्राप्तिरिति तदेवास्य मुख्यं व्यावर्त्यम् । पचतःकल्पमित्यादौ तत्प्रवृत्तौ रूपप्सूत्रस्थं भाष्यं गमकम् । समासग्रहणकृतनियमस्तु अर्थवत्समुदायविषयक इति भाष्ये स्पष्टमिति न तेनास्य व्यावृत्तिरिति दिक् ।

(आतां प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण न केल्यास, 'धन, वन' इत्यादि शब्दांतील प्रत्येक वर्णाला प्रातिपदिकसंज्ञा होईल व त्याहून सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येईल आणि जरी 'धन, वन' इत्यादि शब्दांतील वर्णांचे ठिकाणीं संख्या व कारक यांचा अभाव आहे तरी, 'एकवचनमुत्सर्गतः करिष्यते' या सिद्धान्तान्वयें त्या प्रत्येक वर्णाहून औत्सर्गिक 'सु' प्रत्यय होणें टाळतां येऊं शकणार नाहीं असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें शब्दरत्नकार पुढील पंक्तींत विवरण करितात. 'धन, वन' इत्यादि शब्दांतील प्रत्येक वर्णाला प्रातिपदिकसंज्ञा झाल्यानें त्या प्रत्येक वर्णाहून जो औत्सर्गिक 'सु' प्रत्यय होईल) तो, समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होत असल्यामुळें, त्या समुदायाचा अवयव झाल्याकारणानें त्याचा ('सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें) लुक् होईल. अन्तरङ्गत्वामुळें वर्णरूप अवयवांना प्रथम प्रातिपदिकसंज्ञा होऊन त्यांहून सुबुत्पत्ति झाल्यावर समुदायाचे ठिकाणीं प्रातिपदिकसंज्ञा प्रवृत्त होत असल्यामुळें, प्रत्येक वर्णाहून झालेला 'सु' प्रत्यय समुदायाचा अवयव

ठरण्यांत कांहीं बाध येत नाहीं. ('धन, वन' इत्यादि समुदायांना जर प्रथम प्रातिपदिकसंज्ञा झाली असती व त्यानंतर समुदायांतील वर्णरूप अवयवांना प्रातिपदिकसंज्ञा झाली असती तर, त्या वर्णांहून होणारे विभक्तिप्रत्यय समुदायाचे अवयव ठरले नसते; कारण समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा झाल्यावर त्या विभक्तिप्रत्ययांची उत्पत्ति झाली आहे असें मानावें लागलें असतें आणि त्यामुळें त्या विभक्तिप्रत्ययांचा 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्रानें लुक् होऊं शकला नसता. परंतु समुदायाच्या अपेक्षेनें त्या समुदायांतील वर्णांची प्रथम उपस्थिति होत असून नंतर समुदायाची उपस्थिति होत असल्यामुळें, प्रथमोपस्थित वर्णांना प्रातिपदिकसंज्ञा होणें हें कार्य अन्तरङ्ग ठरतें व नंतर उपस्थित होणाऱ्या समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होणें हें कार्य त्याच्या मानानें बहिरङ्ग ठरतें. त्यामुळें समुदायांतील वर्णांना प्रथम प्रातिपदिकसंज्ञा होऊन त्यांहून सुबुत्पत्ति झाल्यावर अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्यययुक्त वर्णांच्या समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होते आणि अशा रीतीनें वर्णांहून झालेले विभक्तिप्रत्यय देखील समुदायाचे अवयव ठरत असल्यामुळें, 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्रानें त्या विभक्तिप्रत्ययांचा लुक् होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. पण अशा रीतीनें त्या विभक्तिप्रत्ययांचा लुक् होऊन त्यांचें समुदायांत श्रवण होण्याची आपत्ति जरी टळते तरी, प्रत्येक वर्णाला प्रत्ययलक्षणानें जी पदसंज्ञा होते त्यामुळें नलोप, जश्त्व इत्यादि अनिष्ट कार्यें होण्याची जी आपत्ति येते ती टाळतां येऊं शकणार नाहीं. ती आपत्ति टाळण्याकरितां प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण केलें आहे. 'हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'यदि तर्हीमे वर्णा अर्थवन्तोऽर्थवत्कृतानि प्राप्नुवन्ति । कानि ? । अर्थवत्प्रातिपदिकमिति प्रातिपदिकसंज्ञा, प्रातिपदिकादिति स्वाद्युत्पत्तिः, सुबन्तं पदमिति पदसंज्ञा । तत्र को दोषः । पदस्येति नलोपादीनि प्राप्नुवन्ति । धनं वनमिति ।.' पण वर्ण अर्थवान् नसून वर्णसंघात अर्थवान् असल्या-

मुळें, वर दर्शविलेली आपत्ति टळते असें भाष्यकारांनीं पुढें म्हटलें आहे. सारांश प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें, अनर्थक वर्णांना प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं व त्यामुळें सुबुत्पत्ति न झाल्यानें पदसंज्ञा होत नाहीं आणि नलोप होणें इत्यादि सर्व आपत्ति टळतात.) 'पचति, ध्वनति' इत्यादि तिङन्त समुदायांतील वर्णांना प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं; कारण (प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अधातुः, अप्रत्ययः' यांतील) 'धातु' व 'प्रत्यय=प्रत्ययान्त' या शब्दांनीं त्यांच्या अवयवांचे ग्रहण केलें जात असल्यामुळें, त्या निषेधांनींच त्यांच्या वर्णरूप अवयवांना प्रातिपदिकसंज्ञा होण्याचा निषेध होतो. (प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात—'अप्रत्यय इति शक्यमकर्तुम् । कस्मान्न भवति काण्डे कुडचे इति ?। कृत्तद्धितग्रहणं नियमार्थं भविष्यति। कृत्तद्धितान्तस्यैव प्रत्ययान्तस्य प्रातिपदिकसंज्ञा भवति नान्यस्येति'। या भाष्याचा असा अर्थ आहे कीं, प्रकृत सूत्रांतून 'अप्रत्ययः' हें पद गाळलें, म्हणजे प्रत्ययान्ताला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं असा निषेध न केला, तरी चालूं शकतें. पण तो निषेध केला नाहीं तर 'काण्डे, कुडचे' या प्रत्ययान्त पदांना प्रातिपदिकसंज्ञा कां होऊं नये ? त्यांना प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं याचें कारण हें कीं, पुढील सूत्रांत 'कृत्, तद्धित' हे जे शब्द उच्चारले आहेत ते नियमार्थ होतील व नियमाचें स्वरूप असें होईल कीं, प्रकृत सूत्रानें प्रत्ययान्त शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा होणें असेल तर कृत्प्रत्ययान्त किंवा तद्धितप्रत्ययान्त अशाच शब्दांना ती होईल व इतर प्रत्ययान्त शब्दांना ती संज्ञा होणार नाहीं. हा जो वरील भाष्यांत नियम सांगितला आहे त्या नियमान्वयेंच कृत्तद्धितान्तभिन्न इतर प्रत्ययान्त समुदायाला प्रातिपदिकसंज्ञेचा निषेध आपोआपच सिद्ध होत असल्यामुळें, प्रकृत सूत्रांतील 'धातु' व 'प्रत्यय' या पदांनीं त्यांच्या अवयवाचें ग्रहण होतें असें शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे आणि हेंच तात्पर्य सरलाटीकेंतील 'प्रत्ययान्तस्य प्रत्ययस्य वा प्रातिपदिकसंज्ञा चेत् कृदन्तत-

द्धितान्तयोः कृत्तद्धितयोरेव वेति। तथा च समुदायस्य तेनैव व्यावृत्तिसिद्धौ धातुप्रत्ययपदे तदवयवपरे इति तात्पर्यम्' या पंक्तींत विशदरीतीनें सांगितलें आहे. त्यामुळें 'पचति, ध्वनति' या तिङन्त समुदायांतील धातु व प्रत्यय यांचे जे अवयव आहेत त्यांना प्रकृत सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञेचा निषेध होतो.) वरील विवरणावरून हें स्पष्ट होतें कीं, अव्युत्पन्न प्रातिपदिकांच्या अवयवभूत वर्णांहूनच सुबु-त्पत्ति होण्याची आपत्ति देतां येते (कारण वर सांगितल्याप्रमाणें धातु व प्रत्ययान्त या शब्दांनीं तदवयवभूत वर्णांचें ग्रहण होतें व त्या वर्णांना प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं असें मानलें असल्यामुळें, ज्यांत धातु नाहीं व जो प्रत्ययान्तहि नाहीं अशा अव्युत्पन्न प्रातिपदिकाच्याच वर्णरूप अवयवांना, प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' हें पद नसल्यास, प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते असें म्हणतां येतें हें उघड आहे.) 'धिनोतीति धनम्' अशा रीतीनें ('धिवि प्रीणने' या धातूहून औणादिक प्रत्यय होऊन) 'धन' हें प्रातिपदिक सिद्ध झालें आहे व तें व्युत्पन्न प्रातिपदिक आहे असें मानल्यास, (प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' हें पद नसल्यास, ज्या शब्दांतील वर्णांना प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते ते शब्द) 'वन' इत्यादि अव्युत्पन्न प्रातिपदिकें हींच उदाहरणें होत असें समजावें. (यास्कानें निरुक्तांत 'धिनोतीति धनम्' अशी 'धन' या शब्दाची व्युत्पत्ति दिली आहे. यास्काच्या मतें 'धिवि' या इदित् धातूहून औणादिक प्रत्यय होऊन 'धन' हा शब्द सिद्ध झाला आहे. 'वन' या शब्दाची निरुक्तांत कोठेंहि व्युत्पत्ति दिली नाहीं. म्हणून 'धन' हें व्युत्पन्न प्रातिपदिक ठरत असून 'वन' हें अव्युत्पन्न प्रातिपदिक ठरतें आणि ज्याअर्थीं अव्यु-त्पन्न प्रातिपदिकांतील वर्णांना, प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' हें पद नसल्यास, प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते असें वर म्हटलें आहे त्याअर्थीं 'वन' इत्यादि अव्युत्पन्न प्रातिपदिकें तशा प्रकारची आपत्ति येण्याचीं उदाहरणें होत.) भाष्यकार व कैयट यांनीं (अव्युत्पन्न प्रातिपदिकें हींच उदाहरणें देऊन) हें ध्वनित केलें आहे,

म्हणजे अव्युत्पन्न प्रातिपदिकांतील वर्णांनाच प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते हें ध्वनित केलें आहे. म्हणून (प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' हें पद नसल्यास, अव्युत्पन्न प्रातिपदिकांतील वर्णांहून होणाऱ्या 'सु' प्रत्ययाचें श्रवण होण्याची आपत्ति न येतां) नलोप वगैरे होण्याचीच आपत्ति येते (कारण अव्युत्पन्न प्रातिपदिकांतील वर्णांहून सुबुत्पत्ति केली तरी, 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें त्या विभक्तिप्रत्ययांचा लुक् होणारच.) ज्याप्रमाणें (संख्या किंवा कारक इत्यादिकांचा ज्यांहून बोध होत नाहीं अशा) अव्ययांहून एकवचनाचा औत्सर्गिक प्रत्यय होतो असें मानलें आहे. त्याचप्रमाणें अव्युत्पन्न प्रातिपदिकांतील संख्याकारक-बोधरहित वर्णांहून देखील औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय होईल असें गृहीत धरून त्यांहून तसा प्रत्यय होण्याची आपत्ति (मनोरमेंत) दिली आहे. वास्तविक कांहीं गमक–ज्ञापक–असलें तरच (संख्या-कारकबोधरहित शब्दाहून) सुबुत्पत्ति करतां येते. उदाहरणार्थ (संख्याकारकबोधरहित) अव्ययाहून सुबुत्पत्ति होते याचें 'अव्य-यादाप्सुपः' सू. ४५२ हें सूत्र गमक–ज्ञापक–आहे (कारण अव्ययाहून होणाऱ्या विभक्तिप्रत्ययाचा लुक् होतो असें त्या सूत्रांत सांगितलें असल्यामुळें, त्यावरूनच हा निष्कर्ष निघतो कीं, अव्ययाहून सुबुत्पत्ति होते. संख्याकारकबोधरहित) इतर शब्दांहून (देखील) सुबुत्पत्ति होते याचें तें सूत्र ज्ञापक ठरत नाहीं. (त्यामुळें अव्यय खेरीज करून इतर संख्याकारकबोधरहित शब्दांहून सुबुत्पत्ति करतां येत नाहीं) कारण 'एकवचन' अशी अन्वर्थक संज्ञा केली आहे. ('एकः उच्यते अनेन इति एकवचनम्' अशी 'एकवचन' या शब्दाची व्युत्पत्ति आहे. या अन्वर्थक व्युत्पत्तीवरूनच हें सिद्ध होतें कीं, जेथें एकत्वरूप संख्येचा बोध करणें आहे तेथेंच एकवचनाचा प्रत्यय करतां येतो आणि हेंच 'द्व्येकयोर्द्विवचनैकवचने' सू. १८६ या सूत्रांत सांगितलें आहे. म्हणून ज्या शब्दाहून संख्येचा मुळींच बोध होत नाहीं त्याहून एकवचनाचा प्रत्यय कसा होऊं शकणार? तशा शब्दाहून

देखील एकवचनाचा प्रत्यय करतां येतो असें मानल्यास, 'एकवचन' हें अन्वर्थक संज्ञाकरण व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. अव्ययाहून औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय करतां येतो याचें जसें पाणिनीय शास्त्रांत 'अव्ययादाप्सुपः' हें ज्ञापक आढळतें तशा प्रकाराचें ज्ञापक प्रकृत विषया-संबंधानें, म्हणजे अव्युत्पन्न प्रातिपदिकांतील प्रत्येक वर्णाहून औत्स-र्गिक एकवचनाचा प्रत्यय करतां येतो या विषयासंबंधानें, पाणिनीय शास्त्रांत कोठेंहि आढळत नाहीं. असें आहे म्हणूनच, म्हणजे कांहीं तरी ज्ञापक असल्याशिवाय संख्याकारकबोधरहित शब्दाहून औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय करतां येत नसल्यामुळेंच, 'ङ्याप्प्रातिपदिकात्' ४. १. १ या अधिकारसूत्रांत 'प्रातिपदिक' असा अधिकार नसल्यास तिङन्ताहून देखील सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येईल अशी त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं शंका उपस्थित करून त्या शंकेचें अशा रीतीनें निराकरण केलें आहे कीं, तिङ्प्रत्ययानें एकत्व इत्यादि अर्थांचा बोध करून दिला असल्यामुळें ('उक्तार्थानाम-प्रयोगः' या न्यायान्वयें) तिङन्ताहून सुबुत्पत्ति होऊं शकत नाहीं. (त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'ङ्याप्प्रातिपदिक ग्रहणं किमर्थम् ?। ङ्याप्प्रातिपदिकात्स्वादयो यथा स्युः, धातोर्मा भूवन्निति। नैतदस्ति प्रयोजनम्। धातोस्तव्यदादयो विधीयन्ते, तेऽपवादत्वाद्बाधका भविष्यन्ति। तिङन्तात्तर्हि मा भूवन्निति। एक-त्वादिष्वर्थेषु स्वादयो विधीयन्ते; ते चाऽत्र तिङा उक्ता एकत्वादय इति कृत्वा उक्तार्थत्वान्न भविष्यन्ति।') तुमच्या--दीक्षितांच्या–म्हणण्याप्रमाणें ('ङ्याप्प्रातिपदिकात्' या सूत्रांतून 'प्रातिपदिकात्' हें पद गाळल्यास, तिङन्ताहून देखील) औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय होण्याची आपत्ति टाळतां येणें अशक्य आहे. (गमक नसलें तरी अव्युत्पन्न प्रातिपदिकांतील अनर्थक वर्णाहून, प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' हें पद नसल्यास, औत्सर्गिक 'सु' प्रत्यय होण्याची आपत्ति येते असें जें दीक्षितांचें म्हणणें आहे तें बरोबर मानल्यास, 'ङ्याप्प्रातिपदिकात्' या सूत्रांतून 'प्रातिपदिकात्' हें पद गाळलें

तर, तिङन्ताहून देखील औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय होणें त्यांना टाळतां येणें अशक्य आहे; कारण गमक नसलें तरी औत्सर्गिक एकवचनोत्पत्ति होतेच असें त्यांच्या म्हणण्यावरून स्पष्ट होतें. पण तिङन्ताहून देखील तसा एकवचनाचा प्रत्यय होण्याची खरोखरच आपत्ति येत असती तर भाष्यकारांनीं 'ङ्या-प्प्रातिपदिकात्' या सूत्रावरील भाष्यांत तसें म्हटलें असतें. पण तसें भाष्यकारांनीं न म्हणतां त्या आपत्तीचें इतर रीतीनें निवारण केलें असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, संख्याकारकबोधरहित शब्दाहून, कांहीं तरी गमक असल्याशिवाय, औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय करतां येत नाहीं. म्हणून अव्युत्पन्न प्रातिपदिकांतील वर्णांहून, प्रकृत सूत्रांतून 'अर्थवत्' हें पद गाळल्यास, औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय होण्याची आपत्ति येते असें जें दीक्षितांनीं म्हटलें आहे तें बरोबर मानतां येत नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे,) म्हणूनच—म्हणजे प्रातिपदिकांतील अवयवभूत अनर्थक वर्णांना प्रातिपदिकसंज्ञा झाली तरी, गमक उपलब्ध नसल्यामुळें, त्यांहून सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येत नाहीं असें असल्यामुळेंच—प्रकृत सूत्रावरील पुढील भाष्यांत भाष्यकारांनीं 'दश दाडिमानि' इत्यादि अनर्थक पदसमुदायाला प्रातिपदिकसंज्ञा न व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण केलें आहे असें म्हटलें आहे. त्या अनर्थक पदसमुदायाला प्रातिपदिकसंज्ञा झाल्यास, 'सुपो धातुप्राति-पदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें प्रत्येक पदापुढील विभक्तिप्रत्ययाचा लुक् होण्याची आपत्ति येते हेंच वास्तविक 'अर्थवद्'ग्रहणाचें मुख्य व्यावर्त्य आहे, म्हणजे अशा निरर्थक पदसमुदायांतील पदांपुढें असणाऱ्या विभक्तिप्रत्ययाचा लुक् न व्हावा हेंच प्रकृत सूत्रांतील 'अर्थवत्' या पदाच्या ग्रहणाचें मुख्य प्रयोजन आहे. (प्रकृत सूत्रावरील भाष्यांत 'अर्थवत्यनेकपदप्रसङ्गः' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात—'अर्थवदिति प्रातिपदिकसञ्ज्ञायामनेकस्यापि पदस्य प्रातिपदिकसञ्ज्ञा

प्राप्नोति—दश दाडिमानि, षडपूपाः, कुण्डमजाजिनं पललपिण्डः अधरोरुकमेतत्कुमार्याः स्फैयकृतस्य पिता प्रतिशीन इति । समुदायोऽत्रानर्थकः।' या भाष्यांत ज्या 'दश दाडिमानि' इत्यादि पद-समुदायाचा निर्देश केला आहे त्यांतील प्रत्येक पद जरी अर्थवान् आहे व 'दश दाडिमानि, षडपूपाः' इत्यादि लहान वाक्यें अर्थवान् आहेत तरी त्या वाक्यांचा व इतर पदांचा परस्परांशीं अन्वयरूप संबंध नसल्यामुळें, वरील समुदाय अर्थवान् ठरत नाहीं. त्यामुळें प्रकृत सूत्रांतून 'अर्थवत्' हें पद गाळल्यास, वरील अनर्थक समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते; कारण हा अनर्थक समुदाय धातु, प्रत्यय किंवा प्रत्ययान्त नाहीं. समुदायांतील प्रत्येक पद जरी प्रत्ययान्त आहे तरी समुदायाहून प्रत्यय झाला नसल्यामुळें, समुदाय प्रत्ययान्त ठरत नाहीं. या संबंधानें कैयटानें 'प्रतिपदं तु नैव संज्ञा प्राप्नोत्यप्रत्यय इति निषेधात् । समुदायस्य तु निषेधो न प्रवर्तते, प्रत्ययग्रहणे यस्मात्स विहित इति वचनात्, समुदायाच्च प्रत्ययस्याविधानात् प्रत्ययान्तत्वाभावात्' असें म्हटलें आहे. सारांश वरील अनर्थक समुदाय धातु,प्रत्यय व प्रत्ययान्त यांच्या कक्षेंत येत नसल्यामुळें, प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' हें पद नसल्यास, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते व त्या समुदायाला प्राति-पदिकसंज्ञा झाल्यास, गमक नसल्यामुळें, त्या समुदायाहून जरी औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय होऊं शकत नाहीं तरी, 'सुपो धातु-प्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्राची प्रवृत्ति होऊन प्रत्येक पदापुढील विभक्ति प्रत्ययाचा लुक् होण्याची आपत्ति येते. अशा अनर्थक पदसमुदायाला प्रातिपदिकसंज्ञा न व्हावी व त्या समुदायांतील प्रत्येक पदापुढील विभक्तिप्रत्ययाचा लुक् होण्याची आपत्ति न यावी हें वास्तविक प्रकृत सूत्रांतील 'अर्थवत्' या पदाच्या ग्रहणाचें प्रयोजन असून, 'धन, वन' इत्यादि शब्दांतील अनर्थक वर्णांना प्रातिपदिक-संज्ञा न व्हावी हें त्या पदाच्या ग्रहणाचें प्रयोजन नाहीं; कारण त्या अनर्थक वर्णांना प्रातिपदिकसंज्ञा झाली तरी, वर सांगितल्याप्रमाणें

गमकाच्या अभावीं, त्यांहून सुबुत्पत्ति होऊं शकत नसल्यामुळें, पदसंज्ञा होण्याची व तन्निमित्तक नलोप वगैरे अनिष्ट कार्यें होण्याची आपत्ति येत नाहीं. मग असें जर आहे तर 'अर्थवद्ग्रहणं किमर्थम् ?। अर्थवदिति व्यपदेशाय । वर्णानां मा भूदिति । किं च स्यात् ?। वनं धनमिति नलोपः प्रातिपदिकान्तस्येति नलोपः प्रसज्येत' या भाष्याची वाट काय ? हें भाष्य तर शब्दरत्नांतील वरील विधानाविरुद्ध आहे. याचें उत्तर हेंच कीं, पूर्व भाष्य, म्हणजे 'अर्थवद्ग्रहणं किमर्थम्' इत्यादि भाष्य, एकदेशीची उक्ति असून, उत्तर भाष्य हेंच सिद्धान्त-भाष्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'पचतःकल्पम्' इत्यादि स्थलीं जी सुबुत्पत्ति होते तिचें 'प्रशंसायां रूपप्' ५. ३. ६६ या सूत्रावरील भाष्य ज्ञापक आहे. (ज्या शब्दानें एकत्वादि संख्येचा बोध होत नाहीं अशा शब्दाहून, कांहीं तरी गमक असल्याशिवाय, सुबुत्पत्ति करतां येत नाहीं असें वर म्हटलें आहे. यावर शंकाकार अशी शंका करतो कीं. 'पचतिरूपम् पचतोरूपम्' इत्यादि स्थलीं 'क्रियाप्रधानमाख्यातम्' या वचनान्वयें लिङ्गवचनरहित क्रिया-प्रधान 'पचति, पचतः' या शब्दांहून स्वार्थे 'रूपप्' प्रत्यय केला असतां, रूपप्प्रत्ययान्त शब्द लिङ्गवचनादिकांचा बोधक होऊं शकत नाहीं. तरी पण कांहीं गमक नसून देखील त्यांहून जसा नपुंसकाच्या एकवचनाचा 'अम्' प्रत्यय होतो त्याचप्रमाणें 'धनम्, वनम्' इत्यादि समुदायांतील वर्णांहून एकवचनाचा औत्सर्गिक 'सु' प्रत्यय होऊं शकतो व तसा प्रत्यय होण्याची दीक्षितांनीं जी आपत्ति मनोरमेंत दर्शविली आहे ती यथार्थ आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'प्रशंसायां रूपप्' सू. २०२१ या सूत्रानें तिङन्ताहून 'रूपप्' प्रत्यय झाला असतां त्या रूपप्प्रत्ययान्त शब्दाहून जो नपुंसकाच्या प्रथमेच्या एकवचनाचा प्रत्यय होतो त्याला त्या सूत्रावरील भाष्यच प्रमाण आहे. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात– 'यदि तर्ह्येका क्रिया द्विवचनबहुवचनानि न सिध्यन्ति–पचतः पचन्तीति । नैतानि क्रियापेक्षाणि किं तर्हि ? । साधनापेक्षाणि । इहापि तर्हि प्राप्नुवन्ति

[पचतिरूपं] पचतोरूपं पचन्तिरूपमिति । तिङोक्तत्वात्तस्याऽभि-सम्बन्धस्य न भविष्यति । एकवचनमपि तर्हि न प्राप्नोति । समयाद्भविष्यति । द्विवचनबहुवचनान्यपि तर्हि समयात्प्राप्नुवन्ति । एवं तर्ह्येकवचनमुत्सर्गतः करिष्यते--तस्य द्विबव्होरर्थयोर्द्विवचन-बहुवचने अपवादौ भविष्यतः ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, जर क्रिया एकच आहे तर 'पचतः पचन्ति' इत्यादि द्विवचनाचे व बहुवचनाचे प्रयोग कसे होतात ? या प्रश्नाचें उत्तर हें आहे कीं, ते प्रयोग क्रियागतसंख्येच्या योगें होत नसून कर्तृकारकगत संख्येच्या अपेक्षेनें त्या प्रयोगांत वचनभेद केला जातो. मग असें आहे तर, 'पचतोरूपम्, पचन्तिरूपम्' या स्थलीं 'रूपे,रूपाणि' असा द्विवचनाचा व बहुवचनाचा प्रयोग कां होऊं नये ? तसा प्रयोग होत नाहीं याचें कारण हें कीं, तिङ्प्रत्ययानें वचनाचें अभिधान केलें असल्यामुळें व 'उक्तार्थानामप्रयोगः' असा न्याय असल्यामुळें, 'रूपे, रूपाणि' असा प्रयोग होत नाहीं. मग 'पचति-रूपम्' या स्थलीं 'तिप्' या एकवचनाच्या प्रत्ययानें एकवचनाचें अभिधान केलें असल्यामुळें, वरील न्यायान्वयें 'रूपम्' असा एकवचनाचा प्रयोग देखील होऊं नये. 'प्रत्ययः, परश्च' सू. १८०, १८१ अशीं सूत्रें असल्यामुळें व 'न केवला प्रकृतिः प्रयोक्तव्या नापि केवलः प्रत्ययः' असा नियम असल्यामुळें, एकवचनाचा प्रयोग होतो. मग त्याच नियमान्वयें द्विवचनाचे व बहुवचनाचे प्रयोग देखील करतां येऊं शकतात. असेंच जर म्हणणें आहे तर मग 'द्वेकयोर्द्विवचनैकवचने' सू. १८६ असें सूत्र पठित न करितां 'द्वयोर्द्विवचनम्,' 'बहुषु बहुवचनम्' अशीं सूत्रें पठित करावीं. तशीं सूत्रें पठित केल्यानें संख्यानिरपेक्ष एकवचनाचा प्रयोग उत्सर्गरूपानें करतां येतो व द्विवचन आणि बहुवचन त्याचे अपवाद होतील. सारांश या भाष्या-मध्यें 'पचतोरूपम्, पचन्तिरूपम्' इत्यादि स्थलीं 'अम्' हा एक-वचनाचा प्रत्यय करतां येतो असें भाष्यकारांनीं म्हटलें असल्यामुळें, त्या भाष्याच्या गमकरूप आधारें वास्तविक तसा प्रत्यय केला जातो असें

शब्दरत्नकारांचें म्हणणें आहे.) अर्थवान् पदसमुदायाला प्रातिपदिक-संज्ञा होऊं नये याकरितां 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांत 'समास' या शब्दाचें ग्रहण नियमार्थ केलें आहे असें प्रकृत सूत्रावरील भाष्यांत स्पष्ट सांगितलें असल्यामुळें, 'दश दाडिमानि' इत्यादि अनर्थक पदसमुदायाची त्या नियमानें व्यावृत्ति होऊं शकत नाहीं. (सारांश तशा अनर्थक पदसमुदायाला जी प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते ती 'कृत्तद्धित' या सूत्रांतील 'समास' ग्रहणानें टाळतां येऊं शकत नाहीं; कारण अर्थवान् पदसमुदायाला जी प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते ती त्या 'समास' ग्रहणानें टाळतां येते. पण 'दश दाडिमानि' इत्यादि परस्परान्वयरहित पदसमुदाय अर्थवान् नसल्यामुळें, त्याला जी प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते ती प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळेंच, टाळतां येऊं शकते.)

शब्दरत्न— यद्यप्यर्थवत्त्वमिति । व्याख्यानादर्थवत्त्वेनैव सादृश्यं गृह्यत इति भावः । उक्तमिति । एतेनेदमुक्तमेव पुनर्दाढर्चायोच्यत इति सूचितम् । भाष्ये इति । एवं हि तत्र भाष्यम्–"अर्थवदिति वर्त्तते कृत्तद्धितान्तं चैवार्थवत्, न केवलाः कृतस्तद्धिता वेति "कृत्तद्धित– इति सूत्रेऽन्तग्रहणं न कार्यम्" इति । "अर्थवद्ग्रहणानुवृत्ति-सामर्थ्यादेव चेदृशार्थलाभः" इति कैयटः । समुदायार्थारोपादिति । तेन तन्मात्रस्य क्रियावाचित्वनिबन्धनधातुत्वसिद्धिरिति भावः । तत् = क्रियावाचकत्वम् । तत्तदर्थविभागश्चेति । तस्य तस्येति कृतद्विर्वच-नेन षष्ठीसमासे, स सोऽर्थविभाग इति कर्मधारये वा विभक्तिलुकि इदं साधु । एतेनान्यान्यप्रादुर्भावादिति "अपादाने पञ्चमी" इति सूत्रस्थ-भाष्यप्रयोगोऽपि व्याख्यातः। सुबन्तत्वमपि द्विःप्रयोगपक्ष इव स्थाने द्विर्व-चनपक्षेऽप्याद्यान्यशब्दे प्रकृतित्वबुद्धयाऽन्त्यस्यशब्दे प्रत्ययत्वबुद्ध्या सूपपादम् । सर्व इति । धातूपसर्गविभागः, वृत्तिष्वेकार्थीभावश्चै-वमेवेति भावः । स्फोट एवेति । पदरूपो वाक्यरूपो वेत्यर्थः । लोकानां तत्रैव शक्तिग्रहेण बोधादिति भावः । अत एव तस्य परमार्थत्वम्, लोके

बोधजनकत्वात् । शास्त्रेण प्रकृतिप्रत्ययविभागव्युत्पादनेन विशिष्ट-पदस्येव तत्तदर्थबोधनद्वारा विशिष्टे पदे विशिष्टार्थबोधकत्वमेव बोध्यते । 'उपलालनाः' इत्यस्य भवन्तीति शेषः । न तु वास्तवा इति भावस्तदाह–असत्ये इति । आरोपिते इत्यर्थः । लोकानान्त-त्तच्छब्दजन्यबोधानुपयोगित्वात्तत्त्वम् । सत्यं–विशिष्टशक्त्या बोधकं पदादीत्यर्थः । स्युरिति । अधिजगे, अध्यगीष्टेत्यादौ । अर्थवत्त्वादिति। आरोपितार्थवत्वादित्यर्थः । शास्त्रकृत् = भाष्यकृदादिः । सम्मतेति । तद्धितविषये इति शेषः । औत्सर्गिकप्रवृत्तौ हेतुमाह–इष्टस्थलेऽपीति । चः पञ्चम्यर्थहेतुत्वानुवादकः । कथञ्चिदिति । अनेन तदनावश्यक-त्वमेवेति ध्वनयति । ननूत्तरत्र चरितार्थस्य कथं ज्ञापकत्वमत आह–उत्तरार्थस्यापीति । "इकोचि" इति सूत्रेऽज्ग्रहणस्योत्तरार्थतामुक्त्वा भाष्ये उक्तम्–इह किं चित् 'त्रपो' इति । "न लुमता" इति निषेधानित्यत्वज्ञापनद्वारा 'त्रपो' इत्यत्र गुणः फलमिति तदर्थः । इत्थं सतीति । लघुना ऽनेनैवानित्यत्वज्ञापनमाश्रित्य न्यायानुसरणेन तयोः प्रत्याख्यानसम्भव इति भावः ।

'यद्यप्यर्थवत्वं लभ्यते' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, येथें व्याख्यानामुळें अर्थवत्तारूप सादृश्याचें ग्रहण केलें जातें. (प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' हा शब्द नसला तरी 'अधातुः, अप्रत्ययः' या पर्युदासांच्या सामर्थ्यानें 'नञिवयुक्तम्' या परिभाषान्वयें अर्थवान् शब्दांनाच प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकते असें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे व त्याचें कारण हें कीं, धातुप्रत्ययभिन्न पण धातुप्रत्ययसदृश असें इतर अर्थवान् शब्दच असू शकतात, व येथें इतर प्रकारचें सादृश्य न घेतां अर्थवत्तारूप सादृश्यच घेतलें आहे याचें कारण शब्दरत्नकार असें देतात कीं, वार्तिककार व भाष्यकार यांनीं जें व्याख्यान केलें आहे त्या व्याख्या-नान्वयें अर्थवत्तारूप सादृश्यच येथें घेतलें जाऊं शकतें. सर्व निपातांचे ठिकाणीं निपातत्व हा साधारण धर्म जरी आहे तरी सर्व निपात अर्थवान् नसून कांहीं निपात अर्थरहित आहेत व तशा अनर्थक

निपातांना देखील प्रातिपदिकसंज्ञा व्हावी व ती झाल्यानें त्यांहून सुबुत्पत्ति होऊन पदसंज्ञा झाली असतां, पदसंज्ञेच्या निमित्तामुळें 'तिङ्ङतिङः' सू. ३९३५ इत्यादि सूत्रांनीं होणारीं कार्यें व्हावीं याकरितां वार्तिककारानें प्रकृत सूत्रावर 'निपातस्यानर्थकस्य प्रातिपदिकत्वम्' हें वार्तिक पठित केलें आहे. या वार्तिकावरून हें स्पष्ट होतें कीं, प्रातिपदिकसंज्ञा होण्यास अर्थवत्ता असणें आवश्यक आहे. म्हणून 'अधातुः, अप्रत्ययः' या पर्युदासांनीं जर इतर प्रकारच्या सादृश्याचें ग्रहण केलें असतें तर इष्ट प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकली नसती. ती व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांतील पर्युदासांनीं वरील वार्तिकाच्या व भाष्यकारांनीं जें त्याचें व्याख्यान केलें आहे त्याच्या आधारें अर्थवत्तारूप सादृश्याचेंच ग्रहण केलें जातें असें शब्दरत्नकारांचें म्हणणें आहे. आतां प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण, त्याची उत्तर सूत्रांत अनुवृत्ति व्हावी याकरितां, केलें आहे असे पूर्वीं मनोरमेंत सांगितलें असून देखील) 'उत्तरार्थं तदित्युक्तम्' असें जें मनोरमेंत पुन्हा म्हटलें आहे त्यावरून दीक्षित हें सुचवितात कीं, जरी हें पूर्वीं सांगितलें आहे तरी हेंच म्हणणें योग्य आहे याचें दृढीकरण व्हावें, म्हणजे वाचकांच्या मनावर हें पूर्णपणें ठसावें, याकरितां त्याची पुनरावृत्ति केली आहे. 'सुप्तिङन्त-मिति सूत्रे भाष्ये ध्वनितम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं असें म्हटलें आहे कीं, 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांत 'अर्थवत्' या पदाची अनुवृत्ति आहे; कृदन्त व तद्धितान्त हेच अर्थवान् आहेत, केवळ कृत्प्रत्यय किंवा तद्धितप्रत्यय अर्थवान् नाहींत आणि त्यामुळें 'कृत्तद्धित' या सूत्रांत 'अन्त' या शब्दाचें ग्रहण करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. त्या भाष्याच्या वृत्तींत कैयटानें असें म्हटलें आहे कीं, 'कृत्तद्धित-समासाश्च' या सूत्रांत 'अर्थवत्' या पदाची अनुवृत्ति होत असल्या-मुळें, त्या अनुवृत्तीच्या सामर्थ्यानें, भाष्यांत जसा वर अर्थ सांगितला आहे तसा अर्थ निष्पन्न होतो. (या भाष्यावरून हें स्पष्ट होतें

कीं, प्रकृत सूत्रांतून 'अर्थवत्' या पदाची 'कृत्तद्धित' या उत्तर सूत्रांत अनुवृत्ति होते.) 'अवयवे समुदायार्थारोपात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('अधि+इ' या समुदायाच्या अर्थाचा 'इ' या अवयवाचे ठिकाणीं आरोप केल्यानें) क्रियावाचकत्वरूप हेतूमुळें क्रियावाचक शब्दाला होणारी धातुसंज्ञा 'इ' याला होते. 'आरोपितं तदिति चेत्' या मनोर-मेच्या पंक्तींतील 'तत्' या पदाचा 'क्रियावाचकत्वम्' असा अर्थ आहे. 'तत्तदर्थविभागश्च' असें जें मनोरमेंत सामासिक पद घातलें आहे तें, ('नित्यवीप्सयोः' सू. २१४० या सूत्रानें) 'तस्य तस्य' असें द्विर्वचन करून 'अर्थः' या पदाशीं षष्ठीतत्पुरुषसमास केल्यानें किंवा 'सः सः' असें द्विर्वचन करून 'अर्थविभागः' या पदाशीं कर्मधारयसमास केल्यानें व अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा ('सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें) लुक् केल्यानें, सिद्ध होतें. सिद्ध होतें. 'अपादाने पञ्चमी' सू. २–३–२८ या सूत्रावरील भाष्यांत 'अन्यान्यप्रादुर्भावात्' असा जो प्रयोग केला आहे त्याचें देखील वर सांगितल्याप्रमाणेंच समर्थन करतां येतें. (वीप्सा गम्यमान असतांना 'नित्यवीप्सयोः' या सूत्रानें पदाचें द्विर्वचन होऊं शकतें तरी, 'कर्मव्यतिहारे सर्वनाम्नो द्वे वाच्ये, समासवच्च बहुलम्'–सू. २१४७ वरील वार्तिक–हें वार्तिक असल्यामुळें, क्रिया-विनिमयरूप अर्थ गम्यमान असतांनाच सर्वनामाचें द्विर्वचन करतां येतें व द्विर्वचन केलेल्या त्या सर्वनामपदांचा समास होऊं शकतो. क्रियाविनिमयरूप अर्थ गम्यमान नसून देखील 'तत्तदर्थविभागः' किंवा 'अन्यान्यप्रादुर्भावात्' या स्थलीं सर्वनामाचें जें द्विर्वचन करून द्विवर्चन केलेल्या पदांचा जो समास केला आहे तसें करणें वरील वार्तिका-विरूद्ध आहे अशी शंकाकाराची शंका आहे. या शंकेवर 'अपादाने पञ्चमी' या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत कैयटानें 'भाष्यकारवचन-प्रामाण्यादन्यान्यशब्दस्य साधुत्वं द्रष्टव्यम्' एवढेंच उत्तर दिलें आहे. याचें स्पष्टीकरण करितांना उद्योतकारांनीं असें म्हटलें आहे

कीं, सत्यपि द्वित्वे विभक्त्यन्तस्यैव द्वित्वापत्तेः कर्मव्यतिहाराऽभावेन समासवद्भावाऽप्राप्तेरेकशेषेण बाधाच्च द्वन्द्वाऽप्राप्तौ कथमन्यान्ये-तीत्यत आह–भाष्यकारेति । तत्प्रामाण्यात्कर्मव्यतिहाराऽभावेपि बहुल-ग्रहणात्क्वचित्समासवद्भाव इत्यर्थः।' त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे कीं, 'सर्वस्य द्वे' या अधिकारांत पठित असलेल्या 'नित्यवीप्सयोः' या सूत्रानें विभक्त्यन्त पदाचेंच द्विर्वचन करतां येतें; पण प्रकृत स्थलीं क्रियाविनिमयरूप अर्थ गम्यमान नसल्यामुळें त्या विभक्त्यन्त पदांचा समास होऊं शकत नाहीं व 'सरूपाणा-मेकशेषः' सू. १८८ या एकशेषविधायक सूत्रानें द्वन्द्वाचा बाध केला असल्यामुळें द्वन्द्वसमास देखील होऊं शकत नाहीं. तथापि 'अन्यान्यप्रादुर्भावात्' या भाष्यप्रयोगावरून हें सिद्ध होतें कीं, वरील वार्तिकांत 'बहुलम्' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें त्या शब्दाच्या सामर्थ्यानें, क्वचित् स्थलीं क्रियाविनिमयरूप अर्थ गम्यमान नसून देखील सर्वनामाचें द्विर्वचन होतें व समासवद्भाव होतो आणि त्यामुळें 'तत्तदर्थविभागः, अन्यान्यप्रादुर्भावात्' हे प्रयोग साधु ठरतात, आणि शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा देखील हाच आशय आहे.) ज्याप्रमाणें द्विःप्रयोगपक्षांत आद्य 'अन्य' शब्द प्रकृति मानून व द्वितीय 'अन्य' शब्दापुढें असलेला 'स्य' प्रत्यय हा प्रत्यय मानून 'अन्यस्य अन्यस्य' या समुदायाला सुबन्त मानतां येतें त्याचप्रमाणें स्थाने द्विर्वचनपक्षांत देखील त्याच रीतीनें समुदा-याला सुबन्त मानतां येतें. ('सर्वस्य द्वे' या अधिकारसूत्रानें होणाऱ्या पदद्वित्वासंबंधानें द्विःप्रयोग व स्थाने द्विर्वचन असे दोन पक्ष आहेत. प्रथम पक्ष हा कीं, तेंच पद दोनदां उच्चारलें जातें व हाच द्विःप्रयोगपक्ष होय. दुसरा पक्ष हा कीं, एक पदाचे जागीं दोन पदांचा आदेश होतो व यालाच स्थाने द्विर्वचनपक्ष म्हणतात. प्रथम पक्षांत 'अन्यस्य' हें षष्ठ्यन्त पद दोनदां उच्चारलें असल्या-मुळें दोन्ही 'अन्यस्य' हीं पदें सुबन्त ठरतात. पण 'अन्यस्य अन्यस्य' हा समुदाय सुबन्त ठरत नाहीं. प्रथम 'अन्य' शब्द प्रकृति आहे

च द्वितीय 'अन्य' शब्दापुढील 'स्य' प्रत्यय हा प्रत्यय आहे असें मानल्यानें 'अन्यस्य अन्यस्य' हा समुदाय सुबन्त ठरतो व या सुबन्त समुदायाचा 'प्रादुर्भावः' या शब्दाशीं 'सुबन्तं सुबन्तेन समस्यते' या वचनान्वयें षष्ठीतत्पुरुषसमास होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं आणि 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्रानें प्रत्येक पदापुढील विभक्तिप्रत्ययाचा लुक् होऊन 'अन्यान्यप्रादुर्भावः' असें रूप सिद्ध होतें. द्वितीय पक्षांत, म्हणजे स्थाने द्विर्वचनपक्षांत, 'अन्यस्य' या पदाचे जागीं 'अन्यस्य अन्यस्य' असा आदेश होतो असें मानलें असल्यामुळें व 'अन्यस्य' हा स्थानी सुबन्त असल्यामुळें, 'अन्यस्य अन्यस्य' हा समुदायरूप आदेश स्थानिवद्भावानें सुबन्त ठरण्यांत कांहीं अडचण येत नाहीं व त्या सुबन्त समुदायाचा 'प्रादुर्भावः' या सुबन्ताशीं षष्ठीतत्पुरुषसमास होऊं शकतो. पण या पक्षांत अशी अडचण येते कीं, प्रथम 'अन्य' शब्दापुढील 'स्य' हा आदेशावयव ठरत असून प्रत्यय मानतां येऊं शकत नसल्यामुळें, 'सुपो धातु-प्रातिपदिकयोः' या सूत्रानें त्याचा लुक् कसा व्हावा ? या प्रश्नाचें उत्तर हें आहे कीं, 'अन्यस्य' याचे जागीं झालेल्या 'अन्यस्य अन्यस्य' या आदेशांत प्रकृतिप्रत्ययभाव अस्तमित, म्हणजे नाहींसा, झाला नसून, कायम आहे असें 'अनस्तमितावयवभेदस्यैवादेशत्वम्' या सिद्धान्तान्वयें मानल्यानें प्रथम 'अन्य' शब्दापुढील 'स्य' हा प्रत्यय ठरून त्याचा देखील लुक् होण्यांत कांही अडचण येत नाहीं.) मनोरमेंत 'सर्वः कल्पित एव' असें जें म्हटलें आहे त्यांतील 'सर्वः' या शब्दाचा धातूपसर्गविभाग व वृत्तींत होणारा एकार्थी-भाव हाही सर्व कल्पितच आहे असा अर्थ आहे. मनोरमेंत 'स्फोट एव अर्थवान्' असें जें म्हटले आहे त्यांतील 'स्फोटः' या शब्दानें पदरूप किंवा वाक्यरूप स्फोटाचें ग्रहण होतें; कारण लोकांना पदा-पासून किंवा वाक्यापासूनच शक्तिग्रहानें अर्थबोध होत असल्यामुळें, पदस्फोट व वाक्यस्फोट असे दोन प्रकारचे स्फोट मानले आहेत आणि म्हणूनच, म्हणजे स्फोट हाच लोकांना अर्थबोध करून देणारा

असल्यामुळेंच, तोच खरा मानला आहे (आणि प्रकृतिप्रत्ययविभाग इत्यादि सर्व कल्पित मानले आहेत. सभापतिमिश्र म्हणतात– 'ध्वनिव्यङ्ग्यो नित्योऽर्थवाचकः स्फुटत्यर्थोऽस्मात् इति व्युत्पत्या स्फोटः इत्युच्यते । स च न तात्त्विकरूपेण प्रत्यक्षविषयः, किन्तु पदादिरूपेणैवेति पदादीनामप्यर्थवत्वव्यवहारः । वास्तविकवाचकत्वं तु अक्षिगोलकगतेन्द्रियस्याप्रत्यक्षत्वेऽपि प्रत्यक्षज्ञानजनकत्वमिव स्फोटस्यैव) पाणिनीय शास्त्रानें ज्याप्रमाणें विशिष्ट–प्रकृतिप्रत्ययविशिष्ट–पदाचा प्रकृतिप्रत्ययरूप विभाग करून त्याची व्युत्पत्ति दर्शविली जाते त्याचप्रमाणें प्रकृति व प्रत्यय यांच्या अर्थाच्या बोधाच्या द्वारें हेंहि ज्ञापित केलें जातें कीं, प्रकृतिप्रत्ययविशिष्ट पदाचेंच ठिकाणीं विशिष्ट अर्थबोधक शक्ति आहे. (जरी प्रकृति व प्रत्यय हे दोन्ही अर्थवान् आहेत तरी केवळ प्रकृतीचा किंवा केवळ प्रत्ययाचा भाषेंत प्रयोग होत नसून प्रकृतिप्रत्ययविशिष्ट शब्दाचाच भाषेंत प्रयोग होत असतो व त्याचेच ठिकाणीं लौकिक अर्थवत्ता–लौकिक व्यवहारांत अर्थबोध करून देण्याची शक्ति–आहे. त्या प्रकृतिप्रत्ययविशिष्ट शब्दाचे ठिकाणीं असणारी ही शक्ति त्याच्या प्रकृतीचे किंवा प्रत्ययांचे ठिकाणीं असणारी शक्ति नसून स्वतंत्र शक्ति आहे. त्याचप्रमाणें वाक्याचे ठिकाणीं वाक्यार्थबोध करून देणारी स्वतंत्र शक्ति आहे. जरी पाणिनीच्या अष्टाध्यायींत या स्वतंत्र पदशक्तीचा किंवा वाक्यशक्तीचा कोठेंहि साक्षात् उल्लेख केला नाहीं व केवळ प्रकृतिप्रत्ययविभागरूप अन्वाख्यान करून शब्दांची व्युत्पत्ति दर्शविली आहे तरी स्वतंत्र पदशक्ति व वाक्यशक्ति आहे हें बोधित करण्यामध्येंच त्या व्युत्पत्तीचें तात्पर्य आहे, म्हणजे पदाचे किंवा वाक्याचे ठिकाणीं स्वतंत्र अर्थबोधकशक्ति आहे हें ज्ञापित करण्याच्या हेतूनेंच पाणिनीनें आपल्या शास्त्रांत प्रकृतिप्रत्ययविभागरूप व्युत्पत्ति दर्शविली आहे. सारांश प्रकृतिप्रत्ययविभाग इत्यादि जे पाणिनीय शास्त्रांत सांगितले आहेत ते विद्यार्थ्यांना सहज अर्थबोध व्हावा याकरितां सुचविलेले उपाय असून ते वास्तव नव्हत व ध्वनिव्यङ्ग्यस्फोट हाच

पदाच्या किंवा वाक्याच्या अर्थाची अभिव्यक्ति करणारा होय असा शद्वरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. या पंक्तीचा भावार्थ देतांना भैरवीकार म्हणतात–'प्रतिवाक्यं संकेतग्रहासम्भवाल्लघुभूत उपाय: शास्त्रेण बोध्यते शाखाचन्द्रन्यायेन। एवञ्च तत्तदवयवस्य तत्तदर्थानां च प्रदर्शनं वाचकस्य समुदायस्य विशिष्टार्थस्य च बोधन-तात्पर्यकमेवेति भाव:।') हरीच्या कारिकेंतील 'उपलालना:' या पदापुढें 'भवन्ति' हें क्रियापद अध्याहृत आहे व उपलालना:' या पदाचा 'न तु वास्तवा:', म्हणजे वास्तविक खरे नव्हत, असा अर्थ आहे. त्या कारिकेंतील 'असत्ये' या पदाचा 'आरोपिते' असा अर्थ आहे. लौकिक व्यवहारांत पदापासून अर्थबोध होतेवेळीं कल्पित प्रकृतिप्रत्ययविभाग व त्यांचे कल्पिलेले भिन्न भिन्न अर्थ यांचा कांहींच उपयोग होत नसून प्रकृतिप्रत्ययविशिष्ट अखण्ड पदापासूनच त्या अखण्ड पदाचे ठिकाणीं असणाऱ्या विशिष्ट शक्तीनें अर्थबोध होत असल्यामुळें, ते कल्पित प्रकृतिप्रत्ययविभाग व त्यांचे भिन्न भिन्न कल्पिलेले अर्थ असत्य ठरतात. कारिकेंतील 'सत्यम्' या पदाचा विशिष्ट शक्तीनें अर्थबोध करून देणारे 'पदादि' असा अर्थ आहे (व 'पदादि' यांतील 'आदि' या पदानें वाक्याचा संग्रह होतो.) 'कथमन्यथा इङो द्विर्वचनमडादयश्च स्यु:' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें 'अधिजगे, अध्यगीष्ट' इत्यादि उदाहरणांसंबंधानें म्हटलें आहे. ('अधिजगे' या स्थलीं 'इङ्' धातूचे जागीं 'गाङ् लिटि' सू. २४५९ या सूत्रानें 'गाङ् = गा' हा आदेश होऊन 'लिटि धातोरनभ्यासस्य' सू. २१७७ या सूत्रानें 'गा' या आदेशाचें द्विर्वचन झालें आहे. 'अधि + अ + गा + सिच् + त = अध्यगीष्ट' या स्थलीं 'विभाषा लुङ्लृङो:' सू. २४६० या सूत्रानें 'इङ्' धातूचे जागीं विकल्पेंकरून 'गाङ्' हा आदेश होऊन व त्याला 'लुङ्लङ्लृङ्क्ष्वडुदात्त:' सू. २२०६ या सूत्रानें अडागम होऊन व 'गाङ्कुटादिभ्य:' सू. २४६१ या सूत्रानें 'गाङ्' पुढील 'सिच्' प्रत्यय ङित् होऊन व तो प्रत्यय ङित् झाल्यामुळें 'घुमास्थागापा'

सू. २४६२ या सूत्रानें 'गा' यांतील आकाराचे जागीं ईकारादेश होऊन आणि यणादेश, सिचाचें षत्व व 'त' प्रत्ययांतील तकाराचें ष्टुत्व होऊन 'अध्यगीष्ट' असें लुङाचें रूप होतें. विकल्पानें होणारा 'गाङ्' आदेश न केल्यास अजादि 'इङ्' धातूला 'आट्' आगम होऊन व 'आटश्च' सू.२६९ या सूत्रानें वृद्धिरूप एकादेश होऊन आणि वर सांगितल्याप्रमाणें यणादेश, षत्व व ष्टुत्व होऊन 'अध्यैष्ट' असें पाक्षिक लुङाचें रूप होतें.) 'स्वार्थिकानां प्रकृत्यर्थेनैवार्थवत्त्वात्' या मनोरमेंतील पंक्तींतील 'अर्थवत्त्वात्' या पदाचा 'आरोपितार्थवत्त्वात्' असा अर्थ आहे. (कारण स्वार्थिक प्रत्यय प्रकृतीचाच अर्थ सांगणारे असल्यामुळें त्यांचे ठिकाणीं वास्तविक स्वतंत्र अर्थवत्ता नाहीं. तथापि त्यांचे ठिकाणीं प्रकृतीचा अर्थ आरोपित केला जात असल्यामुळें, तशा आरोपित अर्थवत्तेनें ते अर्थवान् मानले जातात.) 'शास्त्रकृत्सम्मता' या मनोरमेंतील पदांतील 'शास्त्रकृत्' याचा 'भाष्यकृदादिः,' म्हणजे भाष्यकारादिक, असा अर्थ आहे, व 'शास्त्रकृत्सम्मता' या मनोरमेंतील पदापुढें 'तद्धितविषये' हें पद अध्याहृत आहे (कारण स्वार्थिक प्रत्यय तद्धित प्रत्यय आहेत आणि म्हणूनच भाष्यकारांनीं स्वार्थिक तद्धित प्रत्यय प्रकृतीच्या अर्थाचे बोधक असतात असें सांगितलें आहे.) 'नञिवयुक्तम्' ही परिभाषा अनित्य मानली तरी तिची इष्ट स्थलीं औत्सर्गिक प्रवृत्ति होतेच याला 'इष्टस्थलेऽप्यप्रवृत्तौ न्यायस्य निर्विषयत्वापाताच्च' असा मनोरमेंत हेतु दिला आहे. या मनोरमेच्या पंक्तींतील 'च' हें पद पञ्चमीचा अर्थ जो 'हेतु' त्याचें केवळ अनुवादक आहे. ('निर्विषयत्वापातात्' ही हेत्वर्थे पञ्चमी असून त्यापुढील 'च' हें पद 'समुच्चय' या अर्थाचें वाचक नसून त्या पञ्चमीचा अर्थ जो 'हेतु' आहे त्याचाच केवळ अनुवाद करणारें पद आहे असें शब्दरत्नकारांचें म्हणणें आहे. 'चेति अन्वाचयसमाहारेतरेतरसमुच्चयविनियोगतुल्ययोगिताऽवधारणहेतुषु' असे 'च' या निपाताचे अनेक

अर्थ आहेत व प्रकृत स्थलीं त्याचा 'हेतु' असा अर्थ आहे.) 'अनित्यत्वज्ञापनस्य कथञ्चिदावश्यकत्वे' या मनोरमेंतील पंक्तींत 'कथञ्चित्' हें पद घातलें असल्यामुळें दीक्षित असें सुचवितात कीं, 'नञिवयुक्तम्' ही परिभाषा अनित्य मानण्याची वास्तविक कांहींच गरज नाहीं. उत्तर सूत्रांत अनुवृत्ति होण्याकरितां चरितार्थ ठरत असलेलें 'अर्थवत्' हें पद ('नञिवयुक्तम्' या परिभाषेच्या अनित्यत्वाचें) ज्ञापक कसें मानतां येतें अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेचें मनोरमेंत 'उत्तरार्थस्यापि…सफलत्वौचित्यात्' असें उत्तर दिलें आहे. (कोणतेंहि सूत्रनिर्दिष्ट पद कशाचेंहि ज्ञापक ठरण्याकरितां तें सूत्रांत असणें अनावश्यक आहे असें मानतां आलें पाहिजे. 'अर्थवत्' या पदाची 'कृत्तद्धित' या उत्तर सूत्रांत अनुवृत्ति व्हावी याकरितां तें पद प्रकृत सूत्रांत घातलें आहे असें मानल्यास, तें पद अनावश्यक ठरत नसून चरितार्थ ठरतें आणि त्यामुळें तें पद 'नञिवयुक्तम्' या परिभाषेच्या अनित्यत्वाचें ज्ञापक मानतां येत नाहीं अशी शंकाकाराची शंका आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, जरी 'अर्थवत्' हें पद उत्तर सूत्रांत अनुवृत्त होणें आवश्यक आहे तरी तें पद प्रकृत सूत्रांत असणें आवश्यक नसल्यामुळें व अशा रीतीनें तें पद प्रकृत सूत्रांत अनावश्यक ठरत असल्यामुळें, तें पद 'नञिवयुक्तम्' या परिभाषेच्या अनित्यत्वाचें ज्ञापक आहे व ती परिभाषा अनित्य मानली जावी हेंच तें पद प्रकृत सूत्रांत घालण्याचें प्रयोजन आहे असें मानतां येतें.) 'इकोऽचि विभक्तौ' सू. ३२० या सूत्रांत केलेलें 'अचि' या पदाचें ग्रहण त्या सूत्रांत अनावश्यक असून उत्तर सूत्रांत त्या पदाची अनुवृत्ति व्हावी एवढ्याचकरितां तें पद त्या सूत्रांत घातलें आहे असें त्या सूत्रावरील भाष्यांत सांगून भाष्यकारांनीं 'इह किञ्चित् त्रपो इति' असें म्हटलें आहे व त्याचा अर्थ हा आहे कीं, ('अचि' हें पद 'इकोऽचि विभक्तौ' या सूत्रांत घालण्याचें प्रयोजन एवढेंच आहे कीं,) 'न लुमताङ्गस्य' सू. २६३ हें निषेधक सूत्र अनित्य आहे हें ज्ञापित

व्हावें व त्या निषेधक सूत्राच्या अनित्यत्वामुळें (संबुद्धीच्या 'सु' प्रत्ययाचा 'स्वमोर्नपुंसकात्' सू. ३१९ या सूत्रानें जरी लुक् झाला आहे तरी तो प्रत्यय प्रत्ययलक्षणानें विद्यमान आहे असें मानल्यानें 'ह्रस्वस्य गुणः' सू. २४२ या सूत्रानें) गुण होऊन 'हे त्रपो' असें रूप सिद्ध व्हावें. (याचें विवेचन पूर्वीं मनोरमेंत केलेंच आहे.) 'इत्थं सति प्रत्याख्यानसम्भवाच्च' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'अर्थवत्' हें लहानसें पदच वरील परिभाषेच्या अनित्यत्वाचें ज्ञापक मानल्यानें त्या परिभाषान्वयें ('ओषधेश्च विभक्तौ' व 'अकर्तरि च कारके' या सूत्रांतील 'विभक्तौ' व 'कारके' या) दोन्ही पदांचें प्रत्याख्यान करतां येऊं शकतें. (वरील दोन सूत्रांतील 'विभक्तौ' व 'कारके' हीं पदें नञिवयुक्तम्' या परिभाषेच्या अनित्यत्वाचेंच केवळ ज्ञापक ठरतात व अशा रीतीनें तीं पदें एकच फल साध्य करणारीं पदें आहेत. परंतु प्रकृत सूत्रांतील 'अर्थवत्' हें पद त्या परिभाषेच्या अनित्यत्वाचें ज्ञापक ठरत असून उत्तर सूत्रांत अनुवृत्ति होण्याच्या देखील उपयोगी पडतें आणि अशा रीतीनें हें फलद्वयसाधक पद आहे. म्हणून हें फलद्वयसाधक एक लहानसें पद वरील परिभाषेच्या अनित्यत्वाचें ज्ञापक मानणें यांत लाघव असून वरील दोन सूत्रांतील दोन केवळ एकफलसाधक पदें ज्ञापक मानण्यांत गौरव आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे व तें पुढें असें म्हणतात कीं, वरील परिभाषा जरी अनित्य मानली तरी, इष्ट स्थलीं तिची औत्सर्गिक प्रवृत्ति रोखतां येत नसल्यामुळें, त्या परिभाषेच्या आधारें 'विभक्तौ' व 'कारके' या पदांचें वरील दोन सूत्रांतून प्रत्याख्यान सहज करतां येतें.)

शब्दरत्न– 'नलोप इति। सुबुत्पत्तिस्तु नोक्ता, "भूवादयो" इत्यस्य लविधौ, तिबादिविधौ चोपस्थितेर्निरवकाशतया अपवादैस्तिबादिभिर्बाधात्। कार्यकालपक्षे इति। न च यथोद्देशेऽपि प्रत्ययान्तत्वस्य भावित्वेनाकृतव्यूहपरिभाषया फलाभावेन च संज्ञाया अप्रवृत्तिरितिवाच्यम्, अकृतव्यूहपरिभाषाया अनित्यत्वात्, असत्त्वाच्च,

भविष्यति किं चित्फलमित्यभिसन्धिमात्रेणात्र पक्षे संज्ञायाः प्रवृत्तेः प्रगृह्यसंज्ञाप्रकरणे कैयटेनोक्तत्वाच्च । यथोद्देशपक्षेण पर्युदासे लक्ष्यसिद्धेः शङ्कासमाधाने अत्र निर्हृले । न हि व्यवस्थितयोः पक्षयोरन्यतरेण लक्ष्ये सिद्धे पक्षान्तरेण शङ्काऽप्युचितेत्यर्थस्य प्रगृह्यसंज्ञाप्रकरणे भाष्ये ध्वनितत्वादिति कश्चित् । कथमन्यथेति । न च राजेत्यादौ कृदन्तत्वात्प्रवृत्तिः, तत्रापि "अप्रत्ययः–" इत्यस्य सम्बन्धात् । अत एव 'दाक्षी', 'दिदृक्षू' इत्यादौ परादिवद्भावेन न सुपो लुक् । न च सुब्लोपविषयमेव ज्ञापकम्, असति बाधके प्रमाणानां सामान्ये पक्षपात इत्यर्थस्यापि ज्ञापनात् । अन्यथा सूत्रोपस्थितङिसम्बुद्धिमात्रविषयता स्यादिति राजपुरुषासिद्धिः । स्पष्टा चेयं रीतिः "सार्वधातुकमपित्" इत्यत्र भाष्ये । प्रकृतसूत्रभाष्ये चेदं स्पष्टम् ।

'अधातुः इति किम् ? । अहन् नलोपो मा भूत्' या मनोरमेंतील पंक्तींत नकारलोप होण्याची आपत्ति दिली आहे, पण सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति दिली नाहीं व त्याचें कारण हें कीं, 'भूवादयो धातवः' या धातुसंज्ञाविधायक सूत्राची ('वर्तमाने लट्' सू. २१५१ इत्यादि) लकारविधायक सूत्रांत व 'तिप् तस् झि' सू. २१५४ इत्यादि लादेशविधायक सूत्रांत उपस्थिति होत असल्यामुळें, निरवकाशत्वामुळें तिबादिविधायक सूत्रें सुबादिविधायक सूत्राचीं अपवादक सूत्रें ठरून त्यांचा बाध करतात (व त्यामुळें धातूहून सुबुत्पत्ति होण्याचा प्रसङ्गच येत नाहीं. प्रकृत सूत्रांत 'अधातुः' हा पर्युदास नसल्यास धातूंना जरी प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते तरी, त्यांची मूळची धातुसंज्ञा नष्ट होऊं शकत नाहीं; कारण धातुसंज्ञा व प्रातिपदिकसंज्ञा या दोन्ही 'आ कडारादेका संज्ञा' सू. २३२ या अधिकाराच्या कक्षेंत येत नसून, तो अधिकार सुरु होण्यापूर्वी पठित आहेत. म्हणून धातूंना प्रातिपदिकसंज्ञा झाल्यास, 'ङ्याप्-प्रातिपदिकात्' सू. १८२ या अधिकारसूत्रान्वयें 'अहन्' या धातूहून सुबुत्पत्ति होण्याची प्राप्ति आहे असें कोणी म्हटल्यास त्यावर

शब्दरत्नकार असें म्हणतात कीं, धातूहून देखील जर सुबुत्पत्ति केली तर, 'धातोः' या अधिकारांत पठित असलेलीं लकारविधायक व तिबादिविधायक सूत्रें सर्वथा निरवकाश ठरतील व निरवकाशत्वा-मुळें तीं सूत्रें 'येन नाप्राप्ते'–प. ५८–या न्यायान्वयें सुबादिविधायक सूत्रांचीं अपवादक सूत्रें ठरून व त्यांचा बाध करून स्वतःच प्रवृत्त झाल्यानें, धातूहून सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति मुळींच येत नाहीं. तसेंच गमकाचा अभाव असल्यामुळें, 'अहन्' या धातूहून औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय देखील करतां येत नाहीं व म्हणूनच दीक्षितांनीं मनोरमेंत सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति न देतां 'अहन्' यांतील नकारलोप होण्याचीच आपत्ति दिली आहे; कारण 'अहन्' हें तिङन्त असल्यामुळें 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रान्वयें प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञक आहेच व प्रकृत सूत्रांतून 'अधातुः' हें पद गाळल्यास, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊन तें प्रातिपदिकान्त पद ठरतें व त्यामुळें 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ हें सूत्र प्रवृत्त होण्याची आपत्ति येते. आतां येथें शंकाकार अशी शंका करतो कीं, प्रकृत सूत्रांत 'अधातुः' हा पर्युदास नसला व केवळ 'अप्रत्ययः = अप्रत्य-यान्तः' एवढाच पर्युदास असला तरी कार्यकालपक्षांत 'अहन्' हा शब्द प्रत्ययान्त ठरत असल्यामुळें त्याला त्या पक्षांत प्रातिपदिकसंज्ञा होऊंच शकत नाहीं अशी मनोरमेंत जी शंका उपस्थित केली आहे ती शंका यथोद्देशपक्षांत देखील उपस्थित होऊं शकते; कारण) यथोद्देशपक्षांत देखील 'अहन्' (याहून तिबादि प्रत्यय केल्यावर) हा शब्द पुढें प्रत्ययान्त होणारा असल्यामुळें व त्याला त्यावेळीं, म्हणजे तिबादि प्रत्यय उत्पन्न होण्यापूर्वी, (प्रातिपदिक) संज्ञा केल्यानें कोणतेंहि फल निष्पन्न होऊं शकत नसल्यामुळें, 'अकृतव्यूहाः पाणिनीयाः'–प. ५६– या परिभाषान्वयें त्या शब्दाचे ठिकाणीं ती संज्ञा प्रवृत्त होऊं शकत नाहीं. (या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं,) ही शंका बरोबर नाहीं; कारण 'अकृतव्यूहाः' ही परिभाषा (मानली तरी

ती) अनित्य आहे व वास्तविक तशी परिभाषाच नाहीं, आणि प्रगृह्यसंज्ञाप्रकरणांत कैयटानें असें म्हटलें आहे कीं, पुढें कांहीं फल होईल असा केवळ संभव असतांना देखील यथोद्देशपक्षांत संज्ञेची प्रवृत्ति करतां येते. (शंकाकाराची शंका अशी आहे कीं, प्रकृत सूत्रांत 'अधातुः' हा पर्युदास नसला व 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' एवढाच पर्युदास असला तरी, यथोद्देशपक्षांत अडागमसहित 'अहन्' या धातूहून 'तिप्' इत्यादि प्रत्यय होण्यापूर्वीं जरी त्याला प्राति-पदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते तरी, त्याहून 'तिप्' प्रत्यय होतांक्षणींच तो प्रत्ययान्त ठरत असल्यामुळें, 'अप्रत्ययः' या पर्युदासाच्या बलानें त्याची प्रातिपदिकसंज्ञा नष्ट होणारच. म्हणून 'तिप्'प्रत्यय करण्यापूर्वीं 'अहन्' याला प्रातिपदिकसंज्ञा करून कांहींच फायदा नाहीं. आणि 'निमित्तं विनाशोन्मुखं दृष्ट्वा तत्प्रयुक्तं कार्यं न कुर्वन्ति' या अर्थाची वाचक 'अकृतव्यूहाः' ही परिभाषा असल्यामुळें, 'अहन्' याला त्यावेळीं, म्हणजे त्याहून 'तिप्' प्रत्यय करण्यापूर्वीं, प्रातिपदिकसंज्ञा करतांच येत नाहीं आणि त्यामुळें 'अहन्' याहून 'तिप् = त्' प्रत्यय केल्यावर त्या प्रत्ययाचा 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें लोप झाला असतां तो शब्द जरी प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञक ठरतो तरी तो प्रातिपदिकसंज्ञक नसल्या-मुळें आणि अशा रीतीनें 'अहन्' हा शब्द प्रातिपदिकान्त पद ठरत नसल्यामुळें, यथोद्देशपक्षांत देखील त्याच्या अन्त्य नकाराचा लोप होण्याची आपत्ति येत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, ज्या 'अकृतव्यूह' परिभाषेच्या आधारावर वरील शंका उपस्थित केली आहे ती परिभाषा अनित्य मानली असल्यामुळें व भाष्यांत ती परिभाषा मुळींच आढळत नसल्याकारणानें ती नाहींच असें मानावें लागत असल्यामुळें, तशा अनित्य व अवास्तव परिभाषेच्या आधारावर केलेली वरील शंका अनुपपन्न ठरते. दुसरें असें कीं, 'ईदूदेद्द्विवचनं प्रगृह्यम्' सू. १.१.११ या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत कैयटानें 'यदाऽनुद्दिश्य प्रयोजनविशेषं प्रयोजनमात्रमभिसन्धाय

भविष्यति किञ्चिदनेन प्रयोजनमिति संज्ञापरिभाषं प्रणीयते, तदा संम्भवत्येऽवायं पक्षो यथाश्रुतग्राहिप्रतिपत्तपेक्षः' असें म्हटलें आहे व शब्दरत्नकार असें म्हणतात कीं, या कैयटोक्तिवरून हें सिद्ध होतें कीं, संज्ञा करतेवेळीं जरी कांहीं तात्कालिक फल होण्याचा संभव नसला तरी, त्यावेळीं संज्ञा केल्यानें जर पुढें कांहीं फल निष्पन्न होण्याचा संभव असेल तर तशा स्थितींत देखील त्यावेळीं संज्ञा करतां येते, व या कैयटोक्तीच्या आधारें 'अहन्' याहून तिबादि प्रत्यय करण्यापूर्वीं त्याला, प्रकृत सूत्रांत 'अधातुः' हा पर्युदास नसल्यास, प्रातिपदिकसंज्ञा करतां येते; कारण त्यावेळीं त्याला ती संज्ञा केली असतां पुढें त्याला पदसंज्ञा झाल्यावर 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' या सूत्रानें त्यांतील अन्त्य नकाराच्या लोपाची प्राप्ति होते. म्हणून तो शब्द पुढें प्रत्ययान्त झाल्यावर 'अप्रत्ययः' या पर्युदासान्वयें त्याची प्रातिपदिकसंज्ञा नष्ट होणार एवढ्यावरून त्याला त्यावेळीं प्रातिपदिकसंज्ञा होणें बंद करतां येत नाहीं, व अशा रीतीनें 'अहन्' याहून तिबादिप्रत्यय होण्यापूर्वीं तो यथोद्देश-पक्षांत, 'अधातुः' या पर्युदासाच्या अभावीं, प्रातिपदिकसंज्ञक ठरत असल्यामुळें, त्याहून 'त्' प्रत्यय होऊन त्या प्रत्ययाचा 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें लोप झाल्यावर 'अहन्' हा शब्द प्रातिपदिकान्त पद ठरतो व त्यामुळें त्याच्या अन्त्य नकाराचा 'न लोपः' सू. २३६ या सूत्रानें लोप होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति जशी कार्यकाल-पक्षांत टाळतां येते तशी यथोद्देशपक्षांत टाळतां येत नाहीं; कारण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें 'अहन्' याहून तिबादि प्रत्यय उत्पन्न होण्या-पूर्वीं त्याला जी प्रातिपदिकसंज्ञा होते ती प्रत्ययोत्पत्ति झाल्यावर पदसंज्ञा झाली तरी नष्ट होत नाहीं आणि म्हणूनच दीक्षितांनीं केवळ कार्यकालपक्षाचा आश्रय करून नलोप होण्याची शंका उपस्थित केली आहे व त्या शंकेचें निरसनहि केलें आहे.) प्रकृत सूत्रांत ('अधातुः' हा) पर्युदास असल्यानें यथोद्देशपक्षांत (नलोपाची आपत्ति टळून 'अहन्' इत्यादि) इष्टरूपांची सिद्धि होत असल्यामुळें,

(कार्यकालपक्षाचा आश्रय करून मनोरमेंत) जी शंका उपस्थित केली आहे व तिचें जें समाधान सांगितलें आहे हे दोन्ही व्यर्थ ठरतात; कारण दोन्ही पक्ष–यथोद्देशपक्ष व कार्यकालपक्ष–व्याकरण-शास्त्रांत मानले असून त्यांची व्यवस्था लावून दिली असल्यामुळें, जर एका पक्षाचा आश्रय केल्यानें इष्ट रूपांची सिद्धि होते तर दुसऱ्या पक्षाचा आश्रय करून त्या पक्षांत शंका देखील उपस्थित करणें योग्य नाहीं हें प्रगृह्यसंज्ञाप्रकरणावरील–'ईदूदेद्द्विवचनं प्रगृह्यम्' सू. १.१.११ या सूत्रावरील–भाष्यांत ध्वनित केलें आहे असें एका वैयाकरणाचें म्हणणें आहे. (तें भाष्य बरेंच विस्तृत आहे, पण प्रकृत विषय नीट ध्यानांत येण्याकरितां त्याचा भैरवींत थोडक्यांत सारांश दिला आहे व तो असा–'तत्र हि अग्नी इत्याह इत्यत्र प्राक् प्रगृह्यसंज्ञायां तस्य स्थाने गुरोरनृत इति प्लुते, ईदूदेत् इति तपर-करणात् पुनः प्रगृह्यसंज्ञा प्रकृतिभावफलिका न प्राप्नोति, प्लुतसंज्ञाकृतस्य प्रकृतिभावस्य त्वप्रवृत्तिरप्लुतवदुपस्थित इत्यप्लुत-वद्भावस्य विधानात्, प्रगृह्यसंज्ञाविधायकसूत्रदृष्टचा प्लुतस्यासिद्धत्वं तु न भवति, कार्यकालपक्षे प्रगृह्यसंज्ञायाः प्लुतप्रगृह्येत्येतदेकवाक्य-तया स्वरसन्धिस्थत्वसंपत्या सिद्धः प्लुतः स्वरसन्धिष्वित्यनेन सिद्धत्वस्य बोधनादित्याशङ्क्य यथोद्देशपक्षाश्रयणेन समाहितं, तेनास्य ध्वनित-त्वादित्यर्थः ।' या भैरवीचा भावार्थ हा आहे कीं, 'अग्नी इत्याह' या उदाहरणांत 'अग्नी' हें ईदन्त द्विवचन असल्यामुळें 'ईदूदेत्' सू. १०० या सापादिक सूत्रानें 'अग्नी' याला प्रथम प्रगृह्यसंज्ञा झाल्यावर नंतर 'गुरोरनृतः' सू. ९७ या त्रैपादिक सूत्रानें 'अग्नी' यांतील अन्त्य ईकाराचे जागीं प्लुत झाला असतां, प्लुत त्रिमात्रिक व दीर्घ द्विमात्रिक असल्यामुळें आणि 'ईदूदेत्' या सूत्रांत तपरकरण केलें असल्यामुळें, 'अग्नी' याची प्रगृह्यसंज्ञा कायम राहत नाहीं व त्यामुळें 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' सू. ९० या सूत्रानें प्रगृह्य-संज्ञेच्या निमित्तानें होणारा प्रकृतिभाव होऊं शकत नाहीं. तसेंच प्लुतसंज्ञेच्या निमित्तानें त्या सूत्रानें होणारा प्रकृतिभाव देखील होऊं

शकत नाहीं; कारण 'अग्नी' या शब्दापुढें 'इति' हा अवैदिक शब्द असल्यामुळें, 'अप्लुतवदुपस्थिते' सू. ९८ या सूत्रानें प्लुत अप्लुतासारखा होतो, म्हणजेच प्लुताच्या निमित्तानें होणारा प्रकृतिभाव होऊं शकत नाहीं. 'ईदूदेत्' या सापादिक सूत्रानें होणाऱ्या प्रगृह्यसंज्ञेच्या दृष्टीनें 'गुरोरनृत:' इत्यादि त्रैपादिक सूत्रांनीं होणारी प्लुतसंज्ञा 'पूर्वत्रासिद्धम्' या वचनान्वयें असिद्ध ठरत असल्यामुळें ती झालीच नाहीं असें मानल्यानें, वरील उदाहरणांत प्रगृह्यसंज्ञेच्या निमित्तानें होणारा प्रकृतिभाव होऊं शकतो असें देखील म्हणतां येत नाहीं; कारण 'प्लुतप्रगृह्या अचि नित्यम्' या प्रकृतिभावविधायक सूत्रांत 'प्लुत' व 'प्रगृह्य' या दोहोंचेंहि ग्रहण केलें असल्यामुळें, प्रकृतिभाव करतेवेळीं 'यदा कार्यं तदा संज्ञापरिभाषम्' या कार्यकालपक्षांत प्लुतसंज्ञाविधायक व प्रगृह्यसंज्ञाविधायक सूत्रें 'प्लुतप्रगृह्य:' या सूत्राच्या प्रदेशांत उपस्थित होऊन व त्या सूत्राशीं एकवाक्यतापन्न होऊन तीं सर्व सूत्रें एकप्रदेशस्थ होत असल्यामुळें व अशा रीतीनें त्यांच्यांतील पूर्वपरभाव नाहींसा होत असल्यामुळें, त्या कार्यकालपक्षांत प्रगृह्यसंज्ञेच्या दृष्टीनें प्लुतसंज्ञा असिद्ध ठरत नाहीं व म्हणूनच 'सिद्ध: प्लुत: स्वरसन्धिषु' असा सिद्धान्त मानला आहे. सारांश कार्यकालपक्षाचा आश्रय केल्यास, प्रगृह्यसंज्ञेच्या दृष्टीनें प्लुतसंज्ञा असिद्ध ठरत नसल्यामुळें, वरील उदाहरणांत प्रगृह्यसंज्ञेच्या निमित्तानें होणारा प्रकृतिभाव न होण्याची आपत्ति येते. यावर भाष्यकार म्हणतात— 'एवं तर्हि किं न: एतेन कार्यकालं संज्ञापरिभाषमिति । यथोद्देशमेव संज्ञापरिभाषम् । तत्र चासावसिद्धस्तस्यासिद्धत्वात् तत्काला एव भवन्ति ।' या भाष्याचा आशय हा आहे कीं, जर कार्यकालपक्ष मानल्यानें दोष येतो तर त्या पक्षाचा आश्रय करण्याची गरज काय ? आम्ही यथोद्देशपक्षच मानूं व त्या पक्षांत प्रगृह्यसंज्ञेच्या दृष्टीनें प्लुत असिद्ध ठरेल आणि तो असिद्ध मानल्यानें, म्हणजे प्लुत झालाच नाहीं व दीर्घ कायमच आहे असें मानल्यानें, प्रगृह्यसंज्ञा

कायम राहून, प्रगृह्यसंज्ञेच्या निमित्तानें होणारा प्रकृतिभाव करण्यांत कांहीं अडचण येणार नाहीं. सारांश व्याकरणशास्त्रांत यथोद्देशपक्ष व कार्यकालपक्ष हे दोन्ही पक्ष सारखेच प्रमाणभूत मानले असल्यामुळें व कांहीं कार्यें करतेवेळीं यथोद्देशपक्षाचा आश्रय करावा व इतर कार्यें करतेवेळीं कार्यकालपक्षाचा आश्रय करावा अशा तऱ्हेची दोन्ही पक्षांची, इष्टकार्यसिद्धी-करितां, भाष्यकारादिकांनीं व्यवस्था लावून दिली असल्यामुळें, ज्या पक्षाचा आश्रय केल्यानें इष्ट रूपांची सिद्धि होत असेल त्या पक्षाचा आश्रय करून त्या रूपांची सिद्धी करावी व दुसऱ्या पक्षाचा आश्रय केल्यानें इष्ट रूपांची सिद्धि होऊं शकत नाहीं अशी शंका देखील उपस्थित करणें अयोग्य आहे असें वरील भाष्यावरून ध्वनित होत असल्यामुळें, कार्यकालपक्षाचा आश्रय करून मनोरमेंत 'कार्यकालपक्षे प्रत्ययान्तत्वेन पर्युदासोऽस्तु' ही जी शंका उपस्थित केली आहे व 'प्रत्ययलक्षणेनोक्तपर्युदासा-प्रवृत्तेः……ज्ञापितत्वात्' असें जें त्या शंकेचें समाधान केलें आहे तीं दोन्हीं व्यर्थ ठरतात; कारण यथोद्देशपक्षाचा आश्रय केल्यानें मनोरमेंत केलेली शंका उपस्थितच होत नाहीं असें एका वैयाकरणाचें म्हणणें आहे. या पंक्तींत त्या वैयाकरणाचा नामनिर्देश न करितां 'कश्चित्' हें अरुचिप्रदर्शक पद घातलें असल्यामुळें, शद्बरत्नकारांना त्या वैयाकरणाचें म्हणणें मान्य नाहीं हें ध्वनित होतें व याचें कारण भैरवींत 'अत्रारुचिबीजं तु यथोद्देशपक्षे यद्यप्युक्तरीत्या निर्वाह-स्तथापि पक्षान्तरे सम्बुद्धिपदस्योक्तार्थज्ञापनपरत्वं भाष्यकृदुक्त-मनुपपन्नमेवेति' असें दिलें आहे.) 'राजा' इत्यादि स्थलीं कृदन्तत्वा-मुळें ('न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्राची) प्रवृत्ति होऊं शकते हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'कृत्तद्धितसमासाश्च' या उत्तर सूत्रांत देखील (प्रकृत सूत्रांतून) 'अप्रत्ययः' हें पद अनुवृत्त होतें. ('राजृ दीप्तौ' या धातूहून 'कनिन्युवृषि' उ. सू. १५४ या सूत्रानें औणादिक 'कनिन्=अन्' प्रत्यय होऊन 'राजन्' असा

जो औणादिक कृत्प्रत्ययान्त शब्द सिद्ध होतो त्याला 'कृत्तद्धित' या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होते. त्याहून प्रथमेच्या एकवचनाचा 'सु' प्रत्यय केला असतां, 'सर्वनामस्थाने चासम्बुद्धौ' सू. २५० या सूत्रानें उपधा दीर्घ होऊन व 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें 'सु' प्रत्ययाचा लोप होऊन 'राजान्' अशी स्थिति होते व जरी 'सु' प्रत्ययाचा लोप झाला आहे तरी 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रानें त्याला पदसंज्ञा होते आणि प्रत्ययलक्षणानें 'सु' प्रत्यय कायमच आहे असें मानल्यानें 'अप्रत्ययः' या पर्युदासामुळें 'राजान्' याला कार्यकालपक्षांत प्रकृत सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा जरी होऊं शकत नाहीं तरी, तो एकदेशविकृत शब्द 'राजन्' हा कृदन्त शब्दच आहे असें मानतां येत असल्यामुळें, 'कृत्तद्धित' या सूत्रानें त्याला प्रातिपदिकसंज्ञक मानतां येतें व अशा रीतीनें 'राजान्' हें प्रातिपदिकसंज्ञक पद ठरत असल्यामुळें, 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' या सूत्रानें अन्त्य नकाराचा लोप होऊन 'राजा' असें इष्ट रूप कार्यकालपक्षांत सिद्ध होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं आणि म्हणून 'कथमन्यथा राजेत्यादौ नलोपः स्यात्' असें जें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे तें चूक ठरतें असें शंकाकाराचें म्हणणें आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'कृत्तद्धित' या सूत्रांत देखील प्रकृत सूत्रांतून 'अप्रत्ययः' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें, प्रत्ययलक्षण मानून 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रवृत्ति केल्यानें 'राजान्' याला जशी प्रकृत सूत्रानें कार्यकालपक्षांत प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं तशीच 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें देखील त्याला ती संज्ञा होऊं शकत नाहीं; कारण वर सांगितल्याप्रमाणें त्या सूत्रांत 'अप्रत्ययः' हें पद अनुवृत्त होत असल्यामुळें, त्या सूत्राचा 'अप्रत्ययान्तं यत् कृदन्तं तद्धितान्तं च तत् प्रातिपदिकसंज्ञं स्यात्' असा अर्थ होतो व ज्या 'सु' प्रत्ययाचा लोप झाला आहे तो प्रत्यय प्रत्ययलक्षणानें कायम आहे असें मानल्यास, 'राजान्' हा कृदन्त शब्द विभक्तिप्रत्ययान्त ठरत असल्यामुळें,

'अप्रत्यय:' या पर्युदासाच्या बलानें त्याला 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें देखील प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'राजान्' हें पद प्रातिपदिकसंज्ञक ठरत नसल्यामुळें, त्यांतील अन्त्य नकाराचा लोप न होण्याची व 'राजा' असें इष्ट रूप सिद्ध न होण्याची आपत्ति येते. 'प्रत्ययलक्षणेनोक्तपर्युदासाप्रवृत्तेः··· ··· ज्ञापितत्वात्' असें जें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे तें बरोबर मानल्यानेंच, वरील आपत्ति टाळतां येऊं शकते. सारांश प्रत्यय-लक्षणानें प्रत्ययान्त मानून 'अप्रत्यय:' या पर्युदासाची प्रवृत्ति करणें व त्या योगानें प्रातिपदिकसंज्ञा होणें बंद करणें योग्य नाहीं.) असें असल्यामुळेंच, म्हणजे 'कृत्तद्धित' या सूत्रांत प्रकृत सूत्रांतून 'अप्रत्यय:' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळेंच, 'दाक्षी, दिदृक्षू' इत्यादि स्थलीं परादिवद्भावानें 'सुप्' चा लुक् होत नाहीं. ('दक्षस्य अपत्यं पुमान् दाक्षि:' या स्थलीं 'दक्ष' या अदन्त प्रातिपदिकाहून 'अत इञ्' सु. १०९५ या सूत्रानें अपत्यार्थक 'इञ्' प्रत्यय होऊन व 'तद्धितेष्वचामादे:' सू. १०७५ या सूत्रानें आद्य अचाची वृद्धि होऊन आणि 'यस्येति च' सू. ३११ या सूत्रानें 'दक्ष' यांतील अन्त्य अकाराचा लोप होऊन 'दाक्षि' असें तद्धितान्त रूप सिद्ध होतें. तसेंच 'द्रष्टुमिच्छु: दिदृक्षु:' या स्थलीं 'सन्' प्रत्ययान्त 'दृश्' धातूहून 'सनाशंसभिक्ष उ:' सू. ३१४८ या सूत्रानें 'उ' हा कृत्प्रत्यय होऊन 'दिदृक्षु' असें कृदन्त रूप सिद्ध होतें. 'कृत्तद्धित-समासाश्च' सू. १७९ या सूत्रान्वयें हे वरील दोन्ही शब्द प्राति-पदिकसंज्ञक ठरतात. या शब्दांहून प्रथमेच्या द्विवचनाचा 'औ' प्रत्यय केला असतां, 'प्रथमयो: पूर्वसवर्ण:' सू. १६४ या सूत्रानें पूर्वसवर्णदीर्घरूप एकादेश होऊन 'दाक्षी, दिदृक्षू' अशीं प्रथमेच्या द्विवचनाचीं रूपें सिद्ध होतात. 'दाक्षि + औ = दाक्षी, दिदृक्षु + औ = दिदृक्षू' या स्थलीं 'अन्तादिवच्च' सू. ७५ या सूत्रान्वयें 'ई' व 'ऊ' हे एकादेश परादिवद्भावानें 'औ' प्रत्ययच आहेत अशी बुद्धि केल्यास, 'दाक्षी' व 'दिदृक्षू' हे शब्द विभक्तिप्रत्ययान्त,

म्हणजे 'औ' प्रत्ययान्त, ठरतात व 'कृत्तद्धित' या सूत्रांत प्रकृत सूत्रांतून 'अप्रत्ययः' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें, त्या कृत्तद्धितान्त शब्दांना, ते विभक्तिप्रत्ययान्त ठरत असल्यामुळें, प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं व त्यामुळें 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व विभक्ति-प्रत्ययाचा लुक् होण्याची आपत्ति टळते. 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांत प्रकृत सूत्रांतून 'अप्रत्ययः' या पदाची अनुवृत्ति होत नाहीं असें मानल्यास, 'दाक्षी' व 'दिदृक्षू' हे शब्द विभक्तिप्रत्ययान्त असून देखील पूर्वान्तवद्भावानें प्रातिपदिकसंज्ञक ठरून व त्यांहून झालेला विभक्तिप्रत्यय प्रातिपदिकावयव ठरून 'सुपो धातुप्रातिप-दिकयोः' या सूत्रानें त्या विभक्तिप्रत्ययाचा लुक् होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरितां 'कृत्तद्धित' या सूत्रांत 'अप्रत्ययः' या पदाची अनुवृत्ति मानणें आवश्यक आहे व तशी अनुवृत्ति होत असल्यामुळें, त्या सूत्राचा असा अर्थ निष्पन्न होतो कीं, कृदन्त व तद्धितान्त शब्द जरी प्रातिपदिकसंज्ञक होतात तरी त्याहून विभक्तिप्रत्यय केला असतां, तशा विभक्तिप्रत्ययान्त कृत्तद्धितान्त शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं.) जेथें 'सुप्' चा, म्हणजे प्रातिपदिकाहून होणाऱ्या विभक्तिप्रत्ययाचा, लोप झाला आहे तेथें 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रवृत्ति करतां येत नाहीं एवढ्याचेंच 'न ङिसम्बुद्ध्योः' सू. ३५२ हें सूत्र ज्ञापक आहे (व 'अहन्' इत्यादि स्थलीं जेथें धातूहून होणाऱ्या प्रत्ययाचा लोप झाला आहे तेथें तें ज्ञापक लागू पडत नाहीं) हें मानणें बरोबर नाहीं; कारण 'असति बाधके प्रमाणानां सामान्ये पक्षपातः', म्हणजे कांहीं बाधक नसल्यास ज्ञापक विशेषापेक्ष न ठरतां सामान्यापेक्ष ठरतें, हें देखील (प्रकृत सूत्रांतील 'अधातुः' या पदाच्या ग्रहणानें) ज्ञापित होतें. असें न मानल्यास, म्हणजे 'न ङिसम्बुद्ध्योः' हें सूत्र सामान्या-पेक्ष ज्ञापक न मानतां विशेषापेक्ष ज्ञापक मानलें तर, त्या सूत्रांत 'ङि' प्रत्यय व सम्बुद्धिप्रत्यय या दोहोंचाच निर्देश केला असल्या-

मुळें, तें सूत्र त्या दोन प्रत्ययांपुरतेंच ज्ञापक ठरेल (व जेथें त्या दोन प्रत्ययांचा लोप झाला आहे तशाच ठिकाणीं 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रत्ययलक्षणानें प्रवृत्ति करतां येऊं शकत नाहीं असें मानावें लागेल) व त्यामुळें 'राजपुरुष' हें रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. ('न ङिसम्बुद्धयोः' सू. ३५२ या सूत्रांत प्रातिपदिकाहून होणाऱ्या 'ङि' व 'सम्बुद्धि' या दोन प्रत्ययांचें ग्रहण केलें असल्यामुळें, प्रातिपदिकाहून होणाऱ्या 'स्वौजस्' सू. १८३ इत्यादि विभक्ति प्रत्ययांचा जेथें लोप झाला असेल तशाच ठिकाणीं प्रत्यय-लक्षणानें प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रवृत्ति करतां येत नाहीं एवढ्याचपुरतें तें सूत्र, 'तुल्यजातीयस्य ज्ञापकम्' या भाष्यवचनान्वयें, ज्ञापक मानतां येतें; कारण त्या सूत्रांत ज्या दोन प्रत्ययांचें ग्रहण केलें आहे त्यांच्या जातीचे प्रातिपदिकाहून होणारे 'सु' इत्यादि विभक्तिप्रत्ययच आहेत. धातूहून होणारे तिबादि प्रत्यय त्यांच्या जातीचे नसून भिन्न जातीचे आहेत. म्हणून तिबादि प्रत्ययांचा लोप झाला असतां, प्रत्ययलक्षणानें 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रवृत्ति करतां येत नाहीं याचें वरील सूत्र ज्ञापक मानतां येत नाहीं. 'अहन्' या स्थलीं धातूहून होणाऱ्या 'तिप्' प्रत्ययाचा— 'इतश्च' सू. २२०७ या सूत्रानें 'तिप् = ति' या प्रत्ययांतील इकाराचा लोप होऊन अवशिष्ट राहिलेल्या 'त्' या अपृक्त प्रत्ययाचा 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें—लोप झाला असल्या-मुळें, तो लुप्त प्रत्यय प्रत्ययलक्षणानें विद्यमान आहे असें मानून 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रवृत्ति करण्यांत वरील विशेषापेक्ष ज्ञापक आड येत नाहीं. प्रत्ययलक्षण मानून तो पर्युदास प्रवृत्त केल्यानें 'अहन्' हा शब्द प्रत्ययान्त ठरत असल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं व अशा रीतीनें 'अहन्' हें प्रातिपदिकसंज्ञक पद मानतां येत नसल्यामुळें, 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व 'अहन्' यांतील अन्त्य नकाराचा लोप होण्याची आपत्ति मुळींच येत नाहीं. म्हणून 'अधातुः इति किम्?

अहन् नलोपो मा भूत्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें चूक ठरतें असें शंकाकाराचें म्हणणें आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, प्रकृत सूत्रांत 'अधातुः' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें त्यावरून हें ज्ञापित होतें कीं, वरील ज्ञापक विशेषापेक्ष नसून सामान्यापेक्ष आहे– म्हणजे 'सु' इत्यादि विभक्तिप्रत्ययांचा लोप झाला असतां प्रत्ययलक्षणानें 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रवृत्ति करतां येत नाहीं एवढ्याचपुरतें वरील सूत्र विशेषापेक्ष ज्ञापक नसून, 'सुप्' प्रत्ययाचा किंवा 'तिङ्' प्रत्ययाचा लोप झाला असला तरी प्रत्ययलक्षण मानून 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रवृत्ति करतां येत नाहीं व प्रातिपदकिसंज्ञा होणें बंद करतां येत नाहीं याचें तें सूत्र सामान्यापेक्ष ज्ञापक आहे. तसें न मानल्यास, प्रकृत सूत्रांतील 'अधातुः' या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते; कारण धातूला प्रातिपदिकसंज्ञा झाली तरी त्याहून सुबुत्पत्ति होऊं शकत नाहीं व गमकाचा अभाव असल्यामुळें एकवचनाचा औत्सर्गिक प्रत्यय देखील होऊं शकत नाहीं हें पूर्वी सिद्ध केलेंच आहे. नलोप होण्याची आपत्तीच काय ती शिल्लक राहते. ती आपत्ति देखील प्रत्ययलक्षणानें 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रवृत्ति करून प्रातिपदिकसंज्ञा होऊं न दिल्यानें जर सहज टाळतां येऊं शकते तर मग प्रकृत सूत्रांत 'अधातुः' या पदाचें ग्रहण कां केलें आहे ? तें व्यर्थ न ठरावें याकरितां वरील ज्ञापक सामान्यापेक्ष आहे असें मानणें आवश्यक आहे. जर वरील ज्ञापक शंकाकाराच्या म्हणण्याप्रमाणें विशेषापेक्षच ज्ञापक मानणें योग्य आहे असें मानलें तर त्या ज्ञापकसूत्रांत 'ङि' प्रत्यय व संबुद्धीचा प्रत्यय या दोनच प्रत्ययांचा निर्देश केला असल्यामुळें, तेवढ्या दोनच प्रत्ययांपुरतें तें सूत्र वास्तविक ज्ञापक मानावें लागेल व इतर 'सुप्' प्रत्ययांच्या विषयांत तें सूत्र ज्ञापक मानतां येऊं शकणार नाहीं आणि त्यामुळें 'राज्ञः पुरुषः राजपुरुषः = राजन् ङस् पुरुष सु' या स्थलीं 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्रानें 'ङि' प्रत्ययाचा किंवा संबुद्धीच्या प्रत्ययाचा लुक् होत

नसून 'ङस्' प्रत्ययाचा लुक् होत असल्यामुळें, प्रत्ययलक्षण मानून 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रवृत्ति केल्यास, 'राजन्' हा शब्द प्रत्ययलक्षणानें प्रत्ययान्त ठरून प्रातिपदिकसंज्ञक होणार नाहीं व त्यामुळें 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' हें सूत्र येथें प्रवृत्त होऊं शकणार नाहीं व 'राजन्' यांतील अन्त्य नकाराचा लोप न होण्याची आपत्ति येईल. ती आपत्ति टाळण्याकरितां शंकाकाराला देखील वरील ज्ञापक सर्व 'सुप्' प्रत्ययांना लागू पडणारें सामान्यापेक्ष ज्ञापक आहे असें मानणें भागच पडतें. सारांश शंकाकार व दीक्षित या दोहोंमध्यें एवढाच फरक आहे कीं, शंकाकार ज्ञापकाच्या कक्षेंत सर्व 'सुप्' प्रत्ययांचा समावेश करतो व दीक्षित त्याखेरीज 'तिङ्' प्रत्ययांचा देखील समावेश करतात, आणि त्यांच्या तशा करण्याला प्रकृत सूत्रांतील 'अधातुः' हा निर्देश प्रमाण असल्यामुळें, त्यांचें म्हणणें स्वीकारणेंच योग्य आहे. त्यामुळें 'अहन्' या स्थलीं ज्या 'त्' प्रत्ययाचा लोप झाला आहे तो 'त्' प्रत्यय कायम आहे असें, प्रातिपदिकसंज्ञा करतेवेळीं, प्रत्ययलक्षणानें मानतां येऊं शकत नसल्यामुळें, 'अहन्' हें प्रातिपदिकसंज्ञक पद ठरून त्यांतील अन्त्य नकाराचा लोप होण्याची दीक्षितांनीं मनोरमेंत जी आपत्ति दर्शविली आहे ती अगदीं योग्य ठरते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'सार्वधातुकमपित्' सू. १.२.४ या सूत्रावरील भाष्यांत हीच रीति स्वीकारली आहे, म्हणजे ज्ञापक सामान्यापेक्ष मानल्यास जर कांहीं बाध येत असेल तरच तें विशेषापेक्ष ज्ञापक मानावें व कांहीं बाध येत नसल्यास तें सामान्यापेक्ष ज्ञापक मानणेंच उचित आहे असें त्या भाष्यावरून सिद्ध होतें. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत देखील हेंच स्पष्टपणें सांगितलें आहे, म्हणजे प्रत्ययलक्षण मानून 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रवृत्ति करतां येत नाहीं याचें 'न ङिसम्बुद्ध्योः' हें सूत्र ज्ञापक आहे. असें भाष्यकारांनीं स्पष्ट म्हटलें आहे. ('सार्वधातुकमपित्' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं असा प्रश्न केला आहे कीं, त्या सूत्रांत 'सार्वधातुकम्' हें

पद कां घातलें आहे व त्या प्रश्नाचें असें उत्तर दिलें आहे कीं, जर 'अपित्', म्हणजे पित्‌भिन्न प्रत्यय ङित् होतो, एवढेंच सूत्र केलें असतें तर पित्‌भिन्न आर्धधातुकप्रत्यय ङित् झाला असता व त्यामुळें 'कर्ता, हर्ता' इत्यादि स्थलीं जो 'तृच्' प्रत्यय झाला आहे तो पित् नसल्यामुळें ङित् झाला असता आणि 'क्ङिति च' सू. २२१७ हें निषेधक सूत्र असल्यामुळें, 'सार्वधातुकार्धधातुकयोः' सू. २१६८ या सूत्रानें होणारा गुण झाला नसता व वरील इष्ट रूपें सिद्ध न होण्याची आपत्ति आली असती. पण पुढें भाष्यकार असें म्हणतात कीं, वर दर्शविलेली आपत्ति आली नसती; कारण पाणिनीनें कांहीं आर्धधातुकप्रत्ययांना इत्संज्ञक ङकार हा अनुबन्ध लावला असल्यामुळें हें सूचित होतें कीं, पित्‌भिन्न आर्धधातुक प्रत्यय वरील सूत्रानें ङित् होत नाहींत. पाणिनीनें ज्या आर्धधातुकप्रत्ययांना ङकारानुबन्ध लावला आहे ते 'चङ्, अङ्, नजिङ्, ङ्वनिप्, अथङ्, नङ्' हे प्रत्यय होत. ङित्करणरूप वर जें ज्ञापक दाखविलें आहे तें सार्वधातुक-प्रत्ययांना देखील लागू पडेल असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'चङ्' वगैरे प्रत्ययांच्या जातीचे, म्हणजेच आर्धधातुक, जे प्रत्यय आहेत त्यांनाच तें ज्ञापक लागूं शकतें. पण भाष्यकार पुढें म्हणतात कीं तसें मानल्यास, 'चङ्' व 'अङ्' हे दोन प्रत्यय लुङ् पुढें असतांना मध्यें होणाऱ्या विकरणासंबंधाचेच ज्ञापक होतील; 'नजिङ्' प्रत्ययांतील ङकार वर्तमानकालवाचक प्रत्ययांचाच व 'ङ्वनिप्' प्रत्ययांतील ङकार भूतकालवाचक प्रत्ययांचाच ज्ञापक होईल; 'अथङ्' प्रत्ययांतील ङकार उणादि प्रत्ययांच्या संबंधानेंच ज्ञापक होईल व 'नङ्' प्रत्ययांतील ङकार 'घञ्' प्रत्ययांच्या अर्थामध्यें होणाऱ्या प्रत्ययांचाच ज्ञापक होईल आणि त्यामुळें 'कर्ता, हर्ता' इत्यादि उदाहरणांत जो 'तृच्' प्रत्यय झाला आहे त्याला वर दाखविलेल्या ज्ञापकांपैकीं कोणतेंच ज्ञापक लागू पडत नसल्यामुळें तो 'तृच्' प्रत्यय ङित् होण्याची आपत्ति येईल आणि ती आपत्ति टाळण्याकरितां त्या सूत्रांत 'सार्वधातुकम्'

हें पद असणें आवश्यक आहे. या भाष्याचा भावार्थ सांगतांना भैरवी-कारांनीं 'एवं च यथा बाधकसत्वात् तत्र न सामान्यापेक्षत्वं किन्तु विशेषापेक्षत्वेन चारितार्थ्यमित्युक्तं तथा अत्रापि बाधकसत्वे विशेषापेक्षत्वं तदभावे तु सामान्यापेक्षत्वं भविष्यतीति तात्पर्यम्' असें म्हटलें आहे व याचा अर्थ पूर्वीं दिलाच आहे. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत 'सुब्लोपे च प्रत्ययलक्षणत्वात्' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात 'सुब्लोपे च प्रत्ययलक्षणेन प्रतिषेधः प्राप्नोति। राजा, तक्षा। प्रत्ययलक्षणेन प्रत्ययो नेति प्रतिषेधः प्राप्नोति। नैष दोषः। आचार्यप्रवृत्तिर्ज्ञापयति न प्रत्ययलक्षणेन प्रतिषेधो भवतीति यदयं न ङिसम्बुद्धयोः इति प्रतिषेधं शास्ति।' या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पर्युदासाची प्रत्ययलक्षणानें प्रवृत्ति करतां येत नाहीं).

शब्दरत्न—अत्र सुप्सिपोरिति। तयोः प्रातिपदिकत्वे तत्सा-मर्थ्यादौत्सर्गिकैकवचने तच्छ्रवणापत्तिः। विभक्त्यर्थस्य लिङ्गं प्रति स्वरूपायोग्यत्वेन न नपुंसकत्वाश्रयोविभक्तिलुक्। तत्सत्त्वे तु पदा-दित्वेन षत्वनिषेधापत्तिर्दोष इति भावः। तत्रैवेति। अत्राप्यौत्सर्गिकै-कवचनापत्तिः, "सुपो धातु—" इति लुगापत्तिश्च, पचेरन्नित्यादौ नलोपापत्तिश्चेति भावः। स्यादेवेति। पूर्वं विभक्त्युत्पत्तये जातस्याति-देशेन विभक्त्यन्ते बुद्धिरिति भावः। यथोद्देशेऽपीति। अपिना कार्यकालपक्षेऽपि। न हि तत्र पक्षे उपदेशेनैवैकवाक्यता नातिदेशे-नेत्यत्र मानमस्ति, अतिदेशैकवाक्यतयैव ह्रस्वप्राप्तेः सुवचत्वात्। प्रातिपदिकग्रहणं वेति। नपुंसकवृत्तित्वस्य प्रातिपदिकधर्मत्वान्नपुंसके वर्तमानस्येस्यर्थेनैव प्रातिपदिकलाभे सिद्धे तस्य व्यर्थत्वादिति भावः। उक्तार्थे = विभक्त्येकादेशस्यान्तवत्त्वाभावे। सामान्यापेक्षमिति। अन्यथा ह्रस्व एव न स्यात्स्वाद्युत्पत्तिस्तु स्यादेवेति भावः। यद्यपीदं प्रातिपदिकग्रहणं सत्त्वप्रधानप्रातिपदिकग्रहणार्थम्, तेनात्र न ह्रस्वः, मूलोक्तार्थे ज्ञापिते चारितार्थ्यं दुर्निरूपं च। संख्याकर्माद्ययोगात्स्वा-द्युत्पत्तिरपि न, औत्सर्गिकमेकवचनमपि न, गमकं विना तदनुत्पत्तेः।

"सुपो धातु—" इति लुगपि न, धातुसाहचर्येण सुप्तिङन्त रसमभिव्याहृतस्यैव तेन लुग्विधानात् । एवं च प्रत्ययान्तपर्युदासो न कर्तव्य इति सूत्रशेषे भाष्ये ध्वनितम् । पचेरन्, सर्वस्मिन्नित्यादौ नकारोच्चारणसामर्थ्येन न नलोपः, तथाप्येतावत्क्लिष्टकल्पनापेक्षया लाघवात्प्रत्ययान्तपर्युदास एवोचित इति भावः ।

'अप्रत्ययः किम् ? हरिषु, करोषि । अत्र सुप्सिपोर्मा भूत्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, (प्रकृत सूत्रांतून 'अप्रत्ययः' हें पद गाळल्यास, 'हरिषु, करोषि' या स्थलीं 'सु, सि' या प्रत्ययांना प्रातिपदिकसंज्ञा होईल व) त्यांना ती संज्ञा झाल्यानें त्या संज्ञेच्या सामर्थ्यानें ('ङ्याप्प्रातिपदिकात्' या अधिकारसूत्रान्वयें) औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय होऊन त्या प्रत्ययाचें श्रवण होण्याची आपत्ति येईल, म्हणजे त्या प्रत्ययाचा लुक् न होतां तो प्रत्यय कायम राहील. (जरी 'सु, सि' या प्रत्ययांहून औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय झाला तरी, 'सामान्ये नपुंसकम्' या वचनान्वयें 'सु, सि' हीं नपुंसक प्रातिपदिकें मानल्यानें 'स्वमोर्नपुंसकात्' सू. ३१९ या सूत्रानें त्या प्रत्ययाचा लुक् होईलच व त्यामुळें त्या प्रत्ययाचें श्रवण होण्याची जी वर आपत्ति दर्शविली आहे ती बरोबर नाहीं असें कोणी म्हटल्यास, त्या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं) विभक्ति प्रत्ययाच्या अर्थामध्यें लिङ्गबोध करून देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें (व तसें सामर्थ्य प्रत्ययभिन्न अर्थवान् प्रातिपदिकांतच असल्यामुळें) 'स्वमोर्नपुंसकात्' या सूत्रानें नपुंसकत्वाच्या आश्रयानें जो विभक्तिप्रत्ययाचा लुक् होणें सांगितलें आहे तो लुक् (प्रत्ययाहून झालेल्या औत्सर्गिक एकवचनाच्या प्रत्ययाचा) होऊं शकणार नाहीं. (प्रकृत सूत्रावरील भाष्याच्या अखेरीस भाष्यकार म्हणतात—'कस्य च नपुंसकं गुणः ? । प्रातिपदिकस्य' व तसेंच 'ह्रस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' १·२·४७ या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत कैयटानें देखील 'नपुंसकलिङ्गं द्रव्यस्यैव सम्भवति । द्रव्यवाचित्वं च प्रातिपदिकस्यैव, न तु सुबन्तस्य, शक्तिप्रधानत्वात्,

नापि तिङन्तस्य, क्रियाप्रधानत्वात्' असें म्हटलें आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं, विभक्तिप्रत्ययांत लिङ्गबोधन करण्याचें सामर्थ्य नसून तें प्रातिपदिकांतच असतें. म्हणून विभक्तिप्रत्ययाहून औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय केला असतां, तो प्रत्यय नपुंसकलिङ्गबोधक प्रातिपदिकाहून झाला नसल्यामुळें, त्याचे ठिकाणीं 'स्वमोर्नपुंसकात्' या सूत्राची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं व त्या प्रत्ययाचा लुक् होऊं शकत नाहीं.) जर 'सु, सि' हे प्रत्यय नपुंसकलिङ्गाची बोधक प्रातिपदिकें आहेत असें मानलें तर (व त्यांहून झालेल्या औत्सर्गिक एकवचनाच्या प्रत्ययाचा लुक् केला तर 'सु, सि' यांना प्रत्यय-लक्षणानें पदसंज्ञा होईल व त्यांत) सकार हा आद्य वर्ण असल्यामुळें, 'सात्पदाद्योः' सू. २१२३ या निषेधान्वयें, त्या सकाराचें षत्व न होण्याची आपत्ति येईल असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. (या विषयाचें विवरण पूर्वीं मनोरमेंत केलेंच आहे.) 'अप्रत्ययान्तः किम् ? । तत्रैव विभक्तिविशिष्टयोर्मा भूत्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, (प्रकृत सूत्रांत 'अप्रत्ययः=अप्रत्ययान्तः' हा पर्युदास नसल्यास, 'हरिषु, करोषि' या प्रत्ययान्तांना प्रातिपदिकसंज्ञा होऊन) त्यांहून देखील औत्सर्गिक एकवचनाचा प्रत्यय होण्याची आपत्ति येईल व 'सुपो धातुप्राति-पदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें ('सु, सि' या प्रातिपदिकावयव होणाऱ्या) विभक्तिप्रत्ययांचा लुक् होण्याची आपत्ति येईल, आणि त्याचप्रमाणें 'पचेरन्' इत्यादि स्थलीं अन्त्य नकाराचा लोप होण्याची आपत्ति येईल. ('पचेरन, सर्वस्मिन्' इत्यादि शब्द जरी प्रत्ययान्त आहेत तरी, प्रकृत सूत्रांत 'अप्रत्ययान्तः' हा पर्युदास नसल्यास, त्यांना प्रातिपदिकसंज्ञा होईल व त्यांहून एकवचनाचा औत्सर्गिक 'सु' प्रत्यय होईल आणि जरी त्या 'सु' प्रत्ययाचा 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें लोप होईल तरी प्रत्यय-लक्षणानें 'पचेरन्, सर्वस्मिन्' हीं प्रातिपदिकसंज्ञक पदें ठरून 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें त्यांतील अन्त्य

नकाराचा लोप होण्याची आपत्ति येईल.) 'अन्तवद्भावेन काण्डे कुडये इत्यादौ प्रातिपदिकत्वं स्यादेव' असें जें मनोरमेंतील शंकाग्रन्थांत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'काण्डे, कुडये' इत्यादि स्थलीं विभक्तिप्रत्यय होण्यापूर्वीं 'काण्ड, कुडय' यांना विभक्तिप्रत्यय होण्यास कारणीभूत असलेली प्रातिपदिकसंज्ञा 'अन्तादिवच्च' सू. ७५ या अतिदेशानें 'काण्डे, कुडये' या विभक्त्यन्त शब्दांचे ठिकाणीं पूर्वान्तवद्भावानें होईल (व त्यामुळें 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' सू. ३१८ या सूत्रानें त्या विभक्त्यन्त शब्दांतील अन्त्य एकाराचा ऱ्हस्व–इकार–होण्याची आपत्ति येईल. या विषयाचें विवेचन मनोरमेंत केलेंच आहे.) 'यथोद्देशेऽपि' या मनोरमेंतील पंक्तींत 'अपि' हा शब्द घातला असल्यामुळें, ('विभक्त्येकादेशो नान्तवत्' हा जो परिहार यथोद्देशपक्षांत सांगितला आहे) तो कार्यकालपक्षांत देखील लागू पडतो. कार्यकालपक्षांत संज्ञासूत्र विधिसूत्राशींच एकवाक्यतापन्न होतें व अतिदेशविधायक-सूत्राशीं एकवाक्यतापन्न होत नाहीं असें म्हणण्यास कांहींच प्रमाण नाहीं. वास्तविक प्रातिपदिकसंज्ञाविधायक प्रकृत सूत्र 'अन्तादिवच्च' या अतिदेशविधायक सूत्राशीं एकवाक्यतापन्न झाल्यानेंच 'काण्डे, कुडये' या स्थलीं ऱ्हस्वाची प्राप्ति होते असें म्हणतां येऊं शकतें. (दीक्षितांच्या मतें 'काण्डे, कुडये' यांना कार्यकालपक्षांत 'अप्रत्य-यान्तः' या पर्युदासाच्या बलानें प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. पण शब्दरत्नकार असें म्हणतात कीं, त्या पक्षांत देखील 'अन्तादिवच्च' सू. ७५ या सूत्राशीं प्रातिपदिकसंज्ञाविधायक प्रकृत सूत्र एकवाक्य-तापन्न झाल्यानें, पूर्वान्तवद्भावानें 'काण्डे, कुडये' यांना प्राति-पदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते व 'विभक्त्येकादेशो नान्तवत्' हा सिद्धान्त असल्यामुळेंच ती आपत्ति टळते. म्हणून तो सिद्धान्त दोन्ही पक्षांत सारखाच लागू करणें उचित आहे.) 'ऱ्हस्वो नपुंसके इति सूत्रे प्रातिपदिकग्रहणं वा उक्तार्थे सामान्यापेक्षं ज्ञापकमस्तु' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, नपुंसकत्व

हा प्रातिपदिकाचे ठिकाणीं राहणारा धर्म असल्यामुळें ('ऱ्हस्वो नपुंसके' एवढेंच सूत्र केलें असतें तरी त्या सूत्रांतील 'नपुंसके' या पदाचा) 'नपुंसके वर्तमानस्य' असा अर्थ झालाच असता व त्या अर्थाच्या सामर्थ्यानेंच 'प्रातिपदिकस्य' या पदाचा आपोआपच लाभ–आक्षेप–झाला असता, आणि असें असून देखील पुन्हा त्या सूत्रांत 'प्रातिपदिकस्य' या पदाचें जें ग्रहण केलें आहे तें व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. (तें प्रातिपदिकग्रहण व्यर्थ न ठरावें याकरितां हें मानणें आवश्यक आहे कीं, विभक्तिप्रत्ययाशीं एकादेश झाला असतां ज्याला पूर्वान्तवद्भावानें प्रातिपदिक मानतां येतें तशा एकादेशान्त प्रातिपदिकाचा अन्त्य दीर्घ अच् ऱ्हस्व न होतां, जें मूळचें दीर्घ अजन्त प्रातिपदिक आहे तशाच प्रातिपदिकाच्या अन्त्य अचाचा त्या सूत्रानें ऱ्हस्व होऊं शकतो. असें मानलें असतां, 'काण्ड, कुड्य' हीं मूळचीं ऱ्हस्वान्त प्रातिपदिकें असून दीर्घान्त प्रातिपदिकें नसल्यामुळें, विभक्तिप्रत्ययाशीं एकादेश झाल्यावर पूर्वान्तवद्भावानें 'काण्डे, कुड्ये' हीं प्रातिपदिकें मानतां येऊं शकलीं तरी, तशा एकादेशानें दीर्घान्त झालेल्या व मूळच्या दीर्घान्त नसलेल्या प्रातिपदिकांचा अन्त्य दीर्घ अच् 'ऱ्हस्वो नपुंसके' सू. ३१८ या सूत्रानें ऱ्हस्व होऊं शकत नाहीं.) मनोरमेंतील वरील पंक्तींत 'उक्तार्थे' हा जो शब्द आहे त्याचा 'विभक्त्येकादेशस्यान्तवत्वाभावे,' म्हणजे 'विभक्त्येकादेश हा पूर्वाचा अन्तवत् होत नाहीं याचें,' असा अर्थ आहे. 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' या सूत्रांतील 'प्रातिपदिकस्य' हें पद सामान्यापेक्ष ज्ञापक न मानतां विशेषापेक्ष ज्ञापक मानल्यास, ('काण्डे, कुड्ये' या स्थलीं) केवळ ऱ्हस्वकार्य होणार नाहीं, परंतु सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येईलच असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. (वरील ज्ञापक विशेषापेक्ष मानल्यानें 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' या सूत्रांत ज्या ऱ्हस्वकार्याचें विधान केलें आहे तेवढ्याचपुरतें तें ज्ञापक ठरेल व 'ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ या अधिकारसूत्रानें प्रातिपदिकाहून सुबुत्पत्ति होण्याचें जें विधान

केलें आहे त्याला तें ज्ञापक लागू पडणार नाहीं. त्यामुळें 'काण्डे, कुडये' या स्थलीं जरी ऱ्हस्वकार्य होण्याची आपत्ति टळेल तरी सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति कायम राहीलच. पण प्रातिपदिकाहून जीं जीं कार्यें होण्याची प्राप्ति आहे त्या सर्व कार्यांना लागू पडणारें तें सामान्यापेक्ष ज्ञापक आहे व तीं कार्यें होऊं शकत नाहींत असें मानल्यानेंच सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति टाळतां येते.) 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' या सूत्रांत 'प्रातिपदिकस्य' या पदाचें ग्रहण द्रव्यप्रधान प्रातिपदिकाचें ग्रहण व्हावें याकरितां केलें आहे व त्यामुळें 'काण्डे, कुडये' या स्थलीं (विभक्तिप्रत्ययाचा अर्थ प्रधान व विशेष्य असून द्रव्यवाचक प्रातिपदिकाचा अर्थ अप्रधान व विशेषणरूप असल्यामुळें व अशा रीतीनें 'काण्डे, कुडये' या शब्दांनीं द्रव्यप्रधान प्रातिपदिकांचें ग्रहण होत नसून विभक्त्यर्थप्रधान शब्दांचें ग्रहण होत असल्यामुळें) त्या सूत्रानें होणारें ऱ्हस्वकार्य होऊं शकत नाहीं आणि तसेंच त्या सूत्रांतील 'प्रातिपदिकस्य' या पदाचें ग्रहण मनोरमेंत सांगितल्याप्रमाणें 'विभक्त्येकादेशो नान्तवत्' या सिद्धान्ताचें ज्ञापक मानल्यास, तें पद 'स्वांशे चरितार्थ' ठरतें असें म्हणतां येणें अशक्य आहे. तसेंच 'काण्डे, कुडये' या विभक्त्यर्थप्रधान शब्दांचा संख्या, कारक इत्यादिकांशीं योग होणें संभवत नसल्यामुळें त्यांहून सुबुत्पत्ति देखील होऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें औत्सर्गिक एक-वचनाचा प्रत्यय देखील त्यांहून होऊं शकत नाहीं; कारण कांहीं तरी गमक–ज्ञापक–असल्याशिवाय तसा औत्सर्गिक प्रत्यय करतां येत नाहीं (हें पूर्वीं सांगितलेंच आहे.) तसेंच 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'सुप्' विभक्तिप्रत्ययाचा लुक् देखील होऊं शकत नाहीं; कारण त्या सूत्रांत 'धातु' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें त्या पदाच्या साहचर्यानें असा अर्थ निष्पन्न होतो कीं, 'सुप्, तिङ्' व तद्भिन्न प्रत्यय यांचें ज्या समुदायांत एकत्र सहोच्चारण झालें आहे तशा समुदायांतीलच 'सुप्' चा त्या सूत्रानें लुक् होऊं शकतो. ('काण्ड, कुडय' हीं द्रव्यप्रधान प्रातिपदिकें

असून त्यांनीं 'काण्ड, कुडय' या द्रव्यरूप अर्थाचा बोध होतो. त्यांहून अधिकरणार्थप्रधान 'ङि = इ' हा सप्तमीच्या एकवचनाचा प्रत्यय केला असतां, विभक्त्यर्थ प्रधान होऊन प्रातिपदिकार्थ अप्रधान—विभक्त्यर्थाचें विशेषण—होतो व 'काण्डे, कुडये' यांचा 'काण्डरुपाधिकरणे, कुडयरुपाधिकरणे' असा अर्थ होतो. या अर्थामध्यें अधिकरणरूप विभक्त्यर्थ प्रधान असून द्रव्यरूप प्रातिपदिकार्थ अप्रधान असल्यामुळें व 'ऱ्हस्वो नपुंसके' या सूत्रांत प्रकृत सूत्रांतून 'प्रातिपदिक' या शब्दाची अनुवृत्ति करतां येत असून देखील त्या सूत्रांत 'प्रातिपदिकस्य' या पदाचें जें मुद्दाम ग्रहण केलें आहे तें द्रव्यप्रधानार्थबोधक नपुंसक प्रातिपदिकाचें ग्रहण व्हावें व तशाच प्रातिपदिकाला ऱ्हस्वकार्य व्हावें याकरितां केलें असल्यामुळें, 'काण्डे, कुडये' हीं जरी पूर्वान्तवद्भावानें प्रातिपदिकें मानलीं तरी, त्या विभक्त्यर्थप्रधान शब्दांना त्या सूत्रानें सांगितलेलें ऱ्हस्वकार्य होऊं शकत नाहीं. त्यांना प्रातिपदिक मानल्यास त्यांहून सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येईल असें म्हणणें असल्यास, तें म्हणणें देखील बरोबर नाहीं; कारण संख्याकारकबोधक प्रातिपदिकाहूनच सुबुत्पत्ति होऊं शकते व वरील विभक्त्यर्थप्रधान शब्दांचा संख्येशीं किंवा कारकाशीं मुळींच योग संभवत नाहीं हें 'ऱ्हस्वो नपुंसके' १.२.४७ या सूत्रावरील भाष्यावरून स्पष्ट होतें. त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात— 'तिबन्तं चापि किंचित् विभक्त्यर्थप्रधानं, किं चित् क्रियाप्रधानम् । काण्डे, कुडये इति विभक्त्यर्थप्रधानं, रमते ब्राह्मणकुलमिति क्रियाप्रधानम् । न चैतयोरर्थयोर्लिङ्गसङ्ख्याभ्यां योगोऽस्ति ।' तसेंच कांहीं गमक नसल्यामुळें 'काण्डे, कुडये' यांहून पूर्वीं सांगितल्याप्रमाणें एकवचनाचा औत्सर्गिक प्रत्यय देखील होऊं शकत नाहीं. आणखी असें कीं, 'सत्वप्रधानप्रातिपदिकग्रहणार्थं प्रातिपदिकग्रहणम्' असें मानलें असतां, जसें 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' या सूत्रांतील 'प्रातिपदिकस्य' या पदाचें ग्रहण स्वांशे चरितार्थ ठरतें तसें तें पद 'विभक्त्येकादेशो

नान्तवत्' या सिद्धान्ताचें सामान्यापेक्ष ज्ञापक मानल्यास, स्वांशे चरितार्थ ठरत नाहीं व स्वांशे चरितार्थ ठरणें हें ज्ञापकाचें एक लक्षण असल्यामुळें, तें पद वरील सिद्धान्ताचें ज्ञापक देखील मानतां येत नाहीं. दुसरें असें कीं, 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्रांत 'धातु' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें त्या पदाच्या साहचर्यानें साहचर्यन्यायान्वयें हें ज्ञापित होतें कीं, 'धात्वयवस्य यादृशस्य सुपो लुग्भवति तादृशस्यैव प्रातिपदिकावयवस्य सुपो लुग्भवति,' म्हणजे धात्ववयव असणाऱ्या जशा प्रकारच्या 'सुप्' चा लुक् होतो तशाच प्रकारच्या प्रातिपदिकावयव असणाऱ्या 'सुप्' चा लुक् होतो. त्यामुळें त्या सूत्राचा असा अर्थ निष्पन्न होतो कीं, सुबन्त किंवा तिङन्त व सुप्तिङ्भिन्न प्रत्यय यांच्या समभिव्याहारानें—यांचें एकत्रीकरण होऊन – बनलेले जे प्रातिपदिक त्यांतीलच अवयवरूप 'सुप्' चा – अन्तर्वर्ति सुबादिविभक्तिप्रत्ययांचा – लुक होतो. या अर्थान्वयें 'राज्ञः पुरुषः = राजपुरुषः = राजन् ङस् पुरुष सु' या स्थलीं जो दोन सुबन्तांचा समासरूप समुदाय 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञक ठरतो त्यांतील 'ङस्' व 'सु' या विभक्ति-प्रत्ययांचें सहोच्चारण असल्यामुळें, वरील सूत्रानें त्यांचा लुक् होतो, आणि तसेंच 'पुत्र अम् क्यच्' हा जो सुबन्ताचा व सुप्तिङ्भिन्न 'क्यच्' या कृत्प्रत्ययाचा समुदाय आहे तो 'सनाद्यन्ता धातवः' सू. २३०४ या सूत्रानें धातुसंज्ञक ठरत असल्यामुळें, त्या समुदायाचा अवयव जो 'अम्' हा विभक्तिप्रत्यय आहे. त्याचा 'क्यच्' प्रत्यया-सह उच्चार केला असल्यामुळें, त्याचा वरील सूत्रानें लुक् होऊन व 'क्यचि च' सू. २६५८ या सूत्रानें 'पुत्र' यांतील अन्त्य अकाराचा ईकार होऊन 'पुत्रीय' असा क्यजन्त नामधातु सिद्ध होऊन त्याची 'आत्मनः पुत्रमिच्छति' या अर्थामध्यें 'पुत्रीयति' इत्यादि रूपें सिद्ध होतात. 'काण्डे, कुडये' या स्थलीं 'ङि = इ' हा एकच 'सुप्' असल्यामुळें व त्याचा इतर 'सुप्' किंवा 'तिङ्' किंवा तद्भिन्न प्रत्यय-यांसह समभिव्याहार–सहोच्चारण–नसल्यामुळें, त्या रूपांतील अन्त्य

'ए' चा 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्रानें मुळींच लुक् होऊं शकत नाहीं.) म्हणून प्रकृत सूत्रांत प्रत्ययान्ताचा पर्युदास करण्याची कांहीं गरज नाहीं असें प्रकृत सूत्रावरील भाष्याच्या अखेरीस ध्वनित केलें आहे. (त्या भाष्यांत भाष्यकारांनीं असा प्रश्न केला आहे कीं, प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' हा पर्युदास मानावा किंवा प्रसज्यप्रतिषेध मानावा. तो पर्युदास मानल्यास, विभक्तिप्रत्ययाबरोबर एकादेश झाला असतां, तशा एकादेशान्त 'काण्डे, कुडचे, रमते' इत्यादि प्रत्ययान्त शब्दांना पूर्वान्तवद्भावानें जी प्रातिपदिकसंज्ञा होऊं पाहते तिचा निषेध करावा लागेल. 'अप्रत्ययः' हा प्रसज्य-प्रतिषेध मानल्यास, 'ब्रम्हबन्धू' या ऊङन्त शब्दाला प्रातिपदिक-संज्ञेचा निषेध होऊं लागेल. अशा रीतीनें दोन्ही पक्षांत दोष दाखवून अखेरीस भाष्यकार म्हणतात—'तस्मादुभाभ्यामपि वक्तव्यं स्याद् ऱ्हस्वो नपुंसके यत्तस्येति । किं च नपुंसके ? । नपुंसकं यस्य गुणः । कस्य च नपुंसकं गुणः ? प्रातिपदिकस्य ।' हेंच तें भाष्य होय कीं ज्या संबंधानें शब्दरत्नांत 'एवं च प्रत्ययान्तपर्युदासो न कर्तव्य इति सूत्रशेषे भाष्ये ध्वनितम्' असें म्हटलें आहे. या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, प्रकृत सूत्रांतील 'अप्रत्ययः' हा जे पर्युदास मानतात किंवा प्रसज्यप्रतिषेध मानतात त्या दोघांच्याहि मतें 'काण्डे' हें प्रातिपदिक आहे असें मानलें जाऊन 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' या सूत्रानें ऱ्हस्व होऊं लागेल आणि त्या दोषाचें निवारण करण्याकरितां त्या सूत्राऐवजीं 'ऱ्हस्वो नपुंसके यत्तस्य' असें सूत्र पठित करावें लागेल. तसें सूत्र पठित केलें असतां, ज्याचे ठिकाणीं नपुंसकत्व हा धर्म आहे त्याचाच त्या सूत्रानें ऱ्हस्व होऊं शकतो व प्रकृत स्थलीं नपुंसकलिङ्ग हा धर्म 'काण्ड' या मूळ प्राति-पदिकांत असून 'काण्डे' या प्रत्ययान्त शब्दांत नसल्यामुळें, 'काण्डे' यांतील अन्त्य एकाराचा ऱ्हस्व होण्याची आपत्ति टळते. या भाष्यावर उद्योतकार असें म्हणतात—'एवं च प्रत्ययान्तपर्युदासो निषेधो वेत्त्युभय-मपि व्यर्थम् । तत्फलं हि तत्र ऱ्हस्वव्यावृत्तिरेव, तस्यामन्यथासिद्धायां

तद्व्यर्थमेवेति भावः। फलान्तरं तु नास्त्येव, औत्सर्गिकैकवचनस्येष्ट-सिद्ध्यर्थं क्वाचित्कत्वेन तदर्थस्य सङ्ख्याकर्माद्ययोगेन च सुबनापत्तेः। न च प्रत्ययान्तस्य प्रातिपदिकत्वे तदवयवसुपो लुगापत्तिः, विधिवैयर्थ्यापत्तेः। तस्माद्धातुसाहचर्याद्विभक्त्यतिरिक्तशब्दघटित-प्रातिपदिकावयवस्यैव तेन लुगिति न दोषः।' या उद्योता-वरून हें स्पष्ट होतें कीं, वरील भाष्यांत भाष्यकारांनीं जें म्हटलें आहे त्याचा वास्तविक हा आशय आहे कीं, प्रकृत सूत्रांत प्रत्ययान्ताचा पर्युदास करण्याची कांहीं गरज नाहीं; कारण तो पर्युदास न केल्यास ज्या आपत्ति येऊं पाहतात त्या सर्व आपत्तींचें इतर रीतीनें सहज निवारण करतां येतें. पण प्रकृत सूत्रांतून 'अप्रत्ययान्तः' हा पर्युदास गाळल्यास 'पचेरन्, सर्वस्मिन्' इत्यादि प्रत्ययान्त नकारान्त पदांना प्रातिपदिकसंज्ञा होईल व ते शब्द प्रतिपदिकसंज्ञक पदें ठरून त्यांच्या अन्त्य नकाराचा 'न लोपः प्राति-पदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें लोप होण्याची आपत्ति येईल अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं,) 'पचेरन्, सर्वस्मिन्' इत्यादि स्थलीं नकारोच्चारण-सामर्थ्यामुळें, नकाराचा लोप होण्याची आपत्ति येत नाहीं. ('झस्य रन्' सू. २२५६, 'ङसिङ्योस्मात्स्मिनौ' सू. २१६ या दोन्ही सूत्रांत प्रत्ययांचे जागीं होणारे आदेश मुद्दाम नकारान्त पठित केले असल्या-मुळें, त्या आदेशांतील अन्त्य नकाराचा 'न लोपः' सू. २३६ या सूत्रानें लोप करतां येत नाहीं. नकाराचा लोप होणें इष्ट असतें तर पाणिनीनें ते आदेश नकारान्त पठित न करितां नकाररहित पठित केले असते. सारांश प्रकृत सूत्रांत 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' असा प्रत्ययान्ताचा पर्युदास न केल्यास दीक्षितांनीं मनोरमेंत ज्या आपत्ति दाखविल्या आहेत त्या सर्व आपत्तींचें निवारण 'यद्यपीदं प्राति-पदिकग्रहणं ··· न नलोपः' या शब्दरत्नांतील पंक्तींत शब्दरत्नकारांनीं केलें आहे. तरी पण शब्दरत्नकार पुढें असें म्हणतात कीं, अशा रीतीनें दीक्षितांनीं दर्शविलेल्या आपत्तींचें निवारण करतां येऊं शकत

असल्यामुळें प्रत्ययान्ताचा पर्युदास करणें जरी अनावश्यक ठरतें) तरी, अनेक क्लिष्ट कल्पना करून प्रत्ययान्ताचा पर्युदास करणें आवश्यक नाहीं असें मानण्यापेक्षां (प्रत्ययान्ताचा पर्युदास केल्यानें कोणतीहि क्लिष्ट कल्पना करावी लागत नसल्यामुळें व अशा रीतीनें तसा) पर्युदास करण्यांतच लाघव असल्यामुळें, तसा पर्युदास करणें उचित आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.

शब्दरत्न—अतथात्वादिति । यस्माद्विहितस्तदादित्वस्यैशास्त्रीयत्वेन व्यपदेशिवद्भावालभ्यत्वादिति भावः । निषेधादिति । यद्यपि व्यपदेशिवद्भावेनैकाच्त्वादेरिवास्याप्यशास्त्रीयस्यातिदेशेन लाभसंभवः, अतएव भवतीत्यादौ भवतेः शब्निरूपिताङ्गत्वसिद्धिः, व्यतिसे इत्यादौ से इत्यस्य पदत्वसिद्धिश्च, इरित्यादौ कार्यकालपक्षे तद्धितान्तत्वनिबन्धनप्रातिपदिकत्वसिद्धिश्च, युवापत्ये तत इञान्तत्वनिबन्धनफक्सिद्धिश्च । तथाप्यसहाय एव व्यपदेशिवद्भावो न तु ससहाये, तेनेतरावयवे तदप्रवृत्तिः । स्पष्टा चेयं रीतिः "आदेच उपदेशे" इत्यत्र कैयटे । अत एव सभासंनयने व्यपदेशिवद्भावेनाकारस्य नादित्वं, दरिद्राधाताविकारस्य नान्तत्वं, तथा सति वृद्धत्वप्रयुक्तश्छः, इवर्णान्तत्वप्रयुक्तोऽच्प्रत्ययश्च स्यात् । ततोऽत्र न किंचिद्वैषम्यम् । साच लोकन्यैयसिद्धा लोकेऽपि बहुपुत्रसत्त्वे नैकस्मिन् ज्येष्ठकनिष्ठादिव्यवहारः, विजातीयकन्यादिसत्त्वे त्वेकस्मिन्नपि तथा व्यवहारो भवत्येवेति बोध्यम् । अत एव हरिञित्यादौ सोः पदत्वं न । "निजौ चत्वार एकाच" इति भाष्यं त्वेकस्मिन्नित्यस्यापर्यालोचनयैकदेश्युक्तिरिति तात्पर्यम् । वस्तुतस्तु पर्युदासेनैवार्थवत्त्वे लब्धे अर्थवद्ग्रहणादत्र सूत्रेऽपि विभक्तीतरानपेक्षायाऽर्थबोधभाष्यमनुपपन्नमत आह—निजौ चत्वार इतीति । तात्पर्यमिति । प्रत्ययपर्युदासाङ्गीकर्तुर्मूलकृत इति शेषः । एतेनारुचिर्ध्वनिता, तामुद्घाटयति—वस्तुतस्त्वित्यादिना । अत्र = सूत्रेऽपीति । अपिनोत्तरसूत्रसङ्ग्रहः । तेनैकरूपता द्वयोर्भवति, मूलरीत्यातु वैरूप्यं स्फुटमेव । ननु भवदुक्तार्थवत्त्वमलौकिकविग्रहवादिकत्वाक्षतिः । तदा प्रत्ययस्य प्राप्तिरेव न, इति केवलप्रत्ययपर्युदासो

व्यर्थः । ध्वनितं चेदं प्रत्ययपर्युदासानुक्त्या भाष्ये । "सुप्तिङन्तम्–" इति सूत्रस्थभाष्यकैयटयोरप्यत्रैव तात्पर्यमिति बोध्यम् ।

'केवलस्य च अतथात्वात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'प्रत्ययग्रहणे यस्मात्स विहितस्तदादेः'– परि. २३–या परिभाषान्वयें प्राप्त होणारा तदादित्वधर्म अशास्त्रीय असल्यामुळें, तसा धर्म प्रत्ययाचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भावानें आणतां येऊं शकत नाहीं. ('व्यपदेशिवदेकस्मिन्'–परि. ३०–या परिभाषान्वयें केवलाचे ठिकाणीं–प्रकृतिरहित केवल प्रत्ययाचे ठिकाणीं– शास्त्रीय धर्माचाच अतिदेश करतां येतो. 'तदादित्व' हा शास्त्रीय धर्म नसून अशास्त्रीय धर्म असल्यामुळें, तशा अशास्त्रीय धर्माचा असहाय प्रत्ययाचे ठिकाणीं अतिदेश करतां येत नाहीं व केवळ प्रत्ययाला प्रत्ययान्त मानतां येत नाहीं.) 'एकाच्त्व' हा अशास्त्रीय धर्म असून देखील ज्याप्रमाणें व्यपदेशिवद्भावानें त्याचा अतिदेश केल्यानें त्या धर्माची प्राप्ति होऊं शकते त्याचप्रमाणें 'तदादित्व' हा अशास्त्रीय धर्म असून देखील त्याचीहि अतिदेशानें प्राप्ति करून देतां येणें शक्य आहे. ('एकाच्' हा अन्यपदार्थप्रधान बहुव्रीहि असून त्याचा 'एकः अच् यस्मिन् वर्णसमुदाये' असा विग्रह होतो. या अर्थान्वयें ज्या वर्णसमुदायामध्यें, उदाहरणार्थ 'गम्, हन्' इत्यादि वर्णसमुदायामध्यें, एक अच् आहे त्याला 'एकाच्' असें म्हणतां येतें. पण 'इण् गतौ' या धातूंत इतर कोणतेहि वर्ण नसून 'इ' हा एक अच्च आहे. तरी अशा 'इ'चे ठिकाणीं व्यपदेशिवद्भावानें एकाच्त्व- रूप अशास्त्रीय धर्माचा अतिदेश करतां येतो व त्याला 'एकाच्' असें म्हणतां येतें. तसें न केल्यास, त्या धातूचें 'एकाचो द्वे प्रथमस्य' सू. २१७५ या सूत्रानें होणारें द्विर्वचन होऊं शकणार नाहीं व 'इयाय' इत्यादि लिट्लकाराच्या इष्ट रूपांची सिद्धि होऊं शकणार नाहीं. सारांश 'व्यपदेशिवदेकस्मिन्' ही परिभाषा लौकिक, म्हणजेच अशास्त्रीय, व्यवहाराच्या आधारावर रचली असल्यामुळें, त्या परि- भाषान्वयें अशास्त्रीय धर्माचा देखील अतिदेश करतां येतो; आणि

असें आहे) म्हणूनच 'भवति' इत्यादि स्थलीं 'भू' याला 'शप्' प्रत्ययाचें अङ्ग मानतां येतें. (भू+शप्+ति=भो+अ+ति=भव्+अ+ति= भव+ति' या स्थलीं 'भू' नें सुरू होणारें 'भव' हें संपूर्ण शब्द-स्वरूप 'यस्मात्प्रत्ययविधिस्तदादि प्रत्ययेऽङ्गम्' सू. १९९ या सूत्रान्वयें 'तिप्' प्रत्ययाचें अङ्ग मानतां येतें. पण 'भू' हें शप्-प्रत्ययाचें अङ्ग कसें ठरावें? 'भू' या स्थलीं 'भू' हा एकटाच आहे व त्यापुढें इतर वर्णसमुदाय नाहीं व 'यस्मात्पूर्वन्नास्ति परमस्ति' अशी 'आदि' शब्दाची व्याख्या असल्यामुळें, या व्याख्ये-प्रमाणें 'भू' ला वास्तविक अङ्गसंज्ञा प्राप्त होऊं नये. तथापि 'व्यपदेशिवदेकस्मिन्' या परिभाषान्वयें 'भू' याला अङ्गसंज्ञा प्राप्त होते व तें 'शप्' प्रत्ययाचें अङ्ग मानण्यांत कांही अडचण येत नाहीं.) तसेंच 'व्यतिसे' इत्यादि स्थलीं 'से' याला पदसंज्ञा होते. ('वि+अति+अस्+से' या स्थलीं 'तासस्त्योर्लोपः' सू. २१९१ या सूत्रानें 'अस्' धातूंतील अन्त्य सकाराचा लोप होऊन व 'श्नसोरल्लोपः' सू. २४६९ या सूत्रानें त्या धातूंतील अवशिष्ट अकाराचा लोप होऊन आणि अशा रीतीनें संपूर्ण 'अस्' धातु नाहींसा होऊन त्या धातूहून झालेला 'से' हा प्रत्ययच शिलक राहतो. त्या प्रत्ययाचे ठिकाणीं प्रत्ययान्तत्वरूप बुद्धि करण्याकरितां व्यपदेशिवद्भाव करणें भाग आहे व व्यपदेशिवद्भाव केल्यानें 'से' हें प्रत्ययान्त ठरुन पद ठरतें आणि 'सात्पदाद्योः' सू. २१२३ हा निषेध असल्यामुळें, 'से' या पदांतील आद्य सकाराचें 'आदेशप्रत्यययोः' सू. २१२ या सूत्रानें होणारें षत्व होत नाहीं. व्यपदेशिवद्भाव केला नसता तर, 'से' याला पदसंज्ञा झाली नसती आणि तो केवळ प्रत्यय ठरला असता आणि त्यामुळें 'आदेशप्रत्यययोः' सू. २१२ या सूत्रानें त्यांतील सकाराचें षत्व होण्याची आपत्ति आली असती व 'व्यतिषे' असें अनिष्ट रूप झालें असतें.) तसेंच 'इः' इत्यादि स्थलीं 'इ' हा कार्यकालपक्षांत तद्धितान्त मानला जात असल्यामुळें ('कृत्तद्धितसमासाश्च' सू. १७९ या सूत्रानें) त्याला

प्रातिपदिकसंज्ञा होते व (तो शब्द 'इञ्' प्रत्ययान्त प्रातिपदिक ठरत असल्यामुळें 'यञिञोश्च' सू. ११०३ या सूत्रानें) 'युवापत्य' या अर्थामध्यें त्या इञन्त प्रातिपदिकाहून 'फक्' प्रत्यय होतो. ('अ' हा वर्ण 'विष्णु' या अर्थाचा वाचक आहे. 'अत इञ्' सू. १०९५ या सूत्रानें अदन्त प्रातिपदिकाहून अपत्यार्थक 'इञ्' प्रत्यय होणें सांगितलें आहे. 'यस्मात्पूर्वमस्ति परन्नास्ति सोऽन्तः' या व्याख्ये-प्रमाणें 'अ' हा वास्तविक अदन्त मानतां येत नाहीं; कारण तो एकटाच असून त्यापूर्वी कोणताहि वर्ण नाहीं. तथापि व्यपदेशिवद्भा-वानें त्याला अदन्त मानतां येत असल्यामुळें त्याहून 'इञ्' प्रत्यय करतां येतो. तो प्रत्यय केल्यावर 'अ + इञ् = अ + इ" अशी स्थिति झाली असतां 'यचि भम्' सू. २३१ या सूत्रान्वयें 'अ' हें अङ्ग भसंज्ञक होत असून त्या पुढें अजादि तद्धित प्रत्यय येत असल्यामुळें, 'यस्येति च' सू. ३११ या सूत्रानें 'अ' या प्रकृतीचा लोप होऊन 'इञ् = इ' हा प्रत्ययच शिलक राहतो. हा जरी केवळ तद्धित प्रत्यय आहे तरी व्यपदेशिवद्भावानें त्याला तद्धितान्त मानतां येतें आणि त्यामुळेंच 'कृत्तद्धित' या सूत्रानें त्याला प्राति-पदिकसंज्ञा होऊन त्या इञ्प्रत्ययान्त प्रातिपदिकाहून 'फक्' प्रत्यय होतो. या शब्दरत्नांतील पंक्तींत जो कार्यकालपक्षाचा मुद्दाम उल्लेख केला आहे व यथोद्देशपक्षाचा उल्लेख केला नाहीं त्याचें कारण हें कीं; यथोद्देशपक्षांत 'अ + इञ्' अशा स्थितींतच हा 'इञ्' प्रत्ययान्त समुदाय तद्धितान्त ठरून त्याला जी प्रातिपदिकसंज्ञा होते ती 'अ' या प्रकृतीचा लोप झाल्यावर देखील अवशिष्ट राहिलेल्या 'इ' या प्रत्ययाचे ठिकाणीं स्थानिवद्भावानें प्राप्त होते. पण कार्यकालपक्षांत अवशिष्ट 'इ' ला प्रातिपदिक मानतां येतें किंवा नाहीं हें ठरविण्याचा जेव्हां प्रसंग येतो तेव्हां 'कृत्तद्धितसमासाश्च' या प्रातिपदिकसंज्ञाविधायक सूत्राची उपस्थिति होते व त्या सूत्रानें तद्धित प्रत्ययाला प्रातिपदिक-संज्ञा होणें सांगितलें नसून तद्धितान्ताला प्रातिपदिकसंज्ञा होणें सांगितलें असल्यामुळें आणि अवशिष्ट 'इ' हा वास्तविक तद्धित

प्रत्यय असून तद्धितान्त नसल्यामुळें, त्याचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव केल्याशिवाय त्याला कार्यकालपक्षांत तद्धितान्त व प्रातिपदिकसंज्ञक मानतां येऊं शकत नाहीं.) तथापि असहायाचेच – एकट्याचेच – ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येतो; ससहायाचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत नाहीं. त्यामुळें जो (समुदायाचा अवयव असून समुदायांतील इतर वर्णांसह अवस्थित आहे) तशा समुदायाच्या अवयवाचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भावाची प्रवृत्ति करतां येत नाहीं. (म्हणून 'व्यतिसे' या स्थलीं 'से' हा प्रत्यय व त्याचप्रमाणें 'इः' या स्थलीं 'ई' हा तद्धितप्रत्यय असहाय असल्यामुळें, त्यांचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येतो. परंतु 'हरिषु, करोषि' या स्थलीं 'सु, सि' हे प्रत्यय प्रकृतिप्रत्ययविशिष्ट समुदायाचे अवयव असून व त्यांना प्रकृतीचें सहाय असून ते असहाय नसल्यामुळें, त्यांचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत नाहीं व त्यांना प्रत्ययान्त मानतां येत नाहीं.) 'आदेच उपदेशेऽशिति' सू. ६.१.४५ या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत कैयटानें हाच अर्थ स्पष्ट केला आहे. (त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं असा प्रश्न केला आहे कीं, त्या सूत्रांतील 'एच उपदेशे' या पदांनीं धातुपाठांत जो 'एच्' आहे त्याचें ग्रहण करावें किंवा जो एजन्त आहे त्याचें ग्रहण करावें. केवळ एचाचें ग्रहण केल्यास 'ढौक्, त्रौक्' या धातूंपुढें 'तृच्' हा अशित् प्रत्यय आला असतां, 'ढौ, त्रौ' यांतील 'औ' चे जागीं आकार होण्याची आपत्ति येईल; पण 'एच्' याचा 'एजन्त' असा अर्थ केल्यास ती आपत्ति टळते; कारण वरील दोन्ही धातु धातुपाठांत औकारान्त पठित नसून ककारान्त पठित आहेत. पण 'एच्' याचा एजन्त असा अर्थ केला तरी 'ढौक्, त्रौक्' या धातूंतील 'ढौ, त्रौ' हे एजन्त आहेत अशी व्यपदेशिवद्भावानें बुद्धि करतां येते व तशी बुद्धि केल्यास, त्यांचें आत्व होण्याची आपत्ति येतेच. यावर भाष्यकार 'अर्थवता व्यपदेशिवद्भावः,' म्हणजे जो अर्थवान् आहे त्याचेच ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येतो, असें उत्तर देतात आणि 'ढौक्, त्रौक्'

यांतील 'ढौ, त्रौ' हे अवयव अर्थवान् नसून संपूर्ण समुदाय अर्थवान् असल्यामुळें, त्या अनर्थक अवयवांचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत नाहीं व त्यांना एजन्त मानतां येत नाहीं. यावर कैयटानें 'आद्यन्तवदेकस्मिन्नित्यतिदेशोऽत्र न प्रवर्ततेऽसहायत्वाभावादौकारस्य,' म्हणजे 'ढौक्, त्रौक्' या समुदायांतील औकार ससहाय असून असहाय नसल्यामुळें त्याचे ठिकाणीं 'आद्यन्तवदेकस्मिन्' किंवा 'व्यपदेशिवदेकस्मिन्' या परिभाषान्वयें व्यपदेशिवद्भाव करतां येत नाहीं, असें म्हटलें आहे. सारांश 'अर्थवता व्यपदेशिवद्भावः' या भाष्यवचनांतील 'अर्थवता' या पदाचा लक्षणेनें 'असाहायेन' असा अर्थ केला आहे; कारण जो अर्थवान् आहे त्याला आपला अर्थ बोधित करण्याकरितां दुसऱ्याच्या मदतीची गरज पडत नसल्यामुळें, त्याला असहाय असें म्हणतां येतें.) जो असहाय आहे, म्हणजे समुदायाचा अवयव नाहीं व एकटाच आहे, त्याचेच ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत असल्यामुळें, 'सभासन्नयन' यांतील आकार व्यपदेशिवद्भावानें आदि मानतां येत नाहीं व 'दरिद्रा' या धातूंतील इकार अन्तीं आहे असें मानतां येत नाहीं. तसें मानल्यास, म्हणजे समुदायांतील अवयव जे 'आ, इ' ससहाय आहेत त्यांचे ठिकाणीं देखील व्यपदेशिवद्भाव करतां येतो असें मानल्यास, प्रथम उदाहरणांत 'वृद्ध' या संज्ञेच्या निमित्तामुळें होणारा 'छ' प्रत्यय व द्वितीय उदाहरणांत धातूंत इकार अन्तीं असतांना होणारा 'अच्' प्रत्यय होण्याची आपत्ति येईल. ('सभासन्नयन' यांतील 'आ' जरी 'भासन्नयन' या समुदायाचा आद्य अच् आहे तरी 'सभासन्नयन' या समुदायाचा आद्य अच् नाहीं आणि तो 'आ' समुदायाचा अवयव असून ससहाय असल्यामुळें, त्याचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत नाहीं व त्याला आदि मानतां येत नाहीं. त्याचप्रमाणें 'दरिद्रा' या धातूंतील इकार जरी 'दरि' याचा अन्त्य वर्ण आहे तरी तो 'दरिद्रा' या समुदायाचा अन्त्य वर्ण नसल्यामुळें, समुदायावयव असणाऱ्या त्या ससहाय इकाराचे ठिकाणीं

व्यपदेशिवद्भावानें तो अन्त्य आहे अशी बुद्धि करतां येत नाहीं. तशा ससहायाचे ठिकाणीं देखील व्यपदेशिवद्भाव करतां येतो असें मानल्यास, प्रथम उदाहरणांत 'वृद्धिर्यस्याचामादिस्तद्वृद्धम्' सू. १३३५ या सूत्रानें वृद्धसंज्ञा होऊन 'वृद्धाच्छः' सू. १३३७ या सूत्रानें वृद्धसंज्ञानिमित्तक 'छ' प्रत्यय होण्याची आपत्ति येईल व द्वितीय उदाहरणांत 'एरच्' सू. ३२३१ या सूत्रानें इकारान्त धातूला होणारा 'अच्' प्रत्यय होण्याची आपत्ति येईल.) असहायाचे ठिकाणींच व्यपदेशिवद्भाव करतां येतो व ससहायाचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत नाहीं असा नियम असल्यामुळेंच, वर जीं उदारहणें दिलीं आहेत, म्हणजे 'व्यतिसे, इः, सभासन्नयन, दरिद्रा' त्यांत कांहीं वैषम्य–दोष–येत नाहीं.' ('व्यतिसे व 'इ' या उदाहरणांत 'से, इ' हे असहाय असल्यामुळें त्यांचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येतो व त्यामुळें 'से' हें पद आहे असें मानतां येते आणि 'इ' हा तद्धित 'इञ्' प्रत्ययान्त आहे असें मानतां येतें. परंतु 'सभासन्नयन' यांतील 'आ' व दरिद्रा' या धातूंतील 'इ' हे समुदायाचे अवयव असून असहाय नसल्यामुळें, त्यांचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत नाहीं आणि अशा रीतीनें या चारहि उदाहरणांत कोणताहि दोष येत नाहीं.) 'व्यपदेशिवदेकस्मिन्' ही परिभाषा लौकिकन्यायसिद्ध आहे. लौकिक व्यवहारांत देखील एखाद्या पुरुषास अनेक पुत्र असल्यास कोणत्याहि पुत्राचे ठिकाणीं 'ज्येष्ठ, कनिष्ठ' इत्यादि व्यवहार करतां येत नाहीं; परंतु त्या पुरुषास पुत्राहून भिन्न अशा कन्या इत्यादि असून एकच पुत्र असल्यास, त्या पुत्राचे ठिकाणीं 'ज्येष्ठ, कनिष्ठ' इत्यादि व्यवहार करतां येतात हें लक्षांत ठेवावें. म्हणूनच, म्हणजे ससहायाचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत नसल्यामुळेंच, 'हरिषु' इत्यादि उदाहरणांत 'सु' या (सप्तमीविभक्तीच्या बहुवचनाच्या) प्रत्ययाला पदसंज्ञा होत नाहीं; (कारण तो 'सु' प्रत्यय 'हरिषु' या समुदायाचा अवयव असून त्याला 'हरि' या प्रकृतीचें सहाय असल्यामुळें,

तो ससहाय आहे.) 'निजौ चत्वार एकाच:' असें जें भाष्यांत म्हटलें आहे तें ('व्यपदेशिवदेकस्मिन्' या परिभाषेंतील) 'एकस्मिन्' या पदाच्या अर्थाचा विचार न करितां म्हटलें असल्यामुळें, तें भाष्य एकदेशीची उक्ति आहे असें (प्रत्ययान्ताचा जसा पर्युदास करणें आवश्यक आहे तसाच प्रत्ययाचा देखील पर्युदास करणें आवश्यक आहे हें मानणाऱ्या दीक्षितांच्या म्हणण्याचें) तात्पर्य आहे. ('एकाचो द्वे प्रथमस्य' ६.१.१ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'नेनिजतीत्यत्र निज्शब्दोऽप्येकाच्, इज्शब्दोऽप्येकाच्, इकारोऽप्येकाच् निशद्बोपि,' म्हणजे 'निज्' धातूंत 'निज्, इज्, इ, नि' असे चार एकाच् आहेत, असें म्हटलें असल्यामुळें, शंकाकार अशी शंका करतो कीं, 'निज्' धातूंतील इकार हा 'निज्' या समुदायाचा अवयव असून देखील तशा ससहाय इकाराला ज्याअर्थी भाष्यकारांनीं एकाच् मानलें आहे त्याअर्थी ससहायाचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत नाहीं हें म्हणणें भाष्यविरुद्ध ठरतें. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, ज्या भाष्याच्या आधारावर वरील शंका उपस्थित केली आहे तें सिद्धान्तभाष्य नसून एकदेशिभाष्य आहे. 'यद्यपि व्यपदेशिवद्भावेनैकाच्त्वादेरिव ···एकदेश्युक्तिरिति तात्पर्यम्' या शब्दरत्नांतील ग्रन्थांत 'व्यपदेशिवदेकस्मिन्' या परिभाषेचें व्याख्यान केलें आहे. शब्दरत्नांतील या सर्व पंक्ति परिभाषेन्दुशेखरांत आढळतात व परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरांत या परिभाषेचें जें विस्तृत विवरण केलें आहे तें वाचल्यास, शब्दरत्नांतील वरील ग्रन्थ उत्तम रीतीनें ध्यानांत येईल.) वास्तविक पाहतां 'अधातु:, अप्रत्यय:' या पर्युदासांच्या सामर्थ्यानेंच 'अर्थवत्' याचा लाभ होत असून=देखील, म्हणजे अर्थवान् शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा होते असा अर्थ निष्पन्न होत असून देखील, प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें, या सूत्रांत असलेल्या 'अर्थवत्' या पदानें देखील, 'अर्थबोध करून देण्याकरितां विभक्तिप्रत्यय खेरीज करून इतर कशाचीहि अपेक्षा नसणें' अशा प्रकारच्या

अर्थवत्वाचें, ग्रहण केलें जातें. एकार्थीभाव झाल्यानें लौकिक प्रयोगांत प्रसिद्ध असलेल्या प्रशस्त अर्थवत्तेप्रमाणें वर सांगितलेली ही अर्थवत्ता देखील अलौकिक प्रक्रियावाक्यांत आरोपित केली जाते. त्यामुळें 'दक्ष अस् इ' अशा स्थितींत (या तद्धितान्त समुदायाला) प्रातिपदिकसंज्ञा होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. 'अर्थवत्' या पदाचा वर जो अर्थ केला आहे तो स्वीकारल्यानें प्रत्ययाला प्रातिपदिकसंज्ञेची प्राप्तीच होत नाहीं; (कारण प्रकृतीच्या सहायाशिवाय प्रत्ययाचे ठिकाणीं लौकिक अर्थबोधकता नाहीं, म्हणजेच त्याला अर्थबोध करण्याकरितां विभक्तिप्रत्यय खेरीज करून इतराच्या सहायाची जरूर आहे) आणि म्हणून केवळ प्रत्ययाचा पर्युदास करणें व्यर्थ ठरतें. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत प्रत्ययाचा पर्युदास करावा असें सांगितलें नसल्यामुळें त्यावरून देखील हेंच ध्वनित होतें. 'सुप्तिङन्तं पदम्' १.४.१४ या सूत्रावरील भाष्याचें व त्या भाष्यावरील कैयटवृत्तीचें देखील यांतच तात्पर्य आहे, म्हणजे प्रकृत सूत्रांत व 'कृत्तद्धितसमासाश्च' या उत्तर सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचा वर सांगितल्याप्रमाणें सारखाच अर्थ आहे हें सांगण्यांत तात्पर्य आहे, हें लक्षांत ठेवावें. (दीक्षितांनीं प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचा जसा अर्थ केला आहे तसा 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांत अनुवृत्त केलेल्या त्या पदाचा अर्थ न करितां भिन्न तऱ्हेचा अर्थ केला आहे. प्रकृत सूत्रांत त्या पदाचा मामुली अर्थ केला आहे, म्हणजे अभिधाशक्तीनें किंवा लक्षणावृत्तीनें ज्याचे ठिकाणीं अर्थबोध करून देण्याचें सामर्थ्य आहे तें शब्दस्वरूप अर्थवत् होय असा अर्थ केला आहे. पण 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांत अनुवृत्त असलेल्या त्या पदाचा 'एकार्थीभावेन लौकिके प्रयोगे प्रसिद्धत्वमर्थवत्वम्' असा अर्थ केला आहे. असा अर्थ करितांना त्यांना अर्थाधिकाराचा आश्रय न करितां शब्दाधिकाराचा आश्रय करावा लागला. अर्थाधिकाराचा त्यांनीं आश्रय केला असता तर, प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचा जसा त्यानीं अर्थ केला आहे

तसाच त्या पदाचा उत्तर सूत्रांत त्यांना अर्थ करणें भाग पडलें असतें. प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचा त्यांनीं जसा अर्थ केला आहे त्या अर्थान्वयें प्रत्ययाचे ठिकाणीं वृत्तिमत्वरूप अर्थवत्व असल्यामुळें, या सूत्रानें प्रत्ययाला जी प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते तिचें निवारण करण्याकरितां त्यांना प्रकृत सूत्रांत 'अप्रत्ययः' हा पर्युदास असणें आवश्यक आहे असें मानणें भाग पडलें. पण एकाच शब्दाचा पूर्वपरसूत्रांत भिन्न रीतीनें अर्थ करणें हें 'सकृदुच्चरितः शब्दः सकृदेवार्थं गमयति' या न्यायाविरुद्ध आहे. दुसरें असें कीं, एकाच पदाचा भिन्न भिन्न तऱ्हेनें पूर्वपरसूत्रांत अर्थ करण्याकरितां गुरुभूत शब्दाधिकाराचा आश्रय करणें आणि प्रकृत सूत्रांत त्या पदाचा जसा अर्थ केला आहे तसा अर्थ केला असल्यामुळें प्रत्ययाचा पर्युदास करणें आवश्यक मानणें इत्यादि दोष दीक्षितांनीं केलेल्या अर्थामध्यें येत असल्यामुळें, त्या सर्व दोषांचें निवारण करण्याकरितां शब्दरत्नकार असें म्हणतात कीं, प्रकृत सूत्रांत व तसेंच 'कृत्तद्धित' या उत्तर सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचा 'विभक्तीतरानपेक्षयाऽर्थबोधकत्वमर्थवत्वम्' असा एकच रीतीनें पारिभाषिक अर्थ करणें योग्य आहे व तसा अर्थ केल्यास प्रत्ययाचा पर्युदास मानण्याची कांहीं गरज राहत नाहीं; कारण प्रत्ययाला अर्थबोध करून देण्याकरितां प्रकृतीची अपेक्षा असल्यामुळें, वरील अर्थान्वयें प्रत्ययाचे ठिकाणीं प्रातिपदिकसंज्ञेची प्राप्तीच होत नाहीं. प्रत्ययाचा पर्युदास करणें आवश्यक आहे असें भाष्यकारांनीं भाष्यांत कोठेंहि म्हटलें नसल्यामुळें, त्यावरून देखील हेंच ध्वनित होतें कीं, प्रत्ययाचा पर्युदास करणें व्यर्थ आहे. 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात— 'यदप्युच्यते कृत्तद्धितसमासाश्चेत्यन्तग्रहणं कर्तव्यमिति, न कर्तव्यम् । अर्थवदिति वर्तते, कृत्तद्धितान्तं चैवार्थवन्न केवलाः कृतस्तद्धिता वा ।' या भाष्यावरून देखील हेंच सिद्ध होतें कीं, प्रकृतीच्या सहायाशिवाय प्रत्ययाचे ठिकाणीं अर्थबोध करण्याचें सामर्थ्य नाहीं; आणि या भाष्यावर टीका करितांना कैयटानें 'ननु यद्यर्थवत्ता लौकिक्याश्रीयते

सा पदस्यैव, न तु कृत्तद्धितान्तस्याऽपि, पदस्यैव लोके प्रयोगाऽर्हत्वात् अन्वयव्यतिरेकगम्या=त्वर्थवत्ता केवलानामपि कृत्तद्धितानामस्तीति किमुच्यते – न केवला इति । एवं तर्ह्यर्थवद्ग्रहणानुवृत्तिसामर्थ्याल्लौकिकार्थप्रत्यासन्नोऽभिव्यक्ततरो योऽर्थः प्रत्ययान्तेषु लक्ष्यते स आश्रीयते इत्यदोषः ।' असें म्हटलें आहे. या वरील प्रदीपांतील 'लौकिकार्थप्रत्यासन्नः' या पदाचा 'लौकिकार्थकं यत्पदं तदर्थस्य प्रत्यासन्नः शास्त्रकृत्कल्पितस्वादिप्रकृतेरर्थः' असा उद्योतांत अर्थ केला असून, 'प्रत्ययान्तेषु' या पदाचा 'सुबन्तेषु' असा अर्थ केला आहे व या कैयटवृत्तीला धरूनच शब्दरत्नकारांनीं 'अर्थवत्' या पदाचा वर सांगितल्याप्रमाणें दोन्ही सूत्रांत सारखा अर्थ केला आहे.)

शब्दरत्न–इत्याद्यर्थमिति । अन्यथा विभक्त्यन्तस्योदात्तता स्यात् । प्रातिपदिकत्वे तु पूर्वं विभक्तिलुकि टकारोकारस्योदात्तत्वे पुनर्जसि टकाराकारोदात्तत्वसिद्धिरिति भावः । कृदन्तत्वेनेति । न च समासविकल्पविधानस्य वैयर्थ्यम्, समासे एकस्वरश्रवणं समासाभावे प्रातिपदिकत्वे तु पूर्वोत्तरपदयोर्भिन्नस्वरश्रवणमिति विशेषात्, दधि उपदंशमित्यादौ पक्षे प्रकृतिभावप्रवृत्तेरपि फलस्य वक्तुं शक्यत्वाच्च ।

'व्युत्पत्तिपक्षेऽपि बहुपटव इत्याद्यर्थं सूत्रम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, प्रकृत सूत्र नसतें तर 'बहुपटवः' हा विभक्तिप्रत्ययान्त शब्द अन्तोदात्त होण्याची आपत्ति आली असती. परंतु तो शब्द प्रातिपदिक मानल्यानें प्रथम विभक्तिप्रत्ययाचा लुक् झाल्यावर टकारापुढील उकार उदात्त झाला असतां, पुन्हा 'जस्' प्रत्यय केल्यानें टकारापुढील अकार उदात्त होऊन इष्टसिद्धि होते. ('ईषदूनाः पटवः बहुपटवः' या स्थलीं 'पटु जस्' या सुबन्ताहून 'विभाषा सुपो बहुच्पुरस्तात्तु' सू. २०२३ या सूत्रानें 'बहुच्' प्रत्यय झाला असून 'पटु जस्' या सुबन्तापूर्वीं तो झाला आहे. प्रकृत सूत्र नसतें तर, 'बहुच् पटु जस्' हा समुदाय जरी

अर्थवान् आहे तरी, तो तद्धितान्त किंवा समास नसल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा झाली नसती व त्या समुदायांत 'बहुच्' हा चित् प्रत्यय आदि असून त्या समुदायाच्या अन्तीं 'पटु जस्' हें प्रकृति-प्रत्ययविशिष्ट शब्दस्वरूप असल्यामुळें, 'चितः सप्रकृतेर्बह्वकजर्थम्'— सू. ३७१० वरील वार्तिक—या वार्तिकान्वयें तो विभक्तिप्रत्ययान्त शब्द अन्तोदात्त झाला असता. परंतु प्रकृत सूत्र असल्यामुळें, 'बहुच् पटु जस्' या अर्थवान् समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होते. येथें हें लक्षांत ठेवावें कीं, हा संपूर्ण समुदाय प्रत्ययान्त नाहीं व त्यामुळें त्याला 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' हा पर्युदास लागू पडत नाहीं. या समुदायांतील 'पटु' या शब्दाहूनच 'जस्' प्रत्यय झाला आहे व तशा जस्प्रत्ययान्त शब्दाहून 'बहुच्' प्रत्यय झाला आहे. अशा रीतीने 'बहुच् पटु जस्' हा समुदाय 'प्रत्ययग्रहणे यस्मात्स विहितः' प. २३ या परिभाषान्वयें अप्रत्ययान्त ठरत असल्यामुळें, त्याला प्रकृत सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. त्याला प्रातिपदिकसंज्ञा झाली असतां, 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें प्रातिपदिकावयव असलेल्या 'जस्' या विभक्ति-प्रत्ययाचा लुक् होऊन 'बहुपटु' यांतील अन्त्य उकार 'फिषोऽन्त उदात्तः' फिट् सू. १ या सूत्रानें उदात्त होतो व 'बहुपटु' या अन्तोदात्त प्रातिपदिकाहून पुन्हा 'जस् = अस्' हा प्रथमेच्या बहुवचनाचा प्रत्यय केला असतां, 'बहु पटु अस्' अशी पुन्हा स्थिति होऊन या स्थितींत 'जसि च' सू. २४१ या सूत्रानें 'बहुपटु' या ऱ्हस्वान्त अङ्गांतील अन्त्य उकाराचा गुण होऊन व 'स्थानेऽन्तरतमः' सू. ३९ या सूत्रानें तो गुण—ओकार—उदात्तस्वरयुक्त होऊन आणि 'एचोऽयवायावः' सू. ६१ या सूत्रानें ओकाराचे जागीं अवादेश होऊन, त्या आदेशांतील 'अ' हा स्थानिवद्भावानें आन्तरतम्यानें उदात्त होतो व अशा रीतीनें 'बहुपटवः' हा शब्द अन्तोदात्त होण्याची आपत्ति टळते व तो मध्योदात्त होतो.) 'मूलकेनोपदंशम् इत्यादौ कृदन्त-त्वेनातिप्रसङ्गात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें बरोबर मानलें

तर समासविकल्पविधायक सूत्र व्यर्थ ठरेल असें कोणी म्हटल्यास तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण ('मूलकोपदंशम्' असा तृतीया-तत्पुरुष) समास केल्यास, एक स्वराचें – अन्तोदात्त स्वराचें – श्रवण होईल व समास न केल्यास, ('मूलकेनोपदंशम्' या समुदायास) प्रातिपदिकसंज्ञा झाली असतां, पूर्व पद व उत्तर पद या दोहोंचे ठिकाणीं भिन्न स्वरांचें श्रवण होईल असा (समासपक्षांत व समासाभावपक्षांत स्वरांत) फरक पडेल. तसेंच 'दधि उपदंशम्' इत्यादि स्थलीं समासाभावपक्षांत प्रकृतिभावाची प्रवृत्ति होईल हें एक अधिक फल सांगतां येणें शक्य आहे. (प्रकृत सूत्राऐवजीं 'बहुच्पूर्वः' असें जर सूत्र केलें तर 'मूलकेनोपदंशम्' या संपूर्ण कृदन्त समुदायास प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येईल असें जें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे त्यावर शंकाकार अशी शंका करतो कीं, 'मूलकेनोपदंशम्' या संपूर्ण कृदन्त समुदायास प्रातिपदिकसंज्ञा झाल्यास, 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'मूलकेन' यांतील विभक्तिप्रत्ययाचा लुक् होऊन 'मूलकोपदंशम्' असेंच रूप होईल व समास केल्यानें देखील तेंच रूप होईल आणि अशा रीतीनें 'तृतीयाप्रभृतीन्यन्यतरस्याम्' सू. ७८४ हें विकल्पानें समास होण्याचें विधान करणारें सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, ही शंका बरोबर नाहीं; कारण तृतीया-तत्पुरुषसमास केला असतां, 'समासस्य' सू. ३७३४ या सूत्रानें 'मूलकोपदंशम्' या समस्त पदांतील अन्त्य अच् उदात्त होऊन व 'अनुदात्तं पदमेकवर्जम्' सू. ३६५० या सूत्रानें त्या पदांतील इतर सर्व अच् अनुदात्त होऊन एकाच अन्तोदात्त स्वराचें श्रवण होईल. पण विकल्पामुळें समास न केल्यास, जरी 'मूलकेनोपदंशम्' या समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होईल व ती संज्ञा झाल्यावर जरी 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्रानें प्रातिपदिकावयव असणाऱ्या 'टा = इन' या अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययाचा लुक् होऊन 'मूलकोपदंशम्' असेंच रूप होईल तरी, तो सामासिक शब्द नसल्यामुळें

'समासस्य' हें सूत्र प्रवृत्त होणार नाहीं व त्यामुळें 'मूलक' व 'उपदंश' या दोन्ही पूर्व व उत्तर पदांत भिन्न स्वरांचे श्रवण होईल; कारण अखंड प्रातिपदिकाचे ठिकाणींच 'फिषोऽन्त उदात्तः' फिट् सू. १ या सूत्राची प्रवृत्ति होत असून सखंड प्रातिपदिकाचे ठिकाणीं तें सूत्र प्रवृत्त होत नाहीं. सारांश समास केल्यानें व न केल्यानें जरी सारखींच रूपें सिद्ध होतात तरी त्यांच्या स्वरांत फरक पडत असल्या-मुळें, 'तृतीयाप्रभृतीनि' हें समासविकल्पविधायक सूत्र व्यर्थ ठर-ण्याची आपत्ति येत नसून सार्थक ठरतें. आतां लौकिक प्रयोगांत स्वरयुक्त उच्चारण केलें जात नसल्यामुळें स्वरांत फरक पडेल एवढ्या एका कारणावरून शंकाकारानें केलेली शंका फेटाळणें योग्य नाहीं असें कोणी म्हटल्यास, शब्दरत्नकार दुसरें असें कारण देतात कीं, 'दधि उपदंशम्' या स्थलीं 'दधि' हें द्वितीयान्त उपपद असून उपपूर्वक 'दंश्' धातुहून 'परीप्सा'—त्वरा—या अर्थामध्यें 'द्वितीयायां च' सू. ३३७४ या सूत्रानें 'णमुल्' हा कृत्प्रत्यय झाला असल्यामुळें, 'दधि उपदंशम्' हा संपूर्ण समुदाय कृद्ग्रहणपरिभाषान्वयें—परि.२८—कृदन्त ठरतो व या स्थलीं देखील 'तृतीयाप्रभृतीनि' या सूत्रानें समास होणें वैकल्पिक असल्यामुळें समास न केल्यास व प्रकृत सूत्राच्या अभावीं संपूर्ण कृदन्त समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा केल्यास, 'दधि' या पुढील 'अम्' या द्वितीयेच्या एकवचनाच्या विभक्तिप्रत्ययाचा 'स्वमोर्नपुंसकात्' सू. ३१९ या सूत्रानें पूर्वींच लुक् झालेला असल्यामुळें, 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्राची प्रवृत्ति करण्याची गरज पडत नाहीं. या स्थलीं 'दधि' यांतील अन्त्य 'इक्' पुढें 'उ' हा असवर्ण अच् असल्यामुळें, 'इकोऽसवर्णे' सू. ९१ या या सूत्रानें वैकल्पिक प्रकृतिभाव होऊं शकतो. समास केल्यास, 'न समासे'—सू. ९१ वरील वार्तिक—या निषेधक वार्तिकान्वयें प्रकृतिभाव होऊं शकत नाहीं आणि अशा रीतीनें देखील 'तृतीयाप्रभृतीनि' हें सूत्र व्यर्थ न ठरतां सार्थक ठरतें. सारांश प्रकृत सूत्राऐवजीं

'बहुच्पूर्वः' हें सूत्र केल्यास दीक्षितांनीं मनोरमेंत जो दोष दिला आहे तो अगदीं योग्य ठरतो व त्यावर शंकाकारानें जी शंका केली आहे ती चूक ठरते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा—कृत्तद्धितसमासाश्च । "अर्थवत्" इत्यनुवर्तते । तत्सामर्थ्यात्तदन्तविधिः । न हि जहत्स्वार्थायां वृत्तौ कृतां तद्धितानां चार्थोऽस्ति । भूतपूर्वगतिलभ्यस्तु न प्रशस्तः । अजहत्स्वार्थायामपि न प्रत्ययमात्रेणार्थपर्यवसानमित्यभिप्रेत्याह—कृत्तद्धितान्ताविति । लिट्, धुक्, इत्यादौ "अधातुः" इति, कर्तेत्यादौ अप्रत्ययान्तमिति पर्युदासे प्राप्ते कृदन्ते विधिरयम् । नियमार्थमिति । न च प्रत्ययान्तत्वेन पर्युदासे प्राप्ते विध्यर्थमस्त्विति शङ्क्यम्, वाक्यस्याप्रत्ययान्तत्वात् । प्रत्ययग्रहणे यस्मात्स विहितस्तदादेरेव ग्रहणात् । ननु स्त्रीप्रत्यये तदादिनियमो निषिद्धः, एवं च राजकुमारीत्यादौ विध्यर्थमस्त्विति चेन्मैवम्, अन्तरङ्गस्यापि हल्ङ्यादिलोपस्य लुग्विषये ऽप्रवृत्त्या श्रूयमाण एव सुपि समासप्रवृत्तेः । तत्र चाप्रत्ययान्तत्वेन प्रवृत्तायाः संज्ञाया एकदेशविकृतन्यायेन विभक्तिलुक्यपि सुलभत्वात् । अत एव गोमत्प्रिय इत्यादौ नुमादयो न । लुकः प्रागन्तरङ्गप्रवृत्तौ तु स्युरेव ।

'कृत्तद्धितसमासाश्च' सू १७९ या सूत्रांत ('अर्थवदधातुः' या पूर्व सूत्रांतुन) 'अर्थवत्' या पदाची अनुवृत्ति होते व त्या अनुवृत्तीच्या सामर्थ्यानें तदन्तविधि होतो. ('कृत्' व 'तद्धित' या प्रत्ययांत पूर्वीं सांगितल्याप्रमाणें लौकिकी अर्थवत्ता नसून ती कृदन्त व तद्धितान्त यांतच असल्यामुळें, प्रकृत सूत्रांतील 'कृत्' व 'तद्धित' या शब्दांनीं कृदन्त व तद्धितान्त यांचें, ती अनुवृत्ति केल्यानें, ग्रहण होतें. तशी अनुवृत्ति केली नसती तर, प्रकृत सूत्र संज्ञाविधायक सूत्र असल्यामुळें, 'संज्ञाविधौ प्रत्ययग्रहणे तदन्तग्रहणं नास्ति'— परि. २७—या परिभाषान्वयें तदन्तविधि करतां आला नसता व कृदन्त आणि तद्धितान्त यांना प्रातिपदिकसंज्ञा न होण्याची आपत्ति आली असती व केवळ 'कृत्' आणि 'तद्धित' प्रत्यय यांना ती

संज्ञा झाली असती आणि त्यांना ती संज्ञा होऊन कोणताहि लाभ झाला नसता.) जहत्स्वार्थावृत्ति मानल्यास, कृत् व तद्धित प्रत्यय अर्थवान् ठरत नाहींत. भूतपूर्वगतीनें लभ्य होणारा अर्थ प्रशस्त अर्थ नव्हे. अजहत्स्वार्थापक्ष मानला तरी देखील, केवळ प्रत्ययानें कोणत्याहि अर्थाचा बोध होत नाहीं. हा वरील आशय मनांत धरूनच प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'कृत्तद्धित' या शब्दाचा 'कृत्तद्धितान्तौ' असा अर्थ केला आहे. (जेथें एखादा शब्द आपल्या मूळ अर्थाचा परित्याग करून भिन्न अर्थाचा बोध करितो तशा स्थलीं जहत्स्वार्था-वृत्ति मानली जाते. उदाहरणार्थ 'मण्डपः' या स्थलीं हा 'मण्डं पिबतीति मण्डपः = पेज पिणारा' असा जो मूळ शब्दार्थ त्याचा परित्याग करून तो शब्द 'मांडव' या अर्थाचा जो बोध करितो तो जहत्स्वार्थावृत्तीनें करितो. जेथें एखादा शब्द आपल्या मूळ अर्थाचा परित्याग न करितां त्या अर्थाखेरीज इतर अधिक अर्थाचा बोध करितो तशा स्थलीं अजहत्स्वार्थावृत्ति मानली जाते. उदा-हारणार्थ 'पङ्कज, द्विरेफ' इत्यादि स्थलीं मूळ शब्द आपल्या मूळ अर्थाचा परित्याग न करितां अजहत्स्वार्थावृत्तीनें अधिक अर्थाचे म्हणजे चिखलांत उत्पन्न होणारें कमल व ज्यांत दोन रेफ आहेत अशा भ्रमर याचे अनुक्रमें बोधक होतात. प्रकृत स्थलीं जहत्स्वार्थावृत्ति मानली, म्हणजे प्रकृति व प्रत्यय आपापल्या मूळ अर्थांचा परित्याग करतात व प्रकृतिप्रत्ययसमुदायच विशिष्टसमुदायशक्तीनें अर्थाचा बोध करतो असें मानलें, तर कृत् व तद्धित प्रत्यय अर्थवान् ठरत नाहींत हें आपोआपच सिद्ध होतें. कृत् व तद्धित प्रत्यय हे जरी इतर प्रत्ययांप्रमाणें अर्थवान् आहेत तरी पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्यांचे ठिकाणीं लौकिक प्रशस्त अर्थ बोधित करण्याचें सामर्थ्य नाहीं. तें सामर्थ्य प्रकृतिप्रत्ययविशिष्ट समुदायांतच आहे. म्हणून 'साम्प्रतिकाभावे भूतपूर्वगतिः'—परि. ७७—या न्यायान्वयें ते प्रत्यय लावण्यापूर्वी त्यांचा जो अर्थ होता त्या अर्थाचें भूतपूर्वगतीनें ग्रहण केलें तरी, तो अर्थ लौकिक प्रशस्त अर्थ नसल्यामुळें, ते प्रत्यय

भूतपूर्वगतीनें देखील प्रशस्तार्थवान् ठरत नाहींत हें उघड आहे. अजहत्स्वार्थावृत्ति मानली–म्हणजे प्रकृति व प्रत्यय आपापल्या अर्थाचा परित्याग न करितां दोन्ही मिळून ज्यांत प्रकृतीचा अर्थ विशेषण व प्रत्ययाचा अर्थ विशेष्य आहे अशा विशिष्ट अर्थाचे बोधक होतात असें मानलें–तरी देखील, केवळ कृत् व तद्धित प्रत्ययांनीं तशा विशिष्ट अर्थाचा बोध होत नसल्यामुळें, त्यांचे ठिकाणीं लौकिकी प्रशस्त अर्थवत्ता आहे असें मानतां येत नाहीं, आणि हा आशय मनांत धरूनच दीक्षितांनीं प्रकृत सूत्रांतील 'कृत्' व 'तद्धित्' या शब्दांचा कृदन्त व तद्धितान्त असा कौमुदींत अर्थ केला आहे. या विषयाचें विवरण मागील सूत्रांत केलेंच आहे व 'सुप्तिङन्तं पदम्' सू. १.४.१४–या सूत्रावरील या विषयासंबंधाचें भाष्य पूर्वीं दिलेंच आहे.) 'लिट् धुक्' इत्यादि स्थलीं 'अधातुः' या पूर्वसूत्रांतील पर्युदासामुळें व 'कर्ता' इत्यादि स्थलीं त्या सूत्रांतील 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' या पर्युदासामुळें जी प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नव्हती ती व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांत 'कृत् = कृदन्त' या शब्दाचें ग्रहण केलें आहे. ('लिह्, दुह्' या धातूंहून 'क्विप् = व्' प्रत्यय केला असतां, 'वेरपृक्तस्य' सू. ३७५ या सूत्रानें त्या अपृक्त प्रत्ययाचा लोप होऊन मूळ धातूच अवशिष्ट राहतात व जरी 'हो ढः' सू. ३२४, 'झलां जशोऽन्ते सू. ८४, 'वाऽवसाने' सू. २२६, 'दादेर्धातोर्घः' सू. ३२५, 'एकाचो बशो भष्' सू. ३२६ इत्यादि पाणिनीय सूत्रांची प्रवृत्ति केली असतां, धातूंच्या मूळ रूपांत थोडासा फरक पडतो तरी एकदेशविकृतन्यायानें ते धातु मानले जाऊं शकतात आणि जरी त्यांहून क्विप् प्रत्यय झाला आहे तरी, 'क्विबन्ता धातुत्वं न जहति' या सिद्धान्तान्वयें त्यांची धातुसंज्ञा नष्ट होत नाहीं व त्यामुळें 'अधातुः' या पर्युदासान्वयें त्यांना प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं. ती त्यांना व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांत 'कृत् = कृदन्त' या शब्दाचें ग्रहण केलें आहे आणि 'लिट्, धुक्' हे शब्द प्रत्ययलक्षणानें क्विप्-प्रत्ययान्त ठरत असल्यामुळें व क्विप् हा कृत्प्रत्यय असल्यामुळें,

ते शब्द कृदन्त मानले जाऊन त्यांना प्रकृत सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होते. 'कृ तृच् = कर्तृ' हा शब्द तृच्प्रत्ययान्त असल्यामुळें, पूर्व सूत्रांतील 'अप्रत्ययान्तः' या पर्युदासामुळें त्याला त्या सूत्रानें जी प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नव्हती ती त्याला व्हावी याकरितां देखील प्रकृत सूत्रांत 'कृत्' शब्दाचें ग्रहण केलें आहे व 'तृच्' हा कृत्प्रत्यय असल्यामुळें 'कर्तृ' हा शब्द कृदन्त ठरून त्याला प्रकृत सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होते.) 'पूर्वसूत्रेण सिद्धे समासग्रहणं नियमार्थम्' असें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे. यावर 'अर्थवदधातुः' या सूत्रांत प्रत्ययान्ताचा पर्युदास केला असल्यामुळें समासाच्या विषयांत देखील प्रकृत सूत्र विध्यर्थ मानावें अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाहीं; कारण वाक्य प्रत्ययान्त मानतां येत नाहीं. याचें कारण हें कीं, 'प्रत्ययग्रहणे यस्मात्सविहित-स्तदादेः'–परि. २३–या परिभाषेंत 'तदादि' या शब्दाचेंच ग्रहण केलें आहे. ('राज्ञः पुरुषः राजपुरुषः=राजन् ङस् पुरुष सु' या अलौकिक विग्रहवाक्यांत जरी 'सु' प्रत्यय शेवटीं दिसतो तरी तो 'पुरुष' या शब्दाहूनच झालेला प्रत्यय आहे व 'राजन् ङस् पुरुष' या समुदायाहून झालेला तो प्रत्यय नव्हें. म्हणून प्रत्ययग्रहणपरि-भाषान्वयें 'राजपुरुष' हा समुदाय प्रत्ययान्त ठरत नसल्यामुळें या समुदायास किंवा 'रामः ग्रामं गच्छति' इत्यादि वाक्यांना 'अप्रत्ययान्तः' हा पर्युदास लागू पडत नाहीं. पण हा पदसमुदाय अर्थवान् असल्यामुळें त्याला वास्तविक पूर्व सूत्रानेंच प्रातिपदिक-संज्ञेची प्राप्ति होते. असें असून देखील समासाला प्रातिपदिकसंज्ञा व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांत पुन्हा 'समास' या शब्दाचें ग्रहण केलें असल्यामुळें, हें सूत्र समासासंबंधानें नियमार्थ ठरतें, व त्या नियमाचें स्वरूप असें कीं, जर अर्थवान् शब्दसमुदायाला प्रातिपदिक-संज्ञा करणें असेल तर ती केवळ समासालाच करतां येते. जर समासाला पूर्व सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा प्राप्त झाली नसती व प्रकृत सूत्रानेंच ती प्राप्त झाली असती तर, प्रकृत सूत्र समासासंबंधानें

देखील विध्यर्थक सूत्र मानतां आलें असतें. पण वर सांगितल्याप्रमाणें तशी परिस्थिति नसल्यामुळें, प्रकृत सूत्र समासासंबंधानें, 'प्राप्ते सति नियमार्थम्' या न्यायान्वयें, नियमार्थक सूत्र मानणेंच योग्य आहे, आणि भाष्यकारांनीं 'अर्थवत्समुदायानां समासग्रहणं नियमार्थं भविष्यति । समास एवार्थवतां समुदायानां प्रातिपदिकसंज्ञो भवति नान्यः' असें पूर्वसूत्रावरील भाष्यांत स्पष्ट म्हटलें आहे.) स्त्रीप्रत्ययाच्या विषयांत, म्हणजे सामासिक शब्दाच्या अन्तीं स्त्रीप्रत्ययान्त शब्द असून तो प्रधान असल्यास, तदादि नियम लागू पडत नाहीं व त्यामुळें 'राजकुमारी' इत्यादि स्थलीं (तशा सामासिक शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा होण्याकरितां प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण नियमार्थ न मानतां) विध्यर्थ मानलें पाहिजे असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें होणारा 'सु' प्रत्ययाचा लोप होणें हें अन्तरङ्गकार्य आहे तरी, ('सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें होणाऱ्या बहिरङ्ग) लुक्च्या विषयांत 'सु' लोपाची प्रवृत्ति होऊं शकत नसल्यामुळें, 'सुप्' प्रत्यय श्रूयमाण—विद्यमान—असतांनाच, म्हणजे 'सुप्' प्रत्ययांचा लुक् होण्यापूर्वींच, समास होतो. तशा स्थितींत प्रत्ययान्तत्वाच्या अभावामुळें प्राप्त झालेली प्रातिपदिकसंज्ञा, अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययांचा लुक् झाल्यावर देखील, एकदेशविकृतन्यायानें सहज प्राप्त होऊं शकते. (शंकाकाराची अशी शंका आहे कीं, 'राज्ञः कुमारी राजकुमारी = राजन् ङस् कुमारी सु' या स्थलीं 'कुमारी' या शब्दाहून झालेल्या 'सु' प्रत्ययाचा केवळ त्या ङीबन्त शब्दाला मानून 'हल्ङ्याब्भ्यः' या सूत्रानें लोप करणें हें कार्य, पदद्वयनिमित्तक समास होऊन प्रातिपदिकसंज्ञा झाल्यावर 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्रानें त्या 'सु' प्रत्ययाचा लुक् करणें या कार्याच्या मानानें, अन्तरङ्ग आहे व त्यामुळें प्रथम 'सु' लोपाची प्राप्ति आहे, आणि 'सु' लोप प्रथम केल्यास व त्यानंतर समास केल्यास, स्त्रीप्रत्ययान्त 'कुमारी' हा

शब्द उत्तरपदार्थप्रधान षष्ठीतत्पुरुषसमासांत प्रधान असल्यामुळें, 'स्त्रीप्रत्यये चानुपसर्जने न' – परि. २६–, म्हणजे स्त्रीप्रत्ययान्त शब्द प्रधान असल्यास तदादिनियम लागू पडत नाहीं, या परिभाषान्वयें 'राजकुमारी' हा संपूर्ण शब्द स्त्रीप्रत्ययान्त ठरतो व 'अर्थवदधातुरप्रत्ययः' या पूर्व सूत्रांत प्रत्ययान्ताचा पर्युदास केला असल्यामुळें, 'राजकुमारी' या, वर सांगितल्याप्रमाणें स्त्रीप्रत्ययान्त ठरत असलेल्या, शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं. ती संज्ञा त्या सामासिक शब्दाला व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण विध्यर्थक मानणें आवश्यक आहे. येथें हें लक्षांत ठेवावें कीं, 'कुमार' या शब्दाहून 'वयसि प्रथमे' सू. ४७८ या सूत्रानें 'ङीप्' प्रत्यय होऊन 'कुमारी' हा स्त्रीप्रत्ययान्त शब्द सिद्ध होतो. 'राज्ञः कुमारी राजकुमारी' या स्थलीं जरी 'कुमारी' हाच शब्द स्त्रीप्रत्ययान्त आहे तरी, समासाच्या अन्तीं असलेला तो स्त्रीप्रत्ययान्त शब्द प्रधान असल्यामुळें, येथें तदादिनियम लागत नाहीं, म्हणजे जरी 'कुमार' या शब्दाहून 'ङीप्' प्रत्यय झाला आहे तरी 'कुमारी' एवढाच शब्द स्त्रीप्रत्ययान्त न ठरतां 'राजकुमारी' हा संपूर्ण शब्द स्त्रीप्रत्ययान्त ठरतो. अशा प्रत्ययान्त सामासिक शब्दाला जी पूर्व सूत्रानें 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' या पर्युदासामुळें प्रातिपदिकसंज्ञा प्राप्त नव्हती ती त्याला प्रकृत सूत्रानें व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांतील 'समास' ग्रहण विध्यर्थक मानलें पाहिजे असें शंकाकाराच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, जरी 'सु' लोपाच्या मानानें 'सुप्' लुक्कार्य बहिरङ्ग आहे तरी, 'अन्तरङ्गानपि विधीन् बहिरङ्गो लुग्बाधते' – परि. ५२ – या परिभाषान्वयें 'सुप्' लुक्कार्य 'सु' लोपाचें बाधक होऊन 'सु' लोप प्रथम होऊं देत नाहीं. त्यामुळें 'राजन् ङस् कुमारी सु' या स्थलीं 'सु' लोप होण्यापूर्वींच त्या दोन सुबन्तांच्या समुदायाला समाससंज्ञा होते व त्या अवस्थेंत तो समुदाय ङीबन्त ठरत नाहीं व 'सु' प्रत्ययान्त देखील मानतां येत

नाहीं; कारण ' ङीप् ' प्रत्यय केवळ ' कुमार ' शब्दाहून झाला असून ' राजकुमार ' या संपूर्ण शब्दाहून झाला नाहीं आणि तसेंच ' सु ' प्रत्यय हा देखील केवळ ' कुमारी ' या शब्दाहून झालेला प्रत्यय असून ' राजकुमारी ' या समुदायाहून झालेला प्रत्यय नाहीं. अशा रीतीनें तो समुदाय प्रत्ययान्त ठरत नसल्यामुळें, त्याला पूर्वसूत्रांतील ' अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः ' हा पर्युदास लागू पडत नाहीं आणि ज्याअर्थीं तो समुदाय अर्थवान् आहे त्याअर्थीं त्याला पूर्वसूत्रानेंच प्रातिपदिकसंज्ञा होते. सारांश ' राजकुमारी ' या शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा होण्याकरितां प्रकृत सूत्रांतील ' समास ' या पदाचें ग्रहण विध्यर्थक मानण्याची कांहींच गरज नाहीं, व कोणत्याहि अर्थवान् समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा न होतां समासालाच ती संज्ञा व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांत ' समास ' या पदाचें ग्रहण केलें आहे व अशा रीतीनें तें ग्रहण विध्यर्थक न ठरतां नियमार्थक ठरतें असेंच मानणें उचित आहे. ' राजन् ङस् कुमारी सु ' या अवस्थेंतच या अर्थवान् अप्रत्ययान्त समुदायाला पूर्व सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होते हें वर सांगितलेंच आहे व ती संज्ञा झाल्यावर ' सुपो धातुप्रातिपदिकयोः ' या सूत्रानें त्या समुदायांतील ' ङस् ' व ' सु ' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययरूप प्रातिपदिकावयवांचा लुक् होतो. तो लुक् झाल्यावर समुदायाच्या स्वरूपांत जरी थोडासा फरक पडतो तरी ' एकदेशविकृतमनन्यवत् '—परि. ३७— या परिभाषान्वयें अवशिष्ट राहिलेल्या समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं.) म्हणूनच, म्हणजे ' सु ' लोपकार्य अन्तरङ्ग असून देखील प्रथम होऊं शकत नसल्यामुळेंच, ' गोमत्प्रियः ' इत्यादि स्थलीं नुमागमादि कार्यें होत नाहींत. बहिरङ्ग लुक् होण्यापूर्वी ' सु ' लोपरूप अन्तरङ्गकार्य होऊं शकलें असतें तर नुमागमादि कार्यें होण्याची आपत्ति आलीच असती. (' गोमान् प्रियः यस्य सः गोमत्प्रियः = गोमत् सु प्रिय सु ' या स्थितींतच समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा न केली व समुदायांतील अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययांचा

'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्रानें होणारा लुक् बहिरङ्ग असल्यामुळें पूर्वीं न केला आणि 'गोमत्' यापुढील 'सु' प्रत्ययाचा 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें लोप होणें हें कार्य अन्तरङ्ग असल्यामुळें तें प्रथम केलें तर, 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रान्वयें 'गोमत्' यापुढें 'सु' प्रत्यय विद्यमान आहे अशी बुद्धि करतां येते आणि त्यामुळें 'उगिदचां सर्वनामस्थाने' सू. ३६१ या सूत्रानें नुमागम होऊन व 'अत्वसन्तस्य चाधातोः' सू. ४२५ या सूत्रानें उपधादीर्घ-कार्य होऊन आणि 'संयोगान्तस्य लोपः' सू. ५४ या सूत्रानें अन्त्य तकाराचा लोप होऊन, 'गोमत्प्रियः' असें इष्ट रूप सिद्ध न होतां, 'गोमान्प्रियः' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल. परंतु 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्रानें होणारा अन्तर्वर्तिविभक्ति-प्रत्ययाचा लुक् बहिरङ्ग असून देखील 'हल्ङ्याब्भ्यः' या सूत्रानें होणाऱ्या अन्तरङ्ग 'सु' लोपाचा बाध करीत असल्यामुळें, 'सु' लोपाची प्रवृत्ति होत नाहीं व समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा झाल्यावर अन्तर्वर्ति 'सु' या विभक्तिप्रत्ययाचा लगेच लुक् होत असल्यामुळें व 'न लुमताङ्गस्य' सू. २६३ हें निषेधक सूत्र असल्यामुळें, 'प्रत्यय-लोपे प्रत्ययलक्षणम्' या सूत्राची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'गोमत्' शब्दापुढील ज्या 'सु' प्रत्ययाचा लुक् झाला आहे तो प्रत्यय विद्यमान आहे असें मानतां येऊं शकत नाहीं आणि त्यामुळें त्या प्रत्ययाच्या निमित्तामुळें अङ्गाला प्राप्त होणारीं नुमागमादि कार्यें होऊं शकत नाहींत आणि 'गोमत्प्रियः' असें इष्ट रूप सिद्ध होतें.)

मनोरमा—नन्वेवमपि असमर्थसमासे दशदाडिमादिवदनर्थके विध्यर्थमस्त्विति चेन्न, "अर्थवत्" इत्यस्यानुवृत्तेरुक्तत्वात् । कथं तर्हि असमर्थसमासे संज्ञेति चेद्धर्मिग्राहकमानादेवेति गृहाण । "असूर्य-ललाटयोः—" इत्यनेन हि असूर्यशब्दे उपपदे खश् विधीयते । उपोच्चारितं पदं चोपपदम् । पदं च "सुप्तिङन्तम्" इति । नियम-शरीरमाह—यत्र संघाते इत्यादि । पूर्वो भाग इत्युपलक्षणम् । उत्तरस्तु

प्रत्ययो नेत्यपि बोध्यम्, अन्यथा जन्मवानित्यादौ संज्ञा न स्यात्तद्धित-ग्रहणस्य औपगवादौ कृतार्थत्वात् । पूर्वो भागः पदमिति किम् ? बहुज्विशिष्टस्य प्रातिपदिकसंज्ञा यथा स्यात्, तेन बहुपटव इत्यत्र प्रथमजसो लुकि बहुपटुशब्दस्य चित्स्वरे पुनर्जसि उपोत्तमोदात्तत्वं सिद्ध्यति । यद्वा प्रकृतिप्रत्ययभावानापन्नसंघातविषयको नियमोऽस्तु । न चाद्यपक्षे राजपुरुषावित्यादौ पुरुषावित्यादेः संज्ञा स्यादिति वाच्यम् । अर्थवत्त्वेनैव वारणात् । प्रत्ययार्थो हि विशिष्ट एवान्वेति, न तूत्तर-पदार्थमात्रे येन पुरुषावित्यस्यार्थवत्त्वं स्यात् । नियमफलमाह–तेने-त्यादि । नन्वेवमपि मूलकेनोपदंशमित्यादौ वाक्यस्य संज्ञा दुर्वारा । कृद्ग्रहणे गतिकारकपूर्वस्यापि ग्रहणात् इति चेन्मैवम्, समासग्रहण-कृतनियमेन परत्वाद् बाधात् । एवं च "कृत्तद्धित–" इति सूत्रे कृद्ग्रहणपरिभाषा नोपतिष्ठित एव निष्फलत्वादिति तत्त्वम् ।

वर जें सांगितलें आहे तें बरोबर आहे असें मानलें तरी, 'दश दाडिमानि' इत्यादि अनर्थक पदसमुदायाला ज्याप्रमाणें (पूर्व सूत्रानें) प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं त्याचप्रमाणें असमर्थ समासाला ती संज्ञा होऊं शकत नसल्यामुळें, तशा समासाला ती संज्ञा व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण विध्यर्थक मानलें पाहिजे अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाहीं; कारण प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाची अनुवृत्ति होते हें पूर्वीं सांगितलें आहे. तर मग (असमर्थ समास अनर्थक असल्या-मुळें व अर्थवान् समासरूप पदसमुदायालाच प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत असल्यामुळें) असमर्थ समासाला प्रातिपदिकसंज्ञा कशी होऊं शकणार असा कोणी प्रश्न केल्यास, त्याला उत्तर हें आहे कीं, असमर्थसमासरूप धर्माचे ठिकाणीं प्रातिपदिकसंज्ञारूप धर्म येतो त्याला ('असूर्यललाटयोर्दृशितपोः' सू. २९५१) हें पाणिनीय सूत्रच प्रमाण आहे. 'असूर्यललाटयोः' या सूत्रानें 'असूर्य' हा शब्द उपपद असतां 'दृश्' धातूहून 'खश्' प्रत्यय होण्याचें विधान केलें आहे. जें समीप उच्चारलेलें असतें त्याला उपपद म्हणतात आणि

जें सुबन्त किंवा तिङन्त असतें त्याला 'सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रान्वयें पद म्हणतात. (परस्परांशीं अर्थामध्यें अन्वित नसणाऱ्या दोन पदांचा जेथें समास केला जातो तेथें तशा समासाला असमर्थ समास म्हणतात. 'अश्राद्धभोजिन्, असूर्यंपश्या:' इत्यादि असमर्थ-समासाचीं उदाहरणें होत. या वरील उदाहरणांत 'नञ्' हा 'श्राद्ध' किंवा 'सूर्य' या शब्दांच्या अर्थांशीं संबद्ध नसून क्रियेच्या अर्थाशीं अन्वित आहे आणि म्हणूनच 'अश्राद्ध, असूर्यं' हे असमर्थसमास ठरतात. 'समर्थ: पदविधि:' सू. ६४७ या सूत्रान्वयें परस्परांशीं अर्थामध्यें अन्वित असणाऱ्या पदांचा समास होऊं शकतो व जीं पदें परस्परांशीं अर्थामध्यें अन्वित नाहींत त्यांचा वास्तविक समास होऊं शकत नाहीं. आणि म्हणूनच तशा समासाला असमर्थसमास म्हणतात व तशा सामासिक शब्दापासून अभिप्रेत असलेल्या इष्ट अर्थाचा बोध होत नसल्यामुळें, तसा समास अर्थरहित ठरतो, व पूर्व सूत्रांत 'अर्थवत्' हें पद असल्यामुळें, ज्याप्रमाणें 'दश दाडिमानि, षडपूपा:' इत्यादि पूर्वसूत्रावरील भाष्यांत दिलेल्या अनर्थक पदसमुदायाला पूर्वसूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं त्याचप्रमाणें असमर्थसमासरूप अनर्थक पदसमुदायाला देखील त्या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं. ती संज्ञा तशा अनर्थक असमर्थ समासाला व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांत 'समास' या पदाचें ग्रहण केलें आहे व अशा रीतीनें तें ग्रहण विध्यर्थक ठरतें असें शंकाकाराचें म्हणणें आहे. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, पूर्वसूत्रांतून प्रकृत सूत्रांत भाष्यकारांनीं 'अर्थवत्' या पदाची अनुवृत्ति मानली असल्यामुळें, जशी पूर्वसूत्रानें अनर्थक असमर्थसमासाला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं तशीच प्रकृत सूत्रानें देखील ती होऊं शकत नाहीं. तशा समासाला प्रातिपदिकसंज्ञा होते हें खरें. पण ती पूर्व सूत्रानें किंवा प्रकृत सूत्रानें होत नसून तशी संज्ञा होण्याला 'असूर्यललाटयो:' हें पाणिनीय सूत्र प्रमाण = ज्ञापक आहे. 'असूर्य' व 'ललाट' हे शब्द अनुक्रमें कर्मणि उपपद असतां, 'दृश्' व 'तप्' या धातूंहून

'खश्' प्रत्यय होणें सांगितलें आहे. या सूत्रावरील कौमुदींत दीक्षित-म्हणतात – 'असूर्यमित्यसमर्थसमासः । दृशिना नञः सम्बन्धात् । सूर्यं न पश्यन्तीत्यसूर्यम्पश्या राजदाराः' व काशिकेंत देखील असेंच म्हटलें आहे. वास्तविक 'न सूर्यः असूर्यः = सूर्यभिन्नः' असा 'असूर्य' या नञ्समासाचा विग्रह किंवा अर्थ नसून 'नञ्' हा 'दृश्' धातूंत अन्वित होतो व 'सूर्यं न पश्यन्तीत्यसूर्यम्पश्याः' असा खरोखर विग्रह होतो. जरी 'असूर्य' असा असमर्थ समास होऊं शकत नाहीं तरी ज्याअर्थी तो पाणिनीनें केला आहे त्याअर्थी तो सौत्रसमास साधु मानणें भाग आहे. त्या अनर्थक असमर्थ सामासिकपदाला प्रातिपदिकसंज्ञा व्हावी कशी ? त्याला प्रातिपदिकसंज्ञा झाल्या-शिवाय त्याहून सुबुत्पत्ति होऊं शकत नाहीं व सुबुत्पत्ति झाल्याशिवाय पदसंज्ञा होऊं शकत नाहीं. पदसंज्ञा झाल्याशिवाय त्याला 'उपपद' मानतां येत नाहीं. पण पाणिनीनें तर 'असूर्य' हा शब्द 'उपपद' असल्यासच 'दृश्' धातूहून 'खश्' प्रत्यय होणें सांगितलें आहे. म्हणून हें विधानच असमर्थसमासाला प्रातिपदिकसंज्ञा होण्यास प्रमाण ठरतें, आणि त्यामुळें तशा समासाला प्रातिपदिकसंज्ञा होण्याकरितां प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण विध्यर्थक मानण्याची कांहीं गरज नाहीं आणि भाष्यकारांनीं सांगितल्याप्रमाणें तें ग्रहण नियमार्थकच मानणें उचित आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. आतां 'समासग्रहणं नियमार्थम्' असें जें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे व त्या पंक्तींत ज्या नियमाचा उल्लेख केला आहे त्या) नियमाचें स्वरूप 'यत्र सङ्घाते पूर्वो भागः पदं तस्य चेद्भवति तर्हि समासस्यैव' असें प्रकृत सूत्रावरील कौमुदींतील पंक्तींत सांगितलें आहे. या वरील नियमांतील 'पूर्वो भागः पदम्' हें उपलक्षणात्मक आहे व त्यांत 'उत्तरस्तु प्रत्ययो न' याचा देखील समावेश होतो हें जाणावें. तसा समावेश न केल्यास, प्रकृत सूत्रांतील 'तद्धित' या पदाचें ग्रहण 'औपगव' इत्यादि शब्दांचे ठिकाणीं चरितार्थ होत असल्यामुळें, 'जन्मवान्' इत्यादि

शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा न होण्याची आपत्ति येईल. ('तदस्यास्ति' सू. १८९४ या सूत्रानें 'जन्मन्' या नकारान्त प्रातिपदिकाहून तद्धित् 'मतुप्' प्रत्यय केला असतां, 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्रानें 'जन्मन्' याला पदसंज्ञा होते व त्यामुळेंच 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें त्यांतील अन्त्य नकाराचा लोप होऊन तें पद अदन्त होतें आणि त्यामुळें 'मादु-पधायाश्च' सू. १८९७ या सूत्रानें 'मतुप्' प्रत्ययांतील मकाराचे जागीं वकार होऊन 'जन्म + वतुप्' अशी स्थिति होते. या समु-दायांतील 'जन्म' हा पूर्व भाग पदसंज्ञक आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. 'यत्र सङ्घाते पूर्वो भागः पदं ...... समासस्यैव' एवढाच नियम मानल्यास, 'जन्मवत्' हें सामासिक पद नसल्यामुळें, तें तद्धितान्त असून देखील त्याला प्रातिपदिकसंज्ञा न होण्याची आपत्ति येते. यावर कोणी असें म्हणेल कीं, 'मतुप्' हा तद्धित प्रत्यय असून 'जन्मवत्' या शब्दाच्या अन्तीं तो प्रत्यय असल्यामुळें, 'जन्मवत्' हा शब्द तद्धितान्त ठरतो व त्यामुळें त्याला प्रकृत सूत्रानेंच प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकते. पण दीक्षित म्हणतात कीं, हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'उपगोः अपत्यं पुमान् औपगवः' या स्थलीं 'तस्या-पत्यम्' सू. १०८८ या सूत्रानें अपत्यार्थक 'अण्' प्रत्यय केल्यावर 'उपगु + अण्' या समुदायांतील 'उपगु' हा पूर्व भाग पदसंज्ञक नसून 'यचि भम्' सू. २३१ या सूत्रानें भसंज्ञक ठरत असल्यामुळें, अशा ठिकाणीं वरील नियम आड न येतां 'औपगव' या तद्धितान्ताला प्रातिपदिकसंज्ञा होऊन प्रकृत सूत्रांतील 'तद्धित' या पदाचें ग्रहण चरितार्थ ठरूं शकते. म्हणून जेथें समुदायांतील पूर्व भाग पद आहे व समुदाय समास नाहीं, म्हणजे सामासिक शब्द नाहीं, तशा ठिकाणीं तो समुदाय तद्धितान्त असून देखील त्याला प्रातिपदिकसंज्ञा न होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरितां 'यत्र पूर्वो भागः पदं उत्तरभागस्तु प्रत्ययो न' असें नियमाचें स्वरूप मानणें आवश्यक आहे. तसें मानलें

असतां, 'जन्मवत्' या स्थलीं 'जन्म' हा पूर्व भाग जरी पदसंज्ञक आहे तरी उत्तरभाग प्रत्यय असल्यामुळें, 'जन्मवत्' हा सामासिक शब्द नसून देखील वरील नियम आड येत नाहीं व त्या शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा होते.) वरील नियमांत 'पूर्वभागः पदम्' असें जें म्हटलें आहे त्याचें प्रयोजन हें आहे कीं, 'बहुच्' प्रत्ययविशिष्ट शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा व्हावी. त्यामुळें 'बहुपटु जस् = बहुपटवः' या समुदायाला (प्रातिपदिकसंज्ञा होते व ती संज्ञा झाल्यावर 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें) प्रथम 'जस्' या विभक्ति-प्रत्ययाचा लुक् झाला असतां, 'बहुपटु' या शब्दाला चित्स्वर होऊन, म्हणजे त्यांतील अन्त्य उकार उदात्त होऊन, 'बहुपटु' या प्रातिपदिकाहून पुन्हा 'जस्' प्रत्यय केला असतां, ज्यांत उपान्त्य स्वर उदात्त आहे असें (इष्टस्वरयुक्त) रूप सिद्ध होतें. ('पटु जस्' या सुबन्त समुदायरूप प्रकृतीहून 'विभाषा सुपो बहुच् पुरस्तात्तु' सू. २०२३ या सूत्रानें 'बहुच्' प्रत्यय होऊन तो सुबन्त प्रकृतीच्या पूर्वीं होतो आणि 'बहु पटु जस्' अशी स्थिति होते. या समुदायांतील 'बहु' हा पूर्वभाग पद नसून प्रत्यय आहे व वरील नियमांत 'यत्र पूर्वो भागः पदम्' हे शब्द असल्यामुळें, हा अर्थवान् समुदाय समास नसून देखील त्याला प्रातिपदिकसंज्ञा होते व 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' या सूत्रानें प्रातिपदिकावयव असलेल्या 'जस्' प्रत्ययाचा लुक् होतो आणि 'बहुपटु' हा प्रातिपदिकसंज्ञक शब्द 'चितः सप्रकृतेः' – सू. ३७१० वरील वार्तिक – या वार्तिकान्वयें अन्तोदात्त होतो व त्याहून 'ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ या अधिकारसूत्रान्वयें नंतर पुन्हा 'जस् = अस्' प्रत्यय केला असतां, 'बहुपटु अस्' या स्थितींत 'जसि च' सू. २४१ या सूत्रानें 'पटु' यांतील अन्त्य उकाराचे जागीं 'ओ' असा जो गुणादेश होतो तो 'स्थानेऽन्तरतमः' सू. ३९ या सूत्रान्वयें उदात्त होतो आणि त्याचे जागीं 'एचोऽयवायावः' सू. ६१ या सूत्रानें 'अव्' आदेश होऊन त्या आदेशांतील अकार आन्तरतम्यानें उदात्त होतो. त्यामुळें 'बहु-

पटु अस् = बहुपटो अस् = बहुपटवः' असें जें रूप होतें त्यांत ढकारापुढील अकार उदात्त होतो व इष्ट मध्योदात्तस्वरयुक्त रूप सिद्ध होतें. 'यत्र पूर्वो भागः पदम्' हे शब्द जर वरील नियमांत नसते तर 'पटु जस्' या सुबन्त प्रकृतीहून झालेला 'बहुच्' प्रत्यय प्रकृतीच्या पूर्वी होत असून पदसंज्ञक नसल्यामुळें व समुदाय तद्धितान्त मानतां येत नसल्यामुळें व तसेंच समुदाय समास नसल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकली नसती व 'जस्' प्रत्ययाचा लुक् झाला नसता आणि त्यामुळें 'पटु जस्' ही बहुच्प्रत्ययाची सुबन्त प्रकृती 'चितः सप्रकृतेः' या वार्तिकानें अन्तोदात्त होऊन 'बहुपटवः' यांतील वकारापुढील अकार उदात्त होण्याची, म्हणजेच तें रूप अन्तोदात्त होण्याची,आपत्ति आली असती.) अथवा ज्या समुदायांतील अवयवांचा परस्परांशीं प्रकृतिप्रत्ययभावरूप संबंध नाहीं तसा समुदाय समास असल्यासच त्याला प्रातिपदिकसंज्ञा होते असें नियमाचें स्वरूप मानावें, म्हणजे 'प्रकृतिप्रत्ययभावानापन्नसङ्घातस्य चेत् प्रातिपदिकसंज्ञा तर्हि समासस्यैव' असें नियमाचें स्वरूप मानावें. (असा नियम मानल्यास, ज्या समुदायांतील अवयवांमध्यें प्रकृतिप्रत्ययभावरूप संबंध आहे अशा समुदायाला तो नियम लागू शकत नाहीं. म्हणून 'जन्म + वतुप्' या स्थलीं प्रकृतिप्रत्ययघटित समुदाय असून तो अर्थवान् असल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होते. त्याचप्रमाणें 'बहु पटु जस्' हा प्रकृतिप्रत्ययघटित समुदाय असून अर्थवान् असल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं.) आद्य पक्ष मानल्यास, म्हणजे 'यत्र पूर्वो भागः पदम् उत्तरभागस्तु प्रत्ययो न' असें जर नियमाचें स्वरूप मानलें तर, त्या पक्षांत 'राजपुरुषौ' इत्यादि स्थलीं 'पुरुषौ' इत्यादि शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण अर्थवत्त्व या कारणामुळेंच त्या संज्ञेचें निवारण करतां येते. 'औ' या प्रत्ययाचा अर्थ 'राजपुरुष' या संपूर्ण समुदायाच्या अर्थाशीं अन्वित होत असून केवळ 'पुरुष' या उत्तर

पदाशीं अन्वित होत नसल्यामुळें, 'पुरुषौ' याचे ठिकाणीं अर्थवत्ता येऊं शकत नाहीं. (राज्ञः पुरुषौ राजपुरुषौ = राजन् ङस् पुरुष औ औ' या स्थलीं 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें प्रातिपदिकावयव 'ङस्' व प्रथम 'औ' या अन्तर्वर्तिविभक्ति-प्रत्ययांचा लुक् झाल्यावर 'राजपुरुष' या सामासिक प्रातिपदिक-संज्ञक शब्दाहून नंतर 'औ' प्रत्यय केला असतां, 'राजपुरुष औ' या स्थितींत 'राजपुरुष' या सामासिक शब्दांतील 'पुरुष' या उत्तर पदाला, ज्या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा लुक् झाला आहे तो प्रत्ययलक्षणानें विद्यमान आहे असें मानून, पदसंज्ञा करतां येत नाहीं; कारण 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ प्रतिषेधः' सू. ४४२ वरील वार्तिक—असें प्रत्ययलक्षणाचें प्रतिषेधक वार्तिक आहे, व मागें सांगितल्याप्रमाणें त्या वार्तिकाचा असा अर्थ आहे कीं, समासांतील उत्तर खंडाला पदसंज्ञा करणें असल्यास, ज्या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा लुक् झाला आहे तो प्रत्ययलक्षणानें विद्यमान आहे असें मानून 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' या सूत्रान्वयें पदसंज्ञा करतां येत नाहीं; पण पदादिविधि करणें असल्यासच, तशा रीतीनें पदसंज्ञा करतां येते. वरील वार्तिकान्वयें 'राजपुरुषौ' या सामासिक पदांतील 'पुरुष' हा उत्तरखण्ड पदसंज्ञक ठरत नाहीं. 'पुरुषौ=पुरुष औ' हा समुदाय असा आहे कीं, यांतील पूर्व भाग 'पुरुष' हा पदसंज्ञक नाहीं व उत्तर भाग 'औ' हा 'राजपुरुष' या समुदायाहून झालेला प्रत्यय असून केवळ 'पुरुष' या शब्दाहून झालेला प्रत्यय नाहीं आणि त्यामुळें, 'राजपुरुषौ' या समुदायांतील 'पुरुषौ' हा शब्द प्रत्ययान्त नसून अर्थवान् असल्यामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा कां होऊं नये अशी शंकाकाराची शंका आहे. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, 'राजपुरुषौ' हा संपूर्ण सामा-सिक शब्द जरी अर्थवान् आहे तरी त्यांतील अवयव 'पुरुषौ' अर्थवान् नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययांचा लुक् झाल्यावर जो नंतर 'औ' प्रत्यय केला जातो तो 'राजपुरुष'

या संपूर्ण समुदायाहून केला जातो, केवळ 'पुरुष' या अवयवाहून केला जात नाहीं. त्यामुळें 'औ' या प्रत्ययाचा अर्थ 'राजपुरुष' या संपूर्ण समुदायाच्या अर्थाशीं अन्वित होत असून 'पुरुष' या शब्दाच्या अर्थाशीं अन्वित होत नसल्यामुळें, 'पुरुषौ' हा वरील समुदायांतील शब्द अर्थवान् ठरत नाहीं आणि त्यामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं.) 'तेन वाक्यस्य न' असें जें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे तें वरील नियमाचें फल होय, म्हणजे तें वरील नियमान्वयें सिद्ध होतें; (कारण वाक्यांतील पदामध्यें प्रकृतिप्रत्ययभावरूप संबंध नसतो किंवा पूर्वभाग पद व उत्तरभाग प्रत्यय अशी स्थिति नसते, आणि 'प्रत्ययग्रहणे यस्मात्सविहितस्तदादेः' या परिभाषान्वयें जरी वाक्य प्रत्ययान्त ठरत नाहीं व तें अर्थवान् पदांचा समुदाय असून स्वतः अर्थवान् असतें तरी, 'अर्थवत्समुदायस्य चेत् प्रातिपदिकसंज्ञा तर्हि समासस्यैव' असा प्रकृत सूत्रांतील 'समास' ग्रहणानें नियम सिद्ध होत असल्यामुळें, वाक्याला प्राति-पदिकसंज्ञा होत नाहीं. त्याला अर्थवान् असल्यामुळें प्रातिपदिकसंज्ञा झाली असती तर त्यांतील सर्व सुबन्तपदांपुढील विभक्तिप्रत्ययांचा 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें लुक् होण्याची आपत्ति आली असती हें पूर्वीं सांगितलेंच आहे.) असें आहे तरी, म्हणजे वरील नियमान्वयें वाक्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं तरी, 'कृद्ग्रहणे गतिकारकपूर्वस्यापि ग्रहणम्'—परि. २८—ही परिभाषा असल्यामुळें, 'मूलकेनोपदंशम्' इत्यादि वाक्यांना प्राति-पदिकसंज्ञा होणें टाळतां येणें शक्य नाहीं अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाहीं; कारण प्रकृत सूत्रांत जें 'समास' या पदाचें ग्रहण केलें आहे तें पर असल्यामुळें, त्याहून निष्पन्न होणाऱ्या नियमानें 'मूलकेनोपदंशम्' इत्यादि कृदन्त समुदायाचे ठिकाणीं प्रातिपदिकसंज्ञा परत्वामुळें बाधित होते. ('कृत्तद्धितसमासाश्च' या प्रकृत सूत्रांत 'कृत्' या पदाचें ग्रहण प्रथम केलें असून

'समास' या पदाचें ग्रहण पर असल्यामुळें, 'मूलकेनोपदंशम्' या कृदन्त समुदायाला 'कृत्' ग्रहणानें प्राप्त झालेल्या प्रातिपदिकसंज्ञेचा, पर समासग्रहणानें निष्पन्न होणाऱ्या 'अर्थवत्समुदायस्य चेत् प्रातिपदिकसंज्ञा तर्हि समासस्यैव' या भाष्यांत सांगितलेल्या नियमानें 'पूर्वात्परं बलवत्' या न्यायान्वयें, बाध होतो व तो कृदन्त समुदाय समास नसल्यामुळें त्याला, अर्थवान् असूनहि, प्रातिपदिक-संज्ञा होत नाहीं.) यावरून हें सिद्ध होतें कीं, 'कृत्तद्धित' या प्रकृत सूत्रांत कृद्ग्रहणपरिभाषा–परि. २८–मुळींच उपस्थित होत नाहीं; कारण ती उपस्थित झाल्यानें कोणतेंहि फल निष्पन्न होत नाहीं. (कृदन्त दोन प्रकारचे आहेत (१) उपपदरहित कृदन्त; (२) उप-पदसहित कृदन्त. उपपदरहित कृदन्तांना प्रकृत सूत्रांतील कृद्ग्रहणानेंच प्रातिपदिकसंज्ञा होते. 'गतिकारकोपपदानां कृद्भिः सह समासवचनं प्राक् सुबुत्पत्तेः'–परि. ७६–या परिभाषान्वयें उपपदसहित कृदन्ताचा, त्याहून सुबुत्पत्ति होण्यापूर्वींच, उपपदाशीं समास होत असल्यामुळें, तसा समास केला असतां, त्या सामासिक शब्दाला प्रकृत सूत्रांतील 'समास' ग्रहणानें प्रातिपदिकसंज्ञा होते. जेथें समासाचा विकल्प सांगितला असल्यामुळें, कृदन्ताचा उपपदाशीं विकल्पेंकरून समास केला जात नाहीं तशा स्थलीं, 'समास' या पदाच्या ग्रहणानें सिद्ध होणाऱ्या वर सांगितलेल्या नियमान्वयें, तशा समासरहित वाक्यरूप कृदन्त समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. सारांश 'कृद्ग्रहणे गतिकारकपूर्वस्यापि ग्रहणम्'–परि. २८–,म्हणजे जेथें सूत्रांत 'कृत्' प्रत्ययाचें ग्रहण केलें आहे तेथें त्या कृदन्तापूर्वीं गति किंवा कारक असल्यास गतिसहित व कारकसहित त्या कृदन्ताचें ग्रहण होतें, ही परिभाषा, 'मूलकेनोपदंशम्' इत्यादि स्थलीं जेथें कृदन्ताचा उपप-दाशीं, 'तृतीयाप्रभृतीन्यन्यतरस्याम्' सू. ७८४ या विकल्पविधायक सूत्रामुळें विकल्पेंकरून, समास केला जात नाहीं तशाच ठिकाणीं समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होण्याकरितां, प्रवृत्त होण्याचा संभव आहे. पण तशा ठिकाणीं देखील 'समास' ग्रहणानें सिद्ध होणाऱ्या

नियमान्वयें तिची प्रवृत्ति वर सांगिल्याप्रमाणें बाधित होत असल्यामुळें, ती तशा ठिकाणीं प्रवृत्त होऊं शकत नाहीं. इतर स्थलीं कृद्ग्रहणानें किंवा 'समास' ग्रहणानेंच नुकतेंच वर सांगितल्याप्रमाणें प्रातिपदिकसंज्ञा होत असल्यामुळें, कृदन्ताला प्रातिपदिकसंज्ञा होण्याकरितां ती परिभाषा प्रवृत्त करण्याची केव्हांहि गरज पडत नाहीं.)

मनोरमा– यत्तु वदन्ति – समासग्रहणं न नियमार्थं किं तु विद्ध्यर्थमेव । अर्थवत्त्वं हि वृत्तिमत्त्वम् । वृत्तिश्च द्विधा । शक्ति-र्लक्षणा च । न च सा समासेऽस्तीति । अत्रेदं वक्तव्यम् । सिद्धान्ते तावदेकार्थीभावाभ्युपगमाद्वृत्तिर्नास्तीति बाधितमेव । मीमांसक-मतेऽपि लक्षणाऽस्त्येव । यदाहुः–

सर्वत्रैव हि वाक्यार्थो लक्ष्य एवेति च स्थितम् ।। इति ।

अथ नैयातिकरीत्योच्येत । तदपि न । बहुपटव इत्याद्यसिद्धेः ।

तद्धितग्रहणं तद्विशिष्टपरमिति चेन्न, पचतकीत्यादावतिव्याप्तेः । किं चैवं कृद्ग्रहणपरिभाषया मूलकेनोपदंशमित्यादावतिव्याप्तिर्दुर्वारैवेत्यास्तां तावत् । चकारोऽनुक्तसमुच्चयार्थः । तेन "निपातस्यानर्थकस्य प्रातिपदिकसंज्ञा वक्तव्या" इति गतार्थम् । येषां द्योत्योऽप्यर्थो नास्ति तदर्थमिदम् । अवद्यति । अनुकरणेषु तु अनुकार्येण सहाभेद-विवक्षायामर्थवत्त्वाभावादेव प्रातिपदिकत्वम् । "भू सत्तायाम्" इति यथा । भेदविवक्षायां तु संज्ञा स्यादेव । "भुवो–वुक्" इति यथा ।

प्रकाशकारांचें असें म्हणणें आहे कीं, प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण नियमार्थ नसून विध्यर्थच आहे; कारण वृत्तिमत्व हेंच अर्थवत्व होय, म्हणजे ज्या शब्दाचे ठिकाणीं अभिधावृत्तीनें किंवा लक्षणावृत्तीनें अर्थबोध करण्याचें सामर्थ्य आहे तशाच शब्दाला अर्थवान् शब्द म्हणतात. वृत्ति दोन प्रकारची आहे. (१) शक्ति, म्हणजे अभिधाशक्ति, व (२) लक्षणा. या दोन्ही वृत्तींपैकीं

कोणतीहि वृत्ति समासाचे ठिकाणीं नसते, म्हणजे या दोन वृत्तींपैकीं कोणत्याहि वृत्तीनें सामासिक पदाच्या अर्थाचा बोध होत नसतो. यावर असें उत्तर आहे कीं, सिद्धान्तपक्षांत एकार्थीभाव मानला असल्यामुळें, म्हणजे समासघटक पदें आपापला भिन्न अर्थ न सांगतां परस्परान्वित व एकार्थीभावापन्न होऊन समुदायशक्तीनें एकच अर्थ सांगतात असा सिद्धान्त मानला असल्यामुळें, समासाचें ठिकाणीं वृत्तिमत्व नसतें हें म्हणणें बाधित होतें – म्हणजे त्या सिद्धान्तान्वयें चूक ठरतें. मीमांसकांच्या मतें देखील समासाचे ठिकाणीं लक्षणारूप वृत्तिमत्व असतेंच; कारण ते म्हणतात – 'सर्वत्रैव हि वाक्यार्थो लक्ष्य एवेति च स्थितम्,' म्हणजे सर्वत्र वाक्यार्थाचा बोध लक्षणावृत्तीनेंच होत असतो असा सिद्धान्त आहे. प्रकाशकारांचें म्हणणें जर नैयायिकांच्या मताला धरून असेल तरी देखील तें म्हणणें योग्य ठरत नाहीं; कारण त्यांचें म्हणणें बरोबर मानल्यास, 'बहुपटवः' इत्यादि स्थलीं इष्टसिद्धि होणार नाहीं, म्हणजे इष्ट प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकणार नाहीं. (नैयायिकांचें मत असें आहे कीं, केवळ पदांच्याच ठिकाणीं अभिधावृत्तीनें किंवा लक्षणावृत्तीनें अर्थाचा बोध करण्याचें सामर्थ्य असतें. तसें सामर्थ्य वाक्यांत किंवा समासांत नसतें. सारांश त्यांच्या मतें पदेंच केवळ अर्थवान् आहेत व तीं वाक्यघटित किंवा समासघटित पदें ज्या अर्थाचा बोध करितात तोच वाक्यार्थ किंवा सामासिक पदाचा अर्थ होय, म्हणजे वाक्यार्थ किंवा सामासिक पदाचा अर्थ हा त्या वाक्यांतील किंवा समासांतील पदांच्या अर्थाहून भिन्न नसून सर्व पदांचा जो अर्थ आहे तोच वाक्यार्थ किंवा समासार्थ होय. मीमांसक म्हणतात कीं, वाक्यांत किंवा समासांत लक्षणावृत्तीनें अर्थाचा बोध करण्याचें सामर्थ्य असतें. वैयाकरणांच्या मतें वाक्यांत किंवा समासांत आणि तसेंच कृदन्त व तद्धितान्त यांत अभिधारूप समुदायशक्तीनेंच अर्थबोध करण्याचें सामर्थ्य असतें. प्रकाशकारांनीं नैयायिकांच्या मताला अनुसरून जें म्हटलें आहे तें बरोबर मानल्यास, 'बहु पटु जस्' हा समुदाय

पदसंज्ञक नसल्यामुळें त्याचे ठिकाणीं अर्थबोध करण्याचें सामर्थ्य नाहीं असें मानावें लागेल व अशा रीतीनें तो समुदाय अर्थवान् ठरत नसल्यामुळें व तसेंच तद्धितान्त देखील नसल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा न होण्याची व त्यामुळें त्याहून सुबुत्पत्ति न होण्याची आणि 'बहुपटव:' असें इष्ट पदसंज्ञक रूप सिद्ध न होण्याची आपत्ति येते.) प्रकृत सूत्रांतील 'तद्धित' या पदाच्या ग्रहणानें (केवळ तद्धितान्ताचेंच ग्रहण होत नसून) तद्धितप्रत्ययविशिष्ट शब्दस्वरूपाचें देखील ग्रहण होतें (व त्यामुळें 'बहु पटु जस्' हा समुदाय जरी तद्धितान्त नाहीं तरी तद्धितप्रत्ययविशिष्ट असल्यामुळें, प्रकृत सूत्रांतील 'तद्धित' या शब्दानें त्याचें ग्रहण होऊन त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकते) असें प्रकाशकारांचें म्हणणें असल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण तें म्हणणें बरोबर मानल्यास, 'पचतकि' इत्यादि स्थलीं अतिव्याप्तिरूप दोष येतो, म्हणजे प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते. ('अव्ययसर्वनाम्नामकच् प्राक् टे:' सू. २०२६ या सूत्रांत 'तिङश्च' सू. २००२ या सूत्राची अनुवृत्ति होत असल्यामुळें, 'पचति' या तिङन्ताहून 'टि' चे पूर्वीं, म्हणजे अन्त्य इकाराचें पूर्वीं, 'अकच् = अक्' प्रत्यय होऊन 'पचतकि' असें रूप होतें. 'पचतकि' हा समुदाय 'अकच्' या तद्धित प्रत्ययानें युक्त आहे, म्हणजे तो तद्धितान्त नाहीं तरी तद्धितप्रत्ययविशिष्ट आहे, व प्रकृत सूत्रांतील 'तद्धित' या शब्दानें केवळ तद्धितान्ताचेंच ग्रहण न होतां तद्धितप्रत्ययविशिष्टाचें देखील ग्रहण होतें असें मानलें तर, प्रकृत सूत्रानें 'पचतकि' याला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची व त्याहून सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येईल.) दुसरें असें कीं, (प्रकृत सूत्रांतील 'तद्धित' या शब्दानें तद्धितप्रत्ययविशिष्टाचें ग्रहण होतें असें मानलें तर, या सूत्रांतील 'कृत्' या शब्दानें कृत्प्रत्ययविशिष्टाचें ग्रहण होतें असे देखील मानावें लागेल व तसें मानल्यास) 'कृद्ग्रहणे'- परि. २८—या परिभाषान्वयें 'मूलकेनोपदंशम्' इत्यादि कृत्प्रत्ययविशिष्ट समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति टाळतां येऊं

शकणार नाहीं. ('मूलकेनोपदंशम्' या कृत्प्रत्ययविशिष्ट समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा झाल्यास, 'मूलकेन' यांतील 'टा = इन' या विभक्तिप्रत्ययाचा लुक् होण्याची व समुदायाहून सुबुत्पत्ति होण्याची आपत्ति येते हें पूर्वी सांगितलेंच आहे. प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण नियमार्थ मानल्यानें ती आपत्ति टळते. म्हणून प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण जसें प्रकाशकार विध्यर्थक मानतात तसें न मानतां तें नियमार्थकच मानणें उचित आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) या विषयाचें एवढें विवेचन पुरें. या प्रकरणांत ज्यांचा निर्देश केला नाहीं त्यांचें देखील ग्रहण व्हावें, म्हणजे त्यांना देखील प्रातिपदिकसंज्ञा व्हावी, याकरितां प्रकृत सूत्रांत 'च' हें पद घातलें आहे. त्यामुळें 'निपातस्यानर्थकस्य प्रातिपदिकसंज्ञा वक्तव्या' हें वार्तिक गतार्थ – अनावश्यक – ठरतें. ज्या निपातांचे ठिकाणीं द्योत्य अर्थ देखील नाहीं त्यांच्याकरितां, म्हणजे तशा अनर्थक निपातांना प्रातिपदिकसंज्ञा व्हावी याकरितां, हें वरील वार्तिक पठित केलें आहे. उदाहरणार्थ 'अवद्यति.' (मागील सूत्रावरील भाष्यांत 'निपातस्यानर्थकस्य प्रातिपदिकत्वम्' हें वार्तिक पठित करून त्याचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात–'निपातस्यानर्थकस्य प्रातिपदिकसंज्ञा वक्तव्या। खञ्जति निखञ्जति। लम्बते प्रलम्बते। किं पुनरत्र प्रातिपदिकसंज्ञया प्रार्थ्यते ?। प्रातिपदिकादिति स्वाद्युत्पत्तिः। सुबन्तं पदमिति पदसंज्ञा। पदस्य पदादिति निघातो यथा स्यात्।' या वरील भाष्यांतील 'अनर्थकस्य' हें प्रतीक घेऊन कैयटानें 'निपातानां द्योतकत्वादभिधेयार्थाऽभावेऽपि द्योत्यार्थसद्भावात् येषामर्थवत्वं तेषां सिद्धयत्येव संज्ञा। यस्य तु द्योत्योऽप्यर्थो नास्ति तदर्थं वचनम्।' असें म्हटलें आहे व याचाच अनुवाद दीक्षितांनीं मनोरमेंत केला आहे. परंतु पुढें ते म्हणतात कीं, प्रकृत सूत्रांतील 'च' नें अशा द्योत्यार्थरहित निपातांचें ग्रहण करतां येत असल्यामुळें, वरील वार्तिक मानण्याची कांहीं गरज नाहीं. 'अवद्यति' हें जें उदाहरण मनोरमेंत

दीक्षितांनीं दिलें आहे त्यांतील 'अव' हा निपात द्योत्यार्थरहित असून अनर्थक आहे व त्या उदाहरणांत 'द्यति' हेंच अर्थवान् असून 'अव' हें अनर्थक असल्यामुळें त्याला पूर्व सूत्रानें जी प्रातिपदिकसंज्ञा प्राप्त नव्हती ती प्रकृत सूत्रानें होऊन त्याहून सुबुत्पत्ति होते, व 'स्वरादिनिपातमव्ययम्' सू. ४४७ या सूत्रान्वयें 'अव' हा निपात अव्ययसंज्ञक ठरत असल्यामुळें जरी 'अव्ययादाप्सुपः' सू. ४५२ या सूत्रानें त्याहून होणाऱ्या औत्सर्गिक 'सु' प्रत्ययाचा, लुक् होतो तरी, प्रत्ययलक्षणानें 'अव' याला पदसंज्ञा होते आणि त्यामुळें 'सुबन्तं समर्थेन समस्यते' या नियमान्वयें त्याचा 'द्यति' या तिङन्ताशीं समास होतो आणि तिङन्ताला 'तिङ्ङतिङः' सू. ३९३५ या सूत्रानें निघातस्वर होतो.) अनुकरणांच्या विषयांत (हें लक्षांत ठेवावें कीं,) जेथें अनुकार्य व अनुकरण या दोहोंमध्यें अभेदविवक्षा असते तेथें अनुकरणाचे ठिकाणीं अर्थवत्व नसल्यामुळेंच अनुकरणाला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. उदाहरणार्थ 'भू सत्तायाम्.' पण जेथें त्या दोहोंमध्यें भेदविवक्षा असते तेथें अनुकरणाला प्रातिपदिकसंज्ञा होतेच. उदाहरणार्थ 'भुवो वुक्' सू. २१७४. (जेथें अनुकरण व अनुकार्य या दोहोंमध्यें अभेदविवक्षा असतें तेथें अनुकरण अर्थरहित असतें हें पूर्वीं सांगितलेंच आहे. म्हणून त्या पक्षांत अनर्थक अनुकरणाला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. 'भू सत्तायाम्' या धातुपाठांतील निर्देशांत मूळ धातु जो 'भू' त्याचें अनुकरण अभेदविवक्षा मानून केलें आहे. त्यामुळें 'भू' या अनुकरणाला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं व त्याहून सुबुत्पत्ति होत नाहीं आणि म्हणूनच धातुपाठांत 'भू' असा विभक्तिप्रत्ययरहित निर्देश केला आहे. येथें जर भेदविवक्षा असती तर 'भू' या अनुकरणाला प्रातिपदिकसंज्ञा होऊन त्याहून सुबुत्पत्ति झाली असती व 'भूः सत्तायाम्' असा धातुपाठांत निर्देश केला असता. 'भुवो वुक्' या सूत्रांत मूळ 'भू' धातूचें सूत्रनिर्दिष्ट 'भू' हें अनुकरण असून दोहोंमध्यें भेदविवक्षा असल्यामुळें, अनुकरण अर्थवान् ठरतें व

त्यामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊन त्याहून षष्ठीच्या एक-वचनाचा प्रत्यय केला आहे. सारांश वरील पाणिनीय निर्देशांवरूनच हें स्पष्ट होतें कीं, अभेदानुकरणपक्षांत अनुकरणाला अर्थवत्वाच्या अभावामुळें प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं व भेदानुकरणपक्षांत अनु-करण अर्थवान् असल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊन त्याहून सुबुत्पत्ति होते.)

शब्दरत्न—तत्सामर्थ्यादिति । अन्यथा संज्ञाविधित्वान्न स्यात् । न प्रत्ययमात्रेणेति । प्रकृतेरपेक्षणादिति भावः । अधातुरिती । कर्तृरूपार्थस्याधिकस्य भानेऽपि क्रियावाचकत्वाक्षत्या धातुत्वाक्षतेरिति भावः । स्त्रीप्रत्यये इति । अनुपसर्जनस्त्रीप्रत्यय इत्यर्थः । तस्य येन केनापि रूपेण ग्रहणे तन्निषेध इत्यभिमानः शङ्कितुः । राजकुमारीति । नन्वत्र प्रातिपदिकत्वस्य न फलं लिङ्गविशिष्टपरिभाषयैव तत्कार्य-सिद्धेरिति चेन्न । प्रातिपदिकत्वतद्व्याप्यधर्माणां लिङ्गप्रत्ययरहिते दृष्टानां तद्विशिष्टेऽनयाऽतिदेशेन तस्या अत्राप्रवृत्तेः । न हि ङीब्र-हिते राजकुमारेत्यादौ तदस्ति, ङ्याब्ग्रहणं त्वन्यार्थमिति वक्ष्यते । शङ्कित्रभिमानानुसारेणैवोत्तरयति—अन्तरङ्गस्यापीति । सुलभत्वा-दिति । यथोद्देशे इदम् । यदि त्वस्य निषेधस्य प्रत्ययग्रहणपरिभाषा-शेषत्वं एवं च यथा सा प्रत्ययग्रहणे एव न तु प्रत्ययाप्रत्ययग्रहणे इति "उगितश्च" इति सूत्रे भाष्ये स्पष्टं, तथाऽयं निषेधोऽपि स्त्रीप्रत्ययमात्रग्रहणे न तु स्त्रीप्रत्ययास्त्रीप्रत्ययग्रहणे इत्युच्यते तदा न दोषः, समुदायस्य प्रत्ययान्तत्वाभावादिति दिक् ।

'तत्सामर्थ्यात्तदन्तविधिः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाची अनुवृत्ति मानली नसती तर ('संज्ञाविधौ प्रत्ययग्रहणे तदन्तग्रहणं नास्ति'—परि. २७ ही परिभाषा असल्यामुळें व) प्रकृत सूत्र प्रातिपदिकसंज्ञाविधायक सूत्र असल्यामुळें, तदन्तविधि होऊं शकला नसता (व त्यामुळें प्रकृत सूत्रांतील 'कृत्' व 'तद्धित'

यांचा कृदन्त व तद्धितान्त असा अर्थ होऊं शकला नसता; पण प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाची अनुवृत्ति असल्यामुळें आणि कृत् प्रत्यय व तद्धित प्रत्यय यांत लौकिकी प्रशस्त अर्थवत्ता नसून ती कृदन्त व तद्धितान्त यांत असल्यामुळें, त्या अनुवृत्तीच्या सामर्थ्यानें तदन्तविधि होऊन कृत् व तद्धित या पदांचा कृदन्त व तद्धितान्त असा तदन्तविधीनें अर्थ सिद्ध होतो.) 'न प्रत्ययमात्रेणार्थपर्यवसानम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, (प्रत्ययाला अर्थबोध करण्याकरितां विभक्तिप्रत्ययाहून भिन्न अशा) प्रकृतीची अपेक्षा असते. (सारांश केवळ प्रत्यय हा लौकिक प्रशस्त अर्थाचा बोध करूं शकत नाहीं. तो प्रकृतीशीं युक्त झाला असतांच प्रकृतिप्रत्ययसमुदायाचे ठिकाणीं लौकिकी प्रशस्त अर्थवत्ता येते, आणि मागील सूत्रावरील शब्दरत्नांत सांगितल्याप्रमाणें त्या सूत्रांतील 'अर्थवत्' या पदाचा व प्रकृत सूत्रांत अनुवृत्त होणाऱ्या त्या पदाचा 'विभक्तीतरानपेक्षयाऽर्थबोधकत्वमर्थवत्वम्' असा अर्थ असल्यामुळें, कृत् प्रत्यय व तद्धित प्रत्यय हे प्रशस्तार्थवत्वाभावामुळें अनर्थक ठरतात व त्यांना प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. परंतु कृदन्त व तद्धितान्त हे प्रशस्तार्थवान् असल्यामुळें, त्यांना ती संज्ञा होते.) 'लिट्, धुक् इत्यादौ अधातुः इति…पर्युदासे प्राप्ते' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, जरी ('लिह्, दुह्' या धातूंहून कर्तरि क्विप् प्रत्यय झाला असल्यामुळें) 'लिट्, धुक्' या शब्दांहून 'कर्ता' या अधिक अर्थाचा बोध होतो तरी, त्या धातूंचें क्रियावाचकत्व नष्ट होत नसल्यामुळें, त्यांना धातु मानतां येतें. (शंकाकाराची शंका अशी आहे कीं, 'लिट्, धुक्' या शब्दांहून केवळ क्रियेचा प्राधान्यानें बोध होत नसून, 'लिह्, दुह्' या धातूंहून कर्तरि क्विप् प्रत्यय केला असल्याकारणानें त्या शब्दांहून कर्त्याचा प्राधान्यानें बोध होतो व जरी क्रियेचा बोध होतो तरी तो कर्तृविशिष्ट क्रिया अशा रीतीनें गौणरूपानें बोध होतो आणि म्हणून 'लिट्, धुक्' यांना धातुसंज्ञेची

प्राप्तीच होत नाहीं. या शंकेवर हें उत्तर आहे कीं, 'भूवादयो धातवः' सू. १८ या धातुसंज्ञाविधायक सूत्रांत केवळ क्रियेचा वाचक असणाऱ्या किंवा प्राधान्यानें क्रियेचा वाचक असणाऱ्या शब्दालाच धातुसंज्ञा व्हावी असें सांगितलें नसल्यामुळें, 'लिट्, धुक्' या शब्दांनीं जरी केवळ क्रियेचा किंवा प्राधान्यानें क्रियेचा बोध होत नाहीं व कर्तृविशिष्टक्रियेचा बोध होतो तरी, त्यांहून क्रियेचाहि बोध होत असल्यामुळें, त्यांचें धातुत्व नष्ट होत नाहीं, आणि म्हणूनच 'अत्वसन्तस्य चाधातोः' सू. ४२५ या सूत्रांतील 'अधातोः' हा पर्युदास सार्थक व योग्य ठरतो. सारांश 'लिट्, धुक्' यांचे ठिकाणीं क्रियावाचकत्व असल्यामुळें, पूर्व सूत्रांतील 'अधातुः' या पर्युदासान्वयें त्यांना जी पूर्वसूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नव्हती ती त्यांना, ते शब्द कृदन्त असल्यामुळें, प्रकृत सूत्रानें होते.) मनोरमेंतील 'स्त्रीप्रत्यये' या पदाचा 'अनुपसर्जनस्त्रीप्रत्यये,' म्हणजे जेथें स्त्रीप्रत्यय प्रधान आहे तशा ठिकाणीं, असा अर्थ आहे. शंकाकारानें मनोरमेंत जी शंका उपस्थित केली आहे ती असें मानून केली आहे कीं, कोणत्याहि रूपानें स्त्रीप्रत्ययाचें ग्रहण होऊं शकत असल्यास तदादि नियम लागू पडत नाहीं. 'राजकुमारी' या सामासिक शब्दाला प्रकृत सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा केल्यानें कोणतेंहि (अधिक) फल लाभत नाहीं, कारण ('प्रातिपदिकग्रहणे लिङ्गविशिष्टस्यापि ग्रहणम्'—परि. ७२-या) लिङ्गविशिष्टपरिभाषान्वयेंच प्रातिपदिकाला पावलेलीं कार्यें त्या स्त्रीप्रत्ययविशिष्ट शब्दाला होऊं शकतात असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण लिङ्गबोधकप्रत्ययरहित शब्दाचे ठिकाणीं जें प्रातिपदिकत्व असतें व प्रातिपदिकाचे ठिकाणीं राहणारे धर्म असतात त्यांचा लिङ्गबोधकप्रत्यययुक्त त्या शब्दाचे ठिकाणीं त्या परिभाषान्वयें अतिदेश करतां येत असल्यामुळें, प्रकृत स्थलीं, म्हणजे 'राजकुमारी' या उदाहरणांत, ती परिभाषा प्रवृत्त होऊं शकत नाहीं. 'ङीप्' प्रत्ययरहित 'राजकुमार' इत्यादि

शब्दांचे ठिकाणीं प्रातिपदिकत्व धर्म नाहीं. ('ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ या सूत्रांत जें) 'ङी, आप्' यांचें ग्रहण केलें आहे तें इतर प्रयोजनांकरितां केलें आहे हें पुढें सांगण्यांत येईल. शंकाकारानें आपली शंका ज्या परिभाषेच्या आधारावर उपस्थित केली आहे ती परिभाषा, म्हणजे 'स्त्रीप्रत्यये चानुपसर्जने न' ही परिभाषा, 'राजकुमारी' या उदाहरणास लागू पडते असें गृहीत धरून दीक्षितांनीं त्या शंकेचें 'अन्तरङ्गस्यापि ··· सुलभत्वात्' या मनोरमेंतील पंक्तींत उत्तर दिलें आहे. त्या पंक्तींत 'सुलभत्वात्' इत्यादि जें म्हटलें आहे तें यथोद्देशपक्षाला धरून म्हटलें आहे. (कारण यथोद्देशपक्षांत एकदां प्रातिपदिकसंज्ञा झाली असतां, पुढें इतर कार्य करतेवेळीं ती संज्ञा कायम राहत असल्यामुळें, तिच्या बलावर पुढें प्राप्त होणारीं इतर कार्यें करतां येतात. परंतु कार्यकालपक्षांत प्राप्त झालेलें कार्य केल्यावर त्या कार्याकरितां केलेली संज्ञा नाहींशी होते व पुढें इतर कार्य प्राप्त झाल्यास, त्या संज्ञेचा उपयोग करतां येत नाहीं व तीं कार्यें करण्याकरितां पुन्हा संज्ञा प्राप्त करावी लागते. म्हणून 'राजन् ङस् कुमारी सु' या स्थलीं 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययांचा लुक् करतेवेळीं यथोद्देशपक्षांत त्या समुदायाला जी प्रातिपदिकसंज्ञा होते ती अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययांचा लुक् केल्यावर देखील पुढें समुदायाहून सुबुत्पत्ति करतेवेळीं कायम राहते. परंतु कार्यकालपक्षांत अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययांचा लुक् होण्याकरितां केलेली प्रातिपदिकसंज्ञा तें लुक्कार्य केल्यावर नाहींशी होत असल्यामुळें, नंतर समुदायाहून सुबुत्पत्ति करतेवेळीं पुन्हा प्रातिपदिकसंज्ञा प्राप्त करून देण्याची गरज पडतेच. म्हणून 'राजन् ङस् कुमारी सु' या स्थलीं सुब्लुक् झाल्यावर जशी 'राजकुमारी' या समुदायाला एकदेशविकृतन्यायानें प्रातिपदिकसंज्ञा यथोद्देशपक्षांत प्राप्त करून देतां येते तशी ती संज्ञा कार्यकालपक्षांत करून देतां येत नसल्यामुळें व त्या पक्षांत पुन्हा प्रातिपदिकसंज्ञा करण्याची गरज पडत असल्यामुळें,

शंकाकाराच्या शंकेवर दीक्षितांनीं जें उत्तर दिलें आहे व म्हटलें आहे कीं, समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा सहज प्राप्त करून देतां येते तें म्हणणें कार्यकालपक्षांत संभवत नसून यथोद्देशपक्षांतच संभवतें आणि म्हणूनच 'यथोद्देशपक्षे इदम्' असें शब्दरत्नांत म्हटलें आहे.) जर 'स्त्रीप्रत्यये' – परि. २६ – ही परिभाषा 'प्रत्ययग्रहणे' – परि. २३ – या परिभाषेची शेष, म्हणजे पूरक, परिभाषा आहे असें मानलें व ज्याप्रमाणें प्रत्ययग्रहणपरिभाषा ही जेथें साक्षात् प्रत्ययाचें ग्रहण केलें आहे अशाच ठिकाणीं लागू पडते व जेथें अशा शब्दाचें ग्रहण केलें आहे कीं, ज्यानें प्रत्यय व प्रत्ययभिन्न या दोहोंचेंहि ग्रहण होतें अशा ठिकाणीं ती परिभाषा लागू पडत नाहीं असें 'उगितश्च' सू. ४·१·६ या सूत्रावरील भाष्यांत सांगितल्या-प्रमाणें मानलें जातें. त्याचप्रमाणें 'स्त्रीप्रत्यये' ही निषेधक परि-भाषा देखील जेथें सूत्रांत स्त्रीप्रत्ययाचें ग्रहण केलें आहे तशाच ठिकाणीं लागू पडते व जेथें सूत्रांत अशा शब्दाचें ग्रहण केलें आहे कीं, जो शब्द स्त्रीप्रत्ययास व स्त्रीप्रत्ययभिन्न इतर प्रत्ययास सारखाच लागू पडतो तशा ठिकाणीं त्या परिभाषेची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं असें मानलें तर, कांहीं दोष येत नाहीं, म्हणजे 'राजकुमारी' या शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं; कारण 'राजकुमारी' हा समुदाय प्रत्ययान्त नाहीं. ('राजकुमारी' या उत्तरपदार्थप्रधान षष्ठीतत्पुरुषसमासांतील 'कुमारी' हें ङीबन्त उत्तर पद प्रधान असल्यामुळें, 'स्त्रीप्रत्यये चानुपसर्जने न'–परि. २६–या परिभाषान्वयें त्या शब्दाला तदादि नियम लागू पडत नाहीं आणि म्हणून जरी केवळ 'कुमार' या शब्दाहून 'ङीप्' प्रत्यय झाला असून 'राजकुमार' या समुदायाहून तो प्रत्यय झाला नाहीं तरी, 'राजकुमारी' हा संपूर्ण समुदाय त्या परिभाषान्वयें स्त्रीप्रत्ययान्त मानतां येतो आणि त्यामुळें 'अर्थवद-धातुः' सू. १७८ या पूर्वसूत्रांत 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' हा पर्युदास असल्याकारणानें, 'राजकुमारी' या स्त्रीप्रत्ययान्त ठरत

असलेल्या शब्दाला जी प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं ती त्या सामासिक शब्दाला व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण नियमार्थ न मानतां विध्यर्थ मानणें आवश्यक आहे; कारण तें ग्रहण नियमार्थ मानल्यास, स्त्रीप्रत्ययान्त 'राजकुमारी' इत्यादि सामासिक शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा न होण्याची आपत्ति येते अशी मनोरमेंत शंका उपस्थित केली आहे. या शंकेवर अशी प्रतिशंका करण्यांत येते कीं, 'राजकुमारी' इत्यादि शब्दांना प्रातिपदिकसंज्ञा होण्याकरितां प्रकृत सूत्रांतील 'समास' ग्रहण विध्यर्थक मानण्याची कांहींच गरज नाहीं; कारण 'राजकुमार' या अर्थवान् सामासिक शब्दाला 'अर्थवदधातुः' या पूर्व सूत्रानें जी प्रातिपदिकसंज्ञा होते ती 'राजकुमारी' या स्त्रीप्रत्यय-विशिष्ट शब्दाचे ठिकाणीं 'प्रातिपदिकग्रहणे लिङ्गविशिष्ट-स्यापि ग्रहणम्'– परि. ७२– या परिभाषान्वयें आपोआपच अतिदेशानें प्राप्त करून देतां येते व त्यामुळें प्रातिपदिकाहून होणारी सुबुत्पत्ति इत्यादि सर्व कार्यें 'राजकुमारी' या शब्दाहून होऊं शकतात. या प्रतिशंकेवर शब्दरत्नांत असें उत्तर दिलें आहे कीं, 'राजकुमारी' या स्थलीं 'राजकुमार' या संपूर्ण शब्दाहून 'ङीप्' प्रत्यय झाला नसून त्यांतील चरमावयव जो 'कुमार' हा शब्द आहे त्याहून 'ङीप्' प्रत्यय झाला आहे. म्हणून 'प्रातिपदिकग्रहणे'- परि. ७२ या परिभाषान्वयें 'कुमार' या शब्दांत जो प्रातिपदिकत्व धर्म आहे तो 'कुमारी' या शब्दांत जरी येऊं शकतो तरी 'राज-कुमारी' या शब्दांत तो धर्म येऊं शकत नाहीं. 'राजकुमार' या प्रातिपदिकाहून जर 'ङीप' प्रत्यय झाला असता तर 'राजकुमार' या शब्दानें स्त्रीप्रत्ययविशिष्ट 'राजकुमारी' या शब्दाचें ग्रहण करतां येऊं शकलें असतें व त्याचे ठिकाणीं प्रातिपदिकत्व धर्म अतिदेशानें आणतां येऊं शकला असता. पण 'राजकुमारस्य स्त्री' राजकुमारी' अशी प्रकृत स्थलीं स्थिति नसून 'राज्ञः कुमारी राज-कुमारी' अशी वास्तविक स्थिति असल्यामुळें, 'राजकुमारी' या

स्त्रीप्रत्ययान्त शब्दाला मागील सूत्रान्वयें व तसेंच पूर्वोक्त लिङ्ग-विशिष्टपरिभाषान्वयें प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं. ती संज्ञा त्या शब्दाला होणें इष्ट असल्यामुळें, प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण विध्यर्थक मानणें आवश्यक आहे असा शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. आतां 'राजकुमारी' या शब्दाहून सुबुत्पत्ति व्हावी एवढ्याकरितांच त्या शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा करून देणें असल्यास त्या शब्दाला जरी प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं असें मानले तरी, 'ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ या अधिकारसूत्रांत 'ङी = ङ्यन्त' याचें ग्रहण केलें असल्यामुळें व 'राजकुमारी' हा शब्द वर सांगितल्याप्रमाणें 'स्त्रीप्रत्यये चानुपसर्जने न' या परिभाषान्वयें ङ्यन्त ठरत असल्यामुळें, त्याहून त्या अधिकार-सूत्रान्वयें सुबुत्पत्ति होण्यांत कांहींच अडचण येत नाहीं अशी पुन्हा प्रतिशंका केली जाते. या प्रतिशंकेवर शब्दरत्नांत असें उत्तर दिलें आहे कीं, 'ङ्याप्प्रातिपदिकात्' या सूत्रांत जें 'ङी, आप्' या स्त्रीप्रत्ययांचें ग्रहण केलें आहे तें ङ्यन्त व आबन्त शब्दांहून सुबुत्पत्ति व्हावी याकरितां केलें नसून भिन्न प्रयोजनाकरितां केलें आहे व तें प्रयोजन त्या सूत्रावरील कौमुदींत 'प्रातिपदिकग्रहणे लिङ्गविशिष्टस्यापि ग्रहणम् इत्येव सिद्धे-ङ्याब्ग्रहणं ङ्याबन्तात् तद्धितोत्पत्तिर्यथा स्यात् ङ्याभ्यां प्राङ् मा भूदित्येवमर्थम्' या शब्दांत दीक्षितांनीं दिलें आहे. आतां मनोरमेंत जी शंका उपस्थित केली आहे त्या शंकेवर दीक्षितांनीं यथोद्देश-पक्षाचा आश्रय करून 'अन्तरङ्गस्यापि हल्ङ्यादिलोपस्य·· सुलभ-त्वात्' असें मनोरमेंत उत्तर दिलें आहे व त्याचें विवरण पूर्वी मनोरमेंत केलेंच आहे. शद्वरत्नकारांचें असें म्हणणें आहे कीं, मनोरमेंत जी शंका उपस्थित केली आहे व दीक्षितांनीं तिचें जें उत्तर दिलें आहे हीं दोन्हीं, 'स्त्रीप्रत्यये चानुपसर्जने न'—परि. २६—ही परिभाषा 'राजकुमारी' या स्त्रीप्रत्ययान्त शद्बाला 'अर्थवद-धातुरप्रत्ययः' या पूर्वसूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होऊं देण्याच्या आड

येते असें गृहीत धरून, केलीं आहेत. वास्तविक ती परिभाषा 'राजकुमारी' या स्थलीं लागू पडत नाहीं असें दीक्षितांनीं त्या शंकेवर उत्तर द्यावयास पाहिजे होतें. ती परिभाषा 'राजकुमारी' या स्थलीं कां लागू पडत नाहीं याचें कारण शब्दरत्नकारांनीं प्रकृत पंक्तींत दिलें आहे. ते असें म्हणतात कीं, 'प्रत्ययग्रहणे यस्मात्स विहितस्तदादेः'–परि. २३– या परिभाषेची 'स्त्रीप्रत्यये चानुपसर्जने न' ही निषेधक परिभाषा असल्यामुळें, ही द्वितीय परिभाषा प्रथम परिभाषेची शेष–पूरक–ठरते व अशा रीतीनें या दोन परिभाषा निषेध्यनिषेधकभावानें परस्परसंबद्ध असल्यामुळें, पूर्व परिभाषेंतील 'ग्रहणे' हा शब्द उत्तर परिभाषेंत संबद्ध होतो व 'स्त्रीप्रत्ययग्रहणे चानुपसर्जने न' अशा रीतीनें ती निषेधक परिभाषा पठित केली पाहिजे आणि त्यामुळें त्या परिभाषेचा असा अर्थ होतो कीं, सूत्रांत स्त्रीप्रत्ययाचें ग्रहण केलें असल्यास व त्या सूत्रानें स्त्रीप्रत्ययान्ताला कांहीं कार्य होणें सांगितलें असल्यास, जेथें स्त्रीप्रत्यय प्रधान आहे तेथें तदादि नियम लागू पडत नाहीं. पण 'अर्थवदधातुरप्रत्ययः' सू. १७८ या पूर्वसूत्रांत जरी 'प्रत्यय' या सामान्य शब्दाचें ग्रहण केलें आहे तरी त्या सूत्रांत स्त्रीप्रत्ययाचें साक्षात् ग्रहण केलें नसल्यामुळें, त्या सूत्राचे ठिकाणीं 'स्त्रीप्रत्यये' ही परिभाषा मुळींच उपस्थित होऊं शकत नाहीं. यावर शंकाकार असें म्हणतो कीं 'प्रत्यय' या सामान्य शब्दानें सर्व प्रकारच्या प्रत्ययांचें ग्रहण होऊं शकत असल्यामुळें त्या शब्दानें स्त्रीप्रत्ययाचें ग्रहण करतां येतेंच व त्यामुळें त्या सूत्राचे ठिकाणीं 'स्त्रीप्रत्यये' ही परिभाषा उपस्थित होण्यांत कांहीं प्रत्यवाय येत नाहीं, आणि ती परिभाषा उपस्थित झाली असतां त्या परिभाषान्वयें 'राजकुमारी' हा संपूर्ण शब्द, त्या समुदायांतील 'कुमारी' हा स्त्रीप्रत्ययान्त शब्द प्रधान असल्यामुळें, स्त्रीप्रत्ययान्त ठरतो व पूर्व सूत्रांत 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' असा पर्युदास असल्यामुळें, त्या सूत्रानें 'राजकुमारी' या अर्थवान् समुदायाला जी प्रातिपदिक-

संज्ञा होऊं शकत नाहीं ती त्याला व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण विध्यर्थक मानणें आवश्यक आहे. या शंकाकाराच्या म्हणण्यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, वर सांगितल्याप्रमाणें प्रत्ययग्रहणपरिभाषेची 'स्त्रीप्रत्यये' ही पूरक परिभाषा असल्यामुळें, प्रत्ययग्रहणपरिभाषेंतील 'प्रत्यय' या शब्दाचें भाष्यकारांनीं जें 'उगितश्च' ४.१.६ या सूत्रावरील भाष्यांत व्याख्यान केलें आहे तें 'स्त्रीप्रत्यये' या परिभाषेंतील 'प्रत्यय' या शब्दाला देखील सारखेंच लागू पडतें. त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं असा प्रश्न केला आहे कीं, त्या सूत्रांतील 'उगितः' या पदाचा 'उगितः प्रातिपदिकात्' असा अर्थ करावा किंवा 'उगिदन्तात् प्रातिपदिकात्' असा अर्थ करावा. 'उगितः प्रातिपदिकात्' असा अर्थ केल्यास, 'भवती, महती' हीं रूपें सिद्ध होऊं शकतील, पण 'अतिभवती, अतिमहती' हीं रूपें सिद्ध होऊं शकणार नाहींत. तदन्तविधीनें तीं रूपें सिद्ध होऊं शकत नाहींत; कारण 'ग्रहणवता प्रातिपदिकेन तदन्तविधिर्नास्ति' – परि. ३१ – अशी प्रतिषेधक परिभाषा आहे. 'उगिदन्तात् प्रातिपदिकात्' असा अर्थ केल्यास, 'अतिभवती, अतिमहती' हीं रूपें सिद्ध होऊं शकतील, पण 'भवती, महती' हीं रूपें सिद्ध होऊं शकणार नाहींत. व्यपदेशिवद्भावानें तीं रूपें सिद्ध होऊं शकत नाहींत; कारण 'व्यपदेशिवद्भावोऽप्रातिपदिकेन' – परि. ३२ – अशी परिभाषा आहे. वरील दोन अर्थांपैकीं कोणताहि अर्थ मानला तरी, 'प्रत्ययग्रहणे यस्मात्स विहितस्तदादेः' – परि. २३ – ही परिभाषा असल्यामुळें, 'निर्गोमती, निर्यवमती' हीं रूपें सिद्ध होऊं शकणार नाहींत. यावर अखेरीस भाष्यकार म्हणतात – 'यदप्युच्यते, उभयथा निर्गोमती, निर्यवमतीति न सिध्यति, किं कारणम् ? । प्रत्ययग्रहणे यस्मात्स तदादेर्ग्रहणं भवति इति । नैतत् प्रत्ययग्रहणम् । प्रत्ययाप्रत्यययोरेतद्ग्रहणम् । कथम् ? । वर्णोप्युगित्, प्रत्ययोप्युगित्, प्रातिपदिकमप्युगित् ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, 'उगितश्च' सू. ४५५

या सूत्रांतील 'उगित्' या शब्दाचा ज्यांत 'उ, ऋ लृ' इत् आहे असें शब्दस्वरूप असा अर्थ आहे. असें शब्दस्वरूप प्रत्ययच असतें असें नसून, जें प्रत्यय नाहीं तें शब्दस्वरूप देखील उगित् असूं शकतें — वर्ण उगित् असूं शकतो. उदाहरणार्थ 'अर्वणस्तृ' सू. ३६४ या सूत्रांत तकार हा वर्ण 'तृ' असा उगित् पठित आहे. 'शतृ' हा प्रत्यय उगित् पठित आहे व तसेंच 'भवतु' हें प्रातिपदिक सर्वादिगणपाठांत उगित् पठित आहे. सारांश 'उगित्' हा शब्द केवळ प्रत्ययास लागणारा शब्द नसून, प्रत्यय व अप्रत्यय या दोहोंनाहि सारखाच लागू पडणारा प्रत्ययाप्रत्ययसाधारण शब्द असल्यामुळें, 'उगितश्च' या सूत्रांत प्रत्ययाचें असाधारण रूपानें ग्रहण केलें आहे असें मानतां येत नाहीं व त्यामुळें त्या सूत्राचे ठिकाणीं प्रत्ययग्रहणपरिभाषा — परि. २३ — उपस्थित होऊं शकत नाहीं, म्हणजे ती परिभाषा त्या सूत्राला लागू पडत नाहीं. प्रत्ययग्रहणपरिभाषेंतील 'प्रत्यय' या शब्दासंबंधानें भाष्यकारांनीं जें वर म्हटलें आहे तें त्या परिभाषेशीं निषेधक भावानें संबद्ध असलेल्या 'स्त्रीप्रत्यये' — परि. २६ — या परिभाषेंतील 'स्त्रीप्रत्यय' या शब्दास लावल्यास, हें स्पष्ट होतें कीं, जेथें सूत्रांत स्त्रीप्रत्ययाचें असाधारणरूपानें ग्रहण केलें आहे — उदाहरणार्थ 'ष्यङः सम्प्रसारणम्' सू. १००३ या सूत्रांत 'ष्यङ्' या स्त्रीप्रत्ययाचें साक्षात् ग्रहण केलें आहे — तशाच ठिकाणीं 'स्त्रीप्रत्यये' ही परिभाषा उपस्थित होते. 'अर्थवदधातुरप्रत्ययः' या पूर्व सूत्रांत स्त्रीप्रत्ययाचें असाधारणरूपानें ग्रहण केलें नसून, स्त्रीप्रत्यय व स्त्रीप्रत्ययभिन्नप्रत्यय या दोहोंनाहि सारख्याच रीतीनें लागू पडणाऱ्या 'प्रत्यय' या साधारण शब्दाचें ग्रहण केलें असल्यामुळें, त्या सूत्राचे ठिकाणीं, 'अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः' हा पर्युदास 'राजकुमारी' या समुदायाला लावतेवेळीं, 'स्त्रीप्रत्यये' ही परिभाषा उपस्थित होत नाहीं व त्यामुळें 'राजकुमारी' यांतील 'कुमारी' हा प्रधान अवयव स्त्रीप्रत्ययान्त आहे तरी, 'राजकुमारी' हा समुदाय प्रत्ययग्रहणपरिभाषान्वयें प्रत्ययान्त ठरत नसल्यामुळें, त्या शब्दाला 'अप्रत्ययः' हा पर्युदास लागू पडत नाहीं व त्यामुळें

'राजकुमारी' या शब्दाला पूर्व सूत्रानेंच प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकते आणि त्याला ती संज्ञा होण्याकरितां प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण विध्यर्थक मानण्याची कांहीं गरज नाहीं. म्हणून मनोरमेंत जी शंका उपस्थित केली आहे ती अयोग्य ठरते व दीक्षितांनीं देखील ती शंका वर दिलेल्या कारणामुळें अनुपपन्न ठरते असेंच म्हणावयास पाहिजे होतें असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. (या विषयाचें विस्तृत विवरण परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषान्तरांत पा. ९४–९६ मध्यें केलें आहे व ते अवश्य वाचावें.)

शब्दरत्न– असमर्थसमासे इति । असूर्यम्पश्या इत्यादावित्यर्थः । धर्मिग्राहकेति । प्रातिपदिकसंज्ञा धर्मः, तद्धर्मो असमर्थसमासः, ग्राहकं मानं खश्विधायकम् । अन्यथा परस्परमसम्बन्धेनैकार्थीभावाभावात्समासो दुर्लभः स्यात् । असूर्यशब्द इति । तत्प्रकृतिके सुबन्त इत्यर्थः । सुपीत्यधिकारात्, उपपदमिति महासंज्ञाकरणाच्च । तदेतदाह । पदं चेत्यादि । शशशृङ्गादिपदानां च बौद्धे तस्मिन् शक्तिरिति न तदर्थमपि समासग्रहणमिति बोध्यम् । यत्र संघाते इतीति । अर्थवतीति शेषः, सजातीयापेक्षनियमस्यौचित्यादिति बोद्ध्यम् । प्रत्ययो नेत्यस्य पूर्वभागप्रकृतिकप्रत्ययो नेत्यर्थः, तेन राजा इयानित्यादौ न दोषः । जन्मवानित्यादाविति । तत्र पूर्वभागस्य पदत्वादिति भावः । ननु तद्धितग्रहणसामर्थ्यं तत्राह–तद्धितेति । तत्र पूर्वभागस्य भत्वात्पूर्वो भागः पदमित्यत्र च पदशब्देन पदसंज्ञकग्रहणमिति भावः ।

'कथं तर्हि असमर्थसमासे संज्ञा' या मनोरमेच्या पंक्तींतील 'असमर्थसमासे' या पदाचा 'असूर्यम्पश्या इत्यादौ' असा अर्थ आहे, म्हणजे 'असूर्यम्पश्याः' इत्यादि असमर्थसमासाचीं उदाहरणें होत. मनोरमेंतील 'धर्मिग्राहकमानात्' या पदाचा असा अर्थ आहे कीं, प्रातिपदिकसंज्ञा हा धर्म असून त्याचा असमर्थ-

समास हा धर्मी आहे व असमर्थसमासाला प्रातिपदिकसंज्ञा होते याचें ग्राहक–प्रमाण–'असूर्यललाटयोर्दृशितपोः' हें खश्प्रत्ययविधायक सूत्र आहे. असमर्थसमासाला प्रातिपदिकसंज्ञा होते याचें तें सूत्र प्रमाण मानलें नाहीं तर, 'नञ्' शद्बाच्या अर्थाचा 'सूर्य' या शद्बाच्या अर्थामध्यें अन्वय होत नसल्यामुळें व अशा रीतीनें 'असूर्य' या असमर्थसमासांतील 'नञ्' व 'सूर्य' या शद्बांच्या अर्थांचा एकार्थीभाव होत नसल्यामुळें, तसा समास होणें अशक्य आहे. (या विषयाचें विवरण मनोरमेंत केलेंच आहे.) 'असूर्यशद्बे उपपदे' या मनोरमेंतील पदांचा 'असूर्यप्रकृतिके सुबन्ते उपपदे,' म्हणजे 'असूर्य' या प्रकृतीहून द्वितीयाविभक्तीचा प्रत्यय केला असतां जें सुबन्त पद होतें तसें उपपद, असा अर्थ आहे; कारण 'असूर्यलला-टयोः' हें सूत्र 'सुपि' या अधिकारांत पठित आहे, म्हणजे या सूत्रांत 'सुपि स्थः' या पूर्व सूत्रांतून 'सुपि' हें पद अनुवृत्त होतें (आणि तशी अनुवृत्ति होत असल्यामुळेंच, मनोरमेंतील 'असूर्य-शद्बे' या पदाचा 'असूर्यप्रकृतिके सुबन्ते' असा अर्थ होतो) आणि दुसरें असें कीं, 'उपपद' ही पाणिनीनें महासंज्ञा, म्हणजे अन्वर्थक संज्ञा, केली आहे. (त्यामुळें 'असूर्यललाटयोः' या सूत्रांत निर्दिष्ट असलेला 'असूर्य' हा शद्ब प्रातिपदिकसंज्ञक झाल्याशिवाय त्याहून सुबुत्पत्ति होऊं शकत नाहीं व तो पदसंज्ञक होऊं शकत नाहीं आणि तो पदसंज्ञक झाल्याखेरीज त्याला उपपद ही संज्ञा होऊं शकत नाहीं.) हा वरील आशय मनांत धरूनच दीक्षितांनीं मनोरमेंत 'उपोच्चारितं पदं चोपपदम्' इत्यादि म्हटलें आहे. (या विषयाचें विवरण पूर्वी मनोरमेंत केलेंच आहे.) 'शशशृङ्ग' ('खपुष्प, वन्ध्यासुत') इत्यादि सामासिक पदांचा बुद्धीमध्यें जो अर्थ विदित होतो त्या अर्थाचें बोधन करण्याची शक्ति तशा शब्दांत असल्यामुळें, तशा शब्दांना देखील प्रातिपदिकसंज्ञा होण्याकरितां प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण विध्यर्थक मानण्याची कांहीं गरज नाहीं हें जाणावें. ('शशशृङ्ग' हा अत्यन्त असत् पदार्थ आहे; कारण सशाला

शिंगें नसतात. तरी पण 'शशशृङ्ग' या सामासिक शब्दांतील 'शश' व 'शृङ्ग' हे दोन्ही शब्द अर्थवान् असल्यामुळें, आपणांस 'शशशृङ्ग' या सामासिक शब्दाचा अर्थ बुद्धीनें करतां येतो. अशा रीतीनें त्या शब्दाचा बौद्धिक किंवा कल्पित अर्थ होत असून त्याचें ठिकाणीं बुद्धिनिष्ठ अर्थवत्ता असल्यामुळें, तो शब्द अर्थवान् ठरतो व त्यामुळें 'अर्थवदधातुः' या पूर्व सूत्रानेंच त्याला प्रातिपदिकसंज्ञा होते. म्हणून तशा लौकिक व्यवहारांत असत्–अनर्थक–मानले जाणाऱ्या शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा होण्याकरितां प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण विध्यर्थक मानण्याची कांहीं गरज नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) प्रकृत सूत्रावरील कौमुदींत जें नियमाचें स्वरूप सांगितलें आहे त्या पंक्तींतील 'सङ्घाते' या पदापूर्वीं 'अर्थवति' हें पद अध्याहृत आहे. तें पद अध्याहृत मानण्याचें कारण हें आहे कीं, नियम हा सजातीया-संबंधानेंच केला जात असतो असेंच मानणें उचित आहे हें जाणावें. ('सङ्घाते' या पदापूर्वीं 'अर्थवति' हें पद अध्याहृत न केल्यास, त्या पदानें अनर्थक संघाताचें देखील ग्रहण होईल व 'दश दाडि-मानि' इत्यादि पूर्वीं दिलेल्या अनर्थक समुदायाला देखील कौमुदींत दिलेला नियम लागू पडेल. पण तो समुदाय अर्थवान् नसल्यामुळें, त्याला 'अर्थवदधातुः' या पूर्व सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञेची प्राप्तीच होत नाहीं. म्हणून तशा अनर्थक समुदायाची व्यावृत्ति होण्याकरितां वरील नियम करण्याची कांहीं गरज नसून, अर्थवान् पदसमुदायाची व्यावृत्ति व्हावी याकरितांच तसा नियम मानण्याची गरज आहे हें स्पष्ट व्हावें याकरितां 'सङ्घाते' या पदापूर्वीं 'अर्थवति' हें पद अध्याहृत करणें उचित आहे असें शब्दरत्नकारांचें म्हणणें आहे. दुसरें असें कीं, 'नियमस्य सजातीयापेक्षत्वात्' असें भाष्यांत ठिक-ठिकाणीं सांगितलें असल्यामुळें व पूर्व सूत्रानें अर्थवानालाच प्रातिपदिकसंज्ञा होणें सांगितलें असल्यामुळें, वरील नियमान्वयें अर्थवान् पदसमुदायाचीच व्यावृत्ति करतां येते.) 'उत्तरस्तु प्रत्ययो

न' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यांतील 'प्रत्ययो न' या पदांचा 'पूर्वभागप्रकृतिकप्रत्ययो न,' म्हणजे ज्याची पूर्वभाग प्रकृति आहे असा प्रत्यय नसला पाहिजे, असा अर्थ आहे, व त्या पदांचा असा अर्थ होत असल्यामुळें, 'राजा इयान्' इत्यादि स्थलीं कांहीं दोष येत नाहीं. ('राजा इयान्' या पदसमुदायांत 'राजा' हा पूर्व भाग पद असून त्यापुढें 'इयत्' हा प्रत्यय आहे. म्हणून हा पद-समुदाय अर्थवान् असून त्यांतील पूर्व भाग पद असल्यामुळें व तसेंच उत्तर भाग प्रत्यय असल्यामुळें, त्या समुदायाला मनोरमेंत दिलेला नियम लागू पडणार नाहीं आणि त्यामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येईल. परंतु मनोरमेंत दिलेल्या नियमांतील 'प्रत्ययः' या पदाचा 'पूर्वभागप्रकृतिकप्रत्ययः' असा अर्थ केल्यानें, 'राजा' या पदसंज्ञक पूर्व भागाला 'इयत्' हा प्रत्यय झाला नसल्यामुळें, 'राजा इयान्' हा पदसमुदाय मनोरमेंत दिलेल्या नियमांत वरील अर्थान्वयें अन्तर्भूत होतो व तो समुदाय अर्थवान् असून देखील समास नसल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. 'राजा इयान् या समुदायांतील 'इयान्' हा प्रत्यय आहे असें जें शब्दरत्नकारांनीं म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'किमिदम्भ्यां वो घः' सू. १८४१ या सूत्रानें 'इदम्' या शब्दास 'वतुप् = वत्' प्रत्यय होऊन व त्या प्रत्ययांतील 'व्' चे जागीं 'घ् = इय्' असा आदेश होऊन आणि 'इदंकिमोरीश्की' सू. १०१८ या सूत्रानें 'इदम्' चे जागीं 'ई' असा सर्वादेश होऊन 'ई + इयत्' अशी स्थिति झाली असतां, 'य-ई' हें अङ्ग 'यचि भम्' सू. २३१ या सूत्रान्वयें भसंज्ञक ठरत असल्यामुळें, 'यस्येति च' सू. ३११ या सूत्रानें 'ई' चा लोप होतो. सारांश या स्थलीं प्रकृतीचा लोप होऊन 'वतुप्' प्रत्ययाचें रूपान्तर झाल्यानें बनलेला 'इयत्' हा प्रत्ययच शिलक राहतो व 'इयान्' हें प्रकृति नष्ट होऊन अवशिष्ट राहिलेल्या प्रत्ययाचेंच प्रथमेच्या एकवचनाचें रूप आहे आणि म्हणून पूर्वभाग पद व उत्तर-भाग प्रत्यय याचें शब्दरत्नकारांनीं हें वाक्य उदाहरण दिलें आहे.)

'अन्यथा जन्मवान् इत्यादौ संज्ञा न स्यात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'जन्मवत्' या स्थलीं 'जन्म' हा पूर्व भाग पद आहे (व उत्तर भाग 'वत्' हा त्याहून झालेला प्रत्यय असल्यामुळें, 'जन्मवत्' हा शब्द वरील नियमाच्या कक्षेंत येत नाहीं आणि त्यामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होते.) प्रकृत सूत्रांत 'तद्धित' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें त्या पदाच्या ग्रहण-सामर्थ्यानें 'जन्मवान्' या तद्धितान्त शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकते असें कोणी म्हटल्यास, त्यावर मनोरमेंत 'तद्धितग्रहणस्य औपगवादौ कृतार्थत्वात्' हें उत्तर दिलें आहे. 'औपगव = उपगु + अण्' या उदाहरणांत 'उपगु' हा पूर्व भाग (पद नसून 'यचि भम्' सू. २३१ या सूत्रान्वयें) भसंज्ञक आहे. (म्हणून तो समुदाय वरील नियमाच्या कक्षेंत येत नाहीं.) 'पूर्वो भागः पदम्' यांतील 'पद' या शब्दानें पदसंज्ञक शब्दाचें ग्रहण होतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. (तो पूर्व भाग 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रान्वयेंच पद-संज्ञक असला पाहिजे असा आग्रह नसून, 'स्वादिश्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्रान्वयें तो पदसंज्ञक असला तरी हरकत नाहीं.)

शब्दरत्न– नन्वत्र पक्षे गवित्ययमाहेत्यादौ दोषः, गो इत्यादिनां सुबन्तत्वाभावेन पदत्वाभावात् । वृषण्वसुरित्यादिसमासे पूर्वभागस्य भत्वेन तत्साजात्येन पूर्वो भागः पदमित्यर्थलाभासम्भवश्चेत्यत आह– यद्वेति । प्रकृतसूत्रे भाष्ये तु अर्थवत्समुदायानां समासग्रहणं नियमार्थ-मित्युक्तम् । अत्र तन्त्रेण षष्ठीतत्पुरुषः कर्मधारयश्च, तत्र षष्ठीसमासे अर्थवदितस्य स्वातन्त्र्येनापि प्रयोगार्हार्थवदित्यर्थः । गवित्ययमित्यादावनुकरणस्यानितिपरस्यापि प्रयोगसत्त्वेन तत्त्वमस्त्येव। प्रकृतिप्रत्ययसमुदायस्य तु न व्यावृत्तिः । प्रत्ययस्य स्वातन्त्र्येण प्रयोगार्हार्थवत्त्वाभावात् । सरूपसूत्रे भाष्ये सुबन्तानामित्यनेनेदमेवोप-लक्ष्यते इति स्पष्टमेव कैयटेनोक्तमिति बोद्धव्यम् ।

'यत्र सङ्घाते पूर्वो भागः पदं तस्य चेद्भवति तर्हि समा-सस्यैव' असें जें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत नियमाचें स्वरूप

दिलें आहे तें बरोबर मानल्यास, 'गवित्ययमाह' इत्यादि स्थलीं दोष येतो; कारण 'गो' इत्यादि अनुकरण सुबन्त नसल्यामुळें, त्याला ('सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें होणारी) पदसंज्ञा होऊं शकत नाहीं (आणि म्हणून 'गविति' हा समुदाय वरील नियमाच्या कक्षेंत येत नसल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते.) तसेंच 'वृषण्वसु' (वृषणश्व) इत्यादि सामासिक शद्बांत पूर्व भाग ('वृषन्' हा पदसंज्ञक नसून 'वृषण्वस्वश्वयोः'–सू. ३३८९ वरील वार्तिक– या वार्तिकान्वयें) भसंज्ञक असल्यामुळें, त्या समासाचें सादृश्य लक्षांत घेतलें असतां त्या उदाहरणांत 'पूर्वो भागः पदम्' या अर्थाचा लाभ संभवत नाहीं. या वर दाखविलेल्या आपत्ति लक्षांत घेऊन दीक्षितांनीं 'यद्वा प्रकृतिप्रत्ययभावानापन्न सङ्घातविषयको नियमोऽस्तु' असें नियमाचें भिन्न स्वरूप मनोरमेंत सांगितलें आहे (व हें नियमाचें स्वरूप मानल्यानें 'वृषण्वसु' या शद्बसमुदायांतील अवयवांमध्यें परस्परांत प्रकृतिप्रत्ययभावरूप संबंध नसल्यामुळें, त्या समासरूप समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं व तसेंच 'गो इति' या समुदायांतील अवयवांत प्रकृतिप्रत्ययभावरूप संबंध नाहीं तरी, तो समुदाय समास नसल्यामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं.) परंतु प्रकृत सूत्रावरील भाष्यांत 'अर्थवत्समुदायानां समासग्रहणं नियमार्थम्' म्हणजे 'अर्थवत्समुदायानां प्रातिपदिकसंज्ञा भवति चेतर्हि समासस्यैव,' असें नियमाचें-स्वरूप सांगितलें आहे. या भाष्योक्त नियमांतील 'अर्थवत्समुदायानाम्' या पदाचा तन्त्रानें–म्हणजे तें पद दोनदां उच्चारून–षष्ठीतत्पुरुष व कर्मधारय असा दोन्ही प्रकारें समास होतो व षष्ठीसमासांतील 'अर्थवत्' या शद्बाचा 'स्वातन्त्र्येणापि प्रयोगार्हमर्थवत्' असा अर्थ होतो. ('अर्थवत्समुदायानां समासग्रहणं नियमार्थम्' या भाष्यवचनांतील 'अर्थवत्समुदाय' या शद्बाचा 'अर्थवतां समुदायः' असा एकदां षष्ठीतत्पुरुष व 'अर्थवान् समुदायः' असा पुन्हा कर्म-

धारयसमास केला असतां, 'अर्थवतां यः समुदायः स्वयं अर्थवांश्च' असा त्या शब्दांतून अर्थ निष्पन्न होतो व त्या अर्थान्वयें, 'दश दाडिमानि' इत्यादि सार्थक पदांच्या अनर्थक समुदायाला प्रातिपदिक-संज्ञा होण्याची आपत्ति टळते. आतां 'अर्थवतां समुदायः' या षष्ठी-तत्पुरुषसमासांतील 'अर्थवताम्' या पूर्व पदाचा 'स्वातन्त्र्येणापि प्रयोगार्हवताम्' असा अर्थ केल्यानें काय फल निष्पन्न होतें हें शब्दरत्नकार पुढील पंक्तींत सांगतात.) 'गवित्ययमाह' इत्यादि स्थलीं 'गो' या अनुकरणापुढें 'इति' हा शब्द नसतांना देखील त्या केवळ 'गो' शब्दाचा प्रयोग होत असल्यामुळें, त्याचे ठिकाणीं पृथक्प्रयोगार्हतारूप अर्थवत्ता आहेच. ('इति' या शब्दाच्या सहायाशिवाय अनुकरणाचा प्रयोग करतां येऊं शकतो हें 'अनुकरणं चानितिपरम्' सू. ७६३ या सूत्रावरून सिद्ध होतें. अशा रीतीनें इतराच्या सहायाशिवाय एकटचा अनुकरणाचा स्वतंत्ररूपानें प्रयोग करतां येऊं शकत असल्यामुळें, त्याचे ठिकाणीं देखील पृथक्-प्रयोगार्हतारूप अर्थवत्व आहेच आणि हें षष्ठीसमासांतील 'अर्थवताम्' या पदाचा जो वर सांगितल्याप्रमाणें अर्थ केला आहे त्याचें फल आहे. त्यामुळें 'गविति' यांतील दोन्ही शब्द अर्थवान् ठरतात व हा समुदायहि अर्थवान् ठरतो. परंतु 'स्वातन्त्र्येण प्रयोगार्हार्थवत्पूर्वावयवकः स्वातन्त्र्येण प्रयोगार्हार्थवदुत्तरावय-वकश्चयोऽर्थवान् समुदायस्तस्य चेत्तर्हि समासस्यैव' असें शब्दरत्नांत वर दिलेल्या अर्थान्वयें भाष्यकारीय नियमाचें, शब्देन्दुशेखरांत व सरलाटीकेंत सांगितल्याप्रमाणें, स्वरूप सिद्ध होत असल्यामुळें व 'गविति' हा अर्थवान् शब्दांचा अर्थवान्-स्वातन्त्र्येण प्रयोगार्ह—समुदाय समास नसल्यामुळें, त्याला वरील नियमान्वयें प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं.) प्रकृतिप्रत्ययसमुदायाची वरील नियमान्वयें व्यावृत्ति होत नाहीं, म्हणजे तशा समुदायाचा 'अर्थवतां समुदायः' यांत अन्तर्भाव होत नाहीं; कारण प्रत्ययाचे ठिकाणीं स्वतंत्ररूपानें पृथक्प्रयोगार्हतारूप अर्थवत्व नाहीं. (म्हणून

'जन्मवान्' इत्यादि प्रकृतिप्रत्ययसमुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होण्यांत वरील भाष्यनियम आड येत नाहीं; कारण प्रकृति व प्रत्यय हे जरी अर्थवान् आहेत तरी 'न केवला प्रकृतिः प्रयोक्तव्या नापि केवलः प्रत्ययः' या भाष्यवचनान्वयें त्यांचे ठिकाणीं पृथक्-प्रयोगार्हतारूप अर्थवत्व नाहीं.) 'सरूप' सूत्रावरील भाष्यांतील 'सुबन्तानाम्' हें पद याच अर्थाचें उपलक्षण आहे हें या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत कैयटानें स्पष्ट म्हटलें आहे हें जाणावें. 'सरूपसूत्रे भाष्ये' हा शब्दरत्नांतील पाठ अशुद्ध असून 'अर्थवत्सूत्रे भाष्ये' हा वास्तविक शुद्ध पाठ आहे. कारण 'अर्थवदधातुः' १. २. ४५ या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत कैयटानें 'सुबन्तानाम्' हें भाष्यांतील प्रतीक घेऊन शब्दरत्नांत सांगितल्याप्रमाणें म्हटलें आहे. त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'तुल्यजातीयस्य नियमः। कश्च तुल्यजातीयः?। यथाजातीयकानां समासः। कथं जातीयकानां समासः?। सुबन्तानाम्।' असें म्हटलें आहे. त्या भाष्यांतील 'सुबन्तानामिति' असें प्रतीक घेऊन कैयटानें 'एतच्चोपलक्षणम्—भेदसंसर्गद्वारकार्थवत्वयुक्तानाम्।' असें म्हटलें आहे व 'भेदसंसर्गद्वारकार्थवत्वयुक्तानाम्' या पदाचें उद्योतांत 'वाक्ये पदार्थयोर्विभागेनापि प्रयोगे सति इतरसंसर्गाकांक्षा भेदसंसर्गः। स द्वारभूतो यस्य विशिष्टार्थवत्वस्य तद्युक्तानामित्यर्थः। समासेऽपि वाक्यीयेनैव तेन विशिष्टार्थवत्वम्। न हि प्रकृतिप्रत्यययोर्विभागः, परश्चेति वचनादिति भावः। एवं च समुदायघटका भागाः स्वातन्त्र्येणापि प्रयोगार्हा अर्थवन्तो गृह्यन्ते इति तात्पर्यम्।' असें व्याख्यान केलें आहे. या वरील कैयटाच्या व्याख्यानावरून 'स्वातन्त्र्येणापि प्रयोगार्हमर्थवत्' असें जें शब्दरत्नांत म्हटलें आहे तें सिद्ध होतें. प्रकृत सूत्रावरील शब्देन्दुशेखरांत देखील 'पदशब्देनात्र स्वातन्त्र्येणापि प्रयोगार्हमर्थवद्गृह्यते। अत एव अर्थवत्समुदायानां समासग्रहणं नियमार्थमित्युक्तमत्र भाष्ये। भाष्ये सुबन्तानामित्यनेन भेदसंसर्गद्वारकार्थवन्त उपलक्ष्यन्ते इति कैयटेन स्पष्टमेवोक्तम्। तेन 'गवित्ययमाहेत्यादौ

गो इत्यादीनां सुबन्तत्वाभावेऽपि न समुदायस्य प्रातिपदिकत्वम्, अनुकरणस्यानिति परस्यापि प्रयोगसत्वेन तावन्मात्रस्यापि पृथक-प्रयोगर्हत्वात् । बहुपटव इत्यादौ प्रातिपदिकत्वसिद्धये स्वातन्त्र्येणेति' असेंच म्हटलें आहे.)

शब्दरत्न– पुरुषावित्यादेरिति । तत्पूर्वभागस्य "उत्तरपदत्वे च–" इति निषेधेनापदत्वात् । परस्य तत्प्रकृतिकप्रत्ययत्वाभावादिति भावः । अर्थवत्त्वेनैवेति । उत्तरपदस्य कार्यित्वाभावेन तन्निषेधाप्रवृत्तेश्चेत्यपि बोध्यम् । वाक्यस्येति । कृदन्तत्वादिति भावस्तदाह–कृदिति । न चास्य भुजा करणत्वेनोपदंशं प्रति न कारकत्वम् । मूलकस्योपदंशे कर्मत्वेनान्वयो विभक्तिस्तु प्रधानानुरोधिकरणत्वकृता तृतीयैवेति तं प्रत्यपि कारकत्वमित्याशयात् । परत्वाद् बाधादिति । नियमस्यार्थतो निषेधेऽपि तात्पर्येणार्थवत्सूत्रापवादस्यास्य परत्वेन कृदन्तत्वप्रयुक्तस्यापि निषेधे तात्पर्यादिति भावः । निषेधानां बलवत्त्वाच्चेत्यपि बोध्यम् । निष्फलत्वादिति । स्पष्टं चेदं "पुंयोगात्" इति सूत्रे भाष्यकैयटयोः ।

'पुरुषावित्यादेः संज्ञा स्यात्' असें जें मनोरमेंतील शंका-ग्रन्थांत शंकाकारानें म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'राजपुरुषौ' यांतील 'पुरुष + औ' या समुदायांतील 'पुरुष' या पूर्व भागाला 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ' सू. ४४२ वरील वार्तिक– या निषेधक वार्तिकान्वयें (प्रत्ययलक्षणानें) पदसंज्ञा होऊं शकत नाहीं व ('पुरुष' या शब्दापुढील 'औ' या अन्तर्वर्तिविभक्ति-प्रत्ययाचा लुक् झाल्यावर 'पुरुष' या शब्दापुढें) जो 'औ' प्रत्यय झालेला आहे त्याची ('राजपुरुष' हा समुदाय प्रकृति असून) 'पुरुष' हा शब्द प्रकृति नव्हे. (सारांश 'पुरुष औ' हा भाग असा आहे कीं, ज्यांतील पूर्वभाग पदसंज्ञक नसून उत्तरभाग त्या प्रकृतीहून झालेला प्रत्यय नसल्यामुळें, हा समुदाय 'यत्र सङ्घाते पूर्वो भागः पदमुत्तरभागस्तु तत्प्रकृतिकप्रत्ययो न' या नियमाच्या

कक्षेंत येत नाहीं आणि म्हणून त्याला प्रातिपदिकसंज्ञेची प्राप्ति होते असें शंकाकाराच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे. या शंकेवर दीक्षितांनीं मनोरमेंत 'अर्थवत्वेनैव वारणात्' असें उत्तर दिलें आहे व त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे कीं, 'पुरुष औ' हा समुदाय अर्थवान् नसल्यामुळें, त्याला 'अर्थवदधातुः' या पूर्व सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं. त्याला ती संज्ञा होऊं शकत नाहीं याचें दुसरें देखील कारण देतां येतें हें शब्दरत्नकार पुढील पंक्तींत सांगतात.) दुसरें असें कीं, 'राजपुरुषौ' यांतील 'पुरुषौ' या उत्तर-पदाला कोणतेंहि कार्य करणें नसल्यामुळें, म्हणजे जें कार्य करणें आहे त्याचा 'पुरुष' हा शब्द कार्यी नसल्यामुळें, 'उत्तरपदत्वे' हें निषेधक वार्तिक या स्थलीं प्रवृत्त होऊं शकत नाहीं हें देखील लक्षांत ठेवावें. ('राजपुरुषौ' यांतील 'पुरुष' या उत्तरपदाला कोणतेंहि कार्य करणें नसून 'पुरुष औ' या समुदायाला प्रातिपदिक-संज्ञारूप कार्य करणें असल्यामुळें आणि अशा रीतीनें 'पुरुष' हा शब्द कार्यी ठरत नसल्यामुळें व जेथें उत्तरपदाला कार्य करणें आहे तशाच ठिकाणीं 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ' हें निषेधक वार्तिक प्रवृत्त होत असल्यामुळें, 'पुरुष' या शब्दाला प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा करण्यांत तें निषेधक वार्तिक आड येत नाहीं. त्यामुळें 'पुरुष औ' या समु-दायांतील 'पुरुष' हा शब्द पदसंज्ञक मानतां येतो व त्यापुढील 'औ' हा प्रत्यय 'पुरुष' या प्रकृतीहून झाला नसून 'राजपुरुष' या समुदायरूप प्रकृतीहून झाला असल्यामुळें, 'यत्र पूर्वो भागः पदमुत्तरभागस्तु तत्प्रकृतिकप्रत्ययो न तस्य चेद्भवति तर्हि समास-स्यैव' या नियमान्वयें 'पुरुष औ' या समास नसलेल्या समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं हें उघड आहे.) 'वाक्यस्य संज्ञा दुर्वारा' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'मूलकेनोपदंशम्' हा पदसमुदाय ('कृद्ग्रहणे गतिकारक-पूर्वस्यापि ग्रहणम्' या परिभाषान्वयें) कृदन्त ठरतो (व त्यामुळें त्याला प्रकृत सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञेची प्राप्ति होते. 'मूलकेनोपदंशं

भुङ्क्ते' या वाक्यांतील) 'मूलकेन' हें पद 'भुङ्क्ते' या क्रियापदांत करणत्वानें अन्वित असल्यामुळें दंशरूप क्रियेशीं त्याचा कारकरूपानें संबंध नाहीं असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'मूलक' या शब्दाचा कर्मत्वरूपानें 'उपदंशम्' या कृदन्तांत अन्वय होतो. या वाक्यांत 'मूलकेन' अशी जी तृतीयाविभक्ति केली आहे त्याचें कारण हें कीं, 'मूलक' हा शब्द भूजिक्रियेचें करण असल्यामुळें व ती क्रिया वाक्यांत प्रधान असल्यामुळें, प्रधान क्रियेच्या अनुरोधानें तृतीयाविभक्ति केली आहे. तरी पण 'मूलक' हें दंशक्रियेचें कारक आहेच; आणि हा आशय मनांत धरूनच दीक्षितांनीं मनोरमेंत ('कृद्ग्रहणे' या परिभाषान्वयें 'मूलकेनोपदंशम्' हा कर्मकारकसहित णमुल्प्रत्ययान्त समुदाय कृदन्त ठरत असल्यामुळें, त्याला प्रकृत सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञेची प्राप्ति होते अशी) शंका उपस्थित केली आहे. ('मूलकेनोपदंशं भुङ्क्ते' या वाक्यांत 'मूलकेन' या करणकारकाचा 'भुङ्क्ते' या क्रियेमध्यें जरी साक्षात् शाब्दिक अन्वय आहे तरी, 'मूलक' या शब्दाचा दंशक्रियेंत देखील कर्मकारकरूपानें आर्थिक अन्वय आहेच आणि त्यामुळें 'मूलकमुपदश्य भुङ्क्ते' असा त्या वाक्याचा अर्थ होतो. म्हणून 'मूलक' हें 'उपदंशम्' या णमुल्प्रत्ययान्त कृदन्ताचें कर्म-रूप कारक ठरत असल्यामुळें, 'मूलकेनोपदंशम्' या समुदायाला, 'कृद्ग्रहणे' या परिभाषान्वयें, कृदन्त मानतां येतें. येथें द्वितीया-विभक्ति न करितां जी तृतीयाविभक्ति केली आहे ती 'प्रधानेतर-योर्यत्र द्रव्यस्य क्रिययोः पृथक । शक्तिर्गुणाश्रया तत्र प्रधानमनु-रूध्यते ॥' या न्यायाला अनुसरून केली आहे व त्या न्यायाचा असा अर्थ आहे कीं, जेथें एखाद्या पदाचा वाक्यांतील प्रधानक्रिया व अप्रधानक्रिया या दोहोंशीं भिन्नभिन्न कारकरूपानें अन्वय होतो तेथें त्या शब्दाचा प्रधान क्रियेंत ज्या कारकरूपानें अन्वय होतो तीच कारकविभक्ति त्या शब्दाहून केली जाते. वरील वाक्यांत भुजिक्रिया प्रधान असून

दंशक्रिया अप्रधान आहे आणि 'मूलक' शब्दाचा भुजिरूप प्रधान क्रियेंत करणरूपानें अन्वय होत असल्यामुळें, 'मूलक' शब्दाहून करणाचा द्योतक तृतीयाविभक्तीचा प्रत्यय केला आहे. तरी पण त्या शब्दाचा तसा तृतीयाविभक्तींत प्रयोग केल्यानें, त्या शब्दाचें दंशरूप अप्रधान क्रियेंत असणारें कर्मरूप कारकत्व नाहींसें होत नाहीं, आणि म्हणून 'मूलकेनोपदंशम्' हा समुदाय 'कृद्ग्रहण' परिभाषान्वयें कृदन्त ठरतो अशी जी मनोरमेंत शंका उपस्थित केली आहे ती उपपन्न – योग्य – ठरते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. या शंकेचें निवारण कसें केलें आहे हें मनोरमेंत सांगितलेंच आहे.) 'समासग्रहणकृतनियमेन परत्वात् बाधात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, नियमाचे निषेध करण्यामध्यें देखील आर्थिक तात्पर्य असल्यामुळें व 'अर्थवदधातुः' या सूत्राचें प्रकृत सूत्र अपवादभूत सूत्र असल्यामुळें, कृदन्तसमुदायाचे ठिकाणीं कृदन्तत्वामुळें प्रकृत सूत्रानें प्राप्त होणाऱ्या प्रातिपदिकसंज्ञेचा देखील परत्वामुळें निषेध करण्यामध्यें प्रकृत सूत्रानें सिद्ध होणाऱ्या नियमाचें तात्पर्य आहे आणि ('निषेधाश्च बलीयांसः' परि. १२१ या परिभाषान्वयें) निषेध अधिक बलवान् असतो हें देखील ध्यानांत ठेवावें. ('कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्राची 'कृदन्तस्य प्रातिपदिकसंज्ञा भवति, तद्धितान्तस्य प्रातिपदिकसंज्ञा भवति, समासस्य प्रातिपदिकसंज्ञा भवति' असें तीन भाग करतां येतात. या तीन भागांपैकीं प्रथम दोन भाग विध्यर्थक आहेत, म्हणजे पूर्व सूत्रांतील 'अप्रत्ययः' या पर्युदासामुळें कृदन्ताला व तद्धितान्ताला जी प्रातिपदिकसंज्ञेची प्राप्ति नव्हती ती करून देण्याकरितां प्रकृत सूत्रांत 'कृत्' व 'तद्धित' या पदांचें ग्रहण केलें आहे आणि अशा रीतीनें प्रथम दोन भाग अप्राप्तप्रापक विधि ठरतात. परंतु समास अर्थवान् असून प्रत्ययान्त नसल्यामुळें, 'अर्थवद्धातुः' या पूर्व सूत्रानेंच समासाला प्रातिपदिकसंज्ञा प्राप्त होते. असें असल्यामुळें, प्रकृत सूत्रांत जें तृतीय वाक्य

घातलें आहे तें व्यर्थ ठरूं पाहतें. तें व्यर्थ न ठरावें याकरितां त्या वाक्याचा 'सिद्धे सत्यारम्भो नियमार्थः' या न्यायान्वयें नियमरूप अर्थ करणें आवश्यक आहे व त्या नियमाचें स्वरूप पूर्वी सांगितलेंच आहे. अशा रीतीनें प्रकृत सूत्रांतील 'समास' ग्रहण विध्यर्थक ठरत नसून नियमार्थक ठरत असल्यामुळें, तें ग्रहण पूर्व सूत्राचें वैयर्थ्यमूलक अपवादक ठरतें आणि कृद्ग्रहणपरिभाषान्वयें कृदन्त ठरणाऱ्या 'मूलकेनोपदंशम्' या समुदायाला कृदन्तत्वामुळें जी प्रातिपदिकसंज्ञेची प्राप्ति होते तिचें देखील प्रकृत सूत्रांत 'कृत्, तद्धित' या पदांनंतर अखेरीस केलेलें 'समास' या पदाचें ग्रहण परत्वामुळें बाधक ठरतें, म्हणजे 'मूलकेनोपदंशम्' हा समुदाय जरी अर्थवान् कृदन्त समुदाय आहे तरी तो समास नसल्यामुळें समासग्रहणकृत नियमान्वयें त्या समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. येथें हें लक्षांत ठेवावें कीं, ज्याला मीमांसक परिसंख्या म्हणतात त्यालाच व्याकरणशास्त्रांत नियम असें म्हणतात व 'अन्यनिवृत्तिफलको हि नियमः, न तु स्वार्थविधानतात्पर्यकः' असें नियमाचें व्याख्यान केलें असल्यामुळें, समासग्रहणकृत नियमाचें समासाला प्रातिपदिकसंज्ञा व्हावी हें सांगण्यांत तात्पर्य नसून समासेतर अर्थवान् समुदायाला जी पूर्व सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञेची प्राप्ति होती तिचा निषेध करण्यांत तात्पर्य आहे आणि अशा रीतीनें तें 'समास' ग्रहण निषेधरूपानें फलित होतें व 'निषेधाश्च बलीयांसः' प. १२१ या न्यायान्वयें विधायक सूत्रापेक्षां निषेध बलवत्तर ठरत असल्यामुळें, तो समासग्रहणफलित निषेध जसा परत्वामुळें 'मूलकेनोपदंशम्' या कृदन्त समुदायाला प्रकृत सूत्रानें प्राप्त होणाऱ्या प्रातिपदिकसंज्ञेचा बाध करतो तसाच तो, निषेधक असल्यामुळें निषेधकत्वामुळें देखील, वरील परिभाषान्वयें त्या संज्ञेचा बाध करतो असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) प्रकृत सूत्रांत 'कृद्ग्रहणे' ही परिभाषा उपस्थित केल्यानें कोणतेंहि फल निष्पन्न होत नाहीं असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें 'पुंयोगादा-

ख्यायाम्' सू. ४.१.४८ या सूत्रावरील भाष्यावरून व तसेंच कैयटवृत्तीवरून स्पष्ट होतें. (त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात- 'ननु चेदानीं प्रातिपदिकसंज्ञायामप्येतया परिभाषया-कृद्ग्रहणपरिभाषया—शक्यमिहोपस्थातुम् ? । नेत्याह । इह हि मूलकेनोपदंशं भुङ्क्ते इति वाक्येऽपि लुक् प्रसज्येत ।' या भाष्याचें व्याख्यान करितांना कैयटानें 'तस्मात् स्थितमेतत् कृत्तद्धितसमासाश्चेत्यत्र कृद्ग्रहणपरिभाषा नोपतिष्ठते । यस्मादप्रत्यय इत्यस्य प्रतिषेधस्य बाधनार्थं तत्र कृद्ग्रहणम् । परिभाषोपस्थाने तु सति, मूलकेनोपदंशं भुङ्क्ते इति वाक्यस्यापि स्यात् । तथा च समासग्रहणाद्यो नियमः सबाध्येत । मध्येऽपवादा इति न्यायाच्च अप्रत्यय इत्ययं निषेधः कृद्ग्रहणे न बाध्येत, न तु समासग्रहणकृतो नियमः । तत्र परत्वात्समासग्रहणेन गतिकारक पूर्वस्यापि कृदन्तस्य वाक्यस्य प्रातिपदिकसंज्ञाया निवर्तनात् यस्मात् कृद्विहितस्तदादेरेव कृदन्तस्य प्रातिपदिकसंज्ञाऽवतिष्ठते ।' या वरील भाष्यान्वयें व कैयटव्याख्यानान्वयें हें स्पष्ट होतें कीं, प्रकृत सूत्राचे ठिकाणीं कृद्ग्रहणपरिभाषा प. २८ उपस्थित होत नाहीं. त्यामुळें 'मूलकेनोपदंशम्' या कारकसहित कृदन्ताला प्रातिपदिकसंज्ञा न होतां, ज्याहून 'णमुल्' हा कृत प्रत्यय झाला आहे त्या णमुल्प्रत्ययान्त 'उपदंशम्' या प्रत्ययग्रहणपरिभाषान्वयें कृदन्त ठरणाऱ्या, शब्दालाच प्रकृत सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होते.)

शब्दरत्न—न च समासे इति । नापि वाक्ये इति बोध्यम् । एकार्थीभावेति । एकोपस्थितिनियामिका समुदायशक्तिरेवात्रैकार्थीभाव इति भावः । एवं समासे वृत्तिः सिद्धा । वाक्येऽपि शक्तिरस्ति । विशेषणविशेष्यभावांशे तच्छक्तेरर्थवत्सूत्रभाष्यादावुक्तत्वात् । लक्षणेति । वृत्तौ वाक्ये चेति भावः । असिद्धेरिति । समास इव तद्धितेऽपि शक्तिलक्षणयोरभावादिति भावः । पचतकीत्यादाविति । न च पूर्ववर्तित्वोत्तरवर्त्तित्वाभ्यामेव वैशिष्ट्यं निवेशनीयम्, विनिगमनाविरहेण मध्यवर्तीत्वस्यापि ग्रहणापत्तेरित्याशयात् । किं च बहुपटवस्तिष्ठन्तीति

वाक्यस्यापि संज्ञापत्तिः । एवं – समासग्रहणस्य नियमार्थत्वाभावे । न चार्थवत्त्वाभावाद्वारणं, न्यायनये उत्तरसूत्रे तदसम्बन्धात् । "तृतीया-प्रभृतीनि –" इति तु स्वरे विशेषार्थम् ।

'न च सा समासेऽस्ति' असें जें प्रकाशकारांनीं म्हटलें आहे त्यावरून हें देखील निष्पन्न होतें कीं, त्यांच्या मतें वाक्याचें ठिकाणीं देखील वृत्तिमत्व म्हणजे अर्थ बोधित करण्याची स्वतंत्र अभिधाशक्ति किंवा लक्षणाशक्ति, नसतें. 'एकार्थीभावाभ्युपगमात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यांतील 'एकार्थीभाव' या शब्दाचा 'एकोपस्थितिनियामिका समुदायशक्तिः' असाच अर्थ आहे. (सारांश समासांत व वाक्यांत एकत्र उपस्थित होणाऱ्या पदांचे अर्थ परस्परांशीं अन्वित झाल्यानें जो एक विशिष्ट अर्थ समुदाय-शक्तीनें बोधित होतो त्यालाच एकार्थीभाव म्हणतात.) अशा रीतीनें समासाचे ठिकाणीं वृत्तिमत्व सिद्ध होतें (कारण दोन पदांचा समास झाला असतां त्यांचा अर्थ परस्परांशीं अन्वित होऊन जो विशिष्ट अर्थाचा बोध होतो तो समासाचे ठिकाणीं असलेल्या समुदायशक्तीनेंच होतो हें स्पष्टपणें व्यक्त होतें. वाक्याचे ठिकाणीं जरी तसें स्पष्टपणें दिसून येत नाहीं तरी) वाक्याचे ठिकाणीं देखील समुदायशक्ति असतेच; कारण 'अर्थवदधातुरप्रत्ययः' १.२.४५ या सूत्रावरील व इतर सूत्रांवरील भाष्यांत असें म्हटलें आहे कीं, वाक्यांतील पदें विशेषणविशेष्यभावापन्न झाल्यानें समुदायशक्तीनें वाक्याच्या अर्थाचा बोध होतो. (उदाहरणार्थ 'रामो गृहं गच्छति' या वाक्यांतील पदांचे अर्थ परस्परान्वित होऊन 'रामकर्तृकगृहकर्मकगमनम्' असा जो त्या वाक्यावरून विशिष्ट अर्थाचा बोध होतो तो बोध करण्याची समुदायशक्ति वाक्यांत आहे. 'अर्थवदधातुः' १.२.४५ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात – 'पदार्थाभिसम्बन्धस्योपलब्धिर्भवति वाक्ये ··· ··· इह – देवदत्त गामभ्याज शुक्लामिति वाक्ये – देवदत्त इत्युक्ते कर्ता निर्दिष्टः ··· गामित्युक्ते कर्म निर्दिष्टम् ··· अभ्याजेत्युक्ते

क्रिया निर्दिष्टा ... शुक्लामित्युक्ते गुणोनिर्दिष्टः ... इहेदानीं देवदत्त गामभ्याज शुक्लामित्युक्ते सर्वं निर्दिष्टम् । देवदत्त एव कर्ता नान्यः । गामेव कर्म नान्यत् । अभ्याजैव क्रिया नान्या । शुक्लामेव न कृष्णामिति । एषां पदानां सामान्ये वर्तमानानां यद्विशेषेऽवस्थानं स वाक्यार्थः ।) 'मीमांसकमतेऽपि लक्षणाऽस्त्येव' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, समासादि वृत्तींचे ठिकाणीं व वाक्यांचे ठिकाणीं लक्षणा असते, म्हणजे तद्धित समासादि वृत्तींचा व तसेंच वाक्याचा अर्थबोध लक्षणेनेंच होतो. (सारांश मनोरमेंत दिले-ल्या कारिकेंतील 'वाक्य' या शब्दाचा 'समस्तासमस्तपदसमूह' या अर्थामध्यें प्रयोग केला आहे.) 'बहुपटव इत्याद्यसिद्धेः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, नैयायिकांच्या मतें जशी समासांत अर्थबोध करण्याची शक्ति नसते तशी 'बहुपटवः' इत्यादि तद्धितविशिष्ट शब्दांत देखील अर्थबोध करण्याची अभिधारूप किंवा लक्षणारूप शक्ति नसते, (व अशा रीतीनें अर्थवत्वाच्या अभावामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा न होण्याची व त्याहून सुबुत्पत्ति न होण्याची आपत्ति येते.) 'पचतकीत्यादावति व्याप्तेः' असें जें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे तें अशा आशयानें म्हटलें आहे कीं, जो शब्द तद्धितप्रत्ययादि किंवा तद्धितप्रत्ययान्त आहे तशाच शब्दाला तद्धित-विशिष्ट मानावें व ज्या शब्दस्वरूपांत तद्धितप्रत्यय मध्यवर्ति आहे तशा शब्दाला तद्धितविशिष्ट मानूं नये अशा प्रकारचा भेद करण्यास कोणतेंहि प्रमाण उपलब्ध नसल्यामुळें, जेथें तद्धितप्रत्यय मध्यवर्ती आहे तशा ('पचतकि' इत्यादि शब्दाला तद्धितविशिष्ट मानणें भाग पडेल व त्यामुळें) तशा शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येईल. दुसरें असें कीं, प्रकृत सूत्रांतील 'तद्धित' या शब्दानें तद्धितविशिष्टाचें ग्रहण होतें असें मानलें तर, 'बहुपटवस्तिष्ठन्ति' या वाक्याला देखील प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येईल; (कारण प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण नियमार्थ न मानल्यास, 'बहुपटवस्तिष्ठन्ति' हा असमस्त अर्थवान् पदसमुदाय

तद्धितविशिष्ट असल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची व 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें अन्तर्वर्ति विभक्ति-प्रत्ययाचा लुक् होण्याची आपत्ति येईल.) 'किं चैवं कृद्ग्रहण-परिभाषया' या मनोरमेंतील पंक्तींतील 'एवम्' या पदाचा 'समासग्रहणस्य नियमार्थत्वाभावे,' म्हणजे प्रकृत सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण नियमार्थक न मानतां विध्यर्थक मानल्यास, असा अर्थ आहे. 'बहुपटवस्तिष्ठन्ति' हें वाक्य (नैयायिकांच्या मतें) अर्थवान् नसल्यामुळें (तें जरी तद्धितविशिष्ट आहे तरी) त्याला प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येत नाहीं, म्हणजे अर्थवत्वा-भावामुळें, त्या संज्ञेचें निवारण होतें, असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण नैयायिकांचें मत बरोबर मानल्यास, पूर्वसूत्रांतून प्रकृत सूत्रांत 'अर्थवत्' या पदाची अनुवृत्ति होऊं शकत नाहीं. (नैयायिकांच्या मतें कृदन्त, तद्धितान्त, समास व वाक्य यांच्यामध्यें अभिधाशक्तीनें किंवा लक्षणेनें अर्थबोध करण्याची शक्ति नसल्यामुळें, ते त्यांच्या मतें अर्थवान् ठरत नाहींत, आणि प्रकृत सूत्रांत 'कृत् = कृदन्त,' तद्धित = तद्धिदान्त' व 'समास' यांचेंच ग्रहण केलें असल्यामुळें व ते नैयायिकांच्या मतें अर्थवान् नसल्यामुळें, त्यांना 'अर्थवत्' हें विशेषण लागूच पडत नाहीं आणि त्यामुळें 'अर्थवत्' या पदाची प्रकृत सूत्रांत अनुवृत्ति करणें विसंगत ठरतें. सारांश 'बहुपटवस्तिष्ठन्ति' हा पदसमुदाय तद्धितविशिष्ट असल्या-मुळें त्याला प्रकृत सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होण्याची आपत्ति येते व पूर्व सूत्रांतील 'अर्थवत्' या पदानें त्या आपत्तीचें न्यायमतांत निवारण होऊं शकत नाहीं.) 'तृतीया प्रभृतीन्यन्यतरस्याम्' सू. ७८४ हें समासविकल्पविधायक सूत्र स्वरांत फरक व्हावा याकरितां केलें आहे. ('मूलकेनोपदंशम्' या स्थलीं विकल्पेंकरून समास केल्यास, 'मूलकोपदंशम्' हा सामासिक शब्द 'समासस्य' सू. ३७३४ या सूत्रानें अन्तोदात्त होतो. समास न केल्यास 'मूलकेनोपदंशम' या कृदन्त समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा केल्यानें 'सुपो धातुप्रातिपदिकयोः'

या सूत्रानें अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययाचा लुक् होऊन 'मूलकोपदंशम्' असेंच जरी रूप होईल तरी हा समास नसल्यामुळें, 'समासस्य' हें सूत्र येथें प्रवृत्त होणार नाहीं व 'मूलकोपदंशम्' या शब्दांत दोन उदात्त स्वर राहतील. अशा रीतीनें तें समासविकल्पविधायक सूत्र चरितार्थ होऊं शकत असल्यामुळें, 'मूलकेनोपदंशम्' या कृदन्त समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा केल्यास तें सूत्र निरर्थक ठरण्याची आपत्ति येते असें जें शंकाकाराचें म्हणणें आहे तें चूक ठरतें.)

शब्दरत्न—अभेदविवक्षायामिति । सादृश्यमूलाभेदविवक्षाया-मित्यर्थः । अनुकरणं च स्वसादृश्येनानुकार्यमुपस्थापयति, तथोप-स्थितस्य शाब्देऽन्वयप्रतियोगित्वं व्युत्पत्तिवैचित्र्यात् । एवं च वृत्त्यार्थबोधकत्वरूपार्थवत्वाभाव इति भावः । अत एव "भू सत्ता-याम्" इत्यादिनिर्देशाः सङ्गच्छन्ते तदाह—भू इति । अपदं न प्रयुञ्जीतेत्यस्यापरिनिष्ठितत्सित्यर्थः । अस्य चास्मादेव लिङ्गात्परि-निष्ठितत्वम् । भेदविवक्षायामिति । अर्थवत् शब्दोऽपि वृत्तिविषय एवैतत्पक्षे इति भावः । अयं पक्षो "मतौ छः सूक्त" इति सूत्रे भाष्ये । अनयोश्च लक्ष्यानुरोधात् व्यवस्थेति दिक् ।

मनोरमेंतील 'अभेदविवक्षायाम्' या पदाचा 'सादृश्यमूला-भेद विवक्षायाम्' असा अर्थ आहे. (अनुकरण व अनुकार्य हे जरी वास्तविक भिन्न आहेत तरी, त्या दोहोंचें स्वरूप अत्यन्त सदृश असल्यामुळें त्यांच्यामध्यें अभेद मानला जातो.) अनुकरण हें अनुकार्याच्या सारखें स्वरूपांत असल्यामुळें, तें त्या स्वरूपसादृश्यामुळें अनुकार्याची उपस्थिति करून देतें व अशा रीतीनें उपस्थित झालेल्या अनुकार्याचा वाक्यांतील इतर पदांशीं कार्यकारणभावरूपवैचित्र्यानें शाब्दिक अन्वय होतो. (अनुकरण दोन प्रकारचें असतें, एक व्यक्त शब्दाचें अनुकरण, व दुसरें अव्यक्त ध्वनीचें अनुकरण. प्रथम स्थलीं अनुकरणाची अनुकार्याच्या विशिष्ट वर्णानुपूर्वीसारखीच वर्णानुपूर्वी असते व या अत्यन्त सादृश्यामुळें, अनुकरण अनुकार्याची उपस्थिति

करून देतें व अशा रीतीनें या दोहोंमध्यें उपस्थाप्योपस्थापकरूप कार्यकारणसंबंध आहे. या कार्यकारणभावामुळेंच अनुकार्याचा वाक्यांत शाब्दिक अन्वय होतो. द्वितीय स्थलीं ज्या अव्यक्त ध्वनीचें अनुकरण केलें जातें त्यांत वर्णानुपूर्वी नसल्यामुळें व तशा स्थलीं अनुकरण व अनुकार्य यांत विशिष्टवर्णानुपूर्वीरूप सादृश्य नसल्यामुळें, अनुकरण अनुकार्याची उपस्थिति करून देऊं शकत नाहीं. म्हणून द्वितीय प्रकारचें अनुकरण अर्थरहितच असतें. प्रथम स्थलीं मात्र अभेदानुकरणपक्षांत अनुकरण अनुकार्याची उपस्थिति करून देण्यामध्येंच खर्ची पडत असल्यामुळें, अनुकरण अर्थरहित ठरतें व त्यामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. परंतु भेदानुकरणपक्षांत 'प्रकृतिवदनुकरणं भवति'–परि. ३६ या परिभाषान्वयें अनुकरण देखील अनुकार्यासारखेंच अर्थवान् ठरत असल्यामुळें, त्याला पूर्व सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होऊन त्याहून सुबुत्पत्ति होते.) यावरून हें स्पष्ट होतें कीं, अभेदानुकरणपक्षांत अनुकरणाचे ठिकाणीं अभिधावृत्तीनें किंवा लक्षणावृत्तीनें अर्थबोध करून देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें, तें अर्थवान् ठरत नाहीं (आणि त्यामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं व त्याहून सुबुत्पत्ति होत नाहीं.) म्हणूनच, म्हणजे अभेदानुकरणपक्षांत अनुकरणाला प्रातिपदिकसंज्ञा होत नसल्यामुळें व त्याहून सुबुत्पत्ति होत नसल्या-मुळेंच, 'भू सत्तायाम्' इत्यादि निर्देश योग्य ठरतात आणि म्हणूनच 'भू सत्तायाम्' हें (अभेदानुकरणपक्षांत अनुकरणाला प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं याचें दीक्षितांनीं मनोरमेंत) उदाहरण दिलें आहे. 'अपदं न प्रयुञ्जीत' असें जें वचन आहे त्याचा, म्हणजे त्यांतील 'अपदम्' याचा 'अपरिनिष्ठितम्' म्हणजे अप्रयोगार्ह, असा अर्थ आहे. पाणिनीनें 'भू सत्तायाम्' इत्यादि निर्देश केले असल्यामुळें, त्या निर्देशांवरूनच 'भू' इत्यादि अनुकरणांचे परिनिष्ठितत्व-प्रयोगार्हत्व–सिद्ध होतें. (ज्याला प्रातिपदिकसंज्ञा आहे त्याहून सुबुत्पत्ति केल्याशिवाय त्याचा वाक्यांत प्रयोग करतां येऊं शकत

नाहीं. पण अभेदानुकरणपक्षांत अनुकरण हें अर्थवान् नसल्यामुळें व अशा रीतीनें प्रातिपदिकसंज्ञक ठरत नसल्यामुळें, त्याहून सुबुत्पत्ति होऊं शकत नाहीं. त्यामुळें त्या पक्षांत अनुकरणाचा अविभक्तिक प्रयोग वाक्यांत करतां येतो व त्याचें अविभक्तिक रूप हेंच त्याचें परिनिष्ठित-प्रयोगार्ह-रूप होय असें मानलें असतां, 'अपदं न प्रयुञ्जीत' या वचनाचें कोणत्याहि रीतीनें उल्लंघन होत नाहीं.) भेदानुकरणपक्षांत शब्द देखील अर्थाप्रमाणें वृत्तीचा—अभिधेचा—विषय होतोच. (जसा शब्दापासून अभिधावृत्तीनें त्याच्या अर्थाचा बोध होतो त्याचप्रमाणें भेदानुकरणपक्षांत अनुकरण हें अनुकार्यरूप शब्दाचाच अभिधावृत्तीनें बोध करून देतें, म्हणजे ज्याचें अनुकरण केलें आहे तो अनुकार्य शब्दच अनुकरणानें बोधित होतो, व अशा रीतीनें भेदानुकरणपक्षांत अनुकरण अर्थवान् ठरत असल्यामुळें, त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊन त्याहून सुबुत्पत्ति होते.) हा द्वितीय पक्ष 'मतौ छः सूक्तसाम्नोः' सू. ५–२–५९ या सूत्रावरील भाष्यांत सांगितला आहे. (या भाष्यांत 'छप्रकरणेऽनेकपदादपि' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात —'छप्रकरणेऽनेकपदादपीति वक्तव्यम् । इहापि यथा स्यात् — अस्यवामीयम्, कयाशुभीयम् । किं पुनः कारणं न सिध्यति ? । अप्रातिपदिकत्वात् ।' या भाष्याचा अर्थ हा आहे कीं, 'अस्यवामीयम्, कयाशुभीयम्' इत्यादि रूपें सिद्ध होण्याकरितां 'छ' प्रत्यय पदसमुदायाहून देखील व्हावा असें विधान केलें पाहिजे; कारण पदसमुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नसल्यामुळें तशा समुदायाहून 'छ' हा तद्धित प्रत्यय होऊं शकणार नाहीं व वरील रूपें सिद्ध होऊं शकणार नाहींत. असें सांगून भाष्यकार नंतर 'सिद्धं तु प्रातिपदिकविज्ञानात्' असें उलट अर्थाचें वार्तिक पठित करितात व म्हणतात —'सिद्धमेतत् । कथम् ? । प्रातिपदिकविज्ञानात् । कथं प्रातिपदिकविज्ञानम् ? । स्वं रूपं शब्दस्याऽशब्दसंज्ञेति वचनात् । स्वं रूपं शब्दस्याऽशब्दसंज्ञा भवतीति । एवं

योऽसावाम्नाये अस्यवामशब्दः पठ्यते सोऽस्यपदार्थः । किं पुनरन्ये आम्नायशब्दा अन्य इमे ? ओमित्याह । कुत एतत् ? । आम्नाय-शब्दानामान्यभाव्यं स्वरवर्णानुपूर्वीदेशकालनियतत्वात् ।' या भाष्याचा कैयटानें 'यथा स्वं रूपमिति वचनादग्नेर्ढगित्यत्राग्निशब्दस्वरूपमग्नि-शब्दस्य प्रत्यायकमेवमाम्नायपठितस्यास्यवामशब्दस्य च्छप्रत्ययप्रकृति-रस्यवामशब्दः प्रत्यायक इत्यर्थवत्त्वात्पदसमुदायरूपत्वाभावाच्च प्राति-पदिकत्वमित्यर्थः ।' असा थोडक्यांत स्पष्ट अर्थ दिला आहे. मग अनुकार्य वैदिक शब्द व त्यांचें अनुकरण करणारे शब्द यांचें स्वरूप अत्यन्त सदृश असून देखील हे शब्द भिन्न मानले पाहिजेत काय असा प्रश्न केला असतां, त्या प्रश्नाचें भाष्यकार 'होय' असें उत्तर देतात, व तसें उत्तर देण्याचें मुख्य कारण हें कीं, अनुकार्य व अनुकरण या दोहोंच्या अर्थामध्यें फरक असतो व उद्योतांत सांगितल्याप्रमाणें तो फरक 'अनुकार्यस्य बाह्योऽर्थः, अनुकरणस्य तु अनुकार्यशब्दरूपमेवेत्यर्थभेदः' असा आहे आणि अनुकरण व अनुकार्य हे भिन्नार्थवाचक शब्द आहेत या सिद्धान्ताच्या दृढीकरणार्थ भाष्यकारांनीं 'आम्नायशब्दानामान्य-भाव्यम्' हें वार्तिक पठित केलें आहे. या भाष्यावरून भेदानुकरणपक्ष स्पष्टपणें सिद्ध होतो.) या दोन पक्षांतील कोणत्या पक्षाचा कोणत्या स्थलीं आश्रय करावा हें लक्ष्यांच्या अनुरोधानें ठरविलें पाहिजे. (जर अनुकरणाहून सुबुत्पत्ति केली असेल तर भेदानुकरणपक्षाचा आश्रय करून ती केली आहे असें मानलें पाहिजे व सुबुत्पत्ति केली नसेल तर अभेदानुकरणपक्षाचा आश्रय करून ती केली नाहीं असें मानलें पाहिजे आणि अशा रीतीनें वरील दोन पक्षांची इष्ट-रूपसिद्ध्यर्थ व्यवस्था लावली पाहिजे.)

मनोरमा– लिङ्गविशिष्टस्येति । लिङ्गबोधकप्रत्ययविशिष्ट-स्यापीत्यर्थः । परिभाषायाः प्रयोजनन्तु अयस्कुम्भी । "अतः कृकमि" इति सत्वम्, तद्धि कंसादिषूत्तरपदेषु विधीयते । किं च । कुमारी-माचष्टे कुमारयति । "णाविष्ठवद्" इति टिलोपः ।

एवं यामिनयन्त्यहानि इत्यत्र आचारे क्विबपि फलम् । ङ्याब्भ्यां प्रागिति । तेन लोहिनिका आर्यका च सिद्ध्यति । तथा हि स्वार्थिकत्वेनान्तरङ्गः परश्च "लोहितान्मणौ" इति कन् ङीपं बाधेत । ततो लोहितिकेत्येव स्यादिष्यते तूभयम् । ङीब्ग्रहणसामर्थ्यात्तु ङ्यन्तात्कनि रूपद्वयं सिद्धम् "वर्णादनुदात्तात्" इत्यस्य वैकल्पिकत्वात् । आर्यशब्दात्तु "न सामिवचने" इत्यत्र ज्ञापयिष्यमाणोऽत्यन्तस्वार्थिकोऽपि कन् आब्ग्रहणसामर्थ्यात् पूर्वं न प्रवर्त्तते । तेन "उदीचामातः स्थाने यकपूर्वायाः" इति इत्वविकल्पः सिद्ध्यति ॥

('ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ सूत्रावरील कौमुदींत 'प्रातिपदिकग्रहणे लिङ्गविशिष्टस्यापि ग्रहणम्'–परि. ७२–ही जी परिभाषा दिली आहे त्या परिभाषेंतील) 'लिङ्गविशिष्टस्य' या पदाचा लिङ्गबोधकप्रत्ययविशिष्टस्य,' म्हणजे लिङ्गाचा बोध करून देणाऱ्या प्रत्ययानें युक्त अशा शब्दाचें (ग्रहण होतें), असा अर्थ आहे. या परिभाषेचें प्रयोजन हें आहे कीं, 'अयस्कुम्भी' या उदाहरणांत (विसर्गापुढें सूत्रनिर्दिष्ट 'कुम्भ' हा शब्द नसून 'कुम्भी' हा स्त्रीप्रत्ययविशिष्ट शब्द आहे तरी) 'अतः कृकमि' सू. १६० या सूत्रानें विसर्गाचें सत्व व्हावें. 'कंस' इत्यादि शब्द उत्तर पद असतां, त्या सूत्रानें विसर्गाचें सत्व होणें सांगितलें आहे. ('अतः कृकमि' या सूत्रांत 'कुम्भ' इत्यादि प्रातिपदिकविशेषांचें ग्रहण केलें आहे व या परिभाषांन्वयें त्या प्रातिपदिकांनीं 'कुम्भी' इत्यादि स्त्रीप्रत्ययविशिष्ट शब्दांचें देखील ग्रहण होतें आणि त्यामुळें 'अयस्कुम्भीं' या उदाहरणांत 'अयः' यांतील विसर्गापुढें 'कुम्भ' शब्द नसून 'कुम्भी' हा शब्द आहे तरी विसर्गाचें सत्व होतें.) या परिभाषेचें दुसरें प्रयोजन हें आहे कीं, 'कुमारीमाचष्टे कुमारयति' या उदाहरणांत 'णाविष्ठवद्' या वचनान्वयें टिलोप व्हावा. ('प्रातिपदिकात् धात्वर्थे बहुलमिष्ठवच्च' या गणसूत्रानें प्रातिपदिकाहून 'णिच्' प्रत्यय होणें व तो प्रत्यय केला असतां, 'इष्ठ' प्रत्यय पुढें असतांना प्रातिपदिकाला जीं कार्यें होणें सांगितलीं आहेत

तीं कार्यें होणें, याचें विधान केलें आहे. या गणसूत्रांत 'प्रातिपदिक' या सामान्यशब्दाचें ग्रहण केलें आहे तरी, त्या शब्दानें वरील परिभाषान्वयें लिङ्गविशिष्टप्रातिपदिकाचें ग्रहण होऊन तशा लिङ्गविशिष्ट प्रातिपदिकाहून देखील 'तत्करोति तदाचष्टे' इत्यादि अर्थामध्यें णिच्प्रत्यय होतो, व तो प्रत्यय केल्यावर त्या लिङ्गविशिष्ट प्रातिपदिकाला, 'इष्ठ' प्रत्यय पुढें आला असतां होणारीं, कार्यें होतात. त्यामुळें 'कुमार' या प्रातिपदिकाहून जसा 'तत्करोति तदाचष्टे' या अर्थामध्यें णिच्प्रत्यय होतो त्याचप्रमाणें 'वयसि प्रथमे' सू. ४७८ या सूत्रानें 'कुमार' या प्रातिपदिकाहून 'ङीप्' प्रत्यय केला असतां 'कुमारी' असा जो ङीबन्त शब्द होतो त्या शब्दाहून देखील वरील अर्थामध्यें णिच् प्रत्यय होतो. व तो प्रत्यय केला असतां इष्ठवद्भावानें 'टेः' सू. १७८६ या सूत्रानें 'कुमारी' यांतील 'टि' चा म्हणजे अन्त्य ईकाराचा, लोप होऊन 'कुमार् + णि + शप् + ति' अशी स्थिति झाली असतां, शप्प्रत्ययाच्या निमित्तामुळें 'सार्वधातुकार्धधातुकयोः' सू. २१६८ या सूत्रानें 'णि = इ' चा 'ए' असा गुण होऊन व त्या 'ए' पुढें 'शप् = अ' हा अच् असल्यामुळें त्याचे जागीं 'एचोऽयवायावः' सू. ६१ या सूत्रानें 'अय्' असा आदेश होऊन 'कुमारयति' असें इष्ट रूप सिद्ध होतें.) याचप्रमाणें 'यामिनयन्ति अहानि' या स्थलीं ('यामिनी' या स्त्रीप्रत्ययविशिष्ट शब्दाहून) आचारार्थक क्विप् प्रत्यय होणें हें देखील वरील परिभाषेचें फल आहे. ('सर्वप्रातिपदिकेभ्यः क्विब्वा वक्तव्यः'—सू. २६६५ वरील वार्तिक—या वार्तिकानें प्रातिपदिकाहून आचारार्थक क्विप्-प्रत्यय होणें सांगितलें आहे. या वार्तिकांत 'प्रातिपदिक' या सामान्य शब्दाचें ग्रहण केलें आहे तरी, वरील परिभाषान्वयें स्त्रीप्रत्ययविशिष्ट प्रातिपदिकाचें ग्रहण होतें. म्हणून 'यामिन्' या नकारान्त प्रातिपदिकाहून 'ऋन्नेभ्यो ङीप्' सू. ३०६ या सूत्रानें 'ङीप्' प्रत्यय केला असतां 'यामिनी' असें जें स्त्रीप्रत्ययविशिष्ट रूप होतें त्याहून देखील आचारार्थक 'क्विप् = व्' प्रत्यय करतां येतो, व त्या

प्रत्ययाचा जरी 'वेरपृक्तस्य' सू. ३७५ या सूत्रानें लोप होतो तरी 'यामिनी' हा प्रत्ययलक्षणानें क्विप् प्रत्ययान्त आहे असें मानतां येतें व त्यामुळें 'सनाद्यन्ता धातवः' सू. २३०४ या सूत्रानें त्याला धातुसंज्ञा होऊन त्याहून 'शप् = अ' व 'झि = अन्ति' हे प्रत्यय केल्यावर 'यामिनी + अ + अन्ति' अशी स्थिति झाली असतां, पूर्वी सांगितल्याप्रमाणें 'शप्' प्रत्ययाच्या निमित्तामुळें 'यामिनी' यांतील अन्त्य ईकाराचा गुण होऊन व अयादेश होऊन 'यामिनयन्ति' असें इष्ट रूप सिद्ध होतें.) प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'ङ्याब्भ्यां प्राङ् माभूत्' असें म्हटलें असल्यामुळें, 'लोहिनिका, आर्यका' हीं रूपें सिद्ध होतात. कौमुदींत जसें वर सांगितल्याप्रमाणें म्हटलें आहे तसें न मानल्यास, 'लोहितान्मणौ,' सू. २०९८ या सूत्रानें होणारा स्वार्थिक 'कन्' प्रत्यय अन्तरङ्ग व तसेंच परसूत्रानें होणारा असल्यामुळें, तो 'ङीप्' प्रत्ययाचा बाध करील, म्हणजे 'ङीप्' प्रत्यय प्रथम न होऊं देतां तो स्वार्थिक प्रत्ययच प्रथम होईल, व त्यामुळें 'लोहितिका' एवढें एकच रूप सिद्ध होईल. परंतु दोन्ही प्रकारचीं रूपें, म्हणजे 'लोहितिका, लोहिनिका' हीं दोन्ही रूपें, सिद्ध होणें इष्ट आहे. प्रकृत सूत्रांत 'ङीप्' प्रत्ययाचें ग्रहण केलें असल्यामुळें, त्या ग्रहणाच्या सामर्थ्यानें ङ्यन्ताहून 'कन्' प्रत्यय होतो व वरील दोन्ही रूपें सिद्ध होतात; कारण 'वर्णादनुदात्तात्' सू. ४९६ या सूत्रानें होणारें कार्य वैकल्पिक आहे. ('लोहितान्मणौ' या सूत्रानें स्वार्थिक 'कन्' प्रत्यय होणें हें कार्य निर्निमित्तक आहे व वर्णवाचक शब्द तकारोपध आणि अनुदात्तान्त असतां त्याहून विकल्पेंकरून 'ङीप्' प्रत्यय होणें व त्याबरोबरच उपधेंतील तकाराचा नकार होणें हें निमित्तद्वयामुळें होणारें कार्य आहे. म्हणून स्वार्थिक 'कन्' प्रत्यय होणें हें निर्निमित्तक कार्य, निमित्तद्वयामुळें होणाऱ्या 'ङीप्' कार्याच्या मानानें, अन्तरङ्ग ठरतें, व 'पूर्वपर' प. ३८ किंवा 'असिद्धं बहिरङ्गमन्तरङ्गे' – परि – ५० – या परिभाषान्वयें अन्तरङ्ग कार्याची प्रथम प्राप्ति होते. तसेंच स्वार्थिक 'कन्' प्रत्यय होणें हें

परसूत्रानें होणारें कार्य असल्यामुळें, 'पूर्वात्परं बलवत्' या न्यायान्वयें त्याचीच प्रथम प्राप्ति होते. त्यामुळें स्वार्थे 'कन्' प्रत्यय प्रथम केला असतां, 'लोहित + कन् = लोहितक' असें रूप झाल्यावर त्या शब्दांत तकार उपधेंत राहत नसल्यामुळें, 'वर्णादनुदात्तात्' या सूत्रानें 'ङीप्' प्रत्यय होऊं शकत नाहीं व 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें त्या अदन्त शब्दाहून 'टाप् = आ' हा प्रत्यय होऊन आणि 'प्रत्ययस्थात्कात्पूर्वस्य' सू. ४६३ या सूत्रानें प्रत्ययस्थ ककारापूर्वी असलेल्या अकाराचा इकार होऊन 'लोहितिका' असेंच रूप सिद्ध होऊं शकेल व 'लोहिनिका' हें पाक्षिक इष्ट–रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. परंतु प्रकृत सूत्रांत 'ङी' व 'आप्' या प्रत्ययांचें ग्रहण, 'ङ्याबन्तात् तद्धितोत्पत्तिर्यथा स्यात् ङ्याब्भ्यां प्राङ् माभूत्' या करितां, केलें असल्यामुळें, त्या प्रत्ययांच्या ग्रहण-सामर्थ्यानें 'लोहित' शब्दाहून 'ङीप्' प्रत्यय, बहिरङ्ग असून देखील, प्रथम होतो व तशा ङीबन्त शब्दाहून स्वार्थिक 'कन्' प्रत्यय होतो आणि 'वर्णादनुदात्तात्' या सूत्रानें होणारें कार्य वैकल्पिक असल्यामुळें, त्या सूत्रानें 'लोहित' शब्दाहून विकल्पेंकरून 'ङीप्' प्रत्यय केला असतां, उपधेंतील तकाराचा नकार होऊन 'लोहिनी' असें रूप होतें व या ङीबन्त शब्दाहून 'लोहितान्मणौ' या सूत्रानें होणारा स्वार्थिक 'कन्' प्रत्यय अन्तरङ्ग असून देखील नंतर केला असतां, 'लोहिनी + कन्' अशा स्थितींत 'केऽणः' सू. ८३४ या सूत्रानें 'लोहिनी' यांतील अन्त्य ईकार ऱ्हस्व होऊन 'लोहिनिक' असें रूप होतें व हा शब्द अदन्त असल्यामुळें, 'अजाद्यतष्टाप्' या सूत्रानें 'टाप् = आ' हा प्रत्यय होऊन 'लोहिनिका' असें रूप होतें. 'ङीप्' प्रत्यय होणें वैकल्पिक असल्यामुळें तो न केल्यास, 'लोहित' या अदन्त शब्दाहून प्रकृतसूत्रांतील 'आप' ग्रहणाच्या सामर्थ्यामुळें प्रथम 'टाप्' प्रत्यय होऊन व नंतर स्वार्थिक 'कन्' प्रत्यय होऊन 'लोहिता + कन्' अशी स्थिति झाली असतां, 'केऽणः' या सूत्रानें 'लोहिता' यांतील आकाराचा अकार होऊन 'लोहितक' अशी

स्थिति झाल्यावर पुन्हा त्या अदन्त शब्दाहून 'टाप् = आ' प्रत्यय केला असतां, 'प्रत्ययस्थात्कात्पूर्वस्य' या सूत्रानें त्या अकाराचा इकार होऊन 'लोहितिका' असें पाक्षिक इष्ट रूप देखील सिद्ध होतें. येथें हें लक्षांत ठेवावें कीं, रक्तवर्णाच्या वाचक 'लोहित' या शब्दाच्या अन्तीं 'त' असल्यामुळें, 'वर्णानां तणतिनितान्तानाम्' फिट्सू. ३३ या सूत्रानें तो शब्द आद्युदात्त ठरतो व 'अनुदात्तं पदमेकवर्जम्' सू. ३६५० या सूत्रानें त्यांतील बाकीचे अच् अनुदात्त होत असल्यामुळें, तो अनुदात्तान्त ठरतो आणि तो तकारोपध असल्यामुळें, 'वर्णादनुदात्तात्' या सूत्रानें त्याला विकल्पेंकरून 'ङीप्' प्रत्ययाची प्राप्ति होते.) 'आर्य' शब्दाहून 'न सामिवचने' सू. २०७७ या सूत्रानें ज्ञापित होणारा अत्यन्त स्वार्थिक 'कन्' प्रत्यय देखील, 'ङ्याप्प्रातिपदिकात्' या सूत्रांतील 'आप्' ग्रहणाच्या सामर्थ्यामुळें, पूर्वीं होत नाहीं (व 'अजाद्यतष्टाप्' या सूत्रानें होणारा 'टाप् = आ' प्रत्ययच पूर्वीं होतो.) त्यामुळें 'उदीचामातः, स्थाने यकपूर्वायाः' सू. ४६५ या सूत्रानें इत्वाचा विकल्प सिद्ध होतो (आणि 'आर्यिका' व 'आर्यिका' अशीं पाक्षिक रूपें सिद्ध होतात. 'अनत्यन्तगतौ क्तात्' सू. २०७६ या सूत्रानें 'अनत्यन्तगति,' म्हणजे क्तान्तानें जी क्रिया दर्शविली जाते ती क्रिया ज्याचे ठिकाणीं होते त्याच्या सकल अवयवाशीं त्या क्रियेचा संबंध होत नाहीं, असा अर्थ गम्यमान असतां, क्तान्ताहून 'कन्' प्रत्यय होणें सांगितलें आहे. 'सामि' किंवा 'सामि' या अर्थाचें वाचक क्तान्ताचें उपपद असल्यास, तशा क्तान्ताहून 'न सामिवचने' सू. २०७७ या सूत्रानें 'कन्' प्रत्यय होण्याचा निषेध केला आहे. पण 'सामि अर्द्धम्' हा शब्द क्तान्ताचें उपपद असल्यास, त्या उपपदसहित क्तान्त प्रकृतीहून ज्ञात होणारी क्रिया अशेषावयवसंबंधिनी नसून अवयवार्धाला व्यापणारी ती क्रिया आहे असें बोधित होत असल्यामुळें, पुन्हा तोच अर्थ सांगण्याकरितां, 'उक्तार्थानामप्रयोगः' या न्यायान्वयें, 'अनत्यन्तगति' या अर्थामध्यें 'कन्' प्रत्यय करण्याची कांहीं गरज

राहत नाहीं. म्हणून 'सामिछिन्नम्' इत्यादि स्थलीं वास्तविक 'कन्' प्रत्ययाची प्राप्तीच होत नसल्यामुळें व 'प्राप्तस्यैव निषेधः' हा न्याय असल्यामुळें, तें सूत्र व्यर्थ ठरूं पाहतें. तें सूत्र व्यर्थ न ठरावें याकरितां असें मानलें पाहिजे कीं, त्या सूत्रानें जो निषेध केला आहे तो 'अनत्यन्तगति' या अर्थामध्यें होणाऱ्या 'कन्' प्रत्ययाचा निषेध केला नसून अत्यन्त स्वार्थिक या अर्थामध्यें होणाऱ्या 'कन्' प्रत्ययाचा निषेध केला आहे, म्हणजे 'सामि' हें क्तान्ताचें उपपद असल्यास, तशा क्तान्ताहून अत्यन्त स्वार्थिक 'कन्' प्रत्यय होऊं शकत नाहीं असा निषेध करणारें तें सूत्र आहे. अशा रीतीनें तें निषेधक सूत्रच, 'प्राप्तस्यैव निषेधः' या न्यायान्वयें, अत्यन्त स्वार्थिक 'कन्' प्रत्यय कोणत्याहि प्रातिपदिकाहून करतां येऊं शकतो याचें ज्ञापक ठरतें असा 'न सामिवचने इत्यत्र ज्ञापयिष्यमाणो ऽत्यन्त-स्वार्थिकोऽपि कन्' या मनोरमेंतील पंक्तीचा भावार्थ आहे. त्या सूत्रावरील कौमुदींत दीक्षितांनीं 'अनत्यन्तगतेरिह प्रकृत्यैवाभिधानात् पूर्वेण कन् न प्राप्तः । इदमेव निषेधसूत्रमत्यन्तस्वार्थिकमपि कनं ज्ञापयति' असेंच म्हटलें आहे. भाष्यकारांनीं तर 'सामिवचने प्रतिषेधानर्थक्यं प्रकृत्यभिहितत्वात्' हें वार्तिक पठित करून त्या सूत्राचें प्रत्याख्यान केलें आहे व त्या भाष्यावरील वृत्तींत कैयटानें 'एवं तर्हि न सामिवचने इति प्रतिषेधेन स्वार्थिकः कन् अस्तीति ज्ञाप्यते' असें म्हटलें आहे. काशिकेंत देखील तसेंच व्याख्यान केलें आहे व त्याचाच अनुवाद दीक्षितांनीं कौमुदींत केला आहे. सारांश वरील निषेधक सूत्रानें ज्ञापित होणारा अत्यन्त स्वार्थिक 'कन्' प्रत्यय निर्निमित्तक असल्यामुळें अन्तरङ्ग असून, अदन्तत्वरूप निमित्तामुळें होणारा 'टाप्' प्रत्यय त्याच्या मानानें बहिरङ्ग आहे. म्हणून जरी अन्तरङ्गशास्त्राची प्रथम प्रवृत्ति झाली पाहिजे तरी, 'ङ्याप्प्रातिपदिकात्' या प्रकृत सूत्रांतील 'आप्' ग्रहणसामर्थ्यामुळें, 'आर्य' या अदन्त शब्दाहून 'टाप्=आ' प्रत्यय प्रथम होऊन 'आर्या' असें रूप झाल्यावर त्याहून नंतर 'कन्' प्रत्यय होतो व 'केऽणः' सू. ८३४ या सूत्रानें 'आर्या'

यांतील अन्त्य आकाराचा ऱ्हस्व होऊन 'आर्यक' असें रूप झालें असतां, या तद्धितान्त प्रातिपदिकाहून पुन्हा 'टाप्' प्रत्यय होऊन 'उदिचामातः स्थाने' या सूत्रानें, 'केऽणः' या सूत्रानें ज्या आकाराचे जागीं अकार झाला आहे त्या अकाराचें, विकल्पें करून इत्व होऊन 'आर्यका' व 'आर्यिका' अशीं पाक्षिक रूपें सिद्ध होतात.

मनोरमाः—स्यादेतत् । एवं सति बहुगोमत्केति न सिद्ध्येत्, कपः प्रागुगिल्लक्षणङीप्प्रसङ्गादिति चेन्मैवम् । अकृत एव समासे ऽलौकिकप्रक्रियावाक्ये एव उत्तरपदस्यावयवीभूय समासान्तः प्रवर्तते इति वक्ष्यमाणत्वात् । स च विभक्तेः पुरस्तादित्येके । परस्तादिति पक्षे तु तध्दितान्तत्वात् सुब्लुकि, पुनः सुपि चाकृते समास इति सिद्धान्तः । तस्मादन्तरङ्गादपि तद्धितात्प्राङ् ङ्यापोः प्रवृत्त्यर्थं ङ्याब्ग्रहणमिति स्थितम् ।

पण 'ङीप्, आप्' हे स्त्रीप्रत्यय तद्धितप्रत्यय होण्यापूर्वी होतात असें मानल्यास 'बहुगोमत्का' या स्थलीं समासान्त 'कप्' प्रत्यय होण्यापूर्वी 'उगितश्च' सू. ४५५ या सूत्रानें पावलेला 'ङीप्' प्रत्यय प्रथम होण्याची आपत्ति येईल व त्यामुळें 'बहुगोमत्क' असें इष्टरूप सिद्ध होऊं शकणार नाहीं असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण समास होण्यापूर्वीच, म्हणजे सामासिक शब्दस्वरूप तयार होण्यापूर्वीच, जें अलौकिक प्रक्रियावाक्य तयार केलें जात असतें तशा वाक्यांतच उत्तरपदाचा अवयव होऊन समासान्त प्रत्यय प्रवृत्त होत असतो, म्हणजे उत्तरपदाच्या पुढें समासान्त प्रत्यय लागत असतो, असें पुढें सांगण्यांत येईल. ('बहवः गोमन्तः यस्यां सा बहुगोमत्का नगरी' या स्थलीं 'बहु जस् गोमत् जस्' अशा स्थितींतच या अलौकिक प्रक्रियावाक्यांत, 'शेषाद्विभाषा' सू. ८९१ या सूत्रानें होणारा समासान्त 'कप्' प्रत्यय होतो व तो 'गोमत् जस्' या उत्तरपदापुढें होत असून त्याचा अवयव होतो व 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'जस्' या दोन्ही अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययांचा लुक् होऊन 'बहुगोमत्क' असें जें

सामासिक रूप तयार होतें तें अदन्त असल्यामुळें, त्याहून 'अजाद्य-तष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें स्त्रीत्वबोधक 'टाप्' प्रत्यय नंतर होतो. या विषयाचें अधिक विवेचन शब्दरत्नांत केले जाईल.) कित्येक वैयाकरणांचें असें म्हणणें आहे कीं, अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययाच्या मागें समासान्त प्रत्यय होत असतो, म्हणजे 'बहु जस् गोमत् कप् जस्' अश तऱ्हेची मांडणी होते. अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययाच्या पुढें समासान्त प्रत्यय होत असतो, म्हणजे 'बहु जस् गोमत् जस् कप्' अशा प्रकारें 'कप्' प्रत्यय होतो, हा पक्ष स्वीकारल्यास, हा कप्प्रत्ययान्त समुदाय तद्धितान्त होत असल्यामुळें (त्याला 'कृत्त-ध्दितसमासाश्च' या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होऊन 'सुपो धातु-प्रातिपदिकयो:' सू.६५० या सूत्रानें अन्तवर्ति) विभक्तिप्रत्ययांचा लुक् झाल्यावर पुन्हा त्याहून सुबुत्पत्ति होण्यापूर्वी समास होतो व हाच सिध्दान्त मानला आहे. (या पंक्तीचें विस्तृत विवरण शब्दरत्नांत केलें जाईल.) सारांश तद्धित प्रत्यय होणें हें कार्य अन्तरङ्ग असलें तरी, 'ङी' व 'आप्' या प्रत्ययांची प्रथम प्रवृत्ति करून नंतर तद्धित प्रत्यय करावा याकरितां प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' या पदाचें ग्रहण केलें आहे हें (वरील विवेचनावरून) सिद्ध होतें. (प्रकृत सूत्रावरील भाष्यांत—सू. ४-१-१ देखील 'ङ्याप्' या पदाच्या ग्रहणाचीं अनेक प्रयोजनें सांगून व त्यांचें प्रत्याख्यान करून अखेरीस भाष्यकार म्हणतात— 'तद्धितविधानार्थं तु ङ्याब्ग्रहणं कर्तव्यम्, ङ्याबन्तात्तद्धितोत्पत्तिर्यथा स्यात् ।')

मनोरमाः—यत्त्वाहुः-आब्ग्रहणं स्पष्टार्थमिति । तदनेन प्रत्युक्तम् । वस्तुतस्तु ङ्यापोर्ग्रहणं मास्तु । सुबन्तात्तद्धितोत्पत्तिरिति निष्कर्षः। सुपः प्रागेव च ङ्यापौ प्रवर्त्तेते, स्वार्थादिप्रयुक्तकार्याणां क्रमिकत्व-स्वीकारादित्यवधेयम् ।

प्रकाशकार म्हणतात कीं, प्रकृत सूत्रांत 'आप्' या पदाचें ग्रहण केवळ सूत्रार्थ स्पष्ट होण्याकरितां केलें आहे. पण हें त्यांचें

म्हणणें वरील विवेचनावरून चूक ठरतें. (प्रकाशकारांच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे कीं, 'ङ्याप्प्रातिपदिकात्' या अधिकारसूत्रांत 'प्रातिपदिक' या शब्दाचें ग्रहण केलें असल्यामुळें, त्या शब्दानेंच 'प्रातिपदिकग्रहणे लिङ्गविशिष्टस्यापि ग्रहणम्' या परिभाषेनें 'आप्' या स्त्रीप्रत्ययविशिष्ट शब्दस्वरूपाचें ग्रहण होत असून देखील पुन्हा प्रकृत सूत्रांत 'आप्' या पदाचें जें ग्रहण केलें आहे त्याचें कांहीं विशेष प्रयोजन नसून, आबन्त शब्द स्वरूपाचें देखील ग्रहण करतां येतें हा अर्थ स्पष्ट व्हावा एवढ्याचकरितां केलें आहे. 'लोहिनिका, लोहितिका' हीं पाक्षिक रूपें सिद्ध होणें हें जसें 'ङीप्' ग्रहणाचें विशेष फल सांगता येतें तसें 'आप्' ग्रहणाचें कोणतेंहि विशेष फल सांगतां येत नाहीं; कारण तद्धितोत्पत्ति केल्यानंतर देखील 'टाप्' प्रत्यय केला तरी रूपांत कांहीं फरक पडत नाहीं. परंतु दीक्षितांनीं वरील विवेचनांत हें सिद्ध केलें आहे कीं, तद्धितोत्पत्ति करण्यापूर्वी 'आप्' प्रत्यय न केल्यास 'आर्यका, आर्यिका' अशीं पाक्षिक इष्ट रूपें सिद्ध न होतां, 'आर्यका' एवढेंच रूप सिद्ध होईल. म्हणून 'आप्' ग्रहण केवळ स्पष्टार्थ केलें आहे हें प्रकाशकारांचें म्हणणें चूक ठरतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.) वास्तविक प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' या पदाचें ग्रहण न केलें तरी चालूं शकतें. सुबन्ताहून तद्धितोत्पत्ति होत असते असा सिद्धांत मानला आहे व सुबुत्पत्ति होण्यापूर्वींच 'ङी,' व 'आप्' हे स्त्रीप्रत्यय होतात; कारण ज्या क्रमानें अर्थबोध होत असतो त्या क्रमानेंच तो तो बोध करून देणारीं कार्यें होत असतात असें मानलें आहे हें लक्षांत ठेवावें. (प्रकृत सूत्रावरील भाष्याच्या कैयटवृत्तींत 'स्वार्थमभिधाय शब्दो निरपेक्षो द्रव्यमाहसमवेतम् । समवेतस्य वचने लिङ्गं सङ्ख्यां विभक्तिं च ।। अभिधाय तान् विशेषानपेक्षमाणश्च कृत्स्नमात्मानम् । प्रियकुत्सनादिषु ततः प्रवर्ततेऽसौ विभक्त्यन्तः ।।' ही कारिका दिली आहे व या कारिकेवरून हें स्पष्ट होतें कीं, जाति, व्यक्ति, लिङ्ग,

संख्या व कारक या क्रमानें शब्दाहून अर्थाचा बोध होतो. म्हणून संख्येचा किंवा कारकाचा बोध करून देणारा 'सुप्' प्रत्यय होण्यापूर्वींच लिङ्गबोधक प्रत्यय होतो. त्यामुळें 'ङी, आप्' हे स्त्रीत्वबोधक प्रत्यय केल्यानंतरच सुबुत्पत्ति होऊं शकते आणि त्यानंतर तद्धितोत्पत्ति होत असल्यामुळें, तद्धित प्रत्यय होण्यापूर्वी 'ङी, आप्' हे स्त्रीत्व-बोधक प्रत्यय केले पाहिजेत हें आपोआपच सिद्ध होतें. म्हणून प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' या पदाचें ग्रहण न केलें तरी चालूं शकतें असें दीक्षितांच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे.)

शब्दरत्न– विशिष्टस्यापीत्यर्थ इति। प्रातिपदिकत्वतद्व्याप्य-धर्माणां लिङ्गप्रङ्गत्ययविशिष्टे अतिदेशादिति भावः। स्पष्टं चेदं "बहुव्रीहेरूधस" इत्यत्र भाष्ये। इयं च प्रातिपदिकसामा-न्यग्रहणे तद्विशेषग्रहणे च तद्ध्वनयन्नाह–अयस्कुम्भीति किं चेत्यादि च। उत्तरपदेष्विति। अत्र च ङ्यन्तमुत्तरपदमिति भावः। टिलोप इति। इदमुपलक्षणं पुंवत्त्वस्य, णिचश्च। सामान्यग्रहणेऽपि प्रवृत्तेरेवानया परिभाषया ङ्याब्ग्रहणवैयर्थ्यं भाष्ये शङ्कितम्। न च दृष्टा माला, दृष्टा गौरीति समुदायस्यानुपसर्जनस्त्रीप्रत्यये तदादिनियमाभावात् ङ्याबन्तत्वेन ततः सुबुत्पत्यर्थं तदस्तु। लिङ्गवि-शिष्टपरिभाषया तु नात्र सिद्धिः। ङ्याब् रहितस्य दृष्टा माल इत्यादेः समुदायस्य प्रातिपदिकत्वाभावेन तदतिदेशाप्रवृत्तेः। एवं चाम् दृष्टा माला देवदत्तेत्यादावेकपदान्तरितत्वेनैकान्तरतापत्तिरिति वाच्यम्। एतद्भाष्यप्रामाण्येन, प्रातिपादिकसाहचर्येण च पृथगर्थोपस्थापकवि-भक्त्यन्तानवयवकङ्याबन्तस्यैव ग्रहणेनादोषात्। प्रत्येकमपि पदत्वसत्त्वेनैकान्तरत्वाभावाच्च। उत्तरसङ्ख्यायाः पूर्वसंख्याबाध-कत्वात्। नियमार्थं तु न। त्यूङन्ते दोषापत्तेः। कुत्साद्यर्थकस्वा-र्थिकानां "कुत्सिते" इति सूत्रस्थभाष्योक्तरीत्या ङ्याबन्तादुत्पत्तेः सिद्धत्वादत्यन्तस्वार्थीके फलमाह–तथाहीत्यादिना। स्वार्थीकत्वेनअत्यन्त स्वास्थिकत्वेन। परश्चेत्यभ्युच्चय:। एवं च "लोहिता-ल्लिङ्गबाधनं वा" इति न वक्तव्यमिति भावः। विकल्प सिद्ध्यतीति।

अन्यथाऽऽर्यशब्दात्कनि समुदायोत्तरटापैव लिङ्गसम्बन्धबोधनसम्भवादेकाज्द्विर्वचनन्यायेन समुदायादेव टापि कनः पूर्वं टाबभावे अतः स्थानिकत्वाभावाद्विकल्पासिद्धिरिति भावः ।

'प्रातिपदिक' या शब्दानें लिङ्गबोधकप्रत्ययविशिष्ट शब्दाचें ग्रहण होतें असें जें 'प्रातिपदिकग्रहणे लिङ्गविशिष्टस्यापि ग्रहणम्' या परिभाषेंत सांगितलें आहे त्याचें कारण हें कीं, प्रातिपदिकाचे ठिकाणीं असणारा प्रातिपदिकत्व धर्म व तसेंच प्रातिपदिकत्वव्याप्य-धर्म, म्हणजे प्रातिपदिकाचेच ठिकाणीं असणारे इतर असाधारण धर्म, या सर्व धर्मांचा लिङ्गविशिष्ट त्या प्रातिपदिकाचें ठिकाणीं अतिदेश होतो. 'बहुव्रीहेरूधसो ङीष्' सू. ४-१-२५ या सूत्रावरील भाष्यावरून हें स्पष्ट होतें. (त्या भाष्यांत अशी शंका केली आहे कीं, 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें बहुव्रीहिसमास प्रातिपदिकसंज्ञक ठरत असल्यामुळें व प्रातिपदिकत्व हा सामान्य धर्म असून बहुव्रीहित्व हा त्याचा व्याप्य धर्म असल्यामुळें, 'कुण्डोधस्' या पुल्लिङ्ग बहुव्रीहि-समासाचे ठिकाणीं असणारा प्रातिपदिकत्वव्याप्य बहुव्रीहित्व हा धर्म 'कुण्डोध्नी' या स्त्रीत्वबोधक ङीष् प्रत्ययविशिष्ट शब्दाचे ठिकाणीं अतिदेशानें आरोपित करतां येतो व हा स्त्रीप्रत्ययविशिष्ट शब्द नद्यन्त असल्यामुळें त्याहून 'नद्यृतश्च' सू. ८३३ या सूत्रानें होणारा 'कप्' प्रत्यय कां होऊं नये. या शंकेचें समाधान 'नद्यन्तानां यो बहुव्रीहिरि-त्येवं सः, न चैष नद्यन्तानां बहुव्रीहिः,' म्हणजे 'कुण्डोध्नी' या स्थलीं बहुव्रीहिसमासाचा अन्त्यावयव नदीसंज्ञक शब्द नसून असन्त 'ऊधस्' शब्द असल्यामुळें, या स्थलीं या सूत्रानें होणारा 'कप्' प्रत्यय होत नाहीं. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, प्रातिपदिकाचे ठिकाणीं असणारा प्रातिपदिकत्व धर्म व त्याचप्रमाणें प्रातिपदिकत्वव्याप्य धर्म हे स्त्रीप्रत्यविशिष्ट त्या प्रातिपादिकाचे ठिकाणीं 'प्रातिपदिकग्रहणे' या परिभाषान्वयें अतिदिष्ट—आरोपित—करतां येतात. या विषयाचें विस्तृत विवेचन परिभाषेन्दुशेखराच्या मराठी भाषांतरांत पान ३५८—६० मध्यें केलें आहे व तें वाचल्यास शब्दरत्नांतील ही पंक्ति

नीट ध्यानांत येईल.) जेथें सूत्रांत 'प्रातिपदिक' या सामान्य शब्दाचें किंवा प्रातिपदिकविशेषाचें ग्रहण केलें आहे तशा दोन्ही ठिकाणीं 'प्रातिपदिकग्रहणे'–परि. ७२–ही परिभाषा लागू पडते हें ध्वनित करण्याकरितां मनोरमेंत 'अयस्कुम्भी, कुमारीमाचष्टे कुमारयति' इत्यादि उदाहरणें दिलीं आहेत. ('ङ्यापप्रातिपदिकात्,' 'प्रातिपदिकाद्धात्वर्थे बहुलमिष्ठवच्च,' 'सर्वप्रातिपदिकेभ्यः क्विब्वा वक्तव्यः' इत्यादि सूत्रांत व वार्तिकांत 'प्रातिपदिक' या सामान्य शब्दाचें ग्रहण केलें आहे. 'अतःकृकमि' सू. १६० इत्यादि सूत्रांत प्रातिपादिकविशेषांचें ग्रहण केलें आहे. या दोन्ही स्थलीं वरील परिभाषा सारखीच लागू पडते व त्या परिभाषान्वयें प्रातिपादिकानें लिङ्गविशिष्ट प्रातिपादिकाचें ग्रहण होतें. हें मनोरमेच्या विवेचनावरून स्पष्ट होतें. म्हणून या पंक्तीचें अधिक विवरण करण्याची गरज नाहीं.) 'तद्धि कंसादिषूत्तरपदेषु विधीयते' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'अयस्कुम्भी' या उदाहरणांत (सूत्रनिर्दिष्ट 'कुम्भ' हें उत्तर पद नसून) ङीबन्त 'कुम्भी' हें उत्तर पद आहे. (अतःकृकमि' सू. १६० या सूत्रानें 'कुम्भ ' इत्यादि शब्द समासांत उत्तर पद असतां अव्यय नसणाऱ्या पूर्व पदाच्या अन्त्य अकारापुढील विसर्गाचें सत्व होणें सांगितलें आहे. पण 'अयस्कुम्भी' या उदाहरणांत 'कुम्भ' हें उत्तर पद नसून ङ्यन्त 'कुम्भी' हें उत्तर पद आहे. तरीं पण 'प्रातिपदिकग्रहणे' ही परिभाषा असल्यामुळें, त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या प्रातिपदिकांनीं स्त्रीत्वबोधकप्रत्ययविशिष्ट त्या प्रातिपदिपदिकांचें देखील ग्रहण होतें आणि त्यामुळें समासांत 'कुम्भी' हें उत्तर पद असून देखील अनव्यय पूर्वपदांतील अकारापुढील अन्त्य विसर्गाचें सत्व होतें.) 'णाविष्ठवदिति टिलोपः' या मनोरमेंतील पंक्तींत 'टिलोपः' हें जें पद आहे तें पुंवद्भावाचे व 'णिच्'चें उपलक्षण आहे म्हणजे स्त्रीप्रत्ययविशिष्ट प्रातिपदिकाहून लिङ्गविशिष्टपरिभाषान्वयें 'णिच्' प्रत्यय होतो व तो केल्यावर पुंवद्भाव होतो (कारण 'प्रातिपदिकाद्धात्वर्थे बहुलमिष्ठवच्च' या गणसूत्राचा कौमुदींत

सांगितल्याप्रमाणें 'प्रातिपदिकात् धात्वर्थे णिच् स्यात्, इष्ठे यथा प्रातिपदिकस्य पुंवद्भावरभावटिलोपविन्मतुब्लोपयणादिलोपप्रस्थस्फाद्यादेशभसंज्ञाः तद्वद् णावपि स्युः' असा अर्थ आहे, म्हणजे प्रातिपदिकाहून 'णिच्' प्रत्यय केला असतां, 'इष्ठ'प्रत्यय पुढें असतांना जीं कार्यें पावतात तीं सर्व कार्यें होतात असा त्या गणसूत्राचा अर्थ आहे. त्यामुळें इष्ठवद्भावानें जसें टिलोपाचें ग्रहण होतें तसेंच पुंवद्भाव इत्यादि वर सांगितलेल्या इतर कार्यांचे देखील ग्रहण होतें.) जेथें सूत्रांत 'प्रातिपदिक' या सामान्य शब्दाचें ग्रहण केलें असेल तेथें देखील 'प्रातिपदिकग्रहणे' ही परिभाषा प्रवृत्त होत असल्यामुळेंच, प्रकृत सूत्रांतील 'ङ्याप्' या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरतें अशी शंका या सूत्रावरील भाष्यांत उपस्थित केली आहे. ('कुमारःश्रमणादिभिः' सू. ७५२ हें जें सूत्र लिङ्गविशिष्ट परिभाषेचें ज्ञापक मानलें आहे त्यांत प्रातिपदिकविशेषाचें ग्रहण केलें असल्यामुळें, जेथें सूत्रांत प्रातिपदिकविशेषाचें ग्रहण केलें असेल तशाच ठिकाणीं ती परिभाषा उपस्थित होऊं शकते असा गैरसमज न व्हावा याकरितां ही पंक्ति लिहिली आहे. प्रकृत सूत्रांत 'प्रातिपदिक' या सामान्य शब्दाचें ग्रहण केलें असून देखील या सूत्रांतील 'ङ्याप्' ग्रहण, वरील परिभाषा असल्यामुळें, व्यर्थ ठरतें अशी प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं जी शंका उपस्थित केली आहे तीवरूनच हें स्पष्ट होतें कीं, जेथें सूत्रांत 'प्रातिपदिक' या सामान्य शब्दाचें ग्रहण केलें आहे तशा ठिकाणीं देखील ती परिभाषा उपस्थित होते. तसें न मानल्यास, ती शंका अनुपपन्न ठरण्याची आपत्ति येते. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत 'ङ्याब्ग्रहणमनर्थकम् प्रातिपदिकग्रहणे लिङ्गविशिष्टस्यापि ग्रहणात्' हें वार्तिक पठित करून भाष्यकारांनीं प्रकृत सूत्रांतील 'ङ्याप्' या पदाचें ग्रहण व्यर्थ ठरतें असें म्हटलें आहे. भाष्यकार म्हणतात–'ङ्याब्ग्रहणमनर्थकम् । किं कारणम् ? । प्रातिपदिकग्रहणे लिङ्गविशिष्टस्यापि ग्रहणात् । प्रातिपदिकग्रहणे लिङ्गविशिष्टस्यापि ग्रहणं भवतीत्येषा परिभाषा कर्तव्या । कःपुनरत्र

विशेषः, एषा वा परिभाषा क्रियेत ङ्याब्ग्रहणं वा ? । अवश्यमेषा परिभाषा कर्तव्या । बह्रन्येतस्याः परिभाषायाः प्रयोजनानि ।' प्रकृत सूत्रावरील कौमुदींत देखील दीक्षितांनीं 'प्रातिपदिकग्रहणे लिङ्ग-विशिष्टस्यापि ग्रहणमित्येव सिद्धे' या शब्दांनीं वरील भाष्याचाच अनुवाद केला आहे. सारांश 'प्रातिपदिकग्रहणे' या परिभाषेनेंच स्त्रीत्वबोधकप्रत्ययविशिष्ट प्रातिपदिकाचें ग्रहण होऊं शकत असल्या-मुळें, तसें ग्रहण व्हावें याकरितां प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' हें पद असण्याची कांहीं गरज नाहीं आणि म्हणून प्रकृत सूत्रांतून तें पद गाळलें तरी चालूं शकतें. यावर शंकाकार अशी शंका करतो कीं, तें पद प्रकृत सूत्रांत असणें इष्ट आहे; कारण तें पद प्रकृत सूत्रांत असल्यास इतर फलांची सिद्धि होते. तीं फलें कोणतीं हें शंकाकार पुढील पंक्तींत सांगतो.) 'दृष्टा माला, दृष्टा गौरी' या पदसमुदायांच्या अन्तीं असणाऱ्या 'माला, गौरी' या शब्दांमध्यें स्त्रीप्रत्यय प्रधान असल्यामुळें, म्हणजे वाक्याच्या अन्तीं असणारें हे स्त्रीप्रत्ययान्त शब्द प्रधान असल्यामुळें, येथें तदादिनियम लागू पडत नाहीं आणि म्हणून हे समुदाय ङ्याबन्त ठरत असल्यामुळें, या समुदायांहून सुबुत्पत्ति व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' या पदाचें ग्रहण कायम असूं द्यावें. 'प्रातिपदिकग्रहणे'—परि. ७२ या परिभाषेनें वरील दोन उदाहरणांत (सुबुत्पत्तिरूप) इष्टसिद्धि होऊं शकत नाहीं; कारण 'दृष्टा माल (दृष्टा गौर)' इत्यादि ङीप्-आप्प्रत्ययरहित समुदायांना प्रातिपदिकसंज्ञा होत नसल्यामुळें, तशा समुदायांचे ठिकाणीं 'प्रातिपदिकग्रहणे' या अतिदेशशास्त्राची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें 'आम् दृष्टा माला देवदत्त' इत्यादि वाक्यांत (वर सांगितल्याप्रमाणें 'दृष्टा माला' या समुदायाहून सुबुत्पत्ति केल्यानें तो पदद्वयसमुदाय एक अखंड पद होत असल्यामुळें व अशा रीतीनें 'आम्' व 'देवदत्त' हा आमन्त्रित शब्द या दोहोंमध्यें) एक पदाचेंच व्यवधान आहे असें मानतां येत असल्यामुळें, या स्थलीं 'आम एकान्तरमामन्त्रितमनन्तिके'

सू. ३९६२ या निघातनिषेधक शास्त्राची प्रवृत्ति होते (परंतु शब्द-रत्नकार म्हणतात कीं, ही वरील शंका बरोबर नाहीं; कारण) प्रकृत सूत्रांत 'प्रातिपदिक' या ज्या शब्दाचें ग्रहण केलें आहे त्या शब्दाच्या साहचर्यामुळें आणि तसेंच प्रकृत सूत्रावरील भाष्य प्रमाणभूत असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, 'ङ्याप्' या शब्दानें अशाच ङ्यन्त व आबन्त समुदायांचें ग्रहण होतें कीं, ज्यांचे अवयव स्वतंत्र रीतीनें भिन्न अर्थाचा बोध करणारे नसून विभक्त्यन्त देखील नाहींत, व असें मानलें असतां, कोणताहि दोष येत नाहीं. त्याचप्रमाणें ('आम् दृष्टा माला देवदत्त' या वाक्यांतील 'दृष्टा' व 'माला' हीं दोन्हीं) स्वतंत्र पदें असल्यामुळें, या स्थलीं 'आम एकान्तरम्' या निषेधक सूत्राची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं; कारण उत्तरसंख्या पूर्वसंख्येची बाधक असते. ('माल' या अदन्त प्रातिपदिकाहून 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें 'टाप् = आ' प्रत्यय केला असतां, 'माला' असें आबन्त रूप होतें. तसेंच 'गौर' या प्रातिपदिकाहून 'षिद्गौरादिभ्यश्च' सू. ४९८ या सूत्रानें 'ङीष्' प्रत्यय केला असतां, 'गौरी' असें ङ्यन्त रूप होतें. 'दृष्टा माला' या पदसमुदायाच्या अन्तीं 'माला' हा आबन्त शब्द असून, 'दृष्टा गौरी' या पदसमुदायाच्या अन्तीं 'गौरी' हा ङ्यन्त शब्द आहे आणि हे दोन्ही स्त्रीप्रत्ययान्त शब्द वाक्यांत प्रधान आहेत. म्हणून जरी 'माल' व 'गौर' या शब्दांहून स्त्रीप्रत्यय झाला असल्यामुळें प्रत्ययग्रहणपरिभाषान्वयें—प. २३—जरी ते शब्द तदादि-नियमानें स्त्रीप्रत्ययान्त ठरतात तरी, त्या परिभाषेची 'स्त्रीप्रत्यये चानुपसर्जने न' प. २६ ही परिभाषा निषेधक परिभाषा असल्यामुळें व वरील दोन समुदायांच्या अन्तीं स्त्रीप्रत्ययान्त शब्द प्रधान असल्यामुळें, या समुदायांना तदादिनियम लागू पडत नाहीं आणि म्हणून हे दोन्ही समुदाय स्त्रीप्रत्ययान्त ठरतात. अशा समुदा-यांहून सुबुत्पत्ति व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' या पदाचें ग्रहण केलें आहे व अशा रीतीनें तें ग्रहण चरितार्थ ठरतें. 'प्राति-

पदिकग्रहणे लिङ्गविशिष्टस्यापिग्रहणमित्येव सिद्धे' असें जें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत दीक्षितांनीं म्हटलें आहे तें या वरील दोन समुदायांना लागू पडत नाहीं; कारण 'प्रातिपदिकग्रहणे' या परिभाषान्वयें स्त्रीत्वबोधकप्रत्ययविशिष्ट शब्दाचे ठिकाणीं प्रातिपदिकत्वरूप धर्माचा अतिदेश करण्याकरितां स्त्रीप्रत्ययरहित त्या शब्दाचे ठिकाणीं प्रातिपदिकत्व धर्म असणें आवश्यक आहे; त्याचे अभावीं अतिदेश कसा होऊं शकणार ? 'दृष्टा माला, दृष्टा गौरी' या ङ्यावन्त समुदाच्या अन्तीं असणाऱ्या 'माला, गौरी' यांचे 'ङी, आप्' हे स्त्रीप्रत्यय नाहीसे केले तर 'दृष्टा माल, दृष्टा गौर' असें त्या समुदायांचें स्वरूप होईल. हे पदसमुदाय अनर्थक मानल्यास, यांना प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं; कारण 'अर्थवदधातुः' सू. १७८ या सूत्रांत 'अर्थवत्' या पदाचें ग्रहण केलें आहे. हे समुदाय अर्थवान् मानले तरी, या समुदायांतील पदें असमस्त असल्यामुळें, 'अर्थवत्समुदायस्य चेत् प्रातिपदिकसंज्ञा तर्हि समासस्यैव' या नियमान्वयें त्यांना प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं. सारांश 'दृष्टा माल, दृष्टा गौर' हे समुदाय प्रातिपदिकसंज्ञक ठरत नसल्यामुळें, 'दृष्टा माला, दृष्टा गौरी' या स्त्रीप्रत्ययान्त समुदायांचे ठिकाणीं 'प्रातिपदिकग्रहणे' या परिभान्वयें प्रातिपदिकत्व धर्म अतिदेशानें प्राप्त करून देतां येणें शक्य नाहीं. म्हणून जरी हे समुदाय प्रातिपदिकसंज्ञक ठरत नाहींत तरी यांहून देखील सुबुत्पत्ति व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' या पदाचें ग्रहण केलें आहे व त्या पदाच्या ग्रहणसामर्थ्यानें ङ्यन्त व आबन्त समुदायांहून देखील, ते प्रातिपदिकसंज्ञक नसले तरी, सुबुत्पत्ति करतां येते आणि अशा रीतीनें त्या पदाचें ग्रहण निष्प्रयोजनक ठरत नसून चरितार्थ ठरतें. दुसरें असें कीं, 'दृष्टा माला' या समुदायाहून एकवचनाचा औत्सर्गिक 'सु' प्रत्यय केला असतां, जरी 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ या सूत्रानें त्या प्रत्ययाचा लोप होतो तरी प्रत्ययलक्षणानें तो संपूर्ण समुदाय एक अखंड पद ठरतें आणि त्यामुळें 'आम् दृष्टा

माला देवदत्त’ या वाक्यांत ‘आम्’ व ‘देवदत्त’ हा आमन्त्रित-संबुद्धयन्त–शब्द या दोहोंमध्यें एकच पदाचें व्यवधान आहे असें मानतां येत असल्यामुळें, ‘आम एकान्तरम्’ सू. ३९६२ या निषेधक सूत्राची वरील वाक्यांत प्रवृत्ति करतां येते व त्यामुळें ‘देवदत्त’ हें पद अनुदात्त होत नाहीं आणि अशा रीतीनें हें एक ङ्याप्ग्रहणाचें विशेष फल सांगतां येतें असें शंकाकाराचें म्हणणें आहे हें खरें कीं, ‘दृष्टा माला, दृष्टा गौरी’ हे पदसमुदाय अर्थवान् असून समास नसल्यामुळें यांना समासग्रहणकृतनियमान्वयें स्वतंत्रपणें प्रातिपदिक-संज्ञा होऊं शकत नाहीं. पण यावर शंकाकार असें म्हणूं शकतो कीं, जरी हे समुदाय प्रातिपदिकसंज्ञक ठरत नाहींत तरी प्रकृत सूत्रानें जशी प्रातिपदिकाहून सुबुत्पत्ति करतां येते तशी ङ्याबन्त समुदाया-हून देखील सुबुत्पत्ति करतां येत असल्यामुळें, वरील दोन समुदायां-हून सुबुत्पत्ति होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. वास्तविक वरील दोन समुदाय जरी वाक्यें आहेत व ‘अर्थवतः समुदायस्य चेत् प्रातिपदिकसंज्ञा तर्हि समासस्यैव’ असा जरी नियम आहे तरी, ‘स्त्रीप्रत्यये चानुपसर्जने न’ ही परिभाषा असल्यामुळें, या परिभाषेच्या सामर्थ्यानें ‘अस्त्रीप्रत्ययान्तपदसमुदायस्य चेत् प्रातिपदिकसंज्ञा तर्हि समासस्यैव’ अशा रीतीनें त्या नियमांतून अस्त्रीप्रत्ययान्तसमुदाय वगळतां येतो व त्यामुळें वरील दोन समुदायांना स्वतंत्रपणें देखील प्रातिपदिकसंज्ञा होण्यांत कांहीं प्रत्यवाय येत नाहीं. समुदायाहून प्रत्यय झाला नसल्यामुळें, ‘अप्रत्ययः = अप्रत्ययान्तः’ हा पर्युदास देखील आड येत नाहीं. सारांश ते समुदाय प्रातिपदिकसंज्ञक ठरले किंवा न ठरले तरी प्रकृत सूत्रान्वयें त्यांहून सुबुत्पत्ति करतां येतेच. वरील समुदायांतील प्रत्येक शब्दाहून संख्याकारकबोधक ‘सुप्’ प्रत्ययाची उत्पत्ति पूर्वींच झाली आहे व त्यामुळें पुन्हा सुबुत्पत्ति करतां येत नाहीं असें कोणी म्हटल्यास, त्यावर शंकाकार असें उत्तर देऊं शकतो कीं, पूर्वीं जी सुबुत्पत्ति झाली आहे ती समुदायांतील अवयवांहून झाली आहे, समुदायाहून झाली नाहीं आणि म्हणून

संपूर्ण समुदायाहून सुबुत्पत्ति करण्यांत कोणताहि प्रत्यवाय येत नाहीं. म्हणून वर दिलेल्या सर्व कारणांमुळें प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' या पदाचें ग्रहण कायम ठेवणें इष्ट आहे असा शंकाकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, दृष्टा माला, दृष्टा गौरी' इत्यादि ङ्याबन्त पदसमुदायांहून सुबुत्पत्ति होणें इष्ट असतें तर प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं तसें. अवश्य म्हटलें असतें व ङ्याब्ग्रहणाची तशा रीतीनें सार्थकता दाखविली असती. पण त्यांनीं तसें न म्हणतां उलट 'ङ्याप्ग्रहणमनर्थकम्' असें स्पष्ट म्हटलें आहे. म्हणून शंकाकारानें केलेली शंका भाष्यविरुद्ध ठरत असल्यामुळें ती अयोग्य ठरते. दुसरें असें कीं, प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' या पदाबरोबर 'प्रातिपदिक' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें त्या पदाच्या साहचर्याच्या सामर्थ्यानें हें सिद्ध होतें कीं, अर्थवान् पदसमुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होण्याबद्दल जो नियम सांगितला आहे तशाच प्रकारचा नियम ङ्याबन्त अर्थवान् पदसमुदायाहून सुबुत्पत्ति करते-वेळीं देखील मानणें इष्ट व आवश्यक आहे, आणि तशा प्रकारचा नियम सिद्ध होण्याकरितां प्रकृत सूत्रांतील 'ङ्याप्' या पदाचा 'पृथगर्थोपस्थापकविभक्तचन्तानवयवकङ्याबन्तस्यैव' असा नियामक अर्थ मानला पाहिजे. शब्दरत्नांतील या सामासिक पदाचा 'पृथगर्थो-पस्थापकाः विभक्त्यन्ताः न अवयवाः यस्य ङ्याबन्तसमुदायस्य' असा विग्रह आहे व ज्या ङ्याबन्त समुदायांतील अवयव स्वतंत्र रीतीनें आपापल्या अर्थाचा बोध करीत नाहींत व विभक्तिप्रत्ययान्त नाहींत अशा ङ्याबन्त समुदायाहूनच सुबुत्पत्ति होऊं शकते असा त्या पदाचा अर्थ आहे. 'दृष्टा माला, दृष्टा गौरी' या दोन्ही समुदायांतील अवयव आपापल्या अर्थाचा स्वतंत्रपणें बोध करितात व ते विभक्तिप्रत्ययान्त आहेत; कारण या स्थलीं त्या पदांचा समास झाला नसल्यामुळें तीं पदें एकार्थीभावापन्न व विशिष्टार्थबोधक झालीं नाहींत. म्हणून अशा ङ्याबन्त समुदायाहून

सुबुत्पत्ति होऊं शकत नाहीं. त्यामुळें 'आम् दृष्टा माला देवदत्त' या वाक्यांतील 'दृष्टा माला' हीं आपापल्या अर्थाचा स्वतंत्रपणें बोध करणारीं दोन विभक्त्यन्त पदें एक अखंड पद आहे असें मानतां येत नाहीं आणि म्हणून या वाक्याचे ठिकाणीं 'आम एकान्तरम्' हें निषेधक सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं. 'दोन' या अधिक संख्येमध्यें 'एक' ही कमी संख्या अन्तर्भूत असल्यामुळें व जेथें दोन पदांचें व्यवधान आहे तेथें एक पदाचें देखील व्यवधान आहेच असें मानतां येऊं शकत असल्यामुळें, 'आम एकान्तरम्' हें सूत्र वरील वाक्यांत कां प्रवृत्त होऊं नये अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेवर शब्दरत्नकारांनीं 'उत्तरसङ्ख्यायाः पूर्वसङ्ख्याबाधकत्वात्' असें उत्तर दिलें आहे व त्यांच्या या म्हणण्याला 'छादेर्घे' सू. ६–४–९६ या सूत्रावरील भाष्य प्रमाण आहे. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'यत्र त्रिप्रभृतयः सन्ति द्वावपि तत्र स्तः, तत्राऽव्युपसर्गस्येत्येव सिद्धम् । न वा एष लोके सम्प्रत्ययः । न हि द्विपुत्र आनीयतामित्युक्ते त्रिपुत्र आनीयते ।' या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, उत्तरसंख्या 'दोन' ही 'एक' या पूर्वसंख्येची बाधक ठरते. म्हणून जेथें दोन पदांचें व्यवधान आहे तेथें एक पदाचेंहि व्यवधान आहे असें मानतां येत नसल्यामुळें, वरील वाक्याचे ठिकाणीं 'आम एकान्तरम्' हा निषेध प्रवृत्त होऊं शकत नाहीं.) प्रकृत सूत्रांतील 'ङ्याप्' या पदाचें ग्रहण नियमार्थ आहे, म्हणजे 'स्त्रीप्रत्ययान्ताच्चेत् प्रत्ययोत्पत्तिर्भवति तर्हि ङ्याबन्तादेव' असा नियम घालून देण्याकरितां तें ग्रहण केलें आहे, असें मानतां येत नाहीं; कारण तसा नियम मानल्यास, स्त्रीत्वबोधक 'ति' व 'ऊङ्' या स्त्रीप्रत्ययान्त शब्दांहून प्रत्ययोत्पत्ति न होण्याची आपत्ति येते (व त्यामुळें 'युवतीः' असें सुबन्त रूप किंवा 'यौवतम्' असें तद्धित 'अञ्' प्रत्ययान्त रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं आणि 'युवतीः पश्य' इत्यादि भाष्यांतील प्रयोग चूक ठरण्याची आपत्ति येईल. 'यूनस्तिः' सू. ५३१ या सूत्रानें 'युवन्' या प्रातिपदिकाहून स्त्रीत्वबोधक 'ति' प्रत्यय होणें

सांगितलें आहे व 'ऊङुतः' सू. ५२१ इत्यादि सूत्रानीं स्त्रीत्वबोधक 'ऊङ्' प्रत्यय होणें सांगितलें आहे. या ऊङ्प्रकरणांत पठित असलेल्या 'श्वशुरस्योकाराकारलोपश्च'–सू. ५२३ वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें 'श्वशुर' या प्रातिपदिकाचें 'श्वश्रूः' असें ऊङ्प्रत्ययान्त स्त्रीलिङ्गाचें रूप होतें. ङ्याप्ग्रहण नियमार्थ मानल्यास, 'श्वश्रूः' इत्यादि सुबन्त रूपें सिद्ध होऊं शकणार नाहींत व 'श्वशुरः श्वश्वा' सू. ९३७ हा पाणिनीय निर्देश व तसेंच 'युवतिका युवतीतरा' इत्यादि भाष्यांत दिलेलीं उदाहरणें अशुद्ध ठरण्याची आपत्ति येईल.) 'कुत्सिते' ५–३–७४ या सूत्रावरील भाष्यांत सांगितलेल्या रीतीनें 'कुत्सा' इत्यादि अर्थांचे द्योतक स्वार्थिक प्रत्यय ङ्याबन्ताहून होत असतात हें सिद्ध होत असल्यामुळें, जे अत्यन्त स्वार्थिक प्रत्यय आहेत, म्हणजे ज्या प्रत्ययांपासून कोणत्याहि अर्थाचा बोध होत नाहीं असे प्रत्यय देखील, ('ङीप्' व 'आप्' हे स्त्रीप्रत्यय लावल्यानंतरच व्हावे म्हणून प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' ग्रहण केलें आहे हें म्हणणें सिद्ध करण्याकरितां व तसे अत्यन्त स्वार्थिक प्रत्यय) नंतर न केल्यानें काय फल होतें हें कळावें याकरितां मनोरमेंत 'तथा हि··· इति कन् ङीपं बाधेत' ही पंक्ति लिहिली आहे. या पंक्तींतील 'स्वार्थीकत्वेन' या पदाचा 'अत्यन्तस्वार्थीकत्वेन' असा अर्थ आहे. या पंक्तींत 'परश्च' हा हेत्वाधिक्य दाखविण्याकरितां एक अधिक हेतु दिला आहे. ('कुत्सिते' या सूत्रावरील भाष्यांत 'स्वार्थमभिधाय शब्दो निरपेक्षो द्रव्यमाह समवेतम्। समवेतस्य च वचने लिङ्गं वचनं विभक्तिं च ॥ अविधाय तान्विशेषानपेक्षमाणश्च कृत्स्नमात्मानम्। प्रियकुत्सनादिषु पुनः प्रवर्ततेऽसौ विभक्त्यन्तः॥' या दोन कारिका पठित केल्या आहेत व या कारिकांवरूनच हें स्पष्ट होतें कीं, लिङ्गबोधक प्रत्यय केल्यानंतरच 'कुत्सा' इत्यादि अर्थांमध्यें होणारे स्वार्थिक तद्धित प्रत्यय करतां येतात. या स्वार्थिक प्रत्ययांत व अत्यन्त स्वार्थिक प्रत्ययांत हा फरक आहे कीं, प्रथम प्रकारच्या प्रत्ययांना अर्थ असतो, म्हणजे ते 'कुत्सा' इत्यादि अर्थांचे वाचक

असतात. पण दुसऱ्या प्रकारच्या प्रत्ययांना, म्हणजे अत्यन्त स्वार्थिक प्रत्ययांना, कोणताहि अर्थ नसतो. स्वार्थिक प्रत्यय जसे स्त्रीप्रत्यय केल्यानंतर होतात तसेंच अत्यन्त स्वार्थिक प्रत्यय देखील स्त्रीप्रत्यय केल्यानंतरच होतात तसें न मानल्यास, 'लोहितिका' व 'आर्यका' अशींच रूपें सिद्ध होतील व 'लोहिनिका, आर्यिका' हीं पाक्षिक इष्ट रूपें सिद्ध होऊं शकणार नाहींत असें दीक्षितांनीं मनोरमेंत, अत्यन्त स्वार्थिक प्रत्यय प्रथम करून नंतर स्त्रीप्रत्यय केल्यास होणारें, फल सांगितलें आहे व याचें विवरण पूर्वी मनोरमेंत केलेंच आहे. अत्यन्त स्वार्थिक प्रत्यय अन्तरङ्ग व परशास्त्रानें होणारा प्रत्यय असल्यामुळें त्याची प्रथम प्राप्ति होते असें जें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे त्यांत तें कार्य प्रथम प्राप्त होण्याबद्दल अन्तरङ्गत्व व परत्व हे दोन हेतु दिले आहेत. परंतु अन्तरङ्गत्व एवढाच प्रबलतर हेतु दिल्यानें काम भागत असतां, परत्व हा दुसरा अधिक हेतु देण्याची कांहीं गरज नव्हती; कारण 'परनित्यान्तरङ्गापवादाना-मुत्तरोत्तरं बलीय:' – परि. ३८ – या परिभाषान्वयें परशास्त्रापेक्षां अन्तरङ्गशास्त्र बलवत्तर असतें. दुसरें असें कीं, जेथें युगपत् प्राप्त होणारीं दोन शास्त्रें तुल्यबल असतात तशाच ठिकाणीं 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ हें सूत्र प्रवृत्त होऊं शकतें आणि तशाच ठिकाणीं परत्वरूप हेतु देणें योग्य ठरतें. पण जेथें युगपत् प्राप्त होणाऱ्या दोन शास्त्रांपैकीं एक शास्त्र अन्तरङ्ग व दुसरें बहिरङ्ग आहे तेथें 'असिद्धं बहिरङ्गमन्तरङ्गे' प. ५० या परिभाषान्वयें अन्तरङ्ग शास्त्राच्या दृष्टीनें बहिरङ्गशास्त्र असिद्ध असल्यामुळें, तीं दोन शास्त्रें तुल्यबल ठरत नाहींत व त्यामुळें तशा ठिकाणीं 'विप्रतिषेधे परंकार्यम्' हें सूत्र प्रवृत्त होत नाहीं, आणि म्हणून तशा स्थलीं 'परश्च' असा अधिक हेतु देणें अयोग्य ठरतें असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. प्रकृत सूत्रांत केलेल्या 'ङ्याप्' ग्रहणाच्या सामर्थ्यामुळें, अत्यन्त स्वार्थिक प्रत्यय होणें हें कार्य अन्तरङ्ग असून त्याच्या मानानें स्त्रीप्रत्यय होणें हें कार्य बहिरङ्ग आहे तरी,

बहिरङ्ग स्त्रीप्रत्यय प्रथम झाल्यानंतर तें अन्तरङ्गकार्य होतें हें मनोरमेंत सांगितलेंच आहे.) 'ङी, आप्' हे स्त्रीप्रत्यय तद्धित प्रत्यय लागण्यापूर्वीं होत असल्यामुळें, 'लोहिताल्लिङ्गबाधनं वा' हें वार्तिक पठित करण्याची कांहीं गरज नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. ('लोहितान्मणौ' ५. ४. ३० या सूत्रावरील भाष्यांत वरील वार्तिक पठित केलें आहे व या वार्तिकाचा अर्थ असा आहे कीं, 'लोहित' या शब्दाहून होणारा 'कन्' प्रत्यय विकल्पेंकरून स्त्रीप्रत्ययाचा बाध करितो, म्हणजे स्त्रीप्रत्यय होण्यापूर्वीं किंवा स्त्रीप्रत्यय केल्यानंतर तो 'कन्' प्रत्यय विकल्पेंकरून करतां येतो. हें वार्तिक नसलें तरी 'लोहितिका' हें रूप सिद्ध होऊं शकतेंच. पण 'लोहिनिका हें पाक्षिक इष्ट रूप सिद्ध होऊं शकत नसल्यामुळें, तें रूप देखील सिद्ध व्हावें याकरितां वरील वार्तिक पठित केलें आहे. परंतु 'ङ्याबन्तात्तद्धितोत्पत्तिर्यथा स्यात् ङ्याब्भ्यां प्राङ् मा भूत्' याकरितां प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' या पदाचें ग्रहण केलें आहे असें मानलें असतां, वरील वार्तिक पठित करण्याची कांहीं गरज राहत नाहीं व तें वार्तिक नसून देखील कौमुदींत सांगितलेल्या सिद्धान्तान्वयें 'लोहितिका, लोहिनिका' हीं दोन्ही रूपें सिद्ध होऊं शकतात हें मनोरमेंत सांगितलेंच आहे.) 'इत्वविकल्पः सिध्यति' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, तद्धितोत्पत्ति होण्यापूर्वीं 'ङी, आप्' हे स्त्रीप्रत्यय करावे हा नियम न मानल्यानें व 'आर्य' या शब्दाहून प्रथम 'कन्' प्रत्यय करून नंतर 'आर्यक' या समुदायाहून 'टाप्' प्रत्यय केल्यानेंच स्त्रीत्वाचा बोध होऊं शकत असल्यामुळें, एकाज्द्विर्वचनन्यायानें 'आर्यक' या समुदायाहूनच 'टाप्' प्रत्यय करावा लागेल व अशा स्थितींत 'कन्' प्रत्ययापूर्वीं 'टाप = आ' नसल्यामुळें, आकाराचे जागीं झालेला अकार मिळूं शकणार नाहीं व त्यामुळें इत्वविकल्प होऊं शकणार नाहीं. ('एकाचो द्वे प्रथमस्य सू. २१७५ या सूत्रानें धातूंतील प्रथम एकाचाचें द्विर्वचन होणें सांगितलें आहे.

'निज्' या धातूंत 'नि, इ, इज्, निज्' असे चार एकाच् आहेत हें पूर्वी सांगितलेंच आहे. या चार एकाच्पैकीं कोणत्या एकाच्चें द्वित्व करावें असा 'एकाचो द्वे प्रथमस्य' ६. १. १ या सूत्रावरील भाष्यांत प्रश्न उपस्थित करून त्या प्रश्नाचें उत्तर देतांना भाष्यकार असें म्हणतात कीं, 'निज्' हा एकाच् खेरीज करून बाकीच्या तीन एकाच्पैकीं कोणत्याहि एकाच्चें द्वित्व केलें तरी 'निज्' या एकाच् धातूंतील कांहीं असा भाग अवशिष्ट राहतो कीं ज्याचें द्वित्व होत नाहीं. त्यामुळें द्विर्वचनशास्त्राची जी अंशत: हानि होऊं पाहते ती न होतां त्या शास्त्राची पूर्णपणें–पूर्णांशांमध्यें–सार्थकता व्हावी याकरितां 'निज्' या समुदायरूप एकाचांतील 'नि, इ, इज्' या अवयवांचें द्विर्वचन न करितां 'निज्' या संपूर्ण एकाचाचें द्विर्वचन करणें योग्य आहे. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'तत्समुदायैकाचो द्विर्वचनं भविष्यति । कुत एतत् ? । शास्त्राहानेः । एवं हि शास्त्रमहीनं भवति । ननु च समुदायेकाचोऽपि द्विर्वचने क्रियमाणेऽवयवैकाचः शास्त्रं हीयते । न हीयते । किं कारणम् ? । अवयवात्मकत्वात्समुदायस्य । अवयवात्मकः समुदायः । अभ्यन्तरो हि समुदायेऽवयवः । तद्यथा, वृक्षः प्रचलन् सहावयवैः प्रचलति ।' हाच एकाज्द्विर्वचनन्याय होय. हा न्याय प्रकृत स्थलीं प्रवृत्त केल्यास, 'आर्य' या शब्दाहून प्रथम अत्यंत स्वार्थिक अन्तरङ्ग 'कन्' प्रत्यय करून नंतर 'आर्यक' या समुदायाहून 'टाप्' प्रत्यय करणें योग्य ठरतें; कारण तसें केल्यानें प्रत्ययसहित संपूर्ण शब्दाच्या स्त्रीत्वाचा बोधक 'टाप्' प्रत्यय होऊं शकतो. 'कन्' प्रत्यय करण्यापूर्वी 'टाप्' केल्यास, तो कन्प्रत्ययविशिष्ट 'आर्य' शब्दाच्या स्त्रीत्वाचा बोधक होणार नाहीं. म्हणून अन्तरङ्गत्वामुळें व तसेंच एकाज्द्विर्वचनन्यायान्वयें 'कन्'प्रत्यय प्रथम करून नंतर 'टाप्' प्रत्यय करणें हें योग्य ठरतें तरी, तो प्रत्यय प्रथम केल्यास, 'आर्यका' एवढेंच रूप सिद्ध होऊं शकतें व 'आर्यिका' हें पाक्षिक इष्ट रूप होऊं शकत नाहीं; कारण 'उदीचामातःस्थाने' सू.४६५ या सूत्रानें आकाराचे जागीं

झालेल्यां अकाराचेंच विकल्पेंकरून इत्व होऊं शकतें. 'आर्य+कन्+टाप्=आर्यका' यांतील यकारापुढें असलेला अकार हा आकाराचे जागीं झालेला नसून मूळचाच अकार असल्यामुळें, त्याचें वरील सूत्रानें इत्व होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'आर्यिका' असें रूप सिद्ध होऊं शकत नाहीं. तसें पाक्षिक इष्ट रूप सिद्ध होण्याकरितां 'ङ्याबन्तात्तद्धितोत्पत्तिः' असा जो प्रकृत सूत्रावरील कौमुदींत नियम सांगितला आहे तो नियम मानणें आवश्यक आहे व तो नियम मानला असतां, 'आर्य' शब्दाहून प्रथम 'टाप्' व नंतर 'कन्' हा तद्धित प्रत्यय केल्यावर 'आर्या+कन्' अशी स्थिति झाली असतां, 'केऽणः' सू.८३४ या सूत्रानें 'आर्या' यांतील अन्त्य आकाराचा अकार होतो व अशा रीतीनें आकारस्थानिक अकार उपलब्ध होत असल्यामुळें, त्या अकाराचें 'उदीचामातः स्थाने' या सूत्रानें वैकल्पिक इत्व होऊन 'आर्यका, आर्यिका' हीं दोन्ही इष्ट रूपें सिद्ध होतात.)

शब्दरत्न— ङीप्प्रसङ्गादिति । अन्यपदार्थस्य स्त्रीत्वादिति भावः । अकृत एवेति । इदं "गोस्त्रियोः" इति सूत्रे भाष्ये स्पष्टम् । समासान्ता इत्यत्र "तादर्थ्यात्ताच्छब्द्यम्" इति हि तत्र भाष्यम् । अलौकिके प्रक्रियावाक्ये एवेत्यस्य प्रवर्त्तत इत्यनेनान्वयः । क्व प्रवर्त्तते तत्राह–उत्तरपदस्येति । अनन्तरमिति शेषः । अवयवीभूयेत्यस्य प्रक्रियावाक्यस्येत्यादिः । एतत्स्वरूपकथनम् । अवयवत्वे प्रमाणमाह–समासान्त इति । तच्छब्दवाच्यत्वादिति भावः । समासस्यैवायमन्तावयव इति । "अन्तः" इति सूत्रे भाष्ये स्पष्टम् । इत्येके इति । अत्रारुचिबीजं तु समासार्थवाक्यस्य अन्तः इति "गोस्त्रियोः" इति सूत्रस्थभाष्यस्य वाच्यार्थविरोधः । न हि सुब्रहितं समासार्थं किन्तु तद्विशिष्टमेव । किं च ततः पूर्वं कपि ततः समाससंज्ञायां सुब्लुकि टापि बहुचर्मिकेत्यादावापः सुपः परत्वादित्वानापत्तिः । तत्रविभक्त्यन्तेऽन्यपदार्थबोधकत्वारोपेण स्त्रीत्वस्य तदन्तेऽसत्त्वात्सुब्लुकः पूर्वं कबन्ताट्टाबिति वक्तुमशक्यमिति ।

'कपः प्रागुगिल्लक्षणङीप्प्रसङ्गात्' असें जें मनोरमेंतील शंकाग्रन्थांत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('बह्वो गोमन्तो यस्यां सा बहुगोमत्का नगरी' या अन्यपदार्थ-प्रधान बहुव्रीहिसमासांत 'नगरी' हा) स्त्रीवाचक शब्द अन्यपदार्थ आहे. (त्यामुळें 'बहुगोमत्' या शब्दाहून 'उगितश्च' सू. ४५५ या सूत्रानें 'ङीप्' प्रत्यय प्रथम केल्यावर नंतर समासान्त 'कप्' प्रत्यय केल्यानें, 'बहुगोमत्का' असें इष्ट रूप सिद्ध न होतां, 'बहुगोमतीका' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. म्हणून 'ङ्याबन्तात्तद्धि-तोत्पत्तिः' हा कौमुदींत दिलेला नियम स्वीकारल्यास वर दर्श-विलेली आपत्ति येत असल्यामुळें, तो नियम स्वीकारार्ह नाहीं असा शंकाकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'अकृते एव समासेऽलौकिकप्रक्रियावाक्ये एव उत्तरपदस्यावयवीभूय समासान्तः प्रवर्तते' असें जें दीक्षितांनीं वरील शंकेवर मनोरमेंत उत्तर दिलें आहे तें 'गोस्त्रियोरुपसर्जनस्य' सू. १–२–४८ या सूत्रावरील भाष्यांत स्पष्ट-पणें सांगितलें आहे. त्या भाष्यांत 'समासान्तः' या स्थलीं 'तादर्थ्या-त्ताच्छब्द्यम्', म्हणजे 'समासान्तः' या पदांतील 'समास' हा शब्द 'समासाकरितां कल्पिलेलें अलौकिक प्रक्रियावाक्य' या अर्थामध्यें घातला आहे, असें म्हटलें आहे. (त्या भाष्यांत भाष्यकारांनीं असा प्रश्न केला आहे कीं, 'बहुकुमारीकः, बहुवृषलीकः' इत्यादि उदाहरणांत 'गोस्त्रियोरुपसर्जनस्य' सू. ६५६ या सूत्रानें प्रथम ऱ्हस्वकार्य करावें कीं 'नद्यृतश्च' सू. ८३३ या सूत्रानें प्रथम समासान्त 'कप्' प्रत्यय करावा. 'कप्' प्रत्यय होण्याचें सूत्र परसूत्र असल्यामुळें, 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ या सूत्रान्वयें 'कप्' प्रत्ययाची प्रथम प्राप्ति होते. पण 'गोस्त्रियोः' या पूर्व सूत्रानें होणारें ऱ्हस्वकार्य, समासापेक्ष 'कप्' प्रत्ययरूप कार्याच्या मानानें, अन्तरङ्ग आहे. म्हणून तें अन्तरङ्ग ऱ्हस्वकार्य प्रथम झालें पाहिजे. पण पुढें भाष्यकार म्हणतात कीं, समासान्त 'कप्' प्रत्यय करणें हें कार्य अन्तरङ्गतर

आहे, म्हणजे ऱ्हस्वकार्यापेक्षां देखील तें कार्य अधिक अन्तरङ्ग आहे. यावर अशी शंका करण्यांत येते कीं, समासान्त 'कप्' प्रत्यय होणें सांगितलें असल्यामुळें, समास केल्यानंतरच 'कप्' प्रत्ययाची प्राप्ति होऊं शकते. म्हणून तो ऱ्हस्वकार्यापेक्षां अन्तरङ्ग कसा ठरूं शकणार ? या शंकेवर भाष्यकारांनीं 'ननु चायं कप् समासान्त इत्युच्यते' असा वरील शंकेचा अनुवाद करून, 'तादर्थ्यात्ताच्छब्द्यं भविष्यति । येषां पदानां समासो न तावत्तेषामन्यद्भवति कपं तावत् प्रतीक्षते ।' असें म्हटलें आहे. या भाष्याचा अर्थ हा आहे कीं, जरी 'कप्' हा प्रत्यय समासान्त होतो तरी, 'समासान्त' या पदांतील 'समास' हा शब्द 'समासाकरितां कल्पिलेलें अलौकिक प्रक्रियावाक्य' या अर्थामध्यें घातला आहे. म्हणून ज्या पदांचा समास करणें आहे त्या पदांना 'कप्' प्रत्यय होईपर्यंत दुसरें कांहीं एक कार्य करतां येत नाहीं. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, समासान्त 'कप्' प्रत्यय होण्यापूर्वीं स्त्रीप्रत्यय मुळींच करतां येत नाहीं व समासान्त 'कप्' प्रत्यय प्रथम केल्यावर अङ्ग उगित् न राहतां अदन्त होत असल्यामुळें, 'ङीप्' प्रत्ययाची प्राप्तीच होत नाहीं व 'टाप्' प्रत्यय होऊन 'बहुगोमत्का' असें इष्ट रूप सिद्ध होतें व 'बहुगोमतीका' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति टळते.) वर दिलेल्या मनोरमेच्या पंक्तींतील 'अलौकिकप्रक्रियावाक्ये एव' या पदांचा 'प्रवर्तते' या पदाशीं अन्वय होतो. समासान्त प्रत्यय कोठें प्रवृत्त होतो याचें उत्तर 'उत्तरपदस्य' या शब्दानें मनोरमेंत दिलें आहे व या पदापुढें 'अनन्तरम्' हें पद अध्याहृत आहे आणि 'अवयवीभूय' या पदापूर्वीं 'प्रक्रियावाक्यस्य' हें पद अध्याहृत आहे. (सारांश मनोरमेंतील वरील पंक्तींत वर सांगितलेलीं पदें अध्याहृत केल्यानें 'अलौकिक-प्रक्रियावाक्ये एव उत्तरपदस्यानन्तरं प्रक्रियावाक्यस्यावयवीभूय समासान्तः प्रवर्तते' असें त्या पंक्तींचें स्वरूप होतें.) 'अवयवीभूय' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें तो समासान्त प्रत्यय कोणत्या स्वरूपानें होतो याचें कथन होय व त्याला समासान्त ही संज्ञा दिली

असल्यामुळें (आणि 'अन्त' हा शब्द अवयववाचक असल्यामुळें) तो समासान्त प्रत्यय अवयवरूपानें होतो याला ती संज्ञा प्रमाण आहे असें दीक्षित म्हणतात; कारण समासान्त प्रत्यय समासाचा चरमावयव होतो हें त्या शब्दाच्या अर्थावरूनच सिद्ध होतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. (जर समासान्त प्रत्यय समासाचा चरमावयव न व्हावा असें विवक्षित असतें तर पाणिनीनें 'समासान्त' अशी संज्ञा उपयोगांत न आणतां, त्या प्रत्ययाचें विधान करतेवेळीं 'समासात्' असा शब्द वापरला असता.) समासान्त प्रत्यय समास होण्याकरितां कल्पिलेल्या अलौकिक प्रक्रिया-वाक्याचाच अन्तावयव होतो हें 'अन्तः' सू. ६–२–१४३ या स्वरविधायक सूत्रावरील भाष्यांत स्पष्ट केलें आहे. (त्या भाष्यांत 'अन्तोदात्तत्वं समासस्येति चेत् कप्युपसंख्यानम्' हें वार्तिक पठित-करून भाष्यकार म्हणतात कीं, 'इदंप्रथमकाः' या उदाहरणांत मकारापुढील अकार समासाचा अन्तावयव ठरत नसून 'कप्' प्रत्यय हा समासाचा अन्तावयव ठरत असल्यामुळें, मकारापुढील अकार उदात्त होणें इष्ट असून देखील तो उदात्त होणार नाहीं आणि म्हणून वरील वार्तिक मानणें आवश्यक आहे. 'इदंप्रथमकाः' या उदाहरणांत मकारापुढील अकारापुढें 'कप्' प्रत्यय असल्यामुळें, तो अकार वरील वार्तिकान्वयें उदात्त होतो. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, समासान्त प्रत्यय समासाचाच, म्हणजे समासाकरितां कल्पिलेल्या अलौकिक प्रक्रियावाक्याचाच अन्तावयव होतो व उत्तरपदाचा अवयव होत नाहीं. या भाष्यावरील उद्योतांत 'समा-सान्ताः समासस्यैवान्तावयवा, न तूत्तरपदावयवा इति भावः। किंच समासान्तानां समासार्थेऽलौकिकप्रक्रियावाक्ये एव प्रवृत्तिः' असें स्पष्ट म्हटलें आहे.) 'स च विभक्तेः पुरस्तादित्येके' या मनोरमेंतील पंक्तींत 'इत्येके' असें जें अरुचिप्रदर्शक पद दीक्षितांनीं घातलें आहे त्याचें कारण हें कीं, 'गोस्त्रियोरुपसर्जनस्य' १. २. ४८ या सूत्रावरील भाष्यांत समासान्त प्रत्यय समासाकरितां कल्पिलेल्या

अलौकिक प्रक्रियावाक्याचा अन्तावयव होतो असें जें सांगितलें आहे त्याविरुद्ध तो पक्ष आहे. (तें भाष्य पूर्वीं दिलेंच आहे व त्या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, समासान्त प्रत्यय समास होण्याकरितां कल्पिलेल्या अलौकिक प्रक्रियावाक्याचा अन्तावयव होत असतो. समासांतील उत्तर पदापुढील विभक्तिप्रत्ययापूर्वीं तो केल्यास, तो प्रक्रियावाक्याचा अन्तावयव होणार नाहीं हें उघड आहे.) 'सुप्' प्रत्ययरहित अलौकिकप्रक्रियावाक्य समास होण्यास उपयोगी पडणारें नसून 'सुप्' सहित अलौकिकप्रक्रियावाक्यच समास होण्यास उपयोगी पडणारें आहे. (कारण 'सुप्सुपा = सुबन्तं सुबन्तेन सह समस्यते' या वचनान्वयेंच हें स्पष्ट होतें कीं, दोन सुबन्त पदांचाच समास होऊं शकतो. म्हणून समासान्त प्रत्यय समासांतील सुप्प्रत्यय-सहित उत्तरपदानंतरच होऊं शकतो व त्या उत्तरपदापुढील विभक्तिप्रत्ययापूर्वीं होऊं शकत नाहीं.) दुसरें असें कीं, समासांतील उत्तरपदापुढील विभक्तिप्रत्ययापूर्वीं 'कप्' प्रत्यय होतो असें मानलें व समाससंज्ञा होऊन अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययांचा लुक् झाल्यावर 'टाप्' प्रत्यय होतो असें मानलें तर, 'बहुचर्मिका' इत्यादि उदाहरणांत 'टाप् = आ' हा प्रत्यय 'जस्' या विभक्तिप्रत्ययापुढें येईल व त्यामुळें ('प्रत्ययस्थात्कापूर्वस्य' सू. ४६३ या सूत्रानें होणारें) इत्व न होण्याची आपत्ति येईल. ('बहूनि चर्माणि यस्यां नगर्याम्' या अन्यपदार्थप्रधान बहुव्रीहिसमासाचें 'बहु जस् चर्मन् जस् कप्' असें अलौकिकप्रक्रियावाक्य न करितां, 'बहु जस् चर्मन् कप् जस्' असें अलौकिकप्रक्रियावाक्य केल्यास, म्हणजे समासान्त 'कप्' प्रत्यय समासांतील 'चर्मन्' या उत्तरपदापुढील 'जस्' या विभक्तिप्रत्ययापुढें न लावतां त्या प्रत्ययापूर्वीं लावल्यास, त्या समुदायाला समाससंज्ञा झाल्यावर 'कृत्तद्धितसमासाश्च' सू. १७९ या सूत्रानें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊन 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययांचा लुक् केल्यानें 'बहु चर्मन् कप्' अशी स्थिति झाली असतां, 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य'

सू. २३६ या सूत्रानें 'चर्मन्' या प्रातिपदिकसंज्ञक पदांतील अन्त्य-नकाराचा लोप झाल्यावर 'बहुचर्म' असें जें अदन्त सामासिक प्रातिपदिक होतें त्याहून 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें 'टाप्' प्रत्यय केला तर, तो 'टाप्' प्रत्यय लुक् झालेल्या 'जस्' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययानंतर आला आहे असें प्रत्ययलक्षणानें मानणें भाग पडेल व 'प्रत्ययस्थात्कात्पूर्वस्य' या सूत्रांत 'असुपः = स आप् सुपः परो न चेत्' असा प्रतिषेध असल्यामुळें, तें सूत्र या स्थलीं प्रवृत्त होणार नाहीं व प्रत्ययरूप ककारापूर्वी असलेल्या अकाराचें इत्व होणार नाहीं आणि त्यामुळें 'बहुचर्मिका' असें इष्ट रूप सिद्ध होणार नाहीं. वरील उदाहरणांत 'जस्' या अन्तर्वर्ति-विभक्तिप्रत्ययाचा लुक् झाला असल्यामुळें व 'न लुमताङ्गस्य' सू. २६३ हा निषेध असल्यामुळें, 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२हें सूत्र या उदाहरणांत प्रवृत्त होऊं शकत नाहीं व त्यामुळें लुक् झालेल्या 'जस्' या विभक्तिप्रत्ययापुढें 'टाप्' आहे असें मानतां येत नाहीं आणि म्हणून 'प्रत्ययस्थात्कात्पूर्वस्य' हें सूत्र या स्थलीं प्रवृत्त होऊं शकतें व 'बहुचर्मिका' असें इष्ट रूप सिद्ध होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं अशी कोणी शंका केल्यास, ती शंका बरोबर नाहीं; कारण 'न लुमताङ्गस्य' हा निषेध अशाच ठिकाणीं लागू पडतो कीं, जेथें लुक् झालेल्या प्रत्ययाच्या निमित्तामुळें त्या प्रत्ययाच्या अङ्गाला कांहीं कार्य करणें आहे. प्रकृत स्थलीं लुक् झालेल्या 'जस्' प्रत्ययाच्या निमित्ता-मुळें त्याच्या अङ्गाला कोणतेंहि कार्य करणें नसून 'कप्' प्रत्ययाचें 'बहुचर्म' हें जें अङ्ग आहे त्याला कप्पूर्वकटाप्प्रत्ययनिमित्तक इत्व-कार्य करणें आहे. म्हणून येथें 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' हें सूत्र प्रवृत्त होऊं शकतें व त्यामुळें 'जस्' या विभक्तिप्रत्ययापुढें 'टाप्' आहे असें प्रत्ययलक्षणानें मानावें लागत असल्यामुळें आणि 'प्रत्यय-स्थात्कात्' या सूत्रांत 'असुपः' हा निषेध असल्यामुळें, तें इत्व-विधायक सूत्र येथें प्रवृत्त होऊं शकत नाहीं व 'बहुचर्मिका' असें

इष्ट रूप सिद्ध होऊं शकत नाहीं. समासांतील 'चर्मन्' या उत्तरपदापुढील 'जस्' प्रत्ययापुढें 'कप्' प्रत्यय लावल्यासच, 'टाप्' प्रत्यय 'जस्' या सुप् प्रत्ययापुढें येत नसल्यामुळें, इत्व होऊन तसें इष्ट रूप सिद्ध होऊं शकतें. म्हणून 'स च विभक्तेः पुरस्तात' या पक्षासंबंधानें दीक्षितांनीं आपली अरुचि प्रदर्शित केली आहे व तो पक्ष स्वीकारार्ह नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'बहुचर्मिका' या उदाहरणांत विभक्त्यन्त समुदाय अन्यपदार्थाचा बोधक असल्यामुळें त्याचे ठिकाणीं स्त्रीत्वाचा आरोप केल्यानें त्याहून 'टाप्' हा स्त्रीत्वबोधक प्रत्यय करतां येतो. पण कबन्त समुदाय अन्यपदार्थाचा बोधक नसल्यामुळें व अशा रीतीनें त्याचे ठिकाणीं स्त्रीत्वाचा अभाव असल्यामुळें, 'जस्' प्रत्ययाचा लुक् होण्यापूर्वी कबन्त समुदायाहून 'टाप्' प्रत्यय करतां येतो हें म्हणणें शक्य नाहीं. ('स च विभक्तेः पुरस्तात्' हा पक्ष मानणाऱ्या वैयाकरणांच्या मतें 'बहुचर्मिका' याचें 'बहु जस् चर्मन कप् जस्' असें अलौकिकप्रक्रियावाक्य होतें हें वर सांगितलेंच आहे. या संपूर्ण समुदायाहून 'टाप्' प्रत्यय केला असतां, तो 'टाप्' प्रत्यय 'जस्' या विभक्तिप्रत्ययापुढें येत असल्यामुळें आणि म्हणून 'चर्म-' यांतील मकारापुढील अकाराचें, 'असुपः' या प्रतिषेधान्वयें, इत्व होऊं शकत नसल्यामुळें, ही आपत्ति टाळण्याकरितां ते वैयाकरण असें म्हणतात कीं, वरील अलौकिकप्रक्रियावाक्यांत 'कप्' प्रत्ययानंतर व 'जस्' प्रत्ययापूर्वी 'टाप्' प्रत्यय करावा. तसें केल्यानें 'टाप्' हा 'कप्' प्रत्ययानंतर येत असून 'जस्' या विभक्तिप्रत्ययानंतर येत नसल्यामुळें, 'असुपः' हा निषेध प्रवृत्त होत नाहीं व 'बहुचर्मिका' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकतें. यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'बहु जस् चर्मन् कप् जस्' हा संपूर्ण जस्प्रत्ययान्त समुदाय 'नगरी' या अन्य पदार्थाचा बोधक असल्यामुळें, तशा समुदायाचे ठिकाणींच स्त्रीत्वाचा आरोप करतां येतो व त्या संपूर्ण समुदायाहूनच 'जस्' प्रत्ययापुढें 'टाप्' प्रत्यय करतां येतो. 'बहु जस् चर्मन्

कप्' हा कप्प्रत्ययान्त समुदाय—भाग—'नगरी' या अन्यपदार्थाचा बोधक नसल्यामुळें, त्या समुदायाचे ठिकाणीं स्त्रीत्वाचा आरोप करतां येत नाहीं, आणि स्त्रीत्वबोधक समुदायाहूनच स्त्रीप्रत्यय करतां येत असल्यामुळें, कप्प्रत्ययान्त समुदायाहून 'टाप्' प्रत्यय करतां येऊं शकत नाहीं. जस्प्रत्ययान्त समुदायापुढें 'टाप्' प्रत्यय केल्यास, 'असुपः' हा निषेध प्रवृत्त होऊन इत्व न होण्याची आपत्ति कायम राहतेच. म्हणून प्रथमपक्षासंबंधानें दीक्षितांनीं जी अरुचि प्रदर्शित केली आहे ती योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

शब्दरत्न—परस्तादिति पक्षे त्विति। न च विशिष्टस्य सुबन्तत्वाभावेन सुबन्तात्तद्धित इति सिद्धान्तविरोधः, तेषामतिरिक्तार्थाभावेन परिपूर्णम्पदमिति न्यायाविषयतया तस्य सिद्धान्तस्य समासान्तविषयेऽभावात्। एवं च समासान्तेषु "ङ्याप्प्रातिपदिकात्" इत्यस्यासम्बन्ध एव, तस्यामवस्थायां वाक्यस्य प्रातिपदिकत्वाभावादिति भावः। तद्धितान्तत्वादिति। प्रातिपदिकत्वेनेति शेषः। पुनः सुपि चाकृते इति। प्रत्ययलक्षणेन सुबन्तत्वात्समाससंज्ञा। कपस्तद्वाक्यावयवत्वेन तद्ग्रहणेन तदन्तस्य ग्रहणम्। सुपि च कृते इति क्वाचित्कः पाठः प्रामादिकः। यद्यपि तत्र पाठे अलौकिकविग्रहवाक्येऽपि अन्यपदार्थान्तर्भावेण एकार्थीभावारोपात् स्त्रीत्वसत्त्वेन पूर्वं टापि ततः सुपि, आपः सुपः परत्वाभावाद् बहुचर्मिकेत्यत्रेत्वसिद्धिरस्ति, तथापि तदुत्पत्तिपर्यन्तं समाससंज्ञाया अप्रवृत्तौ मानाभावात्। न च सुबन्तत्वाभावः, अनेन सुपा समुदायस्य सुबन्तत्वेऽपि उत्तरपदमात्रस्य तत्त्वाभावात्। पूर्वपदस्य सुबन्ततायाः प्रत्ययलक्षणेनैवोपपाद्यत्वात्। एवं च पूर्वं तत्करणे फलाभावः, बहिर्भूतसंख्याकारकसापेक्षसुपस्तस्यामवस्थायां तदनभिव्यक्त्याऽप्रवृत्तेश्च। वस्तुतस्तु तद्धितान्तत्वनिमित्तप्रातिपदिकसंज्ञासमकालमेव विरोधाभावेन तत्पूर्वभागस्य समाससंज्ञेति बोध्यम्। यौगपद्यासम्भव एव शास्त्राणां क्रमप्रवृत्त्यङ्गीकारादिति दिक्॥

'परस्तादितिपक्षे तु', म्हणजे अलौकिक प्रक्रियावाक्यांतील संपूर्ण समुदायाहून 'जस्' या विभक्तिप्रत्ययापुढें समासान्त 'कप्' प्रत्यय करावा, असा जो मनोरमेंत सिद्धान्तपक्ष सांगितला आहे त्यावर अशी शंका करण्यांत येते कीं, 'विशिष्ट', म्हणजे 'बहु जस् चर्मन जस्' हें अलौकिक प्रक्रियावाक्य, सुबन्त नसल्यामुळें, (त्याहून 'कप्' हा समासान्त तद्धित प्रत्यय करणें हें) 'सुबन्तात्तद्धितोत्पत्तिः' या सिद्धान्ताविरुद्ध आहे. (पण शब्दरत्नकार म्हणतात कीं) ही शंका बरोबर नाहीं; कारण समासान्त प्रत्यय हे प्रकृतीच्या अर्थाव्यतिरिक्त इतर कोणत्याहि अधिक विशिष्ट अर्थाचे बोधक नसल्यामुळें, म्हणजेच त्यांचे ठिकाणीं स्वतंत्रार्थबोधकता नसून केवळ प्रकृत्यर्थबोधकता मानली असल्यामुळें, 'परिपूर्णं पदमर्थान्तरमाकाङ्क्षते' हा न्याय तशा अत्यन्त स्वार्थिक समासान्त प्रत्ययांना लागू पडत नाहीं आणि त्यामुळें 'सुबन्तात्तद्धितोत्पत्तिः' हा न्याय तशा समासान्त प्रत्ययांच्या विषयांत प्रवृत्त करतां येत नाहीं. ('बहु जस् चर्मन् जस्' या अलौकिक प्रक्रियावाक्यांत जो अखेरीस 'जस्' प्रत्यय दिसतो तो समासांतील चरमावयव जो 'चर्मन्' शब्द आहे त्याहून झालेला प्रत्यय असून समुदायाहून झालेला प्रत्यय नव्हे. म्हणून समुदाय सुबन्त नसल्यामुळें, त्याहून समासान्त तद्धित 'कप्' प्रत्यय करणें हें 'सुबन्तात्तद्धितोत्पत्तिः' या सिद्धान्ताविरुद्ध ठरतें. हा सिद्धान्त 'कुत्सिते' ५. ३. ७४ या सूत्रावरील भाष्यांत ज्या दोन कारिका पठित केल्या आहेत व ज्या या विवरणांत पूर्वी दिल्या आहेत त्यांवरून सिद्ध होतो. त्या कारिकांचा भावार्थ हा आहे कीं, कोणताहि शब्द प्रथम जातीचा व तत्समवेत असणाऱ्या व्यक्तीचा बोध करतो. त्यानंतर लिङ्ग, वचन व कारक यांचा त्याहून क्रमानें बोध होत असल्यामुळें, तत्तद्बोधक प्रत्यय त्याहून त्याच क्रमानें केले जातात व त्यानंतर तो परिपूर्ण अर्थाचा बोधक होतो आणि असें परिपूर्णार्थक सुबन्तपद तद्धित प्रत्ययाच्या अर्थामध्यें अन्वित होण्याकरितां योग्य होतें व तशा सुबन्त पदाहून

तद्धित प्रत्यय होत असतो. सारांश द्वितीय कारिकेंत 'अभिधाय तान्विशेषानपेक्षमाणश्च कृत्स्नमात्मानम् । प्रियकुत्सनादिषु पुनः प्रवर्ततेऽसौ विभक्त्यन्तः ॥' असें म्हटलें असल्यामुळें, त्यावरूनच 'परिपूर्णं पदमर्थान्तरमाकाङ्क्षते' व 'सुबन्तात्तद्धितोत्पत्तिः' हे सिद्धान्त निष्पन्न होतात. म्हणून शंकाकार म्हणतो कीं, वरील समुदाय सुबन्त नसल्यामुळें त्याहून समासान्त तद्धित 'कप्' प्रत्यय करतां येत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, वरील दोन सिद्धान्त अशाच ठिकाणीं लागू पडतात कीं, जेथें जो तद्धित प्रत्यय करणें आहे तो प्रकृतीहून भिन्न अशा विशिष्ट अर्थाचा बोधक आहे. परंतु समासान्त तद्धित प्रत्यय असे आहेत कीं, ते कोणत्याहि अर्थाचे बोधक नाहींत व 'प्रत्याययति अर्थबोधं करोति इति प्रत्ययः' अशी अन्वर्थक प्रत्ययसंज्ञा पाणिनीनें केली असल्यामुळें, ते वास्तविक अर्थरहित असून देखील प्रकृतीच्या अर्थाचा बोध करणारे आहेत असें मानलें आहे. म्हणून ज्या प्रकृतीहून अत्यन्त स्वार्थिक तद्धित प्रत्यय होतो त्या प्रकृतींत तशा अत्यन्त स्वार्थिक प्रत्ययाचा अर्थ पूर्वींच असल्यामुळें, त्या प्रकृतीला तशा अत्यन्त स्वार्थिक तद्धित प्रत्ययाच्या अर्थाची आकांक्षा राहत नाहीं व त्यामुळें तशा प्रकृतीहून विभक्तिप्रत्यय उत्पन्न होण्यापूर्वींच, म्हणजे प्रकृति सुबन्त होण्यापूर्वींच, अत्यन्त स्वार्थिक समासान्त तद्धित प्रत्यय होऊं शकतो व अशा ठिकाणीं वरील दोन्ही सिद्धान्त लागू पडत नाहींत.) म्हणून, म्हणजे समासान्त प्रत्ययांच्या विषयांत वरील दोन्ही सिद्धान्त लागू पडत नसल्यामुळें, समासान्तप्रत्यय-विधायक सूत्रांत 'ङ्याप्प्रातिपदिकात्' हें अधिकारसूत्र मुळींच संबद्ध–अनुवृत्त–होत नाहीं; कारण समासान्त प्रत्यय होतेवेळीं अलौकिक प्रक्रियावाक्याचे ठिकाणीं प्रातिपदिकसंज्ञेचा अभाव आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. ('बहु जस् गोमत् जस्' या अलौकिक प्रक्रियावाक्यांतच समुदायाहून समासान्त तद्धित 'कप्' प्रत्यय होतो. तो समासान्त प्रत्यय होण्यापूर्वीं त्या समुदायाला

समाससंज्ञा होत नाहीं व त्यामुळें त्याला 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें होणारी प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं. समुदायाहून समासान्त तद्धित प्रत्यय होईपर्यंत समुदाय हा केवळ अर्थवान् पदांचा समुदाय ठरतो व 'समास' ग्रहणकृतनियमान्वयें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं. समासान्त तद्धित प्रत्यय झाल्यावरच समुदाय समाससंज्ञक व तसेंच तद्धितान्त ठरतो आणि त्यामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होते. सारांश समासान्त प्रत्यय करतेवेळीं ज्या समुदायाहून तो प्रत्यय करणें आहे तो समुदाय प्रातिपदिकसंज्ञक ठरत नसल्यामुळें, समासान्तप्रत्ययविधायक सूत्रांचे ठिकाणीं 'ङ्याप्प्रातिपदिकात्' हें अधिकारसूत्र अनुवृत्त होऊं शकत नाहीं.) 'तद्धितान्तत्वात सुब्लुकि' या मनोरमेच्या पंक्तींतील 'तद्धितान्तत्वात्' या पदापुढें 'प्रातिपदिकत्वेन' हें पद अध्याहृत आहे. (सारांश 'बहु जस् गोमत् जस् कप्' हा समुदाय तद्धितान्त असल्यामुळें, त्याला 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होते आणि अशा रीतीनें तद्धितान्तत्वामुळें तो समुदाय प्रातिपदिकसंज्ञक ठरत असल्यामुळें, 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें त्या समुदायांतील अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययांचा लुक् होतो.) 'पुनः सुपि चाकृते समासः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, (जरी अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययांचा लुक् होतो तरी) प्रत्ययलक्षणानें ('बहु' व 'गोमत्' हे शब्द) सुबन्त ठरत असल्यामुळें (कप्प्रत्ययापूर्वी असणाऱ्या 'बहुगोमत्' या समुदायाला) समाससंज्ञा होते आणि ('बहु जस् गोमत् जस् कप्' या) अलौकिक प्रक्रियावाक्यांत 'कप्' हा प्रत्यय त्या वाक्याचा अवयव असल्यामुळें, समासग्रहणानें कप्प्रत्ययान्त समुदायाचें ग्रहण होतें, म्हणजे संपूर्ण कप्प्रत्ययान्त समुदायाला समाससंज्ञा होते. ('सुपि चाकृते' या ऐवजीं) 'सुपि च कृते' असा मनोरमेच्या क्वचित् प्रतींत आढळणारा पाठ अशुद्ध आहे. तो पाठ मानल्यास जरी ('बहु जस् चर्मन् जस् कप्' या) अलौकिक

विग्रहवाक्यांत देखील अन्य पदार्थाचा, म्हणजे अन्यपदार्थबोधक समुदायाचा, अन्तर्भाव असल्यामुळें, या समुदायाचे ठिकाणीं एकार्थीभावाचा आरोप केल्यानें हा समुदाय स्त्रीत्वाचा बोधक होतो व त्यामुळें त्याहून प्रथम 'टाप्' प्रत्यय करून नंतर 'सु' हा प्रत्यय केला असतां, या स्थलीं 'टाप्' हा सुप्प्रत्ययाच्या पुढें येत नसल्यामुळें 'बहुचर्मिका' या उदाहरणांत इत्वाची सिद्धि होऊं शकते तरी, 'सु' हा विभक्तिप्रत्यय करीपर्यंत समाससंज्ञा होऊं शकत नाहीं असें मानण्यास कांहीं प्रमाण नाहीं. ('सुपि च अकृते' हा पाठ मानल्यानें) उत्तर पद सुबन्त ठरत नाहीं (हा दोष येतो असें जर 'सुपि च कृते' हा पाठ मानणाऱ्याचें म्हणणें असेल तर, त्याच्या पक्षांत देखील) अखेरीस 'सु' प्रत्यय केल्यानें जरी संपूर्ण समुदाय सुबन्त मानतां येतो तरी, उत्तर पद हें सुबन्त ठरूं शकत नाहीं. पूर्व पदाला तर प्रत्ययलक्षणानेंच सुबन्त मानावें लागतें. (पण त्याच्या पक्षांत जसें पूर्व पद प्रत्ययलक्षणानें सुबन्त मानतां येतें तसें उत्तर पद प्रत्ययलक्षणानें सुबन्त मानतां येत नसल्यामुळें, त्या उत्तरपदाचे ठिकाणीं सुबन्तत्व आणण्याकरितां) समाससंज्ञा करण्यापूर्वी समुदायाहून 'सु' हा विभक्तिप्रत्यय केल्यानें कांहींच फल निष्पन्न होत नाहीं, म्हणजे उत्तरपद कांहीं सुबन्त होत नाहीं. दुसरें असें कीं, समाससंज्ञा होण्यापूर्वी अन्यपदार्थाची संख्या व कारक यांचा बोध होत नसल्यामुळें, जोपर्यंत समाससंज्ञा होऊन अन्यपदार्थाचा बोध होत नाहीं तोपर्यंत तशा अन्यपदार्थाची संख्या व कारक बोधित करणारा समासापेक्ष 'सु' हा विभक्तिप्रत्यय करतां येत नाहीं. वास्तविक ('बहु जस् चर्मन जस् कप्' हा समुदाय तद्धितप्रत्ययान्त असल्यामुळें) जेव्हां त्या समुदायाला तद्धितान्तत्वामुळें प्रातिपदिकसंज्ञा होते त्याचवेळीं 'कप्' प्रत्ययापूर्वी असलेल्या भागाला कोणताहि विरोध येत नसल्यामुळें, समाससंज्ञा होते, म्हणजे या दोन संज्ञा एकेचवेळीं होण्यांत कोणताहि विरोध येत नाहीं, हें जाणावें. जेथें अनेक सूत्रांनीं प्राप्त होणारीं भिन्न कार्यें एकेचवेळीं होणें संभवत नाहीं

तशाच ठिकाणीं तीं कार्ये क्रमानें करावीं असा सिद्धान्त मानला आहे. ('सुपि च अकृते' हा पाठ न मानतां 'सुपि च कृते समास इति सिद्धान्तः' हा पाठ मानणाऱ्या वैयाकरणाचें असें म्हणणें आहे कीं, 'बहु जस् चर्मन् जस् कप्' या कप्प्रत्ययान्त समुदायाहून 'सु' हा विभक्तिप्रत्यय केल्यानंतरच त्या समुदायाला समाससंज्ञा होऊं शकते; कारण समाससंज्ञा होण्याकरितां ज्या दोन पदांचा समास करणें आहे तीं दोन्ही पदें, म्हणजे पूर्वपद व उत्तरपद हीं दोन्ही, सुबन्त असलीं पाहिजेत. कप्प्रत्ययान्त समुदाय तद्धितप्रत्ययान्त असल्यामुळें 'कृत्तद्धितसमासाश्च' सू. १७९ या सूत्रानें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊन 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें त्या समुदायांतील दोन्ही 'जस्' या अन्तर्वर्तिविभक्ति-प्रत्ययांचा लुक् झाला असतां, जरी प्रत्ययलक्षणानें पूर्वपद सुबन्त मानतां येतें तरी, 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ प्रतिषेधः'–सू. ४४२ वरील वार्तिक–हें प्रतिषेधक वार्तिक असल्यामुळें, उत्तरपद सुबन्त मानतेवेळीं 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ हें सूत्र प्रवृत्त करतां येत नाहीं. त्यामुळें उत्तरपद सुबन्त ठरत नाहीं व 'सुबन्तं सुबन्तेन समस्यते' हा नियम असल्यामुळें आणि वर सांगितल्या-प्रमाणें प्रकृत स्थलीं पूर्व पद सुबन्त ठरत असून उत्तरपद सुबन्त ठरत नस-ल्यामुळें, कप्प्रत्ययान्त समुदायाला समाससंज्ञा होऊं शकत नाहीं. म्हणून त्या समुदायाला समाससंज्ञा प्राप्त करून देण्याकरितां त्याहून 'सु' प्रत्यय करणें आवश्यक आहे. 'सु' प्रत्यय केला असतां, उत्तरपदापुढें 'सु' हा विभक्तिप्रत्यय येत असल्यामुळें, पूर्वपद व उत्तरपद हीं दोन्ही सुबन्त ठरून नंतर समाससंज्ञा होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. समुदायाहून 'सु' प्रत्यय केल्यानंतर त्या समुदायाला समाससंज्ञा केल्यानें 'बहुचर्मिका' हें इष्ट रूप सिद्ध होऊं शकतेंच; कारण 'बहु जस् चर्मन् जस् कप् सु' या अवस्थेंत देखील कप्प्रत्ययान्त समुदाय 'नगरी' या अन्यपदार्थाचा बोधक ठरत असल्यामुळें त्याचे ठिकाणीं एकार्थीभावाचा आरोप केल्यानें, त्याचें स्त्रीत्व बोधित करण्याकरितां,

त्याहून संख्याकारकनिमित्तापेक्ष बहिरङ्ग 'सु' हा विभक्तिप्रत्यय करण्यापूर्वी, त्याहून स्त्रीत्वबोधक अन्तरङ्ग 'टाप्' प्रत्यय करतां येतोच व तो 'टाप्' प्रत्यय विभक्तिप्रत्ययापुढें येत नसून 'कप्' या तद्धितप्रत्ययापुढें येत असल्यामुळें, 'प्रत्ययस्थात्कात्पूर्वस्य' सू. ४६३ या सूत्रानें ककारापूर्वी असलेल्या अकाराचें, म्हणजे 'चर्म' यांतील अन्त्य अकाराचें, इत्व होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं असें 'सुपि च कृते' हा पाठ समर्थन करणाऱ्या वैयाकरणाच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे. यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, असा पाठ मानल्यानें देखील जरी 'बहुचर्मिका' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकतें तरी, अलौकिक विग्रहवाक्यांतील कप्प्रत्ययान्त समुदायाला समाससंज्ञा प्राप्त करून देण्याकरितां समुदायाहून 'सु' हा विभक्तिप्रत्यय करण्याची कांहींच गरज नाहीं. तो विभक्तिप्रत्यय समुदायाहून करण्यापूर्वी देखील अलौकिकविग्रहवाक्यावस्थेंतच कप्प्रत्ययान्त समुदायाला समाससंज्ञा होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं; कारण तो कप्प्रत्ययान्त समुदाय 'नगरी' या अन्यपदार्थाचा बोधक असल्यामुळें त्याचे ठिकाणीं एकार्थीभावाचा आरोप केल्यानें स्त्रीत्वबोधकता येते व त्यामुळें त्याहून स्त्रीत्वबोधक 'टाप्' प्रत्यय करतां येतो. पण कप्प्रत्ययान्त समुदाय तद्धितान्त असल्यामुळें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊन जेव्हां दोन्ही 'जस्' या अन्तर्वर्तिविभक्ति-प्रत्ययांचा लुक् होतो तेव्हां 'बहु' व 'चर्मन्' या दोन्ही पदांपुढें विभक्तिप्रत्यय राहत नसल्यामुळें व 'सुबन्तं सुबन्तेनसह समस्यते' असा नियम असल्यामुळें, त्या दोन पदांचा समास कसा व्हावा अशी जी शंका करण्यांत येते तीवर हें उत्तर आहे कीं, दोन्ही पदें प्रत्ययलक्षणानें सुबन्त मानतां येऊं शकतात. यावर पूर्वपक्षी असें म्हणतो कीं, जरी पूर्वपद प्रत्ययलक्षणानें सुबन्त मानतां येतें. तरी 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ' या प्रतिषेधक वार्तिकान्वयें उत्तरपद सुबन्त मानतां येत नाहीं आणि म्हणूनच उत्तरपद सुबन्त व्हावें व समुदायाला समाससंज्ञा व्हावी याकरितां त्या समासाहून 'सु'

प्रत्यय करणें आवश्यक आहे. पण पूर्वपक्षीच्या या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं; कारण 'सु' प्रत्यय जो अखेरीस केला जातो तो समुदायाहून केला जात असून उत्तरपदाहून केला जात नसल्यामुळें, या प्रत्ययाच्या योगानें 'चर्मन्' हें पद कसें सुबन्त ठरणार? म्हणून 'सु' प्रत्यय केल्यावर देखील उत्तर पद सुबन्त ठरत नसल्यामुळें, समुदायाला समाससंज्ञा न होण्याची आपत्ति जशीची तशीच कायम राहते. आणखी असें कीं, समुदायाला ब्रहुव्रीहिसमाससंज्ञा होऊन तो समुदाय 'नगरी' या अन्यपदार्थाचा बोधक होत नाहीं तोपर्यंत संख्या व कारक यांचा बोध करणारा 'सु' प्रत्यय त्या समुदायाहून करतां येणें कसें शक्य आहे? वास्तविक 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ' हा प्रतिषेध अशाच ठिकाणीं लागू पडतो कीं, जेथें प्रत्ययलक्षणानें उत्तरपदाला पदसंज्ञा करून तन्निमित्तक कांहीं कार्य त्या पदाला करणें आहे. प्रकृत स्थलीं तसें कांहीं करणें नसल्यामुळें, उत्तर पदाला पदसंज्ञा करतेवेळीं वरील प्रतिषेधक वार्तिक मुळींच लागू पडत नाहीं. दुसरें असें कीं, ज्यावेळीं कप्प्रत्ययान्त समुदायाला तद्धितान्तत्वामुळें प्रातिपदिकसंज्ञा होते त्याचवेळीं अलौकिकविग्रहवाक्यावस्थेंतच त्या समुदायांतील कप्प्रत्ययापूर्वी असलेल्या भागाला समाससंज्ञा देखील होते. या स्थितींत पूर्वपद व उत्तरपद विभक्तिप्रत्ययान्त असल्यामुळें सुबन्त ठरतात व त्यामुळें त्या भागाला समाससंज्ञा होण्यांत कांही प्रत्यवाय येत नाहीं. सारांश समाससंज्ञा होण्याकरितां समुदायाहून सुबुत्पत्ति करण्याची मुळींच आवश्यकता नसल्यामुळें, 'सुपि च कृते समास इति सिद्धान्तः' हा पाठ अशुद्ध ठरतो हें उघड आहे.)

शब्दरत्नः—यत्वाहुरिति । ङीग्रहणन्तु लोहिनिकेत्यर्थमिति तद्भावः । अनेनेति । आर्यकेत्यस्य साधनेनेत्यर्थः ।

सुबन्तात्तद्धितोत्पत्तौ, प्रागेव ङ्याप्पोः प्रवृत्तौ च बीजमाह—स्वार्थादिति । स्वार्थद्रव्यलिङ्गसंख्याकारकेत्यर्थः । स्वार्थः । प्रवृत्तिनिमित्तम् । विशिष्टबुद्धौ विशेषणज्ञानस्य कारणत्वात्पूर्वं जात्या-

दिज्ञानं, ततो धर्मित्वेन प्रधानत्वाल्लिङ्गादिभिरप्याकांक्षीतत्वात्तदाश्रयज्ञानं,—ततः स्वमात्रापेक्षत्वाल्लिङ्गस्य ज्ञानं, ततो विजातीयक्रियाकारकापेक्षया सजातीयपदार्थापेक्षसंख्यायाः प्रथममुपस्थित्या तज्ज्ञानं, ततः कारकरूपविभक्त्यर्थाकाङ्क्षा, तन्निवृत्तौ हि बहिर्भूतकुत्सादियोग इति "कुत्सिते" इति सूत्रे भाष्ये स्पष्टम् । एवं च ज्ञानक्रमानुरोधेनैव तत्तत्प्रयुक्तकार्यप्रवृत्तेरौचित्येन क्रमिकत्वं स्पष्टमेव । यद्यपि लोकानां बोधो न क्रमेण, तथाऽपि शास्त्रप्रक्रियायां शास्त्रकृत्कल्पितोऽयं क्रमः । अर्थवदुद्देशेन प्रातिपदिकत्वविधानात् प्रातिपदिकोद्देशेन लिङ्गादौ ङीबादिविधानादिति बोध्यम् । अत एव "घकालतनेषु—" इति चरितार्थम् । स्पष्टं चेदम्—"अचःपरस्मिन्" इत्यत्र भाष्यकैयटयोः । एवं चैतन्न्यायसिद्धार्थानुवाद एव ङ्याब्ग्रहणम् । अत्यन्तस्वार्थिकानारभ्य तस्यनिवृत्तेरुक्तन्यायविषयाभावाच्च समासान्तेषु न दोषः । अत्यन्तस्वार्थिके कन्यार्यिकेत्येव, यद्यभिधानमस्ति। लोहिनिकेत्येतत्सिध्द्यर्थं च "लोहिताल्लिङ्गबाधनं वा" इति कार्यमेवेति भावः । स्पष्टं चेदं सूत्रशेषे भाष्ये इत्यन्यत्र विस्तरः ।

'आब्ग्रहणं स्पष्टार्थम्' असें जें प्रकाशकारांनीं म्हटलें आहे (व 'ङ्याब्ग्रहणं स्पष्टार्थम्' असें म्हटलें नाहीं) त्याचें कारण हें कीं, त्या सूत्रांतील 'ङी' या प्रत्ययाचें ग्रहण 'लोहिनिका' हें रूप सिद्ध व्हावें याकरितां चरितार्थ ठरतें. (पण आब्ग्रहणाचें तसें कोणतेंहि विशेष प्रयोजन सांगतां येत नाहीं.) 'तदनेन प्रत्युक्तम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यांतील 'अनेन' या पदाचा 'आर्यकेत्यस्य साधनेन,' म्हणजे 'आर्यका' या रूपाची सिद्धि होण्याकरितां प्रकृत सूत्रांतील आब्ग्रहण देखील सप्रयोजनक व चरितार्थ ठरत असल्यामुळें, असा अर्थ आहे. (या विषयाचें विस्तृत विवरण पूर्वीं मनोरमेंत केलेंच आहे.) सुबन्ताहून तद्धितोत्पत्ति होत असते व त्यापूर्वींच 'ङी' व 'आप्' हे स्त्रीप्रत्यय होत असतात याचें कारण 'स्वार्थादिप्रयुक्तकार्याणां क्रमिकत्वस्वीकारात्' असें मनोरमेंत दिलें आहे. या पंक्तींतील 'स्वार्थादि' या शब्दाचा 'स्वार्थ, द्रव्य, लिङ्ग,

संख्या, कारक' असा अर्थ आहे. 'स्वार्थ' या शब्दाचा 'प्रवृत्तिनिमित्त' असा अर्थ आहे. (ज्याच्यामुळें शब्दाचा भाषेंत विशिष्ट अर्थ द्योतित करण्याकरितां प्रयोग केला जातो तें त्याचें प्रवृत्तिनिमित्त होय. 'ऋलृक्' या शिवसूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'चतुष्टयी शब्दानां प्रवृत्तिः । जातिशब्दा गुणशब्दाः क्रियाशब्दाः यदृच्छाशब्दाः-श्चतुर्थाः' असें प्रथम सांगून पुढे ''त्रयी च शब्दानां प्रवृत्तिः । जातिशब्दा गुणशब्दाः क्रियाशब्दाः शति । न सन्ति यदृच्छाशब्दाः ।'' असा सिद्धान्त सांगितला आहे. सारांश या भाष्यान्वयें जाति गुण व क्रिया हीं तीन प्रवृत्तिनिमित्तें होत. 'नागृहीतविशेषणा विशेष्ये बुद्धिरुत्पद्यते' या न्यायान्वयें) विशिष्टाचें ज्ञान होण्याकरितां विशेषणाचें ज्ञान होणें आवश्यक असल्यामुळें, प्रथम जाति इत्यादि-कांचें म्हणजे जाति, गुण, क्रिया यांचें, ज्ञान होतें. त्यानंतर विशिष्ट व्यक्तीचें ज्ञान होतें; कारण व्यक्तीचे ठिकाणीं धर्म राहत असल्या-मुळें, व्यक्ति ही (लिङ्ग, संख्या, कारक यांच्या मानानें) प्रधान ठरते आणि लिङ्ग, संख्या, कारक यांचें ज्ञान होण्याकरितां ते ज्या व्यक्तीच्या आश्रयानें राहतात त्या व्यक्तीच्या ज्ञानाची अपेक्षा असते. व्यक्तिज्ञान झाल्यानंतर लिङ्गाचें ज्ञान होतें. तें लिङ्गज्ञान होण्या-करितां तेवढचा एक व्यक्तीचीच अपेक्षा असते. (संख्या व कारक यांचें ज्ञान होण्याकरितां जशी व्यक्त्यन्तराची अपेक्षा असते तशी लिङ्गज्ञान होण्याकरितां व्यक्त्यन्तराची अपेक्षा नसते.) त्यानंतर संख्येचें ज्ञान होतें; कारण संख्येचें ज्ञान होण्याकरितां सजातीय इतर व्यक्तींचीच अपेक्षा असल्यामुळें व जशी कारकास विजातीय क्रियेची अपेक्षा असते तशी संख्येला राहत नसल्यामुळें, संख्येची प्रथम उपस्थिति होऊन तिचें प्रथम ज्ञान होतें. त्यानंतर व्यक्ति क्रियेमध्यें कोणत्या प्रकारें अन्वित आहे हें जाणण्याची, म्हणजेच कारकरूप विभक्तीच्या अर्थाचें ज्ञान होण्याची, आकांक्षा उत्पन्न होते (व त्या कारकाचा बोधक विभक्तिप्रत्यय लावल्यानें) ती आकांक्षा निवृत्त झाल्यावर प्रकृतीच्या अर्थामध्यें अन्तर्भूत नसणारा,

म्हणजेच प्रकृतीच्या अर्थाहून बहिर्भूत असणारा, कुत्सा इत्यादि अर्थ ज्ञात होण्याकरितां त्या प्रकृतीहून त्या त्या विशिष्ट कुत्सादि अर्थांचे बोधक प्रत्यय केले जातात असें 'कुत्सिते' ५–३–७४ या सूत्रावरील भाष्यांत सांगितलें आहे. (या भाष्यांत पठित केलेल्या दोन कारिका पूर्वी दिल्याच आहेत व त्या कारिकांचें विवरण देखील केलेंच आहे.) अशा रीतीनें शब्दाहून लिङ्गादिकांचा बोध होण्याचा जो क्रम वर सांगितला आहे त्या क्रमाला अनुसरूनच व्याकरणशास्त्रांत सांगितलेलीं कार्यें प्रवृत्त होणें उचित असल्यामुळें, कार्यांचें क्रमिकत्व स्पष्ट होतेंच, म्हणजे संख्या व कारक यांचें ज्ञान होण्यापूर्वी लिङ्गाचें ज्ञान होत असल्यामुळें लिङ्गबोधक 'ङी' व 'आप्' प्रत्यय प्रथम लावल्यानंतर संख्याकारकबोधक विभक्तिप्रत्यय लावतां येतात व त्यानंतर तशा सुबन्ताहून तद्धितोत्पत्ति करतां येते. जरी लोकांना वर सांगितलेल्या क्रमानें शब्दाहून लिङ्गादिकांचा क्रमिक बोध होत नसतो (व 'अजाः ग्रामं गच्छन्ति' हें वाक्य ऐकल्याबरोबर त्यांना जाति, व्यक्ति, लिङ्ग, संख्या, कारक या सर्वांचा युगपत् बोध होतो) तरी, व्याकरण-शास्त्रांत सांगितलेली प्रक्रिया करतेवेळीं शास्त्रकार–सूत्रकार आचार्य पाणिनी– यांनीं ती प्रक्रिया कोणत्या क्रमानें करावी हें बोधित कर-ण्याच्या हेतूनें वरील क्रम मानला आहे. अर्थवान् शब्दाला उद्देशून प्रातिपदिकसंज्ञा होण्याचें विधान केलें असल्यामुळें व प्रातिपदिकाला उद्देशून लिङ्गादिकांचा बोध होण्याकरितां, त्याहून 'ङीप्' इत्यादि प्रत्यय होण्याचें विधान केलें असल्यामुळें, तसा कार्यक्रम सिद्ध होतो हें जाणावें. म्हणूनच, म्हणजे असा कार्यक्रम असल्यामुळें व त्यावरून सुबन्तात्तद्धितोत्पत्तिः' हा सिद्धान्त ज्ञापित होत असल्यामुळेंच, 'घकालतनेषु कालनाम्नः' सू.९७५ हें सूत्र चरितार्थ ठरतें. (काल-वाचक शब्दापुढें 'तरप्, तमप्' हे तद्धित प्रत्यय व तसेंच 'काल' किंवा 'तन' हे शब्द आल्यास, त्या कालवाचक शब्दापुढील सप्तमीच्या विभक्तिप्रत्ययाचा विकल्पेंकरून लुक् होतो असा त्या सूत्राचा अर्थ आहे. त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, विभक्त्यन्ताहून 'तरप्, तमप्'

हे तद्धित प्रत्यय होतात आणि अशा रीतीनें त्या सूत्रावरून 'सुबन्तात्तद्धितोत्पत्तिः' हा सिद्धान्त ज्ञापित होतो.) 'अचः परस्मिन्पूर्वविधौ' सू. १–१–५७ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं व त्या भाष्याच्या वृत्तींत कैयटानें वरील क्रम स्पष्टपणें सांगितला आहे. (त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात– प्रत्यङ्गवर्ती लोको लक्ष्यते । तद्यथा । पुरुषोऽयं प्रातरूत्थाय यान्यस्य प्रतिशरीरं कार्याणि तानि तावत्करोति, ततः सुहृदां, ततः सम्बन्धिनाम् । प्रातिपदिकं चाप्युपदिष्टं सामान्यभूतेऽर्थे वर्तते । सामान्ये वर्तमानस्य व्यक्तिरुपजायते । व्यक्तस्य सतो लिङ्गसङ्ख्याभ्यामन्वितस्य बाह्येनार्थेन योगो भवति । यथैव चानुपूर्व्यार्थानां प्रादुर्भावस्तथैव शब्दानामपि तद्वत्कार्यैरपि भवितव्यम् ।' या भाष्याचा अर्थ हा आहे कीं, जो आपणास अधिक जवळचा आहे त्याचें कार्य आधीं करावें अशी मनुष्यमात्राची कार्य करण्याची पद्धत आहे. उदाहरणार्थ मनुष्य हा सकाळीं उठल्यावर जीं त्याच्या स्वतःच्या शरीराचीं कार्यें आहेत तीं तो प्रथम करतो, नंतर मित्रांची व त्यानंतर इतर संबंधिलोकांचीं तो कार्यें करतो. तसेंच प्रातिपदिक उच्चारलें असतां तें ऐकल्याबरोबर त्यापासून प्रथम सामान्य अर्थाचा बोध होतो. त्यानंतर त्या सामान्य अर्थानें युक्त असणारी अशी व्यक्ति मनांत येते; त्यानंतर त्या व्यक्तीचा लिङ्ग आणि संख्या यांच्याशीं असलेला संबंध मनांत आल्यावर त्या व्यक्तीचा बाह्य अर्थाशीं संबंध होतो. ज्या क्रमानें हे अर्थ मनांत येतात त्याच क्रमानें त्या त्या अर्थांचीं बोधक कार्यें होणें योग्य आहे. या भाष्यावर कैयटानें पुढें लिहिल्याप्रमाणें टीका केली आहे– 'नित्येऽपि शब्दार्थसम्बन्धे अक्रमेऽप्यर्थप्रतिपादने उपायभावेनासत्यमपि क्रमं प्रकृत्याद्यर्थं चाश्रित्योपेयव्यवस्थापनात् । तत्र नागृहीतविशेषणा विशेष्ये बुद्धिरुत्पद्यत इत्यादौ सामान्यमभिधीयते । ततस्तदनुरक्तद्रव्ये प्रतीतिः । लिङ्गसङ्ख्याशक्तीनां चाश्रयो द्रव्यमिति तत्पूर्वमभिधातव्यम् । ततः सङ्ख्यापेक्षया लिङ्गं समासन्नमिति तदभिधीयते । व्यादिसङ्ख्याहि वस्त्वन्तरापेक्षोपजायते । एकत्वसङ्ख्यापि वस्त्वन्तरापेक्षद्वित्वादिव्य-

वच्छेदं करोतीति बहिरङ्गा । साऽपि सजातीयपदार्थापेक्षत्वादन्तरङ्गा । कर्मादीनि तु विजातीयक्रियापेक्षणाद्बहिरङ्गाणीति न्यायप्राप्तक्रमः ।' या वरील भाष्यांत व कैयटवृत्तींत जें प्रतिपादन केलें आहे त्याचाच अनुवाद शब्दरत्नांतील वरील पंक्तींत केला आहे.) अशा रीतीनें वरील न्यायानें सिद्ध होणाऱ्या अर्थाचेंच अनुवाद करणारें प्रकृत सूत्रांत केलेलें 'ङ्याप्' ग्रहण आहे, म्हणजे वरील भाष्यांत जो कार्यक्रम सांगितला आहे त्या क्रमानें कार्यें केल्यास लिङ्गबोधक प्रत्यय लावल्यानंतरच विभक्तिप्रत्यय व त्यानंतर तद्धितप्रत्यय लावतां येत असल्यामुळें 'ङ्याप्प्रातिपदिकात्' या सूत्रांत केलेलें 'ङ्याप्' ग्रहण वर सांगितलेल्या क्रमाचाच अनुवाद करणारें आहे हें स्पष्ट होतें. (सारांश प्रकृत सूत्रांत 'ङ्याप्' ग्रहण केलें नसतें तरी, भाष्यांत सांगितलेल्या क्रमान्वयें स्त्रीत्वबोधक प्रत्यय प्रथम केल्यानंतरच सुबुत्पत्ति होऊन नंतर तद्धितोत्पत्ति करतां आली असती, आणि म्हणून प्रकृत सूत्रांतील ङ्याप्ग्रहण अनावश्यक ठरतें.) अत्यन्त स्वार्थिक प्रत्ययांचा जेथून अष्टाध्यायींत प्रारंभ केला आहे तेथून प्रकृत सूत्रांतील 'ङ्याप्' या पदाची निवृत्ति होत असल्यामुळें, म्हणजे त्या सूत्रांचे ठिकाणीं 'ङ्याप्' हें पद अनुवृत्त होत नसल्यामुळें, व ते अत्यन्त स्वार्थिक प्रत्यय वरील न्यायाचा विषय होत नसल्यामुळें, ('ङी' व 'आप्' हे स्त्रीत्वबोधक प्रत्यय होण्यापूर्वींच अत्यन्त स्वार्थिक तद्धित) समासान्त प्रत्यय होण्यांत कांहीं दोष— प्रत्यवाय – येत नाहीं. (कारण ते प्रत्यय पूर्वीं सांगितल्याप्रमाणें प्रकृतीहून भिन्न अशा स्वतंत्र अर्थाचे बोधक नसून केवळ प्रकृतीचाच अर्थ सांगणारे असल्यामुळें, ते अन्तरङ्गतर अत्यन्त स्वार्थिक प्रत्यय प्रथम केल्यानंतरच लिङ्गबोधक प्रत्यय करतां येऊं शकतात आणि म्हणूनच ज्या सूत्रांत समासान्त प्रत्यय होण्याचें विधान केलें आहे तशा सूत्रांत प्रकृत सूत्रांतील 'ङ्याप्' या पदाची अनुवृत्ति करतां येत नाहीं आणि ते प्रत्यय भाष्यांत जो कार्यक्रम सांगितला आहे त्याचा विषय होत नाहींत, म्हणजे ते तद्धित प्रत्यय

असून देखील लिङ्गबोधक प्रत्यय लागण्यापूर्वींच होतात. येथें हें लक्षांत ठेवावें कीं, 'ङ्याप्प्रातिपदिकात्' हें अधिकारसूत्र चतुर्थाध्यायाच्या प्रारंभीं पठित असून तो अधिकार पञ्चमाध्यायाच्या अखेरपर्यंत चालू आहे. 'समासान्ताः' हें पांचव्या अध्यायाच्या चतुर्थ पादांतील ६८ वें सूत्र असून हा अधिकार देखील येथून पञ्चमाध्यायाच्या अखेरपर्यंत चालू आहे.) जर 'आर्य' शब्दाचा 'कन्' व 'टाप्' प्रत्यययुक्त 'आर्यिका' असा भाषेंत कोठें प्रयोग आढळत असेल तर, 'आर्य' शब्दाहून प्रथम अत्यंतस्वार्थिक 'कन्' प्रत्यय केला असतां (नंतर 'टाप्' प्रत्यय केल्यानें) 'आर्यिका' असेंच रूप होऊं शकतें ('आर्यका' असें पाक्षिक रूप होऊंच शकत नाहीं; कारण 'आर्य' शब्दाहून स्त्रीत्वबोधक 'टाप्' प्रत्यय होण्यापूर्वीं प्रथम अत्यन्तस्वार्थिक 'कन्' प्रत्यय करणें भाग आहे व तो प्रत्यय प्रथम केल्यानंतर 'टाप्' प्रत्यय केल्यास, यकारापुढील अकार आकाराचे जागीं झालेला नसल्यामुळें, 'उदीचामातः स्थाने' सू. ४६५ या सूत्रानें त्या अकाराचें विकल्पेंकरून इत्व होऊं शकत नाहीं व 'प्रत्ययस्थात्कात्पूर्वस्य' सू. ४६३ या सूत्रानें त्या अकारचें नित्य इत्व होऊन 'आर्यिका' एवढेंच रूप सिद्ध होऊं शकतें.) 'लोहिनिका' हें पाक्षिक रूप सिद्ध होण्याकरितां 'लोहिताल्लिङ्गबाधनं वा' हें वार्तिक मानणें आवश्यक आहे असा भाष्याचा भावार्थ आहे. प्रकृत सूत्रावरील भाष्याच्या अखेरीस हें स्पष्टपणें सांगितलें आहे व या विषयांचें इतर ग्रन्थांत विस्तृत विवेचन केलें आहे. (प्रकृत सूत्रावरील भाष्यांत 'तद्धितविधानार्थं तु ङ्याब्ग्रहणं कर्तव्यम्, ङ्याबन्तात्तद्धितोत्पत्तिर्यथा स्यात्' असें सांगून भाष्यकार पुढें म्हणतात कीं, तसें मानल्यास, 'समासान्तेषु दोषो भवति'. यावर स्त्रीप्रत्यय देखील स्वार्थिक प्रत्यय आहेत अशी शंका केली असतां, भाष्यकार अखेरीस म्हणतात— 'समासान्ता अपि स्वार्थिकाः। उभयोः स्वार्थिकयोः परत्वात्समासान्ता भविष्यन्ति···कथं लोहिनिकेति वक्ष्यत्येतत् लोहिताल्लिङ्गबाधनं वेति ।' या भाष्याचें व्याख्यान

करितांना कैयटानें 'लोहिनिकेति' हें प्रतीक घेऊन असें म्हटलें आहे कीं, 'न हि लोहिनशब्दः प्रातिपदिकमस्तीति प्रश्नः' व पुढें 'वक्ष्यत्येतदिति' हें प्रतीक घेऊन 'अवश्यवक्तव्यतां दर्शयति । क्रियमाणेऽपिङ्याब्ग्रहणे लोहितान्मणौ, वर्णे चानित्ये, रक्ते इति प्रतिपदविधानाद्बलीयस्त्वात् स्त्रीप्रत्ययं बाधित्वा कन्नेव स्यात्' असें म्हटलें आहे. या कैयटवृत्तींतील प्रतिपदविधानात्' यावर टीका करितांना उद्योतकारांनीं 'अनवकाशत्वे सत्येव तस्य बाधकत्व-प्रयोजकत्वात् चिन्त्यमिदम् । परत्वादिति वक्तुमुचितम्' असें म्हटलें आहे. सारांश प्रतिपदविधानामुळें म्हणा किंवा परत्वामुळें म्हणा, 'लोहित' या शब्दाहून प्रथम स्वार्थिक 'कन्' प्रत्यय केला असतां 'लोहितक' असें जें अदन्त रूप सिद्ध होतें तें तकारोपध नसून ककारोपध असल्यामुळें, 'वर्णादनुदात्तात्' सू. ४९६ हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व 'अजाद्यतष्टाप्' सू. ४५४ या सूत्रानें 'टाप्' प्रत्यय केल्यावर 'प्रत्ययस्थात्कात्पूर्वस्य' या सूत्रानें ककारापूर्वी असलेल्या अकाराचें इत्व होऊन 'लोहितिका' एवढेंच रूप सिद्ध होऊं शकतें. म्हणून 'लोहिनिका' हें पाक्षिक इष्ट रूप सिद्ध होण्याकरितां 'लोहितााल्लिङ्गबाधनं वा' हें वार्तिक मानणें आवश्यक आहे. त्या वार्तिकान्वयें अनुदात्त तकारोपध वर्णवाचक 'लोहित' या शब्दाहून प्रथम 'वर्णादनुदात्तात्' सू. ४९६ या सूत्रानें 'ङीप्' हा स्त्रीप्रत्यय व त्याबरोबरच तकाराचा नकार करून 'लोहिनी' हें रूप सिद्ध झाल्यावर त्याहून नंतर स्वार्थे 'कन्' प्रत्यय केला असतां, 'केऽणः' सू. ८३४ या सूत्रानें 'लोहिनी' यांतील अन्त्य ईकार ऱ्हस्व होऊन 'लोहिनिक' असें अदन्त रूप झाल्यावर त्याहून 'टाप्' प्रत्यय केल्यानें 'लोहिनिका' असें पाक्षिक रूप सिद्ध होतें. सारांश अत्यन्तस्वार्थिक प्रत्यय स्त्रीप्रत्ययापूर्वी होत असल्यामुळें 'लोहिनिका' असें जें पाक्षिक रूप सिद्ध होऊं शकत नाहीं तें सिद्ध व्हावें याकरितां वरील वार्तिक पठित करणें आवश्यक आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. या विषया-

संबंधानें प्रकृत सूत्रावरील शब्देन्दुशेखरांत 'एवं च स्त्रीप्रत्ययेषु, अत्यन्तस्वार्थिकानारभ्य तद्धितेषु च ङ्याब्ग्रहणासम्बन्धो, व्याख्यानात् । अत एव लोहिनिकेत्येतत्सिद्धये लोहिताल्लिङ्गबाधनं वेति चरितार्थम् । अत्यन्तस्वार्थिकानां सुबुत्पत्तेः पूर्वमुत्पत्तिरिति सर्वस्य द्वे इति सूत्रे भाष्ये स्पष्टम्, कैयटे च' असें म्हटलें आहे.)

मनोरमा—सुङस्योरिति । सोरुकारो "अर्वणस्त्रसौ" इत्यत्र विशेषणार्थः । असीत्युक्ते ह्यसकारादावित्यर्थः स्यात् । तथा च "वाजमर्वत्सु पय उस्त्रियासु" इति न सिध्येत् । ङसेरिकारो "युष्मदस्मद्भ्यां ङसोऽश्" इत्यत्र अस्य ग्रहणं मा भूदिति । यदि तु "एकवचनस्य च" इत्यत्र "पञ्चम्या" इत्यनुवृत्तेः परिशेषादन्यस्य ङसोऽत्र ग्रहणं भविष्यतीत्युच्यते, तर्हि "टाङसिङसाम्" इत्येतदर्थः । जश्शसोर्जकारशकारौ "जसः शी" "तस्माच्छसो नः" इत्यनयोर्विषयविभागार्थौ । अन्यतरस्य निरनुबन्धकत्वमेवास्तु इति चेन्न, जसो जकाराभावे औ इत्यस्याव् स्यात् । ततश्च प्रत्ययस्य वकारान्ततापि सम्भाव्येत । एवं शसः शकाराभावे औटो डित्वं सम्भाव्येत । अतोऽसन्देहार्थं तत्करणौचित्यात् । औटष्टकारः सुडिति प्रत्याहारार्थः । टाटकारस्तु "टाङसि—" इति विशेषणार्थः । ङेप्रभृतीनां ङकारो "घेर्ङिति" इति विशेषणार्थः । पकारस्तु प्रत्याहारार्थः । एवं च सर्वेषां सफलत्वेऽपि संज्ञार्था इति प्राचो ग्रन्थाऽसङ्गत एव । सम्यग् ज्ञानं संज्ञा तदर्थाः विशेषणार्था इति यावत् । इति भङ्क्त्वा व्याख्यानेऽपि क्लिष्टत्वमेवेत्युपेक्षितम् ।

('स्वौजस्' सू. १८३ या सूत्रावरील कौमुदींत 'सुङस्योरुकारेकारौ जशटङपाश्चेतः' असें जें दीक्षितांनीं म्हटलें आहे त्याचें ते येथें विवरण करितात.) प्रथमेच्या एकवचनाच्या 'सु' प्रत्ययांत जो उकार घातला आहे तो 'अर्वणस्त्रसौ' सू. ३६४ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'असौ' यांतील 'सु' चें विशेषण व्हावा, म्हणजे त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'सु' नें प्रथमेच्या एकवचनाच्या 'सु = स्' या प्रत्ययाचें ग्रहण व्हावें, याकरितां घातला आहे.

त्या सूत्रांत ('असौ' असें न म्हणतां) 'असि' असें म्हटलें असतें तर, म्हणजे 'सु' या अनल्चें ग्रहण न करितां 'स्' या अल्चें ग्रहण केलें असतें तर, ('यस्मिन्विधिस्तदादावल्ग्रहणे'-परि. ३३-या परिभाषान्वयें) 'असि' या पदाचा 'असकारादौ प्रत्यये परे सति' असा अर्थ झाला असता व त्यामुळें 'वाजमर्वत्सु पय उस्त्रियासु' या श्रुतींतील 'अर्वत्सु' हें रूप सिद्ध होऊं शकलें नसतें. (प्रथमेच्या एकवचनाचा 'सु' प्रत्यय पुढें नसल्यास 'अर्वन्' यांतील अन्त्य नकाराचे जागीं तकार होणें हें 'अर्वणस्तृ' या वरील सूत्रांत सांगितलें आहे. प्रथमेच्या एकवचनाच्या 'स्' या प्रत्ययाला उकारानुबन्ध न लावतां 'सौजस्' असा प्रकृत सूत्राचा पाठ केला असता तर, 'अर्वणस्त्रसि' असें वरील सूत्र पठित करावें लागलें असतें व त्या सूत्रांतील 'असि' या पदाचा 'यस्मिन्विधिः' या परिभाषान्वयें असा अर्थ झाला असता कीं, 'अर्वन्' शब्दापुढें सकारानें सुरु होणारा प्रत्यय न आल्यास, 'अर्वन्' यांतील नकाराचे जागीं तकार होतो, आणि तसा अर्थ झाल्यानें 'अर्वन् + सुप्' या स्थलीं 'अर्वन्' शब्दापुढें सकारानें सुरु होणारा सप्तमीच्या बहुवचनाचा 'सुप्' हा प्रत्यय असल्यामुळें, नकाराचे जागीं तकार न होण्याची आपत्ति आली असती व 'अर्वत्सु' असें श्रुतींत पठित असलेलें इष्ट रूप सिद्ध होऊं शकलें नसतें. ही आपत्ति टाळण्याकरितां प्रकृत सूत्रांत प्रथमेच्या एकवचनाचा प्रत्यय 'स्' असा न उच्चारतां 'सु' असा उकारानुबन्धसहित उच्चारला आहे.) 'ङसि' या पञ्चमीच्या एकवचनाच्या प्रत्ययांत जो इकार घातला आहे तो अशाकरितां कीं, 'युष्मदस्मद्भ्यां ङसोऽश्' सू. ३९९ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'ङस्' या शब्दानें 'ङसि' चें ग्रहण न व्हावें. (सारांश पञ्चमीच्या व षष्ठीच्या एकवचनाचे प्रत्यय 'ङसि' व 'ङस्' असे अनुक्रमें भिन्न रूपानें पठित न करितां ते दोन्ही प्रत्यय 'ङस्' या एकाच तऱ्हेनें पठित केले असते तर, पाणिनीय सूत्रांतील 'ङस्' या शब्दाच्या ग्रहणानें त्या दोन्ही प्रत्ययांचें ग्रहण झालें

असतें व 'ङसि, ङस्' हे प्रत्यय पुढें असतांना जीं भिन्न कार्यें होणें सांगितलीं आहेत व त्या प्रत्ययांचे जागीं कित्येक ठिकाणीं जे भिन्न आदेश होणें सांगितले आहेत ते करतां येऊं शकले नसते.) 'पञ्चम्या अत्' सू. ३९७ या पूर्व सूत्रांतून 'पञ्चम्याः' या पदाची 'एकवचनस्य च' सू. ३९६ या उत्तर सूत्रांत अनुवृत्ति होत असल्यामुळें, 'युष्मदस्मद्भ्यां ङसोऽश् सू. ३९९ या सूत्रानें 'ङस्' चे जागीं होणारा 'अश्' हा आदेश अवशिष्ट राहिलेल्या षष्ठीच्या एकवचनाच्या 'ङस्' प्रत्ययाचे जागींच (दोन्ही प्रत्यय 'ङस्' असेच पठित केले असते तरी) होऊं शकला असता असें कोणी म्हटल्यास, 'टाङसिङसामिनात्स्याः' सू. २०१ या सूत्राकरितां पञ्चमीच्या एकवचनाचा प्रत्यय 'ङसि' असा उच्चारला आहे, म्हणजे त्या सूत्रानें 'ङसि' व 'ङस्' यांचे जागीं जे भिन्न भिन्न आदेश होणें सांगितले आहेत ते करतां यावे याकरितां दोन्ही प्रत्यय 'ङ्स्' अशा एकाच रूपानें पठित न करितां भिन्न रूपानें पठित केले आहेत, असें समजावें. 'जस्' या प्रथमेच्या बहुवचनाच्या प्रत्ययास व 'शस्' या द्वितीयेच्या बहुवचनाच्या प्रत्ययास जे अनुक्रमें जकार व शकार हे अनुबन्ध लावले आहेत ते अशाकरितां कीं, 'जसः शी' सू. २१४ व 'तस्माच्छसो नः पुंसि' सू. १९६ या दोन सूत्रांत सांगितलेल्या विषयांचा विभाग करतां यावा, म्हणजे या दोन सूत्रांनीं 'जस्' व 'शस्' यांचे जागीं जे भिन्न आदेश होणें सांगितलें आहेत ते करतां यावें. (ते दोन्ही प्रत्यय जर एकाच रीतीनें पठित केले असते तर तसें करतां येऊं शकलें नसतें.) या वरील दोन प्रत्ययांपैकी एक प्रत्यय अनुबन्धरहित पठित केला असता तर चालूं शकलें असतें (व 'निरनुबन्धकग्रहणे न सानुबन्धकस्य'—परि. ८२—ही परिभाषा असल्यामुळें, निरनु-बन्धक प्रत्ययानें सानुबन्धक प्रत्ययाचें ग्रहण झालेंच नसतें) असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण (या दोन प्रत्ययांपैकीं प्रथमेच्या बहुवचनाचा 'जस्' हा प्रत्यय

सानुबन्धक पठित न करितां 'अस्' असा अनुबन्धरहित पठित केला असता तर) जकाराचे अभावीं ('सु औ जस्' या ऐवजीं 'सु औ अस्' अशी स्थिति झाली असतां) 'औ' चे जागीं ('एचोऽयवायावः' सू. ६१ या सूत्रानें) 'आव्' असा आदेश झाला असता व त्यामुळें प्रथमेच्या द्विवचनाचा प्रत्यय वकारान्त 'आव्' आहे असा देखील संदेह उत्पन्न होण्याचा प्रसग आला असता. त्याचप्रमाणें (द्वितीयेच्या बहुवचनाचा प्रत्यय 'शस्' असा सानुबन्धक पठित न करितां 'अस्' असा निरनुबन्धक पठित केला असता तर) शकाराच्या अभावामुळें द्वितीयेच्या द्विवचनाचा 'औट्' हा प्रत्यय डित् आहे असा संदेह उत्पन्न होण्याची आपत्ति आली असती; (कारण 'औट्+अस्' अशा स्थितींत 'झलां जशोऽन्ते' सू. ८४ या सूत्रानें 'औट्' यांतील टकाराचे जागीं डकार होऊन 'औडस्' असें सन्धियुक्त रूप झालें असतें व त्यामुळें 'औड्' असा द्वितीयेच्या द्विवचनाचा डित् प्रत्यय आहे कीं काय असा संदेह उत्पन्न झाला असता व तो प्रत्यय डित् मानल्यानें 'अभस्यापि टेर्लोपो डिति' या वचनान्वयें त्याच्या प्रकृतीच्या 'टि' चा लोप होण्याची आपत्ति आली असतीं.) म्हणून वर दर्शविलेले दोन्ही प्रकारचें संदेह उत्पन्न न व्हावे याकरितां 'जस्' व 'शस्' हे जे दोन्ही प्रत्यय भिन्न अनुबन्ध लावून सानु-बन्धक पठित केले आहेत तसेंच करणें उचित ठरतें. द्वितीयेच्या द्विवचनाच्या प्रत्ययाला टकार हा जो अनुबन्ध लावला आहे तो अशाकरितां कीं, 'सुट्' हा प्रत्याहार साधतां यावा. (प्रथमेच्या एकवचनाचा 'सु' हा जो प्रत्यय प्रकृत सूत्राच्या आरंभीं पठित आहे त्याला 'औट्' यांतील टकार हा इत्संज्ञक वर्ण जोडला असतां 'सुट्' असा जो प्रत्याहार सिद्ध होतो त्यानें 'आदिरन्त्येन सहेता' सू. २ या सूत्रान्वयें पहिल्या पांच प्रत्ययांचें, म्हणजे सर्वनामस्थान प्रत्ययांचें, ग्रहण होतें व 'सुडनपुंसकस्य' सू. २२९ या सूत्रांत पाणिनीनें त्या प्रत्याहाराचा उपयोग केला आहे.) तृतीयेच्या एकवचनाच्या प्रत्य-याला टकारानुबन्ध जोडून तो प्रत्यय 'टा' असा जो पठित केला

आहे त्याचें प्रयोजन हें आहे कीं, 'टाङसिङसाम्' सू. २०१ या सूत्रांतील 'टा'ने त्याचें ग्रहण व्हावें. 'ङे' इत्यादि चार प्रत्ययांना, म्हणजे 'ङे, ङसि, ङस्, ङि' या चार प्रत्ययांना ङकारानुबन्ध जोडून ते प्रत्यय जे ङित् पठित केले आहेत त्याचें प्रयोजन हें आहे कीं, 'घेर्ङिति' सू. २४५ या सूत्रांतील 'ङिति' या पदानें त्या चारहि प्रत्ययांचें ग्रहण व्हावें. 'सुप्' या स्थलीं सप्तमीच्या बहुवचनाच्या 'सु' प्रत्ययाला पकार हा जो अनुबन्ध लावला आहे त्याचें (प्रयोजन हें नाहीं कीं, पित्त्वामुळें तो 'अनुदात्तौ सुप्पितौ' सू. ३७०९ या सूत्रानें अनुदात्त व्हावा; कारण तो सुप्त्वामुळें त्या सूत्रानें अनुदात्त आहेच. पककारानुबन्धाचें वास्तविक) प्रयोजन हें आहे कीं, (प्रातिपदिकाहून होणाऱ्या सर्व विभक्तिप्रत्ययांचा) 'सुप्' असा प्रत्याहार ('आदिरन्त्येन सहेता' या सूत्राच्या सहायानें) साधतां यावा (व या प्रत्याहाराचा उपयोग पाणिनीनें 'सुपः' सू. १८५, 'सुपि च' सू. १०२, 'ओः सुपि' सू. २८१ इत्यादि अनेक सूत्रांत केला आहे.) अशा रीतीनें प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या विभक्ति-प्रत्ययांना लावलेले सर्व अनुबन्ध सफल—सहेतुक किंवा सप्रयोजनक ठरत असून देखील ते अनुबन्ध संज्ञार्थ आहेत, म्हणजे त्यांना इत्संज्ञा व्हावी याकरितां ते लावले आहेत, असें जें प्रक्रियाकौमुदीकारांनीं म्हटलें आहे तें म्हणणें असङ्गत—चूक—ठरतें, व प्रक्रियाकौमुदीकारांनीं 'संज्ञार्थाः' हा जो शब्द वापरला आहे त्याचें 'सम्यग्ज्ञानं संज्ञा तदर्था विशेषणार्था इति यावत्' असें जें त्या शब्दाचे तुकडे पाडून (प्रकाशकारांनीं) जरी व्याख्यान केलें आहे तरी तें व्याख्यान क्लिष्ट असल्यामुळें, म्हणजे 'संज्ञार्थाः' या शब्दांतून तसा अर्थ सहज रीतीनें निघूं शकत नसल्यामुळें, त्या व्याख्यानाची उपेक्षा केली आहे. (प्रकृत सूत्रावरील प्रक्रियाकौमुदींत 'सुङस्योरूकारेकारौ जशटङपाश्चेत्संज्ञार्थाः' असें म्हटलें आहे व दीक्षितांनीं देखील प्रकृत सूत्रावरील कौमुदींत अशाच तऱ्हेची पंक्ति लिहिली आहे. फरक एवढाच कीं, दीक्षितांनीं इत्संज्ञार्थाः' या

ऐवजीं 'इतः' हा शब्द वापरला आहे. 'इत्संज्ञा अर्थः प्रयोजनं येषां ते' असा 'इत्संज्ञार्थाः' या पदाचा विग्रह आहे व त्याचा अर्थ हा आहे कीं, अनुबन्धांना इत्संज्ञा व्हावी याकरितां ते वरील प्रत्ययांना लावले आहेत. या शब्दावर दीक्षितांचा कटाक्ष आहे. त्यांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, अनुबन्ध इत्संज्ञक ठरतातच व त्यांना इत्संज्ञा व्हावी हें वास्तविक त्यांचें प्रयोजन नसून मनोरमेंत जीं प्रयोजनें सांगितलीं आहेत तीं ते अनुबन्ध लावण्याचीं प्रयोजनें आहेत, आणि दीक्षितांनीं जीं प्रयोजनें मनोरमेंत दिलीं आहेत तशींच प्रयोजनें प्रसादकारांनीं देखील प्रक्रियाकौमुदीवरील टीकेंत सांगितलीं आहेत. प्रकाशकारांनीं 'संज्ञार्थाः' या पदाचा 'सम्यग् ज्ञानं प्रयोजनं येषाम्' असा क्लिष्ट विग्रह करून प्रक्रियाकौमुदी-कारांच्या व्याख्यानाचें कसें तरी समर्थन केलें आहे. पण दीक्षित म्हणतात कीं, प्रकाशकारांनीं केलेली ही क्लिष्ट टीका उपेक्षार्ह आहे.)

शब्दरत्न—पञ्चम्याइत्यनुवृत्तेरिति । तृतीयाव्यावृत्तये इति भावः । टाङसीति । तत्रेकारानुच्चारणे इष्टस्य यथासंख्यस्यानापत्तिरिति भावः । ङित्त्वमिति । ततश्च टिलोपः स्यादिति भावः । विशेषणार्थ इति । तत्फलन्तु "सुपो सुलुक्" इति सूत्रेणाकारादेशे इनादेशाभावः । घेर्ङितीति । न च घेः सुपि गुण इत्येवास्तु "जसि च" इति नियमात्तु नाङिति प्रवृत्तिरिति वाच्यम्, पतय इत्यर्थं "जसि च" इत्यस्यावश्यकत्वात् ॥

'एकवचनस्य च इत्यत्र पञ्चम्या इत्यनुवृत्तेः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('एकवचनस्य च' सू. ३९६ या सूत्रांत 'पञ्चम्या अत्' या पूर्व सूत्रांतून 'पञ्चम्याः' या पदाची जी अनुवृत्ति केली आहे तिचें प्रयोजन हें आहे कीं, त्या योगानें) तृतीयेची व्यावृत्ति व्हावी. 'टाङसिङसाम्' सू. २०१ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'ङसि' या प्रत्ययांत इकार उच्चारला नसता तर इष्ट यथासङ्-

ख्यन्याय लागू न पडण्याची आपत्ति आली असती. ('ङसि' व 'ङस्' हे दोन्ही प्रत्यय 'ङस्' असेच उच्चारले असते तर 'ङस्'नें पञ्चमीच्या व षष्ठीच्या एकवचनाच्या प्रत्ययांचें ग्रहण झालें असतें व त्यामुळें 'टाङसोरिनात्स्याः' असें सूत्र करावें लागलें असतें आणि तसें सूत्र केलें असतें तर उद्देश्यांची संख्या दोन व विधेयांची संख्या तीन झाली असती व त्यामुळें 'यथासङ्ख्यमनुदेशः समानाम्' सू. १२८ हें सूत्र प्रवृत्त करतां आलें नसतें आणि 'ङसि'चे जागीं 'आत्' असा आदेश करतां आला नसता. त्याचप्रमाणें 'ङसिङ्योःस्मात्स्मिनौ' सू. २१६ या सूत्रांत देखील 'ङसि' चे जागीं 'ङस्' असें उच्चारण करावें लागलें असतें व त्या 'ङस्'नें षष्ठीच्या एकवचनाच्या प्रत्ययाचें देखील ग्रहण झालें असतें व त्याचेहि जागीं 'स्मात्' हा आदेश होण्याची आपत्ति आली असती.) 'औटो डित्वं सम्भाव्येत' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'औट्' प्रत्यय डित् मानल्यास, (तो प्रत्यय पुढें आला असतां, 'अभस्यापि टेर्लोपो डिति' या वचनान्वयें अङ्गाच्या) 'टि' चा लोप होण्याची आपत्ति येईल. (त्यामुळें 'शरद्+औ' या स्थलीं 'शरदौ' असें द्वितीयेच्या द्विवचनाचें इष्ट रूप न होतां, 'अद्' या 'टि' चा लोप होऊन 'शरौ' असें अनिष्ट रूप होईल.) 'टाटकारस्तु टाङसि इति विशेषणार्थः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें फल हें आहे कीं, 'सुपां सुलुक्' सू. ३५६१ या सूत्रानें (वैदिक प्रयोगांत विभक्तिप्रत्ययांचे जागीं) जो 'आ' असा आदेश होतो त्याचे जागीं ('टाङसि' या सूत्रानें होणारा) 'इन' आदेश होत नाहीं. (वेदांत 'सुप्' विभक्तिप्रत्ययांचे जागीं केव्हां केव्हां 'आ' असा आदेश केला जातो. उदाहरणार्थ श्रुतींत 'उभौ यन्तारौ' असें न म्हणतां 'उभा यन्तारौ' असें म्हटलें आहे. तसेंच 'सुरथौ रथीतमौ' असें न म्हणतां श्रुतींत 'सुरथा रथीतमा' असा प्रयोग केला आहे. जर तृतीयेच्या एकवचनाचा प्रत्यय 'टा' असा पठित न करितां 'आ' असा पठित केला असतां तर, 'सुपां सुलुक्' या

सूत्रानें होणाऱ्या 'आ'चे जागीं देखील 'इन' आदेश होण्याची आपत्ति आली असती.) 'घेर्ङिति' सू. २४५ या सूत्राऐवजीं 'घेः (सुपि गुणः)' असें सूत्र पठित करावें व 'जसि च' सू. ५४१ हें सूत्र नियमार्थ मानल्यानें 'घेः' हें सूत्र ङिद्भिन्न प्रत्यय पुढें आला असतां प्रवृत्त होऊं शकणार नाहीं असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'पतयः' हें रूप सिद्ध होण्याकरितां 'जसि च' हें सूत्र (नियामक न मानतां विधायक मानणें) आवश्यक आहे. (शंकाकाराची शंका अशी आहे कीं, 'घेर्ङिति' असें सूत्र न करितां 'घेः' एवढेंच जरी सूत्र केलें तरी, त्या सूत्रांत 'सुपि च' या पूर्व सूत्रांतून 'सुपि' या पदाची व तसेंच 'ह्रस्वस्य गुणः' या पूर्व सूत्रांतून 'गुणः' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें 'घेः सुपि गुणः' या अर्थाचें वाचक 'घेः' हें सूत्र होईल आणि 'जसि च' हें सूत्र नियमार्थक मानलें व 'ङिद्भिन्ने प्रत्यये परे गुणश्चेत् जसि एव' असें नियमाचें स्वरूप न मानतां, टीकाकारांनीं सांगितल्याप्रमाणें, 'अनुनासिकवर्णाघटितगुणाद्येकवचनेतरस्मिन् सुपि गुणश्चेद् जसि एव,' म्हणजे ज्या प्रत्ययामध्यें अनुनासिकवर्ण नाहीं व जो 'अ, ए' किंवा 'ओ' या गुणसंज्ञक वर्णानें सुरू होणारा 'सुप्' प्रत्यय असून एकवचनाचा प्रत्यय आहे तसा प्रत्यय खेरीज करून इतर विभक्ति-प्रत्यय घिसंज्ञक अङ्गापुढें आल्यास त्या अङ्गाच्या अन्त्य वर्णाला जर गुण होणें असेल तर तो गुण 'जस्' प्रत्यय पुढें असतांनाच व्हावा, असें नियमाचें स्वरूप मानलें तर, एकवचनाचें 'ङे, ङसि, ङस्, ङि' हे जे चार प्रत्यय ङित् केले आहेत ते ङित् करण्याची कांहीं गरज राहत नाहीं व या चार ङित् पठित केलेल्या प्रत्ययांपैकीं 'ङे, ङसि, ङस् = ए, अस्, अस्' हे तीन एकवचनाचे प्रत्यय 'ए' व 'अ' या गुणसंज्ञक वर्णांनीं सुरू होणारे असून त्यांत अनुनासिक वर्ण नसल्यामुळें, ते प्रत्यय घिसंज्ञक अङ्गापुढें आले असतां, गुण होऊन इष्ट रूपें सिद्ध होतीलच. हें खरें कीं, वरील

नियम मानल्यानें सप्तमीच्या एकवचनाचा 'ङि = इ' हा प्रत्यय गुणसंज्ञक वर्णानें सुरू होणारा नसल्यामुळें, तो प्रत्यय घिसंज्ञक अङ्गापुढें आला असतां, अङ्गाच्या अन्त्य वर्णाला गुण होणार नाहीं. पण ती इष्टापत्तीच आहे; कारण 'अच्च घे:' सू. २४७ हें गुणाचें बाधक सूत्र असल्यामुळें सप्तमीच्या एकवचनाचा प्रत्यय घिसंज्ञक अङ्गापुढें आला असतां, त्या अङ्गाच्या अन्त्य वर्णाला गुण न होतां इष्ट रूप सिद्ध होतें. उदाहरणार्थ 'हरि + ङि' या स्थलीं 'हरि' या घिसंज्ञक अङ्गांतील अन्त्य वर्णाचे जागीं 'अच्च घे:' या सूत्रानें अकार व ङिप्रत्ययाचे जागीं 'औ' असा आदेश केल्यानें 'हर+औ' अशी स्थिति होऊन 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सूत्रानें वृद्धिरूप एकादेश केला असतां, 'हरौ' असें इष्ट रूप सिद्ध होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. वरील नियमांत 'अनुनासिकवर्णाघटित' हें पद घातलें असल्यामुळें, 'अम्' हा द्वितीयेच्या एकवचनाचा प्रत्यय जरी 'अ' या गुणसंज्ञक वर्णानें सुरु होणारा प्रत्यय आहे तरी तो प्रत्यय 'म्' या अनुनासिक वर्णानें युक्त असल्यामुळें, वरील नियमान्वयें त्याची व्यावृत्ति होते. तसेंच वरील नियमांत 'एकवचन' हा शब्द घातला असल्यामुळें, द्वितीयेच्या बहुवचनाचा 'शस् = अस्' प्रत्यय व त्याचप्रमाणें षष्ठी व सप्तमी यांच्या द्विवचनाचे 'ओस्' हे प्रत्यय जरी गुणसंज्ञक वर्णानें सुरू होणारे प्रत्यय आहेत तरी त्यांची व्यावृत्ति होते. तसेंच वरील नियमांत 'गुणादि' हा शब्द घातला असल्यामुळें, जे 'टा' इत्यादि अजादि प्रत्यय गुणसंज्ञक वर्णानें सुरु होत नाहींत किंवा जे हलादि प्रत्यय आहेत त्यांचीहि व्यावृत्ति होते. सारांश वरील नियम मानल्यास कोणताहि 'सुप्' प्रत्यय ङित् करण्याची आवश्यकता राहत नाहीं असें शंकाकाराचें म्हणणें आहे. ही शंका करितांना शंकाकार असें गृहीत धरून चालतो कीं, 'जसि च' हें गुणविधायक सूत्र घिसंज्ञक प्रकृतीलाच लागू पडणारें सूत्र आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'जसि च' हें सूत्र घिसंज्ञक प्रकृतीलाच लागू पडणारें सूत्र नसून,

ज्या ऱ्हस्वान्त प्रकृति घिसंज्ञक नाहींत त्यांना देखील लागू पडणारें तें सूत्र आहे. उदाहरणार्थ 'पतिः समासे एव' सू. २५७ या सूत्रान्वयें 'पति' हा शब्द समासाच्या अन्तीं असला तरच त्याला घिसंज्ञा होते व केवळ 'पति' शब्दाला घिसंज्ञा होत नाहीं. त्यामुळें 'घेः' असें 'घेर्ङिति' या सूत्राऐवजीं सूत्र केलें व 'जसि च' हें त्याचें नियामक सूत्र मानलें तर, 'पति + जस्' या स्थलीं 'पति' हा शब्द घिसंज्ञक नसल्यामुळें, त्यांतील अन्त्य इकाराला गुण होणार नाहीं आणि 'पतयः' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. म्हणून तें रूप सिद्ध होण्याकरितां 'जसि च' हें स्वतंत्र विधायक सूत्र मानणें आवश्यक आहे; आणि तें सूत्र नियामक न मानतां विधायक मानलें असतां, शंकाकारानें त्या सूत्रांतून जो नियम काढला आहे तो निघूंच शकत नाहीं. सारांश पाणिनीनें चार प्रत्ययांना जें ङित् केलें आहे तें अगदीं योग्य आहे व ते ङित् केले असल्यामुळें, 'घेर्ङिति' या सूत्रांतील 'ङिति' या पदानें त्यांचें ग्रहण होऊन इष्ट रूपें सिद्ध होतात आणि शंकाकारानें केलेली शंका अयोग्य ठरते.)

मनोरमा–'सुपः' ।। तिङस्त्रीणि त्रीणि" इति सूत्रात् त्रीणि त्रीणि इति पदं "तान्येकवचन–" इत्यादि सूत्रं च सम्पूर्णमनुवर्तत इति व्याचष्टे । सुपस्त्रीणि त्रीणीत्यादिना । एकश इति । एकैकमित्यर्थः । "सङ्ख्यैकवचनाच्च" इति वीप्सायां प्रथमान्तात् शस् । यत्तु प्राचा एकैकश इत्युक्तम्, तदयुक्तम्, शसैव वीप्साया उक्तत्वेन द्विर्वचना-योगात्, येन नाप्राप्तिन्यायेन द्विर्वचनापवादः शस् इति सिद्धान्तात् ।

यत्त्वाहुः "सर्वस्य द्वे" इत्यत्र एकैकशो ददातीति भाष्यप्रयोगात् "तान्येक" इति सूत्रे एकश इति सूत्रकारनिर्देशाच्चोभयं साध्विति, तन्न, उदाहृतभाष्यस्यान्यविषयत्वात् । "यत्र तद्धितेनानुक्ता वीप्सा भवति तत्र द्विर्वचनं" इत्युपक्रम्य हि "तद्यथा एकैकशो ददाति" इति भाष्ये उदाहृतम् । व्याख्यातं च कैयटेन अल्पार्थोऽप्येकशब्दोऽस्ति तस्य वीप्सायां द्विर्वचने "बह्वल्पार्थात्–" इति शस्प्रत्यय इति । न चैषोऽर्थः प्रकृते सम्भवतीत्यास्तां तावत् ।

'सुपः' सू. १८५ या सूत्रांत 'तिङस्त्रीणि त्रीणि' सू. २१६० या पूर्व सूत्रांतून 'त्रीणि त्रीणि' या पदांची अनुवृत्ति होते आणि त्याचप्रमाणें 'तान्येकवचनद्विवचनबहुवचनान्येकशः' सू. २१६१ या संपूर्ण पूर्व सूत्राची अनुवृत्ति होते. त्यामुळें कौमुदींत 'सुपः' या प्रकृत सूत्राचें 'सुपस्त्रीणि त्रीणि वचनान्येकश एकवचनद्विवचनबहुवचनसंज्ञानि स्युः' असें व्याख्यान केलें आहे. ('तान्येकवचन' सू. २१६१ या सूत्रांतील) 'एकशः' या पदाचा 'एकैकम्' असा अर्थ आहे. 'एकशः' या स्थलीं 'सङ्ख्यैकवचनाच्च वीप्सायाम्' सू. २११० या सूत्रानें 'वीप्सा' या अर्थामध्यें 'एक' या शब्दाच्या प्रथमेहून तद्धित 'शस्'प्रत्यय झाला आहे. ('एक सु शस्' हा समुदाय तद्धितान्त असल्यामुळें, 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊन व 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'सु' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा लुक् होऊन 'एकशः' हें रूप सिद्ध झालें आहे व 'तद्धितश्चासर्वविभक्तिः' सू. ४४८ या सूत्रांत 'शस्-प्रभृतयःप्राक् समासान्तेभ्यः' असें जें परिगणन केलें आहे त्या परिगणनान्वयें 'एकशः' हा शस्प्रत्ययान्त शब्द अव्ययसंज्ञक ठरतो.) प्रक्रियाकौमुदिकारांनीं ('सुपः' या प्रकृत सूत्राचें 'सुपस्त्रीणि त्रीणि पदान्येकैकश एकवचनद्विवचनबहुवचनसंज्ञानि स्युः' असें व्याख्यान करितांना) 'एकैकशः' या पदाचा जो प्रयोग केला आहे तो चूक आहे; कारण 'शस्' या प्रत्ययानेंच 'वीप्सा' या अर्थाचा बोध केला असल्यामुळें (पुन्हा तोच अर्थ सांगण्याकरितां 'नित्यवीप्सयोः' सू. २१४० या सूत्रानें 'एक' या शब्दाचें) द्विर्वचन करतां येऊं शकत नाहीं. 'येन नाप्राप्ते'–परि. ५८–या परिभाषान्वयें वीप्सार्थक 'शस्'प्रत्यय द्विर्वचनाचा अपवादक–बाधक–ठरतो असा सिद्धान्त मानला आहे. ('नित्यवीप्सयोः' या सूत्रानें जर वीप्सा गम्यमान असतां सर्वत्र द्विर्वचन केलें तर, 'सङ्ख्यैकवचनाच्च वीप्सायाम्' सू. २११० हें सूत्र प्रवृत्त होण्यास कोणतेंहि स्थल मिळणार नाहीं व अशा रीतीनें तें सूत्र अनवकाश ठरण्याची

आपत्ति येत असल्यामुळें, तें सूत्र अनवकाशत्वामुळेंच, 'येन नाप्राप्ते' या न्यायान्वयें 'नित्यवीप्सयोः' या सूत्राचें बाधक ठरतें. त्यामुळें 'सङ्ख्यैकवचनाच्च' या सूत्रानें 'एक' या संख्यावाचक शब्दाहून वीप्सार्थक 'शस्' प्रत्यय केला असतां, पुन्हा तोच वीप्सारूप अर्थ सांगण्याकरितां 'एक' या शब्दाचें द्विर्वचन करतां येत नाहीं; कारण 'उक्तार्थानामप्रयोगः' हा न्याय प्रसिद्ध आहे. म्हणून द्विर्वचन करतां येते किंवा द्विर्वचन न केल्यास 'शस्' प्रत्यय करतां येतो. शस् प्रत्यय व द्विर्वचन हे दोन्ही एकेचवेळीं करतां येत नाहींत. त्यामुळें 'एकैकशः' हें रूप सिद्ध होऊं शकत नाहीं व 'एकशः' किंवा 'एकैकम्' असेंच रूप सिद्ध होऊं शकतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'एकैकम्' हें रूप 'एकं बहुव्रीहिवत्' सू. २१४४ या सूत्रानें सिद्ध होतें.) प्रकाशकारांचें असें म्हणणें आहे कीं, 'सर्वस्य द्वे' सू. ८-१-१ या सूत्रावरील भाष्यांत 'एकैकशो ददाति' असा भाष्यकारांनीं प्रयोग केला असल्यामुळें व 'तान्येकवचन' सू. २१६१ या सूत्रांत पाणिनीनें 'एकशः' असा निर्देश केला असल्यामुळें, 'एकैकशः' व 'एकशः' हीं दोन्ही रूपें साधु ठरतात. पण हें त्यांचें म्हणणें बरोबर नाहीं; कारण त्यांनीं ज्या भाष्यांतील प्रयोगाचें वर उदाहरण दिलें आहे तें भाष्य भिन्न विषयासंबंधाचें भाष्य आहे. त्या भाष्यांत 'यत्र तद्धितेनानुक्ता वीप्सा भवति तत्र द्विर्वचनम्' असा उपक्रम करून 'तद्यथा एकैकशो ददाति' असें भाष्यांत उदाहरण दिलें आहे व त्या भाष्याचें व्याख्यान करितांना कैयटानें असें म्हटलें आहे कीं, 'एक' हा शब्द 'अल्प' या अर्थाचा देखील वाचक आहे व त्या अल्पार्थवाचक 'एक' या शब्दाचें ('नित्यवीप्सयोः' या सूत्रानें) 'वीप्सा' हा अर्थ द्योतित करण्याकरितां द्विर्वचन केल्यावर नंतर 'बव्हल्पार्थात् शस् कारकादन्यतरस्याम्' सू. २१०९ या सूत्रानें (द्विर्वचन करून सिद्ध झालेल्या 'एकैक' या शब्दाहून स्वार्थे) 'शस्' प्रत्यय केला आहे. प्रकृत स्थलीं 'एकैकशः' या शब्दाचा तसा अर्थ—'अल्प' हा अर्थ—होणें

संभवत नाहीं. या विषयासंबंधानें एवढें पुरें. ('सर्वस्य द्वे' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'तद्धितेनोक्तत्वाद्वीप्साया द्विर्वचनं न भविष्यति । तद्धितः खल्वपि वीप्सायामित्युच्यते । यत्र च तद्धितेनाऽनुक्ता वीप्सा भवति तत्र द्विर्वचनम् । तद्यथा—एकैकशो ददातीति ।' असें म्हटलें आहे व या भाष्याचें व्याख्यान करितांना कैयटानें 'तद्धितस्य स्वार्थिकत्वादभिव्यक्तिरेवोक्तिरवसेया । एकैकश इति । केचिदाहुः—अल्पार्थोऽप्येकशब्दोऽस्ति, तस्य वीप्सायां द्विर्वचने कृते बव्हल्पार्थादिति शस्प्रत्ययः ।' असें म्हटलें आहे आणि या वरील भाष्याचा भावार्थ सांगतांना उद्योतकारांनीं 'तस्मादयमत्र भाष्यार्थः—सङ्ख्यैकवचनाच्चेत्यत्र चस्य वीप्सायामित्यनेन सम्बन्धाद्वीप्सायां स्वार्थे च शसित्यर्थः । तत्र स्वार्थिकोऽभिधानस्वाभाव्यादेकशब्दात्कृतद्विर्वचनैकैकशब्दाच्च । तेन नातिप्रसङ्गः । एवं चैकशब्दप्रकृतिकशसः स्वार्थिकत्वस्यापि सत्वेन न ततो नियमेन वीप्सोक्तिरिति, तत्र वीप्साशसभावपक्षे द्विर्वचने कृते ततः स्वार्शथिकसिति । अत्र चेदं भाष्यमेव मानम् ।' असें म्हटलें आहे. कैयटानें वरील भाष्याचें व्याख्यान करितांना 'एक' हा शब्द अल्पार्थक देखील आहे असें जें म्हटलें आहे तें कैयटाचें मत नसून इतरांचें मत आहे व कैयटानें 'केचिदाहुः' हीं अरुचिप्रदर्शक पदें वापरलीं असल्यामुळें, कैयटाला तो अर्थ मान्य नाहीं हें दिसून येतें व उद्योतांत सांगितल्याप्रमाणें त्याचें कारण हें कीं, 'अत्राऽरुचिबीजं तु तस्याऽल्पार्थत्वे न मानम्.' उद्योतकारांच्या वरील म्हणण्याचा भावार्थ हा आहे कीं, 'सङ्ख्यैकवचनाच्च' या सूत्रांतील 'च' या शब्दानें, जसा त्या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें वीप्सार्थक 'शस्' प्रत्यय होतो तसाच, स्वार्थे 'शस्' प्रत्यय देखील होतो. तो स्वार्थे 'शस्' प्रत्यय जसा 'एक' या संख्यावाचक शब्दाहून होतो तसाच त्या 'एक' शब्दाचे 'नित्यवीप्सयोः' या सूत्रानें 'एकैक' असें द्विर्वचन केल्यावर तशा 'एकैक' शब्दाहून देखील होऊं शकतो. अशा रीतीनें 'एकैकशः' या स्थलीं 'शस्' हा प्रत्यय वीप्सार्थक

न मानतां स्वार्थिक मानल्यानें, 'एकैकशः' हा प्रयोग साधु ठरतो. परंतु 'शस्' हा प्रत्यय स्वार्थिक न होतां वीप्सार्थकच होतो असें दीक्षितांचें म्हणणें दिसतें आणि म्हणून ते म्हणतात कीं, एकदां वीप्सार्थद्योतक द्विर्वचन करून 'एकैक' हा शब्द सिद्ध केल्यावर पुन्हा त्याहून वीप्सार्थकद्योतक 'शस्' प्रत्यय करणें हें 'उक्तार्थानामप्रयोगः' या न्यायाविरुद्ध आहे. या विषयाचें अधिक विवरण शब्दरत्नांत केलें जाईल.)

शब्दरत्न– तान्येकेति । तत्रानुवृत्ततानीत्यस्य लब्धव्याकरणान्तरोक्तप्रथमादिसञ्ज्ञानीत्यर्थः ।

वीप्सायां द्विर्वचने इति । शसः कारकाद्विधानेन, मङ्गलामङ्गलरूपार्थापेक्षणेन च बहिरङ्गतया द्विर्वचने कृते शस् इति भावः । यद्यपि क्वचिदुक्तार्थानामपि प्रयोगो भवति, तथाऽपि यत्र तद्धितेनानुक्ता वीप्सा भवति तत्र द्विर्वचनम् । यथैकैकशो ददातीत्यादिभाष्योक्त्या, अल्पार्थैकैकशब्दद्वीप्सायां द्विर्वचनने "बह्वल्पार्थात्–" इति शसिति कैयटोक्त्या च प्रकृते तद्वक्तुमशक्यम् । न चैवं 'ऋषिसहस्रमेकां कपिलामेकैकशः सहस्रकृत्वो दत्त्वा तया ते सर्वे सहस्रदक्षिणाः सम्पन्नाः" इति "अइउण्" सूत्रस्थभाष्ये एकैकश इति प्रयोगासङ्गतिरिति वाच्यम् । एकेति प्राधानार्थकसम्बोधनसत्त्वेनैकश इत्यस्य प्रत्येकमित्यर्थकत्वेनादोषात् । एतद्भाष्यप्रामाण्येन स्वार्थिकद्विर्वचनकल्पनापेक्षया मदुक्तस्यैव न्याय्यत्वात् । किं च नायं भाष्यप्रयोगः, किं तु गौण्यप्युत्तरा संख्या पूर्वां संख्यां बाधते इत्यत्र श्रौतो वा स्मार्तो वाऽयं व्यवहारो दृष्टान्तत्वेनोक्तो भगवतेति तत्र च्छान्दसत्त्वान्न दोषः । "एकैकशः पितृसंयुक्तान्" इत्यादिवदितिदिक् ।

'तान्येकवचन' सू. २१६१ हें जें सूत्र प्रकृत सूत्रांत अनुवृत्त होतें त्यांतील 'तानि' या पदाचा, ज्यांना (पाणिनिकालपूर्व) इतर व्याकरणग्रन्थांत 'प्रथमा, द्वितीया' इत्यादि सांगितलेल्या

संज्ञा प्राप्त झाल्या आहेत अशीं त्रिकें, असा अर्थ आहे. 'सर्वस्य द्वे' ८–१–१ या सूत्रावरील भाष्याच्या वृत्तींत कैयटानें 'तस्य वीप्सायां द्विर्वचने बव्हल्पार्थात् इति शस् प्रत्ययः', म्हणजे 'वीप्सा' या अर्थामध्यें 'एक' या शद्वाचें प्रथम द्विर्वचन होऊन नंतर 'बह्वाल्पार्थात्' सू. २१०९ या सूत्रानें 'शस्' प्रत्यय होतो, असें जें म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('बव्हल्पार्थात् शस् कारकात्' सू. २१०९ या सूत्रानें होणारा) 'शस्' प्रत्यय हा कारकविभक्तीहून होण्याचें विधान केलें असल्यामुळें, म्हणजे त्याला कारकाची अपेक्षा असल्यामुळें, आणि तसेंच ('बव्हल्नार्थान्मङ्गलामङ्गलवचनम्'–सू. २१०९ वरील वार्तिक-या वार्तिकान्वयें) त्या 'शस्' प्रत्ययाला 'मङ्गल, अमङ्गल' या बाह्य अर्थाची अपेक्षा असल्यामुळें (आणि 'सङ्ख्यैकवचनाच्च' सू. २११० या सूत्रानें होणाऱ्या द्विर्वचनाला केवळ संख्येची अपेक्षा असल्यामुळें, अल्पनिमित्तक द्विर्वचनाच्या मानानें बहुनिमित्तक) 'शस्' प्रत्यय बहिरङ्ग ठरतो व त्यामुळें द्विर्वचन प्रथम केल्यानंतर 'शस्'प्रत्यय होतो. जरी क्वचित् स्थलीं–'द्वौव्यतिलुनीते' इत्यादि स्थलीं–उक्तार्थाचा देखील पुन्हा प्रयोग होतो तरी, जेथें तद्धित प्रत्ययानें वीप्सेचा बोध केला नाहीं तशाच स्थलीं, उदाहरणार्थ 'एकैकशो ददाति' इत्यादि स्थलीं, द्विर्वचन करतां येतें असें भाष्यकारांनी म्हटलें असल्यामुळें व तसेंच अल्पार्थवाचक 'एक' या शब्दाचें 'वीप्सा' या अर्थामध्यें प्रथम द्विर्वचन केल्यावर नंतर 'बव्हल्पार्थात्' या सूत्रानें 'शस्'प्रत्यय केला जातो असें 'कैयटानें' म्हटलें असल्यामुळें, (प्रक्रियाकौमुदींत जो प्रकृत सूत्रावरील वृत्तींत 'एकैकशः' या पदाचा प्रयोग केला आहे त्या) प्रकृत प्रयोगासंबंधानें ('एकैकशो ददाति' या भाष्यांतील प्रयोगासंबंधानें जें कैयटानें म्हटलें आहे) तसें म्हणतां येणें शक्य नाहीं; (कारण प्रक्रियाकौमुदीकारांनीं 'एकैकशः' या प्रकृत स्थलीं 'एक' या शब्दाचा 'अल्प' या अर्थामध्यें उपयोग केला नसून एकत्वरूप संख्या या अर्थामध्यें उपयोग

केला आहे. म्हणून 'बव्हल्पार्थात्' हें सूत्र प्रकृत स्थलीं लागू पडत नसल्यामुळें, त्या सूत्रानें होणारा 'शस्'प्रत्यय प्रकृत स्थलीं करतां येत नाहीं; कारण प्रकृत स्थलीं 'वीप्सा' या अर्थामध्यें द्विर्वचन केलें असल्यामुळें, तोच अर्थ पुन्हा बोधित करण्याकरितां, 'उक्तार्थानामप्रयोगः' या न्यायान्वयें, 'शस्'प्रत्यय करतां येत नाहीं. हें खरें कीं, 'व्यतिलुनीते' या उदाहरणांत 'व्यति' या उपसर्गसमुदायानें कर्मव्यतिहाररूप अर्थ द्योतित केला असून देखील पुन्हा तोच अर्थ द्योतित करण्याकरितां 'कर्तरि कर्मव्यतिहारे' सू. २६८० या सूत्रानें आत्मनेपदिप्रत्यय केला आहे व अशा रीतीनें 'उक्तार्थानामप्रयोगः' हा न्याय 'व्यतिलुनीते' या उदाहरणांत व्यभिचरित झाला असल्यामुळें तो न्याय नित्य आहे असें मानतां येत नाहीं. तरी पण 'यत्र च तद्धितेनाऽनुक्ता वीप्सा भवति तत्र द्विर्वचनम्' असें 'सर्वस्य द्वे' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं स्पष्ट म्हटलें असल्यामुळें, त्या न्यायाचा व्यभिचार प्रकृत स्थलीं करतां येत नाहीं. म्हणून जेथें 'एक' या शब्दाहून वीप्सार्थक 'शस्' प्रत्यय केला नसेल तेथेंच द्विर्वचन करतां येतें व जेथें वीप्सार्थक 'शस्' प्रत्यय केला असेल तेथें द्विर्वचन करतां येत नाहीं, व त्या स्थलीं 'एकशः' असाच प्रयोग होऊं शकतो. जेथें वीप्सार्थक द्विर्वचन केलें असेल तेथें वीप्सार्थक 'शस्' प्रत्यय पुन्हा करतां येत नसल्यामुळें, तशा स्थलीं 'एकैकशः' असा प्रयोग न होतां 'एकैकम्' असाच प्रयोग होऊं शकतो.) पण वरील म्हणणें बरोबर मानल्यास, 'अइउण्' या शिवसूत्रावरील भाष्यांत 'ऋषिसहस्रमेकां कपिलामेकैकशः सहस्रकृत्वो दत्त्वा तया ते सर्वे सहस्रदक्षिणाः सम्पन्नाः' असें जें म्हटलें आहे त्यांतील 'एकैकशः हा प्रयोग चूक ठरण्याची आपत्ति येते असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'एकैकशः' या प्रयोगांतील 'एक' हें पद संख्या या प्रधान अर्थाच्या वाचक 'एक' या शब्दाचें संबोधन असून 'एकशः' हें भिन्न पद आहे व त्या पदाचा 'प्रत्येकम्' असा अर्थ आहे (आणि अशा

रीतीनें 'एकैकशः' हें एक पद नसून दोन भिन्न पदांचें सन्धियुक्त रूप आहे व या स्थलीं 'एक' या शब्दाचें द्विर्वचन न करितां त्या 'एक' शब्दाहून वीप्सार्थक 'शस्' प्रत्यय केला आहे) असें मानल्यानें कांहीं दोष येत नाहीं. ('त्यदादीनां सम्बोधनं नास्ति' हें वचन असल्यामुळें व 'एक' हा शब्द त्यदादिगणांत पठित असल्यामुळें, त्याचें संबुद्धीचें रूप होऊं शकत नाहीं असें कोणी म्हटल्यास, त्यावर उत्तर हें आहे कीं 'हे स' असा 'तद्' या सर्वनामाच्या संबुद्धीचा पुल्लिङ्गांत केलेला प्रयोग भाष्यांत आढळत असल्यामुळें, वरील नियम सार्वत्रिक मानतां येत नाहीं आणि त्यामुळें 'हे एक' असें 'एक' या शब्दाचें संबुद्धीचें रूप होऊं शकतें.) 'स्वार्थे' या अर्थामध्यें प्रथम द्विर्वचन करून नंतर 'वीप्सा' या अर्थामध्यें 'शस्' प्रत्यय केल्यानें ('उक्तार्थानामप्रयोगः' हा न्याय बाधित न होतां) वरील भाष्यांत केलेला 'एकैकशः' हा प्रयोग, तें भाष्य प्रमाणभूत असल्यामुळें, शुद्ध ठरतो असें कोणी म्हटल्यास, त्याला उत्तर हें आहे कीं, 'स्वार्थे' या अर्थामध्यें द्विर्वचन करतां येतें अशी कल्पना करण्यापेक्षां ('एकैकशः' या शब्दाची 'एक एकशः' अशीं दोन भिन्न पदें पाडून वर) जें आम्ही व्याख्यान केलें आहे तेंच मानणें अधिक योग्य–न्याय्य–ठरतें; (कारण स्वार्थिक 'स्वार्थे' या अर्थामध्यें द्विर्वचन करणें कोठेंहि व्याकरणशास्त्रांत सांगितलें नसून 'वीप्सा' इत्यादि अर्थांमध्येंच द्विर्वचन होणें सांगितलें आहे. म्हणून शंका-काराची शंका अयोग्य ठरते. त्याचप्रमाणें 'एकैकशः' या स्थलीं प्रथम वीप्सार्थक द्विर्वचन करून नंतर 'स्वार्थे' या अर्थामध्यें तद्धित 'शस्' प्रत्यय केला आहे असें देखील मानतां येत नाहीं; कारण अत्यन्तस्वार्थिक 'शस्' प्रत्यय होतो असें मानल्यास, तो अन्तरङ्ग ठरून प्रथम होईल व तशा शस् प्रत्ययान्त शब्दाचें नंतर द्विर्वचन केल्यास 'एकैकशः' असें रूप न होतां, वेगळेंच अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल. पण 'एकैकशः' याची वर सांगितल्या-

प्रमाणें 'एक, एकशः' अशीं भिन्न पदें पाडल्यास कोणताहि दोष येत नसल्यामुळें, त्याच मार्गाचें अवलंबन करणें योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) दुसरें असें कीं, वरील भाष्यांत आढळणारा प्रयोग भाष्यकारांनीं स्वतः केलेला प्रयोग नसून, उत्तर संख्या अप्रधान असली तरी देखील ती पूर्व संख्येचा बाध करते हा न्याय सिद्ध करण्याकरितां भाष्यकारांनीं दृष्टान्तरूपानें श्रौत किंवा स्मार्त व्यवहाराचें उदाहरण दिलें आहे व तो वैदिक प्रयोग असल्यामुळें, (दृष्टानुविधिः छन्दसि' या वचनान्वयें) 'एकैकशः पितृसंयुक्तान्' इत्यादि वैदिक प्रयोगांप्रमाणें, दोषरहित मानतां येतो. (परंतु जरी वेदांत जसा प्रयोग आढळतो तसा प्रयोग शुद्ध मानणें भाग आहे तरी 'एकैकशः' हा प्रयोग भाषेंत मात्र शुद्ध मानतां येत नाहीं. 'अइउण्' या शिवसूत्रांतील वरील भाष्याचा उद्योतकारांनीं जो आशय दिला आहे तो अवश्य वाचावा. तो बराच लांब असल्यामुळें व या विषया-संबंधानें उद्योतकारांचें म्हणणें पूर्वीं एकदां सांगितलें असल्यामुळें, येथें तो विस्तारभयास्तव देतां येत नाहीं.)

मनोरमा— राम इति । सञ्ज्ञाशब्दोऽयमव्युत्पन्न इति पक्षे ऽर्थवत्सूत्रेण प्रातिपदिकसञ्ज्ञा । "करणाधिकरणयोश्च" इत्यधिकारे घापवादेन "हलश्च" इति घञा रमन्तेऽस्मिन्निति व्युत्पादने तु "कृत्तद्धित–" इति सूत्रेणेति विवेकः ।

('बहुषुबहुवचनम्' सू. १८७ या सूत्रावरील कौमुदींत 'रामः' असें जें 'राम' या प्रातिपदिकाचें प्रथमेच्या एकवचनाचें रूप दिलें आहे त्यांत) 'राम' हा शब्द संज्ञेचा—नांवाचा—वाचक असून अव्युत्पन्न आहे, म्हणजे कोणत्याहि धातूहून 'कृत्' प्रत्यय होऊन सिद्ध झालेला शब्द नाहीं, असा पक्ष मानल्यास, या पक्षांत 'राम' या शब्दाला 'अर्थवद-धातुरप्रत्ययः' सू. १७८ या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होते. परंतु 'करणाधिकरणयोश्च' या अधिकारांत पठित असलेल्या व 'पुंसि

संज्ञायां घ: प्रायेण' सू. ३२९६ या घप्रत्ययविधायक सूत्राचें अपवादक असलेल्या 'हलश्च' सू. ३३०० या सूत्रानें 'रम्' या धातूहून 'अधिकरणे' या अर्थामध्यें 'घञ्' प्रत्यय होऊन 'रमन्ते अस्मिन्' अशा व्युत्पत्तीनें 'राम' हा शब्द सिद्ध झाला आहे असें मानल्यास या पक्षांत 'राम' या कृदन्त व्युत्पन्न प्रातिपदिकाला 'कृत्तद्धितसमासाश्च' सू. १७९ या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होते असा या दोन पक्षांत–अव्युपत्तिपक्ष व व्युत्पत्तिपक्ष या दोन पक्षांत–फरक आहे. (कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, 'गन्धर्व: शरभो राम: सृमरो गवय: शश:। इत्यादयो मृगेन्द्राद्या गवाद्या: पशु-जातय: ।।' या अमरकोशांतील श्लोकान्वयें जेव्हां 'राम' या शब्दाचा पशुविशेष या अर्थामध्यें प्रयोग केला जातो तेव्हां त्या अर्थांत रूढ असलेल्या त्या 'राम' शब्दाला 'अर्थवदधातु:' या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होते व जेव्हां 'प्रभु रामचन्द्र' या अर्थांत त्या शब्दाचा प्रयोग केला जातो तेव्हां 'रमन्ते योगिन: अस्मिन्' या व्युत्पत्तीचा आश्रय केल्यानें त्या कृदन्त यौगिक शब्दाला 'कृत्तद्धित' या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञा होते, आणि अशा रीतीनें या दोन पक्षांत 'राम' या शब्दाच्या अर्थामध्यें फरक होतो.)

शब्दरत्न– रमन्तेऽस्मिन्निति । योगिन इष: ।।

'रमन्तेऽस्मिन्' या मनोरमेंतील पंक्तींत 'योगिन:' हें पद अध्याहृत आहे, म्हणजे 'रमन्ते योगिन: अस्मिन्' अशी 'राम' या शब्दाची व्युत्पत्ति आहे. (यावरून शब्दरत्नकार हें ध्वनित करितात कीं, दीक्षितांनीं 'राम' या शब्दाची जी व्युत्पत्ति दिली आहे ती 'रमन्ते योगिनोऽनन्ते सत्यानन्दे चिदात्मनि । इति रामपदेनासौ परं ब्रह्माभिधीयते ।।' या अगस्तिसंहितेंतील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें दिली आहे.)

मनोरमा– "सरूपाणामेकशेष एकविभक्तौ" ।। एकविभक्तौ-यानीति विभक्ति: सारूप्ये उपलक्षणं न त्वेकशेषे निमित्तम् । एवं

चानैमित्तिकत्वेनान्तरङ्गोऽयमेकशेषः सुबुत्पत्तेः प्रागेव प्रवर्त्तते। यद्येतन्नारभ्येत तर्हि प्रत्येकं विभक्तिः स्यात्, द्वन्द्वश्च प्रवर्तेत। आरब्धे त्वेकशेषेऽनेकसुबन्तविरहाद् द्वन्द्वस्याप्राप्तिरेव फलिता भवतीति भावः। सरूपाण्येवेति। एतच्चोत्तरसूत्रस्थैवकारस्येहानुकर्षणाल्लभ्यते तेन मातृशब्दयोर्जननीवाचिपरिच्छेत्तृवाचिनोर्नैकशेषः। मातृभ्यामित्यादौ सारूप्येऽपि औजसादिषु वैरूप्यात्। एक एवेति। एतच्च सहविवक्षायामेव प्रवर्तते। इतरेतरयोगद्वन्द्वस्य विषय इति यावत्। यत्र ह्यनेकस्यार्थस्य मिलितस्येतरान्वयः स तथाभूतोऽस्य विषयः। इदं च "इदितो नुम् धातोः" इति लिङ्गाल्लभ्यते न्यायाच्च। तथाहि—यः शिष्यते स लुप्यमानार्थाभिधायीति स्थिते श्रूयमाणैकशब्दोपस्थितं सर्वमविशेषादेकरूप्येणैवान्वेतुमर्हति। यद्वा पूर्वसूत्राद् "द्वन्द्वे" इत्यनुवर्त्य द्वन्द्वे प्रसक्ते सतीति व्याख्येयम्।

('सरूपाणामेकशेष एकविभक्तौ' सू. १८८ या सूत्रावरील कौमुदींत 'एकविभक्तौ यानि सरूपाण्येव दृष्टानि तेषामेक एव शिष्यते असें जें म्हटलें आहे त्या पंक्तींतील 'एकविभक्तौ' या पदांतील) 'विभक्ति' हा शब्द सारूप्याचें उपलक्षण आहे, म्हणजे कोणत्या प्रकारचें सारूप्य असतांना एकशेष होतो हें द्योतित करण्याकरितां घातला आहे; एकशेष होण्याकरितां विभक्तिप्रत्यय पुढें असणें या निमित्ताची आवश्यकता आहे हें द्योतित करण्याकरितां तो शब्द घातला नाहीं. सारांश हा एकशेष निर्निमित्तक असल्यामुळें अन्तरङ्ग ठरतो व सुबुत्पत्ति होण्यापूर्वींच याची प्रवृत्ती होते. जर प्रकृत सूत्र आरंभिलें नसतें तर, ज्या शब्दांचा एकशेष करणें आहे त्यांतील प्रत्येक शब्दाहून सुबुत्पत्ति होण्याची व द्वन्द्वसमास होण्याची आपत्ति आली असती. परंतु एकशेषाचें प्रकृत सूत्र आरंभिलें असल्यामुळें व (जेथें एकशेषाची प्राप्ति होते तेथें) अनेक सुबन्त पदें राहत नसल्यामुळें, तशा स्थलीं द्वन्द्वाची प्राप्तीच होत नाहीं हें फलित–सिद्ध–होतें असा भावार्थ आहे. (प्रकृत सूत्रांत समान रूप

शब्दांचा एकशेष होणें सांगितलें आहे. ज्या शब्दांचा एकशेष करणें आहे ते समानरूप आहेत हें कसें ठरवावें याकरितां प्रकृत सूत्रांत 'एकविभक्तौ' हें पद घातलें आहे व या पदांतील 'एक' या पदाचा 'सर्व' असा अर्थ आहे. सारांश ज्या शब्दांचीं रूपें सर्व विभक्तींत सारखीं होतात ते शब्द समानरूप होत. प्रकृत सूत्रांतील 'एकविभक्तौ' हा शब्द निमित्तसप्तमी नसून, म्हणजे 'एकविभक्तौ परतः' असा त्याचा अर्थ नसून, तें पद वास्तविक प्रकृतसूत्रनिर्दिष्ट 'सरूपाणाम्' या पदाशीं अन्वित होतें आणि समानरूपता कशी ठरवावी याचें तें दर्शक आहे. एकशेष होण्याकरितां विभक्तिप्रत्यय पुढें असण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. द्वन्द्वाच्या मानानें एकशेष अन्तरङ्ग ठरतो असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, एकशेष कोणत्याहि पुढें असणाऱ्या निमित्तामुळें होणारा नसून, म्हणजे विभक्तिनिरपेक्ष असून, द्वन्द्व विभक्तिसापेक्ष आहे आणि म्हणूनच अन्तरङ्ग एकशेष बहिरङ्ग द्वन्द्वाचा बाध करतो.) कौमुदींतील वरील पंक्तींत 'सरूपाण्येव' यामध्यें 'एव' हें जें पद घातलें आहे तें ('वृद्धो यूना तल्लक्षणश्चेदेव विशेषः' या) उत्तर सूत्रांतून अनुकृष्ट केलें आहे. त्यामुळें, म्हणजे प्रकृत सूत्रांत 'एव' या पदाचें अनुकर्षण होत असल्यामुळें, 'जननी' या अर्थाचा वाचक 'मातृ' शब्द व 'परिच्छेत्ता'—मापणारा—या अर्थाचा वाचक 'मातृ' शब्द या दोन शब्दांचा एकशेष होऊं शकत नाहीं; कारण 'भ्याम्' इत्यादि विभक्तिप्रत्यय लावले असतां, जरी त्या दोन शब्दांचीं रूपें सारखीं होतात तरी 'औ, जस्' इत्यादि विभक्तिप्रत्यय लावले असतां त्यांचीं रूपें भिन्न प्रकारचीं होतात. (जननीवाचक 'मातृ' शब्दाचीं 'मातरौ, मातरः' इत्यादि रूपें होत असून, परिच्छेतृवाचक 'मातृ' शब्दाचीं 'मातारौ, मातारः' इत्यादि रूपें होतात. सारांश या दोन शब्दांचीं सर्व विभक्तींत सारखीं रूपें होत नसल्यामुळें, त्यांचा एकशेष होऊं शकत नाहीं.) 'एक एव शिष्यते' हें विधान करणारें प्रकृत एकशेष-

विधायक सूत्र जेथें सहविवक्षा आहे तशाच ठिकाणीं प्रवृत्त होतें, म्हणजे जो इतरेतरयोग द्वन्द्वाचा विषय आहे तेथेंच या सूत्राची प्रवृत्ति होते. जेथें अनेक अर्थ एकत्र मिलित होऊन वाक्यांतील इतर पदांशीं सारख्या रीतीनें अन्वित होतात तशा प्रकारची स्थिति असणें हा प्रकृत सूत्राचा विषय आहे, म्हणजे अशी स्थिति असल्यासच प्रकृत सूत्र प्रवृत्त होतें. (परस्परसापेक्ष शब्दांचा वाक्यांतील इतर पदाशीं सारख्याच रीतीनें अन्वय होत असणें याला सहविवक्षा म्हणतात. एकशेष हा इतरेतर योगद्वन्द्वाचा अपवादक असल्यामुळें, इतरेतर-योग द्वन्द्व करतेवेळीं जशी सहविवक्षेची आवश्यकता असते तशीच एकशेष करितांना देखील तिची आवश्यकता असते. सारांश जेथें अनेक शब्दांचे अर्थ एकीभूत होऊन वाक्यांतील इतर पदाच्या अर्थाशीं सारख्याच रीतीनें अन्वित होतात तशाच ठिकाणीं एकशेष करतां येतो. 'चार्थे द्वन्द्वः' सू. ९०१ या सूत्रावरील कौमुदींत 'मिलितानामन्वये इतरेतरयोगः' असें म्हटलें आहे व याचा बालमनोरमेंत 'परस्परापेक्षितानां समुदितानामेकस्मिन्-क्रियापदेऽन्वयो यत्र तत्रेतरेतरयोगः' असा अर्थ दिला आहे आणि हीच सहविवक्षा होय. सहविवक्षा असतांनाच एकशेष होतो याला) 'इदितो नुम् धातोः' सू. २२६२ या सूत्रांतील 'इदितः' हा निर्देश व तसेंच न्याय देखील प्रमाण आहे. ('इदितः' या पदांत दोन 'इत्' शब्द आहेत व ते दोन शब्द समानरूप असून त्यांच्यापुढें कोणताहि विभक्तिप्रत्यय आला असतां, त्यांचीं रूपें सारखींच होतात. तरी पण त्या दोन शब्दांचे ठिकाणीं पाणिनीनें प्रकृत सूत्र प्रवृत्त करून एकशेष केला नाहीं. त्याचें कारण हें कीं, हे दोन 'इत्' शब्द वाक्यांतील इतर पदाशीं सारख्या रीतीनें अन्वित नाहींत. 'इदित्' यांतील प्रथम 'इत्' हा शब्द द्वितीय 'इत्' शब्दांत अन्वित असून द्वितीय 'इत' शब्द 'धातोः' या अन्य पदार्थामध्यें अन्वित आहे, व त्या पदाचा 'इत् ऱ्हस्व इकारः, इत् इत्संज्ञकः यस्य' असा विग्रह असून 'इत्संज्ञकेदन्तधातोः' असा अर्थ आहे.

सारांश पाणिनीनें वरील सूत्रांत 'इतोः' असा एकशेषरूप निर्देश न करितां 'इदितः' असा निर्देश केला असल्यामुळें त्यावरून हें सिद्ध होतें कीं, ज्या शब्दांचा एकशेष करणें आहे ते शब्द वाक्यांतील इतर पदाशीं सारख्या रीतीनें अन्वित असले तरच एकशेष होऊं शकतो.) तसेंच जो अवशिष्ट राहतो तो ज्यांचा लोप झाला आहे त्यांच्या अर्थाचा देखील वाचक असतो असा न्याय आहे. असा न्याय असल्यामुळें, अवशिष्ट राहिलेल्या श्रूयमाण एका पदानें उपस्थित झालेल्या सर्व अर्थांचा वाक्यांतील भिन्न पदाच्या अर्थाशीं एकाच प्रकारानें अन्वय असणें योग्य आहे. ('राम' हा शब्द परशुराम व दाशरथि राम या दोहोंचाहि वाचक आहे आणि 'रामौ भूभारं हृतवन्तौ' इत्यादि वाक्यांत दोन्ही 'राम' शब्दांचे अर्थ वाक्यांतील 'भूभारं हृतवन्तौ या पदांशीं सारख्याच कर्तृरूप कारकरूपानें अन्वित असल्यामुळें, येथें 'रामौ' असा, एकशेष होऊन, प्रयोग होऊं शकतो. परंतु परशुरामानें रावणाशीं सन्धि केला व दाशरथिरामानें रावणाशीं युद्ध केलें असे भिन्न भिन्न अर्थ द्योतित करणें झाल्यास, 'राम' या दोन शब्दांचा वाक्यांतील इतर पदांशीं सारख्याच रीतीनें अन्वय होत नसल्यामुळें, अशा ठिकाणीं 'रामौ' असा, एकशेष होऊन,प्रयोग होऊं शकत नाहीं.) अथवा ('तिष्यपुनर्वस्वोर्नक्षत्रद्वन्द्वे' सू. ८२० या) पूर्व सूत्रांतून प्रकृत सूत्रांत 'द्वन्द्वे' या पदाची अनुवृत्ति करून त्या पदाचें 'द्वन्द्वे प्रसक्ते सति (द्वन्द्वं बाधित्वा एकशेषो भवति)' असें व्याख्यान करावें.

मनोरमा—स्यादेतत् । द्वन्द्वे कृते सतीत्यर्थोऽस्तु । मैवम् । पन्थानौ पन्थान इत्यादौ समासान्तापत्तेः । करौ करा इत्यादौ एकवद्भावापत्तेः । सर्वे सर्वेषामित्यादौ "द्वन्द्वे च" "विभाषा जसि" इत्यनयोरापत्तेश्चेति दिक् । यत्तु प्राचा राम, राम औ इति स्थिते इत्युक्तम्, एकविभक्तौ परत इति च, तत्रेत्थमुक्तिसंभवः राम, राम इत्यत्र अवयवयोरिव समुदायस्यापि प्रातिपदिकसंज्ञाऽस्ति मिलिते-

नार्थवत्त्वात् । न चार्थवत्त्वेऽपि समासग्रहणस्य नियमार्थत्वान्नैवमिति-वाच्यम् । यत्र समुदाये पूर्वो भागः पदं तद्विषयको नियम इत्युक्त-त्वात्, बहुपटव इत्याद्यनुरोधेन नियमस्य सजातीयविषयताया औचित्याच्च । तथा चैकाज्द्विर्वचनन्यायेन समुदायप्रातिपदिकादेव द्विर्वचनाद्युत्पत्तिः । तावताप्यवयवार्थानां संख्यान्वयेनानुग्रहसंभव-वात् । नन्वेवं रामकृष्णावित्यादिष्वपि द्वन्द्वं विनैव समुदायाद्विभक्तिः स्यादिति चेन्मैवम् । द्वन्द्वविधावनेकं सुबन्तमित्यस्यानुवृत्त्या एका-ज्द्विर्वचनन्यायस्य बाधादितिदिक् ।

'द्वन्द्वे' या अनुवृत्त पदाचा 'द्वन्द्वे कृते सति' असा अर्थ करावा असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण तसा अर्थ केल्यास, 'पन्थानौ, पन्थानः' इत्यादि स्थलीं समासान्त प्रत्यय होण्याची व तसेंच 'करौ, कराः' इत्यादि स्थलीं एकवद्भाव होण्याची आपत्ति येईल. त्याचप्रमाणें 'सर्वे, सर्वेषाम्' इत्यादि स्थलीं 'द्वन्द्वे च' सू. २२४ व 'विभाषा जसि' सू. २२५ हीं सूत्रें प्रवृत्त होण्याची आपत्ति येईल. ('द्वन्द्वे' या अनुवृत्त पदाचा 'द्वन्द्वे प्रसक्ते सति', म्हणजे द्वन्द्वाची प्राप्ति झाली असतां, असा अर्थ न करितां 'द्वन्द्वे कृते सति' असा अर्थ केल्यास कोणत्या आपत्ति येतील हें दीक्षितांनीं प्रकृत पंक्तीत सांगितलें आहे. 'पन्थाश्च पन्थाश्च पन्थानौ' किंवा 'पन्थाश्च पन्थाश्च पन्थाश्च पन्थानः' असा द्वन्द्वसमास केल्यास, 'पथिन्' हा शब्द द्वन्द्वसमासाच्या अन्तीं येत असल्यामुळें, 'ऋक्पूरब्धूःपथामानक्षे' सू. ९४० या सूत्रानें समासान्त 'अ' प्रत्यय होईल व 'नस्तद्धिते' सू. ६७९ या सूत्रानें 'पथिन्' यांतील 'टि' चा लोप होऊन 'पथौ पथाः' अशीं अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येईल. तसेंच 'कर' हा प्राण्यङ्गवाचक शब्द असल्यामुळें, 'करश्च करश्च' किंवा 'करश्च करश्च करश्च' असा द्वन्द्वसमास केल्यानें 'करौ, कराः' अशीं इष्ट रूपें न होतां, 'द्वन्द्वश्च प्राणितूर्यसेनाङ्गानाम्' सू. ९०६ या सूत्रानें समाहारद्वन्द्व होऊन एकवद्भाव होण्याची, म्हणजे एकवचनाचा प्रयोग

होण्याची, व 'स नपुंसकम्' सू. ८२१ या सूत्रानें नपुंसकलिङ्गांत प्रयोग होण्याची आपत्ति येईल आणि 'करौ, करा:' या ऐवजीं 'करम्' असें अनिष्ट रूप होईल. त्याचप्रमाणें 'सर्वे' या स्थलीं द्वन्द्वसमास केल्यास 'विभाषा जसि' सू. २२५ या सूत्रानें, 'जस्' प्रत्यय पुढें असल्यामुळें, विकल्पेंकरून 'सर्व' या शब्दाला सर्वनामसंज्ञा होऊन 'सर्वा:' असें पाक्षिक अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल, आणि तसेंच 'सर्वेषाम्' या स्थलीं द्वन्द्वसमास केल्यानें 'द्वन्द्वे च' सू. २२४ या सूत्रानें सर्वनामसंज्ञेचा निषेध होऊन 'सर्वेषाम्' असें इष्ट रूप सिद्ध न होतां, 'सर्वाणाम्' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल. म्हणून 'द्वन्द्वे कृते एकशेष:' असा अर्थ केल्यानें वर दर्शविलेल्या आपत्ति येत असल्यामुळें, तसा अर्थ करणें अयोग्य आहे व 'द्वन्द्वे प्रसक्ते सति द्वन्द्वं बाधित्वा एकशेषो भवति' असाच अर्थ करणें उचित आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) प्रक्रियाकौमुदीकारांनीं (प्रकृत सूत्राचें अवतरण देतांना) 'राम राम औ इति स्थिते' असें जें म्हटलें आहे व (तसेंच प्रकृत सूत्राचें व्याख्यान करितांना 'सरूपाणां मध्ये एक एव शिष्यते नेतरे) एकविभक्तौ परत:' असें जें पुढें म्हटलें आहे त्यासंबंधानें असें म्हणतां येऊं शकतें कीं, जशी 'राम राम' या समुदायांतील प्रत्येक अवयवाला प्रातिपदिकसंज्ञा आहे त्याचप्रमाणें दोन 'राम' शब्द मिळून झालेला समुदाय अर्थवान् असल्यामुळें त्या समुदायाला देखील प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकते. 'राम राम' हा समुदाय अर्थवान् असून देखील, 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रांतील 'समास' या पदाचें ग्रहण नियमार्थ असल्यामुळें, म्हणजे 'अर्थवत: समुदायस्य चेत् प्रातिपदिकसंज्ञा भवति तर्हि समासस्यैव' असा नियम असल्यामुळें, 'राम राम' या असमस्त समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण जेथें अर्थवान् समुदायांतील पूर्व भाग पद आहे तशाच ठिकाणीं तो नियम लागू पडतो हें पूर्वीं सांगितलें आहे (व 'राम राम' या समुदायांतील 'राम' हा

पूर्वभाग पदसंज्ञक नसल्यामुळें, त्या समुदायाला वरील नियम लागू पडत नाहीं.) दुसरें असें कीं, 'बहुपटवः = बहु पटु जस्' इत्यादि समुदायांना प्रातिपदिकसंज्ञा होण्याकरितां वरील 'समास'ग्रहणकृत नियम सजातीयविषयकच मानणें उचित आहे, म्हणजे ज्याप्रमाणें समासांतील पूर्व भाग पद असतो त्याचप्रमाणें ज्या अर्थवान् समुदायांत पूर्व भाग पद असेल तशाच सजातीय अर्थवान् समुदायाला तो नियम लागू पडतो व तशा समुदायालाच प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं हें मानणें उचित आहे. त्याचप्रमाणें एकाज्द्विर्वचनन्यायान्वयें (जेवढ्या अधिक समुदायाचें ग्रहण होऊं शकत असेल तेवढ्याचें ग्रहण करणें इष्ट असल्यामुळें, 'राम राम' या समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा करून त्या) समुदायरूप प्रातिपदिकाहूनच द्विवचनादि विभक्तिप्रत्यय करणें योग्य आहे; कारण तसें केल्यानें देखील, विभक्तिप्रत्ययाचा संख्यारूप अर्थ समुदायांतील प्रत्येक अवयवाच्या अर्थाशी अन्वित होऊं शकतो. पण असें मानलें तर 'रामकृष्णौ' इत्यादि स्थलीं देखील द्वन्द्व न करितांच 'रामकृष्ण' या समुदायाहून सुबुत्पत्ति करतां येईल असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं कारण 'चार्थे द्वन्द्वः' सू. ९०१ या द्वन्द्वविधायक सूत्रांत ('सुबामन्त्रिते' या पूर्व सूत्रांतून) 'सुप् = सुबन्तम्' या पदाची व ('अनेकमन्यपदार्थे' या पूर्व सूत्रांतून) 'अनेकम्' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें, या स्थलीं एकाज्द्विर्वचनन्याय बाधित होतो. (एकाज्द्विर्वचनन्याय पूर्वी सांगितलाच आहे. 'निज्' धातूंत जरी 'नि, इ, इज्, निज्' असे चार एकाच् आहेत तरी, पहिल्या तीन एकाचांचें द्विर्वचन केल्यानें धातूंतील कांहीं भाग असा राहून जातो कीं, ज्याचें द्विर्वचन केलें गेलें नाहीं. ती आपत्ति टाळण्याकरितां 'निज्' या सर्वांत मोठ्या एकाचाचें द्विर्वचन केलें जातें व त्याचें द्विर्वचन केलें असतां, बाकीचें तीन एकाच् त्याच्या पोटांत अन्तर्भूत असल्यामुळें, त्यांचें देखील द्विर्वचन होऊन जातेंच. हा

न्याय 'राम राम' या स्थलीं लावल्यास, जशी या समुदायांतील, प्रत्येक 'राम' शब्दाला प्रातिपदिकसंज्ञा आहे तशीच त्या दोन अर्थवान् शब्दांच्या 'राम राम' या अर्थवान् समुदायाला देखील प्रातिपदिकसंज्ञा असल्यामुळें, प्रत्येक 'राम' शब्दाहून 'सु' प्रत्यय न करितां समुदायाहून 'औ' प्रत्यय करणें योग्य आहे, हा व 'औ' प्रत्यय दोन्ही रामांची मिळून एकंदर दोन ही जी संख्या आहे त्या संख्येचा बोध करीलच. म्हणून एकाज्द्विर्वचनन्यायान्वयें समुदायाहून सुबुत्पत्ति केल्यावर नंतर एकशेष करणेंच योग्य आहे. पण अशा स्थलीं एकाज्द्विर्वचन-न्यायाचा आश्रय केल्यास, 'राम' व 'कृष्ण' यांचा द्वन्द्व करते-वेळीं 'राम' व 'कृष्ण' या प्रत्येक अवयवाहून सुबुत्पत्ति करून जसा द्वन्द्व केला जातो तसें न करितां, 'रामकृष्ण' या अर्थवान् समुदायरूप प्रातिपदिकाहून, द्वन्द्व न करितां देखील, एकदम 'औ' प्रत्यय केल्यानें काम भागूं शकेल व अशा रीतीनें द्वन्द्वविधायक सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल असें कोणी म्हटल्यास, त्यावर उत्तर हें आहे कीं, 'राम व कृष्ण हे दोघे मिळून' असा अर्थ सिद्ध होण्याकरितां इतरेतरयोगद्वन्द्व करणें आवश्यक आहे, व दोन किंवा अधिक सुबन्तांचाच द्वन्द्व होऊं शकत असल्यामुळें, द्वन्द्वसमास करते-वेळीं प्रत्येक अवयवाहून सुबुत्पत्ति करणें भाग आहे व समुदायाहून एकदम सुबुत्पत्ति करतां येत नाहीं. अशा रीतीनें द्वन्द्वसमास करतेवेळीं एकाज्द्विर्वचनन्यायाची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं व त्यामुळें द्वन्द्वसमास करतेवेळीं 'रामसु कृष्णसु' अशी स्थिति झाली असतां, 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययांचा लुक् होऊन 'रामकृष्ण' असें जें सामासिक रूप होतें त्याला 'कृत्तद्धित' या सूत्रानें प्रातिपदिक-संज्ञा होऊन त्याहून 'ङ्याप्प्रातिपदिकात्' सू. १८२ या अधिकारसूत्रानें सुबुत्पत्ति करतां येते, म्हणजे द्विवचनाचा प्रत्यय करतां येतो.)

मनोरमा – इत्थमुक्तिसम्भवे सत्यपि समुदायादेकविभक्तौ परत इति पक्षः किमर्थमुपेक्षित इति चेत् । शृणु । अस्मिन्पक्षे मातृमातारौ इत्यादावप्येकशेषः स्यात् । नन्वेकविभक्तावित्यावर्त्य एवकारं चानुकृष्य, एकविभक्तौ यानि सरूपाण्येवेति व्याख्येयामिति चेन्न । आवृत्तौ मानाभावात् । विभक्तेरेकशेषस्य विशेषणत्वे फला-भावाच्च, न च पयः पयो जरयतीत्यादिव्यावृत्तिः फलम् । सह-विवक्षायामित्यस्यावश्यकत्वात्, अन्यथा पयः पयो नयतीत्यत्र गौणमुख्यकर्मणोरेकशेषापत्तेः । देवदेव इत्यादावतिप्रसङ्गाच्च । प्रत्युत आवृत्या उभयविशेषणत्वे भिक्षाणां समूहो भैक्षमिति न सिद्ध्येत् । तथा हि – भिक्षा ३ अ इति स्थिते ऽन्तरङ्गानपि विधीन् बहिरङ्ग इति लुकि कृते विभक्तिपरत्वाभावादेकशेषो न स्यात्, लुप्ते प्रत्ययलक्षणाभावात् । किं च रामावित्वादौ परत्वान्नित्यत्वाच्च "वृद्धिरेचि" इत्येकादेशे कृते विभक्तिपरत्वाभावादेकशेषो न स्यात् । उभयत आश्रयणेऽन्तादिवद्भावाभावादिति दिक् ।

मग प्रक्रियाकौमुदीकारांनीं (' राम राम औ इति स्थिते ' व ' एकविभक्तौ परतः ' असें) जें म्हटलें आहे त्याचें, वर सांगितल्या-प्रमाणें, युक्तीनें समर्थन करतां येणें संभवत असून देखील, ' समुदायादेकविभक्तौ परतः ' हा जो त्यांचा पक्ष आहे त्याची उपेक्षा कां केली, म्हणजे त्यांचा तो पक्ष कां स्वीकारला नाहीं, असा प्रश्न केल्यास, त्याचें उत्तर श्रवण करा. त्यांच्या पक्षामध्यें ' मातृ मातारौ ' इत्यादि स्थलीं देखील एकशेष होण्याची आपत्ति येते (कारण ' मातृ मातृ औ ' या स्थलीं ' मातृ मातृ ' हे दोन्ही शब्द समानरूप असून त्यांच्या पुढें ' औ ' हा एकच विभक्तिप्रत्यय असल्या-मुळें, ' एकविभक्तौ परतः ' या पक्षामध्यें येथें एकशेष होण्याची आपत्ति येते. परंतु कौमुदींत ' एकविभक्तौ ' या पदाचा ' एकविभक्तौ ' यानि सरूपाण्येव दृष्टानि ' असा जो अर्थ केला आहे तो अर्थ स्वीकारल्यास व त्या पदाचा ' एकविभक्तौ परतः ' असा अर्थ न केल्यास, वरील आपत्ति टळते; कारण जननीवाचक ' मातृ ' शब्द व

परिच्छेतृवाचक 'मातृ' शब्द या दोन शब्दांचीं, पूर्वीं सांगितल्या-प्रमाणें, सर्व विभक्तींत सारखीं रूपें होत नाहींत.) पण प्रकृत सूत्रांतील 'एकविभक्तौ' हें पद दोनदां उच्चारून व ('वृद्धो यूना' या उत्तर सूत्रांतून) 'एव' या पदाचें अनुकर्षण करून प्रकृत सूत्राचा 'एकविभक्तौ यानि सरूपाण्येव तेषामेक एव शिष्यते, एकविभक्तौ परतः' असा अर्थ करावा (व तसें केल्यानें वर दर्शविलेली आपत्ति सहज टाळतां येते) असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'एकविभक्तौ' या पदाची द्विरावृत्ति करण्यास कांहींच प्रमाण नाहीं. दुसरें असें कीं, 'विभक्ति' हें एकशेषाचें विशेषण—निमित्त—मानल्यानें, म्हणजे 'एकविभक्तौ' हें पद निमित्तकोटींत देखील प्रविष्ट करून 'एकविभक्तौ परतः एकशेषः' असा अर्थ केल्यानें, कोणतेंहि विशेष फल निष्पन्न होत नाहीं. 'एकविभक्तौ' या पदाचा 'एकविभक्तौ परतः' असा अर्थ केल्यानें 'पयः पयो जरयति' (पाणी दुधास पचवितें) इत्यादि उदाहरणांत एकशेषाची व्यावृत्ति होणें हें फल आहे असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण एकशेष होण्यास सहविवक्षेची आवश्यकता आहे, म्हणजे ज्यांचा एकशेष करणें आहे त्यांचा वाक्यांतील इतर पदाशीं सारख्याच रीतीनें अन्वय असणें आवश्यक आहे (व 'पयः पयो जरयति' या उदाहरणांत 'पयः' या दोन पदांपैकीं प्रथम 'पयस् सुपयः' हें प्रथमान्त पद 'जरयति' या क्रियेशीं कर्तृरूपानें अन्वित असून द्वितीय 'पयः अम् पयः' हें द्वितीयान्त पद त्या क्रियेंत कर्मरूपानें अन्वित असल्यामुळें व अशा रीतीनें येथें सहविवक्षा नसल्यामुळें, या उदाहरणांत एकशेषाची प्राप्तीच होत नाहीं. म्हणून प्रकृत सूत्रांतील 'एकविभक्तौ' या पदाची द्विरावृत्ति करून एकदां त्या पदाचा 'एकविभक्तौ परतः' असा अर्थ केल्यानें वरील उदाहरणांत एकशेष होण्याची आपत्ति टळते हें म्हणणें चूक ठरतें हें उघड आहे.) जेथें सहविवक्षा असते तशाच स्थलीं एकशेष होतो

हा नियम न मानल्यास, 'पयः पयो नयति' या उदाहरणांत गौण कर्म व प्रधान कर्म यांचा एकशेष होण्याची आपत्ति येते व त्याचप्रमाणें 'देवदेवः' इत्यादि स्थलीं अतिव्याप्ति रूप दोष येऊं पाहतो. ('पयः पयो नयति' या उदाहरणांतील 'नी' धातु द्विकर्मक आहे व प्रथम 'पयः' हें पद 'नयति' या द्विकर्मकक्रियेंत गौणकर्मरूपानें अन्वित असून द्वितीय 'पयः' हें पद प्रधानकर्मरूपानें अन्वित आहे, व अशा रीतीनें हीं दोन्ही पदें एकाच प्रकारानें 'नयति' या क्रियेंत अन्वित नसल्यामुळें, म्हणजेच येथें सहविवक्षा नसल्यामुळें, या स्थलीं एकशेष होत नाहीं. 'पयः पयो नयति' याचा 'पयसि पयो नयति,' म्हणजे दुधांत पाणी घालतो, असा अर्थ आहे व 'नी' धातु द्विकर्मक असल्यामुळें, 'पयसि' चें 'पयः' असें द्वितीयेचें रूप होऊन तें गौणकर्म झालें आहे. तसेंच 'देवानां देवः देवदेवः' या उदाहरणांत जरी दोन 'देव' शब्द असे आहेत कीं, त्यांचीं सर्व विभक्तींत सारखीं रूपें होतात व 'देव आम् देव सु सु = देव देव सु' या स्थलीं अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययांचा 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें लुक् केल्यावर 'देव देव' या दोन 'देव' शब्दांच्या समुदायापुढें 'सु' प्रत्यय आहे तरी' प्रथम 'देव' शब्द द्वितीय 'देव' शब्दांत अन्वित असून द्वितीय 'देव' शब्द वाक्यांतील क्रियेंत कर्तृरूपानें अन्वित असल्यामुळें व अशा रीतीनें येथें सहविवक्षा नसल्यामुळें, एकशेष होत नाहीं.) उलट असें कीं, 'एकविभक्तौ' या पदाची द्विरावृत्ति करून (एक पद निमित्तकोटींत व दुसरें पद उद्देश्यकोटींत प्रविष्ट केल्यास, म्हणजे) तें पद उद्देश्य व निमित्त या दोहोंचेंहि विशेषण मानल्यास, 'भिक्षाणां समूहो भैक्षम्' हें रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं; कारण 'भिक्षा भिक्षा भिक्षा आम् अण्' अशी स्थिति झाली असतां, 'अन्तरङ्गानपि विधीन् बहिरङ्गो लुग्बाधते'—परि. ५२—या परिभाषान्वयें 'आम्' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा प्रथम लुक् केल्यानें, 'भिक्षा भिक्षा भिक्षा' या समुदायापुढें विभक्तिप्रत्यय राहत नसल्यामुळें, एकशेष

न होण्याची आपत्ति येते; कारण ज्या 'आम्' प्रत्ययाचा लुक् झाला आहे त्याचे ठिकाणीं प्रत्ययलक्षण करतां येत नाहीं, म्हणजे तो 'आम्' प्रत्यय प्रत्ययलक्षणानें विद्यमान आहे असें मानतां येत नाहीं. ('भिक्षाणां समूहो भैक्षम्' या स्थलीं 'भिक्षादिभ्योऽण्' सू. १२४४ या सूत्रानें 'तस्य समूहः' या अर्थामध्यें 'अण्' प्रत्यय झाला आहे. 'भिक्षा भिक्षा भिक्षा आम् अण्' हा समुदाय तद्धित 'अण्' प्रत्यायान्त असल्यामुळें, 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊन 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'आम्' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा लुक् पावतो. पण 'आम' प्रत्ययाच्या पलीकडें असणाऱ्या 'अण्' प्रत्ययामुळें झालेल्या प्रातिपदिकसंज्ञेमुळें होणारा तो लुक् असल्यामुळें व एकशेष हा पूर्वी असलेल्या 'आम्' प्रत्ययाच्या निमित्तामुळें होणारा असल्यामुळें, 'पूर्वोपस्थितनिमित्तकमन्तरङ्गम्, परोपस्थितनिमित्तकं बहिरङ्गम्' या न्यायान्वयें, एकशेष हा वास्तविक लुक्च्या मानानें अन्तरङ्ग ठरतो व 'असिद्धं बहिरङ्गमन्तरङ्गे' —परि. ५०—या परिभाषान्वयें एकशेष प्रथम झाला पाहिजे व नंतर 'आम्' प्रत्ययाचा लुक् झाला पाहिजे, व तसें केल्यास, समुदायापुढें 'आम्' प्रत्यय येत असल्यामुळें, एकशेष होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. परंतु 'असिद्धं बहिरङ्गमन्तरङ्गे' या परिभाषेची 'अन्तरङ्गानपि विधीन् बहिरङ्गो लुग्बाधते' ही अपवादक परिभाषा आहे. त्यामुळें, एकशेष अन्तरङ्ग असून देखील तो प्रथम न होतां बहिरङ्ग लुक् प्रथम होतो व अशा रीतीनें समुदायापुढें 'आम्' प्रत्यय राहत नसल्यामुळें, 'एकविभक्तौ परतः' हा पक्ष मानल्यास, या उदाहरणांत एकशेष न होण्याची आपत्ति येते. ज्या 'आम्' प्रत्ययाचा लुक् झाला आहे तो प्रत्ययलक्षणानें विद्यमान आहे असें मानतां येत नाहीं; कारण 'न लुमताङ्गस्य' सू. २६३ हें प्रत्ययलक्षणाचें निषेधक सूत्र आहे व या स्थलीं अङ्गाला एकशेषरूप कार्य करणें असल्यामुळें, प्रत्ययलक्षण मानतां येत नाहीं. सारांश 'एक-

विभक्तौ परतः' हा पक्ष मानल्यास 'भिक्षा अण्' असा एकशेष होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'भैक्षम्' हे इष्ट रूप सिद्ध होऊं शकत नाहीं. म्हणून तो पक्ष स्वीकारतां येत नाहीं.) दुसरें असें कीं, 'रामौ' इत्यादि स्थलीं परत्वामुळें व नित्यत्वामुळें 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सूत्रानें वृद्धिरूप एकादेश प्रथम केल्यावर विभक्ति-प्रत्यय पुढें राहत नसल्यामुळें, एकशेष न होण्याची आपत्ति येते. एका-देशाचे ठिकाणीं एकेच वेळीं पूर्वान्तवद्भाव व परादिवद्भाव करतां येत नाहीं. ('राम राम औ' या स्थितींत प्रकृत सूत्रानें एकशेषाची प्राप्ति आहे व तसेंच 'वृद्धिरेचि' या सूत्रानें वृद्धिरूप एकदेशाची प्राप्ति आहे. 'वृद्धिरेचि' हें सूत्र प्रकृत सूत्राच्या मानानें परसूत्र असल्या-मुळें, 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ या सूत्रान्वयें, वृद्धिरूप एकादेशाची प्रथम प्रवृत्ति झाली पाहिजे. दुसरें असें कीं, वृद्धिरूप एकादेशकार्य जसें पर आहे तसें नित्य देखील आहे; कारण एकशेष प्रथम केला किंवा मागून केला तरी दोन्ही स्थितींत या कार्याची प्राप्ति आहेच. पण वृद्धिरूप एकादेश प्रथम केल्यास 'औ' हा विभक्तिप्रत्यय एकादेशानें नाहींसा होत असल्यामुळें व अशा रीतीनें 'राम राम' या समुदायापुढें विभक्तिप्रत्य राहत नसल्यामुळें, एकशेषाची प्राप्ति होत नाहीं. म्हणून एकशेष अनित्य ठरून 'कृताकृतप्रसङ्गि नित्यम्' या वचनान्वयें वृद्धिरूप एकादेश नित्य ठरतो. त्यामुळें देखील त्या कार्याची प्रथम प्रवृत्ति करणें भाग आहे, व तें कार्य प्रथम केल्यास नुकतेंच वर सांगिल्याप्रमाणें समुदायापुढें विभक्तिप्रत्यय राहत नसल्यामुळें, 'एकविभक्तौ परतः' हा पक्ष मानल्यास, एकशेष न होण्याची व 'रामौ' हें इष्ट रूप सिद्ध न होण्याची आपत्ति येते. यावर अशी शंका करण्यांत येते कीं, 'राम राम औ' या स्थलीं 'राम राम' या समुदायांतील अन्त्य 'अ' व त्यापुढें असणारा 'औ' हा विभक्तिप्रत्यय या दोहोंचे जागीं झालेला 'औ' हा वृद्धिरूप एकादेश 'अन्तादिवच्च' सू. ७५ या सूत्रान्वयें परादिवद्भावानें 'औ' प्रत्ययच आहे असें मानतां येतें व त्यामुळें,

'एकविभक्तौ परतः' या पक्षांत देखील, एकशेष होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. पण परादिवद्भावानें 'औ' हा वृद्धिरूप एकादेश प्रत्ययच आहे असें मानलें तर, 'राम राम' या समुदायांतील द्वितीय शब्द 'राम' अदन्त न राहतां 'राम्' असा मकारान्त होईल, व अशा रीतीनें समुदायांतील दोन्ही शब्द समानरूप राहणार नाहींत आणि त्यामुळें एकशेष होऊं शकणार नाहीं. यावर पुन्हा असें म्हणण्यांत येतें कीं, 'औ' हा वृद्धिरूप एकादेश पूर्वान्तिवद्भावानें समुदायांतील अन्त्य वर्ण 'अ' च आहे व परादिवद्भावानें तो एकादेश 'औ' प्रत्ययच आहे असें मानलें असतां, 'राम राम' या सरूप शब्द-समुदायापुढें 'औ' हा विभक्तिप्रत्यय आहे असें म्हणतां येतें व त्यामुळें एकशेष होऊं शकतो. पण हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'उभयत आश्रयणे नान्तादिवत्' या भाष्यसिद्धान्तान्वयें, एकादेशाचे ठिकाणीं एकेचवेळीं पूर्वान्तिवद्भाव व परादिवद्भाव करतां येत नाहीं. म्हणून 'एकभिक्तौ परतः' हा पक्ष स्वीकारार्ह नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. सारांश दीक्षितांच्या मतें 'राम राम' अशा स्थितींतच, विभक्तिप्रत्यय उत्पन्न होण्यापूर्वींच, एकशेष होतो व प्रकृत सूत्रानें एकशेष होऊन 'राम' असें रूप सिद्ध झाल्यावर त्याहून द्विवचनाचा 'औ' हा प्रत्यय उत्पन्न होतो. म्हणून प्रक्रियाकौमुदी-कारांनीं 'सरूपाणां मध्ये एक एव शिष्यते नेतरे एकविभक्तौ परतः' असें प्रकृत सूत्राचें जें व्याख्यान केलें आहे तें योग्य नसून कौमुदींत या सूत्राचें जें व्याख्यान केलें आहे तेंच योग्य आहे असें दीक्षितांचें म्हणणें आहे व त्यांचें असेंहि म्हणणें आहे कीं, 'एकविभक्तौ' या प्रकृत सूत्रांतील पदाची द्विरावृत्ति करून आणि तें पद एकदां उद्देश्य-कोटींत व पुन्हा निमित्तकोटींत प्रविष्ट करून प्रकृत सूत्राचा अर्थ केल्यानें व 'राम राम औ इति स्थिते' असें व्याख्यान केल्याने वर सांगितल्याप्रमाणें आपत्ति उत्पन्न होत असल्यामुळें, तसें देखील करणें योग्य नाहीं व तें पद दोनदां न उच्चारतां त्या पदाचा 'सरूपाणाम्' या पदाशीं अन्वय करून कौमुदींत जसा अर्थ केला आहे

तसाच अर्थ करणें इष्ट आहे आणि तसें केल्यानें कोणतीहि आपत्ति येत नाहीं.)

मनोरमा—**यत्तु प्राचा व्याख्यात्रा पक्षान्तरमुपन्यस्तं सविभक्तिकानामेकशेष इति । तन्न । निवर्तमानानां विभक्त्या सहैव निवृत्तावपि शिष्यमाणे एकवचनश्रवणप्रसङ्गात् ।**

अथोच्यते युगपदधिकरणवचनतायां द्विवचनबहुवचनान्तानामेकशेषः । द्वन्द्वोऽप्येवम् । तथा हि—अजहत्स्वार्थायां वृत्तौ एकैकमनेकार्थाभिधायि परस्परसमभिव्याहारात् । तथा च अलौकिके द्वन्द्वैकशेषयोः प्रक्रियावाक्ये द्विवचनबहुवचनयोरेव प्रवेशाद् विभक्त्यन्तानामेकशेष इति पक्षो निर्बाध एवेति । तदपि न । जहत्स्वार्थायां वृत्तौ तदयोगात् । पक्षान्तरेऽपि प्रथमप्रवृत्तस्यैकवचनस्य त्यागायोगात् । अन्यथा षष्ठीतत्पुरुषाद्युच्छेदापत्तेः । तत्रापि पूर्वपदस्य उत्तरपदार्थे उपसंक्रमेण षष्ठ्याद्ययोगात् । तथा च भाष्यम् "सेयं युगपदधिकरणवचनता दुःखा च दुरुपपादा च" इति ।

प्रकृत सूत्रावरील प्रक्रियाकौमुदीवर टीका करितांना प्रसादकारांनीं 'सविभक्तिकानामेकशेषः' असें जें पक्षान्तर सांगितलें आहे तें बरोबर नाहीं, म्हणजे तो पक्ष देखील स्वीकारार्ह नाहीं; कारण जे निवृत्त—नाहींसे—होतात ते आपापल्या पुढील विभक्तिप्रत्ययासह नाहींसे झाले तरी जो अवशिष्ट राहतो तो आपल्या पुढील विभक्तिप्रत्ययासह कायम राहील व त्यामुळें त्याच्या पुढील एकवचनाच्या विभक्तिप्रत्ययाचें श्रवण होण्याची आपत्ति येते. (प्रकृत सूत्रावरील प्रक्रियाकौमुदीचें व्याख्यान करितांना प्रसादकार म्हणतात—'एकस्यां विभक्तौ परतो यानि सरूपाणि प्रातिपदिकानि दृष्टानि तेषां मध्ये एक एव सरूपः (शिष्यते), नेतरे सरूपा इत्यर्थः । अनुत्पन्नायामेव विभक्तौ एकशेषः। कृते एकेशेषे विभक्त्युत्पत्तिः ।' अशा रीतीनें दीक्षितांच्या मनाप्रमाणेंच असणारा प्रथम पक्ष सांगून नंतर प्रसादकार पक्षान्तर सांगतांना म्हणतात—'अथवा सविभक्तिकानामेकशेषः ।

कथम् । विभज्यते अनेन प्रातिपदिकार्थः इति विभिक्तिः कारकम् । परशब्द इष्टवाची । एकस्मिन् कारके परत इष्टे विवक्षिते यानि सरूपाणि तेषां मध्ये एक एव शिष्यते नेतर इति । कारकंहि विवक्षितत्वात्स्वनिमित्तां विभक्तिं जनयतीति सविभक्तिकानामेकशेषः । सहविवक्षायां चायमेकशेषो नान्यथा ।' दीक्षितांनीं आतांपर्यंत 'एकविभक्तौ परतः' या प्रथम पक्षाचें खण्डन करून प्रसादकारांनीं जो 'सविभक्तिकानामेकशेषः' हा द्वितीय पक्ष उपन्यस्त केला आहे त्याचें ते आतां खण्डन करतात. ते म्हणतात कीं, हा द्वितीय पक्ष मानल्यास 'राम राम' या समुदायांतील प्रत्येक 'राम' शब्दाहून 'सु' हा एकवचनाचा विभक्तिप्रत्यय केला असतां, 'राम सु राम सु' अशी स्थिति होईल व या समुदायांतील प्रथम 'राम सु' हा निवृत्त झाल्यावर द्वितीय 'राम सु' हा विभक्तिप्रत्ययासह अवशिष्ट राहील व त्या सुबन्ताहून 'औं' हा विभक्तिप्रत्यय उत्पन्न होऊं शकणार नाहीं व 'रामौ' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. म्हणून हा द्वितीय पक्ष देखील स्वीकारार्ह नाहीं.) आतां येथें प्रसादकारांतर्फे असें म्हणण्यांत येतें कीं, जेथें एकेच वेळीं (एकाच पदानें) अनेक व्यक्तींचा बोध होत असतो तशा स्थलीं (दोन व्यक्तींचा बोध होत असल्यास) द्विवचनान्त पदांचा, व (दोनपेक्षां अधिक व्यक्तींचा बोध होत असल्यास) बहुवचनान्त पदांचा एकशेष केला जातो. इतरेतरयोगद्वन्द्वसमासांत देखील असेंच केलें जात असतें. उदाहरणार्थ अजहत्स्वार्थावृत्तिपक्षांत, प्रत्येक शब्द इतर शब्दांसह एकत्र उच्चारला असल्यामुळें, अनेक अर्थांचा बोध करतो, म्हणजे स्वार्थाचा व त्याचप्रमाणें समुदायार्थाचा तो बोध करतो. म्हणून इतरेतर योगद्वन्द्व व एकशेष यांचें अलौकिक प्रक्रियावाक्य तयार करितांना (समुदायांतील प्रत्येक अवयवापुढें) द्विवचनाचा किंवा बहुवचनाचाच प्रत्यय करावा लागत असल्यामुळें, विभक्त्यन्तानामेकशेषः ' हा पक्ष निर्दोष ठरतोच. ('चार्थे द्वन्द्वः' २-२-२९ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'युगपदधिकरणवचनता ' या

पक्षाचा उल्लेख केला आहे व त्या भाष्याच्या वृत्तींत कैयटानें 'युगपदधिकरणवचनता' या पदाचा 'युगपदेकैकेन शब्देन अधिकरणमभिधेयं द्वन्द्ववाच्यं समुदायरूपं यदोच्यते तदा द्वन्द्वः' असा अर्थ दिला आहे. या पक्षांत इतरेतरयोगद्वन्द्वसमासघटक प्रत्येक पद समुदायाच्या अर्थाचा बोध करीत असतें असें मानलें जातें. उदाहरणार्थ 'घटश्च पटश्च घटपटौ' या इतरेतरयोगद्वन्द्वसमासांत 'घट' या प्रथम अवयवाचा 'घटपट' असा समुदायरूप अर्थ होत असून, 'पट' या द्वितीय अवयवाचा देखील तोच अर्थ होतो. अशा रीतीनें समुदायांतील अनेक शब्दांपैकीं प्रत्येक शब्दाला इतर शब्दांच्या सान्निध्यामुळें समुदायांतील सर्व शब्दांच्या अर्थाचें प्रतिपादन करतां येणें यालाच युगपदधिकरणवचनता' अशी संज्ञा आहे. या पक्षाचा आश्रय केल्यास, 'घटपटौ' या स्थलीं 'घट' व 'पट' हे दोन्ही समासघटक शब्द एक घटव्यक्ति व तसेंच एक पटव्यक्ति या दोन व्यक्तींचे वाचक ठरत असल्यामुळें, त्या समासाचें अलौकिक प्रक्रियावाक्य तयार करतेवेळीं घट व पट या प्रत्येक शब्दाहून द्विवचनाचा प्रत्यय करणें उचित आहे. त्याचप्रमाणें ज्या पदांचा एकशेष करणें आहे त्यांतून अवशिष्ट राहणाऱ्या एका पदानें ज्या संख्येचा बोध होणें इष्ट आहे त्या संख्येचीं, एकशेष करण्यापूर्वीं देखील, बोधक तीं पदें आहेत असें या पक्षांत मानतां येत असल्यामुळें, एकशेषवृत्तींतील प्रत्येक घटक पदाहून अलौकिक प्रक्रियावाक्यांत त्या इष्ट संख्येचा बोधक प्रत्यय करणें उचित आहे. या विषयासंबंधानें रत्नप्रभेंत 'येषां पदानामेकशेषः चिकीर्षितस्तानि सर्वाणि पदानि एकशेषानन्तरम् यत्सङ्ख्याकार्थबोधकत्वमेकेनाभीष्टमेकशेषात्प्रागपि तावत्सङ्ख्याकार्थबोधकानि । तथा च तेभ्यो द्विवचनबहुवचनान्येव स्युरिति भावः ।' असें म्हटलें आहे. 'रामश्च रामश्च रामौ' या स्थलीं दोन रामव्यक्तींचा बोध करणें आहे व 'रामराम' या समुदायांतील प्रत्येक 'राम' शब्द दोन व्यक्तींचा बोधक ठरत असल्यामुळें, 'राम सु राम सु' असें अलौकिक प्रक्रिया-

वाक्य न करितां 'राम औ राम औ' असें अलौकिक प्रक्रियावाक्य तयार केलें पाहिजे. तसें केल्यानें, प्रथम 'राम औ' नाहींसा होऊन द्वितीय 'राम औ' अवशिष्ट राहत असल्यामुळें 'रामौ' असें इष्ट रूप सिद्ध होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. तसेंच 'रामश्च रामश्च रामश्च रामाः' या स्थलीं दोनपेक्षां अधिक रामव्यक्तींचा बोध करणें असल्यामुळें, समुदायांतील प्रत्येक घटकाहून बहुवचनाचा 'जस्=अस्' प्रत्यय केला असतां, जो अवशिष्ट राहतो तो 'राम अस्' या स्वरूपाचा असल्यामुळें, 'रामाः' असें इष्ट रूप सहज सिद्ध होऊं शकतें. अजहत्स्वार्थावृत्तिपक्षांत समासांतील व एकशेष-वृत्तींतील प्रत्येक अवयव स्वार्थाचा व तसेंच समुदायाच्या अर्थाचा वाचक होत असल्यामुळें, वरील पक्ष दोषरहित ठरतो असें शंकाकाराचें म्हणणें आहे. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं,) हें म्हणणें देखील बरोबर नाहीं; कारण जहत्स्वार्थावृत्तिपक्षांत द्विवचनबहुवचनाचा प्रत्यय करतां येऊं शकत नाहीं. (जहत्स्वार्था-वृत्तिपक्षांत समुदायांतील प्रत्येक अवयव आपापल्या अर्थाचा परित्याग करीत असल्यामुळें व समुदाय हाच विशिष्ट समुदायशक्तीनें अर्थबोधक ठरत असल्यामुळें आणि अशा रीतीनें समुदायांतील प्रत्येक अवयव अखेरीस अर्थरहित ठरत असल्यामुळें त्याला, अर्थवत्तेच्या अभावामुळें प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं व त्यामुळें त्याहून सुबुत्पत्ति होऊं शकत नाहीं. म्हणून या जहत्स्वा-वृत्तिपक्षांत 'विभक्त्यन्तानामेकशेषः' हें म्हणणें मुळींच संभवत नाहीं.) पक्षान्तर मानलें तरी, म्हणजे अजहत्स्वार्थावृत्तिपक्ष मानला तरी, त्या पक्षांत प्रथम झालेल्या एकवचनाच्या प्रत्ययाचा त्याग करतां येत नाहीं, म्हणजे तो प्रत्यय नाहींसा करतां येऊं शकत नाहीं. (अजहत्स्वार्थावृत्तिपक्षांत अलौकिक प्रक्रियावाक्यांतील प्रत्येक अवयव आपल्या अर्थाचा परित्याग न करितां प्रथम आपल्या अर्थाचा बोध करून नंतर पुढें स्वार्थसमवेत समुदायांतील इतर अवयवांच्या अर्थाचा बोधक होत असल्यामुळें, त्याच्या स्वतःच्या

संख्यारूप अर्थाला अनुरूप असा विभक्तिप्रत्यय प्रथम केल्यानंतरच समुदायाच्या संख्यारुप अर्थाचा बोधक विभक्तिप्रत्यय पुढें करतां येतो त्यामुळें दोन रामव्यक्तींचा बोध करणें झाल्यास, प्रथम 'राम सु राम सु' असा प्रत्येक अवयवाहून एकवचनाचा विभक्तिप्रत्यय केल्यानंतरच समुदायांतील प्रत्येक अवयवाहून समुदायाच्या संख्येचा वाचक 'औ' हा द्विवचनाचा विभक्तिप्रत्यय करतां येतो. तसें केल्यास, 'राम सु औ', राम सु औ' अशी स्थिति झाल्यावर एकशेष केला असतां 'राम सु औ' असा जो एक भाग अवशिष्ट राहतो त्याचें 'रामौ' असें इष्ट रूप सिद्ध करतां येणें शक्य नाहीं; कारण 'राम' व 'औ' या दोहोंमध्यें 'सु' प्रत्यय आहे व त्या 'सु' प्रत्ययाचा लोप कोणत्याहि पाणिनीय सूत्रान्वयें करतां येणें शक्य नाहीं व त्यामुळें 'वृद्धिरेचि' हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं. समुदायांतील प्रत्येक शब्द समास किंवा एकशेष केल्यावर अखेरीस ज्या समुदायार्थाचा वाचक होतो त्याच अर्थाचा वाचक तो शब्द समास किंवा एकशेष करण्यापूर्वीं देखील असतो असें मानल्यास) षष्ठीतत्पुरुष इत्यादि समासांचा उच्छेद होण्याची, म्हणजे ते समास व्यर्थ ठरण्याची व न होण्याची आपत्ति येईल; कारण तशा तत्पुरुषसमासांत देखील पूर्व पदाचा अर्थ उत्तर पदाच्या अर्थामध्यें मिसळून अर्थबोध करीत असल्यामुळें, ('उक्तार्थानामप्रयोगः' या न्यायान्वयें) पूर्व पदाहून षष्ठी इत्यादि विभक्तींचे प्रत्यय करतां येऊं शकणार नाहींत. ('राज्ञः पुरुषः राजपुरुषः' या स्थलीं 'राजन्' हें पूर्वपद 'राजसंबंधी' या अर्थानें 'पुरुष' या उत्तर पदाच्या अर्थामध्यें अन्वित होत असल्यामुळें व अशा रीतीनें तें पूर्वपद षष्ठीचा जो अर्थ संबंध तो, वरील पक्ष मानला असतां, पूर्वींपासूनच सांगत आहे असें मानावें लागत असल्यामुळें, 'उक्तार्थानामप्रयोगः' या न्यायान्वयें 'राजन्' या पूर्व पदाहून, पुन्हा तोच संबंधरूप अर्थ बोधित करण्याकरितां, षष्ठीविभक्तीचा 'ङस्' प्रत्यय करतां येऊं शकत नाहीं व त्यामुळें षष्ठीतत्पुरुष न होण्याची आपत्ति येते. 'राजसम्बन्धी पुरुषः' अशा

रीतीनें ' राजन् ' या पूर्व पदाचा ' पुरुष ' या उत्तर पदाच्या अर्था-मध्यें समास करण्यापूर्वीच सामानाधिकरण्यानें अन्वय होतो असें वरील पक्षान्वयें मानल्यास, सामानाधिकरण्य दर्शविण्याला अनुकूल-योग्य—असा ' सु ' प्रत्यय ' राजन् ' शब्दाहून करावा लागेल व तसें केल्यास, षष्ठीतत्पुरुषसमास न होतां कर्मधारयसमास होण्याची आपत्ति येईल. ही आपत्ति टाळण्याकरितां, हें मानणें आवश्यक आहे कीं, समुदायाच्या प्रत्येक शब्दाहून त्याच्या स्वतःच्या अर्थाला अनु-कूल असाच विभक्तिप्रत्यय करतां येतो व समास होण्यापूर्वी समु-दायाच्या संख्याकारकरूप अर्थाचा वाचक विभक्तिप्रत्यय समुदायांतील प्रत्येक अवयवाहून करतां येत नाहीं. असें मानलें असतां, 'राजपुरुषः' या स्थलीं 'राजन् सु पुरुष सु' असें अलौकिक प्रक्रियावाक्य न होता 'राजन् ङस् पुरुष सु' असें अलौकिक प्रक्रियावाक्य तयार होऊन षष्ठीतत्पुरुषसमास होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. त्याच-प्रमाणें ' रामश्च रामश्च रामौ ' या एकशेषवृत्तींतील प्रत्येक ' राम ' हा अवयव मूळचा एक व्यक्तीचा वाचक असल्यामुळें, त्याहून 'औ' प्रत्यय करतां येत नाहीं व 'सु' प्रत्ययच करतां येतो आणि तसें केल्यास, 'राम सु राम सु' अशी स्थिति झाली असतां, 'राम सु' हा जो एक भाग अवशिष्ट राहतो त्याचें 'रामौ' असें इष्ट रूप होऊं शकत नाहीं. सारांश युगपदधिकरणवचनतापक्षाचा आश्रय करून 'विभक्त्यन्तानामेकशेषः' या पक्षाचा पुरस्कार करणें अयोग्य ठरतें. युगपदधिकरणवचनतापक्ष मानल्यास अनेक अडचणी व आपत्ति उत्पन्न होत असल्यामुळेंच, भाष्यकारांनी 'चार्थे द्वन्द्वः' सू. २. २. २९ या सूत्रावरील भाष्यांत त्या पक्षाचा उहापोह करून अखेरीस 'सेयं युगपदधिकरणवचनता दुःखाच दुरुपपादा च,' म्हणजे युगपदधिकरणवचनतापक्ष अत्यन्त क्लिष्ट व मनास केव्हांहि न पटणारा आणि प्रमाणांनीं सिद्ध न करतां येऊं शकणारा पक्ष आहे, असें भाष्यांत म्हटलें आहे.

मनोरमा— यदपि व्याचख्युः—व्यक्तिपक्षे यावद्व्यक्ति तत्तच्छब्दप्रयोगे प्राप्ते एकस्यैव प्रयोगो यथा स्यादिति सूत्रम् ।

आकृतिपक्षे तु एकेनैवाकृत्यविनाभूतानेकव्यक्तिलाभादनर्थकमिति । तन्न । व्यक्तिपक्षेऽपि "न ब्राह्मणं हन्यात्" इत्यत्र ब्राह्मणशब्देनैवैकेनापि अनेकस्य तन्त्रेण सुवचत्वात् । अन्यथा जातिपक्षेऽपि "वासेन सम्यक्क्षमयोश्च तस्मिन्" इत्यादिनानार्थानुरोधेन सूत्रं विना ऽनिर्वाहात् । तस्माज्जातिव्यक्तिपक्षयोरुभयोरपि तंत्रेण प्रयोगान्निर्वाहेऽपि सर्वत्र तन्त्रेणैव बोधनीयमिति नियामकाभावात्पाक्षिको द्वन्द्वः सूत्रं विना दुर्वारः । घटोऽयं घटोऽयमिति नानाशब्दप्रयोगदर्शनात्, तद्वद् घटघटाविति द्वन्द्वस्य न्यायप्राप्तत्वात् । न चैवमपि घटकलशाविति द्वन्द्वापत्तिः । "विरूपाणामपि समानार्थानाम्" इति वार्तिकात्, रूप्यते बोध्यते इति व्युत्पत्या रूपशब्दस्य अर्थपरत्वमाश्रित्य वार्तिकार्थस्यापि सूत्रेणैव क्रोडीकाराच्च । तस्माद् घटघटौ घटकलशावित्यादिपाक्षिकानिष्टवारणाय पक्षद्वयेऽपि सूत्रमावश्यकमित्यवधेयम् ।

प्रकाशकार असें व्याख्यान करितात कीं, व्यक्तिपक्ष मानल्यास, म्हणजे शब्द हा जातीचा बोधक नसून केवळ व्यक्तीचा बोधक आहे हा पक्ष मानल्यास, (वाक्यप्रयोग करतेवेळीं जितक्या व्यक्तींचा बोध करणें अभिप्रेत असेल तितक्या सर्व व्यक्तींपैकीं) प्रत्येक व्यक्तीकरितां एक एक शब्दाचा प्रयोग करण्याचा प्रसंग आला असतां, त्या सर्व व्यक्तीकरितां एकाच शब्दाचा प्रयोग करतां यावा याकरितां प्रकृत सूत्र आरंभिलें आहे. पण जातिपक्ष मानल्यास, म्हणजे शब्द हा व्यक्तीचा बोधक नसून जातीचा बोधक आहे हा पक्ष मानल्यास, जाति ही व्यक्तीशिवाय राहूं शकत नसल्यामुळें, एक शब्द उच्चारला तरी जातींत अन्तर्भूत असलेल्या अनेक व्यतींचा बोध होत असल्यामुळें, जातिपक्षांत प्रकृत सूत्र व्यर्थ ठरतें. पण हें त्यांचें म्हणणें देखील बरोबर नाहीं; कारण व्यक्तिपक्ष मानला तरी, 'न ब्राह्मणं हन्यात्' या वाक्यांतील एकवचनांत उच्चारलेल्या 'ब्राह्मण' या शब्दानें देखील अनेक ब्राह्मणव्यक्तींचा तन्त्रानें सहज बोध होऊं शकतो. ('सकृदुच्चरितस्यानेकार्थबोधपरकत्वम् = एकोच्चारणेनाने-

कार्थबोधनम् ' अशी व्याकरणशास्त्रांत ' तन्त्र ' या शब्दाची व्याख्या आहे. हें तन्त्र या शास्त्रांत दोन प्रकारचें मानलें आहे (१) अर्थ-तन्त्र; व (२) शब्दतन्त्र. जेथें शब्दाचा एकच अर्थ असून तो शब्द उच्चारला असतां, प्रवृत्तिनिमित्त एकच असल्यामुळें, अनेक व्यक्तींचा बोध होतो त्याला अर्थतन्त्र म्हणतात. उदाहरणार्थ ' घटाः ' किंवा 'ब्राह्मणाः' हा शब्द उच्चारला असतां, अनेक घटांचा किंवा ब्राह्मणांचा अनुक्रमें बोध होतो. जेथें एकाच शब्दाचे अनेक अर्थ असून तो शब्द उच्चारला असतां, त्याच्या अनेक अर्थांचा बोध होतो त्याला शब्दतन्त्र म्हणतात. उदाहरणार्थ 'अक्ष' हा शब्द बेहडा, द्यूत खेळण्याचे फांसे, आस्कूड इत्यादि अनेक अर्थांचा वाचक असल्यामुळें, 'अक्षाः' असा प्रयोग केल्यास त्या सर्व अर्थांचा बोध होतो. सारांश जेथें एकच प्रवृत्तिनिमित्त असतें तेथें अर्थतन्त्र व जेथें भिन्न भिन्न प्रवृत्तिनिमित्तें असतात तेथें शब्दतन्त्र असा या दोन प्रकारच्या तन्त्रांत फरक आहे.) तन्त्र न मानल्यास, जातिपक्षांत देखील 'वासेन सम्यक् क्षमयोश्च तस्मिन्' इत्यादि स्थलीं जेथें अनेकार्थवाचक शब्दाचा प्रयोग आढळतो तेथें प्रकृत सूत्र मानल्या-खेरीज तशा प्रयोगाची उपपत्ति लावतां येऊं शकत नाहीं. ('वासेन सम्यक् क्षमयोश्च तस्मिन्' या वाक्यांत 'क्षमा' हा शब्द व्द्यर्थी असून त्या शब्दाचे शांति व पृथ्वी हे दोन अर्थ आहेत व 'त्याचे ठिकाणीं शांति व पृथ्वी या दोहोंचाहि उत्तम रीतीनें निवास असल्यामुळें' असा त्या वाक्याचा अर्थ आहे. येथें जातिपक्ष मानला तरी, प्रकृत सूत्र असल्याखेरीज 'क्षमा च क्षमा च क्षमे तयोः क्षमयोः' या एकशेषाची उपपत्ति लावतां येणें शक्य नाहीं; कारण शांति व पृथ्वी या दोहोंचेहि ठिकाणीं भिन्न भिन्न जाति असल्यामुळें, दोहोंचाहि प्रकृत स्थलीं 'क्षमा' या शब्दानें बोध होण्याकरितां जातिपक्षांत देखील प्रकृत सूत्र मानणें आवश्यक आहे. म्हणूनच प्रसादकार प्रकृत सूत्रावरील टीकेंत म्हणतात—'ननु च जातिः पदार्थः । जातिश्चैकैव । तत्रैकत्वाद-

र्थस्य बहूनां शब्दानां प्रसङ्ग एव नास्ति । तत् किमेकशेषारम्भेण । व्यक्तिपक्षेऽप्यनेकार्थाभिधानसामर्थ्यं व्द्यादिवदभ्युपेयम् । उच्यते । जातिपक्षेप्यक्षा इत्यादावनेकशब्दत्वं स्यात् । न हि बिभीतकदेवन-शकटाक्षेष्वनुस्यूतं किञ्चित् सामान्यमस्ति । व्यक्तिपक्षेऽपि वृक्षश्च-वृक्षश्चेति वाक्येऽनेकशब्ददर्शनाद् विरूपेषु द्वन्द्वदर्शनादनेकेषामर्थाना-मेकेन शब्देनाभिधानमशक्यमिति यावन्तस्तेऽर्थास्तावतां शब्दानां प्रयोगः प्राप्नोति । इष्यते चैकशब्दत्वम् । तस्मादेकशेष आरभ्यते' । या वरील उताऱ्यावरून हें स्पष्ट होतें कीं, जातिपक्षांत देखील प्रकृत सूत्र असणें आवश्यक आहे असेंच दीक्षितांच्या मतासारखेंच प्रसादकारांचें मत आहे. पण या विरुद्ध प्रकाशकारांचें असें मत आहे कीं, जातिपक्ष मानल्यास प्रकृत सूत्र असण्याची कांहीं आवश्यकता नाहीं, व हे त्यांचें मत खोडून काढण्याकरितांच दीक्षितांनीं 'वासेन सम्यक् क्षम-योश्च तस्मिन्' हें उदाहरण दिलें आहे.) म्हणून जातिपक्ष मानला किंवा व्यक्तिपक्ष मानला तरी त्या दोन्हीं पक्षांत एकशेषाच्या प्रयोगाचें तन्त्राच्या योगानें समर्थन करतां येते तरी, सर्वत्र तन्त्रानेंच बोध करावा असें नियामक शास्त्र नसल्यामुळें, प्रकृत सूत्र नसल्यास, विकल्पानें द्वन्द्व होण्याची आपत्ति टाळतां येणें अशक्य आहे. ('अक्षाः' किंवा 'घटाः' असा प्रयोग जसा तन्त्रानें करतां येतो त्याचप्रमाणें वाक्य-प्रयोग न करितां विकल्पेंकरून सामासिक शब्दाचा प्रयोग केल्यास, 'अक्षाक्षाक्षाः घटघटघटाः' अशीं इतरेतरयोगद्वन्द्वसमासाची अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येईल. अशा स्थलीं इतररेतरयोगद्वन्द्व न होतां एकशेषच व्हावा याकरितां प्रकृत सूत्र मुद्दाम आरंभिलें आहे.) 'घटोयं घटोयम्' इत्यादि अनेकशब्दयुक्त प्रयोग जसे भाषेंत आढळतात त्याचप्रमाणें 'घटघटौ' असा इतरेतरयोगद्वन्द्वाचा प्रयोग देखील न्यायतः प्राप्त होतो, म्हणजे वाक्याचा प्रयोग न करितां विकल्पेंकरून सामासिक शब्दाचा प्रयोग करणें झाल्यास, तसा अनिष्ट प्रयोग होण्याची आपत्ति येते (व तसा अनिष्ट प्रयोग न व्हावा याकरितांच प्रकृत सूत्र आरंभिलें आहे.) समानरूप

शब्दांचाच एकशेष होऊं शकतो असें मानल्यास, 'घटकलशौ' असा इतरेतरयोगद्वन्द्वसमास होण्याची आपत्ति येते असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'विरूपाणामपि समानार्थानाम्', म्हणजे शब्दांचीं रूपें जरी भिन्न असलीं तरी त्यांचा अर्थ एकच असल्यास एकशेष होतो, असें वार्तिक आहे (व त्यामुळें 'घटकलशौ' असें सामासिक रूप न होतां 'घटौ' किंवा 'कलशौ' असें एकशेषाचें रूप होतें. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'एकार्थानामपि विरूपाणाम्' असें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना 'एकार्थानामपि विरूपाणामेकशेषो वक्तव्यः। वक्रदण्डश्च कुटिलदण्डश्च वक्रदण्डौ कुटिलदण्डाविति वा' असें म्हटलें आहे.) दुसरें असें कीं, प्रकृत सूत्रांतील 'सरूपाणाम्' या पदांत जो 'रूप' शब्द आहे त्याची 'रूप्यते बोध्यते इति रूपम्' अशी व्युत्पत्ति करून तो शब्द 'अर्थ' याचाहि वाचक आहे असें मानल्यास, म्हणजे 'सरूपाणाम्' या पदाचा 'समानरूपाणाम्' एवढाच अर्थ न करितां 'समानार्थानाम्' असा देखील अर्थ केल्यास, वरील वार्तिकानें सांगितलेला अर्थ प्रकृत सूत्रांतूनच निघूं शकतो (व त्यामुळें वरील वार्तिक मानण्याची कांहीं आवश्यकता राहत नाहीं.) म्हणून 'घटघटौ, घटकलशौ' इत्यादि पाक्षिक अनिष्ट रूपें न व्हावीं, याकरितां जातिपक्ष व व्यक्तिपक्ष या दोन्ही पक्षांत देखील प्रकृत सूत्र असणें आवश्यक आहे हें जाणावें.

मनोरमा–एवं स्थिते सूत्रवैयर्थ्यमेव हृदि निधाय यदिह व्याचख्युः–नानेनैकशेषो विधीयते इत्यादि। यच्च समुदायादेकस्यां विभक्ताविति पक्षं प्रत्याख्याय पुनराहुः। राम राम औ इति स्थिते इति। अलौकिकमेतत्प्रक्रियावाक्यमूह्यते न तु लौकिकम्। अलौकिके च विभक्त्येकादेशादिकार्यं न प्रवर्तते। प्रयुक्तानामेवान्वाख्यानादित्यादि। तत्सर्वं सन्दर्भविरुद्धं न्यायविरुद्धं च। प्रयुक्तानेव ह्यन्वाख्यातुमलौकिकमुत्प्रेक्ष्यते। शास्त्रीयकार्यं च सर्वमलौकिकेष्वेव प्रवर्तते न तु परिनिष्ठिते। "प्रथमयोः पूर्वसवर्णः" इत्यादीनां

प्रवृत्तिं विना परिनिष्ठितरूपालाभात् । परिनिष्ठिते तत्प्रवृत्तेर्दुरुपपादत्वाच्चेत्यास्तान्तावत् ।

अशा रीतीनें जातिपक्षांत व व्यक्तिपक्षांत प्रकृत सूत्र आवश्यक ठरत असून देखील, हें सूत्र निरर्थक आहे हा आशय मनांत धरून प्रकाशकारांनीं असें व्याख्यान केलें आहे कीं, प्रकृत सूत्र एकशेषाचें विधान करणारें सूत्र नव्हें (व जें न्यायतः प्राप्त आहे त्याचाच केवळ अनुवाद करणारें हें सूत्र आहे.) यानंतर 'समुदायादेकस्यां विभक्तौ परतः' या पक्षाचें प्रत्याख्यान करून पुन्हा प्रकाशकार 'राम राम औ इति स्थिते' असें म्हणतात, म्हणजे ज्या पक्षाचें त्यांनीं प्रत्याख्यान केलें आहे तोच पक्ष स्वीकारून त्याचें व्याख्यान करितात, व पुढें ते असें म्हणतात कीं, 'राम राम औ' अशा प्रकारचें अलौकिक प्रक्रियावाक्य (एकशेष कर्तव्य असतां) कल्पिलें जातें, लौकिक विग्रहवाक्य कल्पिलें जात नाहीं. अलौकिक प्रक्रियावाक्यांत विभक्ति-प्रत्ययाचे जागीं एकादेश इत्यादि कार्यें करतां येऊं शकत नाहींत; कारण लौकिक प्रयोगांत जीं रूपें आढळतात त्याचेंच अन्वाख्यान केलें जातें पण हें त्यांचें सर्व म्हणणें संदर्भविरुद्ध व न्यायविरुद्ध आहे. लौकिक प्रयोगांत आढळणाऱ्या रूपांचें अन्वाख्यान करण्याकरितांच अलौकिक प्रक्रियावाक्य कल्पावें लागतें, म्हणजे सिद्धपदाचीं शकलें पाडून प्रकृतिप्रत्ययविभाग करावा लागतो, व ज्या ज्या शास्त्रीय कार्यांची प्राप्ति होते तीं सर्व कार्यें अलौकिक प्रक्रियावाक्यांतच करावीं लागत असतात. परिनिष्ठित शब्दस्वरूपांत त्या कार्यांची प्राप्तीच होत नाहीं. 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' सू. १६४ इत्यादि सूत्रांची प्रवृत्ति केल्याशिवाय परिनिष्ठित रूपाची सिद्धि होऊं शकत नाहीं. परिनिष्ठित रूपाचे ठिकाणीं त्या कार्यांची प्रवृत्ति होते हें म्हणणें कोणत्याहि प्रमाणानें सिद्ध करतां येऊं शकत नाहीं. या विषयासंबंधानें एवढें म्हणणें पुरें. (प्रकाशकारांचें असें म्हणणें आहे कीं, 'सकृदुच्चरितः शब्दः सकृदेवार्थं गमयति' या वचनान्वयें प्रत्येक शब्द एकच अर्थ बोधित करूं शकत असल्यामुळें, जितके अर्थ

बोधित करणें अभिप्रेत आहे तितक्या शब्दांचा उपयोग करणें आवश्यक आहे हा पक्ष मानल्यास, दोन रामव्यक्तींचा बोध कर्तव्य असतां, 'राम' हा शब्द दोनदां उच्चारणें भाग आहे व प्रकृत सूत्रानें एकशेष करून दोन 'राम' शब्दांतून एक शब्द नाहींसा केला व बाकीचा एक शब्द कायम ठेवला तर जो एक 'राम' शब्द अवशिष्ट राहतो त्यांत वरील वचनान्वयें एकच रामव्यक्तीचा बोध करून देण्याची शक्ति असल्यामुळें, एकशेष केला तरी, अभिप्रेत असलेल्या दोन रामव्यक्तींचा बोध न होतां एकच रामव्यक्तीचा बोध होणार. प्रकृत सूत्राच्या सामर्थ्यानें, एकशेष करून अवशिष्ट राहिलेला शब्द, जितक्या व्यक्तींचा बोध करणें अभिप्रेत आहे तितक्या व्यक्तींचा बोध त्याहून इष्ट वचनाचा, म्हणजे द्विवचनाचा किंवा बहुवचनाचा, प्रत्यय केल्यानें, करूं शकतो असें कोणी म्हटल्यास, त्यावर प्रकाशकारांकडून असें उत्तर देण्यांत येतें कीं, जर शब्दांत एक व्यक्तीपेक्षां अधिक व्यक्तींचा बोध करण्याची शक्तीच नाहीं तर ती शक्ति, प्रकृत सूत्रासारखीं कितीहि वचनें केलीं तरी, त्या शब्दांत उत्पन्न करतां येणें शक्य नाहीं. म्हणून एकशेष केल्यानें इष्ट हेतु सिद्ध होऊं शकत नसल्यामुळें एकशेष करून फायदा काय ? जर एक शब्द उच्चारला असतां अनेक अर्थांची उपस्थिति होते हा पक्ष मानला तर, अनेक व्यक्तींचा बोध करण्याकरितां एक शब्द अनेकदां उच्चारण्याची गरज पडत नाहीं व त्यामुळें एकशेषाची प्राप्तीच होत नाहीं. म्हणून एकशेषाचें प्रकृत सूत्र व्यर्थ ठरतें. त्यामुळें प्रकृत सूत्र विधायक सूत्र नसून जें न्यायप्राप्त आहे, म्हणजे एकच शब्द उच्चारल्यानें अनेक व्यक्तींचा, योग्य विभक्तिप्रत्यय लावला असतां, जो बोध करून देतां येतो, त्याचा केवळ अनुवाद करणारें प्रकृत सूत्र आहे असेंच मानलें पाहिजे असा प्रकाशकारांच्या म्हण-ण्याचा आशय आहे. हा त्यांचा आशय भावप्रकाश टीकेंत सुंदर रीतीनें व्यक्त केला आहे. भावप्रकाशकार म्हणतात. 'यद्येकैकार्थ-

निवेशिनः शब्दास्तत्कथमितरनिवृत्तौ शिष्यमाणादेकस्मात्तद्द्वयादि-प्रतीतिः ? । किं चैकस्यानेकार्थत्वं सूत्रतः स्वभावतो वा ? नाद्यः. न हि स्वतोऽसती शक्तिर्वचनशतेनाप्युत्पादयितुं शक्या । अन्त्ये त्वेकस्यैवानेकार्थोपस्थानसमर्थत्वान्नानेकप्रयोगप्रसङ्ग इति किमेक-शेषारम्भेण ।' मग जर प्रकाशकारांच्या मतें प्रकृत सूत्र अनावश्यक आहे तर 'राम राम औ इति स्थिते' अशा रीतीनें व्याख्यान करण्याची त्यांना काय गरज होती ? तशा तऱ्हेचें व्याख्यान करण्यास प्रवृत्त होणें हें एक प्रकारें प्रकृत सूत्राची आवश्यकता कबूल करण्या-सारखेंच होय. 'समुदायादेकस्यां विभक्तौ परतः' या पक्षाचें समर्थन करण्याकरितां तसे म्हटलें आहे असे जर त्यांचें म्हणणें असेल तर, त्या पक्षाचें तर त्यानीं पूर्वीं प्रत्याख्यान केलें आहे. म्हणून असें मानावें लागेल कीं, प्रथम प्रत्याख्यान करून पुढें त्याच पक्षाचा ते स्वीकार करितात व त्या पक्षाचें समर्थन करण्याकरितां व्याख्यान करितात. अशा रीतीनें त्यांच्या कृतींत पूर्वापर विरोध येत असल्या-मुळें, त्यांचें म्हणणें सन्दर्भविरुद्ध ठरतें असें दीक्षितांचें म्हणणें आहे. तसेच प्रकाशकारांचें म्हणणें न्यायविरूद्ध ठरतें असें जें दीक्षि-तांनीं म्हटले आहे त्याचे हें कारण आहे कीं, 'अलौकिके च विभक्त्येकादेशादिकार्यं न प्रवर्तते' असें प्रकाशकारांनी आपल्या टीकेंत म्हटलें आहे. 'रामश्च रामश्च रामौ' याचें 'राम राम औ' असें अलौकिक प्रक्रियावाक्य ते तयार करितात. असें प्रक्रियावाक्य तयार केल्यास, पूर्वीं सांगितल्या-प्रमाणें परत्वामुळें व नित्यत्वामुळें 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सूत्रानें जें वृद्धिरूप एकादेशकार्य प्रथम प्राप्त होतें तें प्रथम केलें असतां, 'रामरामौ' अशी स्थिति झाल्यावर समुदायापुढें विभक्तिप्रत्यय राहत नसल्यामुळें, 'समुदायादेकस्यां विभक्तौ परतः' हा पक्ष मानल्यास, एकशेष होऊं शकत नाहीं व 'रामौ' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकत नाहीं. यावर प्रकाशकारांतर्फे असें म्हणण्यांत येतें कीं, अलौकिक प्रक्रियावाक्यांत विभक्त्येकादेशादि कार्ये होत नाहींत

व परिनिष्ठित रूपाचे ठिकाणीं, म्हणजे 'राम राम औ' या स्थलीं एकशेष केल्यावर 'राम औ' अशी स्थिति झाली असतां, वृद्धिरूप एकादेशकार्य केलें जातें. मग जर असें आहे तर अलौकिक प्रक्रिया-वाक्य तरी कशाकरितां तयार केलें जातें ? वास्तविक परिनिष्ठित—लौकिक प्रयोगार्ह — रूपाच्या सिद्धीकरितांच अलौकिक प्रक्रियावाक्य तयार केलें जात असतें व जीं जीं शास्त्रीय कार्यें प्राप्त होतात तीं सर्व त्या प्रक्रियावाक्यांतच केलीं जातात व तीं सर्व कार्यें त्या प्रक्रियावाक्यांत केल्याशिवाय लौकिक प्रयोगार्ह रूप सिद्ध होणें कसें शक्य आहे ? परिनिष्ठित रूपाचे ठिकाणीं तीं कार्यें करावीं असें म्हटल्यास, जीं कार्यें प्राप्त होतात तीं सर्व केल्याशिवाय रूपाचे ठिकाणीं परिनिष्ठितत्व—प्रयोगार्हत्व—येणार कसें ? म्हणून अलौकिक प्रक्रियावाक्यांतच; जीं जीं कार्यें प्राप्त आहेत. तीं सर्व कार्यें करून इष्ट रूपाची सिद्धि केली पाहिजे; कारण इष्ट रूप कसें सिद्ध होतें हें प्रदर्शित करण्याकरितांच तें वाक्य प्रकृतिप्रत्ययविभाग करून तयार केलें जात असतें. सारांश वर सांगितल्याप्रमाणें प्रकाशकारांचें म्हणणें सन्दर्भविरुद्ध व तसेंच न्यायविरुद्ध ठरत असल्यामुळें त्याज्य ठरतें असा दीक्षितांचा म्हणण्याचा आशय आहे.)

शब्दरत्न — इति भाव इति । एतावतैव द्वन्द्वापवाद एकशेष इति व्यवहार इति भावः । एतेनैकशेषारम्भफलमपि निरूपितं द्वन्द्वनिवृत्तिरूपम् । उत्तरसूत्रस्थस्येति । "वृद्धो यूना—" इतीत्यर्थः । अनुकर्षणादिति । अनुपश्चात्कर्षणादाकर्षणादित्यर्थः । क्वचिदपकर्षणादित्यपि पाठः । नैकशेष इति । भ्यामादावपीत्यर्थः । भ्यामि स्त्रीपुंसयोस्ताभ्यामित्यनुप्रयोगस्य समत्वात् । एतेनानुप्रयोगविरोधादत्र नैकशेष इत्यपास्तम् । "पुमान्स्त्रिया" इत्येकशेषोऽपि न । तत्राप्येकविभक्तौ सरूपाण्येवेत्यनुवृत्तेः । अतएव "प्रातिपदिकैकशेषे मातृमात्रोः प्रतिषेधो वक्तव्य" इति वार्तिककृतोक्तम् । ननु वार्तिके प्रातिपदिकैकशेष इत्ययुक्तम् । विभक्त्यन्तानामेकशेषेऽपि जननीमातृधान्यमात्रर्थके मातृभ्यां देहि मातृभ्यां

चेत्यत्र प्रतिषेध आवश्यकः । नच तत्पक्षे इष्टापत्तिः । "किमुच्यते प्रातिपदिकानामेकशेष इति न पुनर्यस्यापि विभक्त्यन्तानामेकशेषस्तेनापि प्रतिषेधो वक्तव्यस्तस्यापि ह्येतानि क्वचिद्विभक्त्यन्तानि सरूपाणि मातृभ्यां चेति । अथ मतमेतद्विभक्त्यन्तानां सारूप्ये भवितव्यमेकशेषेण" इति भाष्योक्तेरिति वाच्यम् । सूत्रव्याख्यानपक्षभेदेनैकलक्ष्यस्य साधुत्वासाधुत्वयोरनौचित्यात् । अत एवाथ मतमेतदिति प्रतीकमुपादायाभ्युपगमवादेन त्वेतदुच्यते इति कैयटादिभिर्व्याख्यातमिति चेन्न । ईदृशविरुद्धमभ्युपेत्यैव वार्तिके तदुक्तेः । अतएव तदुत्तरमेवं च कृत्वा चोद्यते,' इत्युक्तं भाष्ये । अस्य प्रातिपदिकानामेकशेष इत्यादीति शेषः । अनेनचास्य पूर्वपक्षवार्तिकत्वं स्फुटमेवोक्तम् । तत्र मातृग्रहणं विभक्तौ विरूपाणामुपलक्षणम् । अयं पूर्वपक्षः प्रातिपदिकैकशेषस्य "एकविभक्तौ" इति पदाभावे एवोपपत्तिं मत्वा कृतः । तदभावे हि यानि सरूपाणि तेषामेकशेष एवेत्यर्थ एव प्राप्नोति । प्रयोगमात्रावच्छेदेन सारूप्यस्य हरिणहरित प्रकृतिकहरिणीशब्दादौ तद्धिते वैरूप्येणासम्भवात्प्रयोगसामानाधिकरण्येनैव सारूप्यस्य ग्राह्यतया तस्यात्रापि सत्त्वात्प्राप्तस्य स निषेधः।' अत एवाग्रे विभक्तेः सारूप्ये उपलक्षणत्वमाश्रित्य तत्पक्षस्थापनेन तत्खण्डनं कृतमित्येवकारापकर्षो भाष्ये ध्वनितः । तं विना तावन्मात्रेण तत्खण्डनायोगात् । एतेन "एकविभक्तौ" इत्यावत्यैकविभक्तौ सरूपाणामेकविभक्तौ विवक्षितायामेकशेष इत्यर्थे यस्यां विभक्तावेकशेषस्तस्यां (१) विभक्तौ सरूपाणामित्यर्थस्य प्रत्यासत्त्या लाभेन भ्यामादावेकशेषो नौजसादाविति वार्तिकं व्यर्थमिति तदाशय इत्यपास्तम् । वार्तिकमते भ्यामादावपि तदभावस्य प्राप्तत्वाच्चेति दिक् ॥

'द्वन्द्वस्याप्राप्तिरेव फलिता भवतीति भावः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यावरूनच एकशेष हा द्वन्द्वाचा अपवाद आहे हा व्यवहार सिद्ध होतो व त्या पंक्तींत एकशेषाचें प्रकृत सूत्र आरंभिण्याचें, द्वन्द्वाची निंवृत्ति होणें, हें फल देखील सांगितलें आहे. (सारांश सुबुत्पत्ति होण्यापूर्वी एकशेषाची प्राप्ति होत असून त्यावेळीं द्वन्द्वाचीं

प्राप्तीच होत नसल्यामुळें, एकशेष केल्यावर जो एक शब्द अवशिष्ट राहतो त्याहून सुबुत्पति केल्यानें एकच सुबन्त पद राहत असून, द्वन्द्वसमास कर्तव्य असतां अनेक सुबन्त पदें असणें आवश्यक असल्यामुळें, एकशेष केल्यानंतर द्वन्द्वाची प्राप्तीच होत नाहीं व अशा रीतीनें एकशेष द्वन्द्वाचा बाधक ठरतो. 'उत्तरसूत्रस्थैवकारस्येहानुकर्षणात्' या मनोरमेच्या पंक्तींतील 'उत्तरसूत्र' या पदानें 'वृद्धो यूना' या उत्तर सूत्राचें ग्रहण होतें. मनोरमेंत 'अनुकर्षणात्' हें जें पद वापरलें आहे. त्याचा 'अनु पश्चात्, कर्षणात् आकर्षणात' असा अर्थ आहे. (जरी 'अनुकर्षण' हा शब्द 'अनुवृत्ति' या अर्थात रूढ आहे तरी त्या शब्दाचा दीक्षितांनीं त्या रूढ अर्थांत प्रयोग न करितां. 'जें पुढें आहे त्याला मागें ओढून आणणें' या यौगिक अर्थामध्यें प्रयोग केला आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) मनोरमेच्या कांहीं प्रतींत ('अनुकर्षणा'त् याच्या ऐवजी) 'अपकर्षणात्' असा देखील पाठ आढळतो. (पण या दोन्ही पाठांचा अर्थ एकच आहे.) 'तेन मातृशब्दयोर्जननीवाचिपरिच्छेत्तृवाचिनोर्नैकशेष:'असें जे मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा अर्थ हा आहे कीं, 'भ्याम्' इत्यादि विभक्ति प्रत्यय पुढें असतां (जरी दोन्ही 'मातृ' शब्दांचीं रूपें एकसारखीच होतात तरी तशा समान रूपांचा) देखील एकशेष होत नाहीं. (याचें कारण हेंच कीं, त्या दोन शब्दांचीं सर्व विभक्तींत सारखी रूपें होत नाहींत, व विभक्तींत भिन्न रूपें होतात हें पूर्वी मनोरमेंत सांगितलेंच आहे.) 'भ्याम् हा प्रत्यय पुढें असतां स्त्रीलिङ्ग (जननीवाचक) 'मातृ' शब्दाचें व पुल्लिङ्ग (परिच्छेतृवाचक) 'मातृ' शब्दाचें जें रूप होतें त्या दोन्ही रूपांचे ठिकाणीं 'ताभ्याम्' या शब्दाचा सारखाच अनुप्रयोग होतो, म्हणजे 'ताभ्याम्' या पदानें त्या दोन्ही रूपांचा परामर्श करतां येऊं शकतो. (म्हणून या 'भ्याम्' प्रत्ययान्त दोन शब्दांचा एकशेष होण्याची जी आपत्ति येत होती ती टळावी याकरितांच 'वृद्धो यूना' या उत्तर सूत्रांतून प्रकृत सूत्रांत 'एव' या पदाचें अनुकर्षण केलें आहे. त्यामुळें

एकविभक्तौ यानि सरूपाण्येव = एकस्यामपि विभक्तौ यानि विरूपाणि न भवन्ति तेषामेकशेषो भवति ' असा प्रकृत सूत्राचा अर्थ होतो व वरील दोन ' मातृ ' पदाचीं ' औ जस् ' इत्यादि प्रत्यय लावले असतां जीं रूपें होतात तीं सारख्या प्रकारचीं होत नसून भिन्न प्रकारचीं होत असल्यामुळें, ' मातृभ्याम् ' हीं पुल्लिङ्गाचीं व स्त्रीलिङ्गाचीं रूपें जरी सारखींच आहेत व त्या दोहोंचा पुल्लिङ्गांत व स्त्रीलिङ्गांत सारख्याच होणाऱ्या ' ताभ्याम् ' या सर्वनामपदानें परामर्श होऊं शकतो तरी त्यांचा एकशेष होऊं शकत नाहीं.) ' भ्यामि स्त्रीपुंसयोस्ताभ्यामित्यनुप्रयोगस्य समत्वात् ' असें जें नुकतेंच वर म्हटलें आहे तशी वास्तविक वस्तुस्थिति असल्यामुळें, अनुप्रयोगाच्या विरोधोमुळें दोन ' मातृ ' शब्दांच्या समान रूपांच्या विषयांत देखील एकशेष होत नाहीं असें जें एकशेष न होण्याचें कित्येकांनीं कारण दिलें आहे तें चूक ठरतें. (परिच्छेतृवाचक पुल्लिङ्गी ' मातृ ' शब्दाचीं व जननीवाचक स्त्रीलिङ्गी ' मातृ ' शब्दाचीं पहिल्या दोन विभक्तींत द्विवचनबहुवचनांचीं भिन्न रूपें होत असल्यामुळें, त्या दोन विभक्तींच्या रूपांत एकशेष होऊंच शकत नाहीं. तृतीयादि विभक्तींचीं द्विवचनबहुवचनांचीं रूपें जरी सारखींच होतात तरी, स्त्रीलिङ्गाच्या व पुल्लिङ्गाच्या रूपांचा परामर्श करते-वेळीं भिन्न सर्वनामरूपांचा अनुप्रयोग करावा लागत असल्यामुळें व सर्वनामाच्या एकाच रूपानें दोहोंचा परामर्श होऊं शकत नसल्यामुळें, म्हणजे स्त्रीलिङ्गाच्या रूपांचा परामर्श करतेवेळीं ' ताभिः, ताभ्यः, तासाम्, तासु ' या सर्वनामरूपांचा अनुप्रयोग करावा लागत असून पुल्लिङ्गाच्या रूपांचा परामर्श करतेवेळीं ' तैः, तेभ्यः, तेषाम्, तेषु ' असा भिन्न अनुप्रयोग करावा लागत असल्यामुळें व अशा रीतीनें कोणताहि सारख्याच सर्वनामरूपाचा, परामर्श करण्याकरितां, अनुप्रयोग करतां येत नसल्यामुळें, समान रूपांच्या विषयांत देखील एकशेष होत नाहीं असें कित्येकांचें म्हणणें आहे. यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, समान रूपांच्या विषयांत एकशेष न होण्याचें जें वर

कारण दिलें आहे तें जरी बहुवचनाच्या रूपांना लागू पडतें तरी तें द्विवचनाच्या रूपांना लागू पडत नाहीं; कारण सर्वनामांचीं तृतीयादि विभक्तींत द्विवचनाचीं पुल्लिङ्गाचीं व स्त्रीलिङ्गाचीं रूपें सारखींच होत असल्यामुळें, तशा रूपांनीं दोन वरील 'मातृ' शब्दांचा एकशेष करून तृतीयादि विभक्तींत होणाऱ्या द्विवचनाच्या रूपांच्या एकाच सर्वनामरूपानें परामर्श करतां येतो. म्हणून तशा समान रूपांच्या विषयांत देखील जो एकशेष होत नाहीं त्याचें वर जें कारण दिलें आहे तें वास्तविक कारण नसून खरें कारण हें आहे कीं, वरील दोन्ही 'मातृ' शब्दांचीं प्रत्येक विभक्तींत सारखीं रूपें होत नाहींत व हा जो सिद्धान्त निष्पन्न होतो तो प्रकृत सूत्रांत उत्तर सूत्रांतून 'एव' या पदाचें अपकर्षण होत असल्यामुळेंच निष्पन्न होतो.) 'पुमान् स्त्रिया' सू. ९३३ या सूत्रानें देखील ('मातृमातारौ' या स्थलीं किंवा दोन 'मातृ' शब्दांच्या समान रूपांचा) एकशेष होऊं शकत नाहीं; कारण त्या सूत्रांत देखील प्रकृत सूत्रांतून 'एकविभक्तौ सरूपाण्येव' या पदांची अनुवृत्ति होते आणि तशी 'एव' या पदासह अनुवृत्ति होत असल्यामुळेंच, वार्तिककारानें 'प्रातिपदिकैकशेषे मातृमात्रोः प्रतिषेधो वक्तव्यः' हें वार्तिक पठित केलें आहे ('पुमान् स्त्रिया' या सूत्रांत प्रकृत सूत्रांतून 'एकविभक्तौ सरूपाणामेव' या पदांची अनुवृत्ति होत असल्यामुळें, त्या सूत्राच्या दृष्टीनें केवळ स्त्रीप्रत्यया-मुळे होणारें वैरूप्यसह्य ठरत असून इतर कोणत्याहि निमित्तामुळें होणारें वैरूप्य सह्य ठरत नाहीं आणि पुल्लिङ्गी व स्त्रीलिङ्गी 'मातृ' शब्दांची सर्व विभक्तींत समान रूपें होत नसल्यामुळें, त्या दोन शब्दांच्या समान रूपांचा जसा प्रकृत सूत्रानें एकशेष होत नाहीं तसाच 'पुमान् स्त्रिया या सूत्रानें देखील एकशेष होत नाहीं. 'पुमान् स्त्रिया' या सूत्रांत जर 'एकविभक्तौ सरूपाणामेव' या पदांची अनुवृत्ति न मानली तर, त्या सूत्रानें पुल्लिङ्गी व

स्त्रीलिङ्गी 'मातृ' शब्दांच्या समान रूपांचा एकशेष होईल व प्रकृत सूत्रानें पावलेल्या त्या दोन शब्दांच्या समान रूपांच्या एकशेषाचें निवारण करण्याकरितां मुद्दाम केलेलें वरील वार्तिक व्यर्थ ठरण्याची आपत्ति येईल. आतां या वरील वार्तिकासंबंधानें शंकाकार अशीं शंका करतो कीं,) वरील वार्तिकांत 'प्रातिपदिकैकशेषे' हें जें पद घातलें आहे तें अयोग्य आहे, म्हणजे तें पद घालावयास नको होतें; कारण 'विभक्त्यन्तानामेकशेष:' अशा पक्ष मानल्यास देखील, जननीवाचक 'मातृ' शब्दाचें व धान्य मापणारा या अर्थाच्या वाचक 'मातृ' शब्दाचें 'मातृभ्याम्' असें जें (चतुर्थीच्या द्विवचनाचें) समान रूप 'मातृभ्यां देहि मातृभ्यां च' या वाक्यप्रयोगांत आढळतें त्या दोन रूपांच्या एकशेषाचा देखील प्रतिषेध सांगणें आवश्यक आहे. (सारांश 'प्रातिपदिकानामेकशेष:' या पक्षांत जशीं वरील वार्तिकाची आवश्यकता आहे तशीच 'विभक्त्यन्तानामेकशेष:' या पक्षांत देखील त्या वार्तिकाची सारखीच आवश्यकता आहे. म्हणून 'मातृमात्रो: प्रतिषेध: सरूपत्वात्' एवढेंच वार्तिक करावयास हवें होतें व तसें वार्तिक केलें असतें तर तें दोन्ही पक्षांत सारखेंच लागू पडलें असतें व दोन्ही पक्षांत एकशेष होण्याची आपत्ति टाळतां आली असती असें शंकाकाराचें म्हणणें आहे. या शंकाकाराच्या शंकेवर अशी प्रतिशंका करण्यांत येते कीं) 'मातृभ्याम्' या दोन समानरूप पदांचा एकशेष होणें ही 'विभक्त्यन्तानामेकशेष:' हा पक्ष मानल्यास इष्टापत्तीच आहे; कारण वरील वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकारांनीं असा प्रश्न केला आहे कीं, 'प्रातिपदिकनामेकशेष:' या पक्षाला लागू पडणारेंच वरील प्रतिषेधक वार्तिक कां केलें आहे व 'विभक्त्यन्तानामेकशेष:' या पक्षाला देखील लागू पडणारें तसें प्रतिषेधक वार्तिक कां केलें नाहीं. त्या द्वितीय पक्षांत देखील भिन्न भिन्न अर्थाच्या दोन 'मातृ' शब्दांचा एकशेष होत नाहीं असा प्रतिषेध केला पाहिजे; कारण या दोन भिन्न 'मातृ' शब्दांचीं कांहीं विभक्त्यन्त रूपें समान आहेत. उदाहरणार्थ

'मातृभ्यांच मातृभ्यांच.' 'विभक्त्यन्तानामेकशेषः' या पक्षांत वरील दोन भिन्न 'मातृ' शब्दांच्या समान रूपांचा एकशेष होणें इष्टच आहे असें जर मत असेल तर वरील वार्तिक योग्य ठरतें. (असें भाष्यांत म्हटलें असल्यामुळें, समानरूप विभक्त्यन्त शब्दांचा एकशेष होणें इष्ट आहे हें स्पष्ट होतें. या प्रतिशंकेवर शंकाकार असें उत्तर देतो कीं, हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण) एकाच सूत्राचें दोन भिन्न रीतीनें व्याख्यान करणें व एका व्याख्यानपक्षांत एखादें रूप साधु ठरविणें व द्वितीयव्याख्यानपक्षांत तेंच रूप असाधु ठरविणें हें अयोग्य आहे. (सारांश 'प्रातिपदिकानामेकशेषः' हा पक्ष मानला तर दोन भिन्न 'मातृ' शब्दांच्या 'मातृभ्याम्' या दोन समान रूपांचा वरील वार्तिकान्वयें एकशेष होऊं शकत नाहीं. पण विभक्त्यन्तानामेकशेषः' हा पक्ष मानला तर त्याच उदाहरणांत एकशेष होऊं शकतो. अशा रीतीनें एकच रूप एका पक्षांत साधु व दुसऱ्या पक्षांत असाधु ठरण्याची आपत्ति येत असल्यामुळें वरील वार्तिकांत 'प्रातिपदिकैकशेषे' हें पद न घालतां 'मातृमात्रोः प्रतिषेधो वक्तव्यः' एवढेंच वार्तिक करावयास पाहिजे होतें. तसें वार्तिक पठित केलें असतें तर तें दोन्ही पक्षांत सारखेंच लागू पडलें असतें व कोणत्याहि पक्षांत एकशेष होण्याची आपत्ति सहज टाळतां येऊं शकली असती असा शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. आतां हें खरें कीं, 'अथ मतमेतद्विभक्त्यन्तानां सारूप्ये भवितव्यमेकशेषेण' असें वरील भाष्यांत म्हटलें आहे व त्यावरून असें दिसून येण्याचा संभव आहे कीं, 'मातृभ्याम्' या दोन समानरूप पदांचा एकशेष भाष्यकारांच्या मतें होणें इष्ट आहे व होऊं शकतो. पण शंकाकार त्यावर असें उत्तर देतो कीं, एखाद्या सूत्राची दोन भिन्न व्याख्यानें करून एकाच रूपाला एका पक्षांत साधु व दुसऱ्या पक्षांत असाधु ठरविणें अयोग्य असल्यामुळेंच) 'अथ मतमेतद्' हें प्रतीक घेऊन कैयटादिकांनीं असें व्याख्यान केलें आहे कीं, 'विभक्त्यन्तानां सारूप्ये भवितव्यमेकशेषेण'

हें जें भाष्यकारांनीं म्हटलें आहे तें केवळ अभ्युपगमवादरूप आहे, म्हणजे प्रतिपक्षाचें म्हणणें खरें आहे हें तेवढ्यापुरतें गृहीत घेऊन म्हटलें आहे. (प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात 'यदि पुनः प्रातिपदिकानामेकशेष उच्येत, किं कृतं भवति ? वचनलोपः परिहृतो भवति।' या भाष्याचा अर्थ असा आहे कीं, प्रत्येक शब्दाहून विभक्ती-प्रत्यय करण्यापूर्वीच प्रातिपदिकांचा एकशेष होतो असा पक्ष मानल्यास, विभक्तीप्रत्ययांचा लोप होण्याचें विधान करण्याची कांहीं गरज राहत नाहीं. कैयटानें या भाष्याचें 'यदि पुनः' हें प्रतिक घेऊन 'एक विभक्ताविति न क्रियते, ऱ्हस्वो नपुंसके इत्यतः प्रातिपदिकग्रहणमनुवर्त्याऽनुत्पन्नायामेव विभक्तौ सरूपाणां प्रातिपदिकानामेकशेष : क्रियते ।' असें म्हटलें आहे. या कैयटाच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे कीं, प्रकृत सूत्रांतून 'एकविभक्तौ' हें पद गाळलें व 'ऱ्हस्वो नपुंसके प्रातिपदिकस्य' या पूर्व सूत्रांतून 'प्रातिपदिकस्य' या पदाची अनुवृत्ति करून त्या पदाचा बहुवचनांत विपरिणाम केला तर, 'सरूपाणां प्रातिपदिकानामेकशेषः' असें प्रकृत सूत्र होईल व सूत्रार्थ असा होईल कीं, समानरूप प्रातिपदिकांहून विभक्तिप्रत्यय उत्पन्न होण्यापूर्वीच प्रातिपदिकावस्थेमध्येंच त्यांचा एकशेष होतो. पण 'सरूपाणां प्रातिपदिकानामेकशेषः' असा वर सांगितल्याप्रमाणें प्रकृत सूत्राचा अर्थ केला तर, 'प्रातिपदिकानामेकशेषेमातृमात्रोः प्रतिषेधःसरूपत्वात्' हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात—'प्रातिपदिकानामेकशेषे मातृमात्रोः प्रतिषेधो वक्तव्यः । माता च जनयित्री मातारौ च धान्यस्य मातृमातारः ।किं कारणम् ? । सरूपत्वात् । सरूपाणि ह्येतानि प्रातिपदिकानि ।'या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, विभक्तिप्रत्यय उत्पन्न होण्यापूर्वीच प्रातिपदिकांचा एकशेष होतो असा पक्ष स्वीकारल्यास, भिन्नभिन्न अर्थांच्या दोन 'मातृ' शब्दांचा एकशेष होत नाहीं असा निषेध करावा लागेल कारण दोन्ही अर्थांचे, म्हणजे जननी व मोजणारा या अर्थांचे, 'मातृ'

शब्द अगदीं सारखे आहेत आणि जरी जननी या अर्थाच्या वाचक 'मातृ' शब्दाचें 'मातरौ' असें प्रथमेचें द्विवचन होतें व मोजणारा या अर्थाच्या 'मातृ' शब्दाचें 'मातारौ' असें प्रथमेचें द्विवचन होतें तरी, विभक्तिप्रत्ययान्त रूपांमध्यें हा फरक असून दोन्ही प्रातिपदिकें सारखीं असल्यामुळें तशा दोन प्रातिपदिकांचीं कित्येक विभक्तींत भिन्न रूपें होत असून देखील 'प्रातिपदिकानामेकशेषः' या पक्षांत त्यांचा एकशेष होण्याची आपत्ति येते व ती आपत्ति टाळण्याकरितां वरील वार्तिक पठित करणें आवश्यक आहे. यापुढील भाष्य 'किमुच्यते प्रातिपदिकानामेकशेषे ...... एवं च कृत्वा चोद्यते' हें शब्दरत्नांत दिलेंच आहे व त्याच्या बऱ्याच भागाचा अर्थ देखील दिलाच आहे. या शब्दरत्नांत दिलेल्या भाष्यांतील 'अथ मतमेतद्' हें प्रतीक घेऊन कैयटानें 'अभ्युपगमवादेन त्वेतदुच्यते विभक्त्यन्तानां सारूप्ये इति । प्रातिपदिकावस्थायां सर्वदा सारूप्यात्सर्वत्रैकशेषः स्यात्, विभक्त्यन्तानां तु सरूपाणामेकशेषे यत्रैव तृतीयादौ विभक्तौ सारूप्यं तत्रैवैकशेषो, न प्रथमाद्वितीययोरित्यर्थः।' असें म्हटलें आहे. सारांश शंकाकार असें म्हणतो कीं, भाष्यकारांच्या शब्दरत्नांत दिलेल्या भाष्याचा असा आशय समजूं नये कीं, 'विभक्त्यन्तानामेकशेषः' या पक्षांत दोन 'मातृ' शब्दांच्या 'मातृभ्यां मातृभ्याम्' या समानरूप विभक्त्यन्तांचा एकशेष होणें इष्ट आहे. वास्तविक भाष्यकारांच्या म्हणण्याचा गूढ भावार्थ हाच आहे कीं, दोन 'मातृ' शब्दांचीं सर्व विभक्तींत सारखीं रूपें होत नसल्यामुळें, 'मातृभ्याम्' या दोन पदांचा एकशेष होणें केव्हांहि इष्ट नाहीं. म्हणून वरील वार्तिक 'प्रातिपदिकानामेकशेषः' व 'विभक्त्यन्तानामेकशेषः' या दोन्ही पक्षांना सारखेंच लागू पडावें याकरितां त्या वार्तिकांत 'प्रातिपदिकैकशेषे' हें पद घालावयास नको होतें असा शंकाकाराच्या म्हणण्याचा आशय आहे. 'ननु वार्तिके प्रातिपदिकैकशेषे इत्ययुक्तम्' येथपासून 'कैयटादिभिर्व्याख्यातम्' येथपर्यंत शंकाग्रन्थ आहे, व या शंकाग्रन्थांतील 'तत्पक्षे इष्टापत्तिः' येथून 'इति

भाष्योक्तेः' येथपर्यंत भाग प्रतिशंकारूप ग्रन्थ आहे. आतां शंकाकारानें शंकाग्रन्थांत जें वर म्हटलें आहे त्यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं,) शंकाकाराचें वरील म्हणणें बरोबर नाहीं; कारण दोन पक्षांमध्यें असा विरोध येतो, म्हणजे एक पक्षांत जें रूप साधु ठरतें तें दुसऱ्या पक्षांत असाधु ठरण्याची आपत्ति येते, हें वार्तिककाराला माहीत असून देखील वार्तिककारानें वरील वार्तिक पठित केलें आहे आणि म्हणूनच, म्हणजे दोन भिन्न 'मातृ' शब्दांच्या समानरूप विभक्त्यन्त पदांचा एकशेष होऊं शकतो असें तेवढ्यापुरतें गृहीत धरून वार्तिककारानें वरील वार्तिक पठित केलें असल्यामुळेंच, 'अथ मतमेतद्विभक्त्यन्तानां सारूप्ये भवितव्यमेकशेषेण' याच्या पुढें भाष्यकारांनीं 'एवं च कृत्वा चोद्यते' असें भाष्यांत म्हटलें आहे. 'एवं च कृत्वा चोद्यते' या पदांपूर्वीं 'प्रातिपदिकानामेकशेषे' इत्यादि पदें अध्याव्याहृत आहेत, म्हणजे 'अथ मतमेद्विभक्त्यन्तानां सारूप्ये भवितव्यमेकशेषेणेति प्रातिपदिकानामेवैकशेषे दोषो भवति । एवं च कृत्वा चोद्यते' अशी भाष्यपंक्ति पठित आहे. (या भाष्यपंक्तीचा अर्थ हा आहे कीं, 'मातृभ्याम्' इत्यादि समानरूप विभक्त्यन्तांचा एकशेष होणें इष्टच आहे असें जर मत असेल तर 'प्रातिपदिकानामेकशेषः' या पक्षांत असमान रूपांच्या विषयांत देखील एकशेष होण्याची आपत्ति येत असल्यामुळें, तो पक्ष दूषित ठरतो व असें गृहित धरूनच वार्तिककारानें त्या पक्षांस 'मातृमात्रोः प्रतिषेधः' हा प्रतिषेध सांगितला आहे.) 'एवं च कृत्वा चोद्यते' असें भाष्यांत म्हटलें असल्यामुळें त्यावरूनच हें स्पष्ट होतें कीं, वरील वार्तिक (सिद्धान्तपक्षाचें वार्तिक नसून) पूर्वपक्षरूपानें पठित केलेलें वार्तिक आहे. त्या वार्तिकांत जें 'मातृ' शब्दाचें ग्रहण केलें आहे तें ग्रहण ज्या प्रातिपदिकांचीं प्रत्येक विभक्तींत समान रूपें होत नाहींत त्यांचें उपलक्षण आहे, म्हणजे वार्तिकांतील 'मातृ' शब्दानें केवळ दोन 'मातृ' शब्दांचेंच ग्रहण होत नसून ज्या समानरूप प्रातिपदिकांचीं सर्व विभक्तींत सारखीं रूपें होत नाहींत त्यांचें देखील ग्रहण होतें.

(यानकर्ता या अर्थाचा वाचक तृजन्त पुल्लिङ्ग 'यातृ' शब्द व देवरपत्नी या अर्थाचा बोधक स्त्रीलिङ्ग 'यातृ' शब्द इत्यादि समानरूप प्रातिपदिकांचें देखील वार्तिकस्थ 'मातृ' शब्दानें ग्रहण होतें; कारण दोन 'यातृ' शब्द—प्रातिपदिकें—जरी समानरूप आहेत तरी त्यांचीं सर्व विभक्तींत समान रूपें न होतां कांहीं विभक्तींत भिन्न रूपें होतात. तसेंच ज्याप्रमाणें 'मातृ' हा शब्द ज्या समानरूप प्रातिपदिकांचीं सर्व विभक्तींत सारखीं रूपें होत नाहींत त्यांचें उपलक्षण आहे त्याचप्रमाणें 'प्रातिपदिकैकशेषे' हें वार्तिकस्थ पद देखील 'विभक्त्यन्तानामेकशेषः' या पक्षाचें देखील उपलक्षण आहे, म्हणजे दोन्हीं पक्षांत 'मातृमात्रोः प्रतिषेधः' हा प्रतिषेध लागू पडतो, हें मानणें योग्य आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा गूढ आशय आहे.) वरील वार्तिकांत जो पूर्वपक्ष केला आहे तो, प्रकृत सूत्रांत 'एकविभक्तौ' हें पद नसलें तरच, 'प्रातिपदिकानामेक-शेषः' या पक्षांत उपपन्न ठरूं शकतो असें मानून केला आहे. प्रकृत सूत्रांत 'एकविभक्तौ' हें पद नसल्यास, जीं समानरूप प्रातिपदिकें आहेत (त्यांचीं कांहीं विभक्तींत भिन्न रूपें होत असली तरी) त्यांचा एकशेष होतोच असाच प्रकृत सूत्रांतून अर्थ निष्पन्न होऊं पाहतो. (प्रकृत सूत्रांत 'एकविभक्तौ' हें पद असल्यास, वरील वार्तिक असण्याची कांहीं गरज नाहीं. पण तें पद प्रकृत सूत्रांतून गाळलें तर वरील वार्तिक पठित करणें आवश्यक आहे असा वार्तिककाराच्या म्हणण्याचा आशय आहे. सारांश प्रकृत सूत्रांत 'एकविभक्तौ' हें पद असणें आवश्यक आहे हें सिद्ध करण्याच्या हेतूनें वार्तिककारानें वरील वार्तिक पूर्वपक्षरूपानें आरंभिलें आहे व तें पद गाळल्यास कोणत्या अडचणी येतील व त्या अडचणी दूर करण्याकरितां कोणते उपाय योजावे लागतील हें त्या वार्तिकांत संक्षिप्तरूपानें सांगितलें आहे.) 'हरित' व 'हरिण' या दोन्ही प्रातिपदिकांचें स्त्रीलिङ्गाचें जरी 'हरिणी' असेंच समान रूप होतें तरी त्या दोन 'हरिणी' शब्दांहून तद्धित प्रत्यय केला असतां (पुंवद्भाव होत असल्यामुळें)

त्यांचीं भिन्न भिन्न रूपें होतात आणि त्यामुळें यच्चावत् सर्व प्रयोगांत त्या दोन शब्दांचीं समान रूपें राहूं शकणें असंभवनीय आहे. म्हणून जेथें प्रयोगांत दोन समानरूप प्रातिपदिकांचीं कांहीं विभक्त्यन्त समान रूपें सामानाधिकरण्यानें आढळतात तशाच सारूप्याचें (प्रकृत सूत्रांतील 'सरूपाणाम्' या पदानें) ग्रहण होतें, आणि तशा प्रकारचें सादृश्य दोन भिन्न 'मातृ' शब्दांच्या 'मातृभ्याम्' या समान रूपांचा जेथें सामानाधिकरण्यानें प्रयोग केला आहे तेथें आढळत असल्यामुळें, तशा ठिकाणीं जी एकशेषाची प्राप्ति होते तिचा प्रतिषेध करण्याकरितां (प्रकृत सूत्रांत 'एकविभक्तौ' हें पद नसल्यास) वरील निषेधक वार्तिक असणें आवश्यक आहे. ('हरित' हा वर्णवाचक शब्द तकारोपध असून 'वर्णाणां तणतिनितान्तानाम्' फिट् सू. ३३ या सूत्रान्वयें आद्युदात्त, म्हणजेच अनुदात्तान्त, आहे. त्यामुळें 'वर्णादनुदात्तात्' सू. ४९६ या सूत्रानें त्याहून विकल्पेंकरून 'ङीप्' प्रत्यय होतो व तो प्रत्यय केला असतां, तकाराचे जागीं नकारादेश होऊन 'हरित' या अदन्त शब्दाचीं 'हरिता हरिणी' अशीं स्त्रीलिङ्गाचीं पाक्षिक रूपें होतात. 'हरिण' या जातिवाचक शब्दाचें देखील 'जातेरस्त्रीविषयात्' सू. ५१८ या सूत्रानें 'ङीष्' प्रत्यय होऊन 'हरिणी' असेंच स्त्रीलिङ्गाचें रूप होतें. जरी 'हरित' व 'हरिण' हीं दोन समानरूप प्रातिपदिकें नाहींत तरी त्या दोन्ही प्रातिपदिकांचीं स्त्रीलिङ्गाचीं रूपें सारखींच होतात, म्हणजे 'हरिणी' अशींच होतात. म्हणून समानरूप प्रातिपदिकांचा एकशेष होतो हा पक्ष मानल्यास, 'हरित' व 'हरिण' या दोन विरूप प्रातिपदिकांहून सिद्ध झालेल्या स्त्रीलिङ्गी समानरूप भिन्नार्थक दोन 'हरिणी' शब्दांचा एकशेष न होण्याची आपत्ति येते. हे दोन 'हरिणी' शब्द असे आहेत कीं, यांचीं सर्व विभक्तींत समानरूपें होतात; पण हे दोन्ही शब्द स्त्रीप्रत्ययान्त असल्यामुळें, 'अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपदिकम्' सू. १७८ या सूत्रांतील 'अप्रत्ययः' या निषेधान्वयें त्यांना प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं व ज्या दोन प्रातिपदिकांहून

हे दोन स्त्रीप्रत्ययान्त शब्द सिद्ध झाले आहेत तीं विरूप प्रातिपदिकें आहेत. मग या दोन स्त्रीप्रत्ययान्त शब्दांचा एकशेष व्हावा कसा ? त्यांचा एकशेष होणें इष्ट असल्यामुळें, प्रातिपदिकैकशेषपक्षांत भाष्यकारांनीं 'हरितहरिणश्येतश्येनरोहितरोहिणानां स्त्रियामुपसङ्ख्यानम्' हें वार्तिक पठित केलें आहे. या वार्तिकाचा अर्थ हा आहे कीं, प्रातिपदिकांचा एकशेष होतो हा पक्ष मानला तर, हरित आणि हरिण, श्येत आणि श्येन, रोहित आणि रोहिण हीं प्रातिपदिकें विरूप असल्यामुळें त्यांहून स्त्रीप्रत्यय केला असतां जीं समानरूप स्त्रीप्रत्ययान्त रूपें होतात त्यांचा जो एकशेष होणार नाहीं तो व्हावा याकरितां हें वार्तिक पठित केलें पाहिजे. पण पुढें भाष्यकार 'न वा पदस्यार्थे प्रयोगात्' हें उलट वार्तिक पठित करतात व म्हणतात कीं, 'न वैष दोषः । किं कारणम् ? । पदस्यार्थे प्रयोगात् । पदमर्थे प्रयुज्यते, विभक्त्यन्तं च पदम् । रूपं चेहाश्रीयते, रूपनिर्ग्रहश्च शब्दस्य नान्तरेण लौकिकं प्रयोगम् । तस्मिन्श्च लौकिके प्रयोगे सरूपाण्ये तानि ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, 'प्रातिपदिकानामेकशेषः' या पक्षांत हें वरील वार्तिक पठित करण्याची कांहीं गरज नाहीं. अर्थाचा बोध होण्याकरितां कोणत्याहि लौकिक प्रयोगांत् प्रातिपदिकांचा प्रयोग केला जात नसून पदांचाच प्रयोग केला जातो आणि पदसंज्ञा ही 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रान्वयें विभक्त्यन्तालाच होते. पाणिनीनें प्रकृत सूत्रांत 'रूप' हा शब्द उच्चारला आहे आणि एखाद्या शब्दाचें रूप अमुकच प्रकारचें आहे असा निश्चय लौकिक प्रयोगावांचून होणें अशक्य आहे. त्या लौकिक प्रयोगामध्यें 'हरित, हरिण' या दोन्ही विरूप प्रातिपदिकांचे 'हरिणी' असें सारखेंच रूप दृष्टीस पडत असल्यामुळें, त्या दोन 'हरिणी' शब्दांचा प्रकृत सूत्रानें एकशेष होण्यांत कांहीं प्रत्यवाय येऊं शकत नाहीं. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, जरी विरूप प्रातिपदिकें असलीं तरी त्यांचीं लौकिक प्रयोगांत जीं स्त्रीप्रत्ययान्त समान रूपें होतात व ज्यांचीं सर्व विभक्तींत सारखींच रूपें होतात

तशा स्त्रीप्रत्ययान्त समान रूपांचा विभक्तिप्रत्यय उत्पन्न होण्यापूर्वी एकशेष होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. या भाष्यावरून हें देखील सिद्ध होतें कीं, लौकिक प्रयोगांमध्यें जो सारखेपणा पहावयाचा तो प्रातिपदिकांत पहावयाचा नसून केवळ विभक्त्यन्त रूपांमध्येंच पहावयाचा असतो. विभक्त्यन्त रूपांमध्यें सारखेपणा असला तर प्रकृत सूत्र लागू पडतें. प्रातिपदिकांचीं जीं तद्धितान्त वगैरे रूपें होतात त्या रूपांतहि सारखेपणा असला पाहिजे याची कांहीं गरज नाहीं. उदाहरणार्थ 'हरित' शब्दाचें व तसेंच 'हरिण' शब्दाचें 'हरिणी' असें जें स्त्रीलिङ्गाचें रूप होतें त्या रूपाचीं विभक्तिप्रत्ययान्त रूपें समान असतात; पण तद्धितान्त रूपें, 'तसिलादिष्वाकृत्वसुचः' सू. ८३६ हें पुंवभ्दावाचें सूत्र असल्यामुळें, भिन्न प्रकारचीं होतात. तद्धित 'रूपप्' प्रत्यय लावल्यास 'हरितरूपा, हरिणरूपा' अशीं भिन्न रूपें होतांत, तद्धित 'अण्' प्रत्यय लावल्यास 'हारित, हारिण' अशीं भिन्न रूपें होतात. पण अशीं जरी तद्धितान्त भिन्न रूपें होतात तरी दोन स्त्रीप्रत्ययान्त 'हरिणी' शब्दाचीं विभक्त्यन्त रूपें समान होत असल्यामुळें व त्यांचेच ठिकाणीं सादृश्य पाहणें आवश्यक असल्यामुळें, प्रकृत सूत्रानें त्या दोन 'हरिणी' शब्दांचा एकशेष होण्यांत कोणतीहि अडचण येत नाहीं. प्रकृत सूत्रांत 'एकविभक्तौ' हें पद असल्यामुळें व तें पद 'सरूपाणाम्' या पदाशीं अन्वित होत असून उत्तर सूत्रांतून 'एव' या पदाचें अनुकर्षण होत असल्यामुळें, 'एकविभक्तौ सरूपाणामेव प्रातिपदिकानामेकशेषः' असा प्रकृत सूत्राचा अर्थ निष्पन्न होतो. पण प्रकृत सूत्रांतून 'एकविभक्तौ' हें पद गाळल्यास, प्रातिपदिकैकशेषपक्षांत 'हरितहरिण–' हें वार्तिक पठित करावें लागेल असा जो वार्तिककारानें दोष दिला होता त्याचें 'न वा पदस्यार्थे प्रयोगात्' हें वार्तिक पठित करून भाष्यकारांनीं निराकरण केलें आहे. या वरील भाष्याच्या आधारावरच 'प्रयोगमात्रावच्छेदेन सारूप्यस्य...असम्भवात् प्रयोगसामानाधिकरण्यैनैव सारूप्यस्य ग्राह्यतया' असें शब्दरत्नांत म्हटलें आहे. वास्त-

विक पाहिलें असतां, ‘प्रातिपदिकग्रहणे लिङ्गविशिष्टस्यापि ग्रहणम्’-परि. ७२ ही परिभाषा असल्यामुळें, या परिभाषेच्या आधारावरच भाष्यकारांना ‘हरितहरिण’ या वार्तिकाचें प्रत्याख्यान करतां आलें असतें. त्यांनी तशा रीतीनें त्या वार्तिकाचें प्रत्याख्यान न करितां, ‘न वा पदस्यार्थे प्रयोगात्’ हें वार्तिक पठित करून त्या पूर्व वार्तिकाचें प्रत्याख्यान केलें आहे ही गोष्ट वेगळी. सारांश प्रकृत सूत्रांतून ‘एकविभक्तौ’ हें पद गाळल्यास व प्रातिपदिकानामेकशेषः’ हा पक्ष मानल्यास, दोन ‘मातृ’ शब्दांचा एकशेष न व्हावा याकरितां ‘मातृमात्रोः ‘प्रतिषेधः’ हें वार्तिक पठित करणें आवश्यक ठरतें; कारण हीं दोन प्रातिपदिकें जरी समानरूप आहेत तरी त्यांचीं सर्व विभक्तींत सारखीं रूपें होत नाहींत हें पूर्वीं सांगितलेंच आहे.) प्रकृत सूत्रांतून ‘एकविभक्तौ’ हें पद गाळलें तरच प्रातिपदिकानामेकशेषे मातृमात्रोः प्रतिषेधः सरूपत्वात्’ हें पूर्वपक्षाचें वार्तिक उपपन्न ठरत असल्यामुळें, भाष्यकारांनीं प्रकृत सूत्रावरील पुढील भाष्यांत प्रकृत सूत्रांत ‘एकविभक्तौ’ हें जें पद आहे त्यांतील ‘विभक्ति’ हा शब्द सारूप्याचें उपलक्षण आहे, म्हणजे तो शब्द सारूप्य या अर्थाचा वास्तविक वाचक आहे, असें मानून व ‘प्रातिपदिकानामेकशेषः’ हा पक्ष सिद्धान्तरूपानें स्थापित करून ‘मातृमात्रोः प्रतिषेधः’ या वार्तिकाचें खण्डन केलें आहे आणि अशा रीतीनें प्रकृत सूत्रांत ‘एव’ या पदाचें अनुकर्षण होतें हें भाष्यकारांनीं ध्वनित केलें आहे. उत्तर सूत्रांतून ‘एव’ या पदाचें अपकर्षण केल्याशिवाय, प्रकृत सूत्रांतील ‘विभक्ति’ हा शब्द सारूप्याचें उपलक्षण आहे एवढेंच मानल्यानें, मातृमात्रोः प्रतिषेधः’ या वार्तिकाचें खण्डन करतां येऊं शकलें नसतें. (प्रकृत सूत्रावरील ज्या भाष्याचा वरील शब्दरत्नांत उल्लेख केला आहे त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात-‘अथानेन प्रक्षेणार्थः स्यात् प्रातिपदिकानामेकशेष इति। बाढमर्थः। किं वक्तव्यमेतत्?। न हि। कथमनुच्यमानं गंस्यते?। एतेनैवाभिहितं सूत्रेण सरूपाणामेकशेष एकविभक्ताविति। कथम्?। विभक्तिः

सारूप्येणाश्रीयते । अनैमित्तिक एकशेषः । एकविभक्तौ यानि सरूपाणि तेषामेकशेषो भवति । क्व ? । यत्र वा तत्र वेति । ' या भाष्याचा अर्थ असा आहे कीं, प्रातिपदिकांचा एकशेष होतो या पक्षाचा कांहीं उपयोग आहे काय ? बराच उपयोग आहे. तर मग प्रातिपदिकांचा एकशेष होतो असें वचन पठित केलें पाहिजे कीं काय ? तसें वचन करावयास नको. पण सूत्रामध्यें तसें स्पष्टपणें सांगितलें नसल्यामुळें तसा अर्थ कसा ज्ञात होऊं शकणार? 'सरूपाणामेकशेष एकविभक्तौ' या सूत्रानेंच हा पक्ष ज्ञात होतो. या सूत्रांत 'विभक्ति' या शब्दानें सारूप्याचा आश्रय केला जातो, म्हणजे सारूप्य कोठें पाहिलें पाहिजे याकरितां प्रकृत सूत्रांत 'विभक्तौ' हें पद उच्चारलें आहे. एकशेष हा अनिमित्तकच आहे, म्हणजे 'विभक्तौ' हें एकशेषाचें निमित्त या रूपानें उच्चारलें नाहीं. म्हणून सूत्रार्थ असा होतो कीं, लौकिक प्रयोगामध्यें ज्या प्रातिपदिकांचें रूप प्रत्येक विभक्तींत सारखें होतें त्या प्रातिपदिकांचा एकशेष होतो. तो केव्हां होतो असें विचारल्यास, तो वाटेल तेव्हां होतो, म्हणजे विभक्तिप्रत्यय पुढें असणें या निमित्ताची त्याला गरज नसून तशीं समानरूप प्रातिपदिकें उच्चार-ल्याबरोबर त्यांचा एकशेष प्राप्त होतो. या भाष्यांत भाष्यकारांनीं प्रकृत सूत्रांतील 'विभक्तौ' हें पद सारूप्याचें उपलक्षण आहे असें सांगून त्या पदाची आवश्यकता दाखविली आहे आणि त्या पदाच्या सामर्थ्यानें, ज्या प्रातिपदिकांचीं सर्व विभक्तींत सारखीं रूपें होतात त्यांचा एकशेष होतो, असा प्रकृत सूत्राचा अर्थ होत असल्यामुळें, दोन 'मातृ' शब्दांचा एकशेष होऊं शकत नाहीं हें आपोआपच सिद्ध होतें, आणि म्हणून 'मातृमात्रोः प्रतिषेधः' हें वचन वरील वार्तिकांत असण्याची कांहीं गरज नाहीं असें भाष्यकारांचें म्हणणें आहे. शब्दरत्नकार म्हणतात कीं, या भाष्यावरून हें ध्वनित होतें कीं, भाष्यकारांनीं प्रकृत सूत्रांत उत्तर सूत्रांतून 'एव' या पदाचें अनुकर्षण केलें आहे. शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, प्रकृत

सूत्रांत 'एव' या पदाचें अनुकर्षण न केल्यास सूत्रार्थ असा होईल कीं, ज्या विभक्तींत सारखीं रूपें होतात त्यांचा एकशेष होतो व ज्या विभक्तींत सारखीं रूपें होत नाहींत त्यांचा एकशेष होत नाहीं, आणि तसा अर्थ झाल्यास, दोन 'मातृभ्याम्' या पदांचा एकशेष होण्याची आपत्ति येते व ती आपत्ति टाळण्याकरितां वरील वार्तिक असणें आवश्यक ठरतें. पण प्रकृत सूत्रांत 'एव' या पदाचें अपकर्षण केल्यानें प्रकृत सूत्राचा, ज्या प्रातिपदिकांचीं सर्व विभक्तींत समानरूपें होतात त्यांचाच एकशेष होतो असा अर्थ होत असल्या-मुळें, त्या अर्थान्वियेंच 'मातृभ्याम्' या पदांचा एकशेष होऊं शकत नाहीं व वरील वार्तिक पठित करण्याची कांहीं गरज राहत नाहीं. या विषयासंबंधानें प्रकृत सूत्रावरील उद्योतांत 'वस्तुतस्तु विभक्ति-त्वावच्छेदेन सारूप्यविवक्षणान्न मातृमात्रादौ दोष इति बोध्यम्। एकशब्दस्वारस्येनैवकारापकर्षणेन वैकस्यामपि विभक्तौ यानि विरूपाणि नेत्यर्थादिति दिक्। एकग्रहणफलं तु चिन्त्यमेव ··· अत्रापि विभक्तिः सारूप्येणाश्रीयते इत्येवोक्तं नत्वेकविभक्तिरिती।' असें म्हटलें आहे.) प्रकृत सूत्रांतील 'एकविभक्तौ' हें पद दोनदां उच्चारून व एकदां उच्चारलेल्या त्या पदाचा ('सरूपाणाम्' या पदाशीं अन्वय केल्यानें) 'एकविभक्तौ सरूपाणाम्' असा अर्थ करून व दुसऱ्यानें उच्चारलेल्या त्या पदाचा 'एकविभक्तौ विवक्षितायाम्' असा अर्थ करून, म्हणजे 'एकविभक्तौ' हें पद एकदा उद्देश्यकोटींत व पुन्हा निमित्तकोटींत प्रविष्ट करून, कित्येक वैयाकरण असें म्हणतात कीं, प्रकृत सूत्राचा असा अर्थ निष्पन्न होतो कीं, जे विभक्तिप्रत्यय लावले असतां समान रूपें होतात ते विभक्तिप्रत्यय पुढें असतांना प्रातिपदिकांचा एकशेष होतो आणि असा अर्थ करून पुढें ते असें म्हणतात कीं, 'भ्याम्' इत्यादि विभक्तिप्रत्यय पुढें असतांना दोन 'मातृ' शब्दांचीं जीं समान विभक्त्यन्त रूपें होतात तशा स्थलीं एकशेष होतो, पण 'औ, जस्' इत्यादि विभक्तिप्रत्यय लावले असतां दोन 'मातृ' शब्दांचीं भिन्न रूपें होत असल्यामुळें

तशा स्थलीं एकशेष होत नाहीं, आणि असा प्रकृत सूत्राचा अर्थ होत असल्यामुळें 'मातृमात्रोः' प्रतिषेधः' हें वार्तिक असण्याची कांहीं गरज नाहीं असा ('राम राम औ इति स्थिते–' असें म्हणणाऱ्या) प्रकाशकारांचा आशय आहे. पण हें त्या वैयाकरणांचें म्हणणें, वर जसें प्रकृत सूत्राचें वरील प्रमाणभूत भाष्याच्या आधारें व्याख्यान केलें आहे त्या व्याख्यानान्वयें, चूक ठरतें; कारण वार्तिककाराच्या मतें 'भ्याम्' इत्यादि विभक्तप्रत्यय पुढें असतांना देखील एकशेष होऊं शकत नाहीं. (वर जें प्रकृत सूत्राचें व्याख्यान केलें आहे त्या व्याख्यानान्वयें ज्या प्रातिपदिकांचीं सर्व विभक्तींत समान रूपें होतात त्यांचाच प्रातिपदिकावस्थेंत विभक्तिप्रत्यय उत्पन्न होण्यापूर्वी एकशेष होत असल्यामुळें, व 'एकविभक्तौ' या पदाची द्विरावृत्ति करण्यास कोणतेंहि प्रमाण नसल्यामुळें, वरील वैयाकरणांचें म्हणणें चूक ठरतें हें अगदीं उघड आहे.)

शब्दरत्न—एतच्चेति । एकशेषविधायकं चेत्यर्थः । ध्वनितं चेदं पृथक सर्वेषां विभक्तिपराणमेकशेष इति पक्षे विभक्त्यन्तानामेकशेष इति पक्षे च, "द्वन्द्वप्रतिषेधो वक्तव्य" इत्याशङ्क्य "अनवकाश एकशेषो द्वन्द्वं बाधिष्यते" इति ग्रन्थेन भाष्ये । इतरेतरेती "एकवच्चास्यान्यतरस्याम्" इत्यनेनैकशेषविषयपदानां समाहारेऽवृत्तिबोधनादिति भावः । इतरान्वय इति । एकरूपेणैकरूपावच्छिन्ने इतरत्रान्वय इत्यर्थः । इदित इति । अत्र ह्यभेदेन परस्परान्वयाद्भेदघटितसाहित्यनिमित्तैकशेषाप्रवृत्तिरिति भावः । ऐकरूप्येणैवेति । पुष्पवन्तपद इवेति भाव । द्वन्द्वे प्रसक्ते इति । विभक्त्युत्पत्तौ सत्यां तत्प्रसक्तिर्बोद्धव्या ।

'एतच्च सहविवक्षायामेव प्रवर्तते' या मनोरमेंतील पंक्तींतील 'एतच्च' या पदांचा 'एकशेषविधायकं च' असा अर्थ आहे. ('सरूपाणामेकशेषः' या सूत्रांत 'एकशेषः' असा पुल्लिङ्गांत निर्देश असल्यामुळें, दीक्षितांनीं 'स च सहविवक्षायामेव' असें

वास्तविक म्हणावयास पाहिजे होतें. परंतु त्यांनी 'एतद्' असा नपुंसकलिङ्गांत सर्वनामरूपाचा निर्देश केला असल्यामुळें, शब्दरत्नकारांनीं त्या पदाचा 'प्रकृत एकशेषविधायकसूत्र' असा अर्थ केला आहे.) 'पृथक् सर्वेषां विभक्तिपराणामेकशेष:' हा पक्ष मानला किंवा 'विभक्त्यन्तामामेकशेष:' हा पक्ष मानला तर 'द्वन्द्वप्रतिषेधो वक्त्यव्य:' असें वचन पठित करावें लागेल अशी प्रकृत सूत्रावरील भाष्यांत शंका उपस्थित करून 'अनवकाश: एकशेष: द्वन्द्वं बाधिष्यते' अशा रीतीनें भाष्यकारांनीं त्या शंकेचें निवारण केलें असल्यामुळें, त्यावरून हें ध्वनित होतें कीं, जेथें सहविवक्षा असते तेथेंच प्रकृत एकशेषविधायक सूत्राची प्रवृत्ति होते. (प्रकृत सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात- 'द्वन्द्वस्य च प्रतिषेधो वक्तव्य:। वृक्षश्च वृक्षश्च वृक्षौ। वृक्षश्च वृक्षश्च वृक्षश्च वृक्षा इति। चार्थे द्वन्द्व: इति द्वन्द्व: प्राप्नोति। नैष दोष:। अनवकाश एकशेषो द्वन्द्वं बाधिष्यते।' भाष्यकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, जेथें जेथे एकशेषाचें प्रकृत सूत्र प्रवृत्त होऊं पाहतें तेथें तेथें 'चार्थे द्वन्द्व:' या द्वन्द्वविधायक सूत्राची अवश्यप्राप्ति असल्यामुळें, प्रकृत सूत्राला प्रवृत्त होण्यास कोणतेंहि उदाहरण मिळत नाहीं व तें अनवकाश ठरूं पाहतें, आणि अनवकाशत्वामुळेंच 'येन नाप्राप्ते'—परि. ५८—या न्यायान्वयें तें द्वन्द्वविधायक सूत्राचा बाध करून स्वत: प्रवृत्त होतें. जेथें सहविवक्षा आहे तेथेंच इतरेतरयोगद्वन्द्व होत असल्यामुळें व ज्या स्थितींत सामान्य शास्त्राची प्रवृत्ति होत असते तशाच स्थितींत विशेषशास्त्र प्रवृत्त होत असल्यामुळें, सहविवक्षा असल्यासच इतरेतरयोगद्वन्द्वाचें बाधक प्रकृत एकशेषविधायक सूत्र प्रवृत्त होऊं शकतें हें आपोआपच सिद्ध होतें. प्रकृत सूत्रावरील पुढील भाष्यांत तर भाष्यकारांनीं 'सहविवक्षायामेकशेष:' असें स्पष्ट सांगून पुढें असें म्हटलें आहे कीं, 'यदप्युच्यते द्वन्द्वप्रतिषेधश्च वक्तव्य इति। नैष दोष: अनवकाश एकशेषो द्वन्द्वं बाधिष्यते।' जेथें सहविवक्षा आहे तेथें इतरेतरयोगद्वन्द्व होतो व जेथें

सहविवक्षा नाहीं तेथें एकशेष होतो असें मानल्यास दोहोंचे विषय भिन्न ठरतील व त्यामुळें 'अनवकाश एकशेषो द्वन्द्वं बाधिष्यते' हें भाष्यवचन असङ्गत ठरण्याची आपत्ति येईल. म्हणून हें मानणें आवश्यक आहे कीं, इतरेतरयोगद्वन्द्वाप्रमाणें एकशेष देखील सह-विवक्षा असल्यासच होऊं शकतो. 'सहविवक्षापदार्थस्तु विशेष्य-विशेषणभावानापन्नानेकस्य युगपदेकपदार्थसम्बन्धबोधनेच्छा' अशी सहविवक्षा या शब्दाची भैरवींत व्याख्या दिली आहे.) 'इतरेतर-योगद्वन्द्वस्य विषय इति यावत्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'एकवच्चास्यान्यतरस्याम्' हीं पदें 'नपुंसकमनपुंसकेन' सू. ९३५ या एकशेषविधायक सूत्रांत घातलीं असल्यामुळें, त्यावरून हें ज्ञापित होतें कीं, जीं पदें एकशेषाचा विषय आहेत त्यांचा समाहारद्वन्द्व होऊं शकत नाहीं. (इतरेतर-योगद्वन्द्वाचें रूप नेहमी द्विवचनान्त किंवा बहुवचनान्त होत असतें. पण समाहार—समूह—हा एकत्वसंख्याविशिष्ट असल्यामुळें, समाहारद्वन्द्वाचें नेहमी एकवचनान्तच रूप होत असतें. इतरेतर-योगद्वन्द्वाच्या विषयांत जसा एकशेष होतो तसा समाहाराच्या विषयांत, म्हणजे समाहार विवक्षित असतांना, देखील तो होतो असें मानल्यास, 'शुक्लः पटः, शुक्ला शाटी, शुक्लं वस्त्रम्' या स्थलीं 'शुक्लः, शुक्ला, शुक्लम्' या नपुंसकानपुंसकांचा एकशेष समाहार विवक्षित असतां, एकवचनांत होईलच व इतरेतरयोगद्वन्द्व विवक्षित असतां बहुवचनांत होईलच, म्हणजे एकवचनाचें व तसेंच बहुवचनाचें 'तदिदं शुक्लम् तानीमानि शुक्लानि' अशीं दोन्ही प्रकारचीं रूपें आपोआपच सिद्ध होऊं शकतील. मग 'नपुंसकमनपुंसकेन' या एकशेषविधायक सूत्रांत 'एकवच्चास्यान्यतरस्याम्' म्हणजे 'विकल्पेन एकवद्भवति' हीं पदें घालण्याची काय गरज होती? असें असून देखील त्या सूत्रांत तीं घातलीं असल्यामुळें त्यावरूनच हें स्पष्ट होतें कीं, समाहाराच्या विषयांत एकशेष होत नाहीं. त्यामुळें नपुंसक व अनपुंसक शब्दांचा

एकशेष केला असतां नित्य द्विवचनान्त किंवा बहुवचनान्त रूपच होऊं शकतें व एकवचनान्त रूप होऊं शकत नाहीं. तसें एकवचनान्त रूप देखील विकल्पेंकरून व्हावें याकरितां त्या सूत्रांत तीं पदें मुद्दाम घातलीं आहेत व अशा रीतीनें तीं पदें समाहारद्वन्द्वाच्या विषयांत एकशेष होत नाहीं याचें ज्ञापक ठरतात.) 'अनेकार्थस्य मिलितस्य इतरान्वयः' या मनोरमेच्या पंक्तीचा 'एकरूपेण एक-रूपावच्छिन्ने इतरत्र अन्वयः', म्हणजे जेथे अनेक पदांच्या अर्थांचा एकाच प्रकारानें एकच अवच्छेदक धर्मयुक्त अन्य पदार्थांत मिळून अन्वय होतो तसेंच स्थल एकशेषाचा विषय ठरतें, असा अर्थ आहे. (याचा भावार्थ हाच आहे कीं, जेथें सहविवक्षा आहे तेथें ज्याप्रमाणें इतरेतरयोगद्वन्द्व होतो त्याचप्रमाणें जेथें सहविवक्षा आहे तेथेंच एकशेष होतो. सहविवक्षा कशास म्हणतात हें वर सांगितलेंच आहे. 'वृक्षौ छिन्धि' या उदाहरणांत 'वृक्षश्च वृक्षश्च' हे दोन्ही शब्द एकत्र मिळून छेदनक्रियेंत एकच रूपानें, म्हणजे कर्मकारकरूपानें, अन्वित असल्यामुळें, या स्थलीं सहविवक्षा आहे व त्यामुळें येथें एकशेष झाला आहे.) 'इदितो नुम्धातोः' सू. २२६२ या सूत्रांतील 'इदितः' या पदांत 'इत्' व 'इत्' अशीं जीं दोन पदें आहेत त्यांचा परस्परांशीं अभेदान्वय असल्यामुळें व जेथें समुदायगतव्यक्तींचा परस्पर भेद स्पष्ट असून त्या सर्व व्यक्ति एकत्र मिळून एकाच क्रियेंत एकाच प्रकारें अन्वित होतात तशाच स्थलीं एकशेष होऊं शकत असल्यामुळें, 'इदितः' यांत असलेल्या दोन 'इत्' पदांचा एकशेष झाला नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. ('इदितः' यांत असणारीं दोन 'इत्' पदें परस्प-रांशीं अभेदान्वयानें अन्वित आहेत असें जें वर शब्दरत्नांत म्हटलें आहे त्याचें कारण 'चक्षिङ्धातौ नुम्वारणाय इत् चासौ इत् च इति कर्मधारयसमासस्वीकारेणेत्संज्ञकेदन्तधातोर्नुम् भवतीत्यर्थस्य तत्रावश्यकतयाऽभेदान्वय इति भावः' असें सरलेंत दिलें आहे. जेथें अभेदान्वय असतो तेथें एकशेष होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ

'हरिरेव हरिः, राम एव रामः' अशा स्थलीं एकशेषाची प्राप्तीच होत नाहीं. जेथें समुदायान्तर्गत व्यक्तींमध्यें परस्परभेद स्पष्ट आहे व त्या सर्व व्यक्ति मिळून एकाच रूपानें वाक्यांतील इतर पदांशीं अन्वित होतात तशाच ठिकाणीं एकशेष होतो. याचें 'वृक्षौ छिन्धि' हें उदाहरण वर दिलेंच आहे. या उदाहरणांत वृक्षरूप समुदायामध्यें ज्या दोन वृक्षव्यक्ति आहेत त्या परस्परभिन्न असून एकाच छेदन क्रियेमध्यें मिळून कर्मरूपानें अन्वित होत असल्यामुळें त्यांचा एकशेष होतो.) 'ऐक्यरूपेणैवान्वेतुमर्हति' या मनोरमेच्या पंक्तींतील 'ऐक्यरूपेण' या पदाचा पुष्पवन्तपदे इव' असा भावार्थ आहे, म्हणजे ज्याप्रमाणें 'पुष्पवन्तौ' हा द्विवचनान्त सकृदुच्चरित शब्द सूर्य व चन्द्र या दोहोंचा मिळून बोधक होतो त्याचप्रप्रमाणें एकशेष केला असतां जो अविशिष्ट राहतो तो स्वतःचा व लुप्त झालेल्या पदांचा मिळून बोधक होतो. ('एकयोक्त्या पुष्पवन्तौ दिवाकरनिशाकरौ' असा अमरकोशांत पाठ आहे. या श्लोकाचा अर्थ असा आहे कीं, 'पुष्पवान्' या शब्दानें सूर्याचा किंवा चन्द्राचा बोध होत नसून 'पुष्पवन्तौ' या द्विवचनान्त पदानें सूर्य व चन्द्र या दोहोंचा मिळून बोव होतो, आणि म्हणूनच 'प्रत्येकं पुष्पवान् इति न प्रयोक्तव्यमिति भावः' असें अमरावरील रामाश्रमीटीकेंत म्हटलें आहे. 'पुष्पवान् च पुष्पवान् च पुष्पवन्तौ' या स्थलीं एक 'पुष्पवान्' शब्द नाहींसा होऊन जो एक 'पुष्पवान्' शब्द अवशिष्ट राहतो तो जसा सूर्य व चन्द्र या दोहोंचा मिळून बोधक होतो त्याचप्रमाणें एकशेष केला असतां जो अवशिष्ट राहतो तो स्वतःचा व लुप्त झालेल्यांचा मिळून बोध करितो असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे असें शब्दरत्नकार म्हणतात.) 'द्वन्द्वे प्रसक्ते सति' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ज्यांचा एकशेष करणें आहे त्यांहून विभक्तिप्रत्यय केला असतां इतरेतरयोग-द्वन्द्वाची जेथें प्राप्ति होते (तेथे अनेक सुबन्तांचा इतरेतरयोगद्वन्द्व होतो. 'राम सु राम सु राम सु' या स्थलीं तीन्ही 'राम' शब्दांहून

सुबुत्पत्ति केली असतां 'चार्थे द्वन्द्वः' सू. ९०१ या सूत्रानें इतरेतरयोग-द्वन्द्वाची प्राप्ति आहे. पण अशा स्थलीं अनवकाश एकशेष इततेतर-योगद्वन्द्वाचा बाध करून सुबुत्पत्ति होण्यापूर्वींच स्वतः प्रवृत्त होतो. व तो प्रवृत्त होते वेळीं सुबन्तांचा अभाव असल्यामुळें, इतरेतरयोग-द्वन्द्वाची वास्तविक प्राप्तीच होत नाहीं. सुबुत्पत्ति केल्यावरच त्याची प्राप्ती होते.)

शब्दरत्नः—एकवद्भावापत्तेरिति । एवं चेतरेतरयोगविषया-भावेनैकशेषानापत्तिरिति भावः । इत्यनयोरिति । "जसः शी" इन्यत्र "वा" इति वक्तव्ये "विभाषा जसि" इति तूद्भूताव-यवभेदविवक्षया बहुवचने, एकशेषद्वन्द्वयोरभावात्तत्र विकल्पवारणा योत्तरार्थं चेति भावः। सजातीयेति । स्वातन्त्र्येण प्रयोगार्हत्वेन साजात्येऽपि न दोषः। एतत्पूर्वभागस्य विभक्त्युत्पत्तिमनपेक्ष्य स्वात-न्त्र्येण प्रयोगानर्हत्वात् । अनुग्रहसम्भवादिति । अत एव न प्रत्येकं तदुत्पत्तिः । बाधादिति । अन्यथा द्वन्द्वोच्छेदो नलोपाद्यसिद्धिश्चेति भावः । यानिसरूपाण्येवेति । तेषामेकविभक्तौ परत एकशेष इति शेषः । मानाभावादिति । भाष्येऽनुक्तत्वादिति भावः । किंचावृत्तौ प्रत्यासत्तिन्यायेन यस्यां विभक्तावेकशेषस्तस्यां विभक्तौ यानि सरूपाण्येव तेषामित्यर्थापत्त्या भ्यामादावेकशेषापत्तिः । "प्रातिप-दिकैकशेषे मातृमात्रोः प्रतिषेधो वक्तव्य" इति वार्तिकेन भ्यामा-दावापि तदभावस्यैवेष्टत्वानुमानात् । फलमिति । समुदायादेकविभ-क्तेरभावाद्विभक्तेर्लुकालुप्तत्वाच्चेति भावः ।

'करौ करा इत्यादौ एकवद्भावापत्तेः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें आहे कीं, ('कर सु कर सु' या स्थलीं 'द्वन्द्वश्च प्राणितूर्यसेनाङ्गानाम्' सू. ९०६ या नियामक सूत्रानें इतरेतरयोगद्वन्द्वाचा बाध होऊन समाहारद्वन्द्वाची प्राप्ति होत अस-ल्यामुळें व एकशेष हा इतरेतर योगद्वन्द्वाचा बाधक असून समाहार-द्वन्द्वाचा बाधक नसल्यामुळें आणि) 'करौ कराः' इत्यादि इतरेत-

रयोगद्वन्द्वाचे विषय नसल्यामुळें अशा ठिकाणीं एकशेष न होण्याची आपत्ती येते (व एकशेष न करितां समाहारद्वन्द्व केल्यास 'करकरम्' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते.) 'सर्वे सर्वेषामित्यादौ द्वन्द्वे च, विभाषा जसि इत्यनयोरापत्तेः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'जसः शी' सू. २१४ या सूत्रांत 'वा' हें पद न घालतां 'विभाषा जसि' सू.२२५ असें जें पृथक् सूत्र केलें आहे त्याचें कारण हें कीं, (समुदायवाचक 'सर्व' या शब्दानें अनेक समुदायांचा बोध करणें नसून एकच समुदायाचा बोध करणें असल्यास जरी त्या शब्दाहून बहुवचनाच्या प्रत्ययाची प्राप्ति होत नाहीं तरी, 'सर्व' या समुदायांत अन्तर्गत असलेल्या) व्यक्तींतील भेद प्रगट व्हावा अशी विवक्षा असतांना, म्हणजे समुदायगत व्यक्तींची बहुत्वसंख्या सांगण्याची विवक्षा असतांना, जेथें बहुवचन केलें जातें तशा स्थलीं समुदाय अनेक नसून एकच असल्यामुळें इतरेतरयोगद्वन्द्वाची व एकशेषाची प्राप्ति होत नसल्यामुळें, तशा लक्ष्यापुढील 'जस्' प्रत्ययाचे जागीं विकल्पेंकरून 'शी' आदेश न व्हावा याकरितां 'जसः शी' या सूत्रांत 'वा' या पदाचें ग्रहण केलें नाहीं व 'विभाषा जसि' हें जें पृथक् सूत्र केलें आहे त्याचा उद्देश हा कीं, (जेथें सर्वनामसंज्ञक पदाचा इतर पदांशीं इतरेतरयोगद्वन्द्व होऊन तें सर्वनामसंज्ञक पद समासाच्या अन्तीं असतें तेथें तशा सामासिक पदाहून झालेल्या 'जस्' प्रत्ययाचे जागीं विकल्पेंकरून 'शी' आदेश व्हावा व 'प्रथमचरम' सू. २२६ इत्यादि) उत्तर सूत्रांत त्या सूत्राची अनुवृत्ति व्हावी. (प्रकृत सूत्रांत अनुवृत्त केलेल्या 'द्वन्द्वे' या पदाचा 'द्वन्द्वे प्रसक्ते सति' असा अर्थ न करितां 'द्वन्द्वे कृते सति' असा अर्थ केल्यास 'विभाषा जसि' या सूत्रान्वयें 'सर्वे' व 'सर्वाः' अशीं पाक्षिक रूपें होण्याची जी मनोरमेंत आपत्ति दिली आहे त्यावर शंकाकार असें म्हणतो कीं, वास्तविक ती आपत्ति येत नाहीं. 'जसः शी वा' असें जर पाणिनीनें सूत्र केलें असतें तर सर्व अदन्त सर्वनामांचीं 'जस्' प्रत्ययाचीं दोन पाक्षिक

रूपें झालीं असतीं व 'विभाषा जसि' हें पृथक् सूत्र करण्याची कांहींच गरज नव्हती. कारण 'जसः शी वा' असें एकच सूत्र केल्यानें सर्व काम भागूं शकलें असतें. पण तसें न करितां 'जसः शी' व 'विभाषा जसि' अशीं जीं दोन पृथक् सूत्रें पाणिनीनें केलीं आहेत त्यावरून हें ज्ञापित होतें कीं, इतरेतरयोगद्वन्द्व करून एकशेष केल्यावर कोणतेंहि द्वन्द्वसमासनिमित्तक कार्य करतां येत नाहीं व 'हलि सर्वेषाम्' सू. १७१ यांतील 'सर्वेषाम्' हा निर्देश याचें ज्ञापक आहे. 'सर्वेषाम्' या स्थलीं 'सर्व ङस्, सर्व ङस् यांचा सर्व ङस' द्वन्द्व करून एकशेष केल्यावर 'द्वन्द्वे च' सू. २२४ या सूत्रानें सर्वनाम-संज्ञानिषेधाची प्राप्ति होते. अशा स्थलीं द्वन्द्व करून एकशेष केल्यावर द्वन्द्वसंज्ञानिमित्तक सर्वनामसंज्ञानिषेध होतो असें मानल्यास, 'सर्वाणाम्' असें रूप होण्याची आपत्ति येते. पण पाणिनीनें तसा सौत्रनिर्देश न करितां 'सर्वेषाम्' असा सौत्रनिर्देश केला असल्यामुळें त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, द्वन्द्व करून एकशेष केला असतां द्वन्द्वनिमित्तक कोणतेंहि समासकार्य नंतर करतां येत नाहीं. त्यामुळें 'सर्व सु सर्व सु सर्व सु' यांचा द्वन्द्व करून एकशेष केल्यावर 'सर्व जस्' अशी स्थिति झाली असतां, 'विभाषा जसि' या सूत्रानें द्वन्द्व-संज्ञानिमित्तक जें वैकल्पिक 'जस्' स्थानिक 'शी' भावरूप कार्य प्राप्त होतें तें करतां येत नाहीं आणि त्यामुळें 'सर्वाः' असें पाक्षिक रूप होण्याची आपत्ति टळते व 'जसः शी' सू. २१४ या सूत्रानें 'सर्वे' असेंच रूप होतें. सारांश 'द्वन्द्वे प्रसक्ते सति' असा पक्ष न मानतां 'द्वन्द्वे कृते सति' असा पक्ष मानला तरी, दीक्षितांनीं मनोरमेंत ज्या आपत्ति दिल्या आहेत त्या येत नाहींत असें प्रकाशमता-नुयायी शंकाकाराचें म्हणणें आहे. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'सर्व' हा शब्द समुदायाचा वाचक असल्यामुळें जेथें अनेक समुदायांची विवक्षा आहे तशा स्थलीं एकशेष केला असतां द्विवचनाचा किंवा बहुवचनाचा प्रत्यय जसा प्राप्त होतो त्याचप्रमाणें जेथें समुदायाच्या एकत्वाची विवक्षा असून

समुदायावयवगत बहुत्वसंख्येची विवक्षा आहे तशा स्थलीं देखील 'सर्व' या शब्दाहून बहुवचनाचा 'जस्' प्रत्यय करतां येतो. पण या द्वितीय स्थलीं समुदायाच्या एकत्वाचीच विवक्षा असल्यामुळें 'सर्व सु सर्व सु सर्व सु' अशी स्थिति न होतां 'सर्व जस्' अशीच एकदम स्थिति होते. अशा स्थितींत द्वन्द्वाची किंवा एकशेषाची प्राप्तीच होत नाहीं व त्यामुळें द्वन्द्वसमासाच्या निमित्तामुळें प्राप्त होणाऱ्या 'विभाषा जसि' या सूत्राची आपोआपच प्राप्ति होत नाहीं. 'जसः शी वा' असें 'जसः शी' या सूत्राऐवजीं सूत्र केलें असतें तर, वरील उदाहरणांत 'सर्वाः' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती. ती आपत्ति न यावी व 'प्रथमचरम' इत्यादि उत्तर सूत्रांत 'विभाषा जसि' या सूत्राची अनुवृत्ति व्हावी याकरिता 'विभाषा जसि' हें पृथक् सूत्र केलें आहे, व हें सूत्र केवळ द्वन्द्वाच्या विषयांत प्रवृत्त होणारें असल्यामुळें आणि वर सांगितल्याप्रमाणें 'सर्व जस्' या स्थलीं द्वन्द्वाची प्राप्ति होत नसल्यामुळें, तें सूत्र त्या उदाहरणांत प्रवृत्त होत नाहीं. 'द्वन्द्वे कृते सति' असा पक्ष मानला व समुदायाच्या बहुत्वसंख्येची विवक्षा आहे असें मानून द्वन्द्व व नंतर एकशेष केला तर मात्र 'विभाषा जसि' हें सूत्र प्रवृत्त होण्याची व 'सर्वाः' असें पाक्षिक अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. द्वन्द्व करून एकशेष केल्यावर द्वन्द्व-समासनिमित्तक कार्यें करतां येत नाहींत व 'हलि सर्वेषाम्' या सूत्रांतील 'सर्वेषाम्' हा निर्देश त्याचें ज्ञापक आहे असें जें शंकाकाराचें म्हणणें आहे त्यावर उत्तर हें आहे कीं, 'सर्वेषाम्' या स्थलीं उद्‌भूतावयवसमूहवाचक 'सर्व' या शब्दाहून द्वन्द्व व एकशेष यांची प्राप्ति होत नसल्यामुळें ते दोन्ही न होतां, एकदम 'आम्' प्रत्यय झाला आहे असें मानल्यानें त्या निर्देशाची उपपत्ति लागत असल्यामुळें, तो निर्देश शंकाकारानें केलेल्या अपूर्व कल्पनेचें ज्ञापक आहे हें मानणें अत्यन्त क्लिष्ट व गौरवयुक्त आहे असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा

आशय आहे. या विषयासंबंधानें भैरवींत 'यच्चोक्तं सुट् चोक्तार्थ-ज्ञापक इति तदपि न, तेन निर्देशेन द्वन्द्वे प्रसक्ते सतीति व्याख्यानमेव ज्ञाप्यताम् । अपूर्वस्य ज्ञापकसिद्धस्य वचनस्य कल्पनापेक्षया ज्ञाप्यार्थस्य अस्मत्सम्मतव्याख्यानेन सिद्धौलाघवात्, उद्भूतावयवभेदसमूह-वाचक सर्वशब्दादामि सुटः प्रवृत्या तस्य निर्देशस्योपपन्नत्वाच्च' असें म्हटलें आहे.) 'नियमस्य सजातीय विषयताया औचित्याच्च' इत्यादि जें मनोरमेंत म्हटलें आहे त्या ऐवजीं 'स्वातन्त्र्येण प्रयोगार्हत्वेन साजात्ये,' म्हणजे जेथें पूर्वभाग असा आहे कीं, ज्याचा भाषेंत स्वतंत्र रीतीनें प्रयोग होऊं शकतो तशाच ठिकाणीं 'समास' ग्रहणकृतनियमान्वयें समुदायास प्रातिपदिकसंज्ञा होत नाहीं, असें जरी म्हटलें तरी कांहीं दोष येत नाहीं; कारण 'राम राम' या समुदायांतील पूर्व भाग जो 'राम' आहे त्याहून विभक्तिप्रत्यय उत्पन्न झाल्याशिवाय तो भाषेंत प्रयोगार्ह नाहीं; (कारण 'न केवला प्रकृतिः प्रयुज्यते नापि केवलः प्रत्ययः' असें भाष्यांत ठिकठिकाणीं सांगितलें आहे. म्हणून 'राम राम औ' या स्थलीं 'राम राम' या अर्थवान् समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा करतेवेळीं 'समास' ग्रहणकृतनियम आड न येण्याचें 'यत्र समुदाये पूर्वो भागः पदं तद्विषयको नियमः' असें जें मनोरमेंत कारण दिलें आहे त्या ऐवजीं शब्दरत्नांतील प्रकृत पंक्तींत 'स्वातन्त्र्येण प्रयोगार्हत्वेन साजात्ये' हें जें कारण दिलें आहे व ज्याचें वर विवरण केलें आहे तें दिलें तरी चालू शकतें असें शब्दरत्नकारांचें म्हणणें आहे.) 'तावताप्यवयवार्थानां सङ्ख्यान्वयेनानुग्रहसम्भवात्' असें मनोरमेंत म्हटलें असल्यामुळें, म्हणजे 'राम राम औ' या स्थलीं 'राम राम' या समुदायाच्या अन्तीं 'औ' हा जो संख्याबोधक विभक्तिप्रत्यय आहे तो समुदायांतील प्रत्येक अवयवाच्या अर्थाशीं अन्वित होऊं शकतो असें म्हटलें असल्यामुळें, समुदायांतील प्रत्येक अवयवाहून सुबुत्पत्ति होत नाहीं. (या विषयाचें विवरण मनोरमेंत केलेंच आहे.) 'एकाज्द्विर्वचनन्यायस्य बाधात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें बरोबर

न मानल्यास, सर्वत्र द्वन्द्वसमास न होण्याची व नलोप इत्यादि कार्ये न होण्याची आपत्ति येईल. ('चार्थे द्वन्द्वः' सू. ९०१ या द्वन्द्व-विधायक सूत्रांत 'सुबामन्त्रिते' या पूर्व सूत्रांतून 'सुप् = सुबन्तम्' या पदाची व तसेंच 'अनेकमन्यपदार्थे' या पूर्व सूत्रांतून 'अनेकम्' या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें, 'अनेकं सुबन्तं चार्थे वर्तमानं वा समस्यते' असा कौमुदींत त्या सूत्राचा अर्थ दिला आहे. या अर्थान्वयें द्वन्द्वसमास होण्यास अनेक सुबन्तांची अपेक्षा असते. द्वन्द्व-समासांतील अवयवांहून सुबुत्पत्ति होत नाहीं व समुदायाहूनच सुबुत्पत्ति होते असें मानलें तर, समुदायांतील अवयव सुबन्त ठरत नसल्यामुळें, कोठेंहि द्वन्द्वसमास होऊं शकणार नाहीं. तसेंच 'दण्डी च खड्गी च दण्डिखड्गिनौ' या स्थलीं 'दण्डिन्' व 'खड्गिन् या द्वन्द्वसमासांतील अवयवांहून सुबुत्पत्ति न करितां समुदायाहून सुबु-त्पत्ति करून 'दण्डिन् खड्गिन् औ' असें अलौकिक प्रक्रियावाक्य केल्यास, 'दण्डिन्' या प्रातिपदिकाहून सुबुत्पत्ति केली नसल्यामुळें तें पदसंज्ञक ठरणार नाहीं व त्यामुळें 'नलोपःप्रातिपदिकान्तस्य सू. २३६ या सूत्रानें होणारा नकारलोप न होण्याची आपत्ति येईल व 'दण्डिखड्गिनौ' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं. शब्दरत्नांत 'नलोपाद्यसिद्धिः' असें जें म्हटलें आहे त्यांतील 'आदि' या शब्दानें पदान्तत्वनिमित्तक कुत्वादि कार्याचें ग्रहण होतें.) 'एकविभक्तौ यानि सरूपाण्येवेति व्याख्येयम्' या मनोरमेंतील शंकाग्रन्थाच्या पंक्तींतील 'यानिसरूपाण्येव' या पदांपुढें 'तेषामेक-विभक्तौ परतः एकशेषः' हीं पदें अध्याहृत आहेत (या पंक्तींचें विवरण मनोरमेंत केलेंच आहे.) 'आवृतौ मानाभावात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, प्रकृत सूत्रांतील 'एकविभक्तौ' या पदाची द्विरावृत्ति करावी असें भाष्यांत कोठेंहि सांगितलें नाहीं. दुसरें असें कीं 'एकविभक्तौ' या पदाची द्विरावृत्ति केल्यास, प्रत्यासत्तिन्यायानें प्रकृत सूत्राचा असा अर्थ होण्याची आपत्ति येईल कीं, जो विभक्तिप्रत्यय पुढें असतां एकशेष करणें

आहे तो विभक्तिप्रत्यय लावल्यानें जीं समानरूपें होतात त्यांचा एकशेष होतो व असा प्रकृत सूत्राचा अर्थ केल्यास, दोन 'मातृ' शब्दांपुढें 'भ्याम्' इत्यादि प्रत्यय आले असतां, त्यांचीं रूपें एकसारखीं होत असल्यामुळें तसे विभक्तिप्रत्यय समुदायापुढें आल्यास एकशेष होण्याची आपत्ति येईल. 'प्रातिपदिकैकशेषे मातृमात्रोः प्रतिषेधो वक्तव्यः' या वार्तिकान्वयें 'भ्याम्' इत्यादि प्रत्यय देखील समुदायापुढें आले असतां, दोन 'मातृ' शब्दांचा एकशेष न होणें इष्ट आहे असें त्या वार्तिकाहून अनुमान निघतें. (सारांश वर जसा प्रकृत सूत्राचा अर्थ केला आहे तसा अर्थ केल्यास, वरील वार्तिकान्वयें सिद्ध न होणारीं रूपें त्या अर्थान्वयें सिद्ध होण्याची आपत्ति येईल. वरील पंक्तींत जो प्रत्यासत्ति-न्याय सांगितला आहे त्यांतील 'प्रत्यासत्ति' या शब्दाचा सान्निध्य असा अर्थ आहे. जेथें वाक्यांत एक शब्द दोनदां उच्चारला आहे तेथें प्रथम उच्चारलेल्या त्या शब्दा-चा जसा अर्थ केला जातो तोच अर्थ, दुसऱ्यानें उच्चारलेल्या त्या शद्वाचा अर्थ करतेवेळीं, उपस्थित होत असल्यामुळें, प्रथम उच्चार-लेल्या त्या शब्दाचा जसा अर्थ केला आहे तसाच दुसऱ्यानें उच्चार-लेल्या त्या शद्वाचा अर्थ करणें इष्ट ठरतें व हाच प्रत्यासत्तिन्याय होय, आणि 'सकृदुच्चरितः शद्वः सकृदेवार्थं गमयति' हें वचन देखील या न्यायाचें पोषक आहे. म्हणून 'एक विभक्तौ' हा शद्व प्रकृत सूत्रांत दोनदां उच्चारण्यास, वरील न्यायान्वयें त्या दोनदां उच्चारलेल्या शद्वाचे भिन्न भिन्न अर्थ करणें योग्य नाहीं असा शद्व-रत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. आतां प्रकृत सूत्रांतील 'एकविभक्तौ' पद दोनदां उच्चारून जे वैयाकरण 'एकविभक्तौ यानि सरूपाणि तेषामेकशेषः एकविभक्तौ परतः' असा प्रकृत सूत्राचा अर्थ करितात, ते म्हणतात कीं, तसें करण्याचें फल हें आहे कीं; 'पयः पयो जरयति' या स्थलीं दोन 'पयः' या समानरूपांचा एक-शेष होण्याची आपत्ति टळते व ती आपत्ति टळण्याचें कारण ते असें

देतात कीं;) 'पयः पय' या समुदायापुढें कोणताहि विभक्तिप्रत्यय नाहीं व त्या समुदायांतील प्रत्येक अवयापुढें' असलेल्या विभक्तिप्रत्ययाचा लुक् झाला आहे. ('पयः पयो जरयति' या स्थलीं 'पयः, पयः' या दोन भिन्न पदांपुढें अनुक्रमें असणाऱ्या 'सु' व 'अम्' या विभत्तिप्रत्ययांचा 'स्वमोर्नपुंसकात्' सू- ३१९ या सूत्रानें लुक् झाला असल्यामुळें 'ही' दोन्ही रूपें समानस्वरूप होतात व 'ही' दोन प्रातिपदिकें अशीं आहेत कीं, ज्याचीं सर्व विभक्तींत समान रुपें होतात. म्हणून 'एकविभक्तौ परतः' असें जें व्याख्यान केलें आहे तें न मानल्यास, या ठिकाणीं एकशेष होण्याची आपत्ति येते. परंतु तें व्याख्यान बरोबर मानल्यानेंच 'पयःपयः' या समुदायापुढें कोणताहि विभक्तिप्रत्यय नसल्यामुळें, ती आपत्ति टळते, आणि हेंच 'एकविभक्तौ' या पदाची द्विरावृत्ति करण्याचें फल आहे असें त्या वैयाकरणांचें म्हणणें आहे. यावर मनोरमेंत असें उत्तर दिलें आहे कीं, एकविभक्तौ' या पदाची द्विरावृत्ति न करितां जेथें सहविवक्षा आहे तेथेंच एकशेष होतो हा पक्ष मानल्यास, वरील उदाहरणांत सहविवक्षा नसल्यामुळें, एकशेष होऊंच शकत नाहीं. त्या उदाहरणांत सहविवक्षा कशी नाहीं हें मनोरमेंत पूर्वी सांगितलेंच आहे.)

शब्दरत्न – सहविवक्षायामिति । सा च समुदायस्यैकार्थनिरूपितैककारकावेश एव भवतीति भावः । गौणमुख्यकर्मणोरिति । उभयोरपि कर्मत्वेन तत्र समुदायादेकविभक्तेः कर्तुं शक्यत्वेन विभक्तिपदेन व्यावर्त्यासम्भवेन सहविक्षायामित्यावश्यकमिति भावः । नन्वत्रापि लुकि विभक्तिपरत्वाभाव इत्यरुचेराह–देवदेव इति । असहविवक्षायामप्येकशेषतत्पुरुषादिविषयेऽपि तदापत्तिरिति भावः । तत्रापि समुदायादेकविभक्तेः सत्वात् । नन्वनेकबोधकैकभिक्षाशब्दादणि भैक्षसिद्धिरस्तीत्यत आह–तथा हीत्यादि । एकशेषारम्भे एकशेषं विना तादृशस्य ज्ञानासम्भव इति भावः । विभिक्तपरत्वाभावादिति । परत्वान्नित्यत्वाच्चादिवृद्धौ सारूप्याभावाच्चेत्यपि बोध्यम् । अविरवि

कन्यायेन समाधानं तु लक्षणैकचक्षुष्कैर्दुर्ज्ञेयम् । न च समर्थग्रहणेन परिनिष्ठितप्रातिपदिकात्तद्धितोत्पत्तेः पूर्वमेकशेषे पश्चात्तद्धित इति वाच्यम् । प्रातिपदिकाधिकारात्किंतत्समर्थं कृतवर्णानुपूर्वीकमिति भाष्यात्प्रातिपदिकसम्बन्धिवर्णमात्राश्रयतत्सम्बन्धिवर्णनिमित्तकार्येण परिनिष्ठितत्वस्यैवाश्रयणात् । अतएव "अश्विामानण् इति सङ्गच्छते । अन्यथा प्रकृत्यंशे दीर्घश्रवणं स्यात् ।

(आतां सहविवक्षा आहे हें केव्हां मानतां येतें हें शब्दरत्नकार पुढील पंक्तींत सांगतात.) जेथें समुदायाचा—समुदायांतील सर्व व्यक्तींचा वाक्यांतील क्रियेशीं एकाच कारकरूपानें अन्वय असतो तेथें सहविवक्षा आहे असें मानतां येतें. (उदाहरणार्थ 'धवखदिरौ छिन्धि' यांतील 'धवखदिर' या समुदायाचा छेदनक्रियेशीं एकाच कारकरूपानें, म्हणजे कर्मत्वरूपानें, अन्वय असल्यामुळें येथें सहविवक्षा आहे हें सिद्ध होतें. पण 'पयःपयो जरयति' या स्थलीं 'पयःपयः' हा समुदाय 'जरयति' या क्रियेशीं एकाच कारकरूपानें अन्वित नसून प्रथम 'पयः' हें प्रथमान्त पद कर्तृरूपानें व द्वितीय द्वितियान्त 'पयः' हें पद कर्मरूपानें अन्वित असल्यामुळें, येथें सहविवक्षा नाहीं हें स्पष्ट होतें. व त्यामुळें एकशेष होऊं शकत नाही.') 'गौणमुख्यकर्मणोःएकशेषापत्तेः' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे की, 'पयःपयो नयति' या उदाहरणांत 'पयः' पयः' हीं दोन्ही (द्वितीयान्त) पदें कर्म असल्यामुळें 'पयःपयः' यासमुदायापुढें एकाच विभक्तीचा, म्हणजे द्वितीया विभक्तीचा प्रत्यय लावणें शक्य आहे व त्यामुळें 'एकविभक्तौ परतः' हा पक्ष मानला तरी देखील या स्थलीं एकशेषाची व्यावृत्ति होऊं शकत नाहीं. (व एकशेष होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्यासाठीं) एकशेष होण्याकरितां सहविवक्षा असावी लागते हें मानणें आवश्यक आहे. ('पयः पयो नयति' या उदाहरणांत दोन्ही 'पयः' हीं पदें द्वितीयान्त असल्यामुळें 'पयस् पयस् शी' असा द्विवचनप्रत्ययपरक

समुदाय मानल्यास येथें एकशेष होण्याची आपत्ति येते. परंतु येथें सहविवक्षा नसल्यामुळें ती आपत्ति टळते. येथें सहविवक्षा कशी नाहीं हें पूर्वीं मनोरमेंत सांगितलेंच आहे.) वरील उदाहरणांत देखील विभक्तिप्रत्ययाचा लुक् झाला असतां, समुदायापुढें विभक्ति-प्रत्यय राहत नसल्यामुळें, म्हणजे 'पयस् अम् पयस् अम्' या स्थलीं 'अम्' या दोन्ही विभक्तीप्रत्ययांचा 'स्वमोर्नपुंसकात्' सू. ३१९ या सूत्रानें लुक् होऊन कोणताहि विभक्तिप्रत्यय समुदायापुढें राहत नसल्यामुळें, या स्थलीं एकशेषाची प्राप्तीच होत नाहीं आणि ही अरुचि मनांत धरूनच दीक्षितांनीं मनोरमेंत 'देवदेवः' हें दुसरें उदाहरण दिलें आहे. सहविवक्षा नसतां देखील एकशेष होतो असें मानलें तर, तत्पुरुष इत्यादि समासांच्या विषयांत देखील एकशेष होण्याची आपत्ति येईल असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे; कारण 'देवदेवः' या उदाहरणांत देखील 'देवदेव' या समुदायापुढें 'सु' हा विभक्तिप्रत्यय आहे. ('देवानां देवः देवदेवः=देव आम् देव सु सु' या स्थलीं 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'आम्' व 'सु' या दोन अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययांचा लुक् होऊन 'देव देव सु' अशी स्थिति झाली असतां, 'एकविभक्तौ परतः' हा पक्ष मानला असतां, येथें 'देव देव' या समुदायापुढें 'सु' हा एकच विभक्तिप्रत्यय असल्यामुळें, हें उदाहरण षष्ठीतत्पुरुषाचा विषय असून देखील, या स्थलीं एकशेष होण्याची आपत्ति येते. परंतु 'एकविभक्तौ परतः' हा पक्ष न मानतां 'सहविवक्षायामेकशेषः' हा पक्ष मानल्यास, पूर्वीं मनोरमेंत सांगितल्याप्रमाणें प्रकृत उदाहरणांत सहविवक्षा नसल्यामुळें, ती आपत्ति टळते.) अनेकभिक्षाव्यक्तिबोधक 'भिक्षा' या एकाच शब्दाहून 'अण्' प्रत्यय केला असतां 'भैक्ष' हें रूप सिद्ध होऊं शकतें असें कोणी म्हटल्यास, त्याचें उत्तर 'तथा हि-भिक्षा इ अ इति स्थिते...' या मनोरमेंतील पंक्तींत दिलें आहे. प्रकृत सूत्रानें एकशेषाचा आरंभ केला असल्यामुळें, एकशेष केल्याशिवाय 'भिक्षा'

हा शब्द अनेक भिक्षारूप व्यक्तींचा वाचक आहे असें ज्ञान होऊं शकत नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. (शब्द हा जातीचा वाचक नसून व्यक्तीचा वाचक आहे असें मानूनच पाणिनीनें एकशेषाचें प्रकृत सूत्र केलें आहे. त्यामुळें 'भिक्षा' या शब्दानें एकाच भिक्षाव्यक्तीचा बोध होऊं शकतो, अनेक भिक्षाव्यक्तींचा बोध होऊं शकत नाहीं. अनेक भिक्षाव्यक्तींचा बोध करणें असल्यास, जितक्या भिक्षाव्यक्तींचा बोध करणें आहे तितके भिक्षाशब्द, 'यावतामभिधानं तावतां प्रयोगो न्याय्य:' या वचनान्वयें, उच्चारणें आवश्यक आहे व तितके भिक्षाशब्द उच्चारल्यानंतर एकशेष केला असतां जो एक भिक्षाशब्द अवशिष्ट राहतो तो तेवढ्या सर्व भिक्षाव्यक्तींचा 'य: शिष्यते स लुप्यमानार्थाभिधायी' या न्यायान्वयें, वाचक होत असल्यामुळें, त्याहून बहुवचनाचा प्रत्यय होऊं शकतो. एक भिक्षाव्यक्तिवाचक एकाच 'भिक्षा' शब्दाहून एकवचनाचाच प्रत्यय होऊं शकतो. अशी स्थिति असल्यामुळें, एकशेष केल्याशिवाय एक भिक्षा शब्द अनेक भिक्षा व्यक्तींचा वाचक होऊं शकत नाहीं. जातिपक्ष मानला तर एक भिक्षाशब्दानें अनेक भिक्षाव्यक्तींचा बोध होऊं शकतो. पण तो पक्ष मानल्यास, प्रकृत सूत्र व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. म्हणून पाणिनीनें प्रकृत सूत्र आरंभिलें असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, व्यक्तिपक्षाला धरूनच पाणिनीनें प्रकृत सूत्र केलें आहे, व त्या पक्षामध्यें 'भिक्षाणां समूहो भैक्षम्' हें रूप, 'भिक्षा' हा शब्द अलौकिक प्रक्रियावाक्यांत तीनदां उच्चारल्याशिवाय, सिद्ध होऊं शकत नाहीं. आतां 'भिक्षा इ अण्' हा जो तद्धितान्त समुदाय 'कृत्तद्धितसमासाश्च' या सूत्रानें प्रातिपदिकसंज्ञक होतो त्यापुढें विभक्तिप्रत्यय राहत नसल्यामुळें एकशेष न होण्याची आपत्ति येते याचें 'विभक्तिपरत्वाभावादेकशेषो न स्यात्' हें जें मनोरमेंत कारण दिलें आहे त्या खेरीज हें देखील कारण देतां येतें कीं, 'तद्धितेष्वचामादे:' सू. १०७५ हें आदिवृद्धीचें सूत्र प्रकृत सूत्राच्या मानानें

परसूत्र असल्यामुळें व तसेंच त्या सूत्रानें होणारें वृद्धिकार्य नित्य असल्यामुळें, म्हणजे एकशेष प्रथम केला किंवा मागून केला तरी तें वृद्धिकार्य अवश्य होणारें असल्यामुळें,) परत्वामुळें व नित्यत्वामुळें आदिवृद्धिकार्य प्रथम केल्यावर ('भिक्षा भिक्षा भिक्षा' हा समुदाय 'भैक्षा भिक्षा भिक्षा' असा झाल्यानें या समुदायांतील 'भिक्षा' या तीन अवयवांचें) सारूप्य–समान रूप–नाहीसें होत असल्यामुळें एकशेष न होण्याची आपत्ति येते. (परंतु 'एकविभक्तौ परतः' हा पक्ष न मानतां तीन 'भिक्षा' या प्रातिपदिकांचा सुबुत्पत्ति करण्या-पूर्वीं प्रातिपदिकावस्थेंतच एकशेष होऊन जो एक 'भिक्षा' शब्द अवशिष्ट राहतो त्याहून 'आम्' प्रत्यय करून नंतर समूहार्थक 'अण्' प्रत्यय केला जातो असें मानल्यास, त्या तद्धितान्त समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा होऊन 'आम्' या अन्तर्वर्ति विभक्तिप्रत्ययाचा 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें लुक् होऊन व 'तद्धितेष्वचामादेः' सू. १०७५ या सूत्रानें, णित्प्रत्यय पुढें असल्या-मुळे, 'भिक्षा' यांतील आद्य अचाची वृद्धि होऊन आणि 'यस्येति च' सू. ३११ या सूत्रानें 'भिक्षा' यांतील अन्त्य आकाराचा लोप होऊन 'भैक्ष' हें इष्ट रूप सिद्ध होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. आतां कित्येक वैयाकरण असें म्हणतात कीं, अनेकार्थवाचक म्हणजे अर्थतन्त्रान्वयें अनेकभिक्षाव्यक्तिप्रतिपादक, 'भिक्षा' या शब्दाच्या षष्ठीच्या बहुवचनाहूनच 'भिक्षाणां समूहः' या अर्थामध्यें 'अण्' प्रत्यय होत असतो व एकशेषनिष्पन्न 'भिक्षा' शब्दाहून 'अण्' प्रत्यय होत नाहीं आणि त्याचें ते वैयाकरण 'अनभिधानात्' असें कारण देतात व म्हणतात कीं, असें समाधान मानलें असतां, एकशेषाची प्राप्तीच होत नसल्यामुळें 'भैक्षम्' हें रूप सिद्ध होऊं शकत नाहीं अशी जी आपत्ति मनोरमेंत दिली आहे ती मुळींच उद्भवत नाहीं आणि 'भिक्षा आम् अण्' अशी स्थिति झाली असतां, या तद्धितान्ताला पूर्वीं सांगितल्याप्रमाणें प्रातिपदिकसंज्ञा होऊन व 'आम्' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा लुक् होऊन आणि

आद्यचाची वृद्धि व अन्त्य आकाराचा लोप होऊन 'भैक्षम्' हें रूप सिद्ध होण्यांत कोणतीहि अडचण येत नाहीं. यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, त्या वैयाकरणांनीं सांगितलेलें) वरील समाधान लक्षणैकचक्षुष्क पुरुषांच्या ध्यानात येणें, अविरविकन्यायाप्रमाणें अशक्य आहे. ('द्विगोर्लुगनपत्ये' ४–१–८८ या सूत्रावरील भाष्यांत अविरविकन्यायाचा उल्लेख केला आहे. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात 'इहाऽस्माभिस्त्रैशब्द्यं साध्यं–पञ्चसु कपालेषु संस्कृतः । पञ्चकपाल्यां संस्कृत पञ्चकपालः इति । तत्र द्वयोःशब्दयोः समानार्थयोरेकेन विग्रहोऽपरस्मादुत्पत्तिर्भविष्यत्यव्यविकन्यायेन । तद्यथा, अवेर्मांसमिति विगृह्य अविकशब्दादुत्पत्तिर्भवति-आविकमिति । एवं-पञ्चसु कपालेषु संस्कृतः इति विगृह्य पञ्चकपाल इति भविष्यति । पञ्चकपाल्यां संस्कृत इति विगृह्य वाक्यमेव । त्रैशब्द्यं चेह साध्यं, तच्चैवं सति सिद्धं भवति ।' या भाष्यांत भाष्यकार असें म्हणतात कीं, 'संस्कृतं भक्षाः' सू. १२१७ या सूत्रानें 'संस्कृत' या अर्थामध्यें सप्तम्यन्ताहून होणारा 'अण्' प्रत्यय 'पञ्चकपाल्याम्' या सप्तम्यन्ताहून नसून होत 'पञ्चसु कपालेषु' या सप्तम्यन्ताहून होतो. त्यांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, असेंच अभिधान आहे, म्हणजे भाषेंत वर सांगितल्याप्रमाणेंच होत असतें, आणि याच्या समर्थनार्थ ते दृष्टान्तरूपानें अव्यविकन्यायाचें उदाहरण देतात. 'अवि' शब्दाहून 'अवेः कः' सू. २०९६ या सूत्रानें स्वार्थे 'क' प्रत्यय होऊन 'अविक' असा जो शब्द सिद्ध होतो त्याहून 'तस्येदम्' किंवा 'तस्य विकारः' या अर्थामध्यें 'अण्' प्रत्यय होऊन व 'तद्धितेष्वचामादेः' या सूत्रानें आद्यचाची वृद्धि होऊन 'आविक' असें रूप होतें. जरी 'अवेर्मांसम्' असें विग्रहवाक्य होतें तरी, 'अवि' शब्दाहून 'अण्' प्रत्यय होत नाहीं व 'आवम्' असें रूप होत नाहीं. याचें कारण 'अनभिधान' हें होय, म्हणजे भाषेंत 'अवि' या शब्दाहून 'अण्' प्रत्यय होत नसून 'अविक' या शब्दाहूनच तो प्रत्यय होत असतो. त्याचप्रमाणें जरी 'पञ्चकपाल्यां

संस्कृतः ' असें विग्रहवाक्य होतें तरी तें वाक्यरूपानेंच कायम राहतें व अनभिधानामुळें 'पञ्चकपाल्याम्' याहून वर सांगितल्याप्रमाणें 'अण्' प्रत्यय न होतां 'पञ्चसु कपालेषु' याहूनच तो प्रत्यय होतो. भाष्यकारांनीं 'अव्यविकन्याय' या शब्दानें वरील भाष्यांत त्या न्यायाचा निर्देश केला आहे. पण कैयटाच्या 'टीकेवरून असें दिसून येतें कीं, भाष्याच्या कांहीं प्रतींत 'अविरविकन्याय' असा निर्देश आढळतो व शब्दरत्नकारांनीं त्या न्यायाचा निर्देश करतेवेळीं 'अविरविकन्याय' हाच शब्द वापरला आहे. कैयटानें प्रदीपांत 'अव्यविकन्यायेनेति' हें प्रतीक घेऊन 'अव्यविकशब्दयोर्यो न्यायस्ते-नेत्यर्थः। क्वचिदविरविकन्यायेनेति पाठस्तत्र च दृष्टान्तत्वेनोपन्यासः। अविः अविकन्यायेन, तद्द्वारेण, यथा प्रत्ययमुत्पादयति न तु स्वयं तथाऽयमपीत्यर्थः। अथवाऽविरित्यस्य विभक्त्यन्तस्यानुकरणमविरिति। ततोऽनुकार्येणार्थेनार्थवत्त्वाद्या विभक्तिरुत्पद्यते तस्या द्वन्द्वान्तर्भावा-ल्लोपः, न तु पूर्वस्याः, अनुकरणत्वात्सुप्त्वाभावात्। यथाऽ-स्यवामीयमिति षष्ठ्या लुगभावः। अथवा भाष्यकारवचन प्रामाण्यादस्य साधुत्वम्। एवमिति। पञ्चकपालीशब्दात्त्वनभिधानात्त-द्धितानुत्पत्तिरिति भावः।' असें म्हटलें आहे. सारांश जेथें दोन समानार्थक शब्दांपैकीं एकानें विग्रह केला जातो व दुसऱ्याहून तद्धि-तप्रत्ययोत्पत्ति होते त्यालाच अव्यविकन्याय म्हणतात. या अविरविक-न्यायाचा आश्रय घेऊन कित्येक वैयाकरण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें असें म्हणतात कीं, अनेकार्थप्रतिपादक 'भिक्षा' या शब्दाहून 'अण्' प्रत्यय होत असून एकशेषनिष्पन्न 'भिक्षा' या शब्दाहून तो प्रत्यय अनभिधानामुळें होत नाहीं. यावर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, या लक्षणैकचक्षुष्क वैयाकरणांना 'अनभिधानात्' हें कारण देऊन अशा तऱ्हेनें प्रतिपादन करण्याचा अधिकार मुळींच नाहीं. तसा अधिकार सर्वज्ञ भाष्यकारादि लक्ष्यैकचक्षुष्क आचार्यांनाच आहे. त्यांचें भाषेवर विलक्षण प्रभुत्व असून सर्व प्रचलित रूपें त्यांच्या डोळ्यासमोर सदैव खेळत असल्यामुळें व भाषेंत प्रचलित

असलेलीं रूपें कोणत्या शद्बाहून कोणता प्रत्यय लावल्यानें सिद्ध होतात याचें त्यांना पूर्ण ज्ञान असल्यामुळें, अमुक रूपाचें अभिधान आहे व अमुकाचें नाहीं असें म्हणण्याचा अधिकार त्यांनाच पोहोंचतो. केवळ पाणिनीय सूत्रें जाणणाऱ्या व त्या सूत्रान्वयें इष्ट रूपांची सिद्धि करणाऱ्या लक्षणैकचक्षुष्क वैयाकरणांना तो अधिकार पोहोंचत नाहीं. म्हणून त्या वैयाकरणांनीं जें वर निराधार समाधान सांगितलें आहे तशा तऱ्हेचें समाधान सांगण्याचा त्यांना मुळींच अधिकार नसल्यामुळें, त्यांचें म्हणणें स्वीकारतां येत नाहीं; कारण भाष्य-कारांनीं असें कोठेंहि म्हटलें नाहीं कीं, एकशेषानें सिद्ध होणाऱ्या भिक्षा' शब्दाहून समूहार्थक 'अण्' प्रत्यय होत नसून अनेक-भिक्षार्थप्रतिपादक 'भिक्षा' शब्दाहूनच तसा प्रत्यय होतो; आणि म्हणून प्रकृत सूत्रान्वयें 'भिक्षाणाम्' हा शब्द एकशेष करूनच सिद्ध होत असल्यामुळें, तशा एकशेषानें सिद्ध झालेल्या षष्ठीबहुवचनान्त 'भिक्षा' शब्दाहूनच समूहार्थक 'अण्' प्रत्यय होतो असें आपणां-सारख्या लक्षणैकचक्षुष्कांना मानणें भाग आहे व तसें मानलें असतां, दीक्षितांनीं मनोरमेंत जी आपत्ति दिली आहे ती योग्य ठरते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'समर्थानां प्रथमाद्वा' सू. १०७२ या सूत्रातील 'समर्थ' या पदानें परिनिष्ठित प्रातिपदिकाचें ग्रहण होत असल्यामुळें, तद्धितप्रत्ययोत्पत्ति होण्यापूर्वी एकशेष होऊन नंतर तद्धितप्रत्यय होतो असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण तें सूत्र प्रातिपदिकाधिकारांत पठित असल्यामुळें कोणतें प्रातिपदिक समर्थ ठरतें असा प्रश्न करून त्या प्रश्नाचें भाष्यकारानीं 'कृतवर्णानुपूर्वीकम्' असें उत्तर दिलें असल्यामुळें त्यावरून हें स्पष्ट होतें कीं, प्रातिपदिकान्तर्गत वर्णामध्यें त्या प्रातिपदिकांतील वर्णांच्याच निमित्तामुळें जीं सन्धिकार्यें प्राप्त होतात तीं सर्व कार्यें केल्यावर त्या प्रातिपदिकाची जी वर्णानुपूर्वी निश्चित होते ती वर्णानुपूर्वी त्या प्रातिपदिकाचें परिनिष्ठित रूप होय. (शंकाकाराचें असें म्हणणें आहे कीं, 'भिक्षा भिक्षा भिक्षा आम्'

या स्थलीं प्रथम एकशेष होऊन 'भिक्षा आम्' असें परिनिष्ठित रूप झाल्यावरच त्याहून समूहार्थक तद्धित 'अण्' प्रत्यय होतो व तसें मानलें असतां, सारूप्य नष्ट झाल्यानें एकशेष होऊं शकत नाहीं अशी जी वर आपत्ति दिली आहे ती मुळींच येत नाहीं. त्याच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे कीं, 'समर्थानां प्रथमाद्वा' या सूत्रांत 'समर्थ' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें व तें सूत्र 'ङ्याप्-प्रातिपदिकात्' या अधिकारांत पठित असल्यामुळें त्या सूत्रांतील 'समर्थ' हें पद त्या सूत्रांत अनुवृत्त होणाऱ्या 'प्रातिपदिक' या शब्दाचें विशेषण होते आणि 'समर्थ' या पदाचा 'परिनिष्ठित प्रयोगार्ह—रूप' असा अर्थ मानला असल्यामुळें आणि जोपर्यंत एकशेष होत नाहीं तोपर्यंत प्रातिपदिकाचे ठिकाणीं परिनिष्ठितत्व येत नसल्यामुळें, 'भिक्षा भिक्षा भिक्षा आम्' या स्थलीं तीन 'भिक्षा' या प्रातिपदिकांचा एकशेष करून जेव्हां 'भिक्षा आम्' अशी स्थिति होते तेव्हां त्याहूनच 'अण्' प्रत्यय करतां येतो व त्यामुळें वर दिलेली आपत्ति येत नाहीं व पूर्वीं सांगितल्याप्रमाणें 'भैक्षम्' हें रूप सिद्ध होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, 'समर्थानां प्रथमाद्वा' ४. १. ८२ या सूत्रांतील 'समर्थानाम्' या पदाचा 'कृतसन्धिकार्याणाम्' असा अर्थ आहे. त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात 'अथैतत्समर्थ-ग्रहणं नैव कर्तव्यम्? । कर्तव्यं च । किं प्रयोजनम्? । समर्थादुत्पत्तिर्यथा स्यादसमर्थान्मा भूदिति । किं पुनः समर्थम्? । अर्थाऽभिधाने यत्समर्थम् । किं पुनस्तत्? । कृतवर्णानुपूर्वीकं पदं,—सौत्थितिः, वैक्षमाणिरिति ।' या भाष्यांतील 'कृतवर्णानुपूर्वीकम्' या पदाचा एवढाच अर्थ आहे कीं, प्रातिपदिकावयवभूत वर्णांमध्यें जें सन्धिकार्य त्या प्रातिपदिकान्तार्गत वर्णांच्या निमित्तामुळें प्राप्त होतें तें सन्धिकार्य केल्यानंतर प्रातिपदिकाचें स्वरूप होतें त्याला परिनिष्ठित स्वरूप म्हणतात व तशा परिनिष्ठित शब्दाहूनच तद्धितप्रत्ययोत्पत्ति होते. उदाहरणार्थ 'सु+उत्थित'

किंवा 'वि+ईक्षमाण' यांहून 'अत इञ्' सू. १०९५ या सूत्रानें अपत्यार्थक तद्धित 'इञ्' प्रत्यय करणें झाल्यास, या वरील दोन प्रातिपदिकांतील वर्णांमध्यें 'अकः सवर्णे दीर्घः' सू. ८५ या सूत्रानें जें सवर्णदीर्घरूप सन्धिकार्य प्राप्त आहे तें करून 'सूत्थित' व 'वीक्षमाण' अशीं परिनिष्ठित – कृतसन्धिकार्य – रूपें झाल्यावरच त्यांहून 'इञ्' प्रत्यय करतां येतो व तो केला असतां, 'तद्धितेष्वचामादेः' सू. १०७५ या सूत्रानें आद्यचाची वृद्धि होऊन 'सौत्थितिः' व 'वैक्षमाणिः' हीं इष्ट रूपें सिद्ध होतात. सन्धिकार्य करण्यापूर्वी 'इञ्' प्रत्यय केल्यास 'सौ + उत्थितिः = सावुत्थितिः' व 'वै + ईक्षमाणिः = वायीक्षमाणिः' अशी अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येईल. परंतु एकशेष करणें हें सन्धिकार्य नव्हे. त्यामुळें 'भिक्षा भिक्षा भिक्षा आम्' याहूनच तद्धितोत्पत्ति होते. सारांश एकशेष करण्यापूर्वी तद्धितोत्पत्ति होत असल्यामुळें, वर 'सारूप्याभावात्' ही जी आपत्ति दिली आहे ती योग्य ठरते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) म्हणूनच, म्हणजे प्रातिपदिकान्तर्गत वर्णांना प्रातिपदिकांत असणाऱ्या वर्णांच्याच निमित्तामुळें जें सन्धिकार्य पावलें आहे तें केल्यावर जें रूप सिद्ध होते तें परिनिष्ठित रूप होय व तशा परिनिष्ठित रूपाहून तद्धितोत्पत्ति होते असा 'समर्थानां प्रथमाद्वा' या सूत्राचा अर्थ असल्यामुळेंच, 'अश्विमानण्' सू. ३४७२ या सूत्रांतील 'अश्विमान्' हा निर्देश योग्य ठरतो. 'परिनिष्ठित' या शब्दाचा वर जसा अर्थ केला आहे तो बरोबर न मानल्यास 'अश्विमान्' यांत 'अश्विन्' ही जी मतुप्प्रत्ययाची प्रकृति आहे त्या प्रकृतींत दीर्घ ईकाराचें श्रवण होण्याची आपत्ति येते. ('अश्विशब्दः विद्यते यस्मिन् मन्त्रे स अश्विमान् = अश्विन् + सु + मतुप्' या स्थलीं 'सु' हा प्रत्यय असून 'अश्विन्' या प्रातिपदिकाचा अवयव नसल्यामुळें, 'सु' या प्रत्ययाच्या निमित्तामुळें 'सौ च' सू. ३५७ या सूत्रानें 'अश्विन्' या नकारान्त प्रकृतीला जें उपधादीर्घकार्य पावलें आहे तें न होतां 'मतुप्' हा तद्धित प्रत्यय होतो.

द्यूत खेळण्याचे फांसे, आस्कूड, बिब्बा इत्यादि अर्थांचा बोध होतो तसा 'अक्ष' या शब्दाचा) पर्यायवाचक शब्द उच्चारल्यानें बोध होत नसल्यामुळें, तें शब्दतन्त्राचें उदाहरण ठरतें. (सारांश जेथें पर्यायवाचक शब्दाचा उपयोग केल्यानें देखील सारखाच अनेकार्थबोध होतो त्याला अर्थतन्त्र म्हणतात. पण जेथें मूळ शब्दाऐवजीं पर्यायवाचक शब्द उच्चारला असतां तसा अनेकार्थबोध होत नाहीं त्याला शब्दतन्त्र म्हणतात.) मनोरमेंतील 'अन्यथा जातिपक्षेऽपि' या पंक्तींतील 'अन्यथा' या पदाचा 'तन्त्रानङ्गीकारे', म्हणजे तन्त्र न मानल्यास, असा अर्थ आहे. 'क्षमा' हा शब्द क्षान्ति व भूमि या दोन्ही अर्थांचा वाचक आहे. ('क्षमा' या शब्दाचे वर जे दोन अर्थ सांगितले आहेत त्यांची जाति भिन्न असल्यामुळें या स्थलीं जातिपक्ष मानल्यानें काम भागत नसून शब्दतन्त्र मानल्यानेंच निर्वाह लागूं शकतो.) मनोरमेंतील 'नानार्थानुरोधेन' या पदापुढें 'सूत्रमावश्यकं तत्र' हीं पदें अध्याहृत आहेत. ('क्षमयोः' या रूपाची सिद्धि होण्याकरितां प्रकृत सूत्र आवश्यक आहे असें जें या पंक्तींत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'क्षमा' शब्दाचे क्षांति व भूमि हे जे दोन अर्थ होतात त्यांच्या जाति भिन्न असल्यामुळें, येथें शब्दतन्त्र मानल्याशिवाय गत्यन्तर नाहीं व 'क्षमा' हा शब्द दोनदां उच्चारून प्रकृत सूत्रानें एकशेष करणें आवश्यक आहे. तसें केल्याशिवाय द्विवचनाचा प्रत्यय करतां येत नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.) 'द्वन्द्वस्य न्यायप्राप्तत्वात्' असें जरी (एकशेषशास्त्र आवश्यक आहे असें गृहीत धरून) मनोरमेंत म्हटलें आहे तरी, अनभिधानाचा आश्रय करून, म्हणजे भाषेंत अनेक व्यक्तींचा बोध करण्याकरितां तोच शब्द अनेकदां उच्चारला जात नसून एकदांच उच्चारल्यानें अनेक व्यक्तींचा बोध होऊं शकत असल्यामुळें, भाष्यकारांनीं जातिपक्ष व व्यक्तिपक्ष या दोन्ही पक्षांत देखील प्रकृत सूत्राचें प्रत्याख्यान केलें आहे ही गोष्ट वेगळी. (हें भाष्य नुकतेंच वर दिलें आहे. त्या भाष्यानें भाष्यकार असें सूचवितात

कीं, व्यक्तिपक्षांत देखील एका शब्दाचे ठिकाणीं व्यर्थता व बव्हर्थ-प्रतिपादकता असल्यामुळें, एकशेषाचें प्रकृत सूत्र असण्याची कांहीं गरज नाहीं. 'चार्थे द्वन्द्वः' सू. ९०१ या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या) 'च' या पदाचा जो (इतरेतरयोगरूप व समाहाररूप) अर्थ आहे तो अर्थ, 'घट' हा शब्द अनेकदां उच्चारला तरी त्या अनेकदां उच्चारलेल्या 'घट' शब्दानें, बोधित होत नसल्यामुळें, तशा स्थलीं, म्हणजे 'घट घट घट' अशा स्थलीं-अनभिधानामुळें, म्हणजे भाषेंत तसा शब्दप्रयोग होत नसल्यामुळें, द्वन्द्वसमासाची प्राप्तीच होत नाहीं (व त्यामुळें द्वन्द्वाचें निवारण होण्याकरितां प्रकृत एकशेषशास्त्र आरंभिण्याची कांहींच गरज नव्हती) असा भाष्यकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. (इतरेतर-योगद्वन्द्वसमासाच्या विषयांतच एकशेषाची प्राप्ति होते असें दीक्षितांचें म्हणणें आहे. पण वर सांगितल्याप्रमाणें इतरेतरयोगरूप अर्थबोधित करण्याकरितां जर 'घट' हा शब्द अनेकदां उच्चारलाच जात नाहीं व अशा रीतीनें द्वन्द्वाची प्राप्तीच होत नाहीं तर द्वन्द्वनिवार-णार्थ एकशेषशास्त्र आरंभिण्याची गरज काय असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'पक्षद्वयेऽपि सूत्रमावश्यकम्' या मनो-रमेच्या पंक्तींतील 'आवश्यकम्' या पदापुढें 'अनभिधानाज्ञाने,' म्हणजे अनेक घटव्यक्तींचा बोध करण्याकरितां भाषेंत 'घट' हा शब्द अनेकदां उच्चारला जात नसून एकदांच उच्चारला जातो या ज्ञानाच्या अभावीं, हें पद अध्याहृत आहे. ('घट' शब्द एकदां उच्चारला तरी त्यापासून अनेक घटांचा बोध होत असल्यामुळें, 'घट' हा शब्द अनेकदां उच्चारून द्विवचनबहुवचनांची उपपत्ति लावण्याकरितां एकशेष करण्याची कांहीं गरज नाहीं. प्रकृत सूत्रांवरील भाष्यांत पठित केलेल्या 'अभिधानं पुनः स्वाभाविकम्' या वचनान्वयें एक शब्द सजातीय अनेक व्यक्तींचा स्वभावतःच व्यक्तिपक्षांत देखील बोधक होत असल्यामुळें, सजातीय अनेक व्यक्तींचा बोध करण्याकरितां

तो शब्द अनेकदां उच्चारण्याची कांहींच गरज राहत नाहीं व त्यामुळें एकशेषाची वास्तविक प्राप्तीच होत नाहीं. परंतु प्रकृत सूत्रावरील भाष्यांत प्रकृत सूत्राचें भाष्यकारांनीं स्पष्टपणें प्रत्याख्यान केलेलें आढळत नसल्यामुळें व प्रत्याख्यानसमर्थनार्थ ज्या भाष्याचा वर दाखला दिला आहे तें एकदेशि भाष्य आहे असें कित्येक वैयाकरणांचें मत असल्यामुळें आणि पाणिनीय सूत्रांचे यावच्छक्ति समर्थन करणें हें वृत्तिकाराचें कर्तव्य असल्यामुळें, त्या कर्तव्याला अनुसरून दीक्षितांनीं प्रकृत सूत्राची आवश्यकता दाखविण्याकरितां अनेक कारणें दिलीं आहेत व हें त्यांचें करणें अगदीं योग्य ठरतें.)

शब्दरत्न--नानेनैकशेषो विधीयते इति। "किं तु न्यायसिद्ध एवानूद्यते" इति एतच्छेषस्तद्ग्रन्थे। प्रयुक्तानामिति। अयं भावः--वृध्द्यादिप्रवृत्तावेकशेषशास्त्राप्रवृत्त्या नित्यविद्ध्युद्देश्यतावच्छेदकानाक्रान्तत्वेन तदेव परिनिष्ठितं स्यात्तच्च न लोके प्रयुज्यते प्रयुक्तानां चेदमन्वाख्यानमिति न तत्प्रक्रियावाक्ये वृध्द्यादिप्राप्तिरिति। सन्दर्भविरुद्धमिति। एकस्यैव प्रयोगो यथा स्यादिति, सूत्रमिति, समुदायादेकविभक्ताविति पक्षः प्रत्याख्यात इति च सन्दर्भ इत्यर्थः। न्यायविरोधमाह--प्रयुक्तानेवेति। न च यद्यादृशशास्त्रीयकार्यप्रवृत्त्या परिनिष्ठितं सल्लोके प्रयोगार्हं कल्पिते तदीयालौकिके तच्छास्त्रप्रवृत्तावपि अत्र वृध्द्यादिप्रवृत्तिर्नोचिता वैषम्यादिति वाच्यम् कृतद्वन्द्वानामेकशेष इति पक्षे नावौ अनड्वाहावित्यादौ परत्वादिना आवादौ कृते एकशेषानापत्तेरिति दूषणदानपरभाष्यवार्तिकासङ्गत्यापत्तेरित्यलम्।

'नानेनैकशेषो विधीयते' असें जें प्रकाशकारांनीं म्हटलें आहे त्या पुढें 'किन्तु न्यायसिद्ध एवानूद्यते' अशी पंक्ति आहे. (प्रकाशग्रन्थ येथें उपलब्ध नाहीं. परंतु भैरवीवरून व तसेंच भावप्रकाशावरून असें दिसून येतें कीं, 'नानेनैकशेषो विधीयते' या प्रकाशग्रन्थांतील पंक्तीपुढें वास्तविक 'किं तु वृत्तिविषये एकस्याप्यने-

कार्थाभिधानशक्तिरस्तीति ज्ञाप्यते' ही पंक्ति आहे व शब्दरत्नांतील पंक्ति त्या वरील पंक्तीचा भिन्न शब्दांत अनुवाद करणारी आहे. प्रकाशकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे की, जर एका शब्दानें एकाच अर्थाचा--व्यक्तीचा--बोध होऊं शकतो असें मानलें तर एकशेष करून जो एक शब्द अवशिष्ट राहतो त्याहून अनेक व्यक्तींचा बोध कसा होऊं शकणार? जर एक शब्द स्वभावत:च अनेक व्यक्तींचा बोध करूं शकतो तर प्रकृत एकशेषाचें सूत्र अनावश्यक ठरतें, आणि हा आशय मनांत धरूनच त्यांनी 'नानेनैकशेषो विधीयते' इत्यादि पंक्ति प्रकृत सूत्रावरील आपल्या टीकेंत लिहिली आहे.) 'प्रयुक्तानामेवान्वाख्यानात्' इत्यादि जें प्रकाशकारांनीं आपल्या ग्रन्थांत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('राम राम औ' या अलौकिक प्रक्रियावाक्यांतच) वृद्धिरूप एकादेश इत्यादि कार्यें केली तर ('रामरामौ' अशी स्थिति होईल व या समुदायांतील 'राम' व 'रामौ' हे अवयव विरूप झाल्याकारणानें) एकशेषाचें प्रकृत सूत्र प्रवृत्त होणार नाहीं (व एकशेष न होण्याची आपत्ति येईल. म्हणून अलौकिक प्रक्रियावाक्यांत वृद्धिरूप एकादेश इत्यादि कार्यें करणें योग्य नाहीं; कारण तसें केल्यास) कोणतेंहि नित्य कार्य करणें बाकी राहत नसल्यामुळें, म्हणजे ज्या ज्या नित्यकार्यांची प्राप्ति झाली आहे तीं सर्व कार्यें अलौकिकप्रक्रियावाक्यांतच होऊन गेलीं असल्यामुळें, 'रामरामौ' हेंच परिनिष्ठित रूप होईल. पण भाषेंत तर तशा रूपाचा -- 'रामरामौ' या रूपाचा -- प्रयोग होत नसतो आणि भाषेंत ज्यांचा प्रयोग होतो त्यांचेंच अन्वाख्यान केलें जातें, म्हणजे तशा रूपांचाच प्रकृतिप्रत्ययरूप विभाग करून तीं रूपें पाणिनीय शास्त्रान्वयें कशीं सिद्ध होतात याचें व्याख्यान केलें जातें. म्हणून अलौकिकप्रक्रियावाक्यांत वृद्धिरूप एकादेश इत्यादि कार्यांची वास्तविक प्राप्तीच होत नाहीं. असा प्रकाशकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. (सारांश प्रयोगार्ह रूपाच्या सिद्धीकरितांच अलौकिकप्रक्रियावाक्य तयार केलें जात असल्यामुळें, जीं कार्यें केल्यानें प्रयोगार्ह रूप सिद्ध

होतें तशींच कार्यें अलौकिकप्रक्रियावाक्यांत करतां येतात व जीं कार्यें केल्यानें प्रयोगार्ह रूप सिद्ध न होतां तद्विपरीत–अनिष्ट व अशुद्ध–रूप होण्याची आपत्ति येते तशीं कार्यें अलौकिकप्रक्रिया-वाक्यांत करतां येत नाहींत. प्रकृत उदाहरणांत 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सूत्रानें वृद्धिकार्य केल्यानें 'राम राम औ = रामरामौ' अशी स्थिति झाली असतां, 'राम, रामौ' अशीं दोन असमान रूपें होत असल्यामुळें व समुदायापुढील 'औ' हा विभक्तिप्रत्यय नाहींसा होत असल्यामुळें, एकशेषाची प्राप्ति होत नाहीं व 'रामौ' हें प्रयोगार्ह रूप सिद्ध न होतां, 'रामरामौ' असें अनिष्ट व अप्रयोगार्ह रूप होऊं पाहते. म्हणून प्रकृत स्थलीं अलौकिकप्रक्रियावाक्यांत वृद्धिकार्य करणें अयोग्य आहे असा प्रकाशकारांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. यावर मनोरमेंत उत्तर दिलेंच आहे व त्याचें विवरण मनोरमेंत पूर्वीं केलेंच आहे.) 'तत्सर्वं सन्दर्भविरुद्धम्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा अर्थ हा आहे कीं, (समानरूप अनेक शब्दांपुढें एकाच विभक्तिप्रत्यय आला असतां, त्या सर्व शब्दांचा प्रयोग न होतां त्यांऐवजीं) एकाच शब्दाचा प्रयोग व्हावा याकरितां प्रकृत सूत्र केलें असें प्रथम सांगून, नंतर प्रकाशकारांनीं 'समुदाया-देकविभक्तौ परतः' या पक्षाचें प्रत्याख्यान केलें आहे असा संदर्भ आहे. (सारांश प्रकाशकारांनीं प्रथम प्रकृत सूत्राची उपयुक्तता प्रतिपादित करून आणि 'एकविभक्तौ परतः' हा पक्ष स्वीकारून नंतर त्या पक्षाचें व तसेंच प्रकृत सूत्राचें प्रत्याख्यान केलें आहे व अशा रीतीनें त्यांच्या म्हणण्यांत परस्परविरोध येतो हें उघड आहे.) प्रकाशकारांचें म्हणणें कसें न्यायविरुद्ध आहे हें सिद्ध करण्याकरितां 'प्रयुक्तानेवह्यन्वाख्यातुमलौकिकमुत्प्रेक्ष्यते' इत्यादि दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे. (याचें विवरण पूर्वीं मनोरमेंत केलेंच आहे.) ज्या प्रकारचीं शास्त्रीय कार्यें केल्यानें परिनिष्ठित रूप होऊन तें भाषेंत प्रयोग करण्यालायक होतें त्याच प्रकारच्या शास्त्रीय कार्यांची, तें रूप सिद्ध करण्याकरितां कल्पिलेल्या अलौकिक

प्रक्रियावाक्यांत, जरी प्रवृत्ति होते तरी, 'राम राम औ' या स्थलीं वृद्धिरूप एकादेशकार्याची प्रवृत्ति करणें योग्य नाहीं; कारण तसें केल्यास वैषम्य येईल, म्हणजे जें परिनिष्ठित रूप होईल तें भाषेंत प्रयोगार्ह असलेल्या रूपाहून भिन्न होईल, असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'कृतद्वन्द्वानामेकशेषः' हा पक्ष मानल्यास 'नावौ, अनड्वाहौ' इत्यादि स्थलीं परत्व इत्यादि कारणां-मुळें आवादेश इत्यादि कार्यें केल्यास एकशेष न होण्याची आपत्ति येईल असें जें दूषणपर भाष्यांत व वार्तिकांत म्हटलें आहे तें विसंगत ठरण्याची आपत्ति येते. (शंकाकाराचें असें म्हणणें आहे कीं, अलौकिकप्रक्रिया-वाक्यांत अशीं कार्यें करूं नये कीं, जीं केल्यानें परिनिष्ठित रूप प्रयोगार्ह होऊं शकणार नाहीं. उदाहरणार्थ 'राम राम औ' या अलौकिकप्रक्रियावाक्यांत जर 'वृद्धिरेचि' सू. ७२ या पर व नित्य सूत्रानें वृद्धिरूप एकादेशकार्य प्रथम केलें तर, 'रामरामौ' असें रूप होऊन त्यांत 'राम, रामौ' असें दोन विरूप अवयव होतील व त्यामुळें एकशेष होणार नाहीं आणि 'रामौ' असें प्रयोगार्ह परि-निष्ठित रूप सिद्ध होणार नाहीं. म्हणून अशा स्थलीं अलौकिक-प्रक्रियावाक्यांत वृद्धिरूप एकादेशकार्य न करितां केवळ एकशेष करावा व तसें केल्यावर 'राम औ' अशी स्थिति झाली असतां वृद्धिरूप एकादेश करावा. तसें केल्यानें 'रामौ' असें परिनिष्ठित प्रयोगार्ह रूप सिद्ध होऊं शकतें. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, शंकाकाराचें वरील म्हणणें भाष्यविरुद्ध असल्यामुळें बरोबर मानतां येत नाहीं. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत 'यदि पुनः समासे एकशेष उच्यते', म्हणजे द्वन्द्वसमास केल्यानंतर एकशेष करावा, हा पक्ष दूषित ठरवितेवेळीं, 'समासे इति चेत् स्वरसमासान्तेषु दोषः,' म्हणजे द्वन्द्वसमास केल्यानंतर एकशेष करावा हा पक्ष स्वीकारल्यास स्वर आणि समासान्त प्रत्यय यांच्या विषयांत दोष येतो, हें वार्तिक पठित करून त्या वार्तिकाचें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात – 'ऋक् च ऋक् च ऋचौ ।

समासान्ते कृतेऽसारूप्यादेकशेषो न प्राप्नोति । इदमिह सम्प्रधार्यम् । समासान्तः क्रियतामेकशेष इति । किमत्र कर्तव्यम् ? । परत्वात्समासान्तः । समासान्ते च दोषो भवति ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, 'ऋक् च ऋक् च' या स्थलीं प्रथम एकशेष न करितां द्वन्द्वसमास प्रथम केल्यास, 'ऋक्पूरब्धूः' सू. ९४० या सूत्रानें परत्वामुळें समासान्त 'अ' प्रत्यय करावा लागेल व तसें केल्यास समुदायांतील प्रथम शब्द 'ऋच्' व द्वितीय शब्द 'ऋच' होईल व अशा रीतीनें हे दोन शब्द असरूप झाल्यानें एकशेष होऊं शकणार नाहीं. पुढें भाष्यकार असें म्हणतात कीं, 'समासे कृते एकशेषः' हा पक्ष स्वीकारल्यास, 'अङ्गाश्रये चैकशेषवचनम्,' म्हणजे अङ्गाच्या आश्रयानें प्राप्त झालेलें कार्य केल्यानंतर एकशेष करावा, असें वचन पठित करावें लागेल. या वार्तिकाचें व्याख्यान करितांना कैयटानें 'च शब्दादनङ्गाश्रयेऽपि । यथा नौश्च नावौ चेति,' म्हणजे या या वार्तिकांत जो 'च' शब्द घातला आहे त्यानें जें कार्य अङ्गाश्रय नाहीं तशा कार्याचें देखील ग्रहण होतें, उदाहरणार्थ 'नौश्च नावौ च,' असें म्हटलें आहे, व शब्दरत्नांत वास्तविक या कैयटोक्तीचाच दाखला दिला आहे; कारण भाष्यांत 'नावौ, अनड्वाहौ' हीं उदाहरणें मुळींच दिलीं नसून कैयटप्रदीपांतच 'नौश्च नावौ च' हें उदाहरण दिलें आहे. 'नौ सु नौ औ जस्' या उदाहरणांत परत्वामुळें 'नौ औ' या स्थलीं 'एचोऽयवायावः' सू. ६१ या अङ्गाधिकारांत पठित नसलेल्या सूत्रानें 'औ' चे जागीं आवादेश केल्यावर समुदायांतील प्रथम अवयव 'नौ' व द्वितीय अवयव 'नावौ' होईल व हे दोन अवयव असरूप झाल्यामुळें एकशेष न होण्याची आपत्ति येईल. त्याचप्रमाणें 'अनडुह् सु अनडुह् औ जस्' या स्थलीं अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययांच्या निमित्तामुळें 'चतुरनडुहोरामुदात्तः' सू. ३३१, 'सावनडुहः' सू. ३३२, 'हल्ङ्याब्भ्यः' सू. २५२ व 'संयोगान्तस्य लोपः' या सूत्रांन्वयें प्राप्त होणारीं कार्यें परत्वामुळें पूर्वी केल्यास, प्रथम अवयव 'अनड्वान्'

व द्वितीय अवयव 'अनड्वाहौ' होईल व हे दोन अवयव असरूप झाल्यानें एकशेष होऊं शकणार नाहीं. या वरील विवेचनावरून हें स्पष्ट होतें कीं, अङ्गाच्या आश्रयानें होणारीं व तसेंच अङ्गाच्या आश्रयानें न होणारीं सर्व कार्यें अलौकिकप्रक्रियावाक्यांतच केलीं पाहिजेत. म्हणून 'यादृशशास्त्रप्रवृत्त्या लोके प्रयोगयोग्यता तदेव शास्त्रं कल्पिते अलौकिके प्रक्रियावाक्ये प्रवर्तते' असें जें शंकाकाराचें म्हणणें आहे तें भाष्यविरुद्ध व कैयटविरुद्ध ठरत असल्यामुळें चूक ठरतें असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) या विषयासंबंधानें एवढें पुरें.

मनोरमा– ("अमि पूर्वः"॥ अम्यचीति । अमि योऽच् तस्मिन् । अमो ऽवयवेऽचीति यावत् । तेन मकारसहितस्य न पूर्वरूपम् । एवं अक्षाद्‌हिन्यामित्यादावपि ऊहिन्यां योऽच् तस्मिन्नित्यादि बोध्यम् । "इको यणचि" इत्यज्ग्रहणस्यानुवृत्तेर्निर्विवादत्वात् । "पदास्वैरि-बाह्या–" इत्यादिनिर्देशाश्चेह लिङ्गम् ।

'अमि पूर्वः' सू. १९४ या सूत्राचें व्याख्यान करितांना कौमुदींत 'अम्यचि' असें जें म्हटलें आहे त्याचा 'अमि यः अच् तस्मिन्,' म्हणजे 'अमोऽवयवेऽचि,' असा अर्थ आहे. (प्रकृत सूत्रांत 'इको यणचि' या पूर्व सूत्रांतून 'अचि' हें सप्तम्यन्त पद अनुवृत्त होतें व तें प्रकृत सूत्रांतील ('अमि' या पदाचें विशेष्य होत असल्यामुळें 'अमि अचि' या पदांचा 'अमि यः अकाररूपः अच् तस्मिन् परतः' असा अर्थ होतो. 'अमि' हें पद जरी प्रकृत सूत्रांत आधारविवक्षेनें सप्तम्यन्त पठित केलें आहे तरी तें पद वास्तविक अवयवषष्ठी आहे आणि म्हणूनच 'अम्यचि' या पदांचा 'अमः अवयवः यः अकाररूपः अच् तस्मिन् परतः' असा दीक्षितांनीं अर्थ केला आहे.) 'अम्यचि' या पदांचा वर सांगितल्याप्रमाणें अर्थ होत असल्यामुळें, मकारसहित 'अम्' प्रत्ययाचे जागीं पूर्वरूप एकादेश होत नाहीं. ('अक्' व मकारसहित संपूर्ण 'अम्' प्रत्यय हे

एकादेशाचे पूर्वपर स्थानी मानले तर 'रामम्, हरिम्, भानुम्' अशीं द्वितीयेच्या एकवचनाचीं इष्ट रूपें न होतां 'राम, हरि भानु' अशीं अनिष्ट रूपें होण्याची आपत्ति येईल. ती आपत्ति टाळण्याकरितां 'अक्' व 'अम्' प्रत्ययांतील अकार हा अच् हे प्रकृत सूत्रानें होणाऱ्या पूर्वरूपएकादेशाचे स्थानी मानणें आवश्यक आहे.) याचप्रमाणें 'अक्षादूहिन्यामुपसङ्ख्यानम्'–सू ७३ वरील वार्तिक–इत्यादि स्थलीं देखील 'ऊहिन्याम्' इत्यादि पदांचा 'ऊहिन्यां यः अच् तस्मिन् परतः,' म्हणजे 'ऊहिन्याः अवयवः यः ऊकारः अच् तस्मिन् परतः,' अशाच प्रकारचा अर्थ होतो हें जाणावें. त्यामुळें 'अक्ष' यांतील अन्त्य अकार व त्यापुढें असलेल्या 'ऊहिनी' शब्दांतील आद्य ऊकार या दोहोंचे जागीं वृद्धिरूप एकादेश होतो. संपूर्ण 'ऊहिनी' शब्द एकादेशाचा एक स्थानी मानल्यास अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येईल हें उघड आहे.) प्रकृत सूत्रांत 'इको यणचि' या पूर्व सूत्रांतून 'अचि' या पदाची अनुवृत्ति होते याबद्दल कोणाचाहि वाद नाहीं. 'पदास्वैरिबाह्यापक्ष्येषु च' सू. २८७० इत्यादि सूत्रांतील 'अस्वैरि' इत्यादि निर्देश वर जसा अर्थ केला आहे तसा अर्थ करण्याला प्रमाण आहेत. ('अस्वैरि' हा शब्द 'स्वादीरेरिणोः'–सू. ७३ वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें सिद्ध झाला आहे. या वार्तिकाचा अक्षरार्थ असा आहे कीं, 'स्व' शब्दापुढें 'ईर' किंवा 'ईरिन्' शब्द आल्यास दोहोंचे जागीं वृद्धिरूप एकादेश होतो. परंतु येथें वास्तविक वृद्धिरूप एकादेशाचे स्थानी 'स्व' शब्दांतील अन्त्य अकार आणि 'ईर' किंवा 'ईरिन्' या शब्दांतील आद्य अच ईकार आहेत व त्यामुळेंच 'स्वैरिन्' असें रूप होतें. पूर्ण 'ईर' किंवा 'ईरिन्' हा शब्द वृद्धिरूप एकादेशाचा एक स्थानी असता तर 'पदास्वैरि' या सूत्रांतील 'अस्वैरि' हा निर्देश चूक ठरण्याची आपत्ति आली असती.)

शब्दरत्न–अमि योऽजिति । अवयविन आधारत्वाविवक्षायां वृक्षेशाखेतिवत्सप्तमी तदाह–अमोऽवयवेऽचीति । "पूर्वपरयोः"

इत्यधिकृतपरशब्देन विशेष्यत्वादजेव गृह्यतेति बोद्धव्यम् । निर्विवाद-त्वादिति । उत्तरत्रानुवृत्तेः सत्त्वादिति भावः । लिङ्गमिति । अनु-वृत्तावनुवृत्तस्य विशेष्यत्वे चेत्यर्थः । स्पष्टं चेदम् "औतोऽम् शसोः" इत्युपक्रम्य प्रत्ययलक्षणसूत्रे भाष्ये ।

अवयवी 'अम्' चे ठिकाणीं आधारत्वाची विवक्षा करून 'वृक्षे शाखा' या प्रयोगाप्रमाणें ('विवक्षातः कारकाणि भवन्ति' या वचनान्वयें 'सप्तम्यधिकरणे च' सू. ६३३ या सूत्रानें) 'अमि' असा प्रकृत सूत्रांत सप्तम्यन्त निर्देश केला आहे. ('वृक्षस्य शाखा' असा प्रयोग न करितां 'वृक्षस्य' या अवयविषष्ठीचे ठिकाणीं आधाराची विवक्षा करून ज्याप्रमाणें 'वृक्षे शाखा' असा प्रयोग केला जातो त्याचप्रमाणें 'अमःअचि' या ऐवजीं 'अमि अचि' असा प्रयोग केला आहे. पण तसा प्रयोग जरी केला आहे तरी त्याचा 'अमः अचि' असाच अर्थ होतो) आणि म्हणूनच दीक्षितांनीं 'अमोऽ-वयवेऽचि' असें मनोरमेंत म्हटलें आहे. 'पूर्वपरयोः' या अधिकारांतील 'पर' या (विशेषणभूत) शब्दानें, ('एकःपूर्वपरयोः' या अधिकारांत पठित असलेल्या प्रकृत सूत्रांतील) अचि हें (अनुवृत्त) पद विशेष्य असल्यामुळें, त्या अच्चेंच म्हणजे 'अमि' यांतील 'अ' या अच्चेंच ग्रहण होतें हें लक्षांत ठेवावें. 'अनुवृत्तेर्निर्विवादत्वात्' असें जें मनो-रमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, प्रकृत सूत्राच्या पुढील सूत्रांत, म्हणजे 'सम्प्रसारणाच्च' या उत्तरसूत्रांत, 'इको यणचि' या सूत्रांतून 'अचि' या पदाची अनुवृत्ति होते. (प्रकृत सूत्रापुढील सूत्रांत त्या पदाची अनुवृत्ति होत असल्यामुळें, प्रकृत सूत्रांत देखील त्या पदाची अनुवृत्ति मानणें आवश्यक आहे; नाहीं तर उत्तर सूत्रांत मण्डूकप्लुतीनें अनुवृत्ति करण्याचा दोष येईल.) 'पदास्वैरि' इत्यादि सूत्रांतील 'अस्वैरि' इत्यादि निर्देश, प्रकृत सूत्रांत 'अचि' या पदाची अनुवृत्ति होते व तें अनुवृत्त पद 'पर' या विशेषणाशीं विशेष्यरूपानें अन्वित होतें, या दोहोंच्याहि संबंधानें प्रमाण आहे. 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. १-१-६२ या सूत्रा-

वरील भाष्यांत 'औतोऽम्शसोः' या सूत्राचा उपक्रम करून भाष्यकारांनीं हें स्पष्ट केलें आहे, म्हणजे 'एकः पूर्वपरयोः' या अधिकारांत पठित असलेल्या सर्व सूत्रांत 'अचि' या पदाची अनुवृत्ति होत असून तें अनुवृत्त पद 'पर' या शब्दाशीं विशेष्यरूपानें अन्वित होतें हें स्पष्ट केलें आहे. ('प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'गोरात्वम् । गामिच्छति गव्यति । प्रत्ययलक्षणे न अमि औतोऽम्शसोः इत्यात्वं प्राप्नोति । स्थानिसंज्ञान्यभूतस्यानल्विधाविति वचनान्न भवति ।' या भाष्याचा भावार्थ हा आहे कीं, 'गो' शब्दाला आत्वाची प्राप्ति होण्याचें 'गामिच्छति' गव्यति' हें उदाहरण आहे. येथें ओकारान्त 'गो' शब्दापुढें प्रत्ययलक्षणानें अजादि 'अम्' प्रत्यय आहे असें मानल्याने 'औतोऽम्शसोः' सू. २८५ या 'एकः पूर्वपूर्वपरयोः' या अधिकारांत पठित असलेल्या सूत्रानें 'आ' असा एकादेश प्राप्त होतो. परंतु 'स्थानिसंज्ञान्यभूतस्यानल्विधौ,' म्हणजे प्रत्ययलक्षण करितांना देखील 'अनल्विधौ' हा स्थानिवद्भावाचा निषेध लागू पडतो, असें म्हटलें असतां एकादेश होण्याची प्राप्ति टळते. 'सुप आत्मनःक्यच्' सू. २६५० या सूत्रानें 'आत्मनः इच्छति' या अर्थामध्यें 'गो अम्' या द्वितीयान्ताहून 'क्यच् = य' प्रत्यय केला असतां, 'गो अम् य' या समुदायाला 'सनाद्यन्ता धातवः' सू. २३०४ या सूत्रानें धातुसंज्ञा होऊन 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'अम्' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा जरी लुक् होतो तरी 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षण्' सू. २६२ या सूत्रानें 'अम्' प्रत्यय कायमच आहे असें मानल्यानें, 'गो' यांतील अन्त्य ओकार व 'अम्' प्रत्ययांतील आद्य अकार हा अच् या दोहोंचे जागीं 'औतोऽम्शसोः' या सूत्रानें 'आ' असा एकादेश पावतो अशी शंका वरील भाष्यांत भाष्यकारांनीं उपस्थित करून त्या शंकेचें अशा रीतीनें निवारण केलें आहे कीं, हा अल्विधि असल्यामुळें येथें प्रत्ययलक्षणानें स्थानिवद्भाव करतां येत नाहीं. 'अम्' हा संपूर्ण प्रत्यय जर

एकादेशाचा स्थानी असता तर अल्विधि ठरूं शकला नसता. परंतु 'अम्' प्रत्ययांतील आद्य अकार हा अच् एकादेशाचा परस्थानी असल्यामुळें, हा अल्विधि ठरतो. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'एकः पूर्वपरयोः' या अधिकारांत पठित असलेल्या सूत्रांत 'अचि' या पदाची अनुवृत्ति होत असून तें अनुवृत्त पद 'पर' या अधिकार-सूत्रांतील विशेषणभूत पदाशीं विशेष्यरूपानें संबद्ध होतें. प्रकृत सूत्रावर टीका करितांना कित्येक टीकाकारांनीं अशी शंका केली आहे कीं, 'विष्णु' या अर्थाच्या वाचक 'अ' या प्रातिपदिकाचें 'अम्' असें जें द्वितीयेच्या एकवचनाचें रूप होतें तें 'हे राम अम् भजस्व' या वाक्यांत 'राम' या अदन्त शब्दापुढें आलें असल्यामुळें, येथें प्रकृत सूत्रानें पूर्वरूप एकादेश कां होऊं नये, व त्या शंकेचें त्यांनीं असें उत्तर दिलें आहे कीं, 'वासुप्यापिशलेः' या पूर्व सूत्रांतून प्रकृत सूत्रांत 'सुपि' या पदाची अनुवृत्ति होऊन तें अनुवृत्त पद प्रकृत सूत्रांतील 'अमि' या पदाचें विशेषण होत असल्यामुळें, त्या 'अमि' शब्दानें 'सुप्' प्रत्यय 'अम्'चेंच ग्रहण होतें आणि वरील वाक्यांत 'अम्' हा 'सुप्' प्रत्यय नसून 'अ' या प्रातिपदिकाचें द्वितीयेचें एकवचन असल्यामुळें, पूर्वरूप एकादेश होत नाहीं. दुसरें असें कीं, 'यस्मात्प्रत्ययविधिः' सू. १९९ या सूत्रान्वयें प्रत्ययानें अङ्ग आक्षिप्त होत असल्यामुळें व तदादिविधि होत असल्यामुळें आणि वरील वाक्यांत जो 'अम्' प्रत्यय झाला आहे तो तो 'राम' या अङ्गाहून झाला नसून 'अ' या अङ्गाहून झाला असल्यामुळें आणि अशा रीतीनें 'राम' हें 'अम्' प्रत्ययाचें अङ्ग नसल्यामुळें, येथें पूर्वरूप एकादेशाची प्राप्ति होत नाहीं. टीकाकारांनीं प्रकृत सूत्रावर आणखी कांहीं शंका उपस्थित केल्या आहेत पण त्या महत्त्वाच्या नसून क्षुल्लक असल्यामुळें त्यांचा येथें निर्देश करण्याची गरज वाटत नाहीं.)

मनोरमा – "तस्माच्छसः"। तच्छब्देन सन्निहितः पूर्वसवर्ण-दीर्घः परामृश्यते। शस इत्यवयवषष्ठी। स चावयवः परत्वेन

विशेष्यते । पूर्वसवर्णदीर्घात् परस्य शसोऽवयवस्येति । तदेतदाह– परो यः शसः सकार इति । परो यः शस् इति तु नोक्तम्, असंभवात् । न हि कृते पूर्वसवर्णदीर्घे परः शस् संभवति ।

'तस्माच्छसो नः पुंसि' सू. १९६ या सूत्रांतील 'तस्मात्' या सर्वनामपदानें ('प्रथमयोः पूर्वसवर्णः' या पूर्व सूत्रांतील) लगेंच जवळ असलेल्या 'पूर्वसवर्ण,' म्हणजेच 'पूर्वसवर्णदीर्घ,' या शब्दाचा परामर्श होतो. प्रकृत सूत्रांतील 'शसः' ही (स्थानषष्ठी नसून) अवयवषष्ठी आहे. (प्रकृत सूत्रांतील 'तस्मात्' ही दिग्योगें-पञ्चमी असल्यामुळें त्या पदाचा 'तस्मात्परस्य' असा अर्थ होतो व यांतील) 'परस्य' हें 'शस्= अस्' प्रत्ययाचा अवयव जो सकार त्याचें विशेषण होतें, म्हणजे 'परस्य' या शब्दानें 'शस्' प्रत्ययांतील सकाराचें ग्रहण होतें, आणि त्यामुळें 'पूर्वसवर्णदीर्घात्परस्य शसोऽव-यवस्य सकारस्य स्थाने नकारादेशो भवति' असा प्रकृत सूत्राचा अर्थ होतो आणि हा आशय मनांत धरूनच प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'परो यः शसः सकारः तस्य नः स्यात् पुंसि' असें व्याख्यान केलें आहे. 'परो यः शस्' असें कौमुदींत व्याख्यान, संभवत नसल्यामुळें केलें नाहीं; कारण पूर्वसवर्णदीर्घ केल्यावर त्या पुढें 'शस्' प्रत्यय येणें संभवत नाहीं. ('राम् + शस् = राम + अस्' या स्थलीं 'प्रथमयोः पूर्वसवर्णः' सू. १६४ या सूत्रानें 'राम' यांतील अन्त्य अकार व 'अस्' प्रत्ययांतील आद्य अकार या दोहोंचे जागीं पूर्वसवर्णदीर्घ 'आ' असा एकादेश केल्यावर 'रामास्' अशी स्थिति होते व या स्थितींत पूर्वसवर्णदीर्घ झाल्यानें 'अस्' प्रत्ययांतील अकार नाहींसा होत असल्यामुळें, पूर्वसवर्णदीर्घापुढें 'अस्' प्रत्यय येणें शक्य नाहीं, सकारच त्यापुढें येऊं शकतो आणि म्हणूनच त्या पर सकाराचे जागीं नकारादेश होतो असें कौमुदींत व्याख्यान केलें आहे.)

शब्दरत्न – अवयवषष्ठीति । अवयवावयविभावसम्बन्धबोधिका षष्ठीत्यर्थः ।

'शस इत्यवयवषष्ठी' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यांतील 'अवयवषष्ठी' या पदाचा 'अवयवावयविभावसम्बन्धबोधिका षष्ठी', म्हणजे ज्या षष्ठीनें अवयवावयविभावरूप संबंध बोधित होतो अशा प्रकारची 'शसः' ही षष्ठी आहे असा अर्थ आहे.

मनोरमा – "अट्कुप्वाङ्"। रषाभ्यामिति पञ्चमीनिर्देशाद्व्यवहितस्याप्राप्तौ वचनमिदम्। अत्र सर्वैर्व्यवायोऽसंभवी, एकैकमात्रव्यवाय इत्यपि नार्थः। क्षुभ्नादिषु क्षुभ्नशब्दपाठसामर्थ्यात्, "सरूपाणाम्" इत्यादिनिर्देशाच्चेत्यभिप्रेत्याह – व्यस्तैर्यथासम्भवं मिलितैश्चेति। नन्वेवं आदर्शेनेत्यादौ अतिप्रसङ्गः। न च अडादिभिरेव व्यवधाने इति नियमः। अप्राप्ते विधिरयमित्युक्तत्वात्। सत्यम्। योगविभागोऽत्र बोध्यः। "व्यवायेऽपि" इत्येको योगो विध्यर्थः। "अट्कुप्वाङ्नुम्" इत्यन्यो नियमार्थः। छान्दसो भिसो लुक्। निषेधं बाधितुमिति। तेन पर्याणद्धमित्यत्र "उपसर्गादसमासेऽपि" इति णत्वं सिध्यतीति भावः। नुम्ग्रहणमिति। तत्स्थानिकस्य स्वाभाविकस्य चानुस्वारमात्रस्योपलक्षणमित्यर्थः। तेन "बृहि वृद्धौ" इदित्वान्नुम्। तस्यानुस्वारः। "तृंहू हिंसायां" स्वाभाविकोऽत्रानुस्वारः। बृंहणम्, तृंहणम्। उभयत्रापि णत्वं सिद्धम्। "इवि प्रीणने" प्रेन्वनम्। इह "कृत्यचः" "इजादेः सनुमः" इति णत्वं न। यथा "नक्षत्रं दृष्ट्वा वाचं विसृजेत्" इति विधौ नक्षत्रदर्शनस्य कालविशेषोपलक्षणत्वात्सत्यपि दिवा नक्षत्रदर्शने वाङ् न विसृज्यते, उपलक्षितस्य कालविशेषस्याभावात्। रात्रौ असत्यपि नक्षत्रदर्शने विसृज्यते तस्य सत्त्वात्। तथेहापि बोध्यम्।

'रषाभ्यां नो णः' सू. २३५ या पूर्वसूत्रांत 'रषाभ्याम्' हा पञ्चमीनिर्देश असल्यामुळें ('तस्मादित्युत्तरस्य' सू. ४१ या सूत्रान्वयें रकाराच्या किंवा षकाराच्या लगेंच पुढें असलेल्या नकाराला णत्व पावतें. परंतु रकार किंवा षकार आणि नकार या दोहोंमध्यें इतर वर्णांचें व्यवधान असल्यास तशा) व्यवहित नकाराला जें णत्व

पावत नाहीं तें व्हावें याकरितां 'अट्कुप्वाङ्नुम्व्यवायेऽपि' सू. १९७ हें प्रकृत सूत्र मुद्दाम आरंभिलें आहे. रकार किंवा षकार आणि नकार या दोहोंमध्यें प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या सर्व वर्णांचें एकेच वेळीं व्यवधान असणें असंभवनीय आहे. तसेंच प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या वर्णांपैकीं एकाच वर्णाचें व्यवधान असल्यास णत्व होतें असा देखील प्रकृत सूत्राचा अर्थ नाहीं. क्षुभ्नादिगणांत पठित असलेल्या 'क्षुभ्न' या शब्दाच्या पाठसामर्थ्या-मुळें व तसेंच 'सरूपाणाम्' इत्यादि पाणिनीय निर्देश असल्यामुळें, हें सर्व लक्षांत धरून 'एतैर्व्यस्तैर्यथासम्भवं मिलितैश्च व्यवधानेऽपि' असें प्रकृत सूत्राचें व्याख्यान करितांना कौमुदींत म्हटलें आहे. ('क्षुभ्न' या स्थलीं षकार व नकार या दोन वर्णांमध्यें 'उ' या 'अट्' चें व तसेंच 'भ्' या पवर्गांतील वर्णाचें व्यवधान आहे. प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या वर्णांपैकीं एकाच वर्णाचें व्यवधान असल्यास किंवा सर्व वर्णांचें मिळून व्यवधान असल्यास नकाराचें णत्व होतें असा जर प्रकृत सूत्राचा अर्थ असता तर, 'क्षुभ्न' या स्थलीं णत्वाची प्राप्तीच नव्हती व त्यामुळें णत्वनिवारणाकरितां त्या शब्दाचा क्षुभ्नादिगणांत पाठ करण्याची कांहींच गरज नव्हती. पण त्या शब्दाचा क्षुभ्नादिगणांत पाठ केला असल्यामुळें आणि तसेंच 'सरूपाणामेकशेषः' सू. १८८ या सूत्रांतील 'सरूपाणाम्' या स्थलीं रकार व नकार या दोहोंमध्यें प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या वर्णा-पैकीं एकच वर्णाचें व्यवधान नसून जरी कांहीं अनेक वर्णांचें व्यवधान आहे व सर्व वर्णांचें व्यवधान नाहीं तरी देखील त्या निर्देशांत पाणिनीनें णत्व केलें असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, प्रकृत सूत्राचा 'एकैकमात्रव्यवाये' किंवा 'सर्वेषां मिलितानां व्यवाये' असा अर्थ न करितां, वर सांगितल्याप्रमाणें कौमुदींत जसा अर्थ केला आहे तसाच अर्थ करणें योग्य ठरतें असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. आतां येथें शंकाकार अशी शंका करतो कीं, 'अट्, कु, पु, आङ्, नुम्' यांचें व्यवधान असल्यास णत्व होतें असा प्रकृत सूत्राचा

अर्थ होत असल्यामुळें) 'आदर्शेन' इत्यादि स्थलीं णत्व होण्याची आपत्ति येते; (कारण या उदाहरणांत रकार आणि नकार यांच्या-मध्यें प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट नसलेल्या शकाराचें जरी व्यवधान आहे तरी पण 'ए' या सूत्रनिर्दिष्ट 'अट्' चें व्यवधान आहेच.) सूत्रनिर्दिष्ट 'अट्' इत्यादि वर्णांचेंच व्यवधान असल्यास णत्व होतें असा प्रकृत सूत्राचा नियामक अर्थ करतां येत नाहीं, म्हणजे प्रकृत सूत्र नियमार्थ सूत्र आहे असें मानतां येत नाहीं; कारण 'अप्राप्ते विधिरयम्—अप्राप्तौ वचनामिदम्'—असें नुकतेंच वर मनो-रमेंत म्हटलें आहे. (शंकाकाराच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे कीं, 'रषाभ्यां नो णः' या पूर्व सूत्रानें जेथें णत्वाची प्राप्ति होत नाहीं तेथें णत्व व्हावें याकरितां मनोरमेंत सांगितल्याप्रमाणें प्रकृत सूत्र मुद्दाम केलें असल्यामुळें तें विधायक सूत्र ठरतें व म्हणून तें नियमार्थ सूत्र मानतां येत नाहीं. त्यामुळें 'आदर्शेन' या उदाहरणांत जरी प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट नसलेल्या शकाराचें व्यवधान आहे तरी, 'ए' या सूत्रनिर्दिष्ट 'अट्' चें व्यवधान असल्यामुळें, येथें वास्तविक प्रकृत सूत्रानें णत्व व्हावयास पाहिजे. प्रकृत सूत्र विधायक सूत्र असून नियमार्थ नसल्या-मुळें, त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या वर्णांचेंच व्यवधान असल्यास णत्व होतें व इतर वर्णांचें व्यवधान असल्यास णत्व होत नाहीं असा प्रकृत सूत्राचा नियामक अर्थ करतां येत नाहीं व त्यामुळें 'आदर्शेन' या स्थलीं णत्व होणें टाळतां येत नाहीं. 'व्यवायेऽपि' असें स्वतंत्र णत्वविधायक सूत्र पाणिनीनें केलें असतें व नंतर प्रकृत सूत्र पठित केलें असतें तरच प्रकृत सूत्र नियामक सूत्र मानतां आलें असतें व 'अडादिभिरेव व्यवाये णत्वं स्यात्' असा प्रकृत सूत्राचा नियामक अर्थ करतां आला असता. 'नन्वेवं आदर्शेनेत्यादौ··· ···विधिरयमित्युक्तत्वात्' हा सर्व शंकाग्रन्थ आहे व या शंका-ग्रन्थांत जी शंका केली आहे तशीच शंका प्रकृत सूत्रावरील भाष्यांत देखील केली आहे व मनोरमेंतील वरील शंकाग्रन्थ त्या भाष्यांतील शंकेचा अनुवादक आहे. त्या भाष्यांत 'आदर्शेन, अक्षदर्शेन'

या स्थलीं णत्व कां .होऊं नये अशी शंका करतेवेळीं भाष्यकार असें म्हणतात–' यद्यप्यत्रान्येनव्यवायोऽटाऽपि तु व्यवायोऽस्ति । तत्रा-स्त्यङ्व्यवाय इति प्राप्नोति ।' व या स्थलीं णत्वाच्या निवारणा-करितां त्यांनीं प्रथम 'अड्व्यवाये णत्वेऽन्यव्यवाये प्रतिषेधः' हें वार्तिक पठित करून नंतर त्याच्या उलट 'न वाऽन्येन व्यपेतत्वात्' हें द्वितीय वार्तिक पठित केलें आहे व या वार्तिकाचें व्याख्यान करितांना कैयटानें 'रषाभ्यामित्यत्र तस्मादिति परिभाषोपस्थानाव्द्य-वाये णत्वाऽप्रसङ्गादेतत्सूत्रमारभ्यमाणमडादिव्यवाये णत्वमनुजानाति, नाऽन्यव्यवाये, तस्य निर्दिष्टग्रहणेन निवर्तितत्वादिति भावः ।' असें म्हटलें आहे. परंतु दीक्षितांनीं वरील उदाहरणांत णत्वाची आपत्ति टाळण्याकरितां 'न वाऽन्येनव्यपेतत्वात्' हें भाष्यांत दिलेलें वार्तिक पठित न करितां प्रकृत सूत्राचा योगविभाग करावा असें सुचविलें आहे व याचें कारण शब्दरत्नांत सांगण्यांत येईल. वरील शंकेसंबंधानें दीक्षित असें उत्तर देतात कीं,) वरील शंका यथार्थ आहे व त्या शंकेचें निवारण करण्याकरितां प्रकृत सूत्राचा योगविभाग करावा. 'व्यवायेऽपि' असा एक भाग करून तें विधायक सूत्र मानावें व अवशिष्ट राहिलेलें 'अट्कुप्वाङ्नुम्' हें द्वितीय सूत्र मानून तें नियामक सूत्र मानावें आणि या नियामक सूत्रांत 'भिस्' प्रत्ययाचा ('छन्दोवत्सूत्राणि भवन्ति' या वचनान्वयें पाणिनीय सूत्रें छन्दोवत् ठरत असल्यामुळें 'सुपां सुलुक्' सू. ३५६१ या सूत्रानें) छान्दस लुक झाला आहे असें समजावें. (तसें मानल्यानें, 'अट्, कु, पु, आङ्, नुम्' याच वर्णांचें व्यवधान सह्य ठरतें, इतर वर्णांचे व्यवधान सह्य ठरत नाहीं आणि 'आदर्शेन' या स्थलीं शकार या असह्य वर्णांचें व्यवधान असल्यामुळे णत्व होत नाहीं. ('रषाभ्यांनो णः' ८–४–१ या सूत्रावरील भाष्यांत वर सांगितल्याप्रमाणेंच योगविभाग करावा असें म्हटलें आहे. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'एवं तर्हि योगविभागः करिष्यते–रषाभ्यां नो णः समानपदे । ततो व्यवाये । व्यवाये च रषाभ्यां नो णो भवतीति । तत अट्कुप्वाङ-

नुम्भिरिति । इदमिदानीं किमर्थम् ? । नियमार्थम् एतैरेवाक्षर-समाम्नायिकैर्व्यवाये नान्यैरिति ।') 'पदव्यवायेऽपि इति निषेधं बाधितुमाङ्ग्रहणम्' असें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें असल्या-मुळें, 'पर्याणद्धम्' या स्थलीं 'उपसर्गादसमासेऽपि' सू. २२८७ या सूत्रानें होणारें णत्व सिद्ध होतें. (धातुपाठांत 'णह् बन्धने' असा 'णोपदेश' धातु पठित केला आहे व 'णो नः' सू. २२८६ या सूत्रानें धात्वादि णकाराचें नत्व होतें. 'परि आङ् नह् क्त' या स्थलीं 'परि' या उपसर्गामध्यें णत्वाचें रकाररूप निमित्त आहे. परंतु रकार व नकार यांच्यामध्यें 'आङ्' या निपातपदाचें व्यवधान असल्यामुळें आणि समानपदांत–एकाच अखण्ड पदांत–प्रकृत सूत्रानें णत्व होणें सांगितलें असल्यामुळें 'पदव्यवायेऽपि' सू. १०५७ या णत्वनिषेधक सूत्रान्वयें णत्व न होण्याची आपत्ति येते. परंतु प्रकृत सूत्रांतील 'अट्' ग्रहणानें 'आङ् = आ' चें ग्रहण होत असून देखील पुन्हा या सूत्रांत 'आङ्' चें ग्रहण मुद्दाम केलें असल्यामुळें, त्या आङ्ग्रहणानें 'पदव्यवायेऽपि' या सूत्राचा बाध होतो व वरील उदाहरणांत 'आङ्' या पदाचें व्यवधान असून देखील 'उपसर्गाद-समासेऽपि' या सूत्रानें होणारें णत्व होतें.) प्रकृत सूत्रांतील 'नुम्' हें पद 'नुम् = न' चे जागीं ('नश्चापदान्तस्य झलि' सू. १२३ या सूत्रानें) होणाऱ्या व तसेंच स्वाभाविक अनुस्वारमात्राचें–केवळ अनुस्वाराचें–उपलक्षण आहे, म्हणजे 'नुम्' नें 'नुम्' चें ग्रहण न होतां वरील दोन्ही प्रकारच्या अनुस्वारांचेंच ग्रहण होतें त्यामुळें 'बृहि वृद्धौ' या स्थलीं 'बृहि' हा धातु इदित् असल्या-मुळें ('इदितो नुम् धातोः' सू. २२६२ या सूत्रानें) जो नुमागम होतो त्याचे जागीं ('नुम् = न्' या पुढें 'ह्' हा झल् असल्यामुळें 'नश्चापदान्तस्य झलि' या सूत्रानें) अनुस्वार होतो. 'तृंहू हिंसायाम्' या धातूंत स्वाभाविक अनुस्वार आहे. दोन्ही स्थलीं णत्व होऊन 'बृंहणम्, तृंहणम्' अशीं रूपें होतात. (या दोन्ही उदाहरणांत 'ल्युट् = अन' प्रत्यय झाला आहे. या दोन्ही

स्थलीं रकार किंवा षकार या वर्णापुढें नकार नसून तो ऋकारापुढें आहे व दोहोंमध्यें 'अट्' प्रत्याहारान्तर्गत अकार व हकार या वर्णांचें व्यवधान आहे. पण ऋवर्णापुढें देखील नकार आल्यास त्याचें णत्व व्हावें याकरितां 'रषाभ्यां नो णः' या सूत्रावरील भाष्यांत 'रषाभ्यां णत्वे ऋकारग्रहणम्' हें वार्तिक पठित केलें आहे व या वार्तिकान्वयें वरील दोन्ही उदाहरणांत णत्व झालें आहे. या विषयाचें अधिक विवरण शब्दरत्नांत करण्यांत येईल. सारांश 'बृंहणम्' या प्रथम उदाहरणांत ऋकार व नकार या दोहोंमध्यें 'नुम्' चे जागीं झालेल्या अनुस्वाराचें व्यवधान असून, 'तृंहणम्' या द्वितीय उदाहरणांत स्वाभाविक अनुस्वाराचें व्यवधान आहे व 'नुम् चें व्यवधान नाहीं तरी, 'नुम्' हा केवळ अनुस्वाराचें उपलक्षण मानला असल्यामुळें णत्व झालें आहे.) 'प्र' या उपसर्ग-पूर्वक 'इवि प्रीणने' या धातूचें 'प्रेन्वनम्' असें रूप होतें. या उदाहरणांत 'कृत्यचः' सू. २८३५ व 'इजादेः सनुमः' सू. २८३८ या सूत्रानें होणारें णत्व होत नाहीं. 'नक्षत्रं दृष्ट्वा वाचं विसृजेत्' हा जो (वेदांत यज्ञदीक्षा घेतलेल्या यजमानाकरितां) विधि सांगि-तला आहे त्यांत नक्षत्रदर्शन हें कालविशेषाचें—रात्रिकालाचें—उपलक्षण असल्यामुळें, ज्याप्रमाणें दिवसा नक्षत्रदर्शन झालें तरी त्यावेळीं उपलक्षित रात्रिकालाचा अभाव असल्याकारणानें मौनाचा त्याग करतां येत नाहीं व रात्रीं नक्षत्रदर्शन न झालें तरी उपलक्षित रात्रिकाल विद्यमान असल्यामुळें मौनत्याग करतां येतो त्याचप्रमाणें प्रकृत सूत्रांतील 'नुम्' निर्देशासंबंधानें जाणावें, म्हणजे प्रकृत सूत्रांतील 'नुम्' यानें वास्तविक 'नुम्' चें ग्रहण होत नसून अनुस्वाराचें ग्रहण होत असल्यामुळें, मग तो अनुस्वार 'नुम्' चे जागीं झालेला असो किंवा स्वाभाविक अनुस्वार असो, अनुस्वाराचें व्यवधान असलें तर णत्व होतें पण 'नुम्' चें व्यवधान असलें तर णत्व होत नाहीं. ('इवि प्रीणने' हा धातु इदित् असल्यामुळें 'इदितो

नुम् धातोः' सू. २२६२ या सूत्रानें नुमागम होतो व 'प्र' या उपसर्गपूर्वक त्या धातूहून 'ल्युट् = अन' हा कृत् प्रत्यय केल्यास 'प्रेन्वनम्' असें रूप होतें. या उदाहरणांत 'प्र' या उपसर्गांतील रकार णत्वाचें निमित्त आहे. येथें 'नुम् = न्' या पुढें जो वकार आहे तो झल् नसल्यामुळें, 'नश्चापदान्तस्य झलि' सू. १२३ या सूत्रानें होणारा नकाराचा अनुस्वार झाला नाहीं. या उदाहरणांत रकार व 'ल्युट् = अन' या कृत् प्रत्ययांतील नकार या दोहोंमध्यें 'नुम्' स्थानिक अनुस्वाराचें किंवा स्वाभाविक अनुस्वाराचें व्यवधान नसून साक्षात् 'नुम्' चें व्यवधान आहे आणि प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेला 'नुम्' हा केवळ अनुस्वाराचें उपलक्षण असल्यामुळें, म्हणजे या 'नुम्' नें साक्षात् नुम्चें ग्रहण होत नसून नुम् स्थानिक अनुस्वाराचें व तसेंच स्वाभाविक अनुस्वाराचेंच ग्रहण होत असल्या-मुळें, येथें नुम्चें व्यवधान असून देखील णत्व झालें नाहीं हें लक्षांत ठेवावें. प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेला 'नुम्' हा अनुस्वारमात्राचें उपलक्षण असल्यामुळें नुम्चें व्यवधान सहन होत नसून अनुस्वाराचें व्यवधान सहन होतें याला दीक्षितांनीं 'नक्षत्रं दृष्ट्वा वाचं विसृजेत्' हा समर्पक दृष्टान्त दिला आहे व त्या दृष्टान्ताचें वर विवरण केलेंच आहे.)

मनोरमा— नन्वेवं नुम्ग्रहणं व्यर्थम् अनुस्वारस्याट्त्वेनैव संग्रहात् । उरः । केणेत्यादौ विसर्गजिह्वामूलीयादिव्यवधाने ष्टुत्वेनैव गतिरिति चेत्सत्यमित्याह—तच्चेति । स्यादेतत् । उक्तरीत्या "नुम्विसर्जनीय" इति सूत्रेऽपि नुम्ग्रहणं त्याज्यं स्यात् । तत्राप्यनुस्वारस्य लक्षणी-यत्वात् । अन्यथाऽसंभवात् । न हि षत्वप्रवृत्तिवेलायां सर्पींषी-त्यादौ नुम् लभ्यते । षत्वस्यासिद्धत्वेन ततः प्रागेवानुस्वारप्रवृत्तेः । यद्यपि सुहिन्सु इत्यत्र संभवत्येव, तथाऽपि तत्रैवातिव्याप्ति वारयितुं लक्ष्यानुरोधान्नुम्स्थानिकेऽनुस्वारे लक्षणाऽऽश्रयणीयैव, व्याख्या-नात् । तस्य च शर्त्वेन तद्व्यवाये षत्वस्य सिद्धत्वादिति चेत् । मैवम् । उक्तरीत्या तत्रत्यविसर्गग्रहणस्य प्रत्याख्यानसंभवेऽपि नियमार्थं

नुम्ग्रहणम् । तथा हि–अनुस्वारेण व्यवधाने चेत् षत्वं तर्हि नूम्स्थानि-केनैवेति नियम्यते, तेन पुंस्वित्यादौ षत्वं नेति दिक् ।

अशा रीतीनें प्रकृत सूत्रांतील नुम्ग्रहण केवळ अनुस्वाराचें उपलक्षण मानलें असल्यामुळें व प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अट्' प्रत्याहारांत अनुस्वाराचा समावेश होत असल्यामुळें, प्रकृत सूत्रांतील 'नुम्' ग्रहण व्यर्थ ठरतें व 'उर: केण' इत्यादि उदाहरणांत विसर्ग, जिव्हामूलीय इत्यादिकांचें व्यवधान असून णत्व होतेंच, अशी कोणी शंका केल्यास, त्या शंकेंतील आशय मनांत धरूनच 'तच्चाकर्तुं शक्यम्,' म्हणजे प्रकृत सूत्रांतून 'नुम्' हें पद गाळतां येतें, असें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे. ('नुम्ग्रहणमनुस्वारोपलक्षणार्थम् । तच्चाकर्तुं शक्यम् । अयोगवाहानामट्सूपदेशस्योक्तत्वात्।' असें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे. याचा भावार्थ हा आहे कीं, नुम्नें नुम्चें ग्रहण होत नसून नुम्स्थानिक किंवा स्वाभाविक अनुस्वाराचें च ग्रहण होत असल्यामुळें व 'अयोगवाहानाम कारोपरि शर्षु च पाठात्,' म्हणजे अनुस्वार, विसर्ग, जिव्हामूलीय, उपध्मानीय व अनुनासिक यांचा अक्षरसमान्यायांत अकारापुढें व 'शर्' प्रत्याहारांत पाठ मानला आहे, असें 'हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्यांत म्हटलें असल्यामुळें आणि अशा रीतीनें प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अट्' प्रत्याहारानें अनुस्वाराचें ग्रहण होऊं शकत असल्यामुळें, प्रकृत सूत्रांत 'नुम्' चें ग्रहण असण्याची कांहीं गरज नाहीं व तें पद प्रकृत सूत्रांतून गाळतां येतें. जर 'नुम्' नें 'नुम्' चें किंवा नुम्स्थानिक अनुस्वाराचेंच ग्रहण होत असतें तर प्रकृत सूत्रांत नुम्ग्रहण आवश्यक ठरलें असतें. प्रकृत सूत्रावरील भाष्यांत देखील 'एवं तर्ह्ययोगवाहानामविशेषेणोपदेशश्चोदितस्तत्राऽनुस्वारे कृतेऽड्व्यवाये इत्येव सिद्धम् । यद्येवं नार्थो नुम्ग्रहणेन । अनुस्वारे कृतेऽड्व्यवाय इत्येव सिद्धम् ।' असेंच म्हटलें आहे व त्याचाच अनुवाद कौमुदींत केला आहे. 'अट्' प्रत्याहारानें अयोगवाहांचें ग्रहण होत असल्यामुळेंच,

'उरः केण' या स्थलीं रकार व नकार या दोहोंमध्यें विसर्गाचें किंवा 'कुप्वोः' सू. १४२ या सूत्रानें विसर्गाचे जागीं विकल्पेंकरून होणाऱ्या जिव्हामूलीयाचें जरी व्यवधान होतें तरी नकाराचें णत्व होतेंच. आतां येथें शंकाकार अशी शंका करतो कीं,) जर प्रकृत सूत्रांतून 'नुम्' हें पद वर सांगितलेल्या कारणामुळें गाळतां येऊं शकतें तर त्याच कारणामुळें 'नुम्विसर्जनीयशर्व्यवायेऽपि' सू. ४३४ या सूत्रांतून देखील 'नुम्' हें पद गाळावें लागेल; कारण त्या सूत्रांत देखील 'नुम्' हा लक्षणेनें अनुस्वाराचाच वाचक आहे. तो अनुस्वाराचा वाचक नाहीं असें मानल्यास ('नुम्' च्या पुढें सकार आला असतां, 'नश्चापदान्तस्य झलि' सू. १२३ या सूत्रानें 'नुम् = न्' चा अवश्य अनुस्वार होणारच व त्यामुळें 'नुम्' कायम राहून त्यापुढें सकार सांपडणें) हें असंभवनीय आहे. 'सर्पींषि' इत्यादि स्थलीं षत्वकार्य करतेवेळीं 'नुम्' ची उपलब्धि होत नाहीं; कारण (अनुस्वारकार्याच्या दृष्टीनें) षत्वकार्य असिद्ध ठरत असल्यामुळें, अनुस्वारकार्य पूर्वीच होतें. ('सर्पिस् + जस्' या स्थलीं 'जश्शसोः शिः' सू. ३१२ या सूत्रानें 'जस्' चे जागीं 'शि = इ' असा आदेश होतो व 'शि सर्वनामस्थानम्' सू. ३१३ या सूत्रान्वयें 'शि' ला सर्वनामस्थानसंज्ञा असल्यामुळें, 'नपुंसकस्य झलचः' सू. ३१४ या सूत्रानें 'सर्पिस्' याला नुमागम झाल्यावर 'सर्पिन् स् इ' अशी स्थिति झाली असतां, 'सान्तमहतः संयोगस्य' सू. ३१७ या सूत्रानें उपधा दीर्घ होऊन 'सर्पीन्स् इ' अशी स्थिति होते. अशा स्थितींत 'नश्चापदान्तस्य झलि' या त्रैपादिक पूर्व सूत्रानें नकाराचा प्रथम अनुस्वार होऊन 'सर्पींस् इ' अशी स्थिति झाल्यावरच 'नुम्विसर्जनीयशर्व्यवायेऽपि' या त्रैपादिक उत्तर सूत्रानें षत्वकार्याची प्राप्ति होतें. सारांश षत्वकार्य करतेवेळीं 'नुम्' उपलब्ध होत नसून अनुस्वारच उपलब्ध होतो; कारण षत्वकार्य करण्यापूर्वी वर सांगितल्याप्रमाणें अनुस्वारकार्याची प्रथम प्रवृत्ति होते आणि म्हणून त्या सूत्रांतील 'नुम्' या पदाचा

अनुस्वार असाच अर्थ करणें भाग आहे.) जरी 'सुहिन्सु' या उदाहरणांत 'नुम्' सांपडणें संभवतें हें खरें आहे तरी, त्या उदाहरणांतच अतिव्याप्तिरूप दोष येण्याचें म्हणजे षत्व होण्याचें, निवारण करण्याकरितां व इष्ट रूपांच्या सिद्धीकरितां त्या सूत्रांतील 'नुम्' या शब्दाचा 'नुम्स्थानिक अनुस्वार' असाच लक्षणेनें अर्थ करणें भाग आहे; कारण भाष्यकारादिकांनीं तसेंच व्याख्यान केलें आहे, व अनुस्वार हा 'शर्' ठरत असल्यामुळें, त्याचें व्यवधान असलें तरी षत्वकार्याची सिद्धि होते. ('स्यादेतत्' पासून 'षत्वस्य सिद्धत्वात्' येथपर्यंत शंकाग्रन्थ आहे. या शंकेवर उत्तर देतांना दीक्षित असें म्हणतात कीं,) ही शंका बरोबर नाहीं; त्या सूत्रांत 'विसर्जनीय' या पदाचें जें ग्रहण केलें आहे त्याचें वरील रीतीनें जरी प्रत्याख्यान करतां येऊं शकतें तरी, त्या सूत्रांतील 'नुम्' ग्रहण नियमार्थ आहे व त्या नियमाचें स्वरूप असें आहे कीं, जर अनुस्वाराचें व्यवधान असल्यास षत्वकार्य होऊं शकतें तर तो अनुस्वार 'नुम्' चें जागीं झालेला अनुस्वार असल्यासच होऊं शकतें. त्यामुळें 'पुंसु' इत्यादि स्थलीं षत्व होत नाहीं. ('सु' या उपसर्गपूर्वक 'हिसि हिंसायाम्' या धातूहून क्विप्प्रत्यय केला असतां व 'इदितो नुम् धातोः' सू. २२६२ या सूत्रानें धातूला नुमागम केला असतां, 'वेरपृक्तस्य' सू. ३७५ या सूत्रानें 'क्विप् = व' या प्रत्ययाचा लोप होऊन 'सुहिन्स्' असें कृदन्त प्रातिपदिक सिद्ध होतें. या प्रातिपदिकाहून 'सु' हा सप्तमीच्या बहुवचनाचा प्रत्यय केला असतां, 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्रानें 'सुहिन्स्' याला पद्संज्ञा होत असल्यामुळें, 'संयोगान्तस्य लोपः' सू. ५४ या सूत्रानें 'सुहिन्स्' या संयोगान्त पदांतील अन्त्य सकाराचा लोप होऊन 'सुहिन् सु= सुहिन्सु' असें रूप सिद्ध होतें. या रूपामध्यें 'सुहिन्' यांतील नकार, म्हणजेच 'इदितो नुम् धातोः' या सूत्रानें धातूला झालेला नुमागम, अपदान्त नसून पदान्तीं असल्यामुळें, 'नश्चापदान्तस्य झलि' सू. १२३ हें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व त्या नकाराचा=

'नुम्' चा अनुस्वार होऊं शकत नाहीं; आणि अशारीतीनें या उदाहरणांत सकार या झल्पूर्वी 'नुम् =न्' सांपडतो. या स्थलीं 'हि' यांतील 'इ' या इण्पुढें 'सु' प्रत्ययांतील सकार असून दोहों-मध्यें नुम्चें व्यवधान आहे व त्यामुळें 'नुम्विसर्जनीय' सू. ४३४ यां सूत्रानें 'सु'प्रत्ययांतील सकाराचें षत्व होण्याची व 'सुहिन्षु' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरितां त्या सूत्रांतील 'नुम्'चा 'अनुस्वार' असा लक्षणेनें अर्थ करणें भाग आहे. तसा अर्थ केल्यास, त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'शर्' प्रत्याहारानें अनुस्वार, विसर्ग इत्यादि अयोगवाहांचें ग्रहण होऊं शकत असल्यामुळें, त्या सूत्रांत केलेलें नुम्ग्रहण देखील व्यर्थ ठरतें असें शंकाकाराचें म्हणणें आहे. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं, त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'शर्'प्रत्याहारानें विसर्ग या अयोगवाहाचें ग्रहण होऊं शकत असल्यामुळें जरी त्या सूत्रांतून 'विसर्जनीय' हें पद गाळतां येऊं शकतें तरी, त्या सूत्रांतून 'नुम्' हें पद गाळतां येणें शक्य नाहीं; कारण त्या पदाचें ग्रहण नियमार्थ केलें आहे व तो नियम असा कीं, कोणत्याही अनुस्वाराचें व्यवधान असल्यास सकाराचें षत्व होत नसून नुम्स्थानिक अनुस्वाराचेंच व्यवधान असल्यास षत्व होऊं शकतें. जर त्या सूत्रांतील 'नुम्' नें कोणत्याहि प्रकारच्या अनुस्वाराचें ग्रहण करतां येऊं शकलें असतें तरच, या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'शर्' प्रत्याहारानें अनुस्वार या अयोगवाहाचें ग्रहण होत असल्याकारणानें त्या सूत्रांतून 'नुम्' हें पद गाळतां येऊं शकलें असतें. पण नुम्ग्रहण नियमार्थ केलें असल्यामुळें, तें पद त्या सूत्रांतून गाळतां येत नाहीं आणि त्या 'नुम्' ग्रहणानें वर जसा नियम सांगितला आहे तशा प्रकारचा नियम सिद्ध होत असल्यामुळें, 'पुंसु' इत्यादि स्थलीं प्रत्ययांतील सकाराचें षत्व होण्याची आपत्ति टळते. 'पुम्स्+सु' या स्थलीं 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्रानें 'पुम्स्' याला पदसंज्ञा होत असल्यामुळें, 'संयोगान्तस्य लोपः' सू. ५४ या सूत्रानें 'पुम्स्'

यांतील अन्त्य सकाराचा लोप होऊन 'पुम् सु' अशी स्थिति झाली असतां, 'मोऽनुस्वार:' सू. १२२ या सूत्रानें मकाराचे जागीं अनुस्वार होऊन 'पुंसु' असें सप्तमीच्या बहुवचनाचें रूप सिद्ध होतें. या स्थलीं 'पु' यांतील उकार हा 'इण्' व 'सु' प्रत्ययांतील सकार या दोहोंमध्यें जरी अनुस्वाराचें व्यवधान आहे तरी, तो अनुस्वार 'नुम्' चे जागीं झाला नसून मकाराचे जागीं झालेला असल्यामुळें, नुम्ग्रहणानें जो नियम वर सांगितल्याप्रमाणें सिद्ध होतो त्या नियमान्वयें, प्रत्ययांतील सकाराचें षत्व होत नाहीं. सारांश 'सुहिन्सु, पुम्सु' इत्यादि उदाहरणांत प्रत्ययांतील सकाराचें षत्व होणें इष्ट नसल्यामुळें, वरील सूत्रांतील 'नुम्' या पदाचा 'नुम्स्थानिक अनुस्वार' असाच लक्षणेनें संकुचित अर्थ करणें भाग आहे, व तसा त्या पदाचा संकुचित अर्थ करावा लागत असल्यामुळें, वरील सूत्रांतून 'नुम्' हें पद गाळतां येऊं शकत नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'हयवरट्' या शिवसूत्रावरील भाष्यांत भाष्यकार असें म्हणतात कीं, अयोगवाहांचा 'शर्' प्रत्याहारांत पाठ केल्यास, 'नुम्विसर्जनीय' या सूत्रांत 'विसर्जनीय' हें पद घालण्याची जरूर राहत नाहीं. पण त्या सूत्रांतून 'नुम्' हें पद मात्र गाळतां येऊं शकत नाहीं; कारण तें पद अनुस्वाराचें विशेषण आहे असें मानलें पाहिजे. तसें मानलें असतां 'नुम्' चे जागीं झालेला जो अनुस्वार त्याचेंच व्यवधान असतांना षत्व होईल व 'पुंसु' इत्यादि उदाहरणांत इतर प्रकारच्या अनुस्वाराचें व्यवधान असल्यामुळें षत्व होणार नाहीं. त्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात—'नुम्विसर्जनीयशर्व्यवायेऽपि इति विसर्जनीय-ग्रहणं न न कर्तव्यं भवति । नुमश्चापि तर्हि ग्रहणं शक्यमकर्तुम् । कथं सर्पींषि धनूंषि । अनुस्वारे कृते शर्व्यवाय इत्येवं सिद्धम् । अवश्यं नुमो ग्रहणं कर्तव्यम् । अनुस्वारविशेषणं नुम्ग्रहणं, नुमो योऽनुस्वा-रस्तत्र यथा स्यादिह मा भूत् । पुंस्विति।' या भाष्याचाच अनुवाद मनोरमेंत केला आहे.)

शब्दरत्न— निर्देशाच्चेति । नुम्ग्रहणाच्चेत्यपि बोद्धचम् । नियमार्थं इति । स च साजात्यादाक्षरसमाम्नायिकविषयकः । अतो नृणामित्यादावृत्तराज्भागेन व्यवधानेऽपि णत्वसिद्धचा "ऋवर्णान्नस्य" इति वचनं न कार्यमिति भावः । इदं प्रत्याहाराह्निके प्रकृतसूत्रे च भाष्ये स्पष्टम् । यद्यपि "रषाभ्याम्" इति पञ्चम्योपस्थितनिर्दिष्टपदस्य "व्यवाये" इत्यनेनाविरोधायाडाद्यतिरिक्ताव्यवहितपरतयाऽऽदर्शनेत्यादौ णत्वं सुशकवारणम् । ध्वनितं चेदं प्रकृतसूत्रे वार्तिककृता, तथाऽपि तत्रनृणामित्यर्थं वचनारम्भे गौरवमितीदमेवादृतं मूलकृता । स्वाभाविकस्येति । तद्भिन्नस्थानिकस्य पाणिन्युच्चारितस्येत्यर्थः । तृंहू इत्यादेरपि "नकारजावनुस्वार" इति वृद्धोक्तेर्नस्थानिकत्वात्, अत एव तृंहू इत्यस्य नलोपे तृढ इत्यस्य सिद्धिः । इवि प्रीणने इति । हिविदिवीतिदण्डकपठितस्येदं निष्कृष्य ग्रहणम् । प्रेन्वनमित्यादौ नुमो नस्य क्षुभ्नादित्वाण्णत्वाभावः । इति दिगिति । तद्वदत्र तु न वक्तुं शक्यं तृंहू इत्यस्य तृंहणमित्यसिद्धेः स्पष्टं चेदं भाष्ये ।

(प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या वर्णांपैकीं एक वर्णाचें व्यवधान असलें तरच णत्व होऊं शकतें असें नसून तशा अनेक वर्णांचें व्यवधान असलें तरी देखील णत्व होऊं शकतें हें सिद्ध करण्याकरितां दीक्षितांनीं मनोरमेंत 'क्षुभ्नादिषु क्षुभ्नशब्दपाठसामर्थ्यात्, सरूपाणामित्यादि निर्देशाच्च' हीं जीं दोन कारणें दिलीं आहेत त्यांखेरीज) 'नुम्ग्रहणाच्च,' म्हणजे प्रकृत सूत्रांत जें 'नुम्' चें ग्रहण केलें आहे तें, हा देखील एक अधिक हेतु देतां येतो हें जाणावें. ('नुम्' हा मित् आगम असल्यामुळें व 'मिदचोऽन्त्यात्परः' सू. ३७ या सूत्रान्वयें ज्याला तो मित् आगम होणें सांगितलें आहे त्या शब्दाच्या अन्त्य अचापुढें होत असल्यामुळें, जेथें 'नुम्' चें व्यवधान होतें तेथें ज्या अन्त्य अचाला तो आगम होतो त्या अचाचें व्यवधान असलेंच पाहिजे हें उघड होतें. त्यामुळें प्रकृत सूत्रांतील नुम्ग्रहणानेंच हें स्पष्ट होतें कीं, 'एकैकमात्रव्यवायेऽपि' एवढाच प्रकृत सूत्राचा अर्थ होत नसून 'अनेकव्यवायेऽपि' असा देखील अर्थ होतो. म्हणून प्रकृत

सूत्रांतील 'नुम्' ग्रहणानेंच हा इष्ट अर्थ सिद्ध होत असल्यामुळें त्या अर्थाच्या सिद्धीकरितां पाणिनीय निर्देशांची मदत घेण्याची कांहीं गरज नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा गूढ आशय आहे.) 'अट्कुप्वाङ्नुम्' हा भाग नियमार्थं मानावा असें मनोरमेंत म्हटलें आहे. नियम हा नेहमी सजातीयांच्याच विषयांत होणारा असल्यामुळें 'अट्कुप्वाङ्नुम्' हा नियम अक्षरसमाम्नायांत निर्दिष्ट असलेल्या वर्णांच्याच विषयांत लागू पडतो. त्यामुळें 'नृणाम्' इत्यादि स्थलीं ऋवर्णाच्या उत्तर अज्भागाचें व्यवधान असून देखील णत्व होतें आणि म्हणून 'ऋवर्णान्नस्य णत्वं वाच्यम्' हें वार्तिक असण्याची कांहीं गरज नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. प्रत्याहाराह्निकांत, म्हणजे 'एओङ् ऐऔच्' या शिव-सूत्रांवरील भाष्यांत, व तसेंच प्रकृत सूत्रावरील भाष्यांत, म्हणजे 'रषाभ्यां नो णः' ८–४–१ या सूत्रावरील भाष्यांत, हें स्पष्ट केलें आहे. (ऋवर्णाचे तीन अवयव कल्पिले आहेत. प्रथम व तृतीय अवयव अज्भाग असून त्या दोहोंच्या मध्यें असणारा द्वितीय अवयव रेफ–रकार–आहे. त्यामुळें 'नृणाम्' या उदाहरणांत जो ऋकार आहे त्याचे वरप्रमाणें तीन भाग कल्पिल्यास, द्वितीय भाग जो रकार त्यांत व नकारांत अज्भागरूप तृतीय अवयवाचें व्यवधान होतें. 'रषाभ्यां नो णः' या सूत्रान्वयें रकाराच्या किंवा षकाराच्या लगेंच पुढें नकार आल्यास त्याचें णत्व होतें. पण 'नृणाम्' या स्थलीं रकार व नकार या दोहोंत वर सांगितल्याप्रमाणें अज्भागाचें व्यवधान असल्यामुळें, त्या सूत्रान्वयें णत्व होऊं शकत नाहीं. ज्या अज्भागाचें वरील उदाहरणांत व्यवधान आहे तो अज्भाग आक्षरसमाम्नायिक, म्हणजे माहेश्वर सूत्रांत जे वर्ण पठित केले आहेत त्यांपैकीं कोणताहि, वर्ण नसून पूर्ण ऋवर्ण हा आक्षरसमाम्नायिक वर्ण असल्यामुळें, प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अट्' प्रत्याहारानें त्या अज्भागाचें ग्रहण होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'अट्कुप्वाङ्नुम्व्यवायेऽपि' हें यथापठित

प्रकृत सूत्र देखील या स्थलीं लागू पडत नाहीं. म्हणून भाष्यकारांनीं प्रकृत सूत्राचा 'व्यवायेऽपि' असा एक भाग करून तो विधायक मानला आहे व 'अट्कुप्वाङ्नुम्' हा अवशिष्ट सूत्रभाग नियमार्थ मानला आहे. 'व्यवायेऽपि' या योगविभागानें पृथक् केलेल्या सूत्राचा 'व्यवायेऽपि णत्वं भवति' असा अर्थ होत असल्यामुळें, त्या अर्थान्वयें 'नृणाम्' या स्थलीं अज्भागाचें व्यवधान असून देखील णत्व होतें. 'अट्कुप्वाङ्नुम्' हा जो अवशिष्ट भाग नियामक मानला आहे त्याचा अर्थ करतेवेळीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, नियम हा नेहमी सजातीयांच्याच विषयांत होत असल्यामुळें व या सूत्रांत —भागांत— आक्षरसमाम्नायिक वर्णांचा निर्देश असल्यामुळें, तो नियम आक्षरसमाम्नायिक वर्णांनाच लागू पडतो व त्यामुळें त्या नियामक भागाचा असा अर्थ होतो कीं, जर आक्षरसमाम्नायिक वर्णांचें व्यवधान असून णत्व होणें असेल तर तें व्यवधान 'अट्, कु, पु'. या आक्षरसमाम्नायिक वर्णांचेंच व्यवधान असलें पाहिजे. या अर्थान्वयें 'नृणाम्' या उदाहरणांत नकाराचें णत्व होण्यांत कांही बाध येत नाहीं; कारण येथें रकार व नकार या दोहोंत वर सांगितल्याप्रमाणें आक्षरसमाम्नायिक वर्णाचें व्यवधान नसून ज्या अज्भागाचें व्यवधान आहे तो आक्षरसमाम्नायिक वर्ण नाहीं. म्हणून 'व्यवायेऽपि' या योगविभागानें पृथक् केलेल्या सूत्रानेंच 'नृणाम्' या स्थलीं णत्व होऊं शकतें, व आक्षरसमाम्नायिक वर्णाचें व्यवधान या स्थलीं नसल्यामुळें, नियमार्थ सूत्र —भाग— णत्व होण्याच्या आड येत नाहीं. सारांश अशा रीतीनें ऋकारापुढें येणाऱ्या नकाराचें णत्व 'व्यवायेऽपि' या भागानेंच होऊं शकत असल्यामुळें, 'ऋवर्णान्नस्य णत्वं वाच्यम्' हें वार्तिक पठित करण्याची कांहीं गरज राहत नाहीं. 'एओङ्' या शिवसूत्रावरील भाष्यांत भाष्यकार असें म्हणतात कीं, 'वर्णैकदेशा वर्णग्रहणेन न गृह्यन्ते,' म्हणजे वर्णांचे अवयव स्वतंत्र वर्णासारखे समजूं नये, असें मानल्यास, 'नुट्' आगम सांगणाऱ्या सूत्रांत, लकारादेश सांगणाऱ्या सूत्रांत, आणि विनाम — णत्व—

सांगणाऱ्या सूत्रांत ऋकाराचें ग्रहण करावें लागेल. णत्वाच्या सबंधानें व्याख्यान करितांना भाष्यकार म्हणतात –' विनामे ऋकारग्रहणं कर्तव्यम् । रषाभ्यां नो णः समानपदे, ऋकाराच्चेति वक्तव्यम् । इहापि यथा स्यात् । मातृणाम्, पितृणाम् इति । यस्य पुनर्गृह्यन्ते रषाभ्यामित्येव तस्य सिद्धम् । न सिध्यति । यत्तद्रेफात्परं भक्तेस्तेन व्यवहितत्वान्न प्राप्नोति । मा भूदेवम् । अड्व्यवाये इत्येव सिद्धम् । न सिध्यति । वर्णैकदेशाः के वर्णग्रहणेन गृह्यन्ते ? । ये व्यपवृक्ता अपि वर्णा भवन्ति । यच्चापि रेफात्परं भक्तेर्न तत्क्वचिदपि व्यपवृक्तं दृश्यते । एवं तर्हि योगविभागः करिष्यते । रषाभ्यां नो णः समानपदे । ततो व्यवाये । व्यवाये च रषाभ्यां नो णो भवतीति । ततोऽट्कुप्वाङ्नुम्भिरिति । इदमिदानीं किमर्थम् ? । नियमार्थम् । एतैरेवाक्षरसमाम्नायिकैर्व्यवाये नान्यैरिति ।।' 'रषाभ्यां नो णः' या सूत्रावरील भाष्य देखील वरील भाष्यासारखेंच आहे व या दोन्ही भाष्यांचा आशय वरील विवरणांत दिलाच आहे. या दोन्ही भाष्यांवरून हें स्पष्ट होतें कीं, रषाभ्यां नो णः ' या सूत्रांत ऋकारग्रहण करण्याची, म्हणजेच 'ऋवर्णान्नस्य णत्वं वाच्यम्' हें वार्तिक पठित करण्याची, कांहीं आवश्यकता नाहीं.) 'रषाभ्यां नो णः' या सूत्रांत 'रषाभ्याम्' हा पञ्चमीनिर्देश असल्यामुळें (व त्यामुळें 'तस्मादित्युत्तरस्य' सू. ४१ या परिभाषान्वयें रकाराच्या किंवा षकाराच्या लगेंच पुढें असणाऱ्या नकाराचें णत्व होतें असा त्या सूत्राचा अर्थ होत असल्यामुळें) प्रकृत सूत्रांत 'व्यवायेऽपि' हें जें पद आहे त्याशीं विरोध न यावा याकरितां (असेंच प्रकृत सूत्राचें व्याख्यान केलें पाहिजे कीं, 'अट्' इत्यादि प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेले वर्ण खेरीज करून इतर आक्षरसमाम्नायिक वर्णांचे व्यवधान असल्यास नकाराचें णत्व होत नाहीं, आणि असा अर्थ केल्यानें 'आदर्शेन' इत्यादि स्थलीं प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या) वर्णांखेरीज इतर (आक्षरसमाम्नायिक) वर्णाचें–शकाराचें–व्यवधान असल्यामुळें, 'आदर्शेन' इत्यादि उदाहरणांत

णत्व होण्याची आपत्ति सहज टाळतां येऊं शकते. ('अट्कुप्वाङ्नुम्भि' हें नियामक सूत्र मानल्यानें, त्या सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या वर्णांखेरीज जेथें इतर आक्षरसमाम्नायिक वर्णांचें व्यवधान आहे तेथें णत्व होऊं शकत नाहीं असा त्या सूत्राचा अर्थ होत असल्यामुळें आणि 'आदर्शेन' या स्थलीं प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या वर्णांहून भिन्न अशा आक्षरसमाम्नायिक शकाराचें व्यवधान असल्यामुळें, या उदाहरणांत णत्व होण्याची आपत्ति आपोआपच टळू शकते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) प्रकृत सूत्रावर वार्तिककाराने जीं वार्तिकें पठित केलीं आहेत त्यांत हें ध्वनित केलें आहे. तरी पण 'नृणाम्' या उदाहरणांत णत्व होण्याकरितां जें वचन म्हणजे 'ऋवर्णान्नस्य णत्वम्' हें वार्तिक, पठित केलें आहे तसें वचन पठित करण्यांत गौरव आहे हा आशय मनांत धरून दीक्षितांनीं प्रकृत सूत्राचा योगविभाग करणें व उत्तर भाग नियमार्थ मानणें हाच पक्ष स्वीकारला आहे. (प्रकृत सूत्रावर 'अड्व्यवाये णत्वेऽन्यव्यवाये प्रतिषेधः' असें वार्तिक प्रथम पठित करून नंतर वार्तिककारांनें 'न वाऽन्येन व्यपेतत्वात्' असें दुसरें उलट अर्थाचें वार्तिक पठित केलें आहे. या दुसऱ्या वार्तिकाचा अर्थ असा आहे कीं, प्रथम वार्तिक पठित करण्याचीं कांहीं गरज़ नाहीं; कारण प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या अडादि वर्णांनींच इतर वर्णांची निवृत्ति होते व त्यामुळें इतर वर्णांचें व्यवधान असल्यास णत्व होऊंच शकत नाहीं. अशा रीतीनें इतर वर्णांचें व्यवधान असतांना णत्वाची प्राप्ति होत नसून देखील जो योगविभाग केला आहे त्याचा मूळ हेतु हा कीं, 'नृणाम्' इत्यादि स्थलीं णत्व व्हावें. योगविभाग केल्याशिवाय त्या उदाहरणांत णत्व होऊं शकत नसल्यामुळें व त्या स्थलीं णत्व होण्याकरितां स्वतंत्र वार्तिक पठित करण्यांत गौरव असून तो हेतु साधण्याकरिता पाणिनीय सूत्राचा योगविभाग करण्यांत लाघव असल्यामुळें, दीक्षितांनीं 'ऋवर्णान्नस्य णत्वं वाच्यम्' हें वार्तिक न स्वीकारतां योगविभागपक्ष अधिक

उचित मानून स्वीकारला आहे असें शब्दरत्नकारांचें म्हणणें आहे.) 'स्वाभाविकस्य चानुस्वारमात्रस्योपलक्षणम्' या मनोरमेच्या पंक्तींतील 'स्वाभाविकस्य' या पदाचा 'तद्भिन्नस्थानिकस्य पाणिन्युच्चारितस्य,' म्हणजे 'नुम्भिन्न इतर कोणत्याहि स्थानीचे जागीं झालेला व पाणिनीनें उच्चारलेला अनुस्वार,' असा अर्थ आहे. 'तृंहू' इत्यादि स्थलीं देखील, 'नकारजावनुस्वारपञ्चमौ झलि धातुषु' या वृद्धोक्तीप्रमाणें, नकाराचे जागीं झालेला अनुस्वार आहे आणि त्यामुळेंच ('अनिदितां हल उपधायाः' सू. ४१५ या सूत्रानें तृंह् क्त' या स्थलीं 'क्त' हा कित्प्रत्यय पुढें असल्यामुळें 'तृन्ह्' याच्या उपधेंतील) नकाराचा लोप होऊन 'तृढ' असें इष्टरूप सिद्ध होतें. ('तृंह्' या स्थलीं जो अनुस्वार आहे तो देखील स्वाभाविक अनुस्वार नसून 'नश्चापदान्तस्य झलि' सू. १२३ या सूत्रानें नकाराचे जागीं झालेला अनुस्वार आहे; पण तो नुम्स्थानिक अनुस्वार नाहीं व पाणिनीनें धातुपाठांत अनुस्वाररूपानें उच्चारला आहे. तो जर स्वाभाविक अनुस्वार असता तर त्याचा लोप होऊं शकला नसता व 'तृंढ' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती. परंतु तो अनुस्वार वर सांगितल्याप्रमाणें 'नश्चापदान्तस्य झलि' या त्रैपदिक सूत्रानें नकाराचे जागीं झाला असल्यामुळें व 'अनिदितां हल उपधायाः' या सापादिक सूत्राच्या दृष्टीनें तो अनुस्वार असिद्ध ठरत असल्यामुळें, म्हणजें अनुस्वार झाला नसून नकारच विद्यमान आहे असें मानावें लागत असल्यामुळें, नकाराचा लोप होऊन 'तृढ' असें इष्ट रूप सिद्ध होतें.) 'इवि प्रीणने' असा जो मनोरमेंत पाठ दिला आहे तो 'इवि हिवि दिवि धिवि जिवि प्रीणनार्थाः' या दण्डक पाठांतून 'इवि' धातु वेगळा काढून दिला आहे. (माधवादिकांनीं तसा दण्डक पाठ स्वीकारला आहे. परंतु धातुपाठांत 'इवि व्याप्तौ, हिवि दिवि धिवि जिवि प्रीणनार्थाः' असा पाठ आढळतो. दीक्षितांनीं प्रकृत स्थलीं माधवानें दिलेला पाठ स्वीकारून व त्यांतून 'इवि' वेंगळा काढून 'इवि प्रीणने' असा धातु मनोरमेंत पठित केला आहे

असें शब्दरत्नकारांचें म्हणणें आहे.) 'प्रेन्वनम्' इत्यादि स्थलीं नुम्‌च्या नकाराचें जें णत्व झालें नाहीं त्याचें कारण हें कीं; 'प्रेन्वनम्' इत्यादि शब्द गणपाठांत क्षुभ्नादिगणांत पठित आहेत. (वास्तविक 'प्रेन्वन' हा शब्द क्षुभ्नादिगणांत पठित केलेला आढळत नाहीं; पण क्षुभ्नादिगण हा आकृतिगण असल्यामुळें व 'प्रेन्वन' इत्यादि स्थलीं णत्व झालें नसल्यामुळें, तशा शब्दांचा पाठ क्षुभ्नादिगणांत मानला असावा असें दिसतें.) 'इति दिक्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं 'ज्याप्रमाणें 'नुम् विसर्जनीयशर्व्यवायेऽपि' सू. ४३४ या सूत्रांतील 'नुम्'चा नुम्‌स्थानिक अनुस्वार असा अर्थ केला आहे. तसा प्रकृत सूत्रांतील 'नुम्' चा अर्थ करणें शक्य नाहीं; कारण तसा अर्थ केल्यास, 'तृंहू' या धातूंत नकाराचे जागीं झालेला अनुस्वार असून नुम्‌चे जागीं झालेला अनुस्वार नसल्यामुळें) 'तृंह्' धातूचा 'तृंहणम्' या रूपांत णत्वाची सिद्धि न होण्याची आपत्ति येते आणि हें (प्रकृत सूत्रावरील) भाष्यांत स्पष्ट केलें आहे. ('तृंहणम्' या स्थलीं ऋकार व नकार या दोन वर्णांमध्यें नुम्‌स्थानिक अनुस्वाराचें व्यवधान नसून नकारस्थानिक अनुस्वाराचें व्यवधान आहे. म्हणून प्रकृत सूत्रांतील 'नुम्' चा नुम्‌स्थानिक अनुस्वार असा संकुचित अर्थ केल्यास, 'तृंहणम्' या स्थलीं णत्व न होतां 'तृंहनम्' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येतें. ही आपत्ति टाळण्याकरितां 'काकेभ्यो दधि रक्ष्यताम्' या वाक्यांतील 'काकेभ्यः' या पदाचा जसा लक्षणेनें 'दध्युपघातक पशुपक्षी' असा सामान्य अर्थ केला जातो तसाच प्रकृत सूत्रांतील 'नुम्' चा 'अनुस्वार' असा सामान्य अर्थ करणेंच योग्य आहे, मग तो अनुस्वार स्वाभाविक असो किंवा नुम्‌स्थानिक असो किंवा इतर वर्णाचे जागीं झालेला असो. प्रकृत सूत्रांतील 'नुम्' चा कोणत्याहि प्रकारचा अनुस्वार असा अर्थ होत असल्यामुळें व प्रकृत सूत्रांत निर्दिष्ट असलेल्या 'अट्' या प्रत्याहारानें अनुस्वार या अयोगवाहाचें ग्रहण होऊं शकत असल्यामुळें, भाष्यकारांनीं 'नुम्'

ग्रहणाचें प्रत्याख्यान केलें आहे. हें भाष्य पूर्वी मनोरमेंत दिलेंच आहे.)

मनोरमा—"यस्मात्प्रत्ययविधिः"। अत्र प्राचोक्तम्—यस्माद्धातोः प्रातिपदिकाद्वेति । तन्न । तिङन्तादीनामपि तरबादिकं प्रत्यङ्गत्वात् । सङ्कोचस्य निर्मूलत्वात् । आमुष्यायण इत्यादौ वृद्ध्यभावापत्तेश्च । न हि प्रातिपदिकादयं तद्धितः किं तु सुबन्तादिति दिक् ।

'यस्मात्प्रत्ययविधिस्तदादि प्रत्ययेऽङ्गम्' सू. १९९ या सूत्रांतील 'यस्मात्' या पदाचा प्रसादकारांनीं 'यस्माद्धातोः प्रातिपदिकाद्वा असा जो अर्थ केला आहे तो बरोबर नाहीं; कारण तिङन्त इत्यादि देखील 'तरप्' इत्यादि प्रत्ययांची अङ्गें होतात आणि म्हणून त्या पदाचा तसा संकुचित अर्थ करण्यास कांहींच प्रमाण नाहीं. 'यस्मात्' या पदाचा तसा संकुचित अर्थ केल्यास 'आमुष्यायणः' इत्यादि स्थलीं वृद्धि न होण्याची आपत्ति येते. 'आमुष्यायणः' या उदाहरणांत जो तद्धित प्रत्यय झाला आहे तो प्रातिपदिकाहून झाला नसून सुबन्ताहून झाला आहे. (प्रक्रियाकौमुदीकारांनीं प्रकृत सूत्राचा 'प्रत्ययो यस्मात् क्रियते तदादि-शब्दः प्रत्यये परेऽङ्गसंज्ञः स्यात्' असाच दीक्षितांसारखा अर्थ केला आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं, त्यांनीं प्रकृत सूत्रातील 'यस्मात्' या पदाचा 'यस्मात् शब्दात्' असा सामान्य अर्थच केला आहे. परंतु प्रसादकारांनीं आपल्या टीकेंत 'यस्मात्' या पदाचा 'यस्माद्धातोः प्रत्ययाद्वा' असा संकुचित अर्थ केला आहे. 'ङ्याप् प्रातिपदिकात्' व 'धातोः' हीं अधिकारसूत्रें असल्यामुळें त्यांनीं असें गृहीत घेतलेलें दिसतें कीं, धातु व प्रातिपदिक यांहूनच प्रत्ययोत्पत्ति होते. पण तसें वास्तविक नसून क्वचित् स्थलीं तिङन्ताहून व सुबन्ताहून देखील प्रत्ययोत्पत्ति होते. उदाहरणार्थ 'तिङः' सू. २००२ या सूत्रानें 'अतिशायने' या अर्थींत तिङन्ताहून 'तमप्' प्रत्यय होणें सांगितलें आहे. तसेच 'किमेतत्तिङ्' सू. २००४ या सूत्रानें तिङन्ताहून

'तरप् तमप्' प्रत्यय होणें व त्या प्रत्ययांना 'आम्' होणें सांगितलें आहे. 'सुबन्तात्तद्धितोत्पत्तिः' हें वचन व्याकरणशास्त्रांत प्रसिद्धच आहे. म्हणून प्रसादकारांनीं 'यस्मात्' याचा जसा संकुचित अर्थ केला आहे तसा अर्थ केल्यास, अङ्गसंज्ञेच्या निमित्ता-मुंळें होणारीं कार्यें होऊं शकणार नाहींत. 'अमुष्य' हा सुबन्त-षष्ठयन्त-शब्द नडादिगणांत पठित आहे व 'नडादिभ्यः फक्' सू. ११०१ या सूत्रानें 'अमुष्य' या शब्दाहून 'गोत्रापत्य' या अर्थामध्यें 'फक्' प्रत्यय केल्यास तो प्रत्यय कित् असल्यामुळें, 'किति च' सू. १०७६ या अङ्गाधिकारांत पठित असलेल्या व त्यांत 'अङ्गस्य' या पदाची अनुवृत्ति होणाऱ्या सूत्रानें अङ्गाच्या आद्य अचाला वृद्धि पावते. 'अमुष्य' हें प्रातिपदिक नसून सुबन्त असल्यामुळें त्याला अङ्गसंज्ञा न झाल्यास, त्याच्या आद्य अचाची वृद्धि होणार नाहीं व 'आमुष्ययणः' हें इष्ट रूप सिद्ध होणार नाहीं. म्हणून 'यस्मात्' या पदाचा 'धातोः प्रातिपदिकाद्वा' असा संकुचित अर्थ न करितां 'शब्दस्वरूपात्' असा सामान्य अर्थच करणें योग्य आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

शब्दरत्न – अङ्गत्वादिति । तदनङ्गीकारे ह्यपाचितरामित्यादौ चिणो लुगापादनादिपरभाष्यविरोधः । चिणः परस्याङ्गसंज्ञानिमि-त्तस्य प्रत्ययस्य लुगित्यर्थात् । दिगिति । दिगर्थस्तु याथाकथाच-मित्यादौ "यथाकथाचहस्ताभ्यां णयतौ" इत्यनेन वचनसामर्थ्येन निपातसमुदायात्प्रत्ययेऽङ्गत्वानापत्तौ वृद्ध्यचनापत्तेरित्यलम् ।

'तिङन्तादीनामपि तरबादिकं प्रत्यङ्गत्वात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे तें बरोबर न मानल्यास, 'अपाचितराम्' इत्यादि स्थलीं 'चिणो लुक्' सू. २३२९ ६·४·१०४ या सूत्रानें प्रत्ययाचा लुक् होण्याची त्या ज्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं आपत्ति दिली आहे त्या भाष्याशीं विरोध येईल; कारण 'चिणो लुक्' या सूत्राचा असा अर्थ आहे कीं, 'चिण्' च्या पुढें असणारा जो प्रत्यय अङ्गसंज्ञा

होण्यास कारणीभूत होतो त्या प्रत्ययाचा लुक् होतो. (‘अ पच् चिण् त तराम् = अपाचि त तराम्’ या उदाहरणांत ‘त’ या प्रत्ययाच्या निमित्तामुळें ‘अपाचि’ याला अङ्गसंज्ञा होते व तो प्रत्यय ‘चिण्’ च्या पुढें असल्यामुळें त्याचा ‘चिणो लुक्’ या सूत्रानें लुक् होऊन ‘अपाचितराम्’ असें रूप होतें. ‘अपाचितराम्’ या स्थलीं ‘अपाचि’ या तिङन्तापुढें ‘तराम्’ हा ‘त’ नें सुरु होणारा प्रत्यय आला असल्यामुळें व तो प्रत्यय देखील, ‘त’ चा लुक् झाल्याकारणानें, चिण्च्या लगेंच पुढें येत असल्यामुळें, त्या प्रत्ययांतील ‘त’ चा देखील ‘चिणो लुक्’ या सूत्रानें लुक् कां होऊं नये अशी त्या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं शंका केली आहे व त्या शंकेचें अशा रीतीनें निवारण केलें आहे कीं, ‘त’ प्रत्ययाचा जो पूर्वीं लुक् झाला आहे तो ‘असिद्धवदत्राभावात्’ सू. २१८३ या सूत्रानें, ‘तराम्’ यांतील ‘त’ चा लोप करतेवेळीं असिद्ध ठरत असल्यामुळें आणि अशारीतीनें ‘चिण्’ व ‘तराम्’ या दोहों मध्यें ‘त’ प्रत्यय विद्यमान आहे असें मानावें लागत असल्यामुळें, ‘तराम्’ यांतील ‘त’ चा लुक् होऊं शकत नाहीं. या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं भाष्यकारांनी तिङन्त शब्दस्वरूप अङ्ग मानलें आहे. म्हणून प्रसादकारांनीं प्रकृत सूत्रांतील ‘यस्मात्’ या शब्दाचा जसा संकुचित अर्थ केला आहे तो बरोबर मानल्यास, वरील भाष्याशीं विरोध येतो.) ‘इति दिक्’ असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्यांतील ‘दिक्’ या शब्दाचा भावार्थ हा आहे कीं, ‘याथाकथाचम्’ इत्यादि स्थलीं ‘यथाकथाच’ या तीन निपातांच्या समुदायाहून ‘यथाकथाचहस्ताभ्यां णयतौ’ सू. १७६२ या सूत्राच्या सामर्थ्यानें ‘ण’ प्रत्यय केला असतां, वृद्धि न होण्याची आपत्ति येते. (‘यथाकथाच’ या तीन निपातांच्या समुदायांतील प्रत्येक निपात अर्थवान् आहे व अशा रीतीनें जरी हा समुदाय अर्थवान् आहे तरी तो समासरूप समुदाय नसल्यामुळें, ‘कृत्तद्धितसमासाश्च’ सू. १७९ या सूत्रांतील ‘समासग्रहणकृत नियमान्वयें त्याला प्राति-

पदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं. म्हणून प्रकृत सूत्रांतील 'यस्मात्' या पदाचा प्रसादकारांनीं 'धातोः प्रातिपदिकाद्वा' असा जो अर्थ केला आहे तो बरोबर मानल्यास, 'तद्धितेष्वचामादेः' सू. १०७५ या अङ्गाधिकारांत पठित असलेल्या सूत्रानें अङ्गाच्या आद्य अचाला होणारी वृद्धि होणार नाहीं व 'याथाकथाचम्' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकणार नाहीं.) या विषयासंबंधानें एवढें पुरें.

मनोरमा– "अतो भिस ऐस" ।। नन्वेस् इत्येवास्तु । न च "अतो गुणे" इति पररूपापत्तिः । एकारोच्चारणवैयर्थ्यापत्तेः । अन्यथा इसमेव विदध्यादिति चेत्सत्यम्–एदैतोर्द्विमात्रत्वाविशेषेण गौरवाभावादैस् कृतः । एवं च पररूपशङ्केव नास्तीति महल्लाघवम् । यत्त्वाहुः–ऐस्करणं निर्जरसैरित्यैकारश्रवणार्थमिति । तद्भाष्य-विरुद्धम् । सन्निपातपरिभाषया जरसादेशाप्रवृत्तेर्निर्जरैरित्येव भाष्ये सिद्धान्तितत्वात् ।

('अतो भिस ऐस्' सू. २०३ या सूत्रासंबंधानें शंकाकार अशी शंका करतो कीं, या सूत्रांत 'ऐस्' चें जागीं) 'एस्' असें पठित केलें असतें तरी देखील चाललें असतें. 'एस्' असें पठित केलें असतें तर 'अतो गुणे' सू. १९१ या सूत्रानें गुणरूप एकादेश होण्याची आपत्ति आली असती हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण गुणरूप एकादेश केल्यानें 'एस्' यांतील एकाराचें उच्चारण व्यर्थ ठरण्याची आपत्ति आली असती. गुणरूप एकादेश होणें इष्ट असतें तर प्रकृत सूत्रांत 'इस्' असाच आदेश होण्याचें विधान केलें असतें (व 'इस्' असा आदेश पठित केला असता तरी 'आद्गुणः' सू. ६९ या सूत्रानें गुणरूप एकादेश होऊं शकलाच असता. सारांश शंकाकार असें म्हणतो कीं, प्रकृत सूत्रांत 'ऐस्' चे ऐवजीं 'एस्' असा आदेश पठित केला असता तरी त्या आदेशांतील एकारग्रहणाच्या सामर्थ्यानें 'अतो गुणे' या सूत्राचा बाध होऊन 'वृद्धिरेचि' सू. ७२ या सूत्रानें वृद्धिरूप एकादेश होऊं शकलाच असता व 'राम

भिस् = राम एस् = रामैः' असें इष्ट रूप सिद्ध होऊं शकलेंच असतें. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं,) वरील शंका योग्य आहे. पण 'ए' व 'ऐ' हे दोन्ही वर्ण सारखेच द्विमात्रिक असल्या-मुळें, 'एस्' च्या ऐवजीं 'ऐस्' पठित करण्यांत गौरवदोष येत नाहीं, म्हणजे मात्राधिक्य होत नाहीं, आणि म्हणून 'ऐस्' असाच आदेश पठित केला आहे. तसा आदेश पठित केल्यानें पररूप एकादेश होण्याची शंकाच उद्भवूं शकत नाहीं आणि अशा रीतीनें 'ऐस्' असा आदेश पठित करण्यांत मोठें लाघव आहे. प्रकाशकारांचें असें म्हणणें आहे कीं, प्रकृत सूत्रांत 'ऐस्' असा आदेश पठित करण्याचें कारण हें आहे कीं, 'निर्जरसैः' या रूपांत ऐकाराचें श्रवण व्हावें. (प्रकृत सूत्रावरील काशिकेंत देखील असेंच म्हटलें आहे व प्रकाश-कारांनीं काशिकेचा अनुवाद केला आहे असें दिसतें. काशिकाकार म्हणतात—'अतिजरसैः । जरामतिक्रान्तैरिति विगृह्य समासे कृते न्हस्वत्वे च भिस ऐसादेशो भवति । एकदेशविकृतमनन्यवद्भवति । जरशब्दस्य जरसादेशः । सन्निपातलक्षणो विधिरनिमित्तं तद्वि-घातस्येति परिभाषेयमनित्या, कष्टाय क्रमणे इति निर्देशात् ।' निरादयःक्रान्ताद्यर्थे पञ्चम्या'–सू. ७८० वरील वार्तिक–या वार्तिकान्वयें 'जरायाः निष्क्रान्तोः निर्जराः' या स्थलीं 'गोस्त्रियोः' सू. ६५६ या सूत्रानें न्हस्व होऊन, 'निर्जर' असा सामासिक शब्द सिद्ध होतो. 'निर्जर भिस्' या स्थलीं अदन्त अङ्गापुढें 'भिस्' प्रत्यय असल्यामुळें प्रकृत सूत्रानें 'भिस्' प्रत्ययाचें जागीं 'ऐस्' असा आदेश होतो आणि 'निर्जर ऐस्' अशी स्थिति होते. या स्थलीं 'जरा' या शब्दाचें 'जर' हें न्हस्वकार्य केल्यामुळें झालेलें एकदेशविकृत रूप असल्यामुळें, एक-देशविकृतमनन्यवत्' प. ३७ या परिभाषान्वयें 'जर' हा शब्द 'जरा' च आहे असें मानलें असतां, त्यापुढें 'ऐस्' हा अजादि विभक्तिप्रत्यय असल्यामुळें, 'जराया जरसन्यतरस्याम्' सू. २२७ या सूत्रानें 'जर' चे जागीं 'जरस्' असा आदेश होऊन 'निर्जरस्

ऐस् = निर्जरसैः' असें रूप होतें व हें रूप सिद्ध होण्याकरितांच प्रकृत सूत्रांत 'एस्' च्या ऐवजीं 'ऐस्' असा आदेश पठित केला आहे असें प्रकाशकारांचें म्हणणें आहे. यावर दीक्षित असें म्हणतात कीं, प्रकाशकारांचें) हें म्हणणें भाष्यविरुद्ध आहे. सन्निपातपरिभाषान्वयें 'जरस्' या आदेशाची वरील उदाहरणांत प्रवृत्ति होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'निर्जरैः' असेंच रूप होऊं शकतें असें ('जराया जरसन्यतरस्याम्' ७-२-१०१ या सूत्रावरील) भाष्यांत सिद्धान्तरूपानें सांगितलें आहे. ('निर्जर भिस्' या स्थलीं अदन्त अङ्ग व त्यापुढील 'भिस्' हा प्रत्यय या दोहोंच्या सन्निपातामुळें 'अतो भिस ऐस्' या प्रकृत सूत्रानें 'भिस्' प्रत्ययाचे जागीं 'ऐस्' असा आदेश होतो. हा आदेश अजादि असल्यामुळें व 'एकदेशविकृतमनन्यवत्' – प. ३७ – या परिभाषान्वयें 'जर' हा शब्द 'जरा' च आहे असें मानतां येत असल्यामुळें 'जराया जरस्' सू. २२७ या सूत्रानें 'निर्जर' यांतील 'जर' चे जागीं 'जरस्' असा आदेश केल्यास, 'निर्जर' हें अदन्त अङ्ग नष्ट होऊन 'निर्जरस्' असें हलन्त अङ्ग होईल व त्यामुळे अदन्त अङ्ग व 'ऐस्' यांचा सन्निपात नष्ट होईल. म्हणून ज्या सन्निपातामुळें 'ऐस्' असा आदेश झाला आहे त्या सन्निपाताचा नाश करण्याकरितां 'ऐस्' हा आदेश, 'सन्निपातलक्षणो विधिरनिमित्तं तद्विघातस्य' – प. ८६ – या परिभाषान्वयें, कारणीभूत होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'जर' चें जागीं 'जरस्' असा आदेश होऊं शकत नाहीं. म्हणून वरील उदाहरणांत 'जरस्' आदेश न होतां 'निर्जरैः' असेंच रूप सिद्ध होतें. 'जराया जरस्' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'सन्निपातलक्षणो विधिरनिमित्तं तद्विघातस्येति । यद्येवमतिजरसमतिजरसैरित्यत्र (जरसादेशो) न प्राप्नोति । अतिजरमतिजरैरिति भवितव्यम् । गोनर्दीय आह इष्टमेवैतत्सङ्गृहीतं भवति । अतिजरमतिजरैरिति भवितव्यं सत्यामेतस्यां परिभाषायां – सन्निपातलक्षणो विधिरनिमित्तं तद्विघातस्येति ।' या भाष्यावरून हें स्पष्ट होतें कीं,

निर्जर अति जर इत्यादि स्थलीं ' जरस् ' आदेश होणें भाष्यकारांच्या मतें मुळींच इष्ट नाहीं. म्हणून 'निर्जरसैः' इत्यादि रूपें सिद्ध होण्याकरितां प्रकृत सूत्रांत ' ऐस् ' असा आदेश पठित केला आहे असें जें प्रकाशकारांचें म्हणणें आहे तें भाष्यविरुद्ध असल्यामुळें बरोबर मानतां येत नाहीं.)

शब्दरत्न – ऐस्कृत इति । नद्यैरित्यादिसिद्धये उत्तरार्थं तदित्यन्ये ।

इतर वैयाकरणांचें असें म्हणणें आहे कीं, उत्तर सूत्रांत, म्हणजे ' बहुलं छन्दसि ' या सूत्रांत, ' ऐस् ' या पदाची अनुवृत्ति व्हावी व त्या योगानें ' नद्यैः ' इत्यादि वैदिक रूपांची सिद्धि व्हावी याकरितां प्रकृत सूत्रांत ' ऐस् ' या पदाचें ग्रहण केलें आहे. (' बहुलं छन्दसि ' या सूत्रांत ' बहुलम् ' या पदाचें ग्रहण केलें असल्यामुळें, जें अङ्ग अदन्त नाहीं तशा अङ्गापुढील ' भिस् ' प्रत्ययाचे जागीं विकल्पेंकरून वैदिक प्रयोगांत ' ऐस् ' आदेश होतो व त्यामुळें वेदांत ' नदीभिः, नद्यैः ' अशीं पाक्षिक रूपें होतात. जर प्रकृत सूत्रांत ' एस् ' असा आदेश पठित केला असता तर वरील उत्तर सूत्रांत त्या आदेशाची अनुवृत्ति झाली असती व त्यामुळें ' नद्यैः ' असें पाक्षिक इष्ट वैदिक रूप सिद्ध न होतां, ' नद्यैः ' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती. ती टाळण्याकरितां प्रकृत सूत्रांत ' ऐस् ' असा आदेश पठित केला आहे असें इतर वैयाकरणांचें म्हणणें आहे.)

मनोरमा – " नामि " । परिभाषाविरोधादिति । एतच्च " रुधादिभ्यः श्नम् " इति सूत्रे " श्नान्नलोपः " इति सूत्रे च भाष्यकैयटयोः स्पष्टम् । आरम्भसामर्थ्यादिति । " सुपि च " इत्यस्य तु न सामर्थ्यम् रामाभ्यामित्यादौ सावकाशत्वादिति भावः । एवं च रामशब्दे " नामि " इत्यस्योपन्यासो लेखकप्रमादादिति यदूचुस्तच्चिन्त्यम् ।

'नामि' सू. २०९ या सूत्रावरील कौमुदींत 'सुपि च इति दीर्घो यद्यपि परस्तथापीह न प्रवर्तते सन्निपातपरिभाषाविरोधात्' असें जें म्हटलें आहे तें 'रुधादिभ्यः श्नम्' सू. ३–१–७८ व श्नान्नलोपः' सू. ६–४–२२ या सूत्रांवरील भाष्यांत व कैयटाच्या वृत्तींत सांगितलें आहे. 'नामि इत्यनेन त्वारम्भसामर्थ्यात् परिभाषा बाध्यते' असें जें प्रकृत सूत्रावरील कौमुदींत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, (ज्याप्रमाणें 'नामि' या सूत्राच्या आरंभसामर्थ्यानें तें सूत्र सन्निपातपरिभाषेचा बाध करून प्रवृत्त होऊं शकतें तसें) 'सुपि च.' सू. २०२ या सूत्रांत सामर्थ्य नाहीं, म्हणजें तें सूत्र सन्निपातपरिभाषेचा बाध करूं शकत नाहीं; कारण 'रामाभ्याम्' इत्यादि स्थलीं तें सूत्र सावकाश ठरतें. ('राम आम्' या स्थलीं 'ऱ्हस्वनद्यापो नुट्' सू. २०८ या सूत्रानें 'आम्' प्रत्ययाला 'नुट्–न्' आगम होऊन 'राम नाम्' अशी स्थिति झाली असतां, 'यदागमाः'-परि. ११–या परिभाषान्वयें नुडागम 'आम्' प्रत्ययाचा अवयव होत असल्यामुळें, 'नाम्' हा 'सुप्' प्रत्यय मानतां येतो. हा प्रत्यय यञादि असल्यामुळें 'सुपि च' या सूत्रानें 'राम' या अदन्त अङ्गाला दीर्घकार्य पावलें आहे व तसेंच 'नामि' या प्रकृत सूत्रानें देखील 'राम' या अजन्त अङ्गाला दीर्घ कार्य पावलें आहे. 'नामि' हें प्रकृत सूत्र 'अग्नीनां, वायूनाम्' इत्यादि स्थलीं सावकाश ठरत असून 'सुपि च' हें सूत्र 'रामाभ्याम्' इत्यादि स्थलीं सावकाश ठरतें. अशा रीतीनें हीं दोन्ही सूत्रें आपापल्या विषयांत सावकाश ठरून तुल्यबल ठरत असल्यामुळें, 'विप्रतिषेधे परं कार्यम्' सू. १७५ या सूत्रान्वयें 'रामाणाम्' या स्थलीं दीर्घकार्य करतेंवेळीं 'नामि' या पूर्व सूत्राची प्रवृत्ति न करितां 'सुपि च' या उत्तर सूत्राची प्रवृत्ति करणें योग्य आहे असें शंकाकाराचें म्हणणें आहे. यावर दीक्षित असें उत्तर देतात कीं, सन्निपातपरिभाषा-परि. ८६-असल्यामुळें, 'सुपि-च' हें सूत्र 'रामाणाम्' या स्थलीं दीर्घ कार्य करण्याकरितां प्रवृत्त

होऊं शकत नाहीं. ' रामाणाम् ' या स्थलीं ऱ्हस्वान्तअङ्गाच्या निमित्तामुळें ' आम् ' प्रत्ययाला जो नुडागम होतो तो नुडागम ' सुपि च ' या सूत्राच्या प्रवृत्तीचें निमित्त होऊं शकत नाहीं; कारण ' सुपि च ' हें सूत्र प्रवृत्त झाल्यास नुडागमाचें निमित्त जें अदन्त ऱ्हस्वाङ्ग तें नष्ट होईल व अशा रीतीनें ऱ्हस्व अङ्ग व त्या पुढील प्रत्यय यांच्या सन्निपाताचा नाश होईल. यावर शंकाकार असें उत्तर देतो कीं, ' नामि ' हें सूत्र प्रवृत्त केल्यानें देखील ऱ्हस्वान्त अङ्ग नष्ट होऊन सन्निपाताचा विघात होणारच आणि अशा रीतीनें वरील दोन सूत्रांपैकीं कोणतेंहि सूत्र प्रवृत्त केल्यास सन्निपातपरिभाषा सारखीच आड येत असल्यामुळें, ' रामाणाम् ' या स्थलीं इष्ट दीर्घकार्य करण्याकरितां ' सुपि च ' या उत्तर सूत्रानें सन्निपातपरिभाषेचा बाध करून त्या सूत्राची प्रवृत्ति करणें उचित आहे. यावर दीक्षित असें उत्तर देतात. कीं, ' नामि ' हें जरी पूर्व सूत्र आहे तरी तें सूत्र मुद्दाम आरंभिलें असल्यामुळें, आरंभसामर्थ्यानें तें सूत्र सन्निपातपरिभाषेचा बाध करून प्रवृत्त होतें. सन्निपातपरिभाषेचा बाध केल्याशिवाय तें सूत्र प्रवृत्त होण्यास कोणतेंहि उदाहरण मिळूं शकत नाहीं आणि तें निरवकाश व व्यर्थ ठरण्याची आपत्ति येते. तें व्यर्थ न ठरावें याकरितां हें मानणें आवश्यक आहे कीं, निरवकाशत्वामुळें सन्निपातपरिभाषेचा बाध करून तें प्रवृत्त होतें. ' सुपिच ' या सूत्राची तशी स्थिति नाहीं, म्हणजे सन्निपातपरिभाषेचा बाध केल्याशिवाय तें सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं अशी वस्तुस्थिति नाहीं; कारण ' रामाभ्याम् ' इत्यादि स्थलीं तें सूत्र सावकाश व चरितार्थ ठरतें. अशा रीतीनें तें सूत्र निरवकाश ठरत नसल्यामुळें, ' रामाणाम् ' या स्थलीं दीर्घकार्य करते वेळीं तें सूत्र सन्निपातपरिभाषेचा बाध करून प्रवृत होऊं शकत नाहीं. ' रामाय ' या स्थलीं सन्निपातपरिभाषा अनित्य मानून जरी त्या सूत्राची प्रवृत्ति केली जाते तरी इतर स्थलीं तें सूत्र, सन्निपातपरिभाषा अनित्य मानून, प्रवृत्त करतां येऊं शकत नाहीं असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. या विषयासंबंधानें

बालमनोरमेंत 'यद्यत्र नामीति दीर्घो न स्यात् तर्हि तदारम्भो व्यर्थः स्यात्। ततश्च निरवकाशत्वाद्रामाणामित्यादौ नामीति दीर्घः सन्निपातपरिभाषां बाधित्वा प्रवर्तते। सुपि चेति दीर्घस्तु रामाभ्यामित्यादौ सावकाशत्वाद्रामाणामित्यादौ नामि परे सन्निपातपरिभाषां न बाधितुमर्हति। तस्माद्रामाणामित्यादौ नामि परे दीर्घप्रवृत्तौ सन्निपातपरिभाषां बाधितुं नामीति दीर्घारम्भः' असें स्पष्ट म्हटलें आहे. 'श्नान्नलोपः' व 'रुधादिभ्यः- श्नम्' या दोन्ही सूत्रांवरील भाष्यांत भाष्यकारांनीं 'यज्ञानाम्, यत्नानाम्' या उदाहरणांत 'सुपिच' या परसूत्राची प्रवृत्ति न करितां, 'नामि' या पूर्व सूत्राचीच प्रवृत्ति करून दीर्घकार्याची सिद्धि केली आहे, आणि या दोन्ही सूत्रांवरील भाष्याच्या वृत्तींत कैयटानें 'यत्तु सुपि चेति दीर्घत्वं तत् सन्निपातलक्षणपरिभाषावशान्नप्रवर्तते' असें स्पष्ट म्हटलें आहे.) असे असल्यामुळें, प्रक्रियाकौमुदींत 'राम' या शब्दाच्या विभक्तिरूपांची सिद्धि करतेवेळीं 'नामि' या सूत्राचा जो उपन्यास केला आहे तो लेखकाच्या प्रमादामुळें केला गेला आहे असें जें प्रकाशकारांचें म्हणणें आहे तें चूक ठरतें. (प्रकाशकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, 'राम नाम =रामाणाम्' या स्थलीं अङ्ग अदन्त असल्यामुळें 'सुपि च' सू. २०२ या परसूत्रानें दीर्घ होऊं शकत असून देखील प्रक्रियाकौमुदींत त्या रूपाच्या सिद्धिकरितां 'नामि' या पूर्व सूत्राचा जो उपन्यास केला आहे तो करण्याची कांहीं गरज नव्हती व तो उपन्यास लेखकाच्या प्रमादामुळें केला गेला असावा. पण दीक्षित म्हणतात कीं, हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'रामाणाम्' या स्थलीं 'सुपि च' या सूत्रानें दीर्घ करतेवेळीं सन्निपातपरिभाषा आड येते. पण 'नामि' हें सूत्र मुद्दाम आरंभिलें असल्यामुळें, आरंभसामर्थ्यामुळें व अनवकाशत्वामुळें तें सूत्र सन्निपातपरिभाषेचा बाध करून 'रामाणाम्' या स्थलीं दीर्घकार्य करण्याकरितां प्रवृत्त होतें. सारांश 'राम' या शब्दाचीं रूपें सिद्ध करितांना प्रक्रियाकौमुदीकारांनीं

'रामाणाम्' हें रूप सिद्ध करतेवेळीं 'नामि' या सूत्राचा जो उपन्यास केला आहे तो विचारपूर्वक व यथायोग्य केला आहे; कारण त्या सूत्राची प्रवृत्ति केल्याशिवाय 'रामाणाम्' या रूपाची सिद्धि होणें शक्य नाहीं. म्हणून तो उपन्यास लेखकाच्या प्रमादामुळें केला गेला असावा हें म्हणणें चूक ठरतें.)

शब्दरत्न–स्पष्टमिति । "सुपि च" इत्यपेक्षया "नामि" इति तत्र नित्यमपि ध्वनितम् ।

'सुपि च' या सूत्राच्या मानानें 'नामि' हें सूत्र नित्य आहे हें देखील वरील दोन्ही सूत्रांवरील भाष्यांत ध्वनित केलें आहे. ('नामि' हें प्रकृत सूत्र 'सुपि च' या सूत्राच्या मानानें नित्य नसतें तर दीर्घकार्याच्या सिद्धीकरितां त्या पूर्व सूत्राचा भाष्यकारांनीं वरील भाष्यांत निर्देश न करितां 'सुपि च' या उत्तर सूत्राचा निर्देश केला असता. 'रामाणाम्' या स्थलीं दीर्घकार्य करण्याकरितां 'सुपि च' हें सूत्र, सन्निपातपरिभाषा असून देखील, प्रथम प्रवृत्त केलें तरी 'नामि' हें सूत्र आरंभसामर्थ्यामुळें 'पर्जन्यवल्लक्षण प्रवृत्तिः' प. १२० या 'इको झल्' १–२–९ या सूत्रावरील भाष्यांत सांगितलेल्या न्यायान्वयें पुन्हा प्रवृत्त होऊं शकतेंच व अशा रीतीनें तें कृताकृतप्रसङ्गि सूत्र 'सुपि च' या सूत्राच्या मानानें नित्य ठरतें व 'परान्नित्यं बलवत्' या न्यायान्वयें तेंच सूत्र प्रवृत्त होतें असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.)

मनोरमा–"आदेशप्रत्ययोः" एकाऽपि षष्ठी विषयभेदाद्भिद्यते इत्याशयेन व्याचष्टे–आदेशः प्रत्ययावयवश्चेति । यदि तु आदेशावयवो गृह्येत तर्हि तिसृणामित्यादौ दोषः । यदि च प्रत्ययोः यः सकार इति तर्हि रामेष्वित्यादौ न स्यात् । यद्यप्येवं वैरूप्येण व्याख्याने सहविवक्षाविरहात् द्वन्द्वो न युज्यते, तथाऽपि सौत्रत्वाद् बोध्यः । विवृताघोषस्येति । यत्तु वदन्ति–सकारस्य सोष्मणोऽघोषस्यान्तरतमः

ष एव मूर्धन्य इति तन्न्यूनम्, ठकारेऽतिप्रसङ्गात् । तथा च प्रातिशाख्यम् । –

"वर्गे वर्गे च प्रथमावघोषौ युग्मौ सोष्माणावनुनासिकोऽन्त्यः" इति । ननु दधिसेच इत्यादौ प्राक् सुबुत्पत्तेः समासे षत्वं वारयितुं पदादादिः पदादिरिति पञ्चमीसमासो भाष्ये उक्तः । ततश्चेहापि "सात्पदाद्योः" इति निषेधः स्यादिति चेत् । मैवम् । स्वादिष्विति या पदसंज्ञा तामाश्रित्योक्तनिषेधो न प्रवर्तते इति सातिग्रहणेन ज्ञापितत्वात् ।

'आदेशप्रत्यययोः' सू. २१२ या सूत्राचें व्याख्यान करितांना 'आदेशः प्रत्ययावयवश्च यः सकारः' असें जें कौमुदींत म्हटलें आहे तें, 'आदेशप्रत्यययोः' ही षष्ठी एक असून देखील विषयभेदामुळें भिन्नभिन्न अर्थांची वाचक आहे असा आशय मनांत धरून, म्हटलें आहे. 'आदेशप्रत्यययोः' यांतील 'आदेशस्य' ही अवयविषष्ठी मानून त्या शब्दाचा 'आदेशावयव' असा अर्थ केला तर 'तिसृणाम्' इत्यादि स्थलीं दोष येतो. तसेंच 'प्रत्ययस्य' ही अभेदसंबंधबोधिका षष्ठी मानून त्या शब्दाचा 'प्रत्ययो यः सकारः' असा अर्थ केल्यास, 'रामेषु' इत्यादि स्थलीं षत्व न होण्याची आपत्ति येते. अशा रीतीनें वर प्रमाणें व्याख्यान केल्यानें 'आदेशस्य' व 'प्रत्ययस्य' या दोन षष्ठींच्या अर्थांमध्यें वैरूप्य–भिन्नता–येत असल्यामुळें, सहविवक्षा राहत नाहीं व त्यामुळें जरी द्वन्द्वसमास होऊं शकत नाहीं तरी तो सौत्रद्वन्द्व मानून निर्वाह करून घेतला पाहिजे. ('आदेशप्रत्यययोः' या इतरेतर योगद्वन्द्व-समासाचा 'आदेशश्च प्रत्ययश्च तयोः' असा विग्रह आहे. या षष्ठ्यन्त सामासिक पदांत आदेश व प्रत्यय हें दोन भिन्न विषय एकत्र संगृहीत केले आहेत. 'आदेशस्य' ही षष्ठी 'राहोःशिरः' या प्रयोगांतील षष्ठीसारखी अभेदसंबंधबोधिका षष्ठी असून 'प्रत्ययस्य' ही अवयवावयविभावसंबंधबोधिका षष्ठी आहे. त्यामुळें

'आदेशस्य यः सकारः' याचा 'आदेशरूपो यः सकारः' असा अर्थ होत असून, 'प्रत्ययस्य यः सकारः' याचा 'प्रत्ययरूपो यः सकारः' असा अर्थ न होतां, 'प्रत्ययावयवो यः सकार' असा अर्थ होतो. 'आदेशस्य' या शब्दाचा 'आदेशावयवस्य' असा अर्थ केल्यास, 'तिसृणाम्' या स्थलीं सकाराचें षत्व होण्याची आपत्ति येते. 'त्रि' हा शब्द स्त्रीलिङ्गाचा वाचक असल्यास त्यापुढें विभक्तिप्रत्यय आला असतां, 'त्रिचतुरोःस्त्रियां तिसृचतसृ' सू. २२८ या सूत्रानें 'त्रि' चे जागीं 'तिसृ' असा आदेश होणें सांगितलें असल्यामुळें, 'त्रि आम्' या स्थलीं त्या सूत्रानें 'त्रि' चे जागीं 'तिसृ' असा आदेश होऊन 'तिसृ आम्' अशी स्थिति होते. या आदेशांत 'इ' या 'इण्' पुढें सकार हा आदेशावयव असल्यामुळें, वरील अर्थान्वयें त्याचें षत्व होण्याची आपत्ति येते. पण 'आदेशरूपो यः सकारः' असा अर्थ केल्यानें, ती आपत्ति टळते; कारण येथें सकाररूप आदेश झाला नसून 'तिसृ' असा आदेश झाला आहे. त्याचप्रमाणें 'प्रत्ययो यः सकारः' असा अर्थ केल्यास, 'रामेषु' या स्थलीं 'सु' हा समुदाय प्रत्यय असून त्यांतील अवयव सकार हा प्रत्यय नसल्यामुळें, त्याचें षत्व न होण्याची आपत्ति येते. पण 'प्रत्ययावयवः यः सकारः' असें व्याख्यान केल्यानेंच ती आपत्ति टळते. पण अशा रीतीनें 'आदेशस्य' ही अभेदसंबंध-बोधिकाषष्ठी व 'प्रत्ययस्य' ही अवयविषष्ठी मानल्यास, या स्थलीं सहविवक्षेचा अभाव होतो. याचें कारण हें कीं, प्रकृत सूत्रांत 'सहेः साडः सः' या पूर्व सूत्रांतून 'सः' या षष्ठ्यन्त पदाची अनुवृत्ति होते. या अनुवृत्त पदांत 'आदेशस्य' या षष्ठीचा तादात्म्यसंबंधानें — अभेदसंबंधानें — अन्वय असून, 'प्रत्ययस्य' या षष्ठीचा अवयवावयविरूपसंबंधानें अन्वय आहे असें मानलें असतां, या दोन षष्ठींचा 'सः' या अनुवृत्त पदांत सारख्याच रीतीनें अन्वय होत नसल्यामुळें, येथें सहविवक्षेचा अभाव आहे हें स्पष्ट होतें, आणि इतरेतरयोगद्वन्द्व होण्याकरितां सहविवक्षा असणें आवश्यक असल्यामुळें, 'आदेश-प्रत्यययोः' या स्थलीं वास्तविक इतरेतरयोगद्वन्द्व होऊं शकत नाहीं.

तथापि 'छन्दोवत् सूत्राणि भवन्ति' या भाष्यवचनान्वयें हा सौत्र-प्रयोग वैदिकप्रयोग ठरतो व 'दृष्टानुविधिश्छन्दसि' या वचानान्वयें तो साधु मानला पाहिजे.) प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'विवृताघोषस्य सस्य तादृश एव षः' असें म्हटलें आहे. परंतु प्रकृत सूत्रावरील टीकेंत प्रकाशकारांनीं 'रामेषु' या स्थलीं जें षत्व झालें आहे त्या संबंधानें 'सकारस्य सोष्मणोऽघोषस्यान्तरतम्यात् तादृश एव षकारो भवति मूर्धन्यः' असें जें म्हटलें आहे तें अपुरें आहे. हें त्यांचें म्हणणें बरोबर मानल्यास, सकाराचे जागीं ठकारादेश देखील होण्याची आपत्ति येते. (प्रसादकारांनीं देखील प्रकाशकारांसारखेंच आपल्या टीकेंत म्हटलें आहे आणि प्रकाशकारांनीं त्यांच्याच म्हणण्याचा अनुवाद केला आहे असें दिसतें.) प्रातिशाख्यांत असें म्हटलें आहे कीं, प्रत्येक वर्गांतील पहिले दोन वर्ण अघोष असून द्वितीय व चतुर्थ वर्ण सोष्म असतात व अन्त्यवर्ण अनुनासिक असतो. (या प्रातिशाख्यान्वयें टवर्गांतील द्वितीय वर्ण ठकार हा अघोष व सोष्म ठरतो. षकार देखील अघोष असून ऊष्मवर्ण आहे. म्हणून 'स्थानेऽन्तरतमः' सू. ३९ या सूत्रान्वयें अन्तरतम्य ठरविण्याकरितां प्रकृत स्थलीं अघोष व सोष्म हे दोन बाह्य यत्नरूप हेतु पुरेसे मानले तर, सकाराचा अन्तरतम जसा षकार ठरतो तसा ठकार देखील ठरतो व त्यामुळें सकाराचे जागीं 'रामेषु' या स्थलीं ठकारादेश देखील होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरितां प्रकृत सूत्रावरील कौमुदींत 'विवृता घोषस्य सस्य तादृश एव षः' असें दीक्षितांनीं म्हटलें आहे. ठकार या स्पर्श वर्णाचा आभ्यन्तरप्रयत्न 'पृस्ष्टं प्रयतनं स्पर्शनाम्' या वचनान्वयें स्पृष्ट असून सकार व षकार या दोन्हीं उष्मवर्णांचा आभ्यन्तरप्रयत्न 'विवृतमूष्मणां स्वराणां च' या वचनान्वयें विवृत्त आहे. त्यामुळें सकाराचा ठकार हा आभ्यन्तरप्रयत्नभेदामुळें अन्तरतम ठरत नसून, षकार हा आभ्यन्तरप्रयत्नसाम्यामुळें 'स्थानेऽन्तरतमः' सू. ३९ या सूत्रान्वयें व तसेंच 'यत्रानेकविधमान्तर्यं तत्र स्थानत आन्तर्यं बलीयः' प. १३ या परिभाषान्वयें अन्ततरम्

व बलवत्तर ठरतो व सकाराचे जागीं ठकारादेश होण्याची आपत्ति टळते आणि षकारादेशच होतो. आतां येथें शंकाकार अशी शंका करतो कीं,) 'दधिसेचः' इत्यादि स्थलीं सुबुत्पत्ति होण्यापूर्वी समास केल्यानें जी षत्वाची प्राप्ति होतें तिचें निवारण करण्याकरितां भाष्यकारांनीं 'सात्पदाद्योः' सू. २१२३ या सूत्रांतील 'पदादि' या शब्दाचा 'पदात् आदिः' असा पञ्चमीसमास केला असल्यामुळें, 'सात्पदाद्योः' या निषेधान्वयें 'रामेषु' या स्थलीं देखील षत्व न होण्याची आपत्ति येते. ('दधिसेचः' या स्थलीं 'गतिकारकोपपदानां कृद्भिःसह समासवचनं प्राक्सुबुत्पत्तेः'-परि. ७६-या परिभाषान्वयें 'सेच्' या कृदन्त प्रातिपदिकाहून सुबुत्पत्ति होण्यापूर्वी समास केल्यानें 'सेच्' याला पदसंज्ञा होत नसल्यामुळें व अशा रीतीनें 'सेच्' यांतील सकार पदाचा आदि ठरत नसल्यामुळें, 'सात्पदाद्योः' या षत्वनिषेधक सूत्रांतील 'पदादि' या शब्दाचा 'पदस्य आदिः पदादिः' असा षष्ठीसमास केल्यास तें षत्वनिषेधकसूत्र पदसंज्ञक नसलेल्या 'सेच्' ला लागू पडत नाहीं व त्यामुळें 'सेच्' यांतील आद्य सकाराचें षत्व होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरितां भाष्यकारांनीं 'न लुमताङ्गस्य' १-१-६३ या सूत्रावरील भाष्यांत 'पदात् आदिः पदादिः' असा पञ्चमीसमास केला आहे व 'दधिसेच्' या स्थलीं 'दधि' या पदाच्या लगेंच पुढें 'सेच्' यांतील सकार असल्यामुळें त्या सकाराचें, पञ्चमीसमास मानून, षत्व होणें टाळलें आहे. म्हणून भाष्यसंमत पञ्चमीसमासपक्ष मानल्यास, 'राम सु = रामेषु' या स्थलीं 'राम' याला 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्रानें पदसंज्ञा होत असल्यामुळें आणि 'बहुवचने झल्येत्' सू. २०५ या सूत्रानें 'राम' यांतील अन्त्य अकाराचें एत्व केल्यावर 'रामे' याला स्थानिवद्भावानें पदसंज्ञा होत असल्यामुळें व त्या पदाच्या लगेंच पुढें 'सु' प्रत्ययांतील सकार असल्यामुळें, त्या सकाराचें षत्व होऊं शकत नाहीं व 'रामेषु' असें रूप सिद्ध होऊं शकत नाहीं असें शंकाकाराचें

म्हणणें आहे. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं,) ही शंका बरोबर नाहीं; कारण 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्रानें जेथें पदसंज्ञा केली जाते तशा ठिकाणीं 'सात्पदाद्योः' सू. २१२३ हा निषेध प्रवृत्त होत नाहीं, म्हणजे लागू पडत नाहीं, हें त्या सूत्रांत केलेल्या 'सात्' या प्रत्ययाच्या ग्रहणानें ज्ञापित होतें. ('अग्निसात्' या स्थलीं 'अग्नि' या पुढें 'सात्' प्रत्यय आला असल्यामुळें 'स्वादिषु' सू. २३० या सूत्रानें 'अग्नि' याला पदसंज्ञा होते व त्याच्या लगेंच पुढें 'सात्' यांतील सकार आल्या-मुळें, 'पदादेः' एवढेंच जरी सूत्र असलें तरी, पञ्चमीसमासपक्षांत या उदाहरणांत षत्वाचें निवारण होऊं शकतेंच व अशा रीतीनें त्या सूत्रांतील 'सात्' या प्रत्ययाचें ग्रहण व्यर्थ ठरूं पाहतें. पण त्या सूत्रांत 'सात्' ग्रहण मुद्दाम केलें असल्यामुळें हें ज्ञापित होतें कीं, जेथें 'सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें पदसंज्ञा होत नसून 'स्वादिषु' या सूत्रानें पदसंज्ञा होते तेथें वरील षत्वनिषेधक सूत्र प्रवृत्त होत नाहीं. त्यामुळें 'अग्निसात्' या स्थलीं 'सात्' यांतील सकाराचें षत्व होण्याची जी आपत्ति येत होती ती टाळण्याकरितां त्या सूत्रांत 'सात्' या प्रत्ययाचें ग्रहण करावें लागलें. 'रामेषु' या स्थलीं देखील 'रामे' याला वर सांगितल्याप्रमाणें 'स्वादिषु' या सूत्रानेंच पदसंज्ञा होत असल्यामुळें, या उदाहरणांत देखील 'सात्पदाद्योः' या निषेधक सूत्राची प्रवृत्ति होत नाहीं व त्यामुळें 'सु' प्रत्ययांतील सकाराचें षत्व होऊन 'रामेषु' असें इष्ट रूप सिद्ध होतें. 'न लुमताङ्गस्य' सू. १–१–६३ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'इह तर्हि दधिसेचौ दधिसेचः सात्पदाद्योरिति पदादिलक्षणः षत्वप्रतिषेधो न प्राप्नोति । मा भूदेवं पदस्यादिः पदादिः पदादेर्नेति । कथं तर्हि ? । पदादादिः पदादिः पदादेर्नेत्येवं भविष्यति । नैवं शक्यम् । इहापि प्रसज्येत । ऋक्षु वाक्षु त्वक्षु कुमारीषु किशोरीष्विति । सात् प्रतिषेधो ज्ञापकः स्वादिषु पदत्वेन येषां पदसंज्ञा न तेभ्यः प्रतिषेधो भवतीति ।')

मनोरमा—यत्त्वाहुः । प्रत्ययविषये नायं निषेध इति ज्ञाप्यत इति । तन्न । व्यतिसे इत्यादौ षत्वापत्तेः । ननु पदस्यादिरिति पक्षे 'व्यतिसे' इत्यत्र षत्वं दुर्वारम् । न च व्यपदेशिवद्भावेन से इत्यस्यापि तिङन्तत्वात्पदत्वं शङ्क्यम् । प्रत्ययग्रहणे यस्मात्स विहितस्तदादेरेव ग्रहणात् अन्यथा 'रामेषु' इत्यादावपि षत्वनिषेधापत्तिरिति चेत्सत्यम् । न वयं प्रत्ययमात्रस्य तदन्ततां ब्रूमः, किंतु प्रकृतिप्रत्ययसमुदाये प्रवृत्तां पदसंज्ञामेकदेशविकृतन्यायेन लुप्तप्रकृतिके प्रत्ययेऽप्यानयामः । 'रामौ' 'रामा' इत्यादावपि हि एकदेशविकृतन्यायेनैव पदत्वम्, एकादेशात्प्रागेव पदसंज्ञाप्रवृत्तेः । न त्वेकादेशे कृते "सुप्तिङन्तम्" इत्यस्य प्राप्तिरस्ति । उभयत आश्रयणे नान्तादिवदिति सिद्धान्तात् ।

यत्तु वदन्ति । प्रकृतिसन्निधाने प्रत्ययस्य पदत्वं नास्ति । "मन्त्रेषु" "सर्वेषाम्" इत्यादिनिर्देशादिति । तन्मन्दम् । उक्तरीत्या पदत्वाभावे न्यायसिद्धे ज्ञापनस्यासम्भवादनुपयोगाच्च ।

प्रकाशकारांचें असें म्हणणें आहे कीं, 'सात्पदाद्योः' हा निषेध प्रत्ययांच्या विषयांत, म्हणजे प्रत्ययांतील आद्य सकाराचें षत्व करतेवेळीं, लागू पडत नाहीं हें (त्या सूत्रांतील 'सात्' प्रत्ययाच्या ग्रहणानें) ज्ञापित होतें. पण हें म्हणणें बरोबर नाहीं. तें म्हणणें बरोबर मानल्यास, 'व्यतिसे' इत्यादि स्थलीं षत्व होण्याची आपत्ति येते. ('व्यतिसे' या स्थलीं 'व्यति' हें पद असून त्याच्या लगेंच पुढें 'से' हा सकारानें सुरु होणारा प्रत्यय आहे. तो प्रत्यय असल्यामुळें 'सात्पदाद्योः' हा निषेध त्याला लागू पडत नाहीं असें मानलें तर, 'व्यतिषे' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. म्हणून प्रकाशकारांचें म्हणणें अयोग्य ठरतें. आतां येथें शंकाकार अशी शंका करतो कीं,) 'सात्पदाद्योः' या सूत्रांतील 'पदादि' या शब्दाचा 'पदस्य आदिः पदादिः' असा जो षष्ठीसमास केला आहे तो षष्ठीसमासपक्ष मानल्यास, 'व्यतिसे' या

स्थलीं षत्वाचें निवारण करणें अशक्य आहे. व्यपदेशिवद्भावानें 'से' हें तिङन्त मानून तें पद आहे (व त्यामुळें 'से' या पदांतील आद्य सकाराचें षत्व होणें 'सात्पदाद्योः' या निषेधान्वयें टाळतां येतें) हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'प्रत्ययग्रहणे यस्मात्सविहितस्तदादेः'—परि—२३—या परिभाषान्वयें, ज्याहून प्रत्यय झाला आहे अशा तदादि समुदायाचें प्रत्ययग्रहणानें ग्रहण होत असतें. (शंकाकार असें म्हणतो कीं, 'व्यतिसे' या उदाहरणांतील 'सें' हें पद नसून केवळ प्रत्यय आहे आणि 'पदादादिः पदादिः' हा पञ्चमीसमासपक्ष मानल्यानें जरी 'से' यांतील आद्य सकाराचें षत्व टाळतां येतें तरी, 'पदस्य आदिः पदादिः' हा षष्ठीसमासपक्ष मानल्यास, प्रकृत सूत्रानें पावलेलें 'से' यांतील सकाराचें षत्व टाळतां येत नाहीं. ज्या 'अस्' धातूहून 'से' हा प्रत्यय झाला आहे त्या संपूर्ण 'अस्' प्रकृतीचा 'श्नसोरल्लोपः' सू. २४६९ व 'तासस्त्योर्लोपः' सू. २१९१ या दोन सूत्रांनीं लोप होऊन 'से' एवढाच प्रत्ययरूप भाग अवशिष्ट राहत असल्यामुळें, 'व्यपदेशिवदेकस्मिन्' — परि. ३० — या परिभाषान्वयें 'से' हें तिङन्त आहे व त्यामुळें पदसंज्ञक आहे असें मानतां येतें आणि त्यामुळें षष्ठीसमासपक्षांत देखील 'सात्पदाद्योः' हा निषेध येथें लागू पडतो आणि 'से' या पदांतील आद्य सकाराचें षत्व होत नाहीं असें कोणी म्हटल्यास, त्यावर शंकाकार असें उत्तर देतो कीं, प्रत्ययग्रहणपरिभाषान्वयें ज्या प्रकृतीहून प्रत्यय झाला आहे त्या प्रकृतिप्रत्ययसमुदायालाच 'सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें होणारी पदसंज्ञा होते. 'व्यतिसे' या उदाहरणांत ज्या 'अस्' प्रकृतीहून 'से' हा प्रत्यय झाला आहे तो संपूर्ण प्रकृति नाहींशी होऊन 'से' हा प्रत्ययच अवशिष्ट राहिला असल्यामुळें, तशा अवशिष्ट राहिलेल्या प्रकृतिरहित 'से' प्रत्ययाला पदसंज्ञा होऊं शकत नाहीं.) जर प्रत्ययाला देखील पदसंज्ञा होते असें मानलें तर 'रामेषु' इत्यादि स्थलीं देखील षत्वाचा निषेध होण्याची आपत्ति येईल, म्हणजे 'सात्पदाद्योः' हा निषेध प्रवृत्त होऊन 'सु'

प्रत्ययांतील सकाराचें षत्व न होण्याची आपत्ति येईल. ('ननु पदस्यादि…… षत्वनिषेधापत्तिः' हा सर्व शंकाग्रन्थ आहे. या शंकेवर दीक्षित असें उत्तर देतात कीं) शंकाकाराचें म्हणणें ठीक आहे; पण आम्ही 'से' या केवळ प्रत्ययाला तिङन्त म्हणत नसून ('अस् से' या प्रकृतिप्रत्ययसमुदायाचे ठिकाणीं प्रवृत्त झालेली पद-संज्ञा 'अस्' या प्रकृतीचा लोप होऊन जो 'से' हा प्रत्यय अवशिष्ट राहतो त्या प्रत्ययाचे ठिकाणीं एकदेशविकृतन्यायानें आणतो. 'रामौ रामाः' इत्यादि स्थलीं देखील एकदेशविकृतन्यायानेंच पदसंज्ञा होते; कारण एकादेश होण्यापूर्वींच पदसंज्ञा प्रवृत्त होते. एकादेश केल्यावर 'सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें पदसंज्ञेची प्राप्ति होत नाहीं; कारण 'उभयत आश्रयणे नान्तादिवत्' असा भाष्यसिद्धान्त आहे. ('अस्' या धातूहून 'से' हा प्रत्यय केला असतां, 'अस से' या प्रकृतिप्रत्यसमुदायाला 'सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें पदसंज्ञा होते व ती संज्ञा त्या समुदायाला झाल्यावर जरी नंतर पूर्वीं सांगितल्याप्रमाणे 'अस्' या प्रकृतीचा लोप होऊन 'से' एवढाच प्रत्ययरूप भाग अवशिष्ट राहतो तरी, 'एकदेशविकृतमनन्यवत्' —परि. ३७—या परिभाषान्वयें अवशिष्ट एकदेशविकृत 'से' याला स्थानिवद्भावानें पदसंज्ञा होते; व्यपदे-शिवद्भावानें, म्हणजे 'व्यपदेशिवदेकस्मिन्'—परि. ३०—या परिभाषा-न्वयें ती संज्ञा होते असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं असें दीक्षित म्हणतात. अशा रीतीनें 'से' हा अवशिष्ट भाग पदसंज्ञक ठरत असल्यामुळें, 'पदस्य आदिः पदादिः असा षष्ठीसमासपक्ष मानला तरी, 'से' या पदांतील आद्य सकाराचें, 'सात्पदाद्योः' हें षत्व-निषेधक सूत्र असल्यामुळें, षत्व होत नाहीं. एकदेशविकृत शब्द-स्वरूपाला 'एकदेशविकृतमनन्यवत्' या न्यायाची प्रवृत्ति करून पदसंज्ञा करतां येते हें सिद्ध करण्याकरितां दीक्षितांनीं मनोरमेंत 'रामौ, रामाः' हीं उदाहरणें दिलीं आहेत. त्यांपैकीं आपण 'रामौ' हें उदाहरण घेऊं. 'राम' या प्रातिपदिकाहून 'औ' हा प्रत्यय केला

असतां, 'राम औ' या प्रकृतिप्रत्यय समुदायाला 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रानें पदसंज्ञा होते व 'वृद्धिरेचि' या सूत्रानें वृद्धिरूप एकादेश होऊन 'रामौ' असें रूप झालें असतां, त्याला ती संज्ञा स्थानिवद्भावानें प्राप्त होते. 'रामौ' या स्थलीं जो वृद्धिरूप एकादेश झाला आहे तो पूर्वान्तवद्भावानें प्रकृतीचा अवयव मानल्यास, प्रकृती-पुढें प्रत्यय राहत नसल्यामुळें, 'रामौ' याला पदसंज्ञा होऊं शकत नाहीं. 'औ' हा वृद्धिरूप एकादेश परादिवद्भावानें प्रत्यय मानल्यास, 'राम' अशी जी मूळ प्रकृति होती ती तशी न राहतां 'राम्' अशी एकदेशविकृत प्रकृति होते व या स्थलीं एकदेशविकृतन्यायाची प्रवृत्ति करून 'राम्' ही एकदेशविकृतप्रकृति 'राम'च आहे असें मानलें तरच 'रामौ' याला पदसंज्ञा होऊं शकते. सारांश 'रामौ' याला कार्यकालपक्षांत पदसंज्ञा होण्याकरितां एकदेशविकृतन्यायाचा आश्रय केल्याशिवाय गत्यन्तर नाहीं; कारण 'उभयत आश्रयणे नान्तादिवत्' असा भाष्यसिद्धान्त असल्यामुळें, 'औ' या वृद्धिरूप एकादेशाला एकेच वेळीं 'राम' या प्रकृतीचा अन्त्य व 'औ' या प्रत्ययाचा आदि मानतां येत नाहीं.) प्रकाशकार असें म्हणतात कीं, प्रकृतीचें सान्निध्य असतां, म्हणजे ज्या प्रकृतीहून प्रत्यय झाला आहे ती प्रकृति प्रत्ययापूर्वीं विद्यमान असतां, प्रत्ययाला पदसंज्ञा होऊं शकत नाहीं आणि हें 'मन्त्रेषु, सर्वेषाम्' इत्यादि (पाणिनीय) निर्देशांवरून सिद्ध होतें. पण हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण वर सांगितल्याप्रमाणें केवळ प्रत्ययाला प्रत्ययग्रहणपरिभाषान्वयें पद-संज्ञेची प्राप्तीच होत नसल्यामुळें, वरील निर्देश ज्ञापक मानतां येणें असंभवनीय आहे व ते निर्देश ज्ञापक मानले तरी (पूर्वीं जें सिद्ध नव्हतें असे कांहीं अधिक सिद्ध होत नसल्यामुळें) ते निर्देश ज्ञापक मानून कांहींच फायदा नाहीं. ('रामेषु, मन्त्रेषु; सर्वेषाम्' इत्यादि स्थलीं प्रत्ययग्रहणपरिभाषान्वयें परि. २३ केवळ प्रत्ययाला पदसंज्ञा होत नसून प्रकृतिप्रत्ययसमुदायालाच ती संज्ञा होत असल्यामुळें, प्रत्ययाला पदसंज्ञा होत नाहीं हें सिद्ध करण्याकरितां पाणिनीय

सूत्रांतील निर्देश ज्ञापक देण्याची गरज काय ? जर कोणत्याहि रीतीनें प्रत्ययाला पदसंज्ञेची प्राप्ति असती तर त्या संज्ञेचें निवारण करण्याकरितां ज्ञापक देणें उचित झालें असते. सारांश जें पूर्वीं सिद्ध नव्हतें तें ज्ञापकाच्या आधारें सिद्ध होतें अशी येथें वस्तुस्थिति नसल्यामुळें, प्रत्ययाला पदसंज्ञा होत नाहीं ही सिद्ध वस्तु सिद्ध करण्याकरितां पाणिनीय निर्देशांचा आधार देण्याची खटपट करणें निरर्थक आहे असा दीक्षितांच्या म्हणण्याचा आशय आहे. प्रकाशकारांनीं ज्या दोन निर्देशांचा आधार दिला आहे ते 'हलि सर्वेषाम्' सू. १७१ या सूत्रांतील 'सर्वेषाम्' व 'मन्त्रेष्वाङ्यादेरात्मनः' सू. ३५५४ या सूत्रांतील 'मन्त्रेषु' हे निर्देश होत. या दोन्ही निर्देशांत 'साम्' व 'सु' या दोन्ही प्रत्ययांतील सकाराचें पाणिनीनें षत्व केलें असल्यामुळें हें ज्ञापित होतें कीं, प्रत्ययाला पदसंज्ञा होत नाहीं; कारण जर प्रत्ययाला पदसंज्ञा झाली असती तर वरील दोन्ही निर्देशांत सकार हा पदाचा आद्य अवयव मानला जाऊं शकला असता व त्यामुळें 'सात्पदाद्योः' या निषेधक सूत्रान्वयें षत्व होऊं शकलें नसतें असा प्रकाशकारांच्या म्हणण्याचा आशय आहे. यावर दीक्षितांनीं जें उत्तर दिलें आहे त्याचें विवरण वर केलेंच आहे.)

शब्दरत्न— विषयभेदादिति । तन्त्रेण षष्ठीद्वयोच्चारणाद् आदेशरूपसस्य स्थाने प्रत्ययावयवसस्य स्थाने च षो भवतीत्येवंरूपः षष्ठीभेद इत्यर्थः । ओस्संबन्धद्वयार्थकं इत्यभिमान । तिसृणामिति । तिस्त्रादेशे सकारोच्चारणन्तु तिस्र इत्यत्र "नरपर" इति षत्वनिषेधे चरितार्थमिति भावः । ठकारेऽतिप्रसङ्गादिति । "सोष्मणः सोष्माण इति द्वितीया" इति "स्थानेऽन्तरतम–" सूत्रस्थभाष्येण तस्यापि सोष्मत्वबोधनात् । सोष्मण इत्यस्योष्मत्वसहितस्येत्यर्थः । अत्रार्थे ऋष्यन्तरसंवादमप्याह–तथा चेति ।

'एकाऽपि षष्ठी विषयभेदाद्भिद्यते' असें जें मनोरमेंत म्हटलें त्याचा भावार्थ हा आहे कीं, तन्त्रानें 'आदेशस्य' व 'प्रत्ययस्य' या

दोन षष्ठींचें उच्चारण केल्यानें, आदेशरूप सकाराचे जागीं व प्रत्ययाचा जो अवयव सकार त्याचे जागीं षकार होतो असा अर्थ होऊन षष्ठीचे दोन भिन्न अर्थ होतात. ('आदेशप्रत्यययोः' या द्वन्द्वसमासांत 'आदेश' व 'प्रत्यय' या दोन शब्दांच्या षष्ठींचे भिन्न संबंधरूप अर्थ होत असल्यामुळें, त्या दोन शब्दांपैकीं प्रत्येक शब्दाहून 'ङस्' प्रत्यय करून 'आदेशस्य' व 'प्रत्ययस्य' अशीं दोन षष्ठीचीं पृथक् पदें उच्चारावयास पाहिजे होतीं व इतरेतरयोगद्वन्द्व करावयास नको होता. पण पाणिनीनें प्रकृत सूत्रांत 'आदेशप्रत्यययोः' असा द्वन्द्वसमासनिर्देश केला असल्यामुळें व त्या द्विवचनान्त सामासिक पदाच्या अन्तीं दोन 'ङस्' प्रत्यय उच्चारणें अशक्य असल्यामुळें, 'ओस्' हा षष्ठीच्या द्विवचनाचा एकच प्रत्यय उच्चारला आहे व त्या 'ओस्' प्रत्ययानें दोन 'ङस्' प्रत्ययांच्या अर्थांचा, म्हणजे अभेदसंबंध व अवयवावयविभावसंबंध या दोन भिन्न संबंधांचा, बोध केला आहे असें तन्त्रानें मानतां येतें. याचा अर्थ हाच कीं, 'आदेशस्य सस्य षो भवति, प्रत्ययावयवस्य सस्य च षो भवति' अशीं दोन भिन्न वाक्यें तयार करून प्रकृत सूत्राचा अर्थ करावा.) सारांश 'आदेशप्रत्यययोः' यांतील 'ओस्' हा प्रत्यय दोन भिन्न प्रकारच्या संबंधांचा बोधक आहे असें मानून दीक्षितांनीं प्रकृत सूत्राचा अर्थ केला आहे. (या पंक्तींत 'इत्यभिमानः' हीं अरुचिप्रदर्शक पदें घातलीं असल्यामुळें हें स्पष्ट होतें कीं, दीक्षितांचें म्हणणें शब्दरत्नकारांना मान्य नाहीं व त्याचें कारण 'प्रत्ययमात्रे तन्त्रेणोच्चारणं लोके न दृष्टम्' असें भैरवींत दिलें आहे व 'वस्तुतस्तु उभयोरपि अभेदेनैवान्वयः, प्रत्ययपदं च प्रत्ययावयवपरमिति नात्र षष्ठीभेदाश्रयणम्। लोपे प्रत्ययलक्षणमित्येव सिद्धे प्रत्ययग्रहणेन प्रत्ययपदस्य प्रत्ययावयवपरत्वबोधनात्।' असें सरलेंत म्हटलें आहे. प्रकृत सूत्रावरील शब्देन्दुशेखरांत देखील 'प्रत्ययशब्दस्तदवयवपरो व्याख्यानात्, सातेः षत्वनिषेधाल्लिङ्गाच्च।' असेंच म्हटलें आहे. सारांश 'आदेशप्रत्यययोः' या सामासिक

पदांतील ' प्रत्यय ' हा शब्द ' प्रत्ययावयव ' या अर्थाचा वाचक आहे असें मानलें असतां, ' आदेशस्य ' व ' प्रत्ययस्य ' या दोन्ही षष्ठींचा 'स:' या अनुवृत्त पदाशीं अभेदरूपसंबंधानें सारखाच अन्वय होत असल्यामुळें, येथें सहविवक्षा आहे हें सिद्ध होतें व त्यामुळें इतरेतर-योगद्वन्द्व होण्यांत कोणतीहि अडचण येत नाहीं आणि सौत्र प्रयोग मानून कशी तरी उपपत्ति लावण्याची कांहींच आवश्यकता राहत नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) 'त्रिचतुरो: स्त्रियां तिसृचतसृ' सू. २९८ या सूत्रांत 'तिसृ' या आदेशामध्यें जें सकाराचें उच्चारण केलें आहे तें ' तिस्र: ' या स्थलीं 'न रपर' सू. ३१६८ या सूत्रानें होणारा षत्वनिषेध व्हावा याकरितां केलें असल्यामुळें चरितार्थ ठरतें. (आदेशप्रत्यययो: ' या सूत्रांतील 'आदेशस्य' ही अवयविषष्ठी मानल्यास 'तिसृणाम्' या स्थलीं 'तिसृ' या आदेशाचा अवयव जो सकार त्याचें षत्व होण्याची आपत्ति येते असें जें दीक्षितांनीं मनोरमेंत म्हटलें आहे त्यावर शंकाकार असें म्हणतो कीं, ' त्रिचतुरो: ' सू. २९८ या सूत्रांत ' तिषृ असा आदेश पठित न करितां पाणिनीनें ' तिसृ ' असा सकारयुक्त आदेश मुद्दाम पठित केला असल्यामुळें, त्या आदेशपाठाच्या सामर्थ्यानेंच ' तिसृणाम् ' या स्थलीं षत्व होण्याची आपत्ति येत नाहीं. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, ' त्रि ' चें जागी ' तिसृ ' असा जो आदेश होणें सांगितलें आहे तो अशाकरितां कीं, ' तिस्र: ' या स्थलीं रेफपरक सकाराचें 'न रपर' या षत्वनिषेधक सूत्रान्वयें षत्व होणें टळावें. ' त्रिचतुरो: ' या सूत्रांत ' तिषृ ' असा आदेश पठित केला असता तर, 'न रपर' हा निषेध लागू पडला नसता व ' तिष्र: ' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति आली असती. अशा रीतीनें ' तिसृ ' असा आदेश पठित करणें चरितार्थ ठरत असल्यामुळें, त्या आदेशपाठाच्या सामर्थ्यानें ' तिसृणाम् ' या स्थलीं षत्व होत नाहीं हें शंकाकाराचें म्हणणें चूक ठरतें.) 'ठकारेऽतिप्रसङ्गात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'स्थानेऽन्तरतम:'

सू. १–१–५० या सूत्रावरील भाष्यांत 'सोष्माणः सोष्मणः इति द्वितीयाः' असें म्हटलें असल्यामुळें, टवर्गांतील ठकार हा द्वितीय वर्ण देखील सोष्म ठरतो. (त्या भाष्यांत भाष्यकारांनीं असा प्रश्न केला आहे कीं, 'स्थानेऽन्तरतमः' या सूत्रांत 'तमप्' ग्रहण कां केलें आहे व त्या प्रश्नाचें असें उत्तर दिलें आहे कीं, झयो होऽ' न्यतरस्याम्' सू. ११९ या सूत्रानें हकाराचे जागीं पूर्वसवर्ण आदेश होणें सांगितलें असल्यामुळें व हकार हा ऊष्म वर्ण असून वर्गांतील दुसरा वर्ण ऊष्म असल्यामुळें आणि तसेंच हकाराचा 'नाद' हा बाह्य यत्न असून वर्गांतील तृतीय वर्णाचा 'नाद' हाच बाह्ययत्न असल्या-मुळें, वर्गांतील दुसरा व तिसरा वर्ण हे भिन्न भिन्न प्रकारें हकाराशीं समान ठरतात आणि म्हणून त्यांची प्राप्ति होते. परंतु वर्गांतील द्वितीय व तृतीय वर्णापेक्षां चतुर्थ वर्ण हा अन्तरतम – अत्यन्त सदृश – आहे; कारण तो ऊष्म वर्ण असून त्याचा 'नाद' हाच बाह्य यत्न आहे अणि म्हणून हकाराचे जागीं आन्तरतम्यानें 'वाक् हरिः' या स्थलीं चवथा वर्ण घकार होतो. त्याचप्रमाणें 'रामेषु' इत्यादि स्थलीं, मनोरमेंत सांगितल्याप्रमाणें, सकाराचे जागीं ठकार न होतां' आन्तरतम्यानें षकारच होतो.) मनोरमेंतील 'सोष्मणः' या पदाचा 'ऊष्मत्वसहितस्य' असा अर्थ आहे. ('शषसहा उष्माणः' या वचनान्वयें हकार हा ऊष्मवर्ण असल्यामुळें व प्रत्येक वर्गांतील द्वितीय व चतुर्थ वर्ण हकारयुक्त असल्यामुळें, ते द्वितीय व चतुर्थ वर्ण सोष्म–ऊष्मवर्णयुक्त–ठरतात हें स्पष्ट होतें.) प्रत्येक वर्गांतील द्वितीय व चतुर्थ वर्ण सोष्म असतात हें सिद्ध करण्याकरितां दीक्षि-तांनीं मनोरमेंत 'वर्गे वर्गे प्रथमावघोषौ' ही आश्वलायनऋषिप्रणीत प्रातिशाख्यांतील कारिका पठित केली आहे.

शब्दरत्न– प्राक् सुबुत्पत्तेरिति । सोपपदात्सिचेर्विजिति भावः । केवलात्सिचेर्विचि दध्नः सेचाविति समासे तु "उत्तरपदत्वे च" इत्यस्य "अपदादिविधौ" इति निषेधेन प्रत्ययलक्षणेन पदत्वसत्त्वा-त्पदस्यादिरिति पक्षेऽपि सिद्धिरिति भावः । यद्यपि कैयटेन सोपपदात्सिचेर्विजेव नानभिधानादित्युक्तं, तथाऽपि "यचि भम्"

इत्यत्र "सुप्तिङन्तम्" इत्यतः "सुब्" इत्यनुवर्त्य यजादौ असर्वनामस्थाने तत्प्रकृतेर्भसंज्ञा भवति, यजाद्यसर्वनामस्थानपरं सुबन्तं यद्यस्ति तदपि भसंज्ञम्, तेन सुवाचेत्यादौ न कुत्वम् । अत्र तत्प्रकृतेः संज्ञा प्रधानशिष्टा अवयवसुबन्तस्य त्वन्वाचयशिष्टा । एवं "स्वादिषु" इति योगं विभज्य स्वादिषु पूर्वस्य पदत्वं विधाय "असर्वनामस्थाने" इत्यत्र सुबन्तमित्यनुवर्त्य "यचि" इत्यपकृष्य प्रसज्यप्रतिषेधमाश्रित्य यजादौ सर्वनामस्थाने परतः पूर्वं पदं न, तत्परं यदि सुबन्तमस्ति तदपि पदं नेत्यर्थः । सुबन्तं च यजादिप्रत्ययाव्यवहितमेववातो राज-पुरुषादौ पूर्वपदे नलोपादिसिद्धिः । तत्र समुदायस्य "स्वादिषु" इति प्राप्ता, अवयवस्य सुबन्तमिति प्राप्ता, श्रूयमाणे सौ पूर्वपदस्य संज्ञेष्टैव, तेन सुवाचावित्यादिसिद्धिरित्येवम् "उत्तरपदत्वे च" इत्यस्य प्रत्याख्याने दध्नः सेचाविति षष्ठीतत्पुरुषेऽपि षत्वनिषेधाय पञ्चमीसमास आवश्यक इत्यनभिधाने न मानमिति तात्पर्यम् । प्रत्याख्याने पञ्चमीसमासे बहुसेचावित्याद्यर्थं बहुच्पूर्वस्य षत्वं नेति वचनं कार्यं, वार्त्तिकारम्भे तत्रैव कुत्ववारणाय "बहुच्पूर्वस्य चापदा-दिविधौ न" इतिवत् । इदमपि योगविभागस्येष्टसिद्ध्यर्थतया यत्रोत्तरपदस्य कार्यित्वं तद्विषय एव, पदान्तत्वप्रत्युक्तकार्ये एव च बोद्धव्यमित्यन्यत्र विस्तरः । या पदसंज्ञेति । न च राजपुरुषेष्वित्यत्र दोषः, अन्तर्वर्त्तिविभक्त्या सुबन्तमिति पदत्वमाश्रित्य निषेधापत्तेरिति वाच्यम्, सातिग्रहणेन "स्वादिषु" इति यस्य पदसंज्ञा तदुत्तरस्य षत्वनिषेधो नेति ज्ञाप्यते इति तात्पर्यात् । प्रत्याख्यानरीत्या तस्यापि "स्वादिषु" इति पदत्वाच्च । सर्वं चेदं "न लुमता–" इति सूत्रे भाष्ये स्पष्टम् ।

'दधिसेच इत्यादौ प्राक्सुबुत्पत्तेः समासे' असें जें मनोरमेंतील शंकाग्रन्थांत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, ('दधिसेचः' हा उपपदसमास असून या स्थलीं) सोपपद 'सिच्' धातूहून 'विच्' प्रत्यय झाला आहे. केवळ 'सिच्' धातूहून 'विच्' प्रत्यय केल्यास, 'दध्नः सेचौ दधिसेचौ' या समासांत, 'पदस्य आदिः पदादिः' हा षष्ठी-

समासपक्ष मानला तरी देखील, इष्ट रूपाची सिद्धि होते, म्हणजे षत्व होण्याची आपत्ति टळते; कारण 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ' या वार्तिकांत 'अपदादिविधौ' हा निषेध असल्यामुळें, त्या निषेधान्वयें 'सेचौ' या समासांतील उत्तर पदाला प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा होते. ('अन्येभ्योऽपि दृश्यन्ते' सू. २९८० या सूत्रानें केवळ 'सिच्' धातूहून 'विच्' प्रत्यय केल्यास, 'पुगन्तलघूपधस्य च' सू. २१८९ या सूत्रानें उपधेंतील इकाराचा गुण होऊन 'सेच्' असें विच्प्रत्ययान्त रूप होतें. 'दध्नः सेचौ = दधि ङस् सेच् औ औ' या स्थलीं 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५०या सूत्रानें जरी 'ङस्' व 'औ' या दोन अन्तर्वर्तिविभक्ति-प्रत्ययांचा लुक् होतो तरी, 'औ' हा लुप्त प्रत्यय कायम असें आहे 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' सू. २६२ या सूत्रानें मानल्यानें, 'सेच्' ला पदसंज्ञा होते व या उत्तर पदांतील आद्य सकाराचें षत्व करणें असल्यामुळें, म्हणजेच उत्तरपदादिविधि करणें असल्यामुळें 'उत्तर-पदत्वे चापदादिविधौ'–सू. ४४२ वरील वार्तिक–हें निषेधक वार्तिक आड येत नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें या वार्तिकाचा असा अर्थ आहे कीं, 'समासे उत्तरखण्डस्य पदसंज्ञायां कर्तव्यामन्तर्वर्तिविभक्ति-लोपे प्रत्ययलक्षणप्रतिषेधो वक्तव्यः, पदादिविधिं वर्जयित्वा.' अशा रीतीनें 'सेच्' हें पदसंज्ञक ठरत असल्यामुळें, 'पदस्य आदिः पदादिः' असा षष्ठीसमासपक्ष मानला तरी, 'सात्पदाद्योः' सू. २१२३ या निषेधक सूत्रान्वयें 'सेच्' या उत्तरपदांतील आद्य सकाराचें षत्व होत नाहीं. दीक्षितांनीं 'दधिसेचौ' या स्थलीं षष्ठीसमास न मानतां 'दधि सिञ्चतः इति दधिसेचौ' असा जो उपपदसमास मानला आहे त्याचें कारण हें कीं, त्यांच्या मतें सोपपद 'सिच्' धातूहूनच 'विच्' प्रत्यय होतो. त्यामुळें 'दधिसेचौ' हा उपपद समास मानल्याशिवाय 'सिच्' धातूहून 'विच्' प्रत्यय होऊं शकत नाहीं आणि 'गतिकारकोपपदानां कृद्भिःसह समासवचनं प्राक् सुबुत्पत्तेः' –परि. ७६– या परिभाषान्वये कृदन्ताहून सुबुत्पत्ति

होण्यापूर्वी उपपदसमास होत असल्यामुळें, 'सेच्' या कृदन्ताला पदसंज्ञा होऊं शकत नाहीं आणि म्हणूनच 'पदादादिःपदादिः' हा पञ्चमीसमासपक्ष मानून दीक्षितांनीं 'दधिसेचौ' या स्थलीं षत्वाचें निवारण केलें आहे. पण कैयटाचें म्हणणें दीक्षितांच्या म्हणण्या-विरुद्ध असल्यामुळें, शब्दरत्नकार कैयटमताचा उपन्यास करून त्या मताचें खण्डन करण्याकरितां पुढील पंक्ति लिहितात.) जरी कैयटानें असें म्हटलें आहे कीं, सोपपद 'सिच्' धातूहून 'विच्' प्रत्यय होण्याचें अभिधान नसल्यामुळें, म्हणजे कोठेंहि सांगितलें नसल्यामुळें, सोपपद 'सिच्' धातूहून 'विच्' प्रत्यय होऊंच शकत नाहीं तरी, तसें अभिधान नाहीं असें म्हणण्यास कांहींच प्रमाण नसल्यामुळें, कैयटाचें म्हणणें बरोबर आहे असें मानतां येत नाहीं. (या पंक्तीं-तील 'तथापि' या पदाचा 'अनभिधाने न मानम्' या बरेंच पुढें असणाऱ्या पदांशीं अन्वय होत असल्यामुळें, वर प्रमाणें या पंक्तीचा अर्थ केला आहे. 'न लुमताङ्गस्य' १-१-६३ या सूत्रावरील भाष्यांत 'अपदादिविधाविति किमर्थम् ? । दधिसेचौ दधिसेचः— सात्पदा-द्योरिति प्रतिषेधो यथा स्यात्' असें जें भाष्यकारांनीं म्हटलें आहे त्यांतील 'दधिसेचाविति' हें प्रतीक घेऊन कैयटानें 'दध्नः सेचाविति षष्ठीसमासः । उपपदसमासे तु प्राक् सुबुत्पत्तेः समासविधानात् सेच्शब्दस्य पदसंज्ञायाः अभावात् पदादित्वं सकारस्य न स्यात् । अनभिधानाच्च सोपपदाद्विजभावात् दधिषेचावित्यादिप्रयोगाभावात् ।' असें व्याख्यान केलें आहे. या कैयटपंक्तींत 'अनभिधानाच्च' इत्यादि जें म्हटलें आहे तसें म्हणण्यास वास्तविक कांहीं प्रमाण नाहीं हें सिद्ध करण्याकरितां शब्दरत्नकार पुढील पंक्ति लिहितात.) 'यचि भम्' सू. २३१ या सूत्रांत 'सुप्तिङन्तं पदम्' या पूर्व सूत्रांतून 'सुप्' या पदाची अनुवृत्ति केल्यानें (व त्या अनुवृत्त 'सुप्' शब्दाचा प्रत्ययग्रहणपरिभाषान्वयें 'सुबन्तम्' असा अर्थ होत असल्यामुळें, 'यचि भम्' या सूत्राचा असा अर्थ होतो कीं,) यकारादि किंवा अजादि असर्वनामस्थानप्रत्यय पुढें असतां, त्या

प्रत्ययाच्या प्रकृतीला–अङ्गाला–भसंज्ञा होते आणि तसेंच तशा यजादि असर्वनामस्थानप्रत्ययापूर्वीं 'सुप् = सुबन्त' असल्यास, त्या सुबन्ताला देखील भसंज्ञा होते. असा त्या सूत्राचा अर्थ केल्यानें, 'सुवाचा' इत्यादि स्थलीं कुत्व होत नाहीं. ('सुष्ठु वाक् यस्य सः सुवाक् तेन सुवाचा = सु वाच सु टा' या स्थलीं 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'वाच्' पुढें असणाऱ्या 'सु' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा जरी लुक् होतो तरी, त्याला प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा केल्यास, 'चोः कुः' सू. ३७८ या सूत्रानें 'वाच्' यांतील चकाराचें कुत्व होऊन, 'सुवाचा' असें इष्ट रूप न होतां, 'सुवाका' असें अनिष्ट रूप होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरितांच 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ' हें वार्तिक पठित केलें आहे. 'सुवाचा' या स्थलीं 'वाच्' या उत्तरपदाच्या आद्य वर्णाला कार्य करणें नसून 'च्' या अन्त्य वर्णाला कार्य करणें असल्यामुळें, म्हणजेच येथें पदादिविधि करणें नसून पदान्तविधि करणें असल्यामुळें, वरील वार्तिकान्वयें 'प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्' या सूत्राची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'वाच्' या उत्तर पदाला पदसंज्ञा होऊं शकत नाहीं आणि अशा रीतीनें 'वाच्' यांतील चकाराचें कुत्व होण्याची आपत्ति टळते. परंतु 'यचि भम्' या सूत्राचा जसा वर अर्थ केला आहे त्या अर्थान्वयें देखील 'सुवाच्' यांतील 'वाच् सु' या सुबन्ताला, त्याच्या पुढें 'टा = आ' हा अजादि असर्वनामस्थानप्रत्यय असल्यामुळें, भसंज्ञा होते आणि आशा रीतीनें त्याला पदसंज्ञा होत नसल्यामुळें, वरील वार्तिक न मानलें तरी, 'वाच्' यांतील अन्त्य चकाराचें कुत्व होण्याची आपत्ति टळते.) 'यचि भम्' या सूत्रानें दोन ठिकाणीं भसंज्ञा होते असें जें वर सांगितलें आहे त्यांपैकीं यजादि असर्वनामस्थानप्रत्ययाच्या प्रकृतीला होणारी भसंज्ञा प्राधान्यानें उपदिष्ट असलेली संज्ञा असून सुबन्त अवयवाला जी भसंज्ञा होणें सांगितली आहे ती अन्वाचयशिष्टा, अनुषंगानें होणारी संज्ञा, होय. ('सु वाच् सु टा' या स्थलीं 'टा' प्रत्ययाची 'सुवाच्'

ही जी प्रकृति आहे त्या प्रकृतीला 'यचि भम्' या सूत्रानें भसंज्ञा होणें हें प्राधान्येंकरून सांगितलें आहे व ती संज्ञा करितांना त्या अङ्गांत अन्तर्भूत असलेल्या 'वाच् सु' या सुबन्तापुढें 'टा' प्रत्यय आला असल्यामुळें, त्या सुबन्ताला होणारी भसंज्ञा ही केवळ अनुषंगानें होणारी संज्ञा आहे असें म्हटलें आहे.) याचप्रमाणें स्वादिष्वसर्वनामस्थाने' सू. २३० या सूत्राचा 'स्वादिषु' व 'असर्वनामस्थाने' असा योगविभाग केल्यानें, 'स्वादिषु' (या भागांत 'सुप्तिङन्तं पदम्' या पूर्वसूत्रांतून 'पदम्' हें पद अनुवृत्त होत असून 'स्वादिषु पदम्' असें हें सूत्र होत असल्यामुळें) या पूर्व भागाचा, 'सु' इत्यादि प्रत्यय पुढें असतां त्यांच्या प्रकृतीला पदसंज्ञा होते, असा अर्थ होतो. 'असर्वनामस्थानें' या द्वितीय भागांत ('सुप्तिङन्तं पदम्' या पूर्व सूत्रांतून 'सुप्' ची, म्हणजेच) 'सुबन्तम्' या पदाची अनुवृत्ति केल्यानें व 'यचि भम्' या उत्तर सूत्रांतून 'यचि' या पदाचें अपकर्षण केल्यानें आणि 'असर्व-नामस्थाने' हा (पर्युदास न मानतां) प्रसज्यप्रतिषेध मानल्यानें, 'असर्वनामस्थाने' या द्वितीय भागाचा असा अर्थ होतो कीं, यकारादि किंवा अजादि सर्वनामस्थानप्रत्यय पुढें असतां त्याच्या प्रकृतीला पदसंज्ञा होत नाहीं व तशा प्रत्ययापूर्वी सुबन्त असल्यास त्या सुबन्ताला देखील पदसंज्ञा होत नाहीं. ('सुडनपुंसकस्य' सू. २२९ या सूत्रान्वयें 'सु, औ, जस्, अम् औट्' या पुल्लिङ्ग किंवा स्त्रीलिङ्ग प्रकृतीहून होणाऱ्या पांच प्रत्ययांना सर्वनामस्थानसंज्ञा होते. 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' या सूत्राचा वरप्रमाणें योगविभाग करून जसा वर अर्थ केला आहे त्या अर्थान्वयें, 'सु' हा सर्वनामस्थान-प्रत्यय पुढें असतां त्याच्या प्रकृतीला पदसंज्ञा होते, पण 'औ, जस्, अम्, औट्' हे चार अजादि सर्वनामस्थानप्रत्यय पुढें असतां त्यांच्या प्रकृतीला पदसंज्ञा होत नाहीं, आणि तसेंच त्यांच्या लगेंच पूर्वी असलेल्या सुबन्ताला देखील पदसंज्ञा होत नाहीं.) 'असर्वनामस्थाने' या द्वितीय भागानें ज्या सुबन्ताला पदसंज्ञा न

होणें सांगितलें आहे तें सुबन्त यजादि सर्वनामस्थानप्रत्ययाच्या लगेंच पूर्वी असलें पाहिजे, व असा अर्थ केल्यानें 'राजपुरुषौ' इत्यादि स्थलीं पूर्वपदांतील नकाराचा लोप होणें इत्यादि कार्यांची सिद्धि होते. ('राजन् ङस् पुरुष औ औ' या स्थलीं 'औ' हा अजादि सर्वनामस्थानप्रत्यय पुढें असल्यामुळें, त्याच्या प्रकृतीला, म्हणजे 'राजन् ङस् पुरुष औ' या प्रकृतीला, वरील अर्थान्वयें पदसंज्ञा होत नाहीं आणि त्याचप्रमाणें त्या अजादि सर्वनामस्थानप्रत्ययाच्या लगेंच पूर्वी असलेल्या 'पुरुष औ' या अन्तर्भूत सुबन्ताला देखील, 'औ' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा लुक् झाल्यावर प्रत्ययलक्षणानें होणारी, पदसंज्ञा होत नाहीं. पण 'राजन् ङस्' हा समासांतील पूर्व अवयव त्या अजादिसर्वनामस्थान 'औ' प्रत्ययाच्या लगेंच पूर्वी नसल्यामुळें, त्याला 'ङस्' प्रत्ययाचा लुक् झाल्यावर प्रत्यय-लक्षणानें पदसंज्ञा होतेच, आणि त्यामुळें 'न लोपः प्रातिपदिकान्तस्य' सू. २३६ या सूत्रानें 'राजन्' या पूर्व पदांतील अन्त्य नकाराचा लोप होऊन 'राजपुरुषौ' असें इष्ट रूप सिद्ध होतें.) अशा रीतीनें योग विभाग करून ज्याप्रमाणें वर अर्थ केला आहे त्या अर्थान्वयें प्रथमेच्या एकवचनाचा 'सु' हा प्रत्यय (जरी सर्वनामस्थानप्रत्यय आहे तरी तो यजादि नसल्यामुळें) पुढें असतां, त्याच्या समुदायरूप प्रकृतीला 'स्वादिषु' या भागानें जी पदसंज्ञा प्राप्त होते व त्या 'सु' प्रत्ययाच्या लगेंच पूर्वी समुदायांत सुबन्त अवयव असल्यास त्या सुबन्त अवयवाला ('असर्वनामस्थानें' या भागानें) जी पदसंज्ञा प्राप्त होते तशी संज्ञा होणें इष्टच आहे. ('स्वादिष्वसर्वनामस्थाने' या सूत्राचा योगविभाग न केल्यास, 'सु' हा सर्वनामस्थानप्रत्यय पुढें असतांना त्याच्या प्रकृतीला पदसंज्ञा होऊं शकत नाहीं. पण योगविभाग केल्यानें, 'सु' हा यजादि प्रत्यय नसल्यामुळें, जरी तो सर्वनामस्थानप्रत्यय आहे तरी, त्याच्या प्रकृतीला पदसंज्ञा होतेच, व तशी संज्ञा होणें इष्ट आहे असें म्हणण्याचें कारण हें कीं, 'साविति पदम्' असें भाष्यांत ठिकठिकाणीं म्हटलें आहे.) अशा

रीतीनें 'सुवाचौ' इत्यादि रूपांची सिद्धि होते. ('सुष्ठु वाक् ययोः तौ सुवाचौ = सु वाच् सु औ' या स्थलीं 'औ' हा अजादि सर्वनामस्थानप्रत्यय पुढें असल्यामुळें जशी त्या प्रत्ययाच्या 'सुवाच्' या समुदायरूप प्रकृतीला पदसंज्ञा होत नाहीं त्याचप्रमाणें त्या 'औ' प्रत्ययाच्या लगेंच पूर्वी असलेल्या 'वाच्' या समुदायान्तर्भूत सुबन्ताला, 'सु' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा लुक् झाल्यावर प्रत्ययलक्षणानें प्राप्त होणारी, पदसंज्ञा होत नाहीं व अशा रीतीनें 'वाच्' हें पदसंज्ञक ठरत नसल्यामुळें, 'चोः कुः' सू. ३७८ या सूत्रानें पदान्ती असलेल्या चवर्गाचें होणारें कुत्व न होतां, 'सुवाचौ' हें इष्ट रूप सिद्ध होतें.) अशा रीतीनें 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ' हें वार्तिक अनावश्यक ठरत असल्यामुळें त्या वार्तिकाचें प्रत्याख्यान केल्यास, 'दध्न सेचौ दधिसेचौ' या षष्ठीतत्पुरुषसमासांत देखील षत्व न व्हावें याकरितां 'सात्पदाद्योः' सू. २१२३ या सूत्रांतील 'पदादि' या शब्दाचा पञ्चमीसमास मानणें आवश्यक आहे. ('दध्नः सेचौ = दधि ङस् सेच् औ औ' या स्थलीं 'औ' हा सर्वनामस्थान अजादि प्रत्यय पुढें असल्यामुळें, वर जसा 'स्वादिषु' सू. २३० या सूत्राचा योगविभाग करून अर्थ केला आहे त्या अर्थान्वयें, 'दधिसेच्' या समुदायाला पदसंज्ञा होत नाहीं व त्याचप्रमाणें त्या प्रत्ययाच्या लगेंच पूर्वी असलेल्या 'सेच् औ' या अन्तर्भूत सुबन्ताला, 'औ' प्रत्ययाचा लुक् झाल्यावर प्रत्ययलक्षणानें प्राप्त होणारी पदसंज्ञा होत नाहीं. त्यामुळें 'सात्पदाद्योः' या सूत्रांतील 'पदादि' या शब्दाचा 'पदस्य आदिः' असा षष्ठीतत्पुरुष समास केल्यास, 'सेच्' हें वर सांगितल्याप्रमाणें पदसंज्ञक ठरत नसल्यामुळें, त्या षत्वनिषेधक सूत्राची प्रवृत्ति येथें होऊं शकत नाहीं आणि 'सेच्' यांतील आद्य सकाराचें षत्व होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरितां 'सात्पदाद्योः' या सूत्रांतील 'पदादि' या शब्दाचा 'पदात् आदिः पदादिः' असा पञ्चमीसमास करणें आवश्यक आहे. तसा समास केला असतां, 'औ' या अजादि

सर्वनामस्थान प्रत्ययाच्या लगेंच पूर्वी 'दधि ङस्' हें सुबन्त नसल्या-मुळें, 'ङस्' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा लुक् झाल्यावर 'दधि' या शब्दाला प्रत्ययलक्षणानें प्राप्त होणारी पदसंज्ञा कायम राहतेच व त्या 'दधि' पदाच्या लगेंच पुढें 'सेच्' यांतील सकार असल्यामुळें, त्या सकाराचें षत्व होण्याची आपत्ति टळते. अशा रीतीनें 'दधि-सेचौ' इत्यादि स्थलीं 'सेच्' याला पदसंज्ञा होत नसली तरी देखील षत्वाचें निवारण होऊं शकत असल्यामुळें,) 'सोपपदात् सिचेर्विजेव न, अनभिधानात्' असें जें कैयटानें म्हटलें आहे तें बरोबर आहे असें मानतां येत नाहीं असा वरील विवेचनाचा तात्पर्यार्थ आहे. (कैयटानें वरप्रमाणें जें म्हटलें आहे त्याचें कारण हें कीं, 'दधिसेचौ' या स्थलीं उपपदसमास केल्यास, तो समास 'गतिकारकोपपदानाम्' – परि. ७२ – या परिभाषान्वयें 'सेच्' या कृदन्ताहून सुबुत्पत्ति होण्यापूर्वीं होत असल्यामुळें, 'सेच्' याला पदसंज्ञा होऊं शकत नाहीं व त्यामुळें 'सात्पदाद्योः' या सूत्रांतील 'पदादि' या शब्दाचा 'पदस्य आदिः पदादिः' असा षष्ठीसमास त्यांच्या मतें मानणेंच उचित असल्यामुळें, 'सेच्' यांतील सकाराचें प्रकृत सूत्रानें षत्व होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति कैयटाच्या मतें टाळणें अशक्य असल्यामुळें, कैयटानें 'सोपपदात् सिचेर्विजेव न, अनभिधानात्' असें म्हटलें आहे. दुसरें असें कीं, 'अन्येभ्योऽपि दृश्यन्ते' सू. २९८० या सूत्रांत 'त्रिजुपे छन्दसि' सू. ३४१३ या पूर्व सूत्रांतून 'छन्दसि' या पदाची कैयटानें अनुवृत्ति मानली असल्यामुळें, जरी सोपपद 'सिच्' धातूहून वैदिक प्रयोगांत 'विच्' प्रत्यय होतो तरी भाषेंत सोपपद 'सिच्' धातूहून त्याच्या मतें 'विच्' प्रत्यय होऊं शकत नाहीं. परंतु काशिका इत्यादि ग्रन्थांत सांगितल्याप्रमाणें 'अन्येभ्योऽपि दृश्यन्ते' या सूत्रांत 'छन्दसि' या पदाची निवृत्ति होत असल्यामुळें, सोपपद 'सिच्' धातूहून लौकिक प्रयोगांत देखील 'विच्' प्रत्यय होऊं शकतो हें उघड होतें. त्यामुळें 'दधिसेचौ' या स्थलीं उपपदसमास मानला तरी, 'पदादादिः

पदादिः' असा 'पदादि' शब्दाचा पञ्चमीसमास केल्यानें 'सेच्' यांतील सकाराचें षत्व होण्याची आपत्ति टळत असल्यामुळें, 'अनभिधानात्' इत्यादि जें कैयटानें म्हटलें आहे तें बरोबर मानतां येत नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा तात्पर्यार्थ आहे.) 'उत्तरपदत्वे चापदादिविधौ' हें वार्तिक मानल्यास 'बहुसेचौ' या स्थलीं कुत्वाचें निवारण होण्याकरितां ज्याप्रमाणें 'बहुच्पूर्वस्य चापदादिविधौ न' असें वचन पठित करावें लागतें त्याचप्रमाणें त्या वार्तिकाचें प्रत्याख्यान केल्यास व 'सात्पदाद्योः' या सूत्रांतील 'पदादि' हा पञ्चमीतत्पुरुषसमास मानल्यास, 'बहुसेचौ' इत्यादि स्थलीं षत्वाचें निवारण होण्याकरितां 'बहुच्पूर्वस्य षत्वं न' असें वचन पठित केलें पाहिजे. इष्ट रूपांची सिद्धि होण्याकरितां योगविभाग केला जात असल्यामुळें, 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' या सूत्राचा वर योग-विभाग करून ज्या भसंज्ञा व पदसंज्ञा होणें सांगितल्या आहेत त्या संज्ञा देखील, जेथें उत्तर पदाला कार्य करणें असेल व तें कार्य त्या उत्तर पदाला पदान्तत्वरूप निमित्तामुळें होणारें कार्य असेल, तशाच ठिकाणीं कराव्या असें इतर ग्रन्थांत विस्तारपूर्वक सांगितलें आहे. ('विभाषा सुपो बहुच् पुरस्तात् तु' सू. २०२३ या सूत्रानें सुबन्ता-हून 'ईषदसमाप्त' या अर्थामध्यें 'बहुच्' प्रत्यय होणें सांगितलें आहे व या सूत्रांत 'पुरस्तात्' हें पद घातलें असल्यामुळें, 'प्रत्ययः, परश्च' सू. १८०,१८१ या सूत्रांन्वयें 'बहुच' प्रत्यय प्रकृतीच्या पुढें न होतां, प्रकृतीच्या पूर्वी होतो. म्हणून 'सेच् औ' या सुबन्ताहून 'बहुच् = बहु' हा प्रत्यय केला असतां, 'बहु सेच् औ' अशी स्थिति झाल्यावर हा समुदाय तद्धितान्त नसून तद्धितादि असल्यामुळें, 'कृत्तद्धितसमासाश्च' सू. १७९ या सूत्रानें त्याला प्रातिपदिकसंज्ञा होऊं शकत नाहीं. तथापि हा समुदाय अर्थवान असल्यामुळें, 'अर्थवदधातुः या सूत्रान्वयें त्याला प्राति-पदिकसंज्ञा होते व या समुदायाचे अन्तीं असलेला 'औ' प्रत्यय समुदायाहून झाला नसून 'सेच्' या शब्दाहून झाला असल्यामुळें, या

समुदायाला प्रातिपदिकसंज्ञा करतेवेळीं 'अप्रत्यय:' हा निषेध आड येत नाहीं. अशा रीतीनें हा समुदाय प्रातिपदिकसंज्ञक ठरत असल्यामुळें 'सुपो धातुप्रातिपदिकयो:' सू. ६५० या सूत्रानें 'औ' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा लुक् होतो व तो प्रत्ययलक्षणानें विद्यमान आहे असें मानलें तरी, 'औ' हा अजादि सर्वनामस्थान-प्रत्यय असल्यामुळें 'सेच्' याला, योगविभाग करून वर जो अर्थ केला आहे त्या अर्थान्वयें, पदसंज्ञा होऊं शकत नाहीं. त्यामुळें 'पदस्य आदि: पदादि:' असा षष्ठीसमासपक्ष मानला तरी, 'सेच्' हें पदसंज्ञक ठरत नसल्यामुळें, 'सात्पदाद्यो:' या षत्वनिषेधक सूत्राची प्रवृत्ति होऊं शकत नाहीं व 'सेच्' यांतील सकाराचें षत्व होण्याची आपत्ति येते. 'पदादादि: पदादि:' असा पञ्चमीसमासपक्ष मानला तरी, 'बहुसेचौ' या स्थलीं 'बहुच्' हा प्रत्यय असून पद नसल्यामुळें व अशा रीतीनें 'सेच' हा शब्द पदाच्या पुढें नसल्यामुळें, वरील षत्वनिषेधक सूत्र प्रवृत्त होऊं शकत नाहीं व 'सेच्' यांतील सकाराचें या पक्षांत देखील षत्व होण्याची आपत्ति येते. धातुपाठांत 'षिच क्षरणे' धा. नं. १४३४ असा षकारादि धातु पठित केला असून 'धात्वादे: ष: स:' सू. २२६४ या सूत्रानें त्या धातूंतील षकाराचे जागीं सकारादेश झाला असल्यामुळें, प्रकृत सूत्रांतील 'आदेश' या शब्दानें त्या आदेशरूप सकाराचें ग्रहण होतें व तो सकार 'बहु' यांतील 'उ' या 'इण' पुढें असल्यामुळें, त्याचें प्रकृत सूत्रानें षत्व होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरितां 'बहुच्पूर्वस्य षत्वं न' म्हणजे ज्या सकारादि शब्दापूर्वीं 'बहुच्' प्रत्यय लागलेला असेल त्या शब्दांतील आद्य सकाराचें षत्व होऊं नये, असें वचन पठित केलें पाहिजे असें शब्दरत्नकार म्हणतात, आणि तसें वचन पठित करणें योग्य आहे याचें समर्थन करण्याकरितां त्यांनीं 'वार्तिकारम्भे तत्रैव ... इतिवत्' ही पंक्ति लिहिली आहे. वार्तिकारंभपक्षांत 'स्वादिषु' या सूत्राचा वरप्रमाणें योगविभाग करण्याची कांहीं गरज नाहीं. 'उत्तर-

पदत्वे चापदादिविधौ' या वार्तिकाचें प्रत्याख्यान करणें असल्यास तसा योगविभाग करावा लागत असल्यामुळें, वार्तिकारंभपक्षामध्यें 'बहुसेच् औ' यांतील 'औ' या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाचा लुक् केल्यावर जरी तो अजादि सर्वनामस्थानप्रत्यय आहे तरी तो प्रत्ययलक्षणानें विद्यमान् आहे असें मानल्यानें 'सेच्' याला, योग विभागाच्या अभावीं, 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रानें पदसंज्ञा होते व 'सेच्' याला पदादिविधि करणें नसून पदान्तविधि करणें आहे तरी, म्हणजे 'सेच्' यांतील आद्य वर्णाला कार्य करणें नसून 'च्' या अन्त्य वर्णाला कुत्वकार्य करणें आहे तरी, 'बहुसेच्' यांतील 'बहु' हें पूर्व पद नसून प्रत्यय असल्यामुळें व 'उत्तरपद' याचा 'समासांतील चरमावयव' असा रूढ अर्थ असून येथें समास झाला नसल्यामुळें आणि अशा रीतीनें 'सेच्' हें उत्तरपद ठरत नसल्यामुळें, या स्थितींत 'उत्तरपदत्वे' हें निषेधक वार्तिक प्रवृत्त होऊं शकत नाहीं. त्यामुळें 'सेच्' याला प्रत्ययलक्षणानें प्राप्त झालेल्या पदसंज्ञेचा बाध न होतां त्याची पदसंज्ञा कायम राहते व त्यामुळें त्या पदांतील अन्त्य चकाराचें कुत्व होण्याची आपत्ति येते. ती आपत्ति टाळण्याकरितां वार्तिकारंभपक्षांत 'बहुच्पूर्वस्य चापदादिविधौ न,' म्हणजे 'पदादिविधिभिन्ने पदान्तस्य बहुच्पूर्वस्य कार्ये कर्तव्ये प्रत्ययलक्षणं न,' हें वचन पठित करावें लागतें. या वचनान्वयें 'बहुच्' प्रत्ययापुढें असलेल्या 'सेच्' याला पदान्तविधि करणें असल्यामुळें, त्याला प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा करतां येत नाहीं. त्यामुळें 'सेच्' हें पदसंज्ञक ठरत नसल्यामुळें, त्यांतील अन्त्य चकाराचें कुत्व होण्याची आपत्ति टळते. म्हणून शब्दरत्नकार म्हणतात कीं, ज्याप्रमाणें वार्तिकारंभपक्षांत 'बहुसेचौ' या स्थलीं कुत्वाचें निवारण होण्याकरितां 'बहुच्पूर्वस्य चापदादिविधौ न' हें वचन पठित करावें लागतें त्याचप्रमाणें वार्तिकप्रत्याख्यानपक्षांत 'सात्पदाद्योः' या सूत्रांतील 'पदादि' हा पञ्चमीसमास मानल्यास, 'बहुसेचौ' या स्थलीं जी षत्व होण्याची आपत्ति येते ती टाळण्याकरितां 'बहुच्पूर्वस्य षत्वं न' हें वचन पठित करावें लागतें.

सारांश वार्तिकारंभपक्ष व वार्तिकप्रत्याख्यानपक्ष हे दोन्ही सदोष ठरतात. तथापि 'योगविभागादिष्टसिद्धिः'–परि. १२३–या परिभाषान्वयें इष्ट रूपांची सिद्धि करण्याकरितांच योगविभाग केला जात असल्यामुळें, वर जो योगविभाग केला आहे त्या योगविभागान्वयें अनिष्ट रूपें सिद्ध न होतां इष्ट रूपें सिद्ध व्हावीं याकरितां हें मानणें आवश्यक आहे कीं, जेथें उत्तरपदाला कार्य करणें आहे व तें कार्य त्या उत्तरपदाच्या अन्त्यवर्णाला करणें आहे तशाच ठिकाणीं त्या योगविभागान्वयें होणाऱ्या भसंज्ञा व पदसंज्ञा इष्टसिद्ध्यर्थ कराव्या. 'बहुसेचौ' या स्थलीं 'सेच्' हें वर सांगितल्याप्रमाणें उत्तरपद नाहीं व तसेंच 'सेच्' यांतील अन्त्य वर्णाला कार्य करणें नसून आद्य वर्णाला षत्वकार्य करणें आहे. म्हणून वरील नियमान्वयें 'बहुसेचौ' यांतील 'सेच्' याला प्रत्ययलक्षणानें प्राप्त होणाऱ्या पदसंज्ञेचा योगविभागानें प्राप्त होणाऱ्या भिन्न संज्ञेनें बाध न करितां ती पूर्व संज्ञा जशीची तशीच अबाधित कायम ठेविली पाहिजे. तसें केलें असतां, 'सेच्' हें पदसंज्ञक ठरतें व 'सात्पदाद्योः' या सूत्रांतील 'पदादि' या शब्दाचा षष्ठीसमास मानल्यानें तें षत्वनिषेधक सूत्र प्रवृत्त होऊन 'बहुसेचौ' या स्थलीं षत्वाचें निवारण करतां येतें व षत्वनिवारणार्थ 'बहुच्पूर्वस्य षत्वं न' हें वचन पठित करण्याची गरज पडत नाहीं. अशा रीतीनें वर जो नियम सांगितला आहे तो मानल्यास, वार्तिकप्रत्याख्यानपक्ष सदोष ठरत नाहीं असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) मनोरमेंत 'स्वादिष्विति या पदसंज्ञा तामाश्रित्योक्तनिषेधो न प्रवर्तते' असें जें म्हटलें आहे तें बरोबर मानल्यास, 'राजपुरुषेषु' या स्थलीं दोष येतो, कारण अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययाला मानून सुबन्तत्वामुळें होणाऱ्या पदसंज्ञेचा आश्रय केल्यास 'सात्पदाद्योः' हें निषेधक सूत्र प्रवृत्त होण्याची आपत्ति येते असें कोणी म्हटल्यास, तें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'सात्पदाद्यो' या सूत्रांत 'सात्' या प्रत्ययाचें ग्रहण केलें असल्यामुळें त्यावरून हें ज्ञापित होतें कीं, जेथें 'स्वादिषु' सू. २३० या सूत्रानें

पदसंज्ञा होते तेथें तशा पदसंज्ञक होणाऱ्या शब्दापुढें असलेल्या सकाराला 'सात्पदाद्योः' हा निषेध लागू पडत नाहीं असें भाष्य-कारांच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे. (शंकाकार असें म्हणतो कीं, 'राज्ञः पुरुषाः राजपुरुषाः तेषु = राजन् ङस् पुरुष जस् सुप्' या स्थलीं 'सुपो धातुप्रातिपदिकयोः' सू. ६५० या सूत्रानें 'ङस्' व जस या अन्तर्वर्तिविभक्तिप्रत्ययांचा लुक् केला असतां, 'जस्' हा प्रत्यय प्रत्ययलक्षणानें विद्यमान आहे असें मानल्यानें 'पुरुष' या उत्तर-पदाला 'सुप्तिन्ङन्तं पदम्' सू. २९ या सूत्रानें पदसंज्ञा होते व जेथें उत्तरपदाला कार्य करणें आहे तशाच ठिकाणीं 'उत्तरपदत्वे चापदादि विधौ' हें निषेधक वार्तिक लागू पडत असल्यामुळें व वरील उदाहरणांत 'पुरुष' या उत्तरपदाला कोणतेंहि कार्य करणें नसून त्या पुढील 'सु' प्रत्ययाला षत्वनिषेधरूप कार्य करणें असल्या-मुळें. 'पुरुष' या उत्तरपदाला पदसंज्ञा करितांना तें वार्तिक आड येत नाहीं. म्हणून 'सात्पदाद्योः' सूत्रांतील 'पदादि' या पदाचा 'पदात् आदिः पदादिः' असा पञ्चमीसमास केल्यास, 'स्वादिषु' या सूत्रानें पदसंज्ञक न ठरणाऱ्या व 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रानें पदसंज्ञक ठरणाऱ्या 'पुरुष' या उत्तरपदापुढें 'सुप्' प्रत्ययांतील सकार येत असल्यामुळें, 'सात्पदाद्योः' या निषेधक सूत्रानें त्या सकाराचें षत्व न होण्याची आपत्ति येते आणि म्हणून पञ्चमीसमासपक्ष मानणें अयोग्य ठरतें. या शंकेवर शब्दरत्नकार असें उत्तर देतात कीं, वरील उदाहरणात 'पुरुष' या उत्तर-पदाला 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रान्वयें प्रत्ययलक्षणानें पदसंज्ञा होऊं शकते असें मानलें तरीं, सप्तमीच्या बहुवचनाचा 'सु' हा प्रत्यय 'राजपुरुष' या संपूर्ण समुदायाहून झाला असल्यामुळें, त्या समुदायाला 'स्वादिषु' सू. २३० या सूत्रानेंच पदसंज्ञा होते व त्या सूत्रानें पदसंज्ञक ठरण्याऱ्या 'राजपुरुष' या शब्दापुढें 'सु' प्रत्ययां-तील सकार आला असल्यामुळें, पञ्चमीसमासपक्षांत देखील, 'सात्पपाद्योः' हा निषेध प्रवृत्त होऊं शकत नाहीं; कारण 'न

लुमताङ्गस्य' सू. १–१–६३ या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकारांनीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, 'सात्प्रतिषेधो ज्ञापकः स्वादिषु पदत्वेन येषां पदसंज्ञा न तेभ्यः प्रतिषेधो भवतीति,' म्हणजे 'सात्पदाद्योः' या सूत्रांत 'सात्' या प्रत्ययाचें ग्रहण केलें असल्यामुळें त्यावरून हें ज्ञापित होतें कीं 'स्वादिषु' सू. २३० या सूत्रानें पदसंज्ञक होणाऱ्या शब्दापुढें सकार आल्यास तें निषेधक सूत्र प्रवृत्त होत नाहीं. म्हणून शंकाकारानें केलेली शंका चूक ठरते असा शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय आहे.) वार्तिकप्रत्याख्यान पक्षांत देखील वरील उदाहरणांतील 'पुरुष' या उत्तरपदाला 'स्वादिषु' या सूत्रानेंच पदसंज्ञा होते ('उत्तरपदत्वे चापदादिविधौ' या वार्तिकाचें प्रत्याख्यान करण्याकरितां 'स्वादिष्वसर्वनामस्थाने' या सूत्राचा पूर्वीं सांगिल्याप्रमाणें योगविभाग करून जो अर्थ केला आहे त्या अर्थान्वयें 'स्वाद्यनन्तरसमुदायावयवसुबन्तं यद्यस्ति तदपि पदसंज्ञं भवति' असा अर्थ निष्पन्न होत असल्यामुळें, 'राजपुरुष' या समुदायांतील 'पुरुष' या सुबन्त अवयवाला देखील 'स्वादिषु' या योगविभागानेंच पदसंज्ञा होते व 'स्वादिषु' या सूत्रान्वयें पदसंज्ञक ठरणाऱ्या 'पुरुष' या शब्दापुढें 'सु' प्रत्ययांतील सकार आला असल्यामुळें, वर सांगितलेल्या भाष्यसिद्धान्तान्वयें 'सात्पदाद्योः' हा निषेध येथें प्रवृत्त होऊं शकत नाहीं आणि त्यामुळें त्या प्रत्ययांतील सकाराचें षत्व होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं.) 'न लुमताङ्गस्य' १-१-६३ या सूत्रावरील भाष्यांत हें सर्व स्पष्टपणें सांगितलें आहे. (तें भाष्य वर दिलेंच आहे व त्याचें विवरण पूर्वीं केलेंच आहे.)

शब्दरत्न—व्यतिसे इति। यद्यपि व्यतिहारस्यानेकर्तृकक्रिया-विषयत्वादेकवचनस्य तत्रासम्भवस्तथाऽपि विश्वामित्राश्रमे मारीचं प्रति किमर्थं ब्रह्मवधं करोषीति पृष्टे ममायं धर्म इति तेनोत्तरिते।

"धर्मोऽस्ति सत्यं तव राक्षसायमन्यो व्यतिस्ते तु ममापि धर्मः। ब्रह्मद्विषस्ते प्रणिहन्मि येन"—(भट्टि का.)

इति भट्टिकाव्यस्थरामवाक्ये तव धर्मेण ममान्यो धर्मस्तपोरूपो व्यत्यासेन भवति येन धर्मेण त्वत्सम्बन्धिनो निहन्मीत्यर्थके एकवचन-दर्शनान्न दोषः । अद्यारभ्य त्वद्धर्मः क्रौर्यं मयि भवति, मद्धर्मोऽक्रौर्यं च त्वयि । "वर्त्तमानसामीप्ये" लट् । रामबाणपातेन समुद्रसमीपे पतितो मारीचस्तपश्चचारेति रामायणे प्रसिद्धम् । अन्यसम्बन्धिक्रिया-मितरः करोति, इतरसम्बन्धिनीमन्य इति कर्मव्यतिहारसम्भवादिति जयमङ्गला । व्यतिसे इत्यस्य हे चैत्र मैत्रेण सह व्यत्यस्तो भवसी-त्यर्थः । यद्देशे मैत्रसत्ता तद्देशे चैत्रस्य सा, यद्देशे चैत्रस्य सा तद्देशे मैत्रस्य सेति फलति । यद्यपि व्यपदेशिवद्भावेनैकाच्त्वादेरिवास्याप्य-शास्त्रीय स्यातिदेशो वक्तुं शक्यः । रामेष्वित्यादौ त्वसहायत्वाभावान्न तत्प्रवृत्तिस्तथाऽपि पूर्वपक्ष्युक्तमभ्युपेत्यापि समाधातुमुपक्रमते-नवयमित्यादिना । सिद्धान्तादिति । "सुप्तिङन्तम्" इत्यत्र "यस्मा-त्प्रत्ययविधिः" इत्यनुवृत्तेरिति भावः । अत्र कृतेऽप्येकादेशे एक-देशविकृतन्यायेनोक्तरीत्या मान्तस्य प्रकृतित्वात् औ इत्यस्य परादित्वं साधितम् ।

अनुपयोगाच्चेति । चेन ससहाये व्यपदेशिवद्भावाप्रवृत्त्या तत्संनिधाने तेषां पदत्वं नास्तीति सूचितम् । "आद्यन्तवत्–" सूत्रस्थभाष्योक्तैकपुत्रादिदृष्टान्तबलेन तथैव लाभादिति दिक् ।

व्यतिहार, म्हणजे क्रियाविनिमय, होण्याकरितां एकापेक्षां अधिक कर्ते आवश्यक असल्यामुळें, 'व्यतिसे' असा एकवचनाचा प्रयोग जरी क्रियाविनिमयरूप अर्थामध्यें होऊं शकत नाहीं तरी, विश्वामित्राच्या आश्रमांत रामानें जेव्हां मारिचाला प्रश्न केला कीं तूं ब्राम्हणांचा वध कां करतोस तेव्हां हा माझा धर्म आहे असें मारिचानें उत्तर दिलें असतां, 'धर्मोऽस्ति सत्यं तव राक्षसायमन्यो व्यतिस्ते तु ममापि धर्मः । ब्रह्मद्विषस्ते प्रणिहन्मि येन' असें जें रामानें त्याला भट्टिकाव्यांतील (द्वितीय सर्गातील ३५ व्या) श्लोकांत उत्तर दिलें आहे त्या उत्तरांत 'तव धर्मेण ममान्यो धर्मस्तपोरूपो

व्यत्यासेन भवति येन धर्मेण त्वत्सम्बन्धिनो निहन्मि' म्हणजे तुझा ब्राम्हणहननरूप धर्म व माझा तपाचरणरूप धर्म या दोन धर्मांत आतां विनिमय होणार व तुझ्या धर्माचा अङ्गिकार करून मी तुझ्या संबंधिजनांचा वध करणार, या अर्थामध्यें 'व्यतिस्ते' असा एक-वचनाचा प्रयोग केला असल्यामुळें, कांहीं दोष येत नाहीं. (रामाच्या म्हणण्याचा भावार्थ हा आहे कीं,) आजपासून तुझे ठिकाणीं असणारा क्रौर्यरूप धर्म माझे ठिकाणीं येणार व माझे ठिकाणीं असणारा क्रोधराहित्यरूप धर्म तुझे ठिकाणीं येणार. या स्थलीं 'वर्तमानसामीप्ये वर्तमानवद्गा' सू. २७८९ या सूत्रानें लट्ल्काराचा प्रयोग केला आहे. रामाचा बाण लागून मारीच समुद्राजवळ पडला व त्यानें तपश्चर्या केली हें रामायणांत प्रसिद्ध आहे. एकाची क्रिया दुसऱ्यानें करणें व दुसऱ्याची क्रिया त्या पहिल्या पुरुषानें करणें अशा प्रकारचा क्रियाविनिमय संभवतो असें वरील श्लोकावरील जयमङ्गला टीकेंत म्हटलें आहे (शब्दरत्नकारांच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं 'तव धर्मेण मम धर्मो व्यतिस्ते' या अर्थामध्यें 'व्यतिस्ते' हा जो एकवचनाचा प्रयोग भट्टिकाव्यांत केला आहे तो व्याकरणरीत्या शुद्ध ठरत असल्यामुळें, दीक्षितांनीं मनोरमेंत 'व्यतिसे' असा जो मध्यम पुरुषाच्या एकवचनाचा प्रयोग केला आहे तो देखील शुद्ध ठरतो.) 'हे चैत्र मैत्रेण सह व्यतिसे–व्यत्यस्तो भवसि' अशा प्रकारच्या वाक्यांत असणाऱ्या 'व्यतिसे' या क्रिया-पदाचा प्रयोग मनोरमेंत उदाहरणरूपानें दिला आहे व त्या वाक्याचा असा अर्थ फलित होतो कीं, ज्या देशामध्यें मैत्राची सत्ता होती तेथें आतां चैत्राची सत्ता झाली असून ज्या देशांत चैत्राची सत्ता होती तेथें मैत्राची सत्ता झाली आहे, म्हणजे चैत्र व मैत्र या दोघांनीं आपसांत आपल्या स्थानांचा विनिमय केला आहे. 'व्यतिसे' या स्थलीं ('पदस्य आदिः पदादिः' या षष्ठीसमासपक्षांत 'से' या प्रत्ययाचा अवयव जो सकार त्याचें षत्व होण्याची शंकाकारानें जी आपत्ति दिली होती त्या आपत्तीचें निवारण करण्याकरितां)

दीक्षितांना असें जरी म्हणतां येणें शक्य होतें कीं, 'व्यपदेशिवदे-
कस्मिन्'—परि. ३०—या परिभाषान्वयें ज्याप्रमाणें एकाच्त्व इत्यादि
अशास्त्रीय धर्मांचा (जेथें समुदायांत इतर वर्ण नसून केवळ एकच
अच्. आहे अशा ठिकाणीं देखील, ती परिभाषा केवळ लौकिक
न्यायाच्या आधारावर रचली असल्यामुळें,) अतिदेश करतां येतो
(आणि अशा रीतीनें व्यपदेशिवद्भावानें 'व्यतिसे' यांतील 'से'
हें पदसंज्ञक मानतां येतें व त्यामुळें 'सात्पदाद्योः' हा निषेध प्रवृत्त
होऊन, पदस्य आदिः पदादिः' या षष्ठीसमासपक्षांत देखील 'से'
या पदांतील आद्य सकाराचें षत्व होत नाहीं,) आणि तसेंच
'रामेषु' या उदाहरणासंबंधानें दीक्षितांना जरी असें म्हणतां येणें
शक्य होतें कीं, 'रामेषु' या स्थलीं 'सु' हा प्रत्यय ('व्यतिसे'
या उदाहरणांतील 'से' या प्रत्ययासारखा असहाय नसून) ससहाय
असल्यामुळें, त्याचे ठिकाणीं व्यपदेशविद्भावाची प्रवृत्ति करतां येत
नाहीं (व त्यामुळें 'सु' हा प्रत्यय पदसंज्ञक ठरत नसल्यामुळें त्याला,
षष्ठीसमासपक्ष मानला असतां, 'सात्पदाद्योः' हा निषेध लागू पडत नाहीं
आणि त्यामुळें त्या प्रत्ययांतील सकाराचें षत्व होण्यांत कांहीं अडचण
येत नाहीं,) तरी दीक्षितांनीं तसे म्हटलें नाही याचें कारण हें कीं,
शंकाकारानें ('व्यतिसें' या उदाहरणांत 'से' या प्रत्ययाला व्यपदे-
शिवद्भावानें पदसंज्ञा होऊं शकत नाहीं असें) जें म्हटलें आहे
तें त्याचें म्हणणें (वादाकरितां तेवढ्यापुरतें) स्वीकारून, त्याच्या
शंकेवर 'न वयं प्रत्ययमात्रस्य तदन्तता ब्रूमः' इत्यादि मनोरमेंत
उत्तर दिलें आहे, म्हणजे 'व्यपदेशिवदेकस्मिन्' ही परिभाषा वरील
उदाहरणांत लागू पडत नाहीं हें जें शंकाकाराचें म्हणणें आहे तें
तात्पुरते स्वीकारून दीक्षितांनीं त्याच्या शंकेचें, एकदेशविकृतन्यायाची
प्रवृत्ति करून, निरसन केलें आहे. ('व्यतिसे' व 'रामेषु' या
दोन उदाहरणांत अत्यंन्त महत्त्वाचा फरक आहे व तो हा कीं,
'व्यतिसे' यांतील 'से' हा प्रत्यय असहाय असून 'रामेषु' यांतील
'सु' हा प्रत्यय ससहाय आहे. असें म्हणण्याचें कारण हें कीं,

ज्या 'अस्' धातूहून 'से' हा प्रत्यय झाला आहे त्या 'अस्' प्रकृतीचा पूर्वी सांगितल्याप्रमाणें लोप होऊन 'से' हा प्रत्ययच अवशिष्ट राहिला आहे व अशा रीतीनें त्याला त्याच्या प्रकृतीचें जें सहाय होतें तें नाहींसे झाल्यामुळें, तो असहाय ठरतो. परंतु 'रामेषु' या स्थलीं ज्या 'राम' प्रकृतीहून 'सु' हा प्रत्यय झाला आहे त्या प्रकृतीचा लोप झाला नसून ती विद्यमान असल्यामुळें, त्या 'सु' प्रत्ययाला त्याच्या प्रकृतीचें सहाय व सान्निध्य आहे आणि अशा रीतीनें तो 'सु' प्रत्यय ससहाय ठरतो. 'व्यपदेशिवदेकस्मिन्' ही परिभाषा ससहायाला लागत नसून असहायालाच लागत असल्यामुळें, 'अस् से' या प्रकृतिप्रत्ययसमुदायाला 'सुप्तिङन्तं पदम्' सू. २९ सूत्रानें जी पदसंज्ञा झाली होती तिचा 'से' या अवशिष्ट असहाय अवयवाचे ठिकाणीं अतिदेश होऊन 'से' याला पदसंज्ञा होते. पण 'रामेषु' यांतील 'सु' हा प्रत्यय वर सांगितल्याप्रमाणें, ससहाय असल्यामुळें, त्या प्रत्ययाचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भावानें पदसंज्ञेचा अतिदेश करतां येत नाहीं व त्यामुळें 'सु' हें पदसंज्ञक ठरत नाहीं. आतां कोणी असें म्हणेल कीं, 'व्यतिसे' यांतील 'से' या प्रत्ययाला 'व्यति' याचें सहाय असल्यामुळें, तो प्रत्यय देखील ससहाय ठरतो, पण हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण 'प्रथमं धातुः साधनेन युज्यते पश्चादुपसर्गेण' या न्यायान्वयें 'से' हा प्रत्यय 'अस्' धातूहून झाला असून 'व्यति अस्' या समुदायाहून तो प्रत्यय झाला नसल्यामुळें, 'व्यति' हा समुदाय विजातीय–प्रकृतिभिन्न-ठरतो व तशा विजातीय समुदायाच्या सन्निध्यानें 'से' हा प्रत्यय ससहाय ठरत नाहीं. 'अस्' धातूचें त्याला सान्निध्य असतें तरच तो ससहाय ठरला असता; पण त्याला तसें सान्निध्य नसल्यामुळें तो असहाय ठरतो व त्याला व्यपदेशिवद्भावानें पदसंज्ञा होते आणि त्यामुळें षष्ठीसमासपक्षांत देखील त्याच्या आद्य सकाराचें षत्व होत नाहीं.) 'न त्वेकादेशे कृते ......इति सिद्धान्तात्' असें जें मनोरमेंत म्हटलें आहे त्याचा भावार्थ हा आहे कीं, 'सुप्तिङन्तं पदम्' या सूत्रांत 'यस्मात्प्रत्यय-

विधिः 'या पूर्व सूत्राची अनुवृत्ति होते. (त्यामुळें त्या सूत्राचा असा अर्थ होतो कीं, ज्या प्रकृतीहून 'सुप्' किंवा 'तिङ्' प्रत्यय झाला आहे ती प्रकृति ज्याच्या पूर्वी आहे व तो प्रत्यय ज्याच्या अन्तीं आहे अशा तदादितदन्त समुदायाला पदसंज्ञा होते.) 'राम औ' या स्थलीं वृद्धिरूप एकादेश केल्यावर देखील तो एकादेश परादिवद्भावाने 'औ' हा प्रत्ययच आहे असें मानलें असतां, 'राम' अशी जी मकारान्त प्रकृति अवशिष्ट राहते ती एकदेशविकृतन्यायानें 'राम' अशी मूळची प्रकृति आहे असें मानतां येतें. (त्यामुळें 'रामौ' हा शब्द तदादितदन्त ठरून त्याला पदसंज्ञा होण्यांत कांहीं अडचण येत नाहीं.) 'अनुपयोगाच्च' या स्थलीं 'च' हें पद घातलें असल्यामुळें दीक्षित असें सुचवितात कीं, ससहायाचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत नसल्यामुळें, प्रकृतीहून झालेल्या व त्या प्रकृतीच्या सान्निध्यांत त्या प्रकृतीच्या लगेंच पुढें असलेल्या प्रत्ययाला पदसंज्ञा होऊं शकत नाहीं. (कारण तसा प्रत्यय, त्याची प्रकृति विद्यमान असल्यामुळें व तो तिच्या सान्निध्यांत असल्यामुळें, ससहाय ठरतो व ससहायाचे ठिकाणीं 'व्यपदेशिवदेकस्मिन्' ही परिभाषा वर सांगितल्याप्रमाणें प्रवृत्त होत नसल्यामुळें, 'रामेषु' या स्थलीं 'सु' या ससहाय प्रत्ययाला व्यपदेशिवद्भावानें पदसंज्ञा होऊं शकत नाहीं.) 'आद्यन्तवदेकस्मिन्' सू. १–१–२१ या सूत्रावरील भाष्यांत 'एकपुत्र' इत्यादि जे दृष्टान्त दिले आहेत त्या दृष्टान्तांच्या सामर्थ्यानें वर जसा ('व्यपदेशिवदेकस्मिन्' या परिभाषेचा) अर्थ केला आहे तसाच अर्थ होतो, म्हणजे ससहायाचे ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येत नसून असहायाचेंच ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येतो हा अर्थ सिद्ध होतो. ('आद्यन्तवदेकस्मिन्' या सूत्रावरील भाष्यांत भाष्यकार म्हणतात–'यथा तर्हि बहुषु पुत्रेष्वेतदुपपन्नं भवत्ययं मे ज्येष्ठोऽयं मे मध्यमोऽयं मे कनीयानिति। भवति चैतदेकस्मिन्नप्ययमेव मे ज्येष्ठोऽयमेव मे मध्यमोऽयमेव मे कनीया-

निति । तथोऽसूतायामसोष्यमाणायां च भवति प्रथमगर्भेण हतेति । तथाऽनेत्याऽनाजिगमिषुराहेदं मे प्रथममागमनमिति ।' या वरील भाष्यांत तीन दृष्टान्त दिले आहेत. पहिला दृष्टान्त एकपुत्राचा, म्हणजे ज्याला एकच पुत्र आहे अशा पुरुषासंबंधानें, असून दुसरा दृष्टान्त प्रथमच प्रसूत झालेल्या व लगेंच मेलेल्या स्त्रियेचा आहे; व तिसरा दृष्टान्त अशा पुरुषासंबंधानें आहे कीं, जो प्रथमच एखाद्या दूर देशांत आला आहे व पुढें त्याचें तेथें येणें कधींहि संभवनीय नाहीं. पहिल्या दृष्टान्तांत एकाच मुलाला जेष्ठ, मध्यम, कनिष्ठ हे शब्द, तो एकटाच असल्यामुळें, लावले जातात. दुसऱ्या व तिसऱ्या दृष्टान्तांत पुढें गर्भ होणें किंवा पुन्हा आगमन होणें संभवनीय नसल्यामुळें, तशा असहाय गर्भाला व आगमनाला 'प्रथम' हा शब्द व्यपदेशिवद्भावानें लावला जातो. या तीन्ही दृष्टान्तांवरून हें स्पष्ट होतें कीं, असहायाचेच ठिकाणीं व्यपदेशिवद्भाव करतां येतो.)

विद्वानांनी प्रशंसिलेलें

नागेशभट्टकृत

परिभाषेन्दुशेखराचें

मराठी भाषांतर

(विस्तृत विवरणासह व प्रक्रियेसह)

कागदी बांधणीच्या प्रतीची किंमत रु. ५—०—०

कापडी बांधणीच्या प्रतीची किंमत रु. ६—०—०

टपालखर्च सुमारे ७५ नये पैसे, निराळा.

अनुवादक व प्रकाशक

रा. ब. नारायण दाजीबा वाडेगांवकर, एम्. ए.

रिटायर्ड डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज, नागपूर.

खास विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां हें भाषांतर तयार करण्यांत आलें आहे. विद्यार्थ्यांना कंटाळवाणें होऊं नये म्हणून फक्त महत्वाच्या विषयांचेंच यांत विवेचन केलें आहे. महाराष्ट्रीय विद्यार्थीवर्गानें प्रस्तुत ग्रंथापासून अवश्य लाभ घ्यावा. शिवाय शास्त्री—पंडितांना तसेच संस्कृत—भाषाभिमानी लोकांनाहि हें पुस्तक उपयुक्त वाटेल असा विद्वानांचा अभिप्राय आहे.

—पुस्तकें मिळण्याचा पत्ता—

खं. [illegible]ा. वाडेगांवकर, रा. ब. वाडेगांवकर यांचा बंगला,

धन्तोली, नागपूर.